।। श्रीगुरुदेवचरित्र ।।

श्री. प.प. सद्‌गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामिमहाराज
यांचे संक्षिप्त चरित्र व स्मृतिसौरभ

श्री. प.प. सद्‌गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामिमहाराज

संकलनकर्ता :
श्री. दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वरशास्त्री
(विद्यावाचस्पती)

श्रीवासुदेवानन्दसरस्वतीग्रन्थमाला

श्रीगुरुदेवचरित्र

(स्मृतिसौरभ पुरवणीसह सुधारित आवृत्ती)

श्री.प.प. सद्गुरुवासुदेवानन्दसरस्वती
टेम्बेस्वामिमहाराज यांचे संक्षिप्त चरित्र

संकलनकर्ता :
दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वरशास्त्री (विद्यावाचस्पती)

दहावी आवृत्ती

मूल्य रुपये १००/-

नववी आवृत्ती :
चैत्र शुद्ध १, शके १९३४
(गुढीपाडवा - नववर्षदिन)
शुक्रवार दि. २३ मार्च २०१२

दहावी आवृत्ती :
चैत्र शुद्ध १, शके १९३६
(गुढीपाडवा - नववर्षदिन)
सोमवार दि. ३१ मार्च २०१४

प्रकाशक :

श्री. श. ज. जोशी, प्रधान विश्वस्त,
प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीस्वामिमहाराज
व
प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामिमहाराज
स्मारक ट्रस्ट, पुणे-४११ ००४.

मुद्रक :

विजय घाटपांडे
जय-भारत प्रिंटिंग प्रेस,
शिवाजी पथ, ठाणे-४०० ६०२.

(श्री. प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामिमहाराज
यांचा रंगीत फोटो आतमध्ये आहे.)

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ॥

प्रकाशकाचे निवेदन (पहिल्या आवृत्तीसंबंधी)

श्री.प.प. सद्गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीस्वामिमहाराज यांच्या संकलित चरित्राचे पुनर्मुद्रण करण्याचा योग त्यांच्याच कृपेने आज येत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. श्रीमहाराजांचा जयन्तीचा शताब्दिमहोत्सव शके १८७६ श्रावण कृष्ण पंचमीस हैद्राबाद येथे प.पू. श्रीगुळवणी महाराजांनी केला. त्यावेळी त्यांच्या संपूर्ण वाङ्मयाबरोबर या श्रीगुरुदेव चरित्राचेही प्रकाशन झाले होते. श्रीटेम्बेस्वामिमहाराजांच्या चरित्राचे संकलन, श्रीमान् गणेशपंत सातवळेकर यांनी अनेक पूर्व चरित्रांच्या आधाराने व त्या त्या गुरुभक्तांचा समक्ष विचार घेऊनही करून ठेवले होते व ते स्वतःचे संकलनात्मक लिखाण प.पू. श्रीगुळवणी महाराजांचेकडे देऊन ठेवले होते. त्यांच्या अनुमतीने श्रीमहाराजांनी ते लिहूनही ठेवले होते. ईशेच्छेनुसार प्रसंग आल्यास याचे प्रकाशनही करण्यास त्यांची संमतीही त्यांनी घेऊन ठेवली होती. त्यावरून व इतरही माहितीवरून हे 'श्रीगुरुदेवचरित्र' शताब्दीसमयी संकलित करून त्याचे प्रकाशन केले व पुढेही त्याच्या तीन (चार) आवृत्त्या निघाल्या. श्री. गणेशपंत सातवळेकर यांचीही सुप्त इच्छा यामुळे फलद्रूप झाल्याने त्यांच्याही आत्म्यास समाधान वाटले असेल. या प्रकाशनसमयी ते दुर्दैवाने नव्हते. नाहीतर त्यांचे नेतृत्वाखालीच हैद्राबादला प्रकाशन समारंभ झाला असता. तथापि यावेळी त्यांच्या चिरंजीवांचेकडे पत्राने विचारणा केली गेली होती. त्यांचेकडूनही याबद्दल त्यावेळी संमति मिळाली होती. याप्रमाणे श्रीगुरुभक्त सातवळेकरांच्या सौजन्यानेच हा ग्रंथ प्रकाशित होऊ शकला ही वस्तुस्थिती कृतज्ञतेने यावेळी आम्ही व्यक्त करीत आहोत. या त्यांच्या ऋणातून अंशतः तरी मुक्त व्हावे या उद्देशाने 'स्तोत्रादि संग्रहा' ची शंभर पुस्तके माणगावी श्रीमहाराजांच्या देवस्थानाकडे याच्या विक्रीच्या द्रव्याचा विनियोग व्हावा म्हणून त्यावेळी पाठविली होती व यावेळीही त्या संस्थेकरिता श्रीगुरुदेव चरित्राच्या काही प्रती अथवा तितके द्रव्य, तेथील ट्रस्टींच्या विचारे माणगावी पाठविणेचा आमचा मानस आहे. हे प्रकाशन एका संस्थेतर्फे होत असून याच्या द्रव्याचा विनियोग श्रीमहाराजांच्या समग्र ग्रंथांचे पुनर्मुद्रण करून ते अल्प मूल्यात जिज्ञासूंना देता यावे असा विश्वस्तांचा मानस आहे. तरी प.पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या आदेशानुसार चालू असणाऱ्या या संस्थेच्या कार्याकडे सर्व सज्जनांनी आत्मीय दृष्टीने लक्ष पुरवून संस्थाभिवृद्धीचे श्रेय मिळवावे. तशी बुद्धी सर्वांना सर्वांतर्यामी, सर्वधीप्रेरक भगवान् श्रीवासुदेव देवो हीच अंतिम प्रार्थना.

॥ श्री श्रीगुरवे नमः ॥

पाचव्या आवृत्तीसंबंधी थोडेसे...

प.प. सद्गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामिमहाराज यांचे संक्षिप्त चरित्र याची ही पाचवी आवृत्ती आहे. भक्तिमार्गाचे महत्त्व व्यक्त करण्याकरिता ४०-४५ वर्षांपूर्वी प.पू. श्रीगुळवणीमहाराजांनी चरित्र प्रसिद्ध केले. सद्गुरुंच्या आदेशानुसार चालू असणाऱ्या या संस्थेच्या कार्याकडे सर्व सज्जनांनी आत्मीय दृष्टीने लक्ष पुरवून संस्थाभिवृद्धीचे श्रेय मिळवावे. तशी बुद्धी सर्वांना सर्वधीप्रेरक श्रीवासुदेव देवो हीच अंतिम प्रार्थना !

श्रीगुरुदेवकृपाभिलाषी
दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर
श्रीवासुदेव निवास, कर्वे रोड,
पुणे-४.

ज्येष्ठ शु.४ शके १९१८
मंगळवार, दि. २१-५-१९९६

सहाव्या आवृत्तीच्या निमित्ताने...

श्री.प.प. सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीटेम्बेस्वामिमहाराज यांचे संक्षिप्त चरित्राची सहावी आवृत्ती आज प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे.

प.पू. श्रीगुळवणी महाराज यांच्या संकल्पानुसार हे कार्य घडत आहे. ईश्वरकृपेने सर्व भक्तमंडळींकडून याचे वाचन, चिंतन घडून योग्य त्या मार्गदर्शनाने ते कृतार्थ व्हावेत अशी भगवान् श्रीवासुदेवांजवळ निरंतर प्रार्थना आहे.

सद्गुरूंच्या आदेशानुसार चालू असणाऱ्या या संस्थेच्या कार्याकडे सर्व सज्जनांनी आत्मीय दृष्टीने लक्ष पुरवून संस्थावृद्धीचे श्रेय मिळवावे व सर्वांचे कल्याण व्हावे ही विनंती.

कृपाभिलाषी
नारायण यशवंत ढेकणे
प्रधान विश्वस्त,
श्रीवासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे-४.

भाद्रपद शु. १४ शके १९२३
शनिवार, दि. १-९-२००१

नवव्या आवृत्तीच्या निमित्ताने...

मंगल आशीर्वाद !

प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेम्बे) स्वामी (आपले परमगुरु). यांच्या चरित्राच्या नवव्या आवृत्तीचे प्रकाशन करण्याचा सुयोग येत आहे ही अतिशय संतोषजनक घटना आहे. विशेष करून हे प्रकाशन प.पू. श्री.टेंबेस्वामिमहाराज यांचे समाधिशताब्दी वर्षाच्या अनुषंगाने होत आहे, हाही शुभयोग आहे. श्रीसद्गुरुमहिमा संवर्धन करणाऱ्या प.पू. योगिराज श्रीगुळवणी महाराजांच्या संकल्पाने व कृपेने ही शुभघडी प्राप्त झाली आहे. सदर आवृत्ती 'स्मृतिसौरभ' पुरवणीसह सुधारून एकत्र देत आहोत. शास्त्रानुसारी आचारधर्माचा जणू दीपस्तंभच, असे त्यांचे संपूर्ण जीवन जिज्ञासू, आर्त, मुमुक्षु अशा सर्वांना मार्गदर्शक आहे. या चरित्र चिंतनाद्वारे सर्व वाचक भक्तांनी आपले कल्याण साधावे व 'वासुदेव: सर्वमिति' अशा उच्च भूमिकेस पात्र व्हावे, अशी श्रीदत्तात्रेयावतारी प.प. श्रीटेम्बे (थोरल्या) स्वामिमहाराजांचे चरणी प्रार्थना आहे.

सर्वांचा कल्याणेच्छु

नववर्षदिन — **नारायण यशवंत ढेकणे**

चैत्र शुद्ध १, शके १९३४ — प्रधान विश्वस्त,

शुक्रवार, दि. २३-३-२०१२ — श्रीवासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे-४.

दहाव्या आवृत्तीच्या निमित्ताने...

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती(टेम्बे) स्वामी महाराज यांच्या चरित्राची दहावी आवृत्ती, प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या समाधी शताब्दी वर्षात व श्री वासुदेव निवास च्या सुवर्ण महोत्सवी वर्षात (२०१३-१४) प्रकाशित करण्याचा सुयोग येत आहे. हीच ईशकृपा !

प्रकाशन संस्था, लेखक, वाचक आदि सर्वांनाच याचे समाधान होत आहे. सर्व भक्त मंडळींचे/अभ्यासकांचे परमकल्याण श्रीस्वामीकृपेने साध्य होवो ही त्यांचे चरणाविंदी प्रार्थना !

सर्वांचा कल्याणेच्छु

नववर्षदिन — **श. ज. जोशी**

चैत्र शुद्ध १, शके १९३६ — प्रधान विश्वस्त,

सोमवार, दि. ३१-३-२०१४ — श्रीवासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे-४.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज यांचे एकूण २३ चातुर्मास केव्हा व कोठे झाले त्याची अनुक्रमणिका

चातुर्मास	अनुक्रम	ठिकाण	शके
चातुर्मास	१	श्रीक्षेत्र उज्जैन	शके १८१३
चातुर्मास	२	ब्रह्मावर्त	शके १८१४
चातुर्मास	३	हरिद्वार	शके १८१५
चातुर्मास	४ व ५	हिमालय	शके १८१६-१७
चातुर्मास	६	हरिद्वार	शके १८१८
चातुर्मास	७	पेटलाद	शके १८१९
चातुर्मास	८	तिलकवाडा	शके १८२०
चातुर्मास	९	द्वारका	शके १८२१
चातुर्मास	१०	चिखलदा	शके १८२२
चातुर्मास	११	महत्पूर	शके १८२३
चातुर्मास	१२	ब्रह्मावर्त	शके १८२४
चातुर्मास	१३	ब्रह्मावर्त	शके १८२५
चातुर्मास	१४	ब्रह्मावर्त	शके १८२६
चातुर्मास	१५	नरसी	शके १८२७
चातुर्मास	१६	बढवाई	शके १८२८
चातुर्मास	१७	तंजावर (संध्यामंडप)	शके १८२९
चातुर्मास	१८	मुक्त्याला	शके १८३०
चातुर्मास	१९	पवनी	शके १८३१
चातुर्मास	२०	हावनूर	शके १८३२
चातुर्मास	२१	कुरुगड्डी	शके १८३३
चातुर्मास	२२	चिखलदा	शके १८३४
चातुर्मास	२३	श्रीक्षेत्रगरुडेश्वर	शके १८३५

श्रीवासुदेव निवासाची प्रकाशने

१. शिक्षात्रयम् (सार्थ संस्कृत) स्त्रीशिक्षा (प्राकृत)
२. श्रीदत्तमाहात्म्य (प्राकृत) ओवीबद्ध
३. श्रीदत्तचंपू (संस्कृत - सार्थ)
४. श्रीगुरुचरित्र त्रिशती काव्य (दत्तकाव्य) संस्कृत सार्थ
५. प.प. श्रीटेंबेस्वामीकृत स्तोत्रसंग्रह (संस्कृत) व पदसंग्रह (प्राकृत)
६. श्रीसत्यदत्त पूजा कथा संग्रह (संस्कृत-मराठी अर्थासह)
७. श्रीदत्तात्रेय षोडशावतार पूजाविधान (तिसऱ्या व सोळाव्या अवतार कथांसह)(संस्कृत) व सर्व सोळा अवतारांच्या कथा-सार्थ
८. श्रीकृष्णालहरी (संस्कृत)
९. प.प. श्रीनारायणस्वामी चरित्र (प्राकृत)
१०. प.प. श्रीटेंबेस्वामीचरित्र - श्रीगुरुदेवचरित्र (प्राकृत)
११. प.प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीचरित्र (प्राकृत)
१२. श्रीगुरुवामनत्रिपदी (प्राकृत) ओवीबद्ध
१३. श्रीदत्तभावसुधारसस्तोत्र (संस्कृत)
१४. श्रीदत्तलीलामृताब्धिसार (प्राकृत) ओवीबद्ध
१५. श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार (प्राकृत) ओवीबद्ध
१६. द्विसाहस्रीगुरुचरित्र (संस्कृत) व प्राकृत ओवीबद्ध
१७. श्रीगुरुमाहात्म्यम् (संस्कृत)
१८. योगवाणी (सिद्धयोगोपदेश) प्राकृत
१९. महायोगविज्ञान (प्राकृत)
२०. सूतसंहिता भाग १ व २
२१. श्रीसद्गुरु-साधक-सुसंवाद (प्राकृत)
२२. स्मर्तृगामींच्या स्मृती (प्राकृत)
२३. जीवनगंगा कलश १ ते ४ (प्राकृत)
२४. प्रयाग - प.पू. कवीश्वर महाराज चरित्र (प्राकृत)
२५. मूर्तिमंत भागवत - प.पू. कवीश्वर महाराज चरित्र (प्राकृत)
२६. प.प. श्रीटेंबेस्वामी प्रश्नावली (प्राकृत)
२७. प.प. श्रीटेंबेस्वामीकृत माघमाहात्म्य (प्राकृत) ओवीबद्ध

२८. प.प. श्रीटेंबेस्वामीचरित्रम् (संस्कृत)
२९. प.प. श्रीटेंबेस्वामीकृत मंत्रविधानम् (संस्कृत-प्राकृत)
३०. वेध वामनाचा(प्राकृत)प.पू. श्रीगुळवणीमहाराज चरित्र (प्राकृत)

प्राप्तीस्थान : श्रीवासुदेव निवास, ४२/१७, एरंडवणे, कर्वे रोड,
पुणे-४११००४. फोन नं. : २५४५५५८४.

श्रीवासुदेव निवास वेबसाईट व इमेल :
www.vasudevniwas.org
Email : info@vasudevniwas.org

❖ ❖ ❖

।। श्रीदत्तात्रेयस्तोत्रम् ।।

दत्तात्रेय त्वां नमामि प्रसीद त्वं सर्वात्मा सर्वकर्ता न वेद।
कोप्यंतं ते सर्वदेवाधिदेव ज्ञाताज्ञातान्मेऽपराधान्क्षमस्व ॥१॥
त्वदुद्भवत्त्वात्त्वदधीनधीत्त्वात्त्वमेव मे वंद्य उपास्य आत्मन्।
अथापि मौढ्यात्स्मरणं न ते मे कृतं क्षमस्व प्रियकृन्महात्मन् ॥२॥
भोगापवर्गप्रदमार्तबंधुं कारुण्यसिंधुंपरिहाय बंधुम्।
हिताय चान्यं परिमार्गयंति हा मादृशो नष्टदृशो विमूढाः ॥३॥
न मत्समो यद्यपि पापकर्ता न त्वस्तमोऽथापि हि पापहर्ता।
न मत्समोऽन्यो दयनीय आर्य न त्वत्समः क्वापि दयालुवर्य ॥४॥
अनाथनाथोऽसि सुदीनबंधुः श्रीशानुकंपामृतपूर्णसिंधुः।
त्वत्पादभक्तिं तव दासदास्यं त्वदीयमंत्रार्थदृढैकनिष्ठाम् ॥५॥
गुरुस्मृतिं निर्मलबुद्धिमाधिव्याधिक्षयं मे विजयं च देहि।
इष्टार्थलब्धिं वरलोकवश्यं धनान्नवृद्धिं हयगोसमृद्धिं ॥६॥
पुत्रादिलब्धिं म उदारतां च देहीश मे चास्त्वयं हि शांतिः।
ब्रह्माग्निभूभ्यो नम ओषधीभ्यो वाचे नमो वाक्पतये च विष्णवे ॥७॥
शांतास्तु भूर्नः शिवमंतरिक्षं द्यौश्चाभयं मेस्तु दिशः शिवाश्च।
आपश्च विद्युत्परिपांतु देवाः शं सर्वतो नोऽभयमस्तु शांतिः ॥८॥

इति प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं
दत्तात्रेयस्तोत्रम्।।

श्री. प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामीमहाराज



जन्मकाल :
रविवार,
श्रावण कृष्ण पंचमी
शके १७७६

समाधिकाल :
मंगळवार,
आषाढ शुक्ल प्रतिपदा
शके १८३६



श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामिमहाराज यांचे

संक्षिप्त चरित्र

सदानन्दति विद्वत्त्वात् सर्वदाऽति विभुत्वतः ।।
मृत्युंजयति योगित्वाद्यः स मे हृदि तिष्ठतु ।।१।।

नमः श्रीगुरो मेशधीशे दयाब्धे
भयार्तिघ्न ते स्वात्मदो वासुदेव ।
यतीट्सेवितानन्दपादाब्जयुग्मं
सदा मे हृदि स्थात्नुतां यातु देव ।।२।।

पूर्वार्ध

सद्गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीस्वामिमहाराजांचे उपलब्ध झालेले सर्व ग्रंथ नुकतेच प्रकाशित झालेले आहेत. त्याबरोबर श्रीमहाराजांचे चरित्रही, साररूपाने का होईना, प्रकाशित झाल्यास बरे होईल असे वाटल्यावरून श्रीगुरुस्मरणपूर्वक यथामति चरित्रलेखनास आरंभ करीत आहे. 'वीतरागविषयं वा चिम्' या योगसूत्रकारांच्या आदेशाप्रमाणे जीवन्मुक्तमहानुभवांच्या चरित्राचे समालोचन हे चित्तस्थैर्यसंपादक असल्याने ही प्रवृत्ति होत आहे. हृदयस्थ परमात्माच बुद्धिदाता असून कार्यसिद्धीही त्याच्याच कृपेने होणारी आहे. करिता त्या सर्वसाक्षी सर्वचित्तवृत्ति-संचालक सिद्धिबुद्धिपतीचे चरणी हे महत्कार्य निर्विघ्न पार पाडण्याबद्दल प्रथम आम्ही प्रार्थना करीत आहो.

सावंतवाडी संस्थानपैकी माणगांव हे गांव सावंतवाडीपासून ८-९ मैल अंतरावर आहे. तेथे सावंतवाडीहून मोटारी रोज जातात. गांवची

वस्ती अंदाजे ३-४ हजारांपर्यंत होईल. ब्राह्मणांची घरे २०-२५ आहेत. गावापासून एकदीड मैल अंतरावर निर्मला नावाची नदी पश्चिमाभिमुख वहात आहे. गावातील मुख्य देवता यक्षिणी असून तिचे स्थान गांवातच मध्यभागी आहे. गावातील ब्राह्मणांच्या निर्वाहाचे साधन म्हणजे भिक्षुकवृत्ती हेच आहे.

सावंतवाडी संस्थानचे सरहद्दीनजिकचे एका गावात हरीभट टेंबे या नावाचे एक सच्छील ब्राह्मण सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी रहात होते. हेच श्रीमहाराजांचे आजोबा होत. हे ऋग्वेदांतर्गत शाकलशाखीय असून यांचे गोत्र अत्रि आहे. हे उत्तम वैदिक असून शिवाय याज्ञिकीही उत्तम प्रकारे करीत असत. यांचे हस्ताक्षर फारच सुंदर होते. पूर्वी मुद्रणाची सोय नसल्याने हातानेच ग्रंथ लिहून काढण्याची पद्धती होती. लेखकांचा स्वतंत्र असा एक तो धंदाच होता. त्यामुळे एखादी गुरुचरित्रासारखी पोथी लिहवून घेण्यास बरेच मूल्य द्यावे लागत होते. श्रीहरिभटजींनी शके १७५२ साली स्वहस्ताने लिहिलेली श्रीगुरुचरित्राची पोथी अद्यापि उत्कृष्ट स्थितीत आहे. याप्रमाणे पूर्वीच्या काळी फार प्रयत्नाने पोथ्या लिहाव्या लागत असल्यामुळे त्याचे महत्व लोकांना विशेष वाटत होते. पोथ्या म्हणजे एक प्रकारचे स्थावर धन समजले जात असे. आता तर मुद्रण-कलेच्या विकासामुळे पुस्तकांचा सुकाळ वाटू लागल्यामुळे 'अतिपरिचयादवज्ञा' या न्यायानुसार जुन्या लेखी पोथ्यांकडे कोणी पहाण्यासही राजी होत नाही अशी स्थिती झालेली आहे.

माणगावी वेदमूर्ति सीतारामभट कोनकर यांचे घरी प्रथम वे. हरीभट यांना आश्रय मिळाला. यांची विद्वत्ता व सदाचार पाहून गावात व परगावीही यांनाच धर्मकार्याकरिता लोक बोलावू लागले. प्रथम उपजीविकेचे साधन पहाण्याकरिता म्हणून वेदमूर्ति हरीभट हे एकटेच वेदमूर्ति कोनकरांचे घरी येऊन राहिले. योगायोगाने दोघांचे प्रेम वाढू लागले. काही दिवसांनी वे. कोनकरांच्या सांगण्याप्रमाणे आपल्या गावी जाऊन वे. हरीभटजींनी आपले कुटुंब, काशी नावाची मुलगी व गणेश नावाचा मुलगा यांच्यासह माणगांवी येऊन कायमचेच वास्तव्य केले.

वेदमूर्ति कोनकरांना पुत्र नसून फक्त येसूबाई म्हणून एक मुलगी होती. त्यांचे प्रथम कुटुंब निवर्तल्यामुळे वे. हरीभटजींनी त्यांना नंतर आपली मुलगी काशी ही दिली. लग्न झाल्यावर तिचे नाव अन्नपूर्णाबाई असे ठेवले. वेदमूर्ति कोनकरांनीही आपली मुलगी येसूबाई ही वे. हरीभटजींचा मुलगा गणेश यास दिली. यांचे घरी आल्यावर तिचे नाव रमाबाई असे ठेवले. पुढे लवकरच वेदमूर्ति कोनकर निवर्तल्यामुळे वेदमूर्ति हरीभट हेच आपल्या गतधवा मुलीचे सर्व पाहू लागले. अन्नपूर्णाबाई कोनकर यांनी आपली इस्टेट व पुरोहित वृत्ती आपली सावत्र मुलगी रमाबाई हिलाच हक्कदार म्हणून दिली, त्यामुळे गणेशभटजी टेंबे हेच माणगांवचे स्थायिक वतनदार बनले. कारण ते अन्नपूर्णाबाईंचे जामातच होते. याप्रमाणे वे. हरीभटजींचे कायमचे राहाणे माणगावी होण्याचा योग आला. त्यांनी आपल्या पूर्वीच्या गावातील घर वगैरे विकूनही टाकले. माणगावात स्थायिक झाल्यावर वेदमूर्ति हरीभटजींना रामकृष्ण, बाळकृष्ण व विष्णू असे तीन मुलगे आणि यमुना व भीमा अशा दोन मुली झाल्या, म्हणजे हरीभटजींना एकंदर चार मुलगे व तीन मुली अशी अपत्ये झाली.

हरीभटजींचे ज्येष्ठ चिरंजीव गणेशभट हेच श्रीमहाराजांचे पिताजी व रमाबाई या माता होत्या. गणेशभटजींना अपस्माराचा म्हणजे फीट येण्याचा विकार जन्मभर होता. म्हणून घरच्या मंडळींनी त्यांना कोठेही दूर अपरिचित स्थळी जाऊ नका असे सांगावे. पण ते प्रारब्धवादी असल्याने त्यांनी सांगावे की सर्वांच्या जीवनाचा व मरणाचा काल व देश ठरलेला आहे. कोणीही कितीही काळजीने वागले तरी तो चुकविता येत नाही किंवा निष्काळजीने वागले म्हणून तो अलिकडे येत नाहीं - गणेश-भटजींची वृत्ती अत्यंत सात्विक व महादेवांचेप्रमाणे भोळी होती. पूर्वसंस्कारानुसार श्रीदत्तप्रभूंचे चिंतनाकडे यांची विशेष प्रवृत्ती असल्याने अर्थातच प्रपंचाकडे यांचे लक्ष कमी होते. यांना वारंवार प्रभूंचे दृष्टांत होत. त्याप्रमाणे ते गाणगापुरीं जाऊन सेवेस रहात असत आणि पुनः दृष्टांत झाला म्हणजे घरी येत असत. एकदा गणेशभटजींचे गाणगापुरास जवळजवळ बारा वर्षे राहाणे झाले. 'सगुण सुंदर पतिव्रता। अनुकूल

मिळालिया कांता। जो विसंबेना भगवत्पथा। भागवतमुख्यता या नांव।' या नाथांच्या सांगण्याप्रमाणे खरोखरच गणेशभटजी भागवतोत्तम होते. त्यांच्या सेवेने भगवान् दत्तगुरु प्रसन्न होऊन त्यांनी त्यांना सांगितले की, 'मी तुमच्यावर प्रसन्न आहे. तुम्हीं आता घरी जाऊन रहा. या उपर गाणगापुरी येण्याचे कारण नाही.' याप्रमाणे श्रीदत्तप्रभूंचा प्रसाद झाल्यानंतरच पुढे शके १७७६ आनंद संवत्सरांत श्रावण कृष्ण पंचमी रविवारी सूर्योदयापासून २६ घटिकांनी श्रीमहाराजांचा जन्म झाला. यापूर्वी गणेशभटजींना दोन मुली झाल्या होत्या. मुलाचे नांव वासुदेव असे ठेवले. श्रीमहाराजांच्या मातोश्रींचाही काल नेहमी पुण्यकर्मात जात असे. अनेक व्रते करणे, निरनिराळ्या लक्षवाती लावणे, गुरुचरित्र, औदुंबर यांना लक्ष प्रदक्षिणा घालणे, येणाऱ्या अतिथींना अन्नदान करणे, ग्रामदेवता यक्षिणीची नित्य पूजा करणे इत्यादि सत्कर्मातच माउलीचा सर्व काळ जात असे. अशा तपोनिष्ठ दंपतीच्या पोटी 'शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी ।' या वचनाप्रमाणे श्रीमहाराजांचा अवतार झाला. महापुरुषांचा अवतार व्हावयाचा असल्यास त्यांच्या पूर्वजांना किती पुण्यसंचय करावा लागतो हे यावरून लक्षात येईल. हरीभटजींचे वय बरेच झाले होते. पण ज्येष्ठ मुलगा गणेश नेहमी गाणगापुरास जात असल्याने त्यांनाच सर्व प्रपंचाचा भार वहावा लागत असे. नुसत्या भिक्षुक वृत्तीने प्रपंच चालविणे जड जाऊ लागल्यामुळे त्यांनी घरात गडी ठेवून शेतीचा जोडधंदा सुरू केला होता.

वासुदेव हे तीन वर्षांचे झाल्याबरोबर त्यावेळी असणाऱ्या खाजगी शाळेत शिकण्याकरिता जाऊ लागले. मातेने घरीच शिवलेले असे आंगडे व टोपडे घालून ही बाल वासुदेवमूर्ति शाळेत जाऊन बसे. त्यावेळी शिक्षणाचा कोण त्रास ! स्लेटपाट्या नसल्याने लाकडाच्या फळीवर धूळ टाकन बोटाने अथवा काडीने अक्षरे काढावयाची. त्यामुळे बोटे अगदी गळून जावयाची. काही दिवसांनी वासुदेवास अक्षरओळख झाली. यक्षिणीच्या देवळातील खाजगी शाळेतच हे मुळाक्षरांचे शिक्षण झाले. वासुदेव नेहमी आजोबांचे सन्निध असे. त्यांचेही या आपल्या चलाख

नातवावर फार प्रेम असल्याने त्यांनी बाल वासुदेवास हळूहळू रूपावळी, समासचक्र, अमरकोश, नित्यस्तोत्रपाठ व शिक्षा, अष्टाध्यायी वगैरे उपग्रंथ शिकविले होते. तीव्र बुद्धीच्या वासुदेवास पाठ होण्यास फारसा विलंब लागत नसे. एवढा वाढता प्रपंच चालविण्यास हरिभटजींना फार कष्ट पडत. पण आपल्या नातवाची ती सुलक्षणी प्रसन्न मूर्ती पाहिल्या-बरोबर त्यांचे सर्व क्लेश दूर होत असत. दारिद्र्यातच पूर्वसंस्कारयुक्त माणसाला खरे तप घडते. 'मनसश्चेन्द्रियाणांच ह्यैकाग्र्यं परमं तप:' या वचनास अनुसरून अत्यंत शांत वृत्तीने, ईश्वरावर भार घालून त्या कुटुंबाचा काल चालला होता आणि लहानपणापासूनच अशा खडतर तपाचा योग वासुदेवास येत राहिल्याने तप्त सुवर्णाप्रमाणे ते तेज वाढतच गेले.

वयाच्या आठव्या किंवा नवव्या वर्षी हरीभटजींनीच आपल्या लाडक्या नातवाची, वासुदेवाची मुंज केली. उपनयन झाल्याबरोबर सायंकाली व प्रात:काली संध्या वंदन करणे, नित्य श्रीगुरुचरित्र वाचणे इत्यादि नियम वासुदेवाचे सुरू झाले. उपनयनसंस्कार ज्याच्याकरिता करावयाचा ते वेदाध्ययनही जवळच भटवाडीत रहाणारे वेदमूर्ति विष्णुभट्ट तात्या उकिडवे यांचेकडे सुरू केले. पण पुढे आपल्या आजोबांचे छत्र वासुदेवास फार दिवस लाभले नाही. पुढे एक दोन वर्षांनीच वे. हरीभटजींना देवाज्ञा झाली. त्यावेळी गणेशभटजी गाणगापुरी असल्याने त्यांचे बंधू बाळकृष्ण यांनीच पित्याचे दहा दिवसातील सर्व कृत्य केले. हरिभट वारल्यानंतर घरात मोठे जाणते माणूस कोणी राहिले नाही. ही संधी साधून गणेशभटजीचे बंधू बाळकृष्णभटजी यांनी घरातील चीजवस्तू होती नव्हती ती लांबविली. शिवाय या कुटुंबावर पांचशे रुपयांचा कर्जाचा बोजा ठेवून बाळकृष्णभट निघून गेले. यावेळी घरात फक्त अन्नपूर्णाबाई व रमाबाई या मायलेकीच काय त्या मोठ्यांपैकी होत्या. घरात काही राहिले नाही, डोक्यावर कर्जाचा बोजा ठेवला गेलेला, अशा स्थितीत कोणीतरी पुरुष मनुष्य व्यवहार पहाण्यास पाहिजे म्हणून अन्नपूर्णाबाईंनी आपला एक नातलग नारायणभट ऊर्फ नाना कोनकर यांना घरी आणून सर्व पहाण्यास सांगितले. रमाबाईंची चुलत

बहीण दुर्गाबाई म्हणून होती. तिला घरातील मुले मावशी म्हणत. हिला काही बाधा असल्यामुळे ती नरसोबाचे वाडीस जाऊन राहिली होती. पण शेवटी वयाचे ९७ वे वर्षी माणगावातच तिचे देहावसान झाले. याच दुर्गा मावशींचेकडून आमच्या चरित्रनायकास प्रसंगी थोडाफार उपयोग व त्रासही झाला. ही हकीगत पुढे यावयाची आहे. नाना कोनकरांनी काही दिवस येथे राहून सर्व व्यवहार पाहिला व पुढे या कुटुंबातील कर्ज फेडण्याकरिता व इतरही झालेला स्वत:चा खर्च वसूल करण्याकरिता म्हणून अन्नपूर्णाबाईंकडून त्यांची वतनी इस्टेट खरेदी म्हणून लिहून घेतली.

वेदमूर्ति तात्याभटजी उकिडवे यांचेकडे वासुदेवाचे वेदाध्ययन चालू होते. त्याप्रमाणे वेदमूर्ति भास्करभटजी ओळकर हे घराजवळच राहात असल्यामुळे त्यांचेकडेही काही अध्ययन झाले होते. कोनकर यांचे घरी नित्य भोजनास वासुदेवाचे जाणे होते. त्यावेळी स्वत:च सोवळ्याने भात करून व नैवेद्य, वैश्वदेव करून नंतरच भोजन करण्याचा वासुदेवाचा परिपाठ होता. 'आचार: प्रथमो धर्म:' या वचनाप्रमाणे लहानपणापासूनच कर्मयोगाचे यथाविधि आचरण करीत राहिल्यास ब्राह्मतेज कसे वाढते हे या उदाहरणावरून लक्षात येईल. पूर्वसंस्कारानुरूप वासुदेवाची प्रज्ञाशक्ति अत्यंत तीव्र असल्यामुळे ८-९ संथेतच त्यांना सर्व पाठ होत होते. घरी संथा म्हणण्याचे वेळी काही स्खलन झाल्यास वडिलांनी एवढेच सांगावे की, 'बाळ ! पोथीकडे पाहून म्हणावे.' गणेशभटजींचा स्वभाव अत्यंत सात्विक होता. घरी ते कधी कोणालाही बोलत नसत. जेवताना मुकाट्याने खाली मान घालून जेवीत असत. त्यांना काही कमी जास्ती हवे असेल ते वाढणाऱ्याने ओळखून फार तर वाढावे; नाहीतर 'विधिवशात् प्राप्तेन संतुष्यताम्' हीच वृत्ती त्यांची होती. 'गृहेष्व-तिथिवद्वसेत्' हे असंगत्व, निरहंकारित्व या गुणांना संपादक असणारे खडतर व्रत गणेशभटजींचे होते आणि तोच आदर्श बालवयात नित्य समोर असल्यामुळे आमच्या चरित्रनायकांच्या चित्तभूमीतही ते पूर्णपणे रुजले. वासुदेवाचे वेदाध्ययन नित्य सोवळ्याने व स्त्रीशूद्रादिकांपासून दूर राहून

होत असल्यामुळे वेदमंत्रांची शक्तिसिद्धि त्या बालवयातच झाली. वेदविद्या ही पुस्तकी विद्या नाही, वेदाला श्रुति असे म्हणतात, म्हणजे गुरुजींच्या मुखातून मंत्र नुसते श्रवण करूनच ते शिष्याने पाठ करावयाचे. असा अभ्यास वासुदेवाचा अत्यंत निष्ठेने चालू होता. पहाटे गुरुजी उठण्याच्या अगोदर उठून अंधारातच त्यांच्या पायाजवळ जाऊन बसायचे, त्यांचा पाय लागल्यावर त्यांनी विचारावे, 'कोण आहे?' तर 'मी वासुदेव' असे उत्तर द्यावे. गुरुजींनी सांगावे की, 'वासुदेवा ! अजून रात्र आहे, नीज.' रात्री दिव्याची स्वतंत्र सोय नसल्यामुळे बाहेर अंगणात तुळशीवृंदावनाजवळ बसूनच म्हणावयाचे. मध्येच झोप आली तरी तेथेच झोपावे व पहाटे उठून पुनः म्हणावे. 'वेदाभ्यासो हि विप्रस्य तपः परमिहोच्चते' या शास्त्रवचनाप्रमाणे हे मोठे तप वासुदेवाचे चालू होते. वेदाध्ययन संपूर्ण होऊन याज्ञिकाचाही अभ्यास झाल्यावर माणगावचेच वेदमूर्ति शास्त्रसंपन्न संभूशास्त्री साधले यांचेजवळ संस्कृताभ्यास करण्यास वासुदेवाने आरंभ केला. रघुवंशाचे काही थोडे श्लोक व काही ज्योतिषाचा भाग इतकाच अभ्यास साधलेशास्त्रींकडे झाला. एका इसमास एकदा साधलेशास्त्रींनी घर बांधण्याचा मुहूर्त सांगितला असता त्यादिवशी कुयोग असल्याचे वासुदेवाने दाखवून दिले. पुढच्या वर्षी अधिक महिना कोणता येणार अशी चर्चा चालू असतां साधलेशास्त्रींचे ते गणित चुकले आणि वासुदेवाने सांगितलेलाच अधिक महिना खरा ठरला. पण ही शिष्याची बुद्धि पाहून गुरुजींनी त्याला सांगितले की, 'यापुढे आमच्याकडे तू शिकण्यास येऊ नकोस. आम्ही काही तुला सांगणार नाही.' 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' ही वृत्ती ठेवून बुद्धिमान शिष्याचे कौतुक करणारे निर्मत्सर खरे गुरुजी विरळाच आहेत. असो. रोज सकाळी व संध्याकाळी संध्यावंदन वेळेवर करण्याचा वासुदेवाचा नियम होता. एकदा माणगावहून दुसरीकडे जाण्याचा प्रसंग आला. मध्येच सूर्यास्त झाला तेव्हा रस्त्यांतील एका झऱ्यावर स्नान करून सायंसंध्या केली व मगच पुढचा रस्ता धरला. एकादशी व्रत अत्यंत कडक पाळावे. स्मार्त व वैष्णव अशा दोन्ही एकादशीस त्यांनी कडकडीत उपोषण करावे. रात्री पूर्ण

जागरण करावयाचे. मध्ये झोप येऊ नये म्हणून शेंडीला दोरी बांधून ती खुंटीला बांधून ठेवावयाची. हेतू हा की, मध्ये डुलकी आलीच तर शेंडीला हिसका बसून जाग यावी. द्वादशीस दुपारी निजावयाचे नाही. असे अत्यंत व्यवस्थितपणाने व्रत केले तरच त्याचा योग्य तो परिणाम होऊ शकतो. आजोबा निवर्तल्यानंतर गृहप्रपंच चालविण्याकरिता वासुदेवास यजमानांच्या घरी पौरोहित्य-कर्म करण्यास जावे लागे. पण त्यांचे कर्म यथासांग करून देऊन घरी येऊन नैवेद्य वैश्वदेव करून जेवावे. परान्न कधीही घेतले नाही. जेवताना रजस्वला, अंत्यज यांचा शब्द कानावर पडताच पात्र सोडून उठावयाचे. परान्नच घेणे नाही तर मग श्राद्धादि-भोजनास जाणे दूरच. अशा नियमांमुळे वासुदेवास प्रसंगी दोन दोन दिवस उपवासही पडत. वादविवाद तर कोणाबरोबर केव्हाही केला नाही. 'सर्वथा स्वहितमाचरणीयम्' ही वृत्ती ठेवून नेहमी सत्कर्मात काल घालवावयाचा. धरलेला नियम प्राण गेला तरी मोडावयाचा नाही. 'नानृतं वदेत्' या शास्त्राज्ञेप्रमाणे असत्य कधीही बोलावयाचे नाही. दारिद्र्यामुळे पुरती वस्त्रेंसुद्धा जवळ नसत. एक नेसण्यास पंचा व एक पांघरण्यास, आणखी एखादा मिळालाच तर तो डोक्याला बांधण्यास. झाले, यावाचून इतर वस्त्र जवळ नाही. पायात जोडा कधीही नाही, छत्री नाही, रात्री निजताना एखाद्या गवताच्या चटईवर, नाही तर पांघरण्याच्या पंचावरच निजावे. त्रिकाल स्नानाचा नियम होता. मातोश्रींच्याविषयी वासुदेवाचे मनात अत्यंत आदरभाव होता. 'न मातुः परदैवतम्' शास्त्राज्ञेप्रमाणे माता कोठेही दिसली तरी तिला अत्यंत नम्रपणाने नमस्कार केल्यावाचून पुढे पाऊल टाकले नाही. याप्रमाणे अंतर्बाह्य अत्यंत नियमपूर्वक आचरण व उत्तम मुखोद्‌गत तेजस्वी अध्ययन यामुळे सर्व लोकांची श्रद्धा बाल वासुदेवावर बसली. त्यामुळे कोणत्याही निमित्ताने वासुदेवास घरी बोलावून शक्तीप्रमाणे संभावना सर्व करीत असत. अशा रीतीने प्रपंचास थोडीफार मदत वासुदेवाकडून होऊ लागली. या मुलाच्या मदतीनेच गणेशभटजींनी काही मुलींची लग्ने व काही मुलांच्या मुंजी केल्या. कनिष्ठ बंधू सीताराम ऊर्फ भलोबा याची मुंज वासुदेवानेच केली. मागे

सांगितल्याप्रमाणे साधलेशास्त्रींनी पुढे शिकविण्यास नकार दिला तरी त्या थोड्या शिक्षणानेच वासुदेवाचे काम झाले. पुढे शिक्षणाची जरुरीच भासली नाही. मध्ये काही नडलेच तर सावंतवाडीचे वेदशास्त्र-संपन्न विष्णुभटजी अळवणी यांचेकडे ८-९ मैल जाऊन शंका समाधान करून घ्यावे, याप्रमाणे थोडक्याच कालात वासुदेवाचा विद्याभ्यास पूर्ण झाला.

घरची गरीबी असल्याने मुलगी कोण देणार ? पण ईशेच्छेने सर्व घडून येते. नाना कोनकर यांनी मध्यस्थी करून रांगणागड येथील हवालदार बाबाजीपंत गोडे यांची मुलगी बायो ही वासुदेवाकरिता ठरवून टाकली. ती मुलगी सुरूप नसून पायातही अधू होती. म्हणून तिचे लग्न होणे कठीणच होते. ही आपली मुलगी वासुदेवाचे गळ्यांत बांधून आपण मोकळे व्हावे म्हणून बाबाजीपंतांनीं वासुदेवाचे गुरुजी उकिडवे व ओळकर यांना हे लग्न जमवून देण्याची गळ घातली. नाना कोनकरांनाही वासुदेवाचे येनकेन प्रकारेण लग्न जमविण्याचे असल्याने तेही या बेतास अनुकूल झाले. त्यांनी मुलालासुद्धा न विचारता मुहूर्तही ठरवून टाकला व मुलाला मुलगी पसंत असल्याबद्दल घरी सर्वांना सांगितले. शेवटपर्यंत वासुदेवाला काही कळले नाही. आईने विचारले असता मला काहीच माहिती नसल्याचे वासुदेवाने सांगितले, तेव्हा तिला बराच विस्मय वाटला व आपल्या मुलाने आपला काहीच विचार न घेता लग्नास संमती दिली याबद्दल वाटणारा किंतूही तिच्या मनातून निघून गेला. आपल्याला लग्न करावयाचे नाही असे वासुदेवाने ऐनवेळी सांगितले तेव्हा आमच्या शब्दाला मान देण्याकरिता तुला हे लग्न केले पाहिजे असे दोघाही गुरुजींनी सांगितल्यामुळे नाईलाज होऊन केवळ गुरूंची आज्ञा म्हणून वासुदेव या लग्नास तयार झाला व हे लग्न पार पडले. त्यावेळी वासुदेवाचे वय २१ वर्षांचे होते. विवाहोत्तर लगेच स्मार्ताग्नीची उपासना चालू करून गायत्रीमंत्रोचे एक पुरश्चरणही त्यांनी केले.

माणगांवी प्रपंचास पुरेशी आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे ती मिळविण्याचे हेतूने गोवा प्रांतांत वासुदेवाने जाण्याचे ठरविले आणि

त्याप्रमाणे पेडणे येथे एका गृहस्थाबरोबर येऊन तो दाखल झाला. त्या बरोबरच्या गृहस्थाने वासुदेवास एका श्रीमंतांच्या घरी नेले. त्या श्रीमंत गृहस्थाने वासुदेवाची थोडी परीक्षा पाहिली. त्याने हातात तिकडील एक नाणे घेऊन वासुदेवास विचारले की, 'तुम्हाला ज्योतिष कळते तर माझ्या हातात काय आहे ते ओळखा पाहू.' वासुदेवाने तात्कालिक प्रश्नलग्न मांडून लगेच उत्तर दिले की, तुमच्या हातात एक नाणे आहे. ही त्याची ज्योतिषशास्त्रातील प्रगती लहान वयांत असलेली पाहून तो श्रीमंत गृहस्थ अत्यंत खूष होऊन त्याने त्याची उत्तम संभावना केली व गोमांतकांतील त्यावेळचे प्रसिद्ध ज्योतिषी नीळंभट पद्ये यांचेकडे आणखी काही दिवस राहून तुम्ही अध्ययन करा म्हणजे तुमची ज्योतिषशास्त्रात यापेक्षाही अधिक प्रगती होईल असे मोठ्या कळकळीने वासुदेवास सांगितले. त्याप्रमाणे पद्ये यांचेकडे जाऊन वासुदेवाने ज्योतिषाचा अभ्यास सुमारे सहा महिनेच केला असेल नसेल, इतक्यातच घरी वडील आजारी असल्याचे कळल्यावरून ताबडतोब त्यांना परतावे लागले. निळंभट पद्ये यांचे वासुदेवावर तीव्र बुद्धि, सदाचार, इत्यादि गुणांमुळे इतके प्रेम जडले होते की, वासुदेव घरी निघाला असता त्याने पुन: परत यावे म्हणून त्याचे सर्व सामान आपल्या घरी ठेवून घेतले. पण पुढे काही वासुदेवभटजींचे जाणे गोमांतकात झाले नाही. वडीलांचे आजारपण पुढे वाढत गेले व त्यांतच शके १७९९ भाद्रपद कृष्ण द्वितीयेस त्यांचा अंत झाला. मरणाचे पूर्वी थोडा वेळ माणगावातील एका मुख्य गृहस्थास घरी बोलावून गणेशभटजींनी सांगितले की, मी मेल्यावर घरी कोणाला रडू देऊ नकोस. त्याने ते कबूल केले व तो तेथेच बसून राहिला. ऐनवेळी काही कामाकरिता तो बाहेर गेला व इकडे गणेशभटजीचे देहावसान होऊन घरांत रडारड सुरू झाली. ती ऐकून तो गृहस्थ लगेच धावतच बाहेरून आला. तो आल्याबरोबर गणेशभटजीनी डोळे उघडले आणि त्याला सांगितले की, 'बाबा तुला मुद्दाम मी सांगितले असता ऐन वेळेवर कसा तू बाहेर गेलास ऽ बरे ! झाले ते झाले, आता तरी जाऊ नकोस. बैस मी आता जातो.' इतके सांगून गणेशभटजींनी प्राण सोडला. भगवद्भक्ताचे

मृत्यूवरसुद्धा नियंत्रण असते. भीष्माचार्य इच्छामरणी होते ही गोष्ट खोटी नाही हे या उदाहरणावरून सर्वांच्या लक्षात येईल. मरणाचे वेळी गणेशभटजी ५६-५७ वर्षांचे होते. वडीलांचे सर्व और्ध्वदेहिक कृत्य वासुदेवभटजींनी केले.

सदाचारपूर्वक सर्व अध्ययन झाल्यामुळे वासुदेवभटजींना वेदमंत्र उत्तम सिद्ध झाले होते. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. माणगावाहून जवळच एका ठिकाणी वासुदेवभटजी एका गृहस्थाबरोबर मंत्रपुष्पाकरिता चालले होते. संध्याकाळची वेळ होती. जाताजाता रस्त्यांत एक साप आढळला. त्याबरोबर बरोबरच्या गृहस्थाने वासुदेव-भटजींना त्याच्यावर मंत्रप्रयोग करण्यास सांगितले. वासुदेवभटजींनी माती हातात घेऊन तिच्यावर मंत्रप्रयोग केला व ती त्या सर्पाच्या सभोवती टाकून ते पुढे आपल्या कामास गेले. तेथील मंत्रपुष्प आटोपून घरी रात्री परत आले. त्यावेळी येतांना त्या सापाची आठवण कोणासच झाली नाही. दुसऱ्या दिवशी दुपारी भोजनोत्तर ते गृहस्थ वासुदेवभटजींचे घरी आले. त्यावेळी त्यांना एकाएकी त्या सापाची आठवण होऊन दोघेही त्या सापाची स्थिती पहाण्यास गेले. जवळ जाऊन पहातात तो माती टाकलेल्या जागेच्या आत फिरून फिरून साप अगदी दमून निश्चेष्ट पडला असल्याचे त्यांना दिसून आले. लगेच वासुदेवभटजींनी दुसऱ्या मंत्राने त्याचा प्रतिबंध दूर करतांच तो साप एकदम वेगाने अन्यत्र निघून गेला. ही त्या दिवशी सापाची झालेली कष्टावस्था पाहून वासुदेवभटजींच्या मनावर परिणामच झाला व त्यांनी पुढे सर्पावर मंत्रप्रयोग करण्याचे कायमचे सोडून दिले. दंडकारण्यात सीतेच्या सांगण्यावरून रामचंद्राच्या सहाय्याकरिता म्हणून, सीतेला एकटीच सोडून जाण्याचा प्रसंग जेव्हा लक्ष्मणावर आला तेव्हा सीतेला कोणाही राक्षसादिकांपासून पीडा होऊं नये म्हणून लक्ष्मणाने पर्णकुटीच्या बाहेर एक रेघ मारून ठेवली व 'आम्ही येईपर्यंत त्या रेघेच्या बाहेर तरी तुम्ही येऊ नका' असे सीतेला सांगून लक्ष्मण निघून गेला. त्या रेघेच्या आत येऊन सीतेचे हरण करण्याची रावणाची सुद्धा छाती झाली नाही ही कथा यथार्थ आहे, असे वासुदेवभटजींच्या वरील गोष्टीवरून

सर्वांचे लक्षात येईल. असेच एकदा वासुदेवभटजी जवळच आपल्या बहिणीच्या गावी गेले होते. तिची गाय दंगा करणारी होती. तिने वासुदेवास गाईवर मंत्रप्रयोग करण्यास सांगताच त्यांनी तो केला. त्याबरोबर ती गाय अगदी गरीब झाली. याप्रमाणे दिवसेदिवस वासुदेव-भटजींची कीर्ति वाढत चालल्यामुळे त्यांचेकडे अनेक लोक नाना प्रकारचे प्रश्न विचारण्याकरिता येऊ लागले. त्या सर्व लोकांना योग्य मार्ग दाखवून पीडेपासून वासुदेवभटजी मुक्त करीत असत. एका गांवात एका माणसाचा खून खाजगी द्वेषामुळे करून ते आरोपी फरारी झाले. त्यापैकी पुढे काही सापडले पण मुख्य आरोपी सापडेना; तेव्हा सरकारतर्फे अधिकाऱ्यांनी वासुदेवभटजींना याबद्दल विचारले तेव्हा 'आरोपी आठ दिवसात अनासायाने तुमच्या ताब्यांत येईल' असे त्यांनी सांगितले. पुढे तो आरोपी परगांवी आपल्या मित्राकडे जाऊन राहिला होता. तेथे एका त्याच्या ओळखीच्या पोलीस अधिकाऱ्याने त्याला पकडून गुन्हा झालेल्या हद्दींतील अधिकाऱ्यांचे स्वाधीन केले. हा चमत्कार पाहून सर्व आश्चर्यचकित झाले. अशाच एका गावी नित्य चोऱ्या होत, पण चोर काही हाती लागेना. वासुदेवभटजींना प्रश्न विचारताच त्या चोराचे स्वरूप, त्यांची येण्याची वेळ वगैरे सर्व सांगून दिले, त्यामुळे हळूहळू सर्व चोरांना अधिकारी ताब्यात घेऊ शकले. या अनुभवावरून सर्वांची विशेष श्रद्धा वासुदेवभटजींचेवर बसली. माणगांवातच एका मराठ्याच्या स्त्रीला एका समर्थ पिशाच्चापासून फार त्रास होत असे. केव्हा केव्हा तर त्या पिशाच्चानें सोसाट्याच्या वाऱ्याच्या रूपाने येऊन त्या स्त्रीला वर आकाशात घेऊन जावे अशी स्थिती होत असे. या त्रासाने गांजून गेलेली ती स्त्री वासुदेवभटजींना शरण आली. तेव्हा त्यांनी भूर्जपत्रावर एक यंत्र लिहून देऊन ते तिला गळ्यात बांधण्यास सांगितले. ते तिने गळ्यात बांधतांच त्या पिशाच्चाला काही करता येईना. त्याच दिवशी वासुदेवभटजींना रात्री त्या पिशाच्चाने गळा दाबून बराच त्रास दिला त्यावेळी मोठाच भयंकर प्रसंग वासुदेवभटजींचेवर आला होता. पुढे दत्तनामस्मरण करताच तो त्रास कमी झाला. इतक्यांत कसली गडबड आहे हे पाहण्याकरिता मातोश्री

उठून आल्या. त्यांच्याकडून खूण करून थोडे तांदूळ मागवून घेतले व ते मिळाल्याबरोबर अभिमंत्रण करून सर्व दिशेला टाकले तेव्हा तो त्रास कमी झाला. आत्मसंरक्षणाचा विधी प्रथम प्रयोग करतेवेळी केला नसल्यामुळे हा त्रास भोगावा लागला असे मागाहून त्यांचे लक्षात आले.

वासुदेवभटजींच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णाबाई असे आजेसासूनेच ठेवले होते. घरात सासूसुनेचे खडाष्टक होते. नित्य काही तरी कारणावरून सासूबाई सुनेची हजेरी घेत असत. पण मातेविषयी वासुदेवभटजींच्या मनात अत्यंत आदरभाव असल्याने त्यांनी याबद्दल आपल्या मातेला कधीही एका अक्षरानेसुद्धा दुखविले नाही. एकदा गणपतीचे उत्सवात पूजेकरिता वासुदेवभटजी बसले असता पूजासाहित्य काहीच तयार नसल्याचे पाहून ते आपल्या कुटुंबास सहज काही बोलले; तेव्हा मातोश्री रमाबाई उगीचच रागावून त्यांच्या कुटुंबाला वाटेल तसे बोलू लागली. ते पाहून वासुदेवभटजींचे मन इतके उद्विग्न झाले की, त्यावेळी त्यांनी असलेल्या साहित्यानेच पूजा करून गणपती पोचविला.

एकदा काही कामाकरिता वासुदेवभटजींना परगावी जावयाचे होते, तेव्हा त्यांनी लवकर स्वयंपाक करण्यास आपल्या मातोश्रींस सांगून ते अनुष्ठान करण्यास गेले. त्यादिवशी अन्नपूणाबाईंना बराच ताप आल्यामुळे त्या निजून राहिल्या. पण ते पाहून रमाबाईंना ते सर्व सुनेचे ढोंग वाटून रागारागाने स्वयंपाक न करता त्या दुसऱ्याच कामांत गर्क राहिल्या. अनुष्ठान आटोपून वासुदेवभटजी आले. पाहतात तो स्वयंपाकाचा पत्ता नाही. त्याबद्दल त्यांनी मातोश्रीस विचारले तेव्हा ती एकदम उसळून म्हणाली की, 'तुझी बायको ढोंग करून निजून राहिली आहे. घरात गुरांना चारा आणण्यात माझा वेळ गेला. स्वयंपाक कसा होईल ?' वासुदेव-भटजींनी त्यावेळी आपल्या कुटुंबाच्या शरीरास हात लावून पाहताच ताप पुष्कळच असल्याचे त्यांना आढळून आले. त्यावेळी त्यांनी आईस सांगितले की, 'आई ! ढोंग कसले म्हणतेस ? खरोखरच तिला ताप फार आहे. तू वाटल्यास हात लावून पहा.' झाले; ही मुलाची वाणी ऐकल्यावर मग काय विचारावे ? मातोश्रीने मुलाची हजेरी घेण्यास सुरुवात केली;

'तू बायकोच्या नादी लागला आहेस, तुला आता आईची किंमत राहिली नाही, तिचा कैवार घेऊन तू मला बोलतोस, मीच कुठेतरी दुसरीकडे जाते,' याप्रमाणे त्यादिवशी त्यांना मातोश्रींचे पुष्कळच वाकूप्रहार सहन करावे लागले. शेवटी मुकाट्याने उठून न जेवताच त्यादिवशी ते बाहेर कामास निघून चालते झाले.

मातोश्रींस वाईट वाटू नये म्हणून वासुदेवभटजी कुटुंबाबरोबर कधी फारसे बोलतसुद्धा नसत. इतके भिऊन वागत असूनही त्यांना वरीलप्रमाणे मातोश्रींकडून कटु बोल ऐकून घ्यावे लागत. रागीट स्वभावामुळे सुनेशी तर सासूचे कधीच पटले नाही. रोज काहीतरी कटकट चालायची; त्यामुळे सुनेचेही मस्तक भडकून जाऊन दोघींचेही चांगले कडाक्याचे भांडण होण्याचा प्रसंग केव्हाकेव्हा येत असे. मार खाण्याचाही प्रसंग सुनेवर एखादेवेळी येत असे. अन्नपूर्णाबाई बिचारी अत्यंत सात्विक ! पडेल ते काम अंगचुकारपणा न करता करणारी होती. पण या जन्मांतरातील योगामुळे, घडून येणाऱ्या कलहामुळे, तिचाही चांगुलपणा जाऊन तिची वृत्ती एखादेवेळी बंडखोर बनत असे. आपल्या पतींनी याबद्दल मातेला काहीतरी सांगून ही रोजची कटकट दूर करावी असे बिचारीला वाटे. पण मातोश्रींना वाईट वाटेल म्हणून वासुदेवभटजींनी एक चकार शब्दही याबद्दल आपल्या आईजवळ काढला नाही. याबद्दल बिचारी अन्नपूर्णाबाई अश्रू ढाळीत कसेतरी कष्टाने दिवस कंठीत असे. एकदा असाच त्रास अन्नपूर्णाबाईंना झाल्यामुळे त्या विमनस्क स्थितीत होत्या. त्यादिवशी आग्रायणेष्टी करण्याचे ठरवून वासुदेवभटजींनी पत्नीस संकल्पाचे वेळी जवळ बसण्यास बोलावले; त्यावेळी तिने ताडकन उत्तर केले की, 'मी तुमची कोण ? कोण बायको असेल तिला हाक मारा.' असे म्हणून ती निघून गेली. ती इष्टि तशीच पत्नीशिवाय त्यांना करावी लागली.

घरातील अशा अंतर्गत कटकटीमुळे वासुदेवभटजींना मनस्ताप भोगावा लागे. तो असह्य झाला म्हणजे, हे घरदार सोडून नरसोबाचे वाडीस जाऊन रहावे असे त्यांना वाटे. पण याला मातोश्रींची परवानगी

कशी मिळणार ? असा प्रश्न पुढे आल्याबरोबर त्यांना स्वस्थ बसावे लागे. सावंतवाडीस आळवणी म्हणून एक सदाचारसंपन्न वैद्य राहात असत. त्यांचा व वासुदेवभटजींचा स्नेह असल्यामुळे कधीतरी त्यांचेकडे वासुदेवभटजी जात असत. सावंतवाडीसच विष्णुपंत आणावकर म्हणून एक गृहस्थ होते. त्यांचे अंगात त्यांचाच एक पूर्वज पिशाच्च झालेला येत असे. तो पिशाच्च सर्व शास्त्रांत निष्णात होता. भूतभविष्यवृत्त कोणाचेही बिनचूक सांगत असे. या पिशाच्चाने आपणास या योनीत येण्याचे कारण असे सांगितले की, पूर्वजन्मात मी उत्तम वैदिक ब्राह्मण होतो. घराच्या मागील दारी एक दुसऱ्याची गाय आलेली आपण पाहिली. तिने काही नासधूस न करता निघून जावे म्हणून आपण सहज एक धोंडा तिला मारला. तो तिच्या वर्मी लागून ती मेली. पण आपण ही आपल्या हातून झालेली गोहत्या कोणालाही सांगितली नाही की त्याबद्दल प्रायश्चित्तही घेतले नाही. मेल्यावर आपण यमदरबारात गेलो तेव्हा यमाने विचारले की, 'तू गोहत्या केली आहेस. अशा पाप्याला वाघाच्या योनीत तरी जावे लागेल किंवा पिशाच्च योनीत, तुला कोणती योनी पसंत आहे ?' तेव्हा व्याघ्र योनीत जाण्यापेक्षा पिशाच्च योनीच बरी, यात ज्ञान तरी राहील असा विचार करून आपण पिशाच्च योनीच पसंत केली. 'आपण अनेक पिशाच्चांवरचे मोठे अधिकारी आहोत. त्यामुळे आपणास वाटेल त्या ठिकाणचे सर्व समजते. या योनीत येऊन २५० वर्षेच्या वर काल लोटला. जास्तीतजास्त पिशाच्च योनीत दहा हजार वर्षे काढावी लागतात.' असे आणावकरांचे समंधाने स्वत:चे वृत्त वेळोवेळी सांगितले. या पिशाच्चाकडे अनेक आर्त लोकांनी नेहमी यावे व यानेही त्यांना शास्त्रोक्त उपाय करण्यास सांगून संकटमुक्त करावे असा क्रम नित्य चालू होता. एकदा घरातील काही त्रासाचा परिणाम असह्य झाल्यामुळे संन्यास घेण्याचे ठरवून वासुदेवभटजी सावंतवाडीस आळवणी वैद्यांचेकडे गेले. एकाएकी आपली इच्छा पण त्यांनी तेथे बोलून दाखविली नाही. त्यादिवशी आळवणी त्या समंधाकडे जाण्यास निघाले. वासुदेवभटजींना विचारता त्यांनीही येण्याचे कबूल केले. आणावकरांचे घरी दोघेही गेल्यावर

थोड्याच वेळात तो समंध अंगात आला आणि वासुदेवभटजींचेकडे पाहून आळवणींना सांगू लागला की, 'या भटजींनी संन्यास घेण्याचे ठरविले आहे पण अजून संन्यासाला पुष्कळ वेळ आहे. तत्पूर्वी बरीच कार्ये यांचेकडून होणार आहेत.' हे आपल्या मनातील ओळखल्यामुळे वासुदेवभटजींना त्या समंधाच्या ज्ञानाबद्दल आदर वाटू लागला. आळवणींनी विचारतांच, संन्यास घेण्याचे ठरवून मी इकडे आलो होतो हे त्यांनी कबूल केले. संन्यास घेण्याचे त्यावेळी साहजिकच राहिले. पुढे प्रसंगाने वासुदेवभटजी त्या समंधाकडे जात असत. या आणावकरांना एक मुलगा झाला. त्याचे जन्मटिपण करण्याकरिता वासुदेवशास्त्री एकदा गेले, त्यावेळी पाटीवर त्या मुलाचे ग्रहमान पाहता त्या मुलाचे आयुष्य एक महिना आहे असे वाटून वासुदेवशास्त्री गणिताची पाटी पालथी घालून स्वस्थ बसून राहिले. पण समंधाने अमुक दिनमान घेऊन गणित करून पहा असे सांगताच शास्त्रीबुवांनी तसे करून पाहिले तो मृत्युयोग नसून एक महिना क्लेश आहेत असे त्यांना दिसले. नंतर त्यांनी काही उपाय समंधाच्या म्हणण्यावरून सांगितला; त्यामुळे पूर्वी त्या मुलाला जे आईचे दूध मिळत नसे ते मिळू लागून त्याचे कल्याण झाले.

वासुदेवशास्त्री एकदा मातोश्रीसह नाशिकला गेले. तेथील साधू देव मामलेदार यांचे घरी गेले असता तुम्ही काय शिकला असे त्यांनी वासुदेवशास्त्रींना विचारले. तेव्हा मी काही शिकलो नाही असे शास्त्रीबुवांनी सांगितले. पण देव मामलेदारांनी यांचे मुखाकडे एकदा पाहून सर्वांना सांगितले की, हे सर्व शिकलेले आहेत; यांचा अधिकार मोठा आहे. नंतर ते शास्त्रीबुवांना दक्षिणा देत असता त्यांनी ती घेतली नाही.

सावंतवाडीचे सबनीस यांचा मुलगा एकदा आजारी पडला, तेव्हा त्याची पत्रिका पाहून दोषपरिहारार्थ वासुदेवशास्त्रींनी गोप्रदान करण्यास सांगितले. सबनीस यांनी वासुदेवशास्त्रींना नकळत त्यांचे बंधु सीताराम यांना बोलावून त्यांना दक्षिणापूर्वक गोप्रदान केले. त्याचा परिणाम असा झाला की, सीतारामास घरी आल्याबरोबर सपाटून ताप आला. चौकशी-अंती गोप्रदानाची हकीकत कळताच वासुदेवशास्त्रींनी रागावून

सीतारामास सांगितले की, मला विचारल्यावाचून तू गोप्रदान घेतलेस त्याचे हे फळ तू भोग. शेवटी ती गाय दुप्पट दक्षिणा देऊन दुसऱ्या ब्राह्मणास देऊन टाकल्यावर सीतारामाचा ताप कमी झाला.

माणगावात एका गृहस्थाच्या संततीचा नाश होत असे. त्याला पिशाच्चाच्या पादुका करून पूजेत ठेवण्यास वासुदेवशास्त्रींनी सांगितले नंतर संतती जगू लागली. त्यापैकी एक मुलगा अत्यंत अशक्त होता. वासुदेवशास्त्रींनी त्या मुलाच्या आजीस सांगितले होते की, हा मुलगा अशक्त असला तरी तुम्ही असेपर्यंत याला काही भीती नाही. पुढे काही दिवसांनी तो मुलगा आजारी पडून त्याची अगदी आसन्नमरण स्थिती झाली. तेव्हा त्याच्या आजीने वासुदेवशास्त्रींना बोलावून आणून त्यांना त्यांच्या सांगण्याचे स्मरण करून दिले. तेव्हा वासुदेवशास्त्रीनी थोडे पाणी अभिमंत्रण करून त्या मुलाच्या अंगावर प्रोक्षण केले. त्याबरोबर तो मुलगा पूर्ववत् सावध होऊन व्यवहार करू लागला.

वासुदेवशास्त्री एकदा परगांवी जात असता रात्रीच्या वेळी रस्त्यात एक मोठा वाघ बसल्याचे त्यांना दिसले. तो रस्ता सोडून जाईना. तेव्हा शास्त्रीबुवांना अतिशय भीती वाटली. ते एका झाडावर चढून तेथूनच ओरडू लागले. तो आवाज ऐकून जवळच त्यावेळी असणारे आत्माराम जडये या नांवाचे एक धाडसी ब्राह्मण तेथे आले. त्यांनी वाघास हाकलून देऊन व शास्त्रीबुवांना झाडावरून उतरून घेऊन त्यांच्या घरी आणून सोडले. पण तो भीतीमुळे उत्पन्न झालेला कंप पुढे वाघरे काढल्यावर नाहीसा झाला. काही दिवसांनी देवांनी याबद्दल वासुदेवशास्त्रींना सांगितले की, तुम्ही रात्री-अपरात्री रानांतून हिंडतां म्हणून आपणच वाघाचे रूप घेऊन तुम्हाला भीती दाखविली.एकदा आपल्या बहिणीच्या घरी वासुदेवशास्त्री गेले. तेथे रात्री शेजारी रडण्याचा आवाज ऐकू आला. वासुदेवशास्त्रींनी चौकशी केली तेव्हां बहिर्णीने सांगितले की, आज सहा महिने हा भुतांच्या रडण्याचा आवाज ऐकू येतो. सर्व लोक हताश झाले आहेत. तपास करूनही काही पत्ता लागत नाही. असे बहिणीने सांगतांच वासुदेवशास्त्रींनीं मंत्रसामर्थ्याने त्या भुतांचा बंदोबस्त करून टाकला.

तेव्हापासून पुन: ते रडणे कोणास ऐकू आले नाही.

वासुदेवशास्त्रींचे घर फार जुने झाल्याने मोडकळीस आले होते म्हणून ते उकलून नवीन बांधण्यास पोतनीस यांनी लाकूड वगैरे देऊन शिवाय पैशाचीही मदत केली. त्यावेळी ते घर दोन महिन्यातच फार गडबडीने बांधले गेले. त्यामुळे ते ३०-४० वर्षांपेक्षा जास्ती टिकू शकले नाही. त्याच जागेवर आज गुरुभक्त महाराणीसाहेब सौ. इंदिराबाई होळकर यांनी उत्तम सीमेंट काँक्रीटचे घर बांधून दिले असून तेथे दत्त मंदिराच्या पुजाऱ्याने नैवेद्य व वैश्वदेव करून राहावे अशी व्यवस्था केली आहे. हे मूळ जन्मस्थान असल्याने येथील काही कायमची व्यवस्था उत्तम प्रकारे होण्याकरितां काही निधी ठेवून त्याचा एक ट्रस्ट करण्याचा सौ. राणीसाहेबांचा विचार चालू आहे.

नरसोबाचे वाडीस जाण्याची इच्छा कधी कधी वासुदेवशास्त्रींना होत असे. पण आईची अनुज्ञा मिळणार नाही असे वाटून त्यांनी तो नाद सोडून दिला होता. एके दिवशी रात्री स्वप्नात एक ब्राह्मण येऊन त्याने शास्त्रीबुवांना विचारले, काहो शास्त्रीबुवा ! तुम्ही नरसोबाचे वाडीस जावे असे म्हणता तर का जात नाही ? शास्त्रीबुवा त्या ब्राह्मणास स्वप्नांतच म्हणतात, काय करावे ? आईची आज्ञा नाही. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, तुम्ही जाण्याचे ठरवाल तर आईची आज्ञा मिळेल आणि सोबत मिळून खर्चाची सोयही होईल. लवकर तयारी करा. हे स्वप्न पडल्यानंतर शास्त्रीबुवांना झोप आली नाही. दुसरे दिवशी मातोश्रीस हे स्वप्न सांगताच तुझी इच्छा असेल तर वाडीस जा. माझी काही आडकाठी नाही असे मातोश्रीने लगेच सांगून टाकले. शास्त्रीबुवा वाडीस जात आहेत हे समजल्याबरोबर जवळचा एक शेजारी येऊन त्याने आपणही तुमच्या-बरोबर वाडीस येतो असे सांगितले. नंतर दोघे मिळून वाडीस जाण्या-करिता घरून निघून सावंतवाडीस आले. तेथे रामभाऊ सबनीसांनी शास्त्रीबुवांना अडीच रुपये देऊन सांगितले की, तुम्ही मागे पत्रिका केली होती त्याचे हे पैसे देणेचे राहिले होते ते घ्या. स्वप्नदृष्टांताप्रमाणे सर्व गोष्टी अनायासे जुळून आल्याचे पाहून वासुदेवशास्त्रींना आनंद वाटला. वाटेतही

ठिकठिकाणी सोबत मिळत गेली. बोरगांव मुक्काम शास्त्रीबुवांना असाच एक दृष्टांत झाला आणि सांगणे झाले की, 'नरसोबाचे वाडीस श्रीगोविंदस्वामी म्हणून मोठे अधिकारी पुरुष आहेत त्यांचे दर्शन घ्या.' याप्रमाणे हळूहळू वासुदेवशास्त्री वाडीस येऊन पोचले. फार दिवसांचा संकल्प पूर्ण झाल्याने त्यांना अत्यंत समाधान वाटले. येण्याबरोबर प्रथम श्रीदत्तपादुकांचे दर्शन करून वासुदेवशास्त्री श्रीगोविंदस्वामींची चौकशी करतात न करतात इतक्यात ब्रह्मनंदांचे मठातील माडीवरून स्वत: श्रीगोविंदस्वामीच खाली येऊन अगदी चिरपरिचिताप्रमाणे विचारू लागले, 'काय वासुदेवशास्त्री ! केव्हा आला ? चला माडीवर, स्नान वगैरे करून या.' असे हे प्रथमदर्शनीच श्रीगोविंदस्वामीचे बोलणे ऐकून वासुदेवशास्त्रींना फारच आश्चर्य वाटले.

वासुदेवशास्त्रींची नरसोबाचे वाडीस प्रथम कोणाशीच ओळख नव्हती. नेसलेला एक मळकट पंचा व एक पांघरलेला असा त्यांचा वेष पाहून हे ब्राह्मण तरी आहेत की नाहीत ? असा तेथील पुजाऱ्यांना संशय आल्यामुळे त्यांना पादुकांवर पाणी घालू दिले नाही; तेव्हा ते नुसते दर्शन घेऊन मुकाट्याने वर येऊ लागले. इतक्यात श्रीगोविंदस्वामींना प्रभूंचे सांगणे झाले की, 'पोथी वाचण्याचे सोडून मंडपात काय चालले ते पहा. त्या बिचाऱ्या लांबून आलेल्या ब्राह्मणाला पुजारी पाणी घालू देत नाहीत.' हे सांगणे झाल्याबरोबर श्रीगोविंदस्वामी उठून खाली आले. वासुदेवशास्त्री खिन्न चित्ताने वर येत होते. त्यांना पाहताच श्रीगोविंदस्वामी म्हणाले, 'शास्त्रीबुवा ! पादुकांवर पाणी घातले की नाही ?' नंतर शास्त्रीबुवांनी घडलेली हकीगत सांगितली; तेव्हा श्रीगोविंदस्वामींनी आपला दंड त्यांचे हातांत देऊन त्यांचेसह स्वत: श्रीगोविंदस्वामी देवाचे मंडपांत आले. नंतर शास्त्रीबुवांनी गुरुपादुकांना पाणी घातले, त्यावेळी गुरुकृपेची अगाध लीला अनुभवून त्यांना अत्यंत समाधान वाटले. पुजारी मंडळींची शंका दूर झाली. नंतर वाडीत एक महिना शास्त्रीबुवांचा मुक्काम झाला. तेथे रोज कृष्णाबाईचे स्नान करून देवास पाणी घालावे, प्रदक्षिणा घालाव्यात, इत्यादि नियम होते.

वाडीस असता शास्त्रीबुवांना देवाचा दृष्टांत झाला की, 'मिरजेस शंकरभटजी म्हणून एक सज्जन गृहस्थ आहेत. त्यांचेकडून गुरुचरित्राची पोथी आणून सप्ताह करा.' त्याप्रमाणे शास्त्रीबुवा मिरजेस त्या गृहस्थांचेकडे गेले, पण त्यांनी पोथी न दिल्यामुळे परत वाडीस आले. 'पुस्तक मिळेल पुन: जाऊन या' असे पुन: सांगणे झाल्यावरून पुन: मिरजेस गेले व पोथी घेऊन येऊन सप्ताहास प्रारंभ केला. हे सर्व होईपर्यंत अन्नाचे ग्रहण केले नाही.

नरसोबाचे वाडीस रात्रौ शेजारती झाल्यावर खाली कोणी जावयाचे नाही, असा नियम आहे. तो वासुदेवशास्त्रींना ठाऊक नव्हता. एकदा शास्त्रीबुवा रात्री कृष्णाबाईवर हातपाय धुण्यास गेले होते. शेजारती होऊन गेली होती. देवदर्शनाकरिता म्हणून गेले असता द्वार बंद होते. नंतर प्रदक्षिणा करून जावे असे मनात आणून दक्षिण दरवाजापाशी शास्त्रीबुवा आल्याबरोबर एका भव्य तेज:पुंज संन्यासी पुरुषाने दरडावून त्यांना विचारले की, शेजारती झाल्यानंतर इकडे न येण्याचा नियम तुला माहीत नाही काय ? त्यावेळी वासुदेवशास्त्रींनी त्या दिव्य पुरुषाला नमस्कार करून क्षमा मागितली व आपण नवीन असल्याने हा नियम ठाऊक नसल्याचे सांगितले. हे संन्यासी पुरुष म्हणजे साक्षात् नृसिंहसरस्वती दत्तमहाराजच होते असे मागाहून श्रीगोविंदस्वामींचेकडून शास्त्रीबुवांना समजले. श्रीगोविंदस्वामी हे मोठे समर्थ अधिकारी पुरुष होते. यांनाच ब्रह्मय्यास्वामी असे म्हणत असत. यांचीच भेट वाडीत आल्याबरोबर शास्त्रीबुवांना झाली व हेच शास्त्रीबुवांचे गुरूही झाले.

वासुदेवशास्त्री नित्य पंचायतनपूजा करीत असत. श्रीगोविंदस्वामींनीं दत्तपादुकांचीही पूजा करण्यास सांगितले. पण देवाची इच्छा असेल तसे होईल असे सांगून शास्त्रीबुवा स्वस्थ राहिले. पुढे काही दिवसांनी देवांनी दृष्टांत दिल्यावरून दत्तपादुकांची पूजा ते रोज करू लागले. एकदा पार्थिवपूजा करण्याविषयी देवांनी वासुदेवशास्त्रींना सांगितले. प्रथम त्यांनी तिकडे कानाडोळा केला, तेव्हा पुन: तसेच सांगणे झाले; त्यावेळी आपल्याजवळ विधान नाही असे शास्त्रीबुवांनी सांगताच ते विधान

कवीश्वरबुवांचेकडे मिळेल असे सांगणे झाले. त्याप्रमाणे ते विधान मिळवून काही दिवस शास्त्रीबुवांनी पार्थिवपूजा केली व देवांनी पुरे म्हणताच ती सोडून दिली.

नरसोबाचे वाडीहून घरी परत येईपर्यंत घराचे बांधकाम संपत आले होते. ते पूर्ण झाल्यावर सर्व सामग्री जमवून वास्तुशांतीचा मुहूर्त ठरविला. पण मुहूर्ताची वेळ टळेपर्यंत पत्नी आलीच नाही. त्यामुळे शास्त्रीबुवांना उद्वेग होऊन त्यांनी आईला सांगितले की, या घरात कोणी नांदणार नाही. येथे धर्मशाळा होईल. नंतर धाकटे बंधु हरीभट यांचेकडून वास्तुशांति करविली. अशी उद्वेग उत्पन्न होण्यासारखी कारणे घडल्यामुळे शास्त्रीबुवांचे मन संसारातून पूर्णपणे उठले आणि ईश्वरप्राप्तीकरिता, पापांचे क्षालन करण्याकरिता म्हणून त्यांनी अत्यंत कठीण असे चांद्रायण व्रत करण्यास आरंभ केला. मध्येच देहपात झाला तरी हरकत नाही. देह ईश्वराला समर्पण होईल आणि घरचा मनस्तापही चुकेल असे त्यांनी ठरविले. आरंभी उपवास करून शुक्ल प्रतिपदेपासून रोज एक एक घास जेवणाचे वेळी वाढविणेचा असतो. याप्रमाणे करता करता पौर्णिमेस पंधरा घासांचे भोजन होते. पुन: रोज एक एक घास कमी कमी असे अमावास्ये-पर्यंत चालवून शेवट उपोषण करावयाचे. दुसरा एक चांद्रायणाचा प्रकार शुक्ल प्रतिपदेस पंधरा घास. पुढे एक एक घास कमी करीत करीत पौर्णिमेस एक घास व पुढे अमावास्येपर्यंत एक एक घास वाढवीत वाढवीत अमावास्येस पंधरा घास असा क्रम आहे. यालाच पिपीलिका-मध्यचांद्रायण अशी शास्त्रीय संज्ञा आहे. याप्रमाणे चांद्रायणव्रत चालू असतां रोज त्रिकाल स्नान करणे, एकाच वस्त्रावर नेहमी असणे, रात्री जमिनीवर निजणे, मौन असणे इत्यादि नियम रोज कसोशीने पाळले जात होते. हे व्रत चालू असता आपण बेशुद्ध पडलो, मेलो तरी तोंडात पेज वगैरे घालू नये असे आपल्या मातोश्रींस वासुदेवशास्त्रींनी बजावून ठेवले होते. शेवटी हे चांद्रायणव्रत ईशकृपेने पूर्ण झाले; पण त्यावेळी एक पाऊलसुद्धा टाकण्याची त्यांना शक्ति राहिली नाही. तथापि रोजचे अनुष्ठान वेळेवर चालूच होते. त्यांतच रक्त पडू लागले. ताप येऊ

लागला. अशा स्थितींतच नरसोबाच्या वाडीस जाण्यास ते निघाले. त्यावेळी सोबत म्हणून मातोश्री बरोबर होत्या. 'कार्यं वा साधयेयम् देहं वा पातयेयम्' असा दृढ मनोनिग्रह या उदाहरणावरून डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभा राहतो.

श्रीदत्तजयंतीस वरीलप्रमाणे वाडीस जाणे झाले. त्यावेळी तेथे शास्त्रीबुवांचा मुक्काम तीन चार महिने झाला. एकदा श्रीगोविंदस्वामींनी शास्त्रीबुवांना श्रीदत्तोपासना स्वीकारण्यास सांगितले; तेव्हा शास्त्रीबुवा म्हणाले, आपल्याला अग्नी व सूर्य ही ब्राह्मणांची नित्य उपासना आहेच. निराळी काय करावयाची ? त्याच दिवशी साक्षात् श्रीदत्तमहाराजांचेकडून वासुदेवशास्त्रींना स्वप्नात मंत्रोपदेश झाला. श्रीगोविंदस्वामीनी हे सर्व जाणून आपल्या निजलेल्या जागेवरूनच विचारले की, 'शास्त्रीबुवा मंत्र मिळाला ना ? आता याचे सर्वसांग विधान उद्या तुम्हाला सांगू.' ही श्रीगोविंदस्वामींची सर्वज्ञता वासुदेवशास्त्रींना अनेकवार अनुभवास आल्यामुळे त्यांची त्यांच्यावर फार श्रद्धा बसली व ते त्यांना आपले गुरू समजू लागले. दुसरे दिवशी श्रीगोविंदस्वामींनीं एक पोथी शास्त्रीबुवांना दिली व या पोथीत तुमच्या मंत्राचे विधान आहे ते लिहून घेऊन मंत्रजप सुरू करा व उपनिषद्भाष्य रोज वाचीत जा, असे सांगितले. वाडीस असतांना शास्त्रीबुवांना संन्यास घेण्याची इच्छा झाली; पण श्रीमौनी-स्वामींनीं सांगितले की, अद्यापि माणगावला काही दिवस तुमचे राहाणे होणार आहे. इतक्यात संन्यासाची गडबड नको.

श्रीमौनीस्वामी हे मूळ सोलापूरकडील रहाणारे होते. लहान असतानाच घराबाहेर पडून यांनी सर्व तीर्थयात्रा केल्या. कडूलिंबाचा पाला खाऊन, रस पिऊन बराच काळ काढला. काशीरामेश्वराची यात्रा पायानेच अनेक वेळा केली. पंचविसावे वर्षी संन्यास घेतल्यावर यांचे नाव प्रद्युम्नसरस्वती असे गुरूंनी ठेवले. बरेच दिवस मौनव्रत धारण केल्यामुळे मौनीस्वामी असे यांना म्हणू लागले. हे ब्रह्मनिष्ठ पुरुष नेहमी बालवृत्तीने राहात. लहान मुलांच्यामध्ये खेळणे, त्यांना खाण्याचे पदार्थ देणे हे यांना आवडत होते. हे बोलतील ते खरे होत असे. श्रीदत्तमहाराजसुद्धा यांच्या

शब्दाला मान देत असत. यांच्याच नेतृत्वाखाली वाडी येथील प्रसिद्ध अग्निहोत्री भारताचार्य रामभाऊ कवीश्वर यांचा महान् यज्ञ निर्विघ्न पार पडला. आमच्या चरित्रनायकावर श्रीमौनीस्वामींचे मोठे प्रेम होते.

वाडीस असताना वासुदेवशास्त्रींना, आपण सात वर्षे माणगावात राहाणार आहोत असे देवांचे सांगणे झाले. त्यामुळे संन्यासाचा बेत रहित करून वासुदेवशास्त्री पुढील व्यवस्थेकरिता माणगावी येण्यास निघाले. वाटेत कोल्हापुरात महालक्ष्मीचे दर्शन घेऊन एक दत्तमूर्ति घेऊन माणगावी जावे असे त्यांना वाटले. पण पैशाची सोय काहीच नसल्याने तो विचार मनातल्या मनातच राहिला. येताना कागल या गावातून सहज बाजार-पेठेतून निघाले असता एका मूर्तिकाराचे दुकानाकडे सहज यांची नजर गेली. तेव्हा तो मूर्तिकार बाहेर येऊन म्हणाला, 'तुम्हाला मूर्ति पाहिजे असल्यास ती कशी पाहिजे तेवढे मला सांगा. मी त्याप्रमाणे तुम्हाला मूर्ति बनवून देईन. पैशाची काळजी करू नका. त्याचे पाहाता येईल.' असे त्या मूर्तिकाराचे भाषण ऐकून मूर्ति कशी असावी याबद्दल शास्त्रीबुवांनी त्याला सर्व माहिती सांगितली व त्याच गावी, मूर्ति घेऊन जाण्याकरिता शास्त्रीबुवांनी आठ दिवस मुक्काम केला. त्या अवधीत मूर्तिकाराने सुंदर मूर्ति तयार करून ती अत्यंत आदराने समर्पण केली. शास्त्रीबुवांनी आपणाजवळ असलेला एक रुपया त्याला दिला. त्याचवेळी तेथे जमलेल्या काही कारकून मंडळींनी आपापसात वर्गणी करून २०-२५ रुपये लगेच त्या ओताऱ्यास देऊनही टाकले. त्या मूर्तिकारास यांना मूर्ति देण्याविषयी दृष्टांत झाल्यामुळे तो त्यांच्याच तपासात होता. ती मूर्ति सात बोटे उंचीची, द्विभुज, वराभयकर, सिद्धासन घातलेली अशी पितळेचीच केली होती.

मूर्ति घेऊन शास्त्रीबुवा माणगावी आले. जेव्हा घराच्या पश्चिम बाजूस थोड्या अंतरावर असलेल्या जागेवर ते आले तेव्हा त्या जागेत मूर्तीची स्थापना करावी अशी सहज यांच्या मनात वृत्ति उत्पन्न झाली. पण ती जागा दुसऱ्याची असल्यामुळे तो विचार मनातच ठेवून शास्त्रीबुवा मूर्ति घेऊन घरी आले व घरातच एक निराळी जागा करून तेथे ती मूर्ति ठेवली.

मातोश्रींची इच्छा घरातच त्या मूर्तीची स्थापना करावी अशी होती. पण ती शास्त्रीबुवांना मान्य झाली नाही. देवालाच आपल्या भक्ताचे माहात्म्य वाढविणेचे होते. त्यामुळे शास्त्रीबुवांच्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी जमून येऊ लागल्या. माणगावाजवळ एक लहानशी वाडी होती. तेथील मालक निवर्तल्यानंतर त्याची पत्नी सर्व व्यवहार पाहू लागली. एके दिवशी रात्री ब्राह्मणाला जमीन दान देण्याबद्दल स्वप्न झाले. ती दुसरे दिवशी वासुदेव-शास्त्रींचे घरी येऊन रमाबाईंना या स्वप्नाचा अर्थ विचारू लागली तेव्हा त्यांनी त्या बाईस सांगितले की 'आमच्या वासुदेवास दत्तमूर्तीची स्थापना करण्यास जागा पाहिजे. तरी ती पश्चिमेकडची तुमची जमीन त्याकरिता द्या.' असे रमाबाईंनी सांगताच ती जमीन त्या बाईने देवाकरिता देऊन टाकली. तेथे आसपास असलेली २-३ खंडीची जमीनही नंतर त्या बाईने देवास दिली.

याप्रमाणे न मागता ईशेच्छेने देवळाकरिता जमीन मिळाल्याबरोबर देऊळ बांधण्यास आरंभ केला. कोणी दगड, विटा, कोणी पैसे याप्रमाणे मदत मिळून काम सुरू झाले. अवघ्या सात दिवसांत देवळाचे काम पुरे झाले. देवाच्या सांगण्याप्रमाणे देवळासमोर विहीर खोदून तीही तीन दिवसात बांधून काढली. देवळाचे तोंड पूर्वेकडे होते. पुढे मोकळी पडवी, मागे एक लहान खोली व मधल्या खणात ३-४ हाताचे लांब रुंद असे देवाचे गर्भगृह शास्त्रीबुवांनी स्वत: आपल्या हाताने विटा तयार करून बांधून काढले. मागच्या खोलीत स्मार्ताग्नि स्वयंपाकगृह होते. याप्रमाणे देऊळ बांधून झाल्यावर त्यात कागलहून आणलेल्या श्रीदत्तमूर्तीची स्थापना शके १८०५, वैशाख शुक्ल पंचमी, यादिवशी केली. श्रीदत्तमहाराजांनीं वाडी मुक्कामी शास्त्रीबुवांना सांगितल्याप्रमाणे त्या दिवसापासून माणगांवी रहाणे केले, त्यामुळे त्या स्थानाची पुढे फारच भरभराट झाली. मूर्तिस्थापना झाल्यापासून वासुदेवशास्त्रींनी पूर्वीपेक्षाही अधिक नियमपूर्वक अनुष्ठान नित्य चालू ठेवले. तेथील सर्व मंडळी त्यांना बुवा या नावानेच संबोधू लागली. यापुढे बुवांनी देवळातच वास केला. दुपारी देवास नैवेद्य समर्पण करून जेवणापुरते घरी जात. भोजनांतील सर्व

पदार्थ एकत्र करून खाण्याची त्यांची पद्धती होती. पहिला गुरुद्वादशीचा उत्सव माणगावी झाल्यावर बुवांनी तेही घरी जाणे बंद केले. रोज सकाळी कोरडी भिक्षा मागून आणावी. त्याचाच पाक करून नैवेद्य, वैश्वदेव करावा. गोग्रास व अतिथी यांचेसाठी अन्न विभाग करून राहिलेल्या भागात आपण भोजन करीत. देवळात कोणी अतिथी येऊन उतरला असल्यास भिक्षेहून आल्यावर भिक्षेतील धान्य त्या अतिथीस प्रथम देऊन मग राहिलेल्या भागाचा उपयोग बुवा करीत असत. रोज लागणारे जळण भिक्षेहून येता येता त्यांनी स्वत:च गोळा करून आणावे. 'स्वयंदासा-स्तपस्विन:' ही वृत्ती त्यांनी नित्य ठेवली होती.

प्रत्येक शनिवारी फार मोठा समारंभ होत असे. सायंकाळी धूप झाल्यावर पुष्कळ आरत्या म्हटल्या जात. नंतर पालखीत उत्सवमूर्ति ठेवून देवळाभोवती तीन प्रदक्षिणा होत असत. त्यावेळी चार पाच हजारापर्यंत समाज जमत असे. तीन प्रदक्षिणा पूर्ण होण्यास ५-७ तास लागत असत. पालखीचे वेळी अनेक स्तोत्रे, पदे इत्यादि म्हटली जात. एकदरीत तो देखावा अत्यंत प्रेक्षणीय, चित्ताकर्षक असा दिसत असे. देवापुढे भक्तगणांनी पेढे, बर्फी, खारका, नारळ, उदबत्ती, कापूर इत्यादि पदार्थ इतके आणून ठेवावेत की, त्यांचा पर्वतप्राय ढीग पडावा. पालखी संपल्यावर आलेले पदार्थ प्रसाद म्हणून सर्वांना वाटण्याची पद्धती होती. काही धान्य वगैरे विशेष जमल्यास त्या मानाने भंडाराही करीत असत. सावंतवाडीचे रामभाऊ सबनीसांचेकडे ही सर्व व्यवस्था करण्याचे काम होते. पूजा-अर्चादि नित्य नियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यावहारिक बाबींकडे बुवांचे लक्ष नसे. अनासक्त रीतीने बुवांचे सर्व व्यवहार नित्य चालू होते. सबनीसांनी एकदा बुवांना नेसण्याकरिता धोतरे दिली. पण बुवांनी ती धोतरे उभी व आडवी फाडून पंचाप्रमाणे त्याचा उपयोग केला. ग्रामदेवता श्रीयक्षिणीची पालखी प्रथम देवळाजवळ येई आणि नंतर श्रीदत्तमहाराजांची पालखी निघे. यक्षिणीची पालखी श्रीदत्तमंदिराकडे आणण्याबद्दल प्रथम देवीच्या व्यवस्थापकांचा विरोध होता. पण बुवांनी जाऊन देवीची प्रार्थना केली; त्यानंतर देवीचा दृष्टांत पालखी नेण्याबद्दल

व्यवस्थापकांना झाल्यामुळे नियमाने पालखी येऊ लागली. पालखी-बरोबर काठी घेणारे, चवरी, मोर्चल धरणारे, पदे म्हणणारे अशी नित्याची १०-१५ मंडळी असत. शिवाय इतर लोकांचा समाजही फार मोठा जमत असे.

रामभाऊ सबनीस हे सावंतवाडीस सरकारी अधिकारी होते. त्यांच्या घरची पिशाच्चबाधा बुवांच्या कृपेने दूर झाल्यापासून त्यांची बुवांचेवर विशेष श्रद्धा बसली. ते स्वत: देवस्थानची व्यवस्था पाहात असल्याने कोणतीच अडचण पडत नसे. एकदा सबनीसांच्यावर काही आरोप येऊन त्यांना कामावरून काढून टाकले. त्यांनी येऊन बुवांना आपले संकट सांगितल्यावर व'तुम्ही योगिनी मंत्राचा जप करा. आजपासून ८२ दिवसांनी तुमचे काम होईल' असे बुवांनी सांगितले. त्याप्रमाणे सबनीसांनीही सर्व निष्ठेने केल्याबरोबर खरोखर बुवांनी सांगितलेल्या दिवशीच सबनीसांना कामावर घेण्याचा हुकूम झाला. दैवी सामर्थ्य केव्हाही अकुंठित असे आहे. अशारितीने उत्तम प्रकारे अर्चन चालू असल्यामुळे साहजिक ते स्थान अत्यंत जागृत असे प्रसिद्ध झाले. श्रीदत्तमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे बुवांनी येणाऱ्या लोकांना आश्वासन देऊन त्यांची कामे होण्याकरिता उपाय सांगावेत. श्रीदत्तांचा बुवांना तसा वरप्रसादच असल्यामुळे सर्व लोकांच्या कामना पूर्ण होत असत. श्रीदत्तांनी आपले गण तेथे संरक्षणार्थ ठेवले होते. त्यामुळे कोणीही कसलाही गुन्हा केला असला तरी तो तत्काल धरला जाई.

प्रतिवर्षी गुरुद्वादशीस व दत्तजयंतीस मोठा उत्सव होत असे. त्यावेळी ८-१० हजारांपर्यंत अन्नसंतर्पण होत असे. श्रीयक्षिणी देवीचे धर्मशाळेत उत्सवाचे वेळी स्वयंपाक करीत असत. एखादेवेळी आचारी न मिळाल्यास गावातील मंडळींनी सर्वांनी मिळून स्वयंपाक करावा व सर्वांना अन्नदान करावे असे कार्य अगदी प्रेमाने व्यवस्थित चालले होते. अशा उत्सवाचे वेळी पालखी पूर्ण होण्यास एखादेवेळी पहाटही होत असे. समाज इतका जमत असे की, प्रसाद वाटण्याकरिता तीन चारशे नारळ फोडले तरी प्रसाद पुरत नसे. पालखीचे प्रसंगी फारच गर्दी होई.

पिशाच्च-ग्रस्त स्त्रीपुरुष शे दोनशेपर्यंत आरतीचे वेळी येऊन आरडाओरड करीत. तेथील खांबाला चिकटून राहात. सर्वांना सारखा प्रसाद वाटण्यात येई. वाटताना कोणी पक्षपात केल्यास देवांनी लगेच बुवांना इषारा देऊन ताबडतोब बंदोबस्त करावा.

देवळात कागलहून आणलेली मूर्ति ठेवलेली होती. याशिवाय पालखीत बसविण्याकरिता एक उत्सवमूर्ति तयार केली होती. हीच सध्या माणगावी आहे. देवळातील मूर्ति बुवांनी जाताना नेली. उत्सवमूर्ति सावंतवाडीस तयार केली. प्रथम ओतण्याचे वेळी ती मूसच फुटली. नंतर बुवांनी प्रभूजवळ प्रार्थना करताच दुसऱ्यावेळी काही विघ्न न येता मूर्ति उत्तम तयार झाली. नंतर पालखी, चवरी, मोरचल, काठ्या इत्यादि सर्व सामान तेथेच तयार करवून मूर्ति वाजत गाजत मोठ्या समारंभाने माणगावास आणली. त्या मूर्तीची अर्चा करण्याचे ठरवून सर्व वैदिक, शास्त्रीमंडळी ठरलेल्या मुहूर्तावर येऊन पोचली. त्यावेळी सबनीस, आणावकर इत्यादि मंडळीही सावंतवाडीहून आली होती. सर्व तयारी झाली. आता आचमन करावयाचे, इतक्यात आणावकरांचे अंगात समंध येऊन बोलू लागला की, 'स्वतंत्रपणे या दुसऱ्या मूर्तीचा अर्चाविधी करण्याचे कारण नाही. अर्चकस्य तपोयोगादर्चनस्यातिशायनात्। आभिरूप्याच्चबिंबानां देवः सान्निध्यमृच्छति।' या शास्त्रवचनाप्रमाणे जेथे अर्चक उत्तम सदाचारसंपन्न असेल, अर्चन यथाशास्त्र उत्तम चालू असेल व जेथे मूर्तीही यथोक्त सौंदर्यसंपन्न असेल तेथे देवाचा वास निश्चित असतो. करिता पूर्वस्थापित मूर्तीला या नवीन मूर्तीचा स्पर्श नुसता केला की पुरे. बाकी कोणताही विधी करण्याचे कारण नाही. असे समंधाने सांगण्याबरोबर बुवांना ते पटले. इतरही सर्व मंडळींची समजूत घातली. नंतर तो अर्चा विधी वगैरे न करिता फक्त पूर्व मूर्तीस या मूर्तीचा स्पर्श केला व महापूजा केली. तिसरी एक प्रवासी मूर्ति अगदी लहान अशी माणगावातीलच एका सोनाराने तयार करून दिली होती. देवांचे सांगणे, प्रवासाचे वेळी पूजेकरिता एक मूर्ति करण्याबद्दल बुवांना झाले. प्रवासात आपल्याकडून सर्व उपचारांनी पूजा होऊ शकणार नाही असे बुवांनी

देवांस सांगितले, तेव्हा देव म्हणाले की, 'मला फक्त स्नान घालून भस्म लावले म्हणजे पुरे. बाकीचे उपचार नसले तरी चालेल.' असे सांगितल्यावर ती प्रवासी मूर्ति तयार करवून घेतली. याप्रमाणे तीन मूर्ति माणगांवी होत्या. शिवाय पालखीचे वेळी डोकीवर घेण्याचा पादुकाजोड व देवळातील पादुकाजोड असे दोन पादुकाजोडही होते. प्रति शनिवारी व उत्सवसमयी उत्सवमूर्तीची पूजा होत असे. बुवा नरसोबाचेवाडीस गेले असता त्यांचे बंधू हरीभटजी हे पूजेचे काम करीत असत. देवांकडे येणाऱ्या उत्पन्नापैकी विशेष ठोक उत्पन्न नरसोबावाडीचे देवस्थानाकडे रवाना करून किरकोळ उत्पन्नातून तेथील खर्च भागविला जात असे. ग्रामस्थ मंडळीनी आपणाला या उत्पन्नातून भाग मिळाला पाहिजे असा वाद उपस्थित केला. एकदा दत्तजयंतीच्या पारण्याच्या दिवशी सर्व मंडळी पानावर जेवणास बसल्यावेळी हट्ट धरून बसली की, आमच्या म्हणण्याचा विचार झाल्याशिवाय आम्ही जेवणार नाही. बुवांनी तर त्यावेळी मौन धरलेले होते. मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला होता. पण त्यावेळी सावंतवाडी संस्थानाचे कारभारी वगैरे अधिकारी मंडळी उपस्थित होती; त्यांनी सर्व मंडळीची समजूत घातल्यामुळे ते प्रकरण तेथेच संपले.

श्रीदत्तमहाराजांचेकडून बुवांना त्या त्या वेळी जसे आदेश होत त्याप्रमाणे तेथील कार्यक्रम चालू होते. काही कार्यांत संशय आला की देवाजवळ प्रार्थना करावी. लगेच त्याबद्दल उत्तर मिळावयाचे. केव्हा स्वप्नात, केव्हा जागेपणी मोठ्या आकाशवाणीच्या रूपाने असे आदेश अनेक प्रकारांनी होत व त्याप्रमाणे बुवा वागत असत. सारांश, देवालाच भक्ताची महती वाढविणेकरिता हे कार्य करवून घ्यावयाचे होते यात शंका नाही. केव्हा केव्हा आणावकरांच्या पिशाच्चाकडूनही काही निर्णय होत असे.

बुवांचा नित्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे होता. पहाटे चार वाजता उठून प्रात:स्मरणपूर्वक योगाभ्यास करावयाचा. नंतर शौचमुखमार्जन, स्नानसंध्या आटोपून श्रीदत्तप्रभूंची पूजा करावयाची. पूजेकरिता फुले,

तुळशी स्वत: तोडून आणलेली असत. भूमीवर पडलेली, झाडावरून आपोआप पडलेली फुले घ्यावयाची नाहीत, असे सर्व निर्बंध पाळले जात होते. आरंभी महान्यास करून रुद्रैकादशिनी रोज करण्याचा नियम होता. पुढे कामाच्या व्यापामुळे वेळ मिळेना तेव्हा देवांनी रोज एकाच रुद्रावर्तन पुरे असे सांगितले. पुढे पुढे तर नुसत्या पुरुषसूक्ताने अभिषेक झाला तरी पुरे असे देवांनी सांगितले. भक्ताची काळजी देवावाचून कोणास असणार ! पूजा झाल्यावर जप वगैरे रोजचे कर्म आटोपून बुवा एकाच घरी भिक्षेस जात असत. जाताना रजस्वला, अंत्यज दृष्टीस पडल्यास त्यादिवशी भिक्षा न करता उपोषण करीत असत. भिक्षेहून आल्यावर स्नान करून मध्यान्हसंध्या, ब्रह्मयज्ञादि आटोपून मूर्तीची पूजा करावयाची. मग नैवेद्य-वैश्वदेव करून भोजन करावयाचे. मुगाची डाळ व तांदूळ एकत्र करून स्वत: शिजवून तयार करावयाचे. एकाने एक गाय दिली होती. तिचे दूध, तूप घ्यावयाचे. भोजनोत्तर भांडीसुद्धा स्वत:च घासायची किंवा बुवांचा एक भाचा त्यांच्याकडे शिकण्यास होता तो प्रसंगाने भांडी घाशीत असे. शिक्षणाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांना बुवा दुपारी शिकवीत असत. देवळापाठीमागे काही फुलझाडे वगैरे लावली होती. त्यांची मशागत विद्यार्थ्यांच्याकडून करवून घेत. कोणाचे प्रश्न वगैरे सांगण्याचे असल्यास त्याचवेळी सांगत. पुराणही सांगत असत. संध्याकाळी स्नानसंध्या झाल्यावर धूप घालून मग आरती होत असे. यावेळी हौसेने पुष्कळ आरत्या म्हटल्या जात. नंतर मंत्रपुष्प होऊन शेजारती केल्यावर देवांना पलंगावर निजवीत असत. यानंतर स्वस्थतेप्रमाणे काही ग्रंथवाचन, योगाभ्यास व नंतर निद्रा. निद्रा देवळातच होती. स्त्रीसंबंध मुळीच नाही. कुटुंबांनी फक्त रोज सकाळी येऊन सारवून रांगोळी घालून जावे व दुपारी जेवणाच्या अगोदर देवदर्शन करून तीर्थप्रसाद घेऊन जावे, इतकाच नियम होता. इतर फावल्या वेळात बुवांचे नामस्मरणही चालू होते.

माणगांवांतील देवस्थान हे नरसोबावाडीचे देवस्थानांतर्गत आहे, तेथूनच याचा उद्‌गम आहे अशी बुवांची भावना होती; त्यामुळे तेथील खर्चाकरिता रुपयाच्या आतील उत्पन्न घेऊन रुपयाच्या वरील उत्पन्न

वाडीस पाठवीत असत. रात्री भजन करताना बुवा प्रेमभराने देवापुढे नाचत असत. पूजेत सर्व उपचार व्यवस्थित समर्पण करावयाचे, त्यात थोडीसुद्धा हयगय होऊ द्यावयाची नाही. एकदा रोज नवे जानवे तयार करून देवाला समर्पण करण्याचे ठरवून तो नियम एक वर्षपर्यंत अविच्छिन्न चालविला. देवाच्या परिवारात २५-३० कुत्री व २-४ गाई होत्या. या सर्वांची व्यवस्था एक सेवेकरी करीत असे. गृहस्थाश्रमी माणसांच्या घरातून जसे सणवार केले जातात तसे देवळात चैत्री पाडव्यापासून सर्व सण केले जात होते. बायकांनाही त्यांच्या सणाचे वेळी बोलावून त्यांना हळदीकुंकू देणे, ओट्या भरणे इत्यादि कार्यक्रम बुवा उत्साहाने करवून घेत असत. अत्यंत दक्षतेने प्रत्येक कार्य पार पडले पाहिजे अशी बुवांची कडक शिस्त होती. एकदा गुरुद्वादशीचा उत्सव आला. मंडळी पुष्कळच आलेली होती. त्या गर्दीत देवळाजवळ काही घाण वगैरे झाली, त्यामुळे बुवा त्या मंडळीना काही रागाने बोलले. ही गोष्ट देवांना आवडली नाही. त्यांनी बुवांना सांगितले 'किती बोलतोस ? इतके बोलणे चांगले नाही.' हे देवाचे सांगणे ऐकल्या दिवसापासून बुवांनी मौन धारण केले. एक वर्षपर्यंत ते मौनी होते. काही विशेष सांगावयाचे असल्यास पाटीवर लिहून दाखवीत. दुसरे वर्षी गुरुद्वादशीचे वेळी देवाची प्रार्थना करून मौन सोडले. देवापुढे नारळ, केळी वगैरे पदार्थांचे ढीगचे ढीग पडत असत. पण तिकडे कधी बुवांनी ढुंकूनही पाहिले नाही. ती सर्व व्यवस्था सबनीस, आणावकर ही मंडळी पाहात होती. घरी उत्पन्नाची बाब काही नसताही यत्किंचितही अभिलाषा नसणे हेच खरे साधुत्व आहे. लोकांचे आग्रहास्तव आत दत्तमूर्तीपुढे येणाऱ्या उत्पन्नांतून चौथा हिस्सा मात्र घरी दिला जात असे.

नरसोबाचेवाडीस चैत्र अमावास्येस श्रीनारायणस्वामींचे उत्सवाकरिता आणि गुरुद्वादशी, दत्तजयंती अशा समयी याप्रमाणे बुवा एक दोन वेळा जात असत. एक वेळ मातोश्रीही बुवांचे बरोबर आल्या होत्या. देवाजवळ धर्मशाळेत बुवांचा मुक्काम असे. ती धर्मशाळा फार मोडकळीस आली होती. रात्री देवाने बुवांच्या मातोश्रींना स्वप्नात सांगितले 'ही जागा दुरुस्त करणे आहे. तरी तुम्ही ताबडतोब दुसरीकडे

राहण्यास जावे.' मातोश्रींनी मुलाला ते स्वप्न सांगितले. आपणास देवांनी तसे सांगितले तर बिऱ्हाड हालवू असे मातोश्रीस सांगून बुवा स्वस्थ राहिले. नंतर बुवांना पहाटे तसेच सांगणे झाले. नंतर मात्र बुवांनी दुसरे दिवशी सकाळी स्नानसंध्यादि अनुष्ठान व भोजन आटोपल्याबरोबर त्या जागेतील सामान बाहेर काढले. बुवा सर्व सामान घेऊन बाहेर येतात न येतात इतक्यातच ती जागा एकदम पडली. बुवा बाहेर आल्यावर समोर कट्ट्यावर मौनीस्वामी बसले होते. त्यांनी विचारले 'शास्त्रीबुवा ! सर्व सामान आणले पण देव का आणले नाहीत ?' हे मौनीस्वामींचे म्हणणे ऐकल्याबरोबर देवाचा संपुष्ट आणण्याकरिता बुवा सर्व मंडळीची नजर चुकवून हळूच एका बाजूने आत गेले. जेथे संपुष्ट ठेवला होता ती भिंतच शिल्लक राहिली होती. संपुष्ट घेऊन बुवा बाहेर येताच तीही भिंत कोसळली. गुरुद्वादशीसारख्या मोठ्या उत्सवाचे वेळी माणगांवी बराच मोठा स्वयंपाक होत असे. त्याकरिता देवळाच्या ईशान्य बाजूस एक मोठी धर्मशाळा काही दिवसांनी बांधली. त्याचा सर्व खर्च गोमांतकांतील एका गृहस्थाने दिला. उत्सवाकरिता लागणारी सर्व भांडी आणवून त्या जागेत एका खोलीत ठेवली होती.

देवालयाचे समोर एक औदुंबरवृक्ष निर्माण झाला. तो मोठा झाल्यावर त्याला पार बांधला व त्यावर दत्तपादुका स्थापन केल्या. रोज तेथेही पूजा होत असे. याशिवाय लोकांना अभिषेक, पूजा वगैरे जे करणेचे असेल ते सर्व त्या औदुंबरावरील पादुकांवर होत असे. आतील मूर्तीशी बुवांचे वाचून कोणाचाही संबंध येत नसे. एक दिवस बुवा औदुंबराचे कट्ट्यावर पादुकांची पूजा करीत बसले होते. इतरही मंडळी जमली होती. इतक्यात एक मोठा साप तेथे आलेला पाहून जमलेली मंडळी घाबरून पळू लागली. त्यावेळी बुवा म्हणाले, अरे पळता का ? तोही तुमच्यासारखाच देवाचे दर्शनास आला आहे. दर्शन घेऊन जाईल. हे ऐकून काही मंडळी थांबली. नंतर बुवांनी त्या सापाला कोणालाही त्रास न देता सरळ रस्त्याने निघून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो साप हळूहळू निघून गेला. सर्व भूतांशी योगी पुरुषांची मैत्री कशी असते याबद्दल हे

उदाहरण पाहून लोकांची खात्री झाली.

पहिल्या गुरुद्वादशीच्या उत्सवाचे वेळी पुरण घातले होते. नैवेद्य दाखविण्याचे वेळी बुवांच्या घशात घास अडकल्याप्रमाणे होऊन फार त्रास झाला. सर्व मंडळी घाबरली. देवांची प्रार्थना केल्यावर तो त्रास कमी झाला. नैवेद्याचे वेळी पुरणपोळ्यांकरिता तूप ठेवले नव्हते. त्यामुळे हा प्रकार देवांनीच केल्याचे मागाहून लक्षात आले. मराठी गुरुचरित्रावर संस्कृत ग्रंथरचना करावी अशी बुवांना देवांची आज्ञा झाली. त्याप्रमाणे बुवांनी संस्कृत गुरुचरित्र करण्यास सुरुवात केली. ग्रंथ संपल्यावर 'संहितेयं द्विसाहस्रीं' असे देवांनी सांगितले. बऱ्याच वेळाने त्या वाक्याचा अभिप्राय लक्षात येऊन बुवांनी ग्रंथाची श्लोकसंख्या मोजून पाहिली. पण तितकी दोन हजार श्लोकसंख्या काही भरेना. तेव्हा सप्तशतीप्रमाणे मोजून पहावे असे वाटून तशी गणना केली. काही अर्धश्लोक, उवाच मंत्र इत्यादि घेऊन पाहिले तेव्हा ती संख्या बरोबर भरली. त्यात काही अशुद्ध राहिल्याचे मागाहून लक्षात आले. पण 'ते मला आवडले आणि अन्य व्याकरणादि दृष्टीने ते शुद्धच आहे.' असे देवांनी बुवांना सांगितले. द्विसाहस्री करण्याचे काम चालू असता नारोपंत उकिडवे एकदा आले होते. त्यांनी बुवांना विचारले की, 'हे ग्रंथलेखनाचे काम तुम्ही कसे करू शकता ?' बुवांनी सांगितले की, 'मी लिहिण्यास बसलो की एका कागदावर मला जशी अक्षरे दिसतात तशी मी लिहून काढतो. माझा काही संबंध नाही.' हा चमत्कार ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले. साधुपुरुष हे आपणाकडे कोणत्याही लहानमोठ्या कर्मांचे कर्तृत्व घेत नाहीत.

एकदा मध्यान्हकालची पूजा होऊन आरती चालू झाली. त्यावेळी एकाएकी तात्कालिक स्फूर्तीने 'जय मायामय कायत्रयपर यतिवर्या' ही आरती मुखांतून बाहेर पडली. दुपारी भोजनोत्तर आरतीचे स्मरण होऊन ती हळूहळू स्मरण करून लिहून काढली. त्यावेळी त्या आरतीत चारही महावाक्यांचा अर्थ समाविष्ट झालेला आहे असे दिसून आले. या प्रकारावरून आर्ष वाणी कशी असते याची कल्पना येऊ शकेल.

योगाभ्यास नित्य चालूच होता. एकदा त्यात काही स्खलन झाल्याने

सारखी उचकी लागली. त्यावेळी दत्तमहाराजांनी बुवांना सांगितले की, 'कापशी गावात एक मोजणीदार राहतात. त्यांचे घराजवळ पिंपळाचे झाड आहे. त्यांच्याकडे तुम्ही चला. ते तुम्हांला उचकीचे कारण सांगून त्यावर उपायही सांगतील.' बुवांनी आज्ञेप्रमाणे त्या गावी मोजणीदारांचेकडे जाऊन याबद्दल चौकशी केली. पण त्यांनी आपणाला योगाची काहीच माहिती नसल्याचे दर्शविले. देवांची आज्ञा झाल्यामुळे आपण आलो आहोत. निर्णय झाल्यावाचून आपण परत जाणार नाही असे बुवांनींही त्यांना स्पष्ट सांगितले व बुवांनी त्या दिवशी तेथेच मुक्काम केला, रात्री मोजणीदारांना देवाचा दृष्टान्त झाल्यामुळे त्यांनी आदराने बुवांना एकान्त-स्थानी नेऊन उपाय समजावून दिला आणि योगाचे विवरण ज्यांत लिहिले आहे असे कबीरधर्मदाससंवादात्मक हिंदी पुस्तकही बुवांना दिले. त्या पुस्तकाचा अडचणीचे वेळी बुवांना उपयोग होऊ लागला. खेचरीचा अभ्यास चालू असता जिभेचा शिराबंध तुटण्याकरिता श्रीदत्तांनीच एक वनस्पती बुवांना दाखविली. त्यामुळे ती शिर तुटून खेचरी लवकर सिद्ध झाली. साक्षात् परमेश्वरच नित्य पाठीराखा असल्यावर अशक्य काय असणार ? योगाभ्यासाच्या प्रभावाने त्यांना सिद्धी वश झाल्या. कोणीही मनुष्य कामाकरिता जवळ येताच तू अमूक कामाकरिता आला आहेस असे बुवांनी अगोदरच ओळखून सांगावे. ते पाहून लोकांना आश्चर्य वाटे. काही काही लोकांना तर बुवांनी अलिकडे कर्णपिशाच्च साधन तर केले नाहीना अशी शंका येऊ लागली. एक वर्षभर असाच प्रकार चालला होता. पण पुढे देवांनी 'हा बाजार काय मांडला आहेस ? पुरे कर.' असे सांगतांच तत्काल बंद केले. पुढे सिद्धीकडे ढुंकूनही पाहिले नाही.

प्रारब्धाप्रमाणे येणारी सुखदु:खे मुकाट्याने सहन करावयाची. भोगूनच प्रारब्धभोग संपवावयाचा. त्याचा प्रतिकार काही करावयाचा नाही. अशी बुवांची प्रथमपासूनच वृत्ति होती. आजारी पडले तरी औषध घ्यावयाचे नाही असा त्यांचा नियम होता. एकदा त्यांना ज्वराचा उपसर्ग बरेच दिवस चालू राहिला. त्यावेळी बुवांचे श्वशूर बाबाजीपंत गोडे यांनी काही औषध सावंतवाडीहून मुद्दाम बुवांचेकरिता आणले व हे औषध

दवाखान्यातील नसून वैद्याकडील चांगले शुद्ध असे आहे, तुम्ही अवश्य घ्या म्हणून औषध घेण्याचा आग्रह बुवांना केला. इच्छा नसताही नाइलाजाने ते औषध बुवांनी घेतले. मात्र लगेच जोराची उलटी होऊन बुवा निश्चेष्ट होऊन पडले. सर्व मंडळी घाबरली. तेव्हां बाबाजीपंत घाबरले व आपण खोटे सांगितल्याबद्दल त्यांनी देवांची क्षमा मागितली. तेव्हा बुवांना बरे वाटून ते उठून बसले व स्नान करून पंचकव्य घेऊन पवमानाच्या आवृत्त्या प्रायश्चित्त म्हणून केल्या.

देवालयात फारच पवित्रपणाने वागावे लागे. याविरुद्ध कोणीही वागल्यास त्याचे प्रायश्चित्त लगेच मिळे. एके दिवशी पूजा झाल्यावर 'सूत सूत काढून टाक' असा आवाज झाला. बुवांच्या लक्षात काही त्याचा अर्थ त्या दिवशी आला नाही. दुसरे दिवशी सकाळी निर्माल्य काढीत असता एका फुलाला सूत गुंतलेले दिसून आले. नंतर सर्व प्रकार लक्षात येऊन प्रासादशुद्धि केली. रत्नागिरीच्या एका ब्राह्मणाची बहीण पिशाच्च-पीडा असल्यामुळे माणगावी सेवेस येऊन राहिली. ती एके दिवशी देवळात प्रदक्षिणा घालीत असतानाच अस्पर्श झाली. त्यामुळे साप, विंचू वगैरे देवळात सर्वत्र निघू लागले. याप्रमाणे दोन चार दिवस त्रास झाला. पुढे स्थानशुद्धीकरिता उदकशांति केली, त्यावेळी सर्वत्र शांतता झाली.

देवापुढे असलेल्या औदुंबराला कोणीही शिवू नये असे देवांचे सांगणे होते. फक्त ब्राह्मण मंडळी सोवळ्याने पूजा करीत असत. एकदा चुकून एक मराठ्याचा मुलगा त्या वृक्षाला शिवल्याबरोबर त्याला साप चावून तो बेशुद्ध पडला. त्यावेळी बुवा तेथे नव्हते. ते आल्यावर ही गोष्ट त्यांचे कानावर जाताच त्या मुलाच्या पालकांना देवांची क्षमा मागावयास सांगितले, तेव्हा तो मुलगा लगेच सावध झाला.

एकदा दत्तजयंतीच्या उत्सवसमयी बुवांच्या दशाहातील एक आप्त बाई आजारी होती. तिच्या भेटीस सीतारामभटजी गेले होते. त्या बाईला देवाज्ञा झाली. आपण अशौचात. परत गावी गेल्यास दत्तजयंतीचा उत्सव बंद पडेल असे सीतारामभटजींना वाटून ते गावी परत न जाता तेथेच राहिले. ही बातमीही त्यांनी माणगांवी कळविली नाही. दुसरे दिवशी बुवा

देवपूजेकरिता देवाजवळ गेल्याबरोबर 'शिवाशिव' असा आवाज आला. बुवांनी बाहेर जाऊन पुन: येणे केले. पूजेकरिता आले पण पुन: तोच शब्द ऐकू आला. बुवांना काहीच कल्पना येईना. देवांना स्पष्ट खुलासा त्यांनी विचारताच 'तुम्हाला अशौच आल्यामुळे पूजा बंद' असे देवांनी सांगितले. त्यामुळे तो उत्सव राहिला. पुढे तपास करता कारण समजून आले.

माणगावी पहिल्या गुरुद्वादशीची गोष्ट. ठिकठिकाणची हजारो मंडळी प्रसादाकरिता जमली आहेत, अशा ऐन वेळी पाऊस थोडा थोडा पडू लागला. सर्व मंडळीनी हे पावसाचे संकट दूर करण्याबद्दल बुवांना विनंती केली. बुवांनी सांगितले, 'तुमच्याप्रमाणे तोही प्रसादाकरिताच आलेला आहे. येईना बिचारा ! बरे, तर एक मोठा नैवेद्य वाढून त्याला दाखवा म्हणजे तो जाईल.' असे सांगून पावसाला मोठा नैवेद्य दाखवला व 'सर्वांचे हाल होतील म्हणून पर्जन्यराजा तू काही वेळ दूर जा' अशी त्याची प्रार्थना केली. त्याबरोबर त्या जागेत पाऊस बंद झाला. आसपास पुष्कळ पाऊस पडला, पण तेथे उत्सवांतील कार्यक्रम संपेपर्यंत पावसाचा एक थेंबसुद्धा पडला नाही.

सावंतवाडीस एक पोलीस अधिकारी होते. त्यांचे येणे जाणे बुवांचेकडे होते. कागलच्या श्रीदत्तमूर्तीला एखादा दागिना करावा असे त्यांना वाटले. पण त्यावेळी त्यांचेकडे पैसे नव्हते. त्यांनी खर्च किती येईल वगैरे सर्व चौकशी करून ठेवली होती. पुढे काही प्रसंगाने त्यांना त्यांच्या दक्षतेबद्दल बक्षीस म्हणून २५ रुपये सरकारकडून मिळाले. ते त्यांनी आपला पूर्वीचा संकल्प पूर्ण करण्याकरिता म्हणून एका कागदाच्या पुडीत बांधून आपल्या कपाटात ठेवून दिले. पुढे त्यांना फिरतीवर जावे लागले. परत येण्यासही २-३ महिने लागले. त्याचवेळी बुवांना देवांचे सांगणे झाले की, सावंतवाडीचे पोलीस अधिकारी कंटक यांचेकडून २५ रुपये मिळणार आहेत त्या पैशांतून मुकुट करावा, काही दिवसांनी बुवा सावंतवाडीस गेले असता त्यांनी ही हकीकत सबनीसांना सांगितली. कंटक त्यावेळी फिरतीवरून परत आले होते. त्यांना बोलावून आणून

पैशाबद्दल विचारले. तेव्हा त्या गोष्टीचे त्यांना एकाएकी स्मरण झाले व दैवीशक्तीचे कौतुकही वाटले. नंतर त्यांनी ते २५ रुपये बुवांचेकडे दिले. बुवांनीं लगेच कोल्हापुराहून सोने आणवून मुकुट तयार करवून देवास घातला.

नारोपंत उकिडवे म्हणून एक ब्राह्मण सावंतवाडीस सरकारी नोकर होते. त्यांची प्रथम देवाधर्मावर श्रद्धा नव्हती. पण आणावकर समंधाने त्यांना आस्तिक बनविले. तेव्हापासून ते माणगांवी जात असत. ते प्रथम अक्कलकोट-स्वामीमहाराजांच्या शिष्यांना घेऊन माणगांवी निघाले होते. त्याचे आदले दिवशी रात्रीचे वेळी बुवांना देवांनी सांगितले की, 'उद्या येथे एक साधुपुरुष येणार आहेत. त्यांना पायस द्यावे.' दुसरे दिवशी ते साधू व उकिडवे दर्शनास आले. बुवांचे व त्यांचे थोडे बोलणे होते न होते इतक्यांत एका माणसाची गाय रानातून चुकून देवळाजवळ आली. त्याचवेळी तिचा मालकही गाय केव्हा सापडेल असा प्रश्न विचारण्यास बुवांचेकडे आला. तेथेच त्याला गाय मिळाली व त्याने लगेच गाईचे दूध काढून बुवांचेकडे आणून दिले. बुवांनी ते दूध तापवून व साखर घालून त्या साधूंना दिले व पूर्व रात्री झालेल्या दृष्टान्ताची हकिकतही त्यांना सांगितली. त्यामुळे उकिडवे यांची श्रद्धा वाढून ते शनिवारी पालखीस नियमाने येऊ लागले. एकदा त्यांना काही कारणामुळे पालखीस जाता आले नाही. पालखीची तयारी करून मंडळी त्यांची वाट पहात बसली. पण बुवांनी सांगितले, 'आज नारोपंत येणार नाहीत, त्यांची वाट पाहू नका.' मग मंडळींनी पालखीचे काम आटोपून घेतले. दुसरे दिवशी नारोपंतांनी येऊन बुवांना सांगितले की, 'काल आपणास एका गृहस्थाने काही अडचण आणल्यामुळे पालखीस येता आले नाही. म्हणून खेद वाटला.' बुवा म्हणाले, 'हल्ली त्या वाटेत वाघाचा त्रास रात्री होत असल्यामुळे देवांनीच तुम्हाला प्रतिबंध होण्याची व्यवस्था केली आहे.' एकदा नारोपंत उकिडवे यांना इंदूरास काही काम होते, म्हणून ते देवांच्या आज्ञेची वाट न पाहता बुवांनाच सांगून तिकडे रवाना झाले. पण वाटेत बऱ्याच अडचणी उपस्थित होऊन त्यांचे ७-८ दिवस मोडले. आपण

देवांची आज्ञा न घेताच आलो त्यामुळे असा घोटाळा झाला असे वाटून नारोपंत इंदूरला न जाता अर्ध्या रस्त्यातूनच परत फिरले व थेट माणगावास आले. तो दिवस शनिवारचा असल्याने पालखीची तयारी करून मंडळी नारोपंतांची वाटच पहात होती. इतक्यात नारोपंत येऊन पोचले. त्यांना आश्चर्य वाटले. आपण इंदूरला गेल्याचे तुम्हाला माहीत असता तुम्ही माझी वाट का पाहिली असे त्यांनी मंडळीना विचारले. मंडळी म्हणाली की, 'नारोपंतांना देवांची आज्ञा नसताना ते इंदूरास गेले. तरी त्यांचे जाणे तिकडे न होता ते आज पालखीस येतील. थोडी वाट पहा.' असे बुवांनी आपणास सांगितल्यावरून आपण थांबलो. हे ऐकताच नारोपंतांना बुवांच्या सामर्थ्याबद्दल असणारा आदर अधिक वाढला.

नारोपंतांनी एकदा आपल्या घरच्या गाईचे दूध देवांसाठी आणले होते. गर्दी असल्यामुळे आत न जाता ते बाहेरच एका बाजूस उभे राहिले. नैवेद्याची वेळ येताच बुवांना सांगणे झाले की, 'आज नारोपंतांचेकडील दूध नैवेद्यास पाहिजे.' बुवांनी एका इसमास बाहेर चौकशीकरता पाठविले असता खरोखरच त्या दिवशी दूध घेऊन नारोपंत आले असून ते बाहेरच थांबल्याचे कळले. नंतर ते दूध देवांना समर्पण केले गेले.

बुवांच्या आज्ञेप्रमाणे नारोपंतांनी देवांना निजण्याकरिता एक लहानसा चंदनाचा उत्तम पलंग तयार करवून माणगांवी नेला. पलंगाची रचना फारच सुंदर होती. तेथे जमलेल्या मंडळींपैकी याला खर्च काय आला म्हणून एकाने विचारले. तेव्हा नारोपंत म्हणाले, 'त्याचे पैसे द्यावयाचे नाहीत. सबब हिशेब ठेवला नाही.' ते ऐकून बुवांनी सांगितले की, 'या पलंगास तेवीस रुपये बारा आणे खर्च आला आहे.' मग नारोपंतांनी स्मरणपूर्वक सर्व हिशोब करून पाहिला तेव्हा आठ आण्याची तूट येऊ लागली. पुन: विचार करता सर्व लक्षात आले. पलंगावरील कापडाकरिता मुंबईच्या एका स्नेह्यास दोन रुपये दिले होते, त्याने दीड रुपयाचेच कापड आणले व त्याचेकडे आठ आणे शिल्लक राहिले. म्हणजे ते आठ आणेही खर्चांत धरल्यामुळे चोवीस रुपये तीन आणे होत होते. पण आता चूक लक्षात आल्यामुळे बुवांनी सांगितलेला हिशोब बिनचूक

असल्याबद्दल सर्वांची खात्री झाली.

पूर्वी घरप्रपंच बुवा पाहात असता एका व्यापाऱ्याचे एक रुपया अकरा आणे बुवांनी देणे होते. ते त्यावेळी विस्मृतीने देणेच राहिले. पुढे त्या व्यापाऱ्याने ते सूट म्हणून लिहून जमाखर्च पुरा केला. काही दिवसांनी बुवा एकदा ध्यानस्थ बसले असता त्या व्यापाऱ्याच्या चोपडीतील खातेबाकीचा एक रुपया अकरा आणेचा तो आकडा त्यांचे मनश्चक्षूंसमोर एकाएकी आला. त्याबरोबर त्यांनी व्यापाऱ्याकडे चौकशी केली असता आपण सूट देऊन ते खाते पुरे केले आहे असे सांगितले लगेच आपणास सूट घेणेची इच्छा नाही असे बुवांनी त्याला कळवून एकाकडून तितकी द्रव्याची भिक्षा मागून ते द्रव्य त्याला देऊन टाकले.

असाच एकदा एक गोसावी बुवांचेकडे येऊन धाबळी तरी द्या नाही तर आठ आणे तरी द्या, असा बुवांना आग्रह करू लागला. बुवांनी आपणाजवळ दोन्हीही नसल्याचे सांगितले. त्यावेळी तेथेच प्रदक्षिणा घालणाऱ्या एका बाईने मी पैसे देते असे बुवांना सांगून आठ आणे त्या गोसाव्यास दिले व तो गोसावी निघून गेला. काहीं दिवसांनी ध्यानाचे वेळी 'आठ आणे कोणाचे नावावर मांडावयाचे' हे शब्द बुवांचे कानावर आले. लगेच बुवांना त्या गोष्टीचे स्मरण झाले व त्यांनी एकाजवळ आठ आण्याची भिक्षा मागून ते पैसे त्या बाईस पोचविले. भक्ताला कोणाच्या ऋणांत ठेवण्याची देवांची इच्छा नसते हे खरे.

बुवांच्या कुटुंबास एकदा एका गृहस्थाने घरी नेऊन एक सौभाग्यालंकार दान दिला. तो अलंकार अंगावर घालून आपली पत्नी देवळात आलेली पाहून बुवांनी त्याबद्दल चौकशी केली. तेव्हा सर्व समजले. मग तो अलंकार काढून ठेवून देवळात यावे असे पत्नीला कळविले. तिनेही ती पतीची आज्ञा मान्य करून तो दागिना एका फडक्यांत बांधून घरात फेकून दिला व नंतर पूर्वीप्रमाणे लंकेची पार्वती बनून देवदर्शनास आली. तेव्हा कोठे बुवांना समाधान झाले. भक्तश्रेष्ठ नेहमीच पूर्ण निरिच्छ असतात व त्यांच्या सत्संगतीचा इतरांवरही परिणाम झाल्यावाचून राहात नाही.

बुवा वारंवार नरसोबावाडीस जात. तेथे रोज सकाळी दत्तपादुकांना पाणी घालण्याचा त्यांचा नियम कधीच चुकला नाही. ते पाहून पुजारी मंडळींनी एकदा यांचा नियम मोडण्याचे ठरविले व रोजच्यापेक्षा पहाटेची पूजा लवकर करण्याचा त्यांनी बेत केला. पण विश्वसाक्षी परमात्म्यापुढे हे लपून कसे राहील ? त्या रात्री स्वप्नात देवांनी बुवांना सांगितले 'लवकर उठून पाणी घालावे.' बुवा लवकर उठून गडबडीने स्नानास गेले व स्नान करून त्यादिवशी सर्वांचे आधी त्यांनी पाणी घातले. तेव्हा पुजारी मंडळींना पश्चात्ताप होऊन त्यांनी खरी हकीकत बुवांना सांगितली. ती ऐकून देवांनी लवकर उठण्यास का सांगितले याचा उलगडा बुवांना झाला.

एकदा नरकचतुर्दशीचे दिवशी सकाळी श्रीगोविंदस्वामी, बुवा व शिवराम अष्टेकर म्हणून एक ब्राह्मण असे तिघेजण शौचाकरिता बाहेर पडले. रस्त्यात पुजाऱ्यांच्या मुलांनी त्यांना गाठून प्रसाद घेण्यास सांगितले. स्वामी म्हणाले, 'आम्ही शौचास निघालो आहोत. तूर्त तुमचा प्रसाद मठात ठेवा. नंतर आम्ही घेऊ.' मुलेही हट्टाला पेटून म्हणाली, 'आता घेत असाल तर प्रसाद देतो, मठात काही आम्ही ठेवणार नाही.' शेवटी मुलांचा आग्रह पाहून स्वामींनी विचार केला की, आज या मुलांच्या रूपाने देवच आपली परीक्षा पाहात आहेत. काही हरकत नाही. शेवटी त्यांनी व बुवांनी मुलांकडून फळाचा प्रसाद मागून घेऊन तो लगेच खाऊन टाकला. अष्टेकराने मात्र प्रसाद न घेतल्यामुळे तो तापाने भयंकर आजारी पडला. नंतर त्याच्या बायकोस दृष्टांत झाल्याप्रमाणे तिने देवांजवळ क्षमा मागून लघुरुद्र केल्यावर तो बरा झाला. देवांच्या प्रसादाविषयी कशी भावना असली पाहिजे याबद्दल ही कथा मार्गदर्शक ठरेल.

माणगावी सर्व कार्यक्रम व्यवस्थित चालू होता. त्यात कधीही चूक होत नसे. एकदा बरेच श्रम झाले होते म्हणून बुवांनी नित्यक्रम थोडक्यात पुरा करून ते निजण्यास गेले. त्यावेळी त्यांना एक विंचू चावल्यामुळे रात्रभर झोप मिळाली नाही. त्या वेळेपासून त्यांनी आपल्या नित्यक्रमात कधीही खंड पडू दिला नाही.

नारोपंतांनी एकदा चांगले आंबे मुंबईहून आणवून देवास दिले.

त्याचा नैवेद्य दाखवीत असताना हे आंबट आंबे आहेत असे देवांचे सांगणे झाले. नारोपंतांना बुवांनी ते सांगताच नारोपंतांना प्रथम ते पटेना. पण आंबे स्वत: खाऊन पहाताच खरोखरच ते आंबट निघाले. ते पाहून त्यांना खेद वाटला.

सावंतवाडीस एक ब्राह्मण क्षयरोगाने पीडित झाला होता. औषधोपचार बराच केला. मग एका सद्गृहस्थांच्या सांगण्यावरून त्या ब्राह्मणाने नियमाने गुरुचरित्रवाचन सुरू केले. त्यामुळे हळूहळू त्याची प्रकृति चांगलीच सुधारली. पुढे तो ब्राह्मण वेदान्तविषयाचे श्रवण करू लागला. पण अधिकार नसल्यामुळे त्या श्रवणाचा त्याच्यावर विपरीत परिणाम झाला. त्याची कर्मावर अश्रद्धा उत्पन्न होऊन त्याने सर्व आचारधर्म टाकला. त्यामुळे त्याला पुन: पूर्ववत् क्षयरोगाचा त्रास होऊ लागला. तो यावर काही उपाय विचारण्याकरिता माणगांवी बुवांचेकडे आला असता बुवांनी त्याची निर्भत्सना करून सांगितले की, 'तुम्ही ब्राह्मण जातीत जन्माला येऊन आपली स्नानसंध्यादि नित्यकर्मे टाकली त्याचा हा परिणाम आहे. वेदान्ताचा अभ्यास केला तरी यावज्जीव ईश्वर व गुरु यांची सेवा केलीच पाहिजे. त्यांना कधीही सोडता यावयाचे नाही. तुम्ही तर वेदान्ताच्या पाठीमागे लागून सर्वच टाकले आहे. त्यामुळे तुमच्यावर देवांची अवकृपा झाली आहे. आता तुम्ही तुम्हाला वेदान्त सांगणाऱ्या गुरुकडे जाऊन निरोगी व्हा.' असे बुवांचे भाषण ऐकून तो ब्राह्मण खिन्नपणाने निघून गेला व पुढे काही दिवसांनी मरण पावला.

नरसोबावाडी येथील एक शास्त्री माणगावास आले व त्यांनी बुवांचेबरोबर तुम्ही योगाभ्यास कशाला करता? याचा उपयोग काय ? व याला आधार काय ? इत्यादि शंका काढून वादविवादास आरंभ केला. यावर बुवांनी 'आपला काही शास्त्राभ्यास नाही म्हणून आपण वादविवाद करू शकत नाही' असे त्यांना उत्तर देऊन आपण नित्यकर्मांत निमग्न झाले. पुढे त्या शास्त्रीबुवांना मोठा अभिमान झाला. ते तेथून निघून दुसऱ्या एका गावी गेले व तेथील एका धर्मशाळेत उतरले. श्रीदत्तमहाराजांनी ब्रह्मचारीवेष धारण केला व ते शास्त्रीबुवा जेथे उतरले होते त्या धर्मशाळेत

येऊन त्यांना त्यांनी योगाचे अनेक ग्रंथांचे आधार दाखवून संयुक्तिक पटवून दिली. त्यामुळे त्यांना अत्यंत समाधान होऊन ते पुन: माणगावी त्या ब्रह्मचाऱ्याची चौकशी करण्याकरिता म्हणून परत आले व त्यांनी सर्व हकिगत बुवांना सांगितली. बुवांनी शास्त्रीबुवांना लगेच सांगितले की, 'अहो ! ते प्रत्यक्ष दत्तमहाराज होते. तुम्ही त्यांचे पाय धरण्याचे विसरला.' हे ऐकून त्या वाडीकर शास्त्रीबुवांना फार वाईट वाटले.

माणगावास असलेल्या नदीचे नाव निर्मला असे आहे. ते नाव बुवांनीच ठेवलेले आहे. त्याची हकीगत अशी आहे - बुवा एकदा नरसोबावाडीला गेले होते. तेथून परत येत असता या नदीवर जेव्हा आले तेव्हो तेथे एक दिव्य स्त्री प्रगट होऊन तिने बुवांना सांगितले की, 'आता तुम्ही माझे नामाभिधान केल्यावाचून पुढे जाऊ नका.' बुवांनी थोडा विचार करून तिला सांगितले, 'तुझे नाव आम्ही निर्मला असे ठेवले आहे.' असे तिला सांगून त्यांनी नमस्कार केला. तीही स्त्री अदृश्य झाली. इतक्यात त्यांना आणण्याकरिता गावची बरीच मंडळी भजन करीत सामोरी आली. बुवांनी नदीचे नाव निर्मला असे ठेवल्याचे सर्वांना सांगून सर्वांबरोबर गावात आले.

माणगांवी राहणारे शंकरभटजी साधले नावाचे एक गृहस्थ एकाएकी घर सोडून निघून गेले, तीन चार वर्षे झाली. पुष्कळ शोध केला तरी त्यांचा पत्ता लागला नाही. त्यांच्या आईने बुवांना त्यांच्याबद्दल विचारले. तेव्हा त्यांनी त्यांच्या कुटुंबाने अश्वत्थाला एक लक्ष प्रदक्षिणा घालाव्या म्हणजे तो परत येईल असे सांगितले. शंकरभटजीच्या आईने सुनेकडून अश्वत्थ प्रदक्षिणेचा नियम पार पाडल्याबरोबर तिचा मुलगा आपोआप घरी परत आला.

जवळच एका गावी एका ब्राह्मणाचे घरी पिशाच्चपीडा फार होऊ लागली. तो बुवांना शरण आला. तेव्हा बुवा म्हणाले, 'तुम्ही घरात नियमाने नैवेद्य वैश्वदेव करीत चला व विष्णुसहस्रनामाच्या १२०० आवृत्ति करा.' असे सांगून काही स्वतंत्र मंत्रजपही त्यांना सांगितला. ते अनुष्ठान त्या ब्राह्मणाने सुरू करताच ती पीडा थांबली. पुढे काही दिवसांनी तो

नियम सुटल्याबरोबर पूर्ववत् त्रास होऊ लागला.

एका ब्राह्मणाची बायको वारली. दुसरा संबंध करण्याचे ठरले. जी मुलगी पाहिली तिचे टिपण नसल्याचे तिच्या बापाने सांगितले. शेवटी लग्नाचे ठरले. मुलाची आई बुवांचेकडे येऊन तिने पुन: मुलाचे लग्न ठरल्याचे बुवांना सांगितले. बुवा म्हणाले, 'त्या मुलीस मंगळ आहे. पण आता निश्चय झाल्यामुळे आपण त्यावर उपाय सांगतो तो करा म्हणजे दोषाचा परिहार होईल.' 'एक तांबडा बैल दान करून मंगळाचा जप करा व ब्राह्मणसुवासिनी भोजन घालून सांगता करा', असे सांगून दानाचा व जपाचा संकल्पपूर्वक विधी लिहून दिला. त्यानीही श्रद्धेने ते करून नंतर लग्न केले, त्यामुळे त्यांचा प्रपंच पुढे उत्तम प्रकारे चालला.

आत्मारामपंत साधले यांनी माणगावात दुसरे एक दत्तमंदिर स्पर्धेने बांधले होते. ते तेथीलच राहणारे होते. त्यांच्या सुनेचा प्रसूतिकाळ जवळ येऊन तिला अत्यंत त्रास होऊ लागला. तेव्हा ते बुवांचेकडे येऊन त्यांनी बुवांना आपल्या घरी येऊन काहीतरी उपाय करण्याबद्दल फार विनवून सांगितले. शेवटी बुवा आपले अनुष्ठान आटोपून त्यांचे घरी जाण्यास निघाले. अर्ध्या रस्त्यात येताच त्यांना देवांनी सांगितले की, 'मागे फिरा, आता पुढे जाण्याचा उपयोग होणार नाही.' बुवांनीं लगेच साधले यांना सांगितले की, 'तुम्ही घरी जा, आपण येऊन कार्य होण्यासारखे नसल्याने आपण येत नाही.' असे सांगून बुवा परतले. साधले घरी येऊन पोचण्या पूर्वीच सुनेचे प्राणोत्क्रमण झाले होते.

माणगांवचे दत्तमंदिरात प्रसंगाने इतर गावची वैदिक मंडळी येऊन म्हणणे करीत असत. पण सर्वांनी मिळूनच म्हणावे, चर्चारूपाने नको; कारण त्यामुळे मत्सर, द्वेष इत्यादि विकार होण्याचा संभव असल्याचे बुवांनी सांगावे, याकरिता सर्वांनी मिळूनच म्हणण्याचा प्रघात तेथे होता. अशाच एका प्रसंगी बुवांनी नारोपंत उकिडवे यांना पुरुषसूक्ताचा सविस्तर अर्थ सांगितला. त्यामुळे त्यांना विस्मय वाटून त्यांनी बुवांना विचारले, 'बुवा ! या आपल्या प्रांतात वेदार्थ सांगणारी मंडळी प्राय: दुर्मिळ ! तुम्हीही कोठे बाहेर पडला नाही; तर तुम्हाला वेदाचा अर्थ कसा

समजतो ?' बुवा म्हणाले, आपण एकदा नरसोबावाडीहून इकडे येताना एका गावी मुक्काम केला. तेथे एक स्वामीमहाराज पूजा करीत होते. शेवटी मंत्रपुष्प झाल्यावर आपण एक संहितेचा अध्याय म्हटला. ते म्हणणे यांना आवडले. नंतर स्वामींनीं आपणास विचारले की, 'तुम्ही वेदार्थ समजण्याविषयी काही अभ्यास केला आहे काय ? नसल्यास आपण ती दिशा दाखवून देऊ' असे त्या स्वामीमहाराजांनी सांगितले. ते कबूल करून आपण तेथे मुक्काम केला. तेव्हा स्वामीमहाराजांनी 'संहितेतील पहिल्या तीन अध्यायांचा अर्थ वैदिक पद्धतीस अनुसरून उत्तम प्रकारे सांगितला आणि तेवढ्या दिग्दर्शनावरून वेदांतील कोणताही भाग आपणास समजू लागला.' ही हकीकत त्या दिवशी बुवांनी नारोपंत उकिडवे यांना सांगितली. निष्ठापूर्वक सदाचाररत सद्भक्ताला ईश्वर कोणत्याही रूपाने भेटून घरबसल्या दिव्य ज्ञान देऊन कृतार्थ करतो असे या उदाहरणाने दिसते.

एकदा देवांचे नैवेद्याकरिता मोठ्या भांड्यात केळ्याची शिकरण केली होती. बुवा नैवेद्य दाखवू लागले असता देव म्हणाले की, 'यात नरोटीचा तुकडा पडलेला आहे तो काढून नैवेद्य दाखवावा.' बुवांनी ते पात्र बाहेर आणून तुकडा काढून टाकण्यास मंडळींना सांगितले. मंडळींनी पुष्कळ शोध केला आणि यात काही पडले नाही असे बुवांना सांगितले. बुवा म्हणाले, 'देवांची स्पष्ट आज्ञा झाली आहे, पुनः चांगले पाहा.' नंतर मंडळींनी ती शिकरण दुसऱ्या पात्रांत हळूहळू ओतून पाहण्याचे वेळी तो तुकडा मिळाला. असे चमत्कार सहज घडून येत होते.

बुवांच्या मातोश्रींनी एकदा महाशिवरात्रीकरिता गोकर्णास जाण्याचे ठरविले. यात्रेच्या वेळी कोणीतरी मुलगा बरोबर पाहिजे म्हणून तिने इतर मुलांना विचारले, पण त्यांनी नकार दिला. शेवटी बुवा आपले खात्रीने ऐकतील अशा मोठ्या आशेने बुवांना आपल्याबरोबर यात्रेस येण्यास सांगितले. पण 'देवांची परवानगी झाल्याशिवाय आपण ही जागा सोडून कोठेही जाऊ शकत नाही' असे बुवांनी सांगताच ती बिचारी निराश झाली. इतकी मुले असून एकाही मुलाचा उपयोग आपणास नाही हे पाहून

तिला फार वाईट वाटले. मातोश्रींची उद्विग्नता पाहून तिच्या समाधानाकरिता आपण बरोबर येतो, तयारी करा असे त्यांनी मातोश्रींना सांगितले. ते ऐकून अत्यंत आनंद वाटून त्यांनी निघण्याची तयारी केली. प्रथम सावंतवाडीला जाण्यास मंडळी निघाली. जाता जाता बुवांच्या पायास एकाएकी फुरसे चावले. संध्याकाळची वेळ होती; काही समजले नाही. बुवांनी पाय झटकला व कोणासही न सांगता ते वाट चालू लागले. सावंतवाडीस येऊन उकिडवे यांचे दत्तमंदिरांत मुक्काम केला. देवाचे तीर्थ तसेच पात्रात ठेवून देण्यास बुवांनी नारोपंतांना सांगितले. पुढे लवकरच पायाला बरीच सूज आली. विषही फार चढून कळा फार येऊ लागल्या. तेव्हा देवांचे तीर्थ त्या फुरसे चावलेल्या जागी घालण्यास बुवांनी सुरुवात केली. तेथे असलेल्या एका इसमाने हे बुवांचे कृत्य पाहून तत्काल नारोपंतांचे घरी जाऊन हे वर्तमान त्यांना सांगितले. नारोपंत ताबडतोब मंदिरांत आले. चौकशीअंती फुरेसे चावल्याचे बुवांनी सांगितले. बुवा समाधी लावून बसले तरी ते विष समाधीतून उठल्याबरोबर पुन: चढू लागले. त्रास काही केल्या थांबेना. रामभाऊ सबनीसांनी एका मांत्रिकास पाठविले; पण बुवा त्याच्याकडून इलाज करून घेण्यास तयार झाले नाहीत. सर्वांनी आग्रहाने पायाला औषध लावले. पण ते लावताच सूज अधिक वाढून वेदनाही पूर्वीपेक्षा असह्य झाल्या. तेव्हा तो वर लावलेला लेप धुऊन टाकल्यावर किंचित् बरे वाटले. दोन तीन दिवस तेथे मुक्काम केला. पण पायाची सूज व वेदना कमी होण्याचे चिन्ह दिसेना. बुवांच्या वेदना पाहून मातोश्रींना मात्र फार वाईट वाटले. आपल्यामुळेच हा प्रसंग मुलावर आला. आता गोकर्णास तरी वेळेवर कसचे जाणे होते, असे वाटून ती बिचारी बुवांना घेऊन परत माणगांवी आली. त्याच दिवशी रात्री देवांनी स्वप्नांत बुवांचा पाय दाबून त्यांत घुसून बसलेला दाताचा तुकडा काढून टाकला. पुढे दोन दिवसांनी हळूहळू सूज कमी होऊन पाय उत्तम पूर्ववत् झाला. नंतर बुवा म्हणाले, 'आपण गोकर्णाला जाऊ नये म्हणून हे विघ्न देवांनेच आणले. करिता देवांच्या आज्ञेवाचून कोठेही जाणे चांगले नाही.' मातोश्रींनीं तर त्या दिवसापासून बुवांना त्यांच्याविरुद्ध काहीही

करण्याचा आग्रह करावयाचा नाही असे ठरवून टाकले. पण मातृप्रेमामुळे पुढे एकदा असा प्रसंग ओढवलाच. तो प्रकार असा, एकदा घरात लाडू केले. सर्वांप्रमाणे वासुदेवानेही लाडू खावा असे माउलीला वाटले. तिने बुवांना हाक मारून लाडू खाण्याचा आग्रह केला. प्रेमळ मातेच्या आग्रहापुढे बुवांचे काही चालेना. शेवटी नाइलाजाने बुवांने लाडवाचा एक तुकडा तोंडात टाकला मात्र. तोच घशात एकदम घास अडकून बुवांनीं डोळे पांढरे केले. आईला पश्चात्ताप होऊन तिने देवांची प्रार्थना केली व इत:पर आपण मुलाला कोणत्याही बाबतीत आग्रह करणार नाही असे देवांजवळ कबूल केल्यावर तो घास बुवांचे घशाखाली जाऊन बुवांना बरे वाटले.

'अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्याग:' या योगसूत्राप्रमाणे ते देऊळ एखाद्या महर्षीच्या आश्रमाप्रमाणे निर्वैर झाले होते. सर्वही प्राण्यांना तेथील स्थानाबद्दल आत्मीयता वाटत होती. बुवा जेवणास बसले की, उंदरांनी जवळ येऊन त्यांनी ठेवलेला भात अत्यंत शांतपणाने खावा. परका मनुष्य दिसला की पळून जावे. एक नाग दोन महिने देवळातच होता. इकडे तिकडे फिरताना सर्वांना दिसे. पण कोणालाही त्याचा त्रास झाला नाही. ७-८ हात लांबीची धामण देवळाच्या उंबऱ्यावर डोके टेकून निजत असे. लोकांनी काही दिवसांनी तिला मारण्याचे ठरविले. पण ती शेवटी जंगलांत निघून गेली. अशाही स्थितीत बुवा मात्र निश्चित मनाने देवळातच निद्रा घेत असत. देवळाजवळ डोंगरावर एक मोठी गुहा आहे. तेथे बुवा ध्यानाकरिता जाऊन बसत. एकदा ते गुहेत ध्यानस्थ बसताच बाहेर एक मोठा वाघ येऊन बसला. बुवांचे ध्यान संपल्यावर ते उठून पाहतात तो समोरच एक मोठा वाघ बसलेला ! त्याला पाहताच बुवांची भीतीने बोबडी वळली. शेवटी गुहेतच ते बसून राहिले. थोड्या वेळाने वाघ गुरगुरून निघून गेला व बुवा देवळात परतले. तेव्हा देवांनी सांगितले की 'यापुढे गुहेत बसण्यास जाऊ नये.' त्या सांगण्याप्रमाणे पुढे ती गुहा बुवांनी वर्ज्य केली. असाच एकदा एक मोठा नाग देवळात आला व देवापुढे जाऊन दर्शन करून परत जाऊ लागला. रात्रीची वेळ ! बुवांच्या

सांगण्याप्रमाणे मंडळीनी हातांत दिवा धरून त्याला बरेच दूरपर्यंत पोचविले.

एका उत्सवाचे वेळी नैवेद्यावर तूप न वाढताच तो देवळात आणून देवापुढे ठेवला. बुवा नैवेद्य दाखविणार इतक्यात त्यांचे पाठीवर कोणाचा तरी जोराचा धक्का बसला. बुवा फार घाबरले व तूप तूप म्हणून ओरडले. नंतर तूप आणून घातल्यावर नैवेद्य समर्पण केला. देवांना यत्किंचितही न्यूनता खपत नव्हती. अन्नशुद्धीवाचून नैवेद्य कसा समर्पण होईल ! अनन्य भक्तांची न्यूनता देवच पूर्ण करतो. दीपवाळीस एकदा नैवेद्यास सर्वांनी पोहे दिले; दही-पोहे होते. घरातीलही पोहे त्यात होते. पण ते कोरडेच त्यात मिसळले गेले. देव म्हणाले, 'आज आम्हाला कोरडे पोहे का खाऊ घालता ?' चौकशी करता घरांतून आलेले पोहे कोरडे असल्याचे समजले. ते दुसरे कोणी पाठविले होते. आईने नव्हे. पण त्या दिवशी आईचा गळा सुजला. देवांजवळ क्षमा मागितल्यावर आईस बरे वाटले.

एकदा एका माणसाने देवाचे नैवेद्यास बराच मोठा सुरण आणून दिला. त्यादिवशी भाजी करून त्याचा नैवेद्य दाखविला व नंतर तेथे जमलेल्या मुलांना तो भाजीचा प्रसाद दिला. तो खाताच मुलांच्या गळ्याला अत्यंत खाज सुटून त्रास झाला. यावरून तो सुरण खाजरा असल्याचे कळून आले. तथापि बुवांनी ती नैवेद्याची भाजी टाकून न देता प्रसाद म्हणून सर्व खाऊन टाकली. गळा फार सुजला. पण ते सर्व सहन केले. याला म्हणतात खरा भाव !

माणगावी बुवांचे महत्त्व वाढलेले पाहून इतरांना त्यांचा हेवा वाटू लागला व काही मंडळींनी आसपास त्या त्या ठिकाणी दत्तमंदिर स्थापून बुवांचेप्रमाणेच भजनपूजनाचा कार्यक्रम सुरू केला. पण 'दया क्षमा शांति तेथे देवांची वसति' याप्रमाणे स्थिती इतरत्र नसल्याने ती देवस्थाने फार दिवस चालली नाहीत. लवकरच त्या त्या मंडळींना कोणाला राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा तर कोणाला वेड लागणे असे प्रकार घडून येऊन ती स्थाने ओस पडली. साधूंचा द्रोह केला असता ते देवाला कसे आवडेल ?

इतर अधिकारी मंडळीना अशीच बुवांचे सारखी आपली प्रसिद्धी व्हावी असे वाटे. पण बुवांना मात्र या प्रसिद्धीचा कंटाळा असे. श्रीदत्तमहाराजांचे वास्तव्य माणगांवात झाल्यापासून तेथील उत्सव फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. दहा दहा हजार मंडळी जमत असत. अशा स्थितीत बुवांना अनुष्ठान करण्यास स्वस्थता कोठून मिळणार ? शेवटी बुवांनी मंडळींची गर्दी कमी करण्याबद्दल देवांची प्रार्थना केली. पुढे दोन वर्षे गेल्यावर 'तुमच्या इच्छेप्रमाणे हा बाजार बंद केला' असे देवांनी बुवांना सांगितले. नंतर मात्र मंडळींची ये-जा हळूहळू कमी झाली.

एक कुष्ठरोग झालेला मनुष्य माणगांवी येऊन राहिला. बुवांच्या सांगण्याप्रमाणे तो देवाला लांबून प्रदक्षिणा घालण्याची सेवा करू लागला. त्यामुळे काही दिवसांनी त्याचा तो रोग बरा झाला. तेव्हा त्याने गुरुद्वादशीकरिता नरसोबाचेवाडीस जाणेबद्दल आपली इच्छा बुवांचेजवळ व्यक्त केली. बुवांनी त्याला सांगितले की, 'तुला येथून जाण्याबद्दल अद्यापि देवांची आज्ञा न झाल्याने तुला हे गाव सोडता येणार नाही.' असे बुवांनीं सांगितले तरी तो आपला हट्ट सोडीना. त्या रात्री उंदरांनी त्याचे अंग बरेच ठिकाणी कुरतडून खाल्ले. दुसरे दिवशी बुवांनी तीर्थ शिंपडून त्या पीडेतून त्याला मुक्त केले. नंतर काही दिवस तेथे राहून तो मनुष्य बुवांना न विचारताच नरसोबाचे वाडीस निघून गेला. वाडीचे हद्दीत पाऊल टाकताच पुन: पूर्ववत् त्याचे सर्व अंग रोगाने भरून गेले व याला वाडीतून हाकलून द्या असा देवांचा दृष्टांत पुजाऱ्यांना झाला. त्याप्रमाणे पुजाऱ्यांनी त्या माणसाला वाडीत राहू दिले नाही. शेवटी नाइलाजाने तो मनुष्य परत माणगांवी आला. पण येथेही देवांच्या सांगण्याप्रमाणे बुवांनी त्याला थारा न देता हाकलून काढले. शेवटी तो आपल्या गांवी परत गेला व या रोगांतच त्याचा अंत झाला.

एकदा ग्रस्तोदित्त चंद्रग्रहण आले होते. ते ग्रहण दिसणार नाही असे पंचांगात दिले असल्यामुळे मंडळी स्वस्थ होती. बुवा रोजच्याप्रमाणे सकाळी अनुष्ठान आटोपून भिक्षेस निघाले. इतक्यांत देवांनी सांगितले की, 'आज ग्रहण दिसणार आहे. सबब भिक्षा व नैवेद्य आज नाही.'

हे ऐकून बुवांनी सर्वांना तसे सांगितले. गावातील काही प्रतिष्ठित मंडळींनी बुवांचा त्यावेळी उपहास केला. पण संध्याकाळी जेव्हा ग्रहण खरोखर दिसले तेव्हा सर्वांना आपली चूक कळून आली.

सावंतवाडीचे कारभारी बावडेकर म्हणून होते. हे प्रथम नास्तिक असून पिशाच्च वगैरे सर्व खोटे असे म्हणत. त्यांच्या मुलीचे लग्न झाले. लग्न झाल्याबरोबर ती मुलगी एकाएकी बेशुद्ध पडली. आणावकर समंधाने तिला पिशाच्चबाधा झाली असल्याचे सांगून तिला माणगांवी घेऊन जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या मुलीला माणगांवी नेले असता बुवांनी अंगारा देऊन तो जपून ठेवावा व पुन: दत्तजयंतीचे उत्सवाचे वेळी यावे असे सांगितले. पण त्या मुलीला सांगितलेल्या वेळी माणगावी न नेल्यामुळे ती पुन: बेशुद्ध पडली. थोड्या वेळाने सावध होऊन बडबडू लागली. डॉक्टरला बोलावून आणले. डॉक्टरला पाहताच ती मुलगी एकदम त्यांचे अंगावर धावून जाऊन म्हणाली की, 'मला औषध देतोस काय ? काय तुझा पराक्रम आहे तो दाखीव.' शेवटी नाईलाजाने डॉक्टर निघून गेले. लोक बावडेकरांना म्हणू लागले की, 'तुम्ही तर पिशाच्च मानीत नाही. आता तुमच्या घरांतच ते शिरले आहे.' बावडेकरांनी साखर व पाच रुपये एका नोकराबरोबर माणगांवी पाठवून मुदत देणेस बुवांना कळविले. बुवांनी त्या नोकराला सांगितले की, 'देवांपुढे लाच देऊन काही उपयोग नाही.' असे सांगून ती साखर व रुपये परत केले. शेवटी बावडेकर स्वत: मुलीस बरोबर घेऊन माणगावी आले. 'तुमचा पिशाच्चावर विश्वास नसताना तुम्ही इकडे का येता ? असे बुवांनी त्यांना विचारले व 'पालखी झाल्यावर आणावकर समंध याबद्दल खुलासा करील' असे सांगितले. त्यादिवशी काहीच सांगणे झाले नाही. दुसरे दिवशी सकाळी आणावकर समंधाने बावडेकरांना सांगितले की, 'तुम्ही नरसोबाचे वाडीस एक अश्वत्थ वृक्षास पार बांधा व एक सहस्र ब्राह्मण भोजन घाला.' हे समंधाचे म्हणण ऐकून इतकी आपली शक्ति नसल्याचे बावडेकरांनी सांगितले. तेव्हा तुम्ही शंभर ब्राह्मण जेवू घाला असा बुवांनी निर्णय दिल्यावर त्यांनी नरसोबाचे वाडीस जाऊन बुवांचे आज्ञेप्रमाणे

ब्राह्मण समाराधना करताच ती मुलगी पूर्णपणे बरी झाली.

एकदा नारोपंत उकिडवे यांचे गुडघ्यास एकाएकी सूज येऊन पाय फार दुखू लागला. तसेच ते माणगावी आले. बुवांनी त्यांची ती स्थिती पाहून विचारले की, 'श्रीदत्तमूर्तीच्या गुडघ्यास कधी धक्का लागला होता काय ?' पुढे चौकशीकरिता स्नानासाठी मूर्ति खाली घेण्याचे वेळी मूर्तीच्या पायास घंगाळ लागल्याचे समजले. बुवांनी देवांचे सर्वांगाला तूप लावून ऊन पाण्याने स्नान घालण्यास सांगितले. तसे करताच नारोपंतांचा पाय बरा झाला.

एक अत्यंत अभिमानी वैदिक ब्राह्मण गांवोगांवी सर्व वैदिकांचेकडून जयपत्रे घेत घेत एकदा माणगांवी आला व तेथील वैदिक मंडळींपुढे त्याने आपला अभिप्राय सांगितला. सर्व मंडळी रात्री देवळात जमून म्हणणे झाले व दुसरे दिवशी बुवांनीं वेदांतील काही भाग घेऊन पुराण सांगितले. ते ऐकल्याबरोबर त्या ब्राह्मणाचा अभिमान तत्काल नाहीसा होऊन त्याने बुवांना सर्वांसमक्ष साष्टांग नमस्कार घालून त्यांची क्षमा मागितली.

वेदाध्ययन करणाऱ्यांनी अत्यंत शुद्धतेने राहावे असे बुवा सांगत असत. नाटकाला, जत्रेच्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी जाऊ नये अशी त्यांची ताकीद असे. तरीसुद्धा एखादे वेळी विद्यार्थी रात्री मुकाट्याने नाटकास वगैरे जात व पहाटे स्नान करून म्हणण्याकरिता येत. पण झोप थोडीच त्यांचे ऐकणार ! म्हणता म्हणता मुलांना झोप आल्याचे बुवांना दिसताच मुलांची चूक त्यांच्या लक्षात येई व त्याबद्दल दंड म्हणून प्रत्येकाकडून तेथल्या तेथेच एक सहस्र गायत्रीमंत्राचा जप करून घेतला जाई.

देवांनीं केव्हा केव्हा बुवांची परीक्षा पहावी. एकदा बुवा ध्यान करीत असता एक मनुष्य ध्यानातच पालखी घेऊन आला व 'तुमचे इहलोकचे वास्तव्य संपले आहे. तुम्ही पालखीत बसा.'असे त्याने बुवांना सांगितले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे निर्विकार मनाने बुवा त्या पालखीत बसले. मात्र लगेच ते दृश्य नाहीसे झाले. अशाच एकदा ध्यानाचे वेळी तुला कुष्ठरोग होणार असे देवांचे सांगणे झाले. ध्यानातून उठल्याबरोबर त्या सांगण्याप्रमाणे अनुभवही आला. एक हात व एक पाय निश्चेष्ट झाले.

प्रारब्धयोग समजून तीन चार दिवस बुवांनी ते सहन केले. ते लवकरच बरे झाल्यावर बुवांनी याबद्दल देवांकडे विचारणा केली असता देव म्हणाले की, 'तुमचा निश्चय कसा आहे ते पाहिले.'

माणगांवच्या देवस्थानाबद्दल बुवांनीं एकदा लोकांना सांगितले की, हे स्थान फार जागृत आहे. पण नरसोबावाडीप्रमाणे योगिनी वगैरे परिवार देवता येथे नाहीत. फक्त गण तेवढे आहेत. त्यामुळे येथे सर्वांची कामे इच्छेप्रमाणे होणार नाहीत.

देवांचे गण माणगांवी देवस्थानात होते. याबद्दल एकदा अशी प्रचीति आली की, एका बाईने देवळात जाऊन देवांपुढचे चार आणे. चोरून नेले. लगेच देवांच्या गणाने तिच्या शरीरात शिरून तिला त्रास देण्यास आरंभ केला. त्यामुळे भिऊन ती बाई परत देवळांत आली व आपला गुन्हा कबूल करून ते चार आणे तिने देवांपुढे ठेवले.

मानसन्मानापासून बुवा नेहमी दूर असत. एकदा बुवा सावंतवाडीस उकिडवे यांचे दत्तमंदिरात आल्याची वार्ता राजवाड्यात समजली. बुवांना राजवाड्यात बोलवण्याचे ठरले. ही गोष्ट बुवांचे कानी जाताच त्यांनी उकिडवे यांना गांवाबाहेर अमुक ठिकाणी भेटा असा निरोप पाठवून लगेच ते सावंतवाडीतून बाहेर पडले.

बुवांच्या घरच्या स्थितीचे वर्णन पूर्वी आलेलेच आहे. सासू-सुनेचे जमत नव्हते. त्यातही दारिद्र्यामुळे अन्नवस्त्राची चिंता. नाना कोनकर तेथील व्यवस्थापक होते. त्यांनी घरातील कलहाची स्थिती पाहून अन्नपूर्णाबाईंना आंबोली गावात इचलकरंजीकरांच्या छत्रात स्वयंपाक करण्याकरिता पाठविण्याचे ठरविले. अन्नपूर्णाबाई बिचारी आपल्या दु:स्थितीने अत्यंत निराश झाली होती. आपल्या पतीचे यश एवढे मोठे पसरले आहे, पण केवळ आईच्या प्रेमामुळे ते आपणाकडे लक्ष देत नाहीत, हे पाहून तिला वाईट वाटे. यामुळे बरे झाले, चार दिवस दूर राहण्यास मिळाल्यास घरातील नित्याची कटकट तरी मिटेल असे वाटून अन्नपूर्णाबाईंनीही कोनकरांच्या म्हणण्यास संमती दिली व कोनकरांच्या घरीच त्या राहण्यास गेल्या. दुसरे दिवशी तिकडे जाणेकरिता निघणेचे

ठरले. बुवांना या गोष्टीची गंधवार्ता सुद्धा नव्हती. ते देवळातील आपल्या नित्यकर्मांत दंग होते. मातोश्रीला मात्र लोकापवादाची भीती वाटून त्यांनी एका इसमाला ही गोष्ट बुवांचे कानावर घालण्यास सांगितले. त्यादिवशी शनिवार होता. रात्र पालखी वगैरे सर्व आटोपल्यावर बुवा स्वस्थ पडले होते. इतक्यात त्या इसमाने येऊन मातोश्रींचा निरोप बुवांना सांगितला. बुवांनीं निर्विकार चित्ताने त्या इसमास विचारले की 'आप्पा ! कुटुंबाने असे जाणे तुम्हांला बरे वाटते काय ?' आप्पा म्हणाले, 'नाही' मग बुवा म्हणाले, 'देवांची प्रार्थना करा म्हणजे जाणे रहित होईल.' आप्पांनी प्रार्थना केली व ते घरी निघून गेले. पहाटे कोनकरांना अकस्मात् फुरसे चावले. त्यामुळे त्यांचा पाय सुजून अतिशय त्रास होऊ लागला. अर्थातच अन्नपूर्णाबाईंचे जाणे रहित झाले. त्या मुकाट्याने उठून आपल्या घरी आल्या व घडलेली सर्व हकिकत त्यांनी आपल्या सासूपुढे सांगितली. भक्ताच्या मानापमानाचे संरक्षण देवांकडून कसे होते याबद्दलची ही साक्ष आहे. भक्ताला त्याची परवाही नसते.

माणगांवी श्रीमंत, गरीब सर्वही आर्त भक्त सेवा करण्याकरिता येऊन राहात व निष्ठेने सेवा करून कृतकार्य होऊन परत आपले गावी जात. सावंतवाडी संस्थानच्या राणीसाहेबांना काही पिशाच्चबाधा झाली. राजवाड्यातील एका स्वयंपाक्याचे पैसे त्यांच्याकडे राहिले व तो तशाच स्थितीत पैसे न घेताच मेला. तो पिशाच्च होऊन त्यांना त्रास देऊ लागला. राणीसाहेब ती पीडा जाण्याकरिता माणगावी येऊन बुवांनी सांगितल्याप्रमाणे प्रदक्षिणा घालणे, नित्य धूप, आरती अशा समयी उपस्थित राहाणे अशी सेवा एखाद्या साध्या सेवेकऱ्याप्रमाणे करू लागल्या. रात्री आरतीचे वेळी त्यांचे अंगांत रोज पिशाच्चसंचार होऊन त्याही इतरांप्रमाणे खांबास चिकटून राहात व अव्यवस्थित चाळे करीत. वेळोवेळी बुवांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी तेथे ब्राह्मणद्वारा महारुद्र, गुरुचरित्रसप्ताहवाचन इत्यादि करावे. राजेसाहेब सुद्धा वेळोवेळी श्रीदत्तदर्शनास येत असत. काही दिवसांनी राणीसाहेबांची बाधा पूर्णपणे दूर होऊन त्या आनंदाने घरी गेल्या.

श्रीदत्तमंदिरास पाडगांवकर यांनी काही मदत केली होती. त्यांचा नोकर सावंत याला पोटशुळाची असह्य व्यथा होती. त्याकरितां त्याच्या मालकाने त्याला माणगांवी सेवेकरिता ठेवले होते. नित्य नामस्मरण करीत प्रदक्षिणा घालण्याची सेवा बुवांनी त्याला सांगितली होती. त्याप्रमाणे तो भावभक्तीने सेवा करीत होता. काही दिवसांनी त्याची पोटशुळाची व्यथा बरीच कमी झाली. श्रीदत्तमंदिरांत रात्री शेजारती झाल्यावर कोणीही राहावयाचे नाही असा नियम होता. एके दिवशी मंदिरातच सहज पडला असता सावंताला झोप लागली. रात्री त्याला स्वप्नात एकाने येऊन सांगितले की, 'तुझा मालक मेला. सबब तू ताबडतोब वाडीस जा.' दुसरे दिवशी हे स्वप्न सावंताने बुवांना सांगितले. तेव्हा बुवा म्हणाले, 'हे काही देवांचे स्वप्न नाही, पिशाच्चाचे आहे. करिता देवांची आज्ञा घेतल्यावाचून तू हे स्थान सोडून वाडीस जाऊ नकोस.' बुवांनी असे स्पष्ट सांगितले असताही त्यांचे न ऐकता तो सावंतवाडीस निघून गेला. तेथे गेल्यावर पाहतो तो आपला स्वामी जिवंत असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटले. मालकाने त्याला रागे भरून परत माणगांवी पाठविले. त्याप्रमाणे तो परत येण्यास निघाला. पण वाटेत त्याला पिशाच्चाने गाठून पुनः त्याला पोटशूळ इतका असह्य उत्पन्न केला की, त्यांतच त्याचा शेवटी अंत झाला. देवांची आज्ञा कोणती व इतरांची कोणती हे निश्चित समजावून सांगण्यास महापुरुषच समर्थ असतात. म्हणून ते सांगतील त्याच्यावर विश्वास ठेवून वागण्यातच मनुष्याचे पूर्ण कल्याण आहे. तेथे स्वतःची बुद्धि बिलकूल चालवून उपयोग नाही हे तात्पर्य.

देवळाजवळच डोंगरांत एक झरा बुजलेला होता. ती जागा मंडळींनी खणल्याबरोबर त्या झऱ्यांतून धो धो धो पाणी वाहू लागले. मंडळींनीं जिकडे तिकडे गंगा आली, गंगा आली म्हणून प्रसिद्ध केले ! झाले. लोकांना काय हे वृत्त समजल्याबरोबर भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी स्नानाकरिता येऊ लागल्या. ब्राह्मण मंडळी संकल्प सांगू लागली. हा हा म्हणता ३०-४० रुपये जमले. बुवांना ही वार्ता समजताच सर्व ब्राह्मणांना बोलावून आणून ताबडतोब ही बुवाबाजी बंद करण्यास सांगितले आणि

तेथे आजरेकरबुवांनी स्थापन केलेल्या मारुतीकरिता जमलेल्या पैशाचा विनियोग सर्वांकडून करविला. आजरेकरबुवा हे कनोजी ब्राह्मण शरीराने फार धिप्पाड होते. त्यांनी उपासनाबलाने मारुतीरायांना प्रसन्न करून घेतले होते. त्याप्रमाणे ते बोलतील ते खरे होत असे. यांचे बुवांवर अतिशय प्रेम होते. आवेश आला म्हणजे तेलांत शेंदूर कालवून प्यावा, दहा दहा हात उड्या माराव्यात, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर वानराप्रमाणे उड्या मारून जावे अशा लीला आजरेकरबुवा करीत असत. त्यांना आजऱ्याचे मारुतीबुवा असे म्हणत. यांनी माणगावी दत्तमंदिरा-नजीक द्रोणगिरी पर्वत उचललेल्या मारुतीची मूर्ति स्थापन केली होती. ते वेळोवेळी माणगावी बुवांना भेटण्याकरिता म्हणून येत असत. हे शेवटी नरसोबाचे वाडीत जाऊन राहिले होते. तेथेच त्यांचे देहावसान झाले.

एकदा बुवा नरसोबाचे वाडीस गेले असता एक चमत्कार घडला. पाऊस बरेच दिवस न पडल्यामुळे खाली दत्तपादुकांवर मंडळींनी संततधार अनुष्ठान सुरू केले. त्याचवेळी वरच्या बाजूस नामसप्ताह चालू होता. सप्ताहाचे ठिकाणी श्रीमौनीस्वामी बसले होते. त्यांच्याजवळ काही मुलांनी जाऊन आपल्या बालबुद्धीप्रमाणे त्यांना विचारले, 'स्वामीजी? वर सप्ताहांत देव प्रत्यक्ष येऊन बसले आहेत, कारण आपण येथे आहात. तर मग खाली संततधार कोणावर धरावयाची ? दोन ठिकाणी देव कसे एकदम राहतील ?' ही मुलांची वाणी ऐकून त्यांच्या समाधानाकरिता श्रीमौनीस्वामीही आपल्या बालवृत्तीस अनुसरून मुलांना म्हणाले, 'गड्यांनो ! तुमचे म्हणणे बरोबर आहे, आताच्या आता खाली जाऊन संतत धार बंद करण्यास सांगा.' मुलांनीं खाली जाऊन स्वामीमहाराजांची आज्ञा मंडळींना कळविली. पण एकदा सुरू केलेले अनुष्ठान मंडळींनाही मध्येच बंद करता येईना. ते समजल्यावर श्रीमौनीस्वामी रागावून म्हणाले की, 'देव इकडे वर सप्ताहात बसले असता त्यांना तुम्ही संततधार ठेवून त्रास देता तर पाऊसच पडणार नाही जा. काय करायचे ते करा.' झाले. स्वामींची वाणी म्हणजे श्रीदत्तप्रभूंचीच वाणी. शेवटी लोक हताश होऊन बुवांचेकडे गेले. बुवांनीं सांगितले, 'श्रीमौनीस्वामींनी प्रार्थना केल्यावाचून

पाऊस कधीच पडणार नाही. तरी तुम्ही अशी युक्ती करा की, आपली सर्व मुले नेऊन स्वामींच्या जवळ सोडून द्या आणि त्यांना असे सांगा, 'स्वामीजी ! या मुलांचा सांभाळ आमच्याकडून होणे शक्य नाही, पाऊस नसल्यामुळे चिंता आहे. तरी ही मुले सांभाळा.' इतक्यात बुवाही तेथे आले. बुवांनी सांगितले की, 'महाराज ! आपली आज्ञा होण्यापूर्वीच खाली संततधार सुरू केली ते अनुष्ठान मध्येच कसे सोडता येईल ? तरी या बालगोपालांकरिता आपण पाऊस पाडण्याकरिता प्रभूला गळ घातली पाहिजे.' असे बुवांनी सांगताच बरे तर चला. असे म्हणून श्रीमौनीस्वामी उठले व खाली श्रीदत्तपादुकांजवळ जाऊन म्हणाले की, 'देवा ! या मुलाबाळांचेकरिता पाऊस पाहिजे, लवकर पाठवा.' अशी प्रार्थना श्रीमौनीस्वामींची होण्याबरोबर थोड्याच वेळात काही चिन्ह नसताही आकाशात ढग जमून उत्तम पाऊस पडला व सर्वत्र आनंदी आनंद झाला.

एकदा गुरुद्वादशीच्या उत्सवाला आलेल्या मंडळींना बुवांनी दिवाळीकरिता ४-५ दिवस ठेवून घेतले. त्या मंडळींत सावंतवाडीचे बागवत नावाचे एक कीर्तनकार होते. त्यांना असे वाटले की, उगीच आपण दिवाळीकरिता येथे राहिलो. घरी असतो तर चांगले पक्वान्न खावयास मिळाले असते. असे विचार मनांत येताच देवांनी बुवांना त्यादिवशी उत्तम पक्वान्नाचा बेत करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यादिवशी जेवणाचा बेत घरच्यापेक्षाही उत्तम झाला. माणगावांतील एक पुराणिक बुवांनाही बुवांनीं जेवण्यास त्यादिवशी बोलावले होते. पण आपणास परान्न घ्यावयाचे नाही अशी काहीतरी सबब सांगून ते भोजनास आले नाहीत. ते उत्तम सुग्रास जेवण झाल्यावर भागवतबुवांनीं सर्वांना आपल्या मनांत सकाळी आलेले विचार सांगितले. सर्वांनाच ते ऐकून आश्चर्य वाटले. सर्वसाक्षी परमात्म्याची व त्याच्या भक्तांची लीला अचिंत्य आहे.

नरसोबाचे वाडीस लक्ष्मण दीक्षित यांचे चिरंजीव नारायण म्हणून होते. प्रथम त्यांचे काही मराठी शिक्षण व मिरज येथे काही इंग्रजी शिक्षणही झाले. नंतर वाडीचे संस्कृत शाळेचे अध्यापक कृष्णशास्त्री वष्ट

यांचेजवळ त्यांनी काव्याचा अभ्यास केला. नंतर ते वष्टांच्या आज्ञेप्रमाणे बुवांचेकडे अभ्यासाकरिता येऊ लागले. बुवांनी त्यांना संध्येपासून सर्व आचारधर्माचे शिक्षण देऊन अनुष्ठान करीत रहा असे सांगितले. बुवांचे आज्ञेप्रमाणे नारायण दीक्षितांचे सर्व वागणे होते. लग्न झाल्यावर स्मार्ताग्नीची उपासना कोरान्न भिक्षा मागून यांनी केली. शेवटी संन्यास-ग्रहण केले. देवांचे आज्ञेने पुढे त्यांना श्रीटेंबेमहाराजांनीच दंड देऊन नृसिंहसरस्वती असे नामाभिधान ठेवले. यांनाच दीक्षितस्वामी असे लोक म्हणत. यांनी आपल्या गुरुमहाराजांचे आज्ञेवरून शेवटपर्यंत वाडीतच राहून गुरुपासना केली. शेवटी शेवटी ४-५ वर्षे ते तीर्थयात्रेकरिता वाडीतून बाहेर पडले. त्यांनी वाडीच्या पलिकडे अमरापूर क्षेत्रांत श्रीदत्त व अमरेश्वर यांचे मंदिर बांधून तेथेच आपल्या गुरूंचे नावाने श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ नावाची संस्था निर्माण केली व ती विश्वस्तांचे ताब्यात दिली. यांचे गुरुप्रेम व शांति, तितिक्षा इत्यादि गुण अवर्णनीय असे होते. श्रीमहाराज यांचेबद्दल लोकांना सांगत असत की, 'मी त्याला संध्येपासून शिकविले आहे. मला त्याचा फार अभिमान आहे.' असे गुरु व त्यांना साजणारे असे शिष्य हे खरोखर धन्य आहेत. यांचे समाधिस्थान अयोध्या नगरी आहे.

एका गृहस्थास संकटायोगिनीचे दशेतून मुक्त होण्याकरितां बुवांनी त्याला राहूचा मंत्र जपण्यास सांगितले. त्याने मंत्रजपास आरंभ करताच त्याचा गळा एकाएकी फार सुजल्याने जप करता येईना. बुवांना ही हकीकत कळविल्यावर बुवा त्या गृहस्थाचे गावी गेले व समक्ष सर्व बंदोबस्त करून त्याला जप करण्यास सांगितले. पुढे त्या ब्राह्मणाचे ते कार्य बुवांचे कृपेने पार पडले. देवांचे मनात सेवा घ्यावयाची नसली म्हणजे असे मध्येच सेवेत विघ्न उत्पन्न होते. पण त्यात बुवांच्यासारखे मध्यस्थ जर असतील तरच देवतेच्या कोपाचे उपशमन होऊन तो भक्त कृतकार्य होतो.

नारोपंत उकिडवे यांना योगाभ्यास करण्याची इच्छा होऊन त्यांनी पुस्तकावरूनच प्राणायामाचा अभ्यास सुरू केला. तो चुकल्यामुळे पोटशूळ प्राणांतिक असा निर्माण झाला. उपचार केले पण त्याचा उपयोग

झाला नाही. शेवटी ते बुवांचेकडे आले असता बुवांनी थोडा वेळ विचार करून उकिडवे यांना प्रश्न केला की, 'तुम्ही प्राणायाम करीत असता काय ?' त्यांनी कबुली जबाब दिला. नंतर बुवांनी पुस्तकावरून प्राणायामाचा अभ्यास न करण्याबद्दल त्यांना बजावले व उपाय करून त्यांचा पोटशूळ बंद केला.

माणगावी नेहमी अनेक सेवेकरी सेवा करण्याकरिता येऊन राहत असत. उत्सवाचे वेळी इतरही यात्रा बऱ्याच मोठ्या प्रमाणात जमत असत. एकदा अशीच एक बाई दर्शनार्थ आली व स्नान करण्याकरिता समोरच्या विहिरीवर गेली. स्नानाचे वेळी तिने आपल्या अंगावरचे सर्व दागिने कपड्याखाली ठेवले होते. हे दुसऱ्या एका बाईच्या दृष्टीस पडले आणि तिने त्या बाईची नजर चुकवून ते सर्व दागिने उचलून आपल्या घरी नेले व ते जमिनीत खळगा खणून त्यात ठेवून दिले. दागिन्याची मालकीण स्नान करून येऊन पहाते तो आपण ठेवलेल्या जागी एकही दागिना नाही. शोध केला पण काहीच पत्ता लागेना. शेवटी रडत रडत ती बुवांचेकडे आली व सर्व हकीकत तिने बुवांचे कानावर घातली. तेव्हा बुवांनी तिला 'तुझे दागिने संध्याकाळपर्यंत मिळतील, रडू नकोस,' असे सांगून तिचे समाधान केले. बुवांनी देवांच्या गणांना चोरीचा शोध लावण्यास सांगितले. त्यावेळी चोरी करणाऱ्या बाईपुढे एक अक्राळविक्राळ स्वरूपाचा मोठा पुरुष येऊन तिला भीती दाखवू लागला. त्याबरोबर ती भिऊन पळत पळत बुवांचे जवळ आली. जवळ येण्याबरोबर बुवांनी तिला ओळखले व चोरीचे दागिने मुकाट्याने घेऊन येण्यास सांगितले. लगेच त्या बाईने घरी पुरून ठेवलेले दागिने बुवांचे समोर आणून ठेवले व झालेल्या अपराधाबद्दल बुवांचे जवळ क्षमा मागितली. त्यावेळी तिला भीती दाखविणारा तो पुरुष निघून गेला व ती बाई निर्भय झाली. नंतर त्या मालकिणीला तिचे दागिने बुवांनीं परत दिले.

वेंगुर्ले येथील एका ब्राह्मणाचा मुलगा पंधरावे वर्षी एकाएकी बोलेनासा झाला व त्याने खाणेही वर्ज्य केले. चार पाच वर्षे उपाय करून त्याचा बाप थकला. शेवटी आपल्या मुलाला घेऊन तो माणगावी

बुवांचेकडे आला व त्यांना मुलाची सर्व हकीकत सांगितली. बुवांनी मुलाकडून देवास प्रदक्षिणा घालण्यास सांगितले. प्रथम तो मुलगा प्रदक्षिणा घालीना. मग जबरदस्तीने त्याच्या हाताला धरून प्रदक्षिणा घातल्या. पुढे तो स्वत:च प्रदक्षिणा घालू लागला. मग काही दिवसांनी बुवांनी त्या मुलाला गुरुचरित्र वाचण्यास सांगितले. पण तो आरंभी वाचीना. मग मनातल्या मनात वाचू लागला. एक सप्ताह झाला, तीर्थ घेऊ लागला. पुढे हळूहळू व थोडे थोडे बोलूही लागला. तिसरा सप्ताह पूर्ण होताच पूर्वीप्रमाणे उत्तम बोलणे, चालणे, जेवणे वगैरे सर्व व्यवहार करू लागला. नंतर देवांची आज्ञा झाल्यावर त्याला मंडळींनीं घरी नेले.

एका गावी एक गृहस्थ नवशिक्षित असा होता. तो भूतपिशाच्च मानीत नसे व हे मानणाऱ्यांची तो थट्टा करीत असे. पण पुढे चमत्कार असा झाला की, त्याला स्वत:लाच पिशाच्चबाधा होऊ लागल्यामुळे तो माणगावी सेवेकरिता येऊन राहिला. तेथे एकदा त्याचा मेहुणा त्याला भेटण्याकरिता म्हणून आला. तो एल्एल्. बी. झालेला होता. त्याने सेवेस राहिलेला आपला मेहुणा सखाराम याची थट्टा करण्यास आरंभ केला. सखारामचे शरीरात पिशाच्चाने संचार केला व त्याला विचारले, 'का रे आमची का थट्टा करतोस ?' त्या मेहुण्याने सांगितले की, 'तू जर माझ्या शरीरात शिरून प्रत्यक्ष मला त्रास देशील तर मग पिशाच्चयोनी खरी आहे असे मी मानीन; नाही तर हे सर्व थोतांड आहे असे समजण्यास हरकत नाही.' त्या पिशाच्चाने सांगितले की, 'ज्याच्याकडे आमचे काही येणे असते अशा संबंधी माणसालाच आम्ही त्रास देतो, इतरांना नाही.' हे ऐकून तर त्या माणसाने देवाची, पिशाच्चाची, बुवांची सर्वांचीच थट्टा आरंभिली. तेव्हा त्या पिशाच्चान त्या नास्तिक माणसाच्या संबंधी अशा पिशाच्चाला सांगून त्याचा चांगलाच समाचार घेणेस सांगितले. त्याबरोबर त्या पिशाच्चाने सखारामाच्या मेहुण्याचे अंगांत शिरून त्याला चांगलाच चोप दिला. तेव्हा सखारामाच्या पिशाच्चाने सावध झाल्यावर त्याला विचारले की, 'का रे ! तू का आता ढोंग करू लागलास ? आता तुझे काय शहाणपण आहे ते दाखव की !' त्या नास्तिक माणसाची चांगली हजेरी

घेऊन, याला त्रासातून मुक्त करू नका असे बुवांना त्या पिशाच्चाने सांगितले व त्याची घडलेली सर्व हकीकत सांगितली. तो सखारामाचा मेहुणा त्या पीडेमुळे मरणोन्मुख झाला. त्याच्या घरच्या सर्व मंडळींनी माणगांवी येऊन बुवांची प्रार्थना केली, तेव्हा बुवा म्हणाले की, 'हा देवाचे दरबारात अपराधी आहे; करिता याने येथे काही दिवस राहून सेवा केली पाहिजे म्हणजे बरे वाटेल.' शेवटी त्याला नाइलाजाने माणगावी यावेच लागले; नंतर बुवांचे सांगण्याप्रमाणे त्याने श्रद्धेने सेवा केली. त्यामुळे तो पूर्ण दोषमुक्त होऊन घरी गेला.

नरसोबाचे वाडीहून परत कोल्हापुरास कुलदेवी महालक्ष्मीचे दर्शन करून येण्याचा बुवांचा नियम होता. एकदा ते कोल्हापुरी ठकारभटजींचे घरी उतरले होते. बुवांची विद्वत्ता ठकार जाणून होते म्हणून त्यांचा परिचय करून देणेकरिता त्यांनी गावातील एका शास्त्रीबुवांना आपल्या घरी बोलावले. ते शास्त्रीबुवा घरी आले तेव्हा बुवा आत अनुष्ठान करीत बसले होते. एक मळकट पंचा नेसलेली त्यांची मूर्ति पाहून त्यांनी ठकारांना विचारले की, 'हे असले रत्न तुम्ही कोठून आणले ? याकरिता का आम्हाला तुम्ही बोलावले ?' तेव्हा ठकारांनी त्यांना गप्प बसण्याबद्दल हातांनी खूण केली. काही वेळाने बुवा अनुष्ठान संपवून बाहेर आले. दोघांचे काही शास्त्रीय विषयांवर बोलणे सुरू झाले त्यावेळी मात्र त्या शास्त्रीबुवांना बुवांची सर्व शास्त्रांत प्रगति असलेली पाहून अत्यंत आश्चर्य वाटले व त्यांनी सकाळच्या आपल्या बोलण्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

नरसोबाचे वाडीस जाताना आजऱ्यास जाऊन तेथे आजरेकरबुवांना भेटून बुवा पुढे जात. आजरेकरबुवांचा बुवांचेवर फार लोभ होता. आजरेकरबुवा कनोजी ब्राह्मण होते. आपल्या हातचे बुवांना चालत नाहीं म्हणून त्यांनी कोणाकडून तरी सांडगे, पापड, कुरडया इत्यादि पदार्थ बुवांना चालण्यासारखे करून ठेवावेत. बुवा तेथे प्रसंगाने एकदोन दिवस प्रेमामुळे राहातही असत. वाडीस एकदा जात असता संध्याकाळी मुरगूडगावी मुक्काम करावा लागला. बुवा नदीवर निघाले तेव्हा तिकडून

पुष्कळ ब्राह्मण संध्या करून बोलत बोलत येत होते. तो समुदाय जवळ आल्याबरोबर बुवांनी तेथल्या तेथे रस्त्यातच सर्वांना साष्टांग नमस्कार घातला. मंडळींनाही त्यामुळे संकोच वाटून त्यांनी असे का म्हणून विचारताच 'विप्रौघदर्शनात् क्षिप्रे क्षीयंते पापराशयः' इत्यादि श्लोक म्हणून दाखविला. दुसरे दिवशी सकाळी एका घरी बुवा भिक्षेकरिता गेले असता तेथील बाईने सूप भरून तांदूळ भिक्षा घालण्याकरिता आणले. ते पाहून बुवा म्हणाले की, 'तुम्ही सर्व भिक्षेकऱ्यांना इतके तांदूळ घालीत असता काय ? फक्त एक मूठभर तांदूळ घाला' असे सांगून एक मूठच तांदूळ घेऊन बाकीचे परत नेणेस सांगितले.

माणगांवात पाडगांवकर म्हणून एक गृहस्थ होते. त्यांच्या घरातील दोन तीन माणसे एकदम गेली म्हणून त्यांनीं बुवांना विचारले. 'तेव्हा तुम्ही अगोदर हे रहाते घर पाडून नवे बांधा मग काय करावयाचे ते आपण करू' अस बुवा म्हणाले. बुवांचे सांगण्याप्रमाणे त्यांनी जुने घर पाडून नवीन घर बांधले व बुवांना कळविले. वास्तुशांति बुवांचे आज्ञेप्रमाणे केली व बुवा येण्याची वाट पाहात ते घरमालक बसले. रात्र झाली तरी बुवा आले नाहीत. तेव्हां त्यांचा शोध घेण्यास एक माणूस पाडगांवकरांनी पाठविला. वाटेतच डोंगराच्या पायथ्याशी बुवांची व त्या माणसाची भेट झाली. मला आपल्या सोबतीकरिता पाठविले आहे असे त्याचे बोलणे ऐकून बुवांनी त्या माणसाला एक बाजूला बोट करून सांगितले की, 'तो पाहा आमच्या सोबतीकरिता आला आहे. आम्हाला दुसरी सोबत काय करावयाची ?' त्या माणसाने तिकडे पाहिले तर एक मोठा नाग तेथे असल्याचे त्याला दिसले. नंतर बुवांनीं त्या नागाला तेथेच राहण्यास सांगून आपण त्या माणसाबरोबर पाडगांवकरांचे घरी गेले व तेथे संरक्षणविधि काय करावयाचा तो विचार करून परत निघाले. तो मनुष्यही बरोबर आला. पूर्वीच्या जागी येताच तो नाग यांची वाट पाहात होताच. मग त्या माणसाला परत जाण्यास सांगून आपण त्या नागाबरोबर बुवा देवळात आले. बुवांचा योगाभ्यास चालू होता. त्यावेळी काही कारणाने मलद्वार घट्ट होऊन शौचास सकाळी वेळेवर होईना. नंतर पुनः शौचास जावे लागे.

त्यामुळे अनुष्ठानात व्यत्यय येई. एकदा मुंबईहून एक शास्त्रीबुवा आले होते. त्यांचेजवळ हा विषय निघाला असता त्यांनी अभ्यासानंतर तूप खावे म्हणजे शौचास साफ होईल असे सांगितले. त्याप्रमाणे बुवांनीं एक दिवस तूप खाल्ले. देवांना हे बुवांचे करणे पसंत न पडल्याने अतिसाराचा उपद्रव सुरू झाला. दिवसांतून अनेकवेळी शौचास जावे लागून तितक्या वेळा स्नान करावे लागे. असा त्रास एक वर्षभर सारखा चालू होता. अशक्तपणा फार आल्याने चालण्याची शक्ति राहिली नाही. त्याचवेळी नरसोबाचे वाडीस चैत्रांत श्रीनारायणस्वामींचे उत्सवास जाण्याबद्दल देवांचे सांगणे झाले. काय होईल ते होवो असा विचार करून वाडीस जाण्याकरिता बुवा बाहेर पडले. थोडा मार्ग चालून पुढे गेल्यावर एक मनुष्य भेटला व त्याने काही औषध देऊन ते घेतल्यावर अतिसार बंद होईल असे सांगितले. औषध घ्यावे की नाही या विचारात बुवा असता 'औषध घ्यावे' असे देवांचे सांगणे झाले. बुवा म्हणाले, 'प्रारब्धकर्माचे फल भोगलेच पाहिजे. आपल्याला औषध नको. वाडीस जाऊन येईपर्यंत विकार बंद राहिला म्हणजे झाले.' पण 'औषध घेतलेच पाहिजे' असे पुन: सांगणे होताच ते औषध घेतले, त्यामुळे अतिसार थांबला. वाडीचा उत्सव संपल्यावर बुवा परत माणगावी आल्याबरोबर अतिसार पुन: सुरू झाला. तो बरेच दिवस पुन: चालू राहिला. 'तूप खाऊन बरे वाटले की नाही' असे देवांनी एकदा रागाने विचारले. तेव्हा देवांच्या आज्ञेशिवाय आपण तूप खाल्ले त्याचे हे प्रायश्चित्त असे बुवांचे लक्षांत आले. नंतर दही खाण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणे दही खाल्ल्याने अतिसाराचा विकार कमी झाला. पण मध्ये केव्हातरी विशेष त्रास झाला म्हणजे पुन: तो उद्‌भवत असे. तो विकार शेवटपर्यंत कायम राहिला. बुवांचे महत्त्व सहन न झाल्याने तेथीलच एका ब्राह्मणाने काही अभिचारिक मंत्रप्रयोग करून तो बुवांचे पाठीमागे कायमचा लावला. त्यामुळे योगाभ्यास बंद पडला व देवांचे सांगणे झाले 'आता योगाभ्यास होणे शक्य नाही, तरी आता गृहस्थाश्रमास आरंभ करावा.'

गृहस्थाश्रमास सुरुवात करण्याबद्दल देवांची झालेली आज्ञा

मातोश्रींना कळविली, तेव्हा तिच्याही मनाला समाधान वाटले. देवांचे धर्मशाळेतच बुवांचा गृहस्थाश्रम सुरू झाला. धर्मशाळेतच स्मार्ताग्नीची उपासना चालू झाली. बुवांचे जेवण देवळातच होत असे. अन्नपूर्णाबाई मात्र जेवणास घरी जात होत्या व रात्री घरातील सर्व काम आटोपून देवळात येत होत्या. काही दिवसांनी देवळात बुवांनी एकट्यानीच संहिता स्वाहाकार कोणाचीही मदत न घेता केला. एकदा अन्नपूर्णाबाई रोजच्याप्रमाणे रात्री देवळांतील धर्मशाळेत आल्या. बुवा तेथे नसल्यामुळे त्या देवळाकडे गेल्या. तेथे दार लावले होते. त्याला थोडा धक्का दिल्याबरोबर आतून बुवांनी कोण आहे असे विचारले. बाईनी मी आहे असे सांगून त्या बाहेरच उभ्या राहिल्या. मागे एकदा एक स्त्री पुराणाचे वेळी देवळातच अस्पर्श झाल्याने देवळाचे शुद्धीकरण करावे लागले होते. त्या वेळेपासून मातोश्रींवाचून इतर कोणाही बायकांना देवळात जाण्याची बंदी होती. अन्नपूर्णाबाई बाहेर येऊन उभ्या राहिल्या तरी बुवा आत काही वाचनात गुंग झाल्याने त्यांना त्यांचे स्मरण राहिले नाही. बऱ्याचवेळाने बुवा देवळातून बाहेर आले तो अन्नपूर्णाबाई बसल्या असून त्यांना समाधी लागली आहे असे बुवांना दिसले. त्यांना बुवांनी हालवून सावध करण्याचा प्रयत्न केला, तथापि त्या देहभानावर आल्या नाहीत. शेवटी अन्य शास्त्रीय उपायांनी त्यांना बुवांनी सावध केले. तेव्हा त्या म्हणाल्या, 'पूर्ण आनंदांत मी निमग्न होते; आपण मला उगीच सावध केलेत. योगाभ्यासाचा काहीच संबंध नसताही श्रीदत्तप्रभूंनी सहज लीलेने अन्नपूर्णाबाईंना समाधिसुखाचा अनुभव मिळवून दिला. भक्तावर अशी खरी कृपा प्रभूची असते.

अन्नपूर्णाबाईंना गर्भधारणा झाली, त्यावेळी रमाबाईंनी त्यांना बराच त्रास दिला. बाळंतपण ज्याचे त्यानी करावे असेही त्या बोलल्या. बुवांनाही ते सर्व पाहून खेद वाटला. देवांनींच पुढील सर्व व्यवस्था करून ठेवलीच होती. बुवांना माणगांवात राहण्याचा मोह उत्पन्न होऊ नये म्हणून आईच्या द्वारानेच देवांनीच तसे सांगितले असेल. सावंतवाडीस नारोपंतांना स्वप्न पडले की, बुवांनी माणगांव सोडून अन्यत्र जाण्याची

तयारी चालविली आहे. दुसरे दिवशीं येऊन त्यांनी बुवांना अन्यत्र जावयाचे आहे काय असे विचारता बुवांनीं नाही म्हणून सांगितले. नंतर आपणास आदले रात्री झालेले स्वप्न सांगून उकिडवे सावंतवाडीस परत गेले. दुसरे दिवशी सकाळी पूजा झाल्यावर 'आज माणगांव सोडून निघून जावयाचे आहे.' असे देवांचें सांगणे बुवांना झाले. अद्यापि सात वर्षे पूर्ण झाली नाहीत असे बुवांनीं सांगितले असतां चांद्रमानाप्रमाणे काल पूर्ण झाला असल्याचे देव म्हणाले. नंतर निघण्याची तयारी केली. 'देव व कुटुंब बरोबर घ्यावेत असे देवांचे पुन्हा सांगणे झाले. बुवांनी घरी जावून मातोश्रींना वंदन केले व देवांची आज्ञा झाल्याने येथून आपण आता निघणार असल्याचे सांगितले. त्यावेळीही मातोश्री काही वेडेवाकडे बोलल्या. नंतर कुटुंबाला येणार असल्यास चल असे म्हणताच अन्नपूर्णाबाईही निघाल्या. 'अंगावर काय असेल ते काढून ठेवावे, एका मंगळसूत्रावाचून दुसरे काही नको' असे बुवांनी सांगताच अन्नपूर्णाबाईनी नाकांतील एक लहान नथ व कानांतीलही एक लहान बुगडीजोड काढून ठेवला. बुवांनी दोन मूर्ति, पंचायतनाचा संपुष्ट व एक तांब्या इतके बरोबर घेतले. कुटुंबाजवळ एक धोतर व एक लुगडे इतकेच सामान होते. सर्व मंडळी पोचविणेस निघाली. त्यांना आपले येथे काही नाही असे बुवांनी सांगितले. 'निर्मानमोहा जितसंगदोषाः' इत्यादि भगवद्वचनाप्रमाणे झालेले हे चरित्र आहे. अकरा वाजण्याचे सुमारास सावंतवाडीस उकिडवे यांचे दत्तमंदिरांत दोघेही पतिपत्नी येऊन पोचली. अन्नपूर्णाबाई नारोपंतांच्या घरी जेवण्यास गेल्या. इकडे बुवांनी नियमाप्रमाणे भिक्षा आणली व स्वयंपाक करून भोजन केले. सबनीस, आणावकर वगैरे मंडळी भेटण्यास आली होती. नारोपंतांनी देव ठेवण्याकरिता एक व्यवस्थित करंडा काखेला लावता येईल असा बुवांना करून दिला. तसेच त्यांच्या आईने अन्नपूर्णाबाईंना एक मुकटा व एक तांब्या आग्रहाने दिला. नंतर सायंकाळचे वेळी बुवा पत्नीसह वाडीस जाण्याकरिता निघाले. त्यावेळी गेल्यावर मात्र पुनः या भागात त्यांचे येणे कधीच झाले नाही. शके १८११ पौष मासात बुवांनी माणगाव सोडले. रस्त्याने जाताना मध्ये काही

बैलगाड्या लागल्या. त्या बाजूने चालेनात. तेव्हा देवांच्या गणांनी त्यापैकी एक गाडी उचलून दूर फेकून दिली. ती गाडी मोडली. त्या गाडीवानाला लागले. ते पाहून बुवांना वाईट वाटले आणि वाडीस गेल्याबरोबर देवांचे गण देवांचे ताब्यात देण्याचे त्यांनी ठरविले. नंतर दोघेही नरसोबाचेवाडीस पोचले. श्रीदत्तदर्शनानंतर नारायणस्वामींचे धर्मशाळेत कुटुंबाला ठेवून बुवा श्रीमौनीस्वामी व श्रीगोविंदस्वामी यांचे दर्शनार्थ गेले व दोघांनाही साष्टांग वंदन करून इकडे येण्याबद्दल देवांची आज्ञा झाल्याचे त्यांना कळविले. कोरान्न भिक्षा रोज मागून आणावी. तांब्यात तांदूळ व वस्त्रात जोधळे घ्यावेत. एक वर्षभर वाडीस राहाण्याबद्दल बुवांना देवांनी सांगितले होते. श्रीगोविंदस्वामीने आपल्या जवळच्या शाळिग्राम व उपनिषदांच्या पोथ्या बुवांना देण्याचा आपला मानस कळविला. पण सध्याची अडचण दूर झाल्यावर घेण्याचो बुवांनी सांगितले पुढे लवकरच अन्नपूर्णाबाई गोखल्यांच्या ओरीत प्रसूत झाल्या व त्यांना मुलगा झाला. बुवांना ही वार्ता समजताच जातकर्म करण्या-करिता ते आले. पण पुत्र मृत झाल्याचे समजताच ते सर्व राहिले. बाळंतपण दुर्गा मावशीनेच केले. पण काहीतरी वाकडे बोलण्याची तिला सवय होती. 'माणगावला आईला त्रास दिला, आता मला येथे त्रास देण्यास आला आहे. यांचे कष्ट कोणी करावे ?' अशा तऱ्हेने दुर्गामावशी बोलत असत. पुढे काही दिवसांनी बुवा सहकुटुंब ब्रह्मानंदाचे माडीवर राहू लागले. त्याठिकाणी अतिथिसत्कारपूर्वक उत्तम गृहस्थाश्रम केला.

असे काही दिवस गेल्यावर श्रीगोविंदस्वामींचा समाधिकाळ जवळ आला. त्यांनी बुवांना बोलावून दशोपनिषदे सांगितली व त्या पोथ्या आणि शाळीग्राम त्यांना दिला. नंतर गोविंदस्वामी आजारी पडले. एकदा गोविंदस्वामींनीं आपणास मनन ऐकवावे अशी इच्छा दर्शविली. त्यांचेच पुस्तक घेऊन बुवा मनन वाचू लागले. त्यावेळी त्यातील रहस्यार्थ गोविंदस्वामींनी बुवांना समजावून दिला व पूर्ण आशीर्वाद दिला. बुवांनीही अशा ब्रह्मनिष्ठ गुरूंना साष्टांग नमस्कार घालून आपली गुरुनिष्ठा व्यक्त केली. गोविंदस्वामींच्या समाधीच्या पूर्व दिवशी बुवांना दृष्टांत

झाला की, 'उद्या स्वामी देह सोडणार.' तेव्हापासून बुवा त्यांचेजवळ बसून राहिले. दुसरे दिवशी गोविंदस्वामींचे निर्वाण झाले. त्यावेळी मौनीस्वामीसारख्या जीवन्मुक्त पुरुषांनाही वाईट वाटले. नंतर यथाशास्त्र सर्व कर्म करून कृष्णाबाईच्या डोहात गोविंदस्वामींचा देह विसर्जन केला. शेवटी मौनीस्वामींच्या आज्ञेप्रमाणे बुवांच्या हस्तेच त्यांचा समाराधनाविधी झाला.

वाडीस असताना बुवांची इच्छा संन्यास घेण्याची होती. पण अद्यापि एक वर्ष अवकाश असल्याबद्दल देवांचे सांगणे झाले. गोविंद-स्वामींनीही तसेच सांगितले होते. वाडीस एके दिवशी मौनीस्वामी बुवांचेकडे येऊन सकाळचे वेळी म्हणाले 'बुवा ! आज कोणी स्वामी भिक्षेस तुमचेकडे येणार आहेत की नाहीत ?' बुवा म्हणाले, 'आज कोणास सांगितले नाही.' तेव्हा मौनीस्वामी म्हणाले, 'आज सर्वच स्वामी तुमचेकडे भिक्षेस येणार आहेत. स्वयंपाक लवकर करा.' लगेच बुवांनी भिक्षा मागून आणली. स्वयंपाक तयार झाला. इतक्यात पुजारी मंडळींना अशौच झाल्यामुळे सर्वच स्वामी बुवांचेकडेच त्यादिवशी भिक्षेस आले. त्यावेळी मौनीस्वामींच्या बोलण्याचा अर्थ बुवांचे लक्षात आला.

काही दिवसांनी वाडी सोडून उत्तर दिशेस जाण्याची बुवांना आज्ञा झाली. ही गोष्ट पुजारी मंडळींना समजताच त्यांनी बुवांना न जाण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिले. पण देवांच्या आज्ञेबाहेर आपणास जाता येत नाही असे बुवांनी सांगितले. शेवटी सर्व मंडळींनी मौनीस्वामींचेकडे जाऊन, बुवांना आपण जाऊ देऊ नका अशी विनंती केली. त्यांनी मंडळींचे समाधानार्थ 'बरे तर जाऊ देत नाही' असे सर्वांना सांगितले. निघण्याची तयारी झाल्यावर मौनीस्वामींचे दर्शनास बुवा गेले तेव्हा मौनीस्वामींनीं विचारले, 'बुवा ! कोठे जाणार ?' बुवा म्हणाले, 'कोल्हापुरास जाणार.' तेव्हा स्वामींनीं सांगितले 'बरे, तर कोल्हापुरी दोन दिवसांपेक्षा जास्ती राहू नका.' हे ऐकून बुवांना स्वामींच्या मुखाने ही देवाची आज्ञा झाली असे वाटले. कारण त्यांनी पुन: परत वाडीस या असे काही सांगितले नव्हते. नंतर देवांची प्रार्थना करून, वंदन करून बुवा वाडीहून निघाले व हळूहळू

कोल्हापुरास पंचगंगेच्या घाटावर येऊन पोचले. अन्नपूर्णाबाई बरोबर होत्याच. त्यांना तेथील प्रसिद्ध सत्पुरुष कुंभारस्वामी यांच्या दर्शनाची इच्छा झाली. इतक्यात कुंभारस्वामीच पळत पळत तेथे आले. त्यांनी अन्नपूर्णाबाईंच्या हातातील तांब्या घेऊन पंचगंगेवर जाऊन पाणी प्राशन केले व परत तो तांब्या त्यांना देऊन पळत पळत आले तसे निघून गेले. नंतर महालक्ष्मीचे दर्शन घेऊन बुवांनी तेथे दोन दिवस मुक्काम केला. तेथून पुढे भिलवडीस भुवनेश्वरीचे दर्शन घेऊन नंतर औदुंबरी श्रीदत्तपादुकांचे दर्शनार्थ गेले व तेथून पंढरपुरी येऊन पोचले.

पांडुरंगाचे दर्शन घेऊन बाहेर पडल्यावर एक ब्राह्मण बुवांना प्रसाद म्हणून डाळे देऊ लागला. पण बुवांनी ते घेण्याचे नाकारले. शेवटी 'तो प्रसाद आहे. बांधून ठेवावा' असे कुटुंबांचे म्हणणे ऐकून त्याप्रमाणे ते डाळे घेऊन एका फडक्यांत बांधून ठेवले. रात्री पांडुरंगांनी विचारले की, 'तुम्ही प्रसाद का घेतला नाही ?' बुवा म्हणाले, 'आपण बाजाराचे भाजलेले डाळे खात नाही.' बरे खाऊ नका. असे सांगून ते ब्राह्मण स्वरूपी पांडुरंग अदृश्य झाले. बुवा जागे होऊन पाहतात तो आपण सकाळी डाळे बांधून ठेवलेली गाठोडी गेली.

पंढरपुराहून पत्नीसह बुवा बार्शीस येऊन त्यांनी अंबरीषवरदाचे दर्शन घेतले. तेथे माणगांवचेच राहणारे दत्तुशास्त्री साधले यांचेकडे बुवांचा तीन दिवस मुक्काम होता. दत्तूशास्त्रींनी बुवांना सहा रुपये दिले, पण ते बुवांनी घेतले नाहीत. शेवट बुवा बाहेर गेल्याचे पाहून ते रुपये दत्तूशास्त्रींनी मुकाट्याने देवांचे करंड्यात टाकले. बुवांनी बाहेरून येताच सांगितले की, आमच्या देवाला आता द्रव्यसंग्रह करावा असे वाटू लागले आहे. हे ऐकल्याबरोबर दत्तूशास्त्रींना फारच आश्चर्य वाटले. बार्शीवरून निघून हळूहळू बुवांनी गोदातीरी गंगाखेड येथे येऊन मुक्काम केला. तेथे काही दिवस राहणे झाले. पुढे एके दिवशी बुवांना असा दृष्टांत झाला की, 'आजपासून चौथे दिवशी तुम्हाला दोघांनाही नेण्याकरिता आम्ही येऊ ' हे ऐकून बुवा म्हणाले, 'आपणास संन्यास घ्यावयाचा असल्याने आपण येणार नाही. तिला वाटल्यास न्या. आपली हरकत नाही.' नंतर

अन्नपूर्णाबाईंना थोडा ताप आला व महामारीचा उपद्रव सुरू झाला. त्यावेळी त्यांची वस्त्रे धुणे, त्यांना नेसविणे, वगैरे सर्व कामे बुवांनींच केली. त्याच आजारात शके १८१३ वैशाख वद्य १४ शुक्रवारी दुपारी त्या अत्यंत पुण्यवान् साध्वीचा आत्मा अनंतात विलीन झाला. त्यावेळी बुवा सर्व बंधनातून मुक्त झाले. त्यावेळचे त्यांचे पत्र असे आहे - 'गंगाखेड. श्रींचे आज्ञेने उत्तरखंडी जाणे होत असतां गोदावरीतीरी वैशाख वद्य १४ शुक्रवारी दुपारी सौभाग्यवतीला देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरपंथी जाणे होईल. चि. दत्तू व भालू यांस वरील मजकूर प्रविष्ट व्हावा. इहपर द्वयाने सत्कालक्षेप करावा. मातोश्री आईस मानसिक वंदन असावे. यावर आता भेट होणे प्रारब्धाधीन आहे. परंतु सदैव चरणकमल हृदयी ठेवले आहे. तेथील सर्व दृष्ट स्पृष्ट कृतोपकार मंडळींचे स्मरण आहे. हा मजकूर ती. बाबाजीपंत गोडे यास प्रविष्ट व्हावा.'

पत्नीचा विधी झाल्यावर सहावे दिवशी अशौचातच रात्री एक रक्तवस्त्र नेसलेली विधवा बाई बुवांचे स्वप्नात आली व तिने बुवा शिवू नको म्हणत असता त्यांच्या गुडघ्यांचेवर घट्ट धरून मी तुम्हाला घेऊन जाणार असे बुवांना म्हणाली. बुवा जागे झाले व आता आपलीही दशा बायकोप्रमाणेच होणार असे पाहून त्यांना वाईट वाटले. त्यांनी त्यावेळी देवांची निंदा करण्यास प्रारंभ केला. 'आजपर्यंत तीन वेळा संन्यासाची इच्छा व्यक्त केली असता ती पुरी होऊ दिली नाही आणि आता अशौच असताना मृत्यू यावा हे देवाला शोभते काय ? देवांची यत्किंचितही आज्ञा आजपर्यंत मोडली नाही आणि देवाने मात्र अशा ऐनवेळी उपेक्षा करून आपला घात करणे चांगले आहे काय ? देव लबाड आहे असे मौनीस्वामी म्हणतात ते खरे आहे. काही झाले तरी संन्यास घेतल्यावाचून आपण देह सोडणार नाही' असे बुवांनी देवास सांगितले. बाळाचा प्रेमळ हट्ट माता का पुरविणार नाही ? बुवांचा त्यावेळी अपमृत्यू टळला. पण त्या बाईने जेथे स्पर्श केला होता त्या जागेवर मात्र गजकर्णाप्रमाणे एक चट्टा पडला.

गंगाखेड मुक्कामी बुवांच्या पत्नीचे देहावसान झाल्याचे वृत्त मागे दिलेच आहे. त्यानंतर तेरा दिवसपर्यंत पत्नीचे सर्व और्ध्वदेहिक यथाविधि

केले आणि लगेच चौदाव्या दिवशी ज्येष्ठ शु. १२ (११ निर्जला) असते. संन्यासाश्रम घेतला. रात्री श्रीदत्तप्रभूंनी श्रीगोविंदस्वामींच्या रूपाने स्वप्नात येऊन प्रणवाचा उपदेश करून त्याचा जप करण्यास सांगितले व यापुढे माधुकरीचेच अन्न घ्यावे, मठभिक्षा नको असे सांगितले. 'अनाश्रमी न तिष्ठेत' या वचनाप्रमाणे गृहस्थाश्रम संपल्याबरोबर संन्यास झाला हे विशेष आहे. दुसरे दिवशी गोदावरीच्या तीरावर जाऊन, सर्व ब्राह्मण मंडळींना बोलावून प्रायश्चित्ताचा विधी केला. स्नान झाल्यावर, एखादे स्वामी जर यावेळीं प्रेषोच्चार करविण्या-करिता असते तर बरे झाले असते असे सर्वांना वाटले. सर्वांच्या समक्ष एकदा प्रेषोच्चार होणे बरे असे बुवांनाही वाटले. इतक्यांत नदीपलिकडून अकस्मात् एक संन्यासी आले. त्यांनी बुवांचेकडून प्रेषोच्चार करवून घेवून संन्यास दिला. आता पूर्वीचे बुवा हे नाव गेले. यापुढे महाराज याच नावाने उल्लेख करणे बरे. श्रीमहाराज सर्व विधी आटोपून गावांत आले. इतक्यात स्मरण झाल्यामुळे स्वामींना भिक्षेस बोलविण्याकरिता मंडळी गेली असता तेथे कोणीच नसल्याचे पाहून मंडळी विस्मयचकित झाली. श्रीमहाराजांना मात्र वाईट वाटले. त्यादिवशी ब्राह्मण मंडळीच्या आग्रहामुळे माधुकरी न आणता तेथेच भिक्षा केली. त्यामुळे अतिसाराचा उपद्रव सुरू झाला. मंडळींनी देवांची प्रार्थना केल्यानंतर तो थांबला.

उज्जयिनी येथे नारायणानंदसरस्वती नावाचे स्वामी आहेत. त्यांचेकडे जाऊन दंड घ्यावा अशी श्रीमहाराजांना देवांची आज्ञा झाली. नारायणानंदसरस्वती हे कारंजा गावी होऊन गेलेले दत्तावतार श्रीनृसिंह-सरस्वती यांचे वंशांतील शुक्लयजुर्वेदीय माध्यदिन शाखेचे होते. हे समर्थ संप्रदायांतील होत. शेवटी त्यांची समाधि चाफळ येथे श्रीरामप्रभूपुढे झाली. आपल्या गुरूंचा संप्रदाय लक्षात घेऊन श्रीमहाराजही दासनवमीचा उत्सव करीत असत. गंगाखेडहून प्रवास करीत करीत श्रीमहाराज वाशीमच्या जवळ सरहद्दीवर आले. तेथे पोलीस ठाण्यांत श्रीमहाराजांना पोलिसांनी बसवून ठेवले. पुढे सोडीनात. संध्याकाळपर्यंत तेथे बसावे लागले. सायंकाळी वरिष्ठ अधिकारी तेथे सहज आला. त्याने चौकशी

केली. तेव्हा श्रीमहाराजांना निष्कारण त्रास दिल्याबद्दल त्याने पोलीस लोकांची बरीच कानउघाडणी केली. नंतर त्या अधिकाऱ्याचा राग शांत करून श्रीमहाराज पुढे वाशीमला आले. तेथून चंद्रग्रहणानिमित्त महाराज उमरखेड येथे गेले. तेथील प्रसिद्ध सत्पुरुष गोचरस्वामी यांचे मठात मुक्काम होता. त्यावेळी गोचरस्वामी नुकतेच समाधिस्थ झाले होते. त्यांना आजारी असताना देवयोगाने संन्यास झाला. नंतर ते बरे झाले. पण त्यांनी पूर्वी सहस्त्र ब्राह्मण भोजनाचा संकल्प केला होता. तो पूर्ण होण्याकरिता त्यांनी पुढे काही काळ असा नियम केला की, भिक्षेला बोलावण्याकरिता कोणी आल्यास त्याला सांगावयाचे की, 'बाबा ! माझ्याबरोबर तू अकरा ब्राह्मणांना भोजनास सांगशील तर आम्ही तुझे घरी भिक्षेस येऊ.'असा त्यांनी नियम केल्यामुळे लवकर त्यांचा सहस्त्रभोजनाचा संकल्प पूर्ण झाला. गोमयाने प्रथम जमीन सारवून त्यावर भिक्षा वाढायची व ती गायीप्रमाणे मुखाने खायची यामुळे याना गोचरस्वामी असे लोक म्हणत. लोक दागिने देण्याचा नवस करीत व काम झाल्यावर दागिने, कांकणे वगैरे अंगावर आणून घालीत. यांचे गुरुबंधू तुकाराम महाराज येळेगावकर हेही प्रसिद्ध सत्पुरुष होते.

श्रीमहाराज उमरखेडहून माहूर येथे गेले. तेथे श्रीरेणुकामाता, श्रीदत्त यांचे दर्शन घेऊन परतले. पुढे खांडवा, बढवाईवरून ओंकारेश्वरी येऊन धर्मशाळेत मुक्काम केला. तेथे नवज्वराचा त्रास सुरू झाला. तरी नित्य स्नान संध्या वगैरे कर्मे चालूच होती. धर्मशाळेत निवाऱ्याची जागा नसल्यामुळे चार पांच दिवसानंतर एका ब्राह्मणाच्या आग्रहावरून त्याचे घरीं गेले. पुढे ४, ५ दिवसांनी घाम येऊन ताप निघाला. अशक्तता मात्र फारच आली. एके दिवशी 'चुकलो चुकलो यापुढे राहणार नाही' असे मोठ्याने श्रीमहाराज बडबडू लागले. लोकांना काही कळेना. नंतर त्याचा खुलासा झाला. ब्राह्मणाचे घरी अतिथीने तीन दिवसांपेक्षा अधिक राहू नये असा शास्त्रनियम असल्यामुळे देवांनी तेथून निघून दुसरीकडे जाणेकरिता श्रीमहाराजांना शिक्षा केली. मग तेथून महाराज लगेच निघाले व हळूहळू मंडलेश्वरी येऊन पोचले. तेथे कैवल्याश्रम म्हणून अधिकारी स्वामी होते.

त्यांनी महाराजांना मी दंड देतो, असे सांगितल्यामुळे महाराज तेथे राहिले, रात्री 'माझी आज्ञा मोडतोस काय?'असे देवांचे सांगणे ऐकून ते कैवल्याश्रमांना सांगितले व त्यांची अनुज्ञा घेऊन उज्जनीस जाण्यास निघाले.

मंडलेश्वराहून निघून त्यांनी बलवाडा येथे मुक्काम केला. तेथे माधुकरी मागून आणली व ठाणेदाराच्या आग्रहावरून त्याचे घरी भिक्षा सोडण्यास महाराज गेले. ठाणेदार मोठा भाविक मनुष्य होता. त्यावेळी एक यात्रेकरू ब्राह्मणही जेवणास आला होता. त्या ब्राह्मणाने पात्रावर बसून आपोशन हातात घेऊन त्या ठाणेदारास सांगितले की, 'मला तुम्ही दोनशे ब्राह्मणांना पुरेल इतका शिरापुरीचा शिधा देण्याचे कबूल करा, तरच मी जेवण करीन, नाहीतर मी उठून जाईन.' ती त्या ब्राह्मणाची वाणी ऐकून आता हा ऐन दुपारचे वेळी भरलेले पात्र टाकून जाणार म्हणून ठाणेदार व त्याची पत्नी दोघेही घाबरली. त्याने दहा ब्राह्मणांचा शिधा देतो असे कबूल केले. तरीही तो ब्राह्मण आपला हेका सोडीना. शेवटी ठाणेदाराने या धर्मसंकटांतून आपणास सोडविण्याबद्दल श्रीमहाराजांची प्रार्थना केली. तेव्हा महाराजांनी त्या ब्राह्मणाला स्पष्ट सांगितले की, 'तुम्ही अगोदर काही न सांगता ऐनवेळी असा त्रागा करता तर तुम्हांला आता एकाही पानाचा शिधा मिळणार नाही. तुमच्यासारख्या हेकेखोर, लोभी ब्राह्मणांना दान देण्याची शास्त्राची आज्ञा नाही. तुम्ही पानावरून उठून गेला तरी यजमानास काही दोष लागणार नाही. जेवावयाचे असेल तर मुकाट्याने जेवून चला' असे खरमरीत उत्तर मिळाल्यावर मग मात्र तो ब्राह्मण काही गडबड न करता मुकाट्याने जेवून निघून गेला. महाराजांनी आपणास या संकटांतून वाचविल्याबद्दल ठाणेदारासही आनंद झाला.

प्रवास करीत करीत अखेर महाराज उज्जनीस येऊन पोचले. श्रीदत्तमंदिरात जाऊन नारायणस्वामींना वंदन करून आपले येण्याचे कारण महाराजांनी सांगितले 'आपले गुरु अनिरुद्धानंदसरस्वती येथेच आहेत त्यांची आज्ञा झाल्यावर दंड देतो' असे नारायणस्वामी म्हणाले. महाराजांनी त्यांचेकडे जाऊन श्रीदत्तमहाराजांची दंडग्रहणाबद्दलची आज्ञा कळविली. तेव्हा त्यांनी नारायणस्वामींचेकडून महाराजांना विधीप्रमाणे

दंड देवबिला आणि 'वासुदेवानंदसरस्वती' हे नाव ठेवले. हेच नाव संन्यासग्रहणसमयी महाराजांना देवांनी सांगितले होते. त्यावेळी सर्व संन्याशांना मठभिक्षा दिली आणि आपण माधुकरी मागण्याकरिता आज्ञा घेण्यास गुरुस्वामींचेकडे गेले. त्यावर त्यांनी सांगितले की, 'आजच तुम्ही दंडग्रहण केले आहे, करिता आमच्याबरोबर येथेच आज भिक्षा करा.' 'देवांच्या आज्ञेविरुद्ध आपणास तसे करता येत नाही.' असे महाराजांनी सांगितले. पण गुरुस्वामी ऐकेनात. 'तुम्ही येथे भिक्षा केली नाही तर आम्हीसुद्धा करणार नाही' असे सांगितले. त्यामुळे नाइलाजाने त्यादिवशी महाराजांनी तेथे सर्वांबरोबर भिक्षा केली. पण लगेच महाराजांना सारख्या उलट्या होऊ लागल्या. काहीच उपाय चालेना. ते पाहून गुरुस्वामी घाबरले. त्यांनी देवांची प्रार्थना केली की, 'देवा ! यांच्याप्रमाणे मीही आपला शिष्य आहे, आपणच माझ्याकडून यांना दंड देवविलात. करिता व्यवहारास अनुसरून यांना आज येथे भिक्षा करण्यास मीच सांगितले. माझ्या अपराधाबद्दल यांना शिक्षा का ? लवकर यांच्या उलट्या बंद कराव्यात. यापुढे मात्र मी आपल्या आज्ञेविरुद्ध काहीही सांगणार नाही.' याप्रमाणे गुरुस्वामींनीं प्रार्थना केल्यावर महाराजांच्या उलट्या थांबून त्यांना बरे वाटले. महाराजांचे गुरु नारायणानंदसरस्वती, त्यांचे गुरु अनिरुद्धानंदसरस्वती व त्यांचे गुरु अच्युतानंदसरस्वती अशी श्रीमहाराजांची परंपरा आहे. नंतर काही दिवस उज्जनीसच मुक्काम होता. पहिला चातुर्मास उज्जनीसच झाला. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' या उक्तीप्रमाणे जगत्कल्याणाकरिताच श्रीमहाराजांचा सर्व काळ गेला.

महाराजांनी माणगांव सोडल्यानंतर तेथील देवस्थानाचे महत्त्व कमी झाले. देवळांतील मूर्ति महाराजांनी नेली होती. त्या जागी उत्सवमूर्ति ठेवून महाराजांचे बंधू हरीभट हे पूजाअर्चा करू लागले. प्राप्ती विशेष नसल्याने गुरुद्वादशी, दत्तजयंती वगैरे उत्सव थोडक्यात दहापाच ब्राह्मण सांगून हरीभटजी करीत असत. हरीभटजींनी आपल्या हयातीपर्यंत हे अर्चनाचे काम चालविले होते. महाराजांच्या हाताखाली ते तयार झाले असल्याने सर्व कार्य व्यवस्थित करीत असत. ब्राह्मवर्तास महाराजांचा

मुक्काम असताना त्यांना भेटण्यास हरीभटजी गेले होते. त्यांना तेथेच गंगातीरी राहून देहाचे सार्थक करण्याबद्दल महाराजांनी सांगितले; पण प्रापंचिक ओढीमुळे ते परत माणगावी आले. पुढे त्यांच्या मातोश्री आजारी पडल्या. त्यांची स्मृति शेवटपर्यंत गेली नाही. अगदी शेवटी 'माझा अंतकाळ समीप आला आहे. सर्वांची जेवणे झाली ना !' असे त्या माउलीने विचारले. हरीभटजींनीं मातेचे मस्तक मांडीवर घेतले. नंतर हरीस्मरण करीत ती परमपवित्र माता उत्तम लोकाला गेली. मातेचे उत्तरकार्य हरीभटजींनीच केले. पुढे हरीभटजीही काही दिवसांनी वारले. त्यांची पत्नी त्यांचेपूर्वीच गेली होती. एक मुलगा ४-५ वर्षांचा होता, तोही पुढे १-२ वर्षांनीं वारला. नंतर हरीभटजींचे जामात दत्तोबा धूपकर हे माणगावी येऊन राहिले. त्यांनी देवस्थानची व्यवस्था निरंतर चालावी या उद्देशाने माणगाव देवस्थानचे विश्वस्तपत्र करून ठेवले. श्रीमंत महाराणी-साहेब सौ. इंदिराबाई होळकर, इंदूर यांचेकडून माणगांवी देवास वार्षिक काही स्थावर उत्पन्नही येत असून दरमहा काही मदत होत असते. धूपकर असताना त्यांचेकडे देऊळ बांधण्याकरिता सौ. राणीसाहेबांनीं तीन हजार रुपये दिले होते, त्यातून देवळाचे काम पायापर्यंत आले होते. धूपकरांचे पश्चात् पंचमंडळी व्यवस्था पहात होती. महाराजांचे घर मोडकळीस आल्यामुळे धूपकरांची मंडळी व देव धर्मशाळेत होते, सौ. राणीसाहेबांनीं पुन: सहा हजार रुपये खर्च करून माणगावी देवळाचे काम पुरे केले व शके १८६० वैशाख शुद्ध १३ स श्रीक्षेत्र काशी येथील श्रीब्रह्मानंदसरस्वती यांचेकडून देवळात श्रीदत्त, श्रीशंकराचार्य, श्रीसरस्वती व श्रीगुरुमहाराज यांच्या मूर्ति बसविल्या आहेत. महाराजांच्या पूर्वीच्या घराच्या जागी सौ. राणीसाहेबांनी उत्तम दुमजली घर बांधून दिले आहे. पूजा करणाऱ्याने त्या घरात नैवेद्य वैश्वदेव करून राहावे व देवाची नित्य पूजा करावी असा सौ. राणीसाहेबांचा हेतू आहे. याप्रमाणे श्रीमहाराजांचे चरित्राचा पूर्वार्ध येथे समाप्त झाला.

श्रीगुरुचरणारविंदार्पणमस्तु। श्रीगुरुदेवदत्त।।

उत्तरार्ध

श्रीक्षेत्र उज्जनी : चातुर्मास १ – शके १८१३

उज्जनी येथे श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेने श्रीनारायणानंदसरस्वती-स्वामींचेकडून महाराजांनी दंड ग्रहण केला. सर्वत्र वर्णाश्रम लोप झालेला आहे. तरी सर्व भरतखंडात पायीच संचार करून सर्व लोकांना उपदेश करावा व धर्ममार्गाची स्थापना करावी अशी श्रीदत्तप्रभूंची आज्ञा महाराजांना झाली. त्याप्रमाणे महाराजांचे वागणे सुरू झाले. दंडग्रहण झाल्याबरोबर पहिला चातुर्मास महाराजांचा उज्जनी येथेच झाला. गुरुस्वामींच्या आग्रहाने ते अन्यत्र कोठे न जाता तेथेच राहिले. महाराजांचा कार्यक्रम नित्याचा पुढीलप्रमाणे होता - पहाटे उठून शौचमुखमार्जन केल्यावर स्नान व्हावयाचे. स्नान नेहमी त्रिकाल होत असे. नंतर दंडतर्पण, प्रणवजप झाल्यावर दत्तमूर्तीस स्नान घालून भस्म लावावे. संन्याशांना फुले, तुळशी तोडता येत नसल्याने कोणी आणून दिल्यास दत्तमूर्तीस फुले वगैरे उपचार मिळत. नाहीतर नुसते भस्मावरच भागवावे लागे. कोणी विद्यार्थी असल्यास त्याला वेद, शास्त्र आवश्यक तो पाठ द्यावयाचा. दुपारी पुनः स्नानादि नित्यकर्म झाल्यावर दक्षिणी ब्राह्मणाचे घरून भिक्षा आणून ते सर्व अन्न एकत्र करून खावे. तीनच घरी भिक्षा घ्यावयाची असा नियम होता. दुपारी कोणी काही शास्त्रीय विषय समजावून घेणेकरिता येत. त्यावेळी त्यांना तो विषय समजावून सांगून त्यांचे समाधान करावे व संध्याकाळचे अनुष्ठान झाल्यावर पुराण सांगावयाचे. महाराजांची प्रवचनशैली उत्कृष्ट होती. सर्व विषय सप्रमाण सोपपत्तिक पटवून देण्याची हातोटी उत्तम होती. प्रवचनातून वेदवाक्यांचा उच्चार पुराणादि-समय करू नये. तसे केल्यास वेदपुरुषाचा शाप होतो असे महाराजांचे सांगणे असे.

संग्रही वृत्ती महाराजांची पूर्वीपासूनच नव्हती. लंगोटच्या ४,

छाट्या २, दंड व लाकडी किंवा वेळींवहाचा कमंडलू, एखादेवेळी धाबळी, उपनिषदांची पोथी, पंचायतनाचा संपुष्ट, दोन दत्तमूर्ति व पाणी काढण्याची दोरी इतकेच जिन्नस बरोबर असावयाचे. याशिवाय कसलाच संग्रह नाही. सेवा कोणाकडूनही घ्यावयाची नाही. वस्त्रे धुणे वगैरे स्वत:ची कामे स्वत:च करावयाची. कोणालाही स्पर्श करावयाचा नाही. स्पर्श झाल्यास किंवा शौचास जाऊन आल्यास स्नान करावयाचे. पायात काही न घालता पायांनीच सर्व प्रवास करावयाचा. सर्व सिद्धी प्रसन्न असताही त्यांचा उपयोग कधीच करावयाचा नाहीं. याप्रमाणे अत्यंत कडकपणाने शास्त्रीय नियमांचे पालन महाराज करीत असत. त्यामुळे त्यांच्या सदुपदेशाचा जनतेवर तत्काल परिणाम होत असे. 'आधीं केले मग सांगितले' असे महाराजांचे वागणे असे. भाद्रपद पौर्णिमेस चातुर्मास संपल्यावर महाराज उज्जनीहून निघून महत्पुरास आले. तेथे काही मुक्काम झाला. दक्षिणी ब्राह्मणांवाचून इतर कोणाकडेही भिक्षा घ्यावयाची नाही असा महाराजांचा नियम असल्यामुळे फार त्रास पडत असे. तशी वस्ती नसल्यास उपवासाचा प्रसंग येई. पण दहा दहा कोसाचा प्रवास उपोषण पडले तरी व्हावयाचाच, तो कधी चुकला नाही. मुक्काम होईल त्या ठिकाणी सर्व लोकांना सन्मार्गाचा उपदेश देवांचे आज्ञेनुसार चालूच होता. महाराजांची शांति, विद्या व तप हे पाहून प्रत्येक गावच्या मंडळींना महाराजांनी आपल्या गावी रहावे असे वाटत असे व त्याप्रमाणे ते लोक महाराजांना तसा आग्रहसुद्धा करीत असत. पण चातुर्मासानिमित्त फक्त एखाद्या तीर्थक्षेत्रांत महाराजांचा मुक्काम होई. इतरवेळी तीन दिवसांपेक्षा कोठेही मुक्काम होत नसे. मंडळींचे विशेष प्रेम, श्रद्धा, भक्ति पाहून एखादे स्थळी अधिकही मुक्काम कदाचित् होत असे. त्याप्रमाणे महत्पुरांस महाराजांचे वास्तव्य काही दिवस झाले. तेथे एक कालीभक्त ब्राह्मण काळूमैया या नावाचा रहात असे. पूर्वी आचारधर्माप्रमाणे वागून अनेक वर्षे त्याने चांगली तपश्चर्या केली. शेवटी तत्त्वज्ञानसंपन्न असा तो झाला. एकदा ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारनी श्रावण मासात एक लक्ष ब्राह्मण भोजन घातले, त्यावेळी तेथे जाऊन त्या पंक्तीतील उच्छिष्ट पात्रांतील

अन्न काळूमैयाने खाल्ले व त्या वेळेपासून दगड मारणे, शिव्या देणे, कोणी ब्राह्मणाने भिक्षा दिली तर ती टाकून देऊन दुसरीकडे कोठेही भिक्षा घेणे, असे वेड्यासारखे वर्तन काळूमैयाचे सुरू झाले. त्यामुळे अज्ञानी लोक त्याला वेडा समजून त्याची थट्टा करू लागले. महाराज तेथे गेल्यावर त्यांनी हा प्रकार पाहिला व काळूमैयांची खरी योग्यता जाणून सर्व लोकांना सांगितले की, 'हे मोठे सिद्ध पुरुष आहेत यांची जर तुम्ही थट्टा कराल तर तुमचा सर्वस्वी नाश होईल.' याप्रमाणे प्रत्यक्ष महाराजांनी सांगितल्यावर मग मात्र लोकांना भीती वाटून ते काळूमैयाबरोबर आदराने वागू लागले. काळूमैयांची सेवा एकनिष्ठेने करणारा असा तेथे रामजी नावाचा ब्राह्मण होता. तो त्यांना स्नान घालून जेवण घालीत असे. वस्त्रे धुणे, कोठे दूर गेल्यास परत आणून आपल्या स्थानावर निजविणे अशी त्यांची सर्व बडदास्त त्याने ठेवली होती. त्याने एक चांगली मोठी काठी काळूमैयांना हातात धरण्यास दिली होती. एकदा रामजीचे सांप्रदायिक गुरु त्या गावी आले व रामजीला भेटण्यास काळूमैयांचे स्थानी आले. त्यावेळी त्या गुरूंचे समक्ष काळूमैयानीं आपल्या हातातील काठीने रामजीस अतिशय बेदम मारले. ती त्यांची उग्र वृत्ती पाहून ते रामजीचे गुरु तर त्या ठिकाणी क्षणभरसुद्धा राहिले नाहीत. शेवटी काठीचे तुकडे करून काळूमैयांनी रामजीचे अंगावर फेकून देऊन सांगितले, 'ले तेरी लकडी' असे त्याला सांगून कोठे तरी निघून गेले. रामजीने लगेच उठून 'आपणास काहीही माराचा त्रास न होता ते काठीचे प्रहार म्हणजे फुलांसारखे मृदु लागले' असा आपला अनुभव लोकांना सांगितला आणि त्या दिवसांपासून तो जीवन्मुक्तासारखा निश्चिंत वृत्तीत राहू लागला. गुरुकृपेचे फळ त्याला मिळाले. काळूमैयांनी देहत्यागापूर्वी ४० दिवस ती उन्मत्तवृत्ति सोडून दिली व नेहमी ध्यानस्थ बसू लागले. शके १८२२ मध्ये ते देहबंधनांतून मुक्त झाले.

महत्पुराहून निघून महाराज सारंगपूर या गावी आले. लोकांच्या आग्रहामुळे त्यांना काही दिवस तेथे राहावे लागले. अनेक लोक दर्शनास येत. महाराजांचे कृपेने सर्वांच्या कामना पूर्ण होत असत. त्या गावात एक

केशवराव नावाचा नास्तिक मनुष्य देवी-डॉक्टर होता. त्याने नेहमी महाराजांची व त्यांचेकडे येणाऱ्या लोकांची निंदा करावी. स्नान, संध्या, नैवेद्य, वैश्वदेव वगैरे आचारधर्म त्याने सोडून दिले होते. तो एकदा महाराजांना आपल्या घरी भिक्षेचे निमंत्रण सांगण्याकरिता आला. तेथे नित्याप्रमाणे पुष्कळ मंडळी बसली होती. केशवरावाने आपला मनोदय महाराजांना कळविला. महाराजांनी त्याची एकंदर चिन्हे पाहून त्याला स्पष्ट सांगितले, 'तू ब्राह्मणासारखा दिसत सुद्धा नाहीस, तुझ्या घरी नैवेद्य, वैश्वदेव काही होत नाही, म्हणून तुझे घरी आपण भिक्षेकरिता येणार नाही.' हे महाराजांचे बोलणे ऐकून केशवराव त्यांना म्हणाला की, 'आपण पुण्याचे कऱ्हाडे ब्राह्मण आहोत. आपल्या घरी नैवेद्य, वैश्वदेव, नाही, कोणतेच ब्राह्मणाचे कर्म मी करीत नाही, तथापि आपण म्हणाल तर उद्या कोणाकडून तरी नैवेद्य, वैश्वदेव करवीन' हे त्याचे उद्‌गार ऐकल्या-बरोबर महाराज अतिशय संतापले व त्याला म्हणाले, 'तुझ्यासारख्याचे तोंडसुद्धा आपण पाहणार नाही, मग जेवण तर दूरच.'

महाराजांनी सर्वांसमक्ष केलेली निर्भत्सना केशवरावाला सहन झाली नाही. तो रागारागाने घरी निघून गेला व आईला त्याने घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा आई उलट त्याच्यावरच रागावून बोलली की, महाराज म्हणाले ते योग्य आहे. आपल्या घरी महाराज भिक्षेला येणार नाहीत तर आम्ही ब्राह्मण कसले ! याप्रमाणे उलट आई आपणावरच रागावलेली पाहून केशवरावास वाईट वाटले. इकडे महाराजांना मंडळी म्हणाली की, 'महाराज ! केशवराव फार दुष्ट मनुष्य आहे, तो रागाने निघून गेला. आता तो काही परत येणार नाही.' ते ऐकून महाराज म्हणाले की, 'थांबा काय होते ते पहा. केशवराव परत आलाच पाहिजे.' इकडे आईही रागावल्यावर केशवरावास पश्चात्ताप झाला आणि महाराजांना आपल्या घरी भिक्षेला कसेही करून आणावयाचेच असा निश्चय करून पुन: महाराजांचेकडे आला. महाराजांना साष्टांग नमस्कार घालून त्याने त्यांची क्षमा मागितली आणि 'मी महादोषी आहे आपण दया करून मला पदरात घ्या. यापुढे आपण सांगाल तसे मी वागेन,' असे अत्यंत नम्रतापूर्वक काकुळतीने

त्याने सांगितले. तो पुन: परत आलेला पाहून सर्व मंडळींना आश्चर्य वाटले. इतक्यात त्याची आई तेथे आली आणि तिने महाराजांना विनंती केली, 'आपण माझ्या मुलाला ब्रह्मकर्म शिकवावे व तो शिकून तसे वागू लागला म्हणजे नंतर आपण आमचे घरी भिक्षेस यावे.' ती गोष्ट महाराजांनी कबूल केली. नंतर केशवरावाला महाराजांनी स्वत: संध्या, पूजा, वैश्वदेव इत्यादि नित्य ब्रह्मकर्म शिकविले व त्याप्रमाणे तो वागू लागल्यावर महाराज त्याचे घरी भिक्षेस गेले. पुढे केशवराव अत्यंत आस्तिक होऊन नित्यकर्म झाल्याशिवाय पाणीसुद्धा पिईनासा झाला. सत्संगतीचा प्रभाव कसा असतो हे या उदाहरणावरून स्पष्ट लक्षात येईल. केशवराव मूळचे पुण्याचे राहणारे. त्यांचे लग्न झाले होते. नोकरीकरिता एकटेच ते सारंगपुरास आले व तेथे आपले लग्न झाले नाही असे त्यांनी सर्वांस सांगितले. तेथे मामलेदारांच्या घरी केशवरावांचा मुक्काम होता. केशवरावांची स्त्री वयांत आल्यावर त्यांचा शोध काढून एका बाईच्या सोबतीने सारंगपुरास येऊन पोचली. तिला पाहून केशवराव रागावले व मी तुला वागविणार नाही असे त्याने तिला सांगितले. नंतर मामलेदारांनी तिला आपलेकडे ठेवून घेतले व काही दिवसांनी केशवरावांची समजूत करून त्यांनी तिला केशवरावांच्या स्वाधीन केले. ती अत्यंत सुशील असल्याने केशवराव थोड्याच दिवसात तिच्याशी प्रेमाने वागू लागले. तिला काही दिवसांनी एक मुलगा झाला. तो आजानुबाहू असून सर्व गांवातील मंडळींना प्रिय होता. तीन वर्षांपासूनच मनाचे श्लोक म्हणणे, आलेल्या याचकास भिक्षा घालणे इत्यादि सत्कर्मांकडे त्याचा स्वाभाविक ओढा होता. तो मुलगा पाच वर्षांचा झाला असता एके दिवशी त्या घरी एक जटाधारी तपस्वी पुरुष भिक्षेकरिता आले. मुलाने भिक्षा घालताच त्याला त्या योगी जटाधारी तपस्वी पुरुषाने विचारले, 'क्यों बच्चा ! कहातक प्रपंच में रहनेका विचार है ?' हे ऐकून लगेच मुलाने सांगितले की, 'मैं कल आऊंगा।' हे ऐकून तो साधू निघून गेला. हे त्या दोघांचे संभाषण सर्वांबरोबर केशवरावानेही ऐकले, पण तिकडे त्याने काही लक्ष दिले नाही. दुसरे दिवशी मुलाने सकाळी स्नान केल्यावर आईबापांचेकडून

गांवातील सर्व मंडळींना बोलावले. सर्व मंडळी आल्यावर त्यांना 'प्रभूचे स्मरणनित्य ठेवून सन्मार्गाने वागा' असे सांगून त्या मुलाने 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' हा श्लोक म्हणून व प्रभूंना एकदा नमस्कार करून सर्वांसमक्ष आपला देह सोडला. सर्वांना त्यावेळी फार दु:ख झाले; पण त्याच्या आईने मात्र दु:ख न करता अत्यंत शांतवृत्ती धारण केली होती. उलट तिने सर्वांना सांगितले, 'जगात कोणाचाही संबंध खरा नाही. ऋणानुबंध असेपर्यंतच संबंध असतो. मीही आणखी सहा महिन्यांनी पंढरपुरी हा देह ठेवणार आहे.' हे तिचे बोलणे ऐकून व ती व तिचा मुलगा कोणीतरी पूर्वीचे योगभ्रष्ट असावेत असे सर्व लोकांना वाटले. नंतर सर्व मंडळी आपापल्या घरी गेली. सहा महिन्यांनी तिने पंढरपुरी चलण्याबद्दल पतीला विनंती केली. नंतर तिला घेऊन केशवराव मामलेदारासह पंढरपुरास आले. एकादशीचे दिवशी चंद्रभागेचे स्नान करून त्या पतिव्रता स्त्रीने पांडुरंगाचे दर्शन घेतले. नंतर आपल्या पतीस नमस्कार करून ती म्हणाली, 'मी आज जाणार आहे. माझ्यापासून जरी आपला वंश वाढला नाही, तथापि मोरोपंतांच्या कुटुंबातील एका मुलीबरोबर आपला विवाह होऊन तिच्यापासून आपला वंश वाढेल.' असे पतीस सांगून सर्वांचा निरोप घेऊन हरिस्मरणपूर्वक तिने प्राण सोडला. नंतर तिचे सर्व क्रियाकर्मांतर करून केशवराव पुण्यास आले. मोरोपंतांना त्यांची बातमी कळताच ते विवाहाची बोलणी करण्याकरता आले असता केशवरावाने स्पष्ट नकार दिला व लग्न मोडण्याकरिता त्याने अनेक प्रयत्न केले. तथापि प्रथम स्त्रीच्या सांगण्याप्रमाणे तो योग बलवत्तर असल्याने त्या मुलीशी केशवरावांचे लग्न शेवटी झाले. पुढे सर्व मंडळी सारंगपुरास आली. अशा विलक्षण घटना घरातच घडल्या तरीही केशवरावांचा नास्तिकपणा गेला नाही. पण वर वर्णन केल्याप्रमाणे महाराजांची संगती घडताच तो पूर्णपणे नाहीसा झाला. महाराजांचे जवळ दोन दत्तमूर्ति होत्या. एक कागलची माणगावास ठेवली होती ती व दुसरी लहान प्रवासी मूर्ति. सारंगपूरचे राहणारे गोविंदराव यांनी त्या दोन मूर्तींपैकी मोठी मूर्ति पूजेकरिता महाराजांचे जवळ मागितली. त्यावेळी महाराजांनी सांगितले

की, 'यापैकी कोणतीही मूर्ति तुमच्या उपयोगी नाही. त्यांची कोठेतरी स्थापना करणेचा आपला मनोदय होता. पण देवांनी सांगितले की, ही मूर्ति जेथे जाईल त्या घराचा व गावाचाही नाश होईल. म्हणून या मूर्ति कोणीही घेत नाहीत व आपणही कोणाला देत नाही.' असे महाराजांनी सांगितले तरी त्यांची आज्ञा मोडून ती मोठी मूर्ति गोविंदरावांनी एक लहान देऊळ बांधून त्यांत नेऊन ठेवली. पुढे लवकरच त्यांचा एकुलता एक मुलगा वारला. पुढे ते स्वत: आजारी पडले. नंतर काही वर्षांनी गोविंदरावांना त्या मूर्तीने स्वप्नांत सांगितले की, मला बढवाई येथील श्रीवासुदेव दत्तमंदिरांत नेऊन पोचीव. बढवाईचे दत्तमंदिरांतील ब्रह्मचारी लक्ष्मणबुवा यांनाही आपणास सारंगपुराहून येथे घेऊन येण्याबद्दल दृष्टांत झाला होता. नंतर लक्ष्मणबुवांनी सारंगपुराहून ती मूर्ति आणून नर्मदातीरी बढवाईस दत्तमंदिरांत नेऊन ठेवली. याप्रमाणे या मूर्तीची थोडक्यात हकीकत आहे.

सारंगपुराहून बजरंगगडास जाण्याकरिता महाराज निघाले. रस्त्यात एका गावी सारखा पाऊस लागल्यामुळे एका अग्निहोत्री बुवांच्या घरापुढील ओट्यावर उतरले. महाराज येत असल्याबद्दल त्या अग्निहोत्री बुवांना सारंगपुराहून मंडळींनी कळविले होते. त्याप्रमाणे ते वाट पहातच होते. पण दैवयोग असा विचित्र की, महाराज येण्याचे ऐन वेळेसच अग्निहोत्री बुवा अन्यत्र काही कामाकरिता गेले. महाराज त्यांच्या कट्ट्यावर उतरले. थोडे भिजलेले अंग पुसून सामान काढून तेथे ठेवले. इतक्यात त्यांना कट्ट्यावर बसलेले पाहून अग्निहोत्र्यांचा १७-१८ वर्षांचा मुलगा बाहेर आला व 'तुमच्याकरिता घर बांधले नाही. कोणाच्या परवानगीने येथे उतरला ? आताच्या आता चालते व्हा नाहीतर दंड-कमंडलू फेकून देईन.' इत्यादि अद्वातद्वा महाराजांना बोलला. त्या मुलाचे ते कठोर भाषण ऐकून महाराज तेथून उठले आणि गावाबाहेर येऊन तेथे एका झाडाखाली रात्रभर राहिले. पहाट झाल्यावर पुढील प्रवासास लागले. महाराज निघून गेल्याबरोबर अग्निहोत्र्यांच्या मुलाला भ्रम होऊन तो वेड्यासारखा बडबडू लागला. काही वेळाने अग्निहोत्री बुवा घरी

येऊन पाहतात तो मुलगा वेडा झालेला त्यांचे दृष्टीस पडला. तेव्हा बायकोने सांगितले, 'कोणी एक स्वामी बाहेर कट्ट्यावर येऊन उतरले असता मुलगा त्यांना रागाने बोलल्यामुळे ते निघून गेले. तेव्हापासून मुलगा भ्रमिष्ट होऊन बडबड करू लागला.' हे बायकोचे म्हणणे ऐकून अग्निहोत्री बुवांना वाईट वाटले. सारंगपूरच्या पत्राप्रमाणे ते महाराजच असले पाहिजेत, पण आपल्या दुर्दैवाने ऐन वेळी आपण बाहेर निघून गेल्यामुळे हा घोटाळा झाला. त्यांचे दर्शन घेऊन क्षमा मागितली पाहिजे असा विचार करून रात्र संपल्याबरोबर सकाळी सर्व अन्हिक उरकून अग्निहोत्री बुवा महाराजांच्या शोधार्थ बाहेर पडले. बरेच दिवस फिरूनही महाराजांचा शोध काही लागला नाही. तथापि त्यांनीं प्रयत्न चालू ठेवला. पुढे एक दीड वर्षाने शोध लागल्याबरोबर अग्निहोत्रीबुवा महाराज होते त्या गावी गेले व साष्टांग नमस्कार घालून झालेल्या अपराधाबद्दल त्यांनी महाराजांची क्षमा मागितली. अग्निहोत्री बुवा म्हणाले, 'महाराज ! आपण येणार म्हणून मी बराच वेळ आपली वाट पाहिली. पुढे काही काम निघाल्यामुळे मी थोडा वेळ बाहेर गेलो, इतक्यात आपले येणे झाले. मुलाने आपणास न ओळखता आपला अवमान केला. तरी हा अपराध पोटात घालून गुरुमाउलीने कृपा करावी' असे अग्निहोत्री बुवांचे भाषण ऐकून महाराज किंचित् रागाने त्यांना म्हणाले, 'तुम्ही गृहस्थ असता अतिथींबद्दल तुमच्या घरातील मंडळींचे मनात काहीच आदरभाव दिसत नाही, तुम्ही त्यांना तसे शिक्षण द्यावयास नको काय ? अतिथी सत्कार हे गृहस्थाचे मुख्य कर्तव्य आहे. यति, ब्रह्मचारी यांनी गृहस्थाचे घरी जावयाचे नाहीतर कोठे जावयाचे ? तुमच्या घरच्या एकंदर प्रकारावरून तुमचे अग्निहोत्र म्हणजे एक नुसता पोटपूजेचा प्रकार आहे असे का म्हणू नये ? आम्ही काही तुमच्या मुलाला वेड लावले नाही. ते तुमच्याच कर्माचे फल आहे. तुम्ही आता घरी निघून जा' असे महाराजांचे स्पष्ट भाषण ऐकल्याबरोबर अग्निहोत्रीबुवा फारच कष्टी होऊन त्यांनी अत्यंत दीन होऊन महाराजांची वारंवार क्षमा मागितली, तेव्हा महाराजांनाही दया येऊन त्यांनी थोडा अंगारा मंत्रून देऊन तो मुलाला लावण्यास सांगितले.

नंतर महाराजांची आज्ञा घेऊन अग्निहोत्रीबुवा घरी आले व त्यांनीं अंगारा मुलाला लावताच तो मुलगा पूर्वीप्रमाणे बरा झाला.

महाराजांचा प्रवास चालूच होता. ते पिछोरा नावाच्या गावात आले. तेथे काही मुक्काम झाले. अधिकारी मंडळींना उपनिषदे समजावून सांगितली. संध्याकाळी पुराणही नित्य चालत असे. तेथील मामलेदारांचा बंधू भास्करराव यास अपस्माराचा व्याधी जडल्यामुळे त्याने तो बरा होण्याकरिता पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही. एके दिवशी संध्याकाळी भास्करराव, महाराजांचे पुराण चालू असताना तेथे आला व 'मला या व्याधीतून मुक्त करा' अशी त्याने महाराजांची प्रार्थना केली. इतक्यात त्याचे अंगात पिशाच्च संचार होऊन तो काही बडबडू लागला. तेव्हा महाराजांनी त्याला सांगितले, 'आता येथे पुराण चालू आहे. यात व्यत्यय नको, उद्या येऊन तुमची हकीकत सांगा म्हणजे विचार करू.' असे महाराजांनी सांगताच ते पिशाच्च निघून गेले. भास्करराव‌ही नंतर आपले घरी गेले. दुसरे दिवशी पुराणाचे अगोदर येऊन भास्करराव‌ांनी आपली हकीकत सांगितली. त्याचवेळी पिशाच्चाने त्यांच्या शरीरात प्रवेश करून सांगितले की, 'मी ज्या पिंपळावर राहतो त्याखाली हा लघुशंका करीत असल्यामुळे अस्वच्छता होते, म्हणून मी याला पीडा देत आहे.' हे पिशाच्चाचे सांगणे ऐकून महाराज त्याला म्हणाले की, 'अरे याचा अपराध केवढा आणि शिक्षा केवढी ? तू लबाड आहेस. याला सोडून तू जातोस की नाही ? का शिक्षा केली पाहिजे ?' ही महाराजांची वाणी ऐकल्याबरोबर ते पिशाच्च घाबरले आणि त्याने आपली खरी हकीकत सांगितली 'महाराज ! मी यापूर्वी निपुत्रिक अवस्थेत मरण पावल्यामुळे माझे और्ध्वदेहिक झाले नाही, त्यामुळे ही पिशाच्च योनी मला मिळाली. हा भास्करराव चांगला श्रीमंत असल्यामुळे याच्याकडून आपण नारायणबळी करविल्यास मी या योनीतून मुक्त होईन आणि या उद्देशानेच याला मी त्रास देतो. तरी याला नारायणबळी करण्याची आज्ञा व्हावी.' अशी पिशाच्चाची विनंती ऐकून महाराजांनी भास्करराव‌ां-कडून त्या पिशाच्चाचे उद्धारार्थ नारायणबळी करविला. त्यामुळे त्या

पिशाच्चालाही मुक्ती मिळून भास्कररावांचीही अपस्माराची पीडा कायमची दूर झाली.

महाराज पुढे खरेरा या गावी आले. तेथे काही दिवस राहणे झाले. श्रीमहाराजांच्या दर्शनास नित्य पुष्कळ मंडळी येत होती. एकदा एक बाई दर्शनास आली व महाराजांच्या लहान दत्तमूर्तीची पूजा करू लागली. तिने उदबत्ती पेटविल्याबरोबर तिच्या अंगांत पिशाच्चसंचार होऊन ती ओरडू लागली. ते ऐकून सर्व मंडळी तेथे जमली. 'तू कोण आहेस ? असे प्रथम महाराजांनी त्या पिशाच्चाला विचारले. तेव्हा त्याने सांगितले की, 'मी या जवळच्या मशिदीचा मालक जिंद आहे. त्या मशिदीजवळ या बाईने लघुशंका केल्यामुळे मी या बाईस धरले आहे. हिचा नवरा चांगला श्रीमंत आहे. त्याने माझी मशिद चांगली बांधून द्यावी म्हणजे मी या बाईला सोडतो.' हे पिशाच्चाचे सांगणे ऐकून महाराज त्याला म्हणाले की,'तू या बाईच्या तीन गर्भांचा नाश केल्यामुळे तुझी मशिद दुरुस्त करण्याबद्दल हिच्या नवऱ्यास आपण सांगणार नाही. तरी तू मुकाट्याने निघून जा' ही महाराजांची वाणी त्या पिशाच्चाने ऐकून फारच काकुळतीन महाराजांची त्याने प्रार्थना केल्यामुळे तिच्या नवऱ्यास महाराजांनी ती मशिद दुरुस्त करून देण्यास सांगितले. त्याने त्याप्रमाणे करताच त्या बाईची पिशाच्चबाधा दूर होऊन तिची संततीही पुढे वाचली. त्या गावाहून महाराज काशीस जाण्याकरिता निघाले. ते पायवाटेने निघालेले पाहून मंडळींनी सांगितले की, 'रेल्वे झाल्यापासून या पायवाटेने कोणी प्रवास करीत नाहीत. रस्त्यात जंगल फार असल्याने हिंस्त्र पशूंचा त्रास, दोन दोन दिवस गाव लागत नाही, तरी आपण पायवाटेने न जाता रेल्वेने जावे.' असे मंडळींचे म्हणणे ऐकून महाराज म्हणाले की, 'आजपर्यंत सर्व प्रवास श्रीदत्तगुरूंचे आज्ञेप्रमाणे पायांनीच झाला असून पुढेही तसाच होईल. श्रीदत्तप्रभूंची जशी इच्छा असेल तसे घडेल' असे सर्व मंडळींना सांगून महाराज त्या पायवाटेने निघाले. काही वाटचाल झाल्यावर श्रीदत्त भिल्ल वेषाने महाराजांचे जवळ येऊन म्हणतात की, 'तुम्हाला काशीला जावयाचे आहे ना ? तुम्हाला मी रस्ता दाखवितो. माझ्या पाठीमागून या'

असे म्हणून तो भिल्ल पुढे चालू लागला व महाराज त्याच्या पाठीमागून चालले. थोड्याच वेळात एक लहानशी टेकडी उतरून आल्यावर तो भिल्ल म्हणाला की, 'तो समोर गाव दिसतो तेथे जा, म्हणजे मग तेथून तुम्हाला पुढे सरळ रस्ता लागेल.' असे सांगून तो भिल्ल एकदम दिसेनासा झाला. त्याने दाखवून दिलेल्या रस्त्याने महाराज त्या गावात येऊन पोचले. ज्या गावी येण्यास २-३ दिवस लागतात तेथे आपण एक-दोन तासातच येऊन पोचलो हे नंतर महाराजांना कळून आले, तेव्हा त्यांना प्रभूची अतर्क्य लीला पाहून कौतुक वाटले. सर्व मंडळींनाही तो प्रकार समजल्यावर आश्चर्य वाटले.

पुढे महाराज प्रवास करीत करीत जालवण मुक्कामी आले. तेथे मंडळींच्या आग्रहामुळे काही दिवस मुक्काम झाला. तेथेही नित्याप्रमाणे वेदांचे, उपनिषदांचे शिक्षण देण्याचे काम चालू होते, पुढे दासनवमी आली. त्यादिवशी महाराजांनी, दासबोधाचे वाचन व्हावे असे ठरविले. त्या गावातील एका शास्त्रीबुवांना ती गोष्ट पटली नाही. ते संस्कृतचे अभिमानी होते. त्यांचे मत असे होते की, 'दासबोध प्राकृत ग्रंथ आहे. ज्यांना संस्कृतचा गंधही नाही त्यांनी फार तर तो वाचावा.' हे त्यांचे मत महाराजांना समजले तेव्हा त्यादिवशी रात्री दासबोध वाचता वाचता त्यांनी एका वेदवाक्याचा अर्थ सांगून त्याचे विवरण केले आणि तशाच अर्थाची दासबोधांतील एक ओवीही वाचून दाखवून त्या शास्त्रीबुवांना विचारले, 'काय शास्त्रीबुवा ! दासबोध ग्रंथ प्राकृत आहे का संस्कृत आहे, ते आता तरी नीट विचार करून सांगा.' ते महाराजांचे म्हणणे शास्त्रीबुवांना चांगले लागले व आपली चूक पटून त्यांनी महाराजांची क्षमा मागितली. नंतर महाराजांनी त्यांना समजावून सांगितले की, 'ग्रंथ वाचीत असताना तो प्राकृत आहे की संस्कृत आहे या बाह्यांगाचा विचार करू नये. त्यातील सांगितलेल्या अर्थाकडे अनुसंधान ठेवावे. समर्थ रामदासस्वामी प्रत्यक्ष मारुतीरायांचे अवतार असून प्रभू श्रीरामचंद्रांचे निस्सीम भक्त होते. त्यांना संस्कृत येत नव्हते असे म्हणता येणार नाही. सर्वही लोकांना समजण्याकरिता म्हणून त्यांनी प्राकृत भाषेत ग्रंथ करून

त्यातून शास्त्राची सर्व प्रमेये व्यवस्थित रीतीने मांडलेली आहेत. तो ग्रंथ प्रासादिक आहे. कलियुगात आचारधर्म लुप्तप्राय झाल्याने नुसत्या वेदपठणाचा व्हावा तसा उपयोग होत नाही. पण साधुपुरुषांनी केलेल्या प्रासादिक प्राकृत ग्रंथांचा यावेळी फार मोठा उपयोग होण्यासारखा आहे. याचा तुम्ही अनुभव घेऊन पाहा. तुम्ही संस्कृत ग्रंथांचे पठण करूनही तुमच्या घरातील ब्रह्मसमंध अद्यापि गेला नाही हे खरे आहे ना ? तर मग आता आपण सांगतो त्याप्रमाणे मराठी गुरुचरित्राचा सप्ताह करून पाहा, म्हणजे तो समंधही मुक्त होईल आणि तुमचाही त्रास जाईल.' याप्रमाणे महाराजांनी त्यादिवशी सत्पुरुषांच्या प्राकृत ग्रंथाविषयी विशेष प्रशंसोद्‌गार काढले. त्याचा परिणाम शास्त्रीबुवांचे मनावर होऊन त्यांनी महाराजांचे आज्ञेप्रमाणे प्राकृत गुरुचरित्राचा सप्ताह केला, त्यामुळे त्यांच्या घरातील बरेच दिवसांचा ब्रह्मसमंध नाहीसा झाला. तेव्हा शास्त्रीबुवांचा इतका विश्वास बसला की, ते पुढे रोज नियमाने गुरुचरित्र वाचू लागले. तसेच इतरही संतांचे प्राकृत ग्रंथ वाचण्याचा त्यांना नाद लागला आणि असा अनुभव आल्यामुळे पुढे त्यांनी प्राकृत ग्रंथांची निंदा कधीही केली नाही. जालवणास गणपतराव गर्दे म्हणून एक वकील आर्यसमाजीय होते. त्यांची मते नास्तिकच होती. पण महाराजांच्या उपदेशाचा परिणाम त्यांचे मनावर होऊन ते पूर्ण आस्तिक बनले.

चातुर्मास २ ब्रह्मावर्त – शके १८१४

महाराज जालवणाहून निघून फिरत फिरत ब्रह्मावर्तास येऊन पोचले. येथे येण्याची ही त्यांची पहिली खेप. यावेळी येथे आठ महिने मुक्काम झाला. अंताजीपंतांचे घाटावर राम मंदिरानजिक एका झोपडीत महाराजांचे वास्तव्य होते. तेथे रोज सकाळी शौचमुखमार्जन व स्नान झाल्यावर झोपडीचे दार लावून भिक्षेची वेळ होईपर्यंत बसत असत. नंतर पुन: गंगेवर मध्यान्ह स्नान करून येऊन व आवश्यक ती कर्म करून तीन घरची भिक्षा आणावयाची व ती घ्यावयाची. हे होईपर्यंत झोपडीचे दार उघडे असे. नंतर पुन: संध्याकाळ होईपर्यंत दरवाजा बंद. याप्रमाणे आठ

महिने कार्यक्रम चालू होता. तोपर्यंत महाराजांच्याबद्दल कोणासच काही माहिती झाली नाही. पुढे चातुर्मास सुरू झाला. तेव्हा मंदिरात पुराण ऐकण्यास महाराज जाऊ लागले. दोन-तीन दिवस झाल्यावर एके दिवशी पुराण झाल्यावर महाराज पुराणिकबुवांना म्हणाले की, 'उद्या आपले पुराण संपल्यावर आपण एक श्लोक सांगू. पुराणिकबुवांनीही महाराजांचे म्हणणे मान्य करून उद्या महाराज पुराण सांगणार असल्याबद्दल सर्व मंडळींना कळविले. दुसरे दिवशी पुराण झाल्यावर महाराजांनी एका गीताश्लोकाच्या आधाराने पुराणास आरंभ केला. ते ऐकत असता महाराजांची विद्वत्ता व योग्यता लोकांच्या लक्षात येऊन सर्वच मंडळी विस्मयचकित झाली. महाराजांचे पुराण संपल्याबरोबर पुराणिकबुवांनी महाराजांना सांगितले की, 'आमचा चातुर्मास आजच संपला व आपला सुरू झाला. तरी आपणच उद्यापासून पुराण सांगावे. मी काही उद्यापासून या व्यासपीठावर बसणार नाही.' याप्रमाणे सर्वांसमक्ष पुराणिकबुवांनी प्रार्थना केल्याप्रमाणे महाराज रोज पुराण सांगू लागले. केवळ श्रीदत्तप्रभूंची आज्ञा म्हणूनच महाराजांचे हे काम चालले होते. त्यांत लोकैषणेचा काही संबंध नव्हता. त्यामुळे नित्य अनेक मंडळी पुराणश्रवणास येऊ लागली. काही विद्यार्थीही अध्ययनास येऊ लागले. आषाढ पौर्णिमेपासून चातुर्मास सुरू झाला. ज्योतिष, याज्ञिक, वेदांत, योग इत्यादि विविध विषयांच्या अभ्यासाकरिता महाराजांचेकडे अनेक लोक येऊ लागले. महाराजांचा मुक्कामही त्यावेळी ब्रह्मावर्तास चांगला दीड वर्ष झाला. बऱ्याच मंडळींना सन्मार्गाचा उपदेश होऊन त्यांचे कल्याण झाले. वर्णाश्रम धर्माकडे लोकांची प्रवृत्ती विशेष वाढली. पुढे पुढे महाराजांची कीर्ति बरीच दूरवर पसरली. ती ऐकून ग्वाल्हेर-लष्कर येथील एक महापंडित गोपाळाचार्य हे आपल्या शिष्यमंडळींसह एकदा महाराजांचे दर्शन घ्यावे म्हणून ब्रह्मावर्तास आले. सायंकाळची वेळ. महाराजांचे पुराण चालले होते ते पाहून गोपाळाचार्य मंदिरांत एका बाजूस उभे राहिले. लगेच महाराजांनी त्यांना पाहून आपले पुराण संपविले आणि त्यांना घेऊन आपल्या आश्रमांत आले. बाकीची मंडळी बाहेरच थांबली. आत

गोपाळाचार्य व महाराज यांची काही चर्चा होऊन त्यांत आचार्यांचे समाधान झाले. दुसरे दिवशी गोपाळाचार्य महाराजांचा निरोप घेऊन परत गेले. ब्रह्मावर्तास असताना महाराजांनी दत्तपुराण नावाचा एक ग्रंथ संस्कृत भाषेमध्ये लिहिला. एकंदर श्लोकसंख्या साडेतीन हजार असून टीकाही विस्तृत केलेली आहे. एकंदर अध्याय ६४ असून आठ अष्टके आहेत. ऋक्संहितेप्रमाणेच याची रचना झालेली आहे. ऋक्संहितेतील प्रत्येक अध्यायांतील आरंभ व दत्तपुराणांतील अध्यायाचा आरंभ एकसारखा आहे. पहिल्या अध्यायातील प्रत्येक श्लोकांत एक, दोन असे ऋक्पाद घालून स्तुति केली आहे. यालाच वेदपादस्तुति असे म्हणतात. असा हा अप्रतिम ग्रंथ ब्रह्मावर्तास गंगातीरावर निर्माण झाला.

चातुर्मास ३ हरिद्वार – शके १८१५

ब्रह्मावर्ताहून निघून गोकुळ, मथुरा, वृंदावन इत्यादि स्थाने पहात पहात महाराज शके १८१५ वैशाख पौर्णिमेच्या सुमारास हरिद्वारास येऊन पोचले. तेथे गंगेच्या तीरावर अहिल्याबाईंच्या धर्मशाळेजवळ असणाऱ्या दत्तमंदिरांत महाराजांचा मुक्काम झाला. त्यावेळी तेथे शारदापीठाधीश श्रीराजराजेश्वरस्वामी शंकराचार्य यांचाही मुक्काम होता. त्यांच्या आग्रहावरून तेथेच चातुर्मासांत राहण्याचे महाराजांनी ठरविले. चातुर्मासांत शंकराचार्यांना उपनिषद्भाष्य ऐकवून भाद्रपद पौर्णिमेनंतर बदरीनारायणाचे यात्रेकरिता महाराज निघाले. रस्त्यांत महाराजांना नर्मदातीरावरील भालोद गावातील यात्रेला निघालेले बळवंतराव वगैरे लोक भेटले. एकदा बळवंतरावांस फार थंडी वाजू लागल्यामुळे डॉक्टरांना प्रकृति दाखविली. तेव्हा डॉक्टरांनी त्यांना चुकून सोमलाच्या गोळ्या दिल्या. त्या गोळ्या त्यांनी घेतल्या व अशक्तपणामुळे डोलीत बसून पुढे निघाले. त्या सोमलांच्या गोळ्यांचा परिणाम थोड्याच वेळात दिसून आला. बळवंतरावास सारखे जुलाब होऊ लागले. अंगात उष्णता वाढल्यामुळे सर्व शरीराचा दाह होऊ लागला. शेवटी एका झऱ्यावर आपणास घेऊन जाण्याबद्दल त्यांनी डोलीवाल्यास सांगितले. त्याप्रमाणे

ते डोलीवाले झऱ्याजवळ येताच बळवंतराव दाह शांत व्हावा म्हणून त्या पाण्यातच जाऊन बसले. ही त्यांची स्थिती पाहून डोलीवाले घाबरून बळवंतरावांना तेथेच टाकून पळून गेले. महाराजांना हे समजल्याबरोबर लगेच पोलीसमध्ये वर्दी देऊन त्या डोलीवाल्यांस पकडून आणविले व ती डोली घेऊन बळवंतराव जेथे पाण्यात बसले होते तेथे महाराज येऊन पोचले. नंतर बळवंतरावांची ती अवस्था पाहून महाराज त्यांना म्हणाले की, 'बळवंतराव ! एकाएकी तुमची अशी अवस्था का झाली ? काही औषध वगैरे खाल्ले काय ?' बळवंतरावांचा गळा उष्णतेने सुजला होता. त्यांना बोलता येईना. त्यांनी खुणांनी सर्व सांगितले व पदरांत बांधलेले डॉक्टरांचे औषध महाराजांना दाखविले. ते पाहताच महाराज म्हणाले, 'हा तर प्रत्यक्ष सोमल आहे, याची पीडा जाण्याकरिता तूप खाल्ले पाहिजे.' पण तेथे पुष्कळ शोध केला तरी तूप मिळाले नाही. पुढे तसेच त्यांना डोलीत घालून उतरण्याचे ठिकाणी आणले. तेथे आल्याबरोबर बळवंतराव बेशुद्ध पडले. ती रात्रीची वेळ, थंडी अतिशय, सहानुभूतीचे माणूस जवळ कोणी नाही. शेवटी रात्रभर महाराज बळवंतरावांचे जवळ बसून होते. सारखे जुलाब होतच होते. वस्त्रे कोण धुणार ? शेवट ती वस्त्रे सुद्धा महाराजांनीच धुतली व बळवंतरावास एका बाजूस निजविले. मध्यरात्रीच्या सुमारास बळवंतराव सावध होऊन काही खावयास मागू लागले. तेव्हा महाराज उठून एका हलवायाचे दुकानासमोर येऊन मोठ्याने 'नारायण' असे म्हणाले. हलवाई तो आवाज ऐकून जागा झाला व इतक्या रात्री त्रास का देता असे त्याने महाराजांना विचारले. महाराजांनी त्याला सांगितले, 'बाबा, एक गरीब ब्राह्मण फार आजारी असून त्याला फार भूक लागली आहे. आपला व त्याचा काही संबंध नाही. तथापि यावेळी त्याचे आप्त कोणी जवळ नसल्यामुळे त्याचे दु:ख पाहून आपण संन्यासी असूनही यावेळी काही मिठाई मागण्यास आलो आहो, पैसे उद्या देऊ.' हे महाराजांचे बोलणे ऐकून त्या हलवायाने काही मिठाई लगेच दिली व आपण एका अनाथ ब्राह्मणाकरिता ही नेत असल्यामुळे याचे पैसे नकोत असे त्याने महाराजांना सांगितले. नंतर ती मिठाई घेऊन महाराज

बळवंतरावांना निजविलेल्या ठिकाणी आले व थोडी थोडी मिठाई त्यांच्या तोंडात घालू लागले. ती मिठाई पोटात गेल्यावर बळवंतरावांस हळूहळू बरे वाटू लागले. रात्र संपल्यावर महाराजांनी तार करून त्यांच्या मुलाला बोलावून घेतले व तो आल्यावर सर्व सामानासह बळवंतरावांस त्याचे स्वाधीन केले. त्याच दिवशी बळवंतराव इहलोक सोडून गेले. महाराजही पुढील यात्रेस निघून गेले. इत:पर यात्रेच्या वेळी कोणाचीही संगती नको असे महाराजांनी ठरविले.

चातुर्मास ४ व ५ हिमालय – शके १८१६–१७

महाराज बदरीनारायणाचे दर्शनार्थ निघाले. रस्त्यांत हृषिकेश, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, गुप्तकाशी, बदरीकेदार इत्यादि स्थाने पहात पहात बदरीनारायणाचे दर्शन केले. प्रत्येक ठिकाणी एक-दोन दिवस, कोठे अधिकही मुक्काम होत असे. बरोबर दक्षिणी ब्राह्मण यात्रेकरू असल्याने भिक्षेची अडचण पडली नाही. हिमालयांत बदरीनारायणाचे दर्शनास जात असता एका ठिकाणी मोठा कडा तुटलेला असून पुढे जाण्यास मार्ग नाही असे पाहून महाराज तेथेच थबकले. इतक्यांत कड्यावरून दोघेजण खाली येऊन महाराजांना म्हणाले की, 'पुढे जाण्यास रस्ता नाही. मागे परत जा. नाहीतर देहपात होईल.' हे त्या दोघा पुरुषांचे बोलणे ऐकून महाराजांनी त्यांना सांगितले, 'देह पडला तरी हरकत नाही. नरनारायणांचे दर्शनार्थ आपण आलो आहो. ते दर्शन झाल्याशिवाय आपण परत फिरणार नाही. पुढे वाट नसेल तर आपण दोघे तिकडून कसे आला ?' हे महाराजांचे निर्धाराचे भाषण ऐकून ते दोघेही पुरुष अदृश्य होऊन त्याठिकाणी प्रत्यक्ष नरनारायणप्रभू मुनि दिसू लागले. महाराजांनाही नरनारायणांचे दर्शन घडल्यामुळे आनंद झाला. याप्रमाणे श्रीमहाराजांना दर्शन देऊन नरनारायणप्रभू दिसेनासे झाले. हिमालयांत एक सरोवरात तपश्चर्या करणारा एक योगी पुरुष महाराज तेथे येताच वर येऊन त्याने त्यांचे दर्शन घेतले. महाराजांनीही हात वर करून 'नारायण' म्हणून त्याला आशिर्वाद देताच तो योगी पुरुष पूर्ववत् सरोवरात अदृश्य झाला. बदरीनारायणाचे

रस्त्यांत मध्येमध्ये प्रवासी लोकांच्या उतरण्याच्या जागा बांधलेल्या आहेत. तेथे येणाऱ्या गरीब लोकांना अन्न, वस्त्रे, कांबळी, धाबळ्या इत्यादि वस्तू श्रीमंत लोक देत असतात. काळीकंबळीवाला या प्रसिद्ध साधुपुरुषाने अनेक श्रीमंत लोकांना भेटून ही व्यवस्था करून ठेवली आहे. पहाडांत थंडी फार, बर्फ पडते त्यामुळे पुष्कळ लोक या स्थानांतून आपणास जरूर त्या वस्तूंचे दान घेतात. अशाही ठिकाणी महाराजांचेकडे दोन छाट्या व एक धाबळी याखेरीज वस्त्रांचा संग्रह नाही, अग्नीला तर स्पर्शही करावयाचा नाही. याप्रमाणे राहून हिमालयांत महाराजांनी प्रवास केला. दैवीशक्तीवाचून हे केव्हाही शक्य नाही. ही शक्ति केवळ सदाचरणाने मिळू शकते हे महाराजांनी आपल्या दिव्य चरित्रावरून सर्वांना दाखवून दिले होते.

बदरीनारायणाचे मूर्तीचे दर्शन दुरूनच घ्यावे लागते. कारण मूर्ति परिसाची आहे अशी लोकांची समजूत असल्यामुळे तेथे जवळ जाऊन कोणी लोखंडाचे सोने करतील या भीतीने देवळाचे गाभाऱ्यांत यात्रेकरूंना जाण्यास बंदी आहे. पण महाराजांना मात्र तसा काही प्रतिबंध न होता त्यांनी अगदी जवळ जाऊन दर्शन व पूजन केले. गंगोत्रीस गेल्यावेळी तेथे स्नान करताच थंडीने महाराजांचे अंग अगदी गारठून गेले. काही हालचाल होईना. इतक्यात कोणी पेटलेली शेगडी आणून ठेवली. बराच वेळ शेकल्यावर अंगांत ऊब आली. अग्निस्पर्श न करण्याबद्दल श्रीदत्तांची आज्ञा होती. पण या ठिकाणी मात्र ती पाळता आली नाही. संपूर्ण आयुष्यांत हा शेकण्याचा प्रसंग एकदाच आला असल्याचे महाराज सांगत असत. गंगोत्रीच्या वाटेवर एक गाव लागले. तेथे मुसलमानांची बरीच वस्ती होती. मंडळींना गावात पाठवून महाराज बाहेरच एका दगडावर बसून राहिले. नंतर थोड्या वेळाने महाराज त्या दगडावर छाटी पांघरून निजले. लवकरच त्यांना गाढ झोप लागली. त्यावेळी जोरात पाऊस पडू लागला. लगेच मंडळी गावातून तेथे येऊन पाहतात तो महाराजांना त्या शिळेवर झोप लागली आहे व खालून वरून सारखे पाणी वाहत आहे, तरी महाराजांना त्याचे भानही नाही.

चातुर्मास ६ हरिद्वार – शके १८१८

महाराज हिमालयात गेले असता त्यांचे दोन चातुर्मास कोठे झाले ही माहिती लागत नाही. त्यावेळी प्रत्यक्ष महाराजांनाही कोणी यासंबंधी विचारलेले दिसत नाही. त्यामुळे ही दोन वर्षे महाराजांचा अज्ञातवास होता एवढेच समजून पुढील चरित्र पाहावे. हिमालयांतील यात्रा आटोपून महाराज शके १८१८ वैशाख पौर्णिमेचे सुमारास हरिद्वार येथे परत आले. या वर्षीचा चातुर्मास तेथेच झाला. तेथे या खेपेस सहा महिने मुक्काम होता. नंतर तेथून ब्रह्मावर्तास येण्याकरिता महाराज निघाले. बरोबरचे ब्राह्मण यात्रेकरू पूर्वीच पुढे निघून गेले होते. त्यामुळे व रस्त्यांत दक्षिणी ब्राह्मणांची सोय न झाल्यामुळे महाराजांना १८ दिवस उपवास घडला. काही ठिकाणी गुजराथी ब्राह्मणांकडून फळे मिळाली, तेवढी खाऊनच राहावे लागले. रस्त्यात एका गुजराथी ब्राह्मणाच्या बाईने शेंगाचे दाणे, चणे व गहू भाजून त्याचे पीठ करून महाराजांचे बरोबर दिले होते. ते रोज पाण्यांत कालवून खावयाचे आणि २०-२५ कोस चालावयाचे असा महाराजांचा त्यावेळी क्रम असे. असा प्रवास करीत महाराज ब्रह्मावर्तास येऊन पोचले. तेथे घाटावर राममंदिरात मुक्काम ठेवला. गणपतीबुवा म्हणून एक मोठे साधू १८५७ साली झालेल्या बंडाचे वेळी तेथे राहत होते. त्यांचा बाटून मुसलमान झालेला पुतण्या आपल्या पत्नीस नेण्याकरिता तेथे आला. त्या स्त्रीने, 'अशा पतीबरोबर जावे की नाही, याबद्दल शास्त्रनिर्णय काय ?' असा प्रश्न महाराजांना केला. महाराजांनी तिला सांगितले की, 'पति प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झाल्यावाचून त्याच्याशी संसर्ग ठेवू नये असे शास्त्र आहे.' ही महाराजांची आज्ञा ऐकून त्या स्त्रीने आपल्या पतीस प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होण्यास सांगितले, पण त्याने ते ऐकले नाही. त्यामुळे त्या स्त्रीनेही त्याच्याबरोबर न जाता ब्रह्मावर्तासच राहून हरिभजनांत काळ घालविण्यास सुरुवात केली. तिच्या पाच वर्षांच्या मुलाला पिशाच्चबाधा होती. तो वारंवार बेशुद्ध होत असे. तिच्या प्रार्थनेप्रमाणे एक यंत्र महाराजांनी भूर्जपत्रावर लिहून त्या मुलाच्या हातात बांधण्याकरिता म्हणून तिच्याजवळ दिले होते. ते बांधल्यामुळे त्या

मुलाची पीडा कमी झाली. पुढे एकदा ती बाई अस्पर्श झाली असता तिच्याजवळ जाण्याकरिता तो मुलगा हट्ट धरून बसला. शेवटी त्याच्या हातातील ते यंत्र काढून दुसरीकडे ठेवले. त्यावेळी होळीचा सण असल्यामुळे त्या मुलाला त्याच्या मामाने मुलांचे खेळ पाहण्याकरिता बाहेर नेले. जाताना रस्त्यांत मुसलमानांचे कबरस्थान होते. त्याच्याजवळ येण्याबरोबर त्या पिशाच्चाने मुलाची मान मुरगळल्यामुळे तो खाली पडला. थोड्याच वेळात त्याचे प्राणोत्क्रमण झाले. त्यावेळी त्या पिशाच्चाने बाईच्या शरीरात प्रवेश करून खुलासा केला की, 'माझा दीड रुपया देणे तू दिले नाहीस म्हणून मीच तुझा हा मुलगा मारला व तुझ्या नवऱ्यालाही मीच भ्रष्ट केले. तुझ्या मुलाला वेड लावून तुझा गर्भपातही मीच केला आहे.' हा केवढा भयंकर कर्मविपाक !

ब्रह्मवर्तास एका ब्राह्मणाने काही पुस्तके घेण्याकरिता काही पैसे ठेवले होते. तेथे कुलूप किल्ली काही नसल्यामुळे पैसे बाहेरच पडले होते. ते एका चांगल्या घराण्यांतील मुलाने चोरले. पुष्कळ शोध केला तरी पत्ता लागेना. शेवटी महाराजांनी चोरीचा तपास करण्याविषयी दत्तमहाराजांच्या गणास आज्ञा केली. लगेच एका गणाने त्या मुलाच्या शरीरात प्रवेश करून मी चोरी केली असे महाराजांचे समक्ष त्याचेच तोंडाने कबूल करण्यास लावले. नंतर त्या मुलाने पैसे परत आणून दिले. 'चांगल्या घराण्यांत जन्म घेऊन तू चोरीचे नीच कर्म करतोस हे चांगले नाही.' असे महाराजांनी त्या मुलाला सांगताच त्याने महाराजांची क्षमा मागून पुढे तो सद्वर्तनाने वागू लागला. कानपूर येथे एक गौड ब्राह्मण रहात होता. त्याची मुलगी दहा वर्षांची होती. लवकरच त्याने एक चांगलेसे स्थळ पाहून तिचे लग्न करणेचे ठरविले. हे मुलीला समजताच तिने बापाला विचारले असता तो मुलगा नोकरी करतो असे त्याने मुलीस सांगितले. ते ऐकून मुलीने 'अशा ब्राह्मणाबरोबर मला लग्न करावयाच नाही, तसेच व्यापार व शेती करणारा ब्राह्मण वरही मला पसंत नाही. जो केवळ भिक्षा मागून तपश्चर्या करणारा ब्राह्मण असेल त्याच्याबरोबर माझे लग्न करावे,' असे स्पष्ट बापास सांगितले. त्यावेळी बापाला काय करावे ते सुचेना, म्हणून महाराजांचेकडे

येऊन त्याने सर्व हकीकत सांगितली. ते ऐकून महाराज त्याला म्हणाले, 'ही तुझी मुलगी कोणीतरी योगभ्रष्ट आहे. तिच्या इच्छेविरुद्ध तू जाऊ नकोस. तिच्या श्रद्धेप्रमाणे तिला इष्ट तो वर अनायासाने मिळेल, तू निश्चिंत रहा.' अशी त्या ब्राह्मणाची समजूत करून महाराजांनी त्याला घरी पाठविले. पुढे थोड्याच दिवसात त्या ब्राह्मणाच्या घराजवळच असणाऱ्या धर्मशाळेत एक ब्रह्मचारी तपस्वी ब्राह्मण तीर्थयात्रा करीत करीत येऊन उतरला. त्या मुलीने त्या ब्रह्मचाऱ्याला पाहून त्याच्याबरोबर माझे लग्न करा असे आपल्या पित्याला सांगितले. नंतर तिच्या पित्याने त्या ब्रह्मचाऱ्यास घरी जेवणास बोलावून त्याच्याजवळ लग्नाची गोष्ट काढली, पण तो नाकबूल झाला. शेवटी महाराजांनी या लग्नाची मध्यस्थी केली. ते त्या ब्रह्मचाऱ्यास म्हणाले की, 'या मुलीने तुला मनाने वरले आहे. जर तू आता लग्न केले नाहीस तर तुला स्त्री हत्येचे पातक लागेल. तुमचे घटित गोत्र सर्व जमले आहे व ही तुला प्रपंचांत अनुरूप अशी वधू आहे. ही महाराजांची आज्ञा झाल्यावर प्रारब्धभोग मानून त्या ब्रह्मचाऱ्याने लग्नास शेवटी संमती दिली. पुढे उत्तम मुहूर्तावर त्यांचा विवाह झाल्यावर ती मुलगी आपल्या त्या पतीबरोबर तीर्थयात्रेस निघून गेली. प्रयाग क्षेत्रांत एक मोठी धर्मशास्त्र परिषद होणार होती. त्याकरिता हिंदुस्थानातील अनेक पंडित मंडळी येणार होती. मोठमोठ्या राजांनीही या परिषदेस सहाय्य केले होते. इंदूरच्या महाराजांच्यातर्फे प्रतिनिधी म्हणून पं. सखारामशास्त्री टिल्लू हे प्रयागला जाण्यास निघाले. वाटेत ते महाराजांचे दर्शनाकरिता उतरले. महाराजांना वंदन करून परिषदेची सर्व हकीकत सांगितली. तेव्हा त्यांना महाराज म्हणाले, 'शास्त्रीबुवा ! भगवंतापासून निश्वासवत् सर्वज्ञानाकर अपौरुषेय वेद आविर्भूत झाले व सर्व सृष्टीही ईश्वरानेच निर्माण केली. सर्व जगताचा व्यवहार चालविण्या-करिता मोठमोठ्या मंत्रद्रष्ट्याऋषींनी अनेक स्मृति पुराणे करून त्यांतून सर्व नियम सांगितले आहेत. त्यात केव्हाही बदल करता येणार नाही. आजपर्यंत होऊन गेलेल्या शंकराचार्यांच्या सारख्या महात्म्यांनीही त्यात बदल केला नाही. त्या नियमांचे संरक्षणाकरिताच वेळोवेळी भगवंताचे अवतार होतात. यात

सुधारणा कोणीही करू शकणार नाही. तसा प्रयत्न करणे अयोग्य आहे. आपण निर्माण केलेल्या सृष्टीची काळजी त्या ईश्वराला नाही आणि ती तुमच्यासारख्यांना मात्र आहे असे म्हणता येणार नाही.' इत्यादि गोष्टी महाराजांनी शास्त्रीबुवांना सांगितल्या. शास्त्रीबुवांनी त्या मुकाट्याने ऐकून घेतल्या. शेवटी ठरल्याप्रमाणे ते परिषदेस गेले. पण तेथे नुसता वादविवाद होऊन निर्णय काहीच झाला नाही. हे भाकित महाराजांनी आधीच केले होते.

ब्रह्मावर्तास एके दिवशी महाराजांचे समोर मंत्रशास्त्राचा विषय निघाला. त्यावेळी महाराजांनीं सांगितले, 'जारण मारण प्रयोग करून दुसऱ्याचा नाश करणे चांगले नाही. त्यामुळे अध:पात होतो.' मंडळी म्हणाली, 'तर मग असे अध:पात करणारे उपाय वेद, तंत्र, गोरक्ष, मच्छेंद्र यांनी का सांगितले ? हे उपाय लोकांच्या पुढेच नसते तर लोक कशाला प्रवृत्त झाले असते ?' हे मंडळीचे म्हणणे ऐकून महाराज म्हणाले, 'व्यापारी आपल्या दुकानांत चांगल्या वाईट सर्व वस्तू ठेवतो. तो साखरही ठेवील व विषारी पदार्थही ठेवील. घेणाराला तो व्यापारी अमुकच पदार्थ घेतला पाहिजे असा आग्रह मुळीच करीत नाही. घेणाऱ्याने आपण कोणता माल घेणे श्रेयस्कर होईल हे ठरविले पाहिजे. या उदाहरणाप्रमाणेच महापुरुषांनी अनेक प्रकारची साधने जरी दाखविलेली असली तरी जो आपल्या मनाचा संयम करून चांगली साधना करीत राहतो त्याचे कल्याण होते आणि जो पूर्वजन्मीच्या दुर्वासनांमुळे वाईट साधनेकडे वळतो त्याला अधोगती मिळते.' याप्रमाणे महाराजांनी सर्वांना समजावून सांगून सर्वांचे समाधान केले.

ब्रह्मावर्तास गंगातीरी महाराजांचा मुक्काम आहे. तसेच महाराजांनी आपल्या तीरावरही यावे असे नर्मदा नदीला वाटून तिने महाराजांना दृष्टांत देऊन आपली इच्छा कळविली. पण तिकडे महाराजांनी लक्ष दिले नाही. पुढे एकाएकी असा चमत्कार घडला की, एका ब्राह्मणाच्या अंगावर फोड झाले होते. त्या व्याधीने तो फार गांजला होता. त्याला कोणी सांगितले, तू महाराजांच्या पायांचे तीर्थ घेशील तर तुझा रोग बरा होईल.'

तो ब्राह्मण याची संधी पाहू लागला. एके दिवशी महाराज लिहिण्यास मांडी उपडी करून बसले होते. त्यावेळी त्यांचे पाय मागे होते. ब्राह्मणाने ती संधी साधून पाठीमागे जाऊन महाराजांच्या पायांवर पाणी घातले व एकदम त्यांना शिवून ते सर्व तीर्थजल गोळा करून पिऊन टाकले व अंगाला लावले. महाराजांनी एकदम मागे वळून पाहून असे करण्याचे कारण त्या ब्राह्मणाला विचारले. तेव्हा त्याने 'आपल्या असह्य व्याधींच्या परिहारार्थ एकाच्या सांगण्यावरून आपण असे केले आहे' असे सांगून अपराधाची क्षमा करण्याबद्दल महाराजांना विनंती केली. लगेच महाराज उठून गंगेवर जाऊन स्नान करून आले पण त्यांच्या चित्तास समाधान वाटेना. काहीतरी आपल्या शरीरास पीडा होणार असा महाराजांना भास झाला. त्यादिवशी रात्री स्वप्नांत एक चांडाळीण महाराजांना शिवली. त्यांनी लगेच उठून देवाचे ध्यान केले. सकाळी उठून पहातात तो सर्व अंगभर फोड उठले आहेत. ब्राह्मणाचे अंग बरे झाले पण तो रोग महाराजांचे शरीरावर पसरला. महाराजांनी त्यावेळी गंगेची स्तुती पाच श्लोकांनी केली. लोकांनी काही उपचार करतो असे सांगताच महाराजानी सांगितले की, 'हा दुसऱ्याचा प्रारब्ध भोग आहे, तो भोगूनच संपविला पाहिजे. याला औषधोपचारांचा उपयोग होणार नाही.' त्याच रात्री दृष्टांत झाला की, 'अनाधिकारी माणसाला पायांचे तीर्थ दिल्यामुळे हा त्रास भोगावा लागला. तथापि हे कृत्य बुद्धिपूर्वक घडलेले नाही. करिता तीन दिवस नर्मदेचे स्नान केल्यावर शरीर पूर्ववत् चांगले होईल.' याप्रमाणे दृष्टांत झाल्यावर गंगेची अनुज्ञा घेऊन महाराज नर्मदा किनारी येण्याकरिता ब्रह्मावर्ताहून निघाले. ते मार्गशीर्ष मासांत जालवण मुक्कामी आले. तेथे झालेल्या महिना दीड महिन्याच्या मुक्कामांत तेथील बऱ्याच मंडळींना अरणे शिकविली. तेथून निघून सारंगपूर, महत्पूर या गावावरून हरणगावी आले. तेथे असा चमत्कार दिसला की, तो सर्व गांव जळून गेला असून एकच घर तेवढे चांगले शिल्लक राहिले आहे. असे होण्याचे कारण महाराजांनी तेथील मंडळींना विचारले असता त्यांनी पुढीलप्रमाणे हकीकत सांगितली. 'गावात एकदा दुपारच्या वेळी एक साधुपुरुष आला

होता. त्याने सर्वांच्या घरी जाऊन अन्नयाचना केली. पण कोणीही त्याला भोजन दिले नाही. त्यावेळी तो साधू संतापून म्हणाला की, 'मी तीन दिवसांचा उपाशी असताही या गावात मला कोणी विचारले नाही. जळो हा गाव !' असे रागाने बोलून तो साधू निघून गेला. रस्त्यांत राहिलेल्या घरचा मालक परगांवाहून येत होता. त्याला साधू भेटले. त्याने त्यांची विचारपूस करतांच साधूने वरीलप्रमाणे उत्तर त्याला दिले. नंतर त्या माणसाने एका झाडाखाली साधुमहाराजांना बसवून मी अन्न घेऊन येतो असे सांगून गावी आला. तोच गावातील सर्व घरांना आग लागली असून आपले घर मात्र सुरक्षित असल्याचे त्याला दिसले. नंतर त्याने त्वरेने घरी जाऊन अन्न सर्व तयार करून त्या साधुमहाराजांना नेऊन वाढले. तेही जेवून तृप्त होऊन निघून गेले. ही हकीकत मंडळींनी सांगताच महाराजांनी सर्वांना सांगितले की, 'दुपारी आपल्या दारात कोणीही आला तरी त्याची जात वगैरे न पाहता त्याला शक्तीप्रमाणे अन्न द्यावे, हा गृहस्थांचा मुख्य धर्म आहे. असा महाराजांचा उपदेश ऐकून सर्व लोक त्याप्रमाणे वागू लागले. पुढे महाराज नर्मदातीरी नेमावर येथे येऊन पोचले व नर्मदामातेची नमस्कारपूर्वक प्रार्थना केली, 'माझ्या थोडच्या अपराधाबद्दल केवढी ही कडक शिक्षा केली ? माझ्याशिवाय तुझे महत्त्व वाढविणारा दुसरा कोणी नाही काय ?' अशी प्रार्थना करून तेथे मुक्काम केला. तीन दिवसांत नर्मदामातेच्या स्नानाने तो विस्फोटक रोग बरा होऊन महाराजांचे शरीर पूर्वीप्रमाणे उत्तम झाले. त्यावेळी नर्मदालहरी म्हणून नर्मदेची स्तुती केली. नंतर तेथून निघून ब्रह्माणी घाटावर महाराज आले. घाटावरून चालण्याचे वेळी पाय घसरून महाराजांचे कमरेत लचक भरली. त्यामुळे हालचाल अगदी बंद झाली व महाराज निजून राहिले. भिक्षेची वेळ झाली तरीसुद्धा उठता न आल्यामुळे तसेच पडून राहिले. हे पाहून नर्मदामाता कुमारिकेच्या रूपाने येऊन महाराजांना म्हणाली की, 'महाराज ! भिक्षेची वेळ झाली, उठा, मी तुमची लचक बरी करते.' इतके बोलून त्या मुलीने थोडेसे भस्म घेऊन व मंत्र म्हणून ते महाराजांच्या कमरेस चोळले व उभे राहून पाय खाली बडवा असे महाराजांना

सांगितले. त्याप्रमाणे महाराजांनी करताच खरोखरीच त्यांना उत्तम चालता येऊ लागले. महाराजांनी नर्मदामातेला ओळखून तिची स्तुती केली. नंतर नर्मदामाता गुप्त झाली. तो मंत्र महाराजांना येत होताच, पण नर्मदामातेचे वात्सल्य पाहून महाराजांना कौतुक वाटले. नंतर महाराज भिक्षेकरिता गावात गेले. त्यावेळी त्यांना तेथील हकीकत पुढे लिहिल्या-प्रमाणे समजल्यामुळे त्यांनी त्या गांवात भिक्षा केली नाही. ते कारण असे, 'पुण्यातील एक ब्राह्मण आपल्या लग्न झालेल्या मुलीस घेऊन या ब्रह्माणी गावांत आला. तो मोठा द्रव्यलोभी होता. त्याने आपली ती लग्न झालेली मुलगी तिचे लग्न झाले नाही असे सांगून तेथेच एका ब्राह्मणास दिली. तो ब्राह्मण कांही दिवसांनी वारला. त्याबरोबर त्या मुलीचे केशवपन करून टाकले. कांही दिवसांनी तिच्या पहिल्या नवऱ्यास ही हकीकत कळल्याबरोबर तो तिला घेऊन जाण्याकरितां पुण्याहून त्या गांवी आला. त्या गांवात गणूभय्या नांवाचा आडदांड मनुष्य होता. त्यांचे व त्या मुलीच्या दुसऱ्या नवऱ्याचे वैर असल्यामुळे त्याने तिचा पुण्याचा पहिला नवरा आलेला पाहून त्या मुलीस आपल्या ताब्यांत घेतले आणि तिला पुन: केस ठेवावयास लावून तिच्या पहिल्या नवऱ्याच्या ताब्यात देऊन टाकले.' ही त्या गावात घडलेली हकीकत महाराजांना समजताच त्यांनी त्या गावात भिक्षा न घेता त्या गावाबाहेर येऊन एका झाडाखाली स्वस्थ बसून राहिले. भर दुपारची वेळ. यावेळी जायचे तरी कोठे ! ऊन कमी झाल्यावर पुढे दुसऱ्या गावी जावे. आजचा दिवस उपवासच घडणार असा विचार करीत महाराज त्या झाडाखाली बसून राहिले असता, पूर्ववत् कुमारिकेच्या रूपाने नर्मदामाता तेथे आली व महाराजांना म्हणाली, 'आपण या ब्रह्माणी गावात भिक्षा न घेता येथे का बसून राहिला ?' त्यावेळी महाराज त्या मुलीला म्हणाले की, 'या गावातील लोक धर्मभ्रष्ट असल्याने अशा लोकांच्या घरचे अन्न घेण्यापेक्षा नर्मदेचे जलपान करून राहाणे काय वाईट ?' हे महाराजांचे भाषण ऐकून ती मुलगी म्हणाली, 'महाराज ! नेमावर नावाचे माझे गाव येथून जवळच आहे. तेथे आमचे घरी आपण भिक्षेस चलावे.' असे मुलीचे म्हणणे ऐकून महाराज तिला

म्हणाले, 'आपणास एकाच घरची भिक्षा चालत नाही.' ते ऐकून तिने तेथे सतरा घरे दक्षिणी ब्राह्मणांची असल्याचे सांगितले व ती मुलगी दिसेनाशी झाली. नंतर महाराजांनी नेमावरला जाऊन भिक्षा घेतली. तेथे चौकशी केली असता ब्राह्मणांची सतराच घरे असल्याचे समजले, ती मुलगी मात्र तेथे कोठेही दिसली नाही. नेमावरला महाराज लोकाग्रहास्तव काही दिवस राहिले. नेमावर हे नर्मदेचे नाभिस्थान असून तेथे सिद्धेश्वर म्हणून प्रसिद्ध देवस्थान आहे.

नेमावरला ब्राह्मण मंडळींना आचारधर्माचे शिक्षण देऊन महाराज उज्जेनीस आले. तेथे गणपतीबुवा म्हणून एक गणेशोपासक होते. त्यांनीच सत्यविनायकव्रत प्रकाशित केले आहे. त्यांना योगाची थोडीबहुत माहिती होती, पण आपणास योग पूर्णपणे अवगत असल्याचे ते भासवीत. त्यांना महाराजांचा अधिकार प्रथम माहीत नसल्यामुळे ते एकदा महाराजांना आपल्या घरी घेऊन गेले व आपल्या अभ्यासाच्या खोलीत नेऊन तेथे योगासंबंधी काही माहिती महाराजांचे पुढे सांगितली. महाराजांनी त्यांचे भाषण स्वस्थपणे ऐकून घेतले आणि एका धौतीचा कपडा गिळून थोड्या वेळाने तो बाहेर काढला. तो कपडा सबंध रक्ताने लाल झालेला दिसला. नंतर असे होण्याचे कारण महाराजांनी गणपतीबुवांना विचारले. तेव्हा मात्र बुवांची खात्री झाली की, महाराजांची योग्यता मोठी आहे. आपण व्यर्थ अहंकार दाखविला. याप्रमाणे वाटून त्यांनी महाराजांची क्षमा मागितली. नंतर महाराजांनी त्यांना सर्व समजावून सांगितले.

उज्जनीहून निघून फिरत फिरत परत नर्मदाकिनारी ओंकारेश्वर येथे महाराज आले. तेथे एक ज्योतिर्लिंग प्रसिद्ध आहे. तेथे धावरीकुंड म्हणून एक कुंड नर्मदेचे योनिस्थान आहे. त्या कुंडांत महाराज स्नानाकरिता उतरले आणि बुडी मारून वर येताना त्यांनी आपल्या ओंजळीतून नर्मदा बाण वर आणले. इतक्यात भिल्लवेषाने शंकर प्रकट होऊन महाराजांना म्हणाले की, 'तुम्हीच या बाणाची पूजा कराल ना ?' यावर महाराज म्हणाले, 'बेल, तुळशी संन्याशाला तोडता येत नसल्यामुळे या बाणांची पूजा आपणाकडून होणे अशक्य आहे. बरे दिसल्यामुळे हे बाण आपण

घेतले.' हे ऐकून भिल्लरूपी शंकरांनी सांगितले, 'तर मग हे बाण येथेच टाकून द्या, नेऊ नका.' असे सांगून ते भिल्ल दिसेनासे झाले. महाराजांनीही नर्मदेत ते बाण परत सोडून दिले. ओंकारेश्वरी महाराज ३३ दिवस राहिले. रोज पुराण चाले. त्यावेळी तेथील राजाचे कार्यवाह बळवंतराव यांना महाराजांनी सर्व नित्यब्रह्मकर्म शिकविले. तेथून मंडलेश्वर, महेश्वर इत्यादि गावावरून महाराज पेटलाद या गावी येऊन पोचले.

चातुर्मास ७ पेटलाद – शके १८१९

इंदूर संस्थानांतील एक मोठे गाव पेटलाद हे महीनदीचे तीरावर आहे. येथे ब्राह्मणवस्ती चांगली आहे. या गावी महाराजांनी शके १८१९ साली चातुर्मास केला. तेथेच आषाढ शुद्ध पक्षात दत्तलीला-मृतसिंधु हा प्राकृत एक सहस्र ओव्यांचा ग्रंथ महाराजांनी रचला. चातुर्मास संपल्यावर पेटलादहून निघून महाराज चिखलदा या गावी आले. येथे व्यंकटराव नावाचा गृहस्थ पत्नी मृत झाल्यावर नोकरी सोडून देऊन नदीतीरावरील एका मंदिरांत राहात असे. महाराज चिखलद्यास आल्यानंतर आपणास योगाभ्यास सांगण्याविषयी त्याने महाराजांना विनंती केली. त्याप्रमाणे त्याला षट्क्रिया व प्राणायाम याचे शिक्षण महाराजांचेपासून मिळाले. तेथे नानासाहेब, गंगाधरराव, बाळा वैद्य इत्यादी मंडळींची श्रद्धा पाहून महाराजांनी त्यांना उपनिषद्भाष्याचा पाठ सांगितला. नित्य पुराणही चालू होते. तेथेच महाराजांची दिवाळी झाली. नरकचतुर्दशीच्या आदले दिवशी महाराजांना दत्तमहाराजांचा दृष्टान्त झाला की, 'उद्या दिवाळी असल्यामुळे आपणास अभ्यंगस्नान घालावे.' महाराजांनी त्याचवेळी देवाला सांगितले की, 'आपण संन्यासी असल्याने अग्नीला शिवता येत नाही, तरी ऊन पाणी कोठून आणता येईल ? सुगंधी तेलही आपणाकडे नाही, तरी अभ्यंगस्नानाची सोय आपणाकडून होणार नाही. रोजच्या-प्रमाणे साध्या गार पाण्याने स्नान घालता येईल आणि निघताना आपण रोज थंड पाण्याने स्नान घालून भस्म लावले म्हणजे झाले, जास्ती

उपचारांची आवश्यकता नाही असे आपण सांगितले होते.' याप्रमाणे महाराजांनी दत्तमहाराजांना जबाब दिला. दुसरे दिवशी महाराज स्नान करून आले आणि रोजच्याप्रमाणे स्नान घालून व भस्म लावून मूर्ति ठेवून दिली. मंगलस्नान न घातल्यामुळे मूर्तिला राग येऊन ती नर्मदेच्या पाण्यात जाऊन बसली. ही गोष्ट महाराजांना काहीच माहीत नव्हती. रोजच्याप्रमाणे दुपारी भिक्षा मागून आल्यावर हस्तपादप्रक्षालन व आचमन करून नैवेद्य दाखविण्याकरिता मूर्तीजवळ महाराज गेले मात्र, एकदम मोठा तोफेसारखा आवाज होऊन दत्तमहाराजांनी बोलण्यास आरंभ केला की, 'आज दिवाळी असून मला मंगलस्नान घातल्यावाचून नैवेद्य दाखवितोस काय ? मी इकडे नर्मदेत बसलो आहे. मला नैवेद्य नको काही नको.' ही प्रभूची रागाची वाणी ऐकून महाराज घाबरून नर्मदेच्या तीरावर आले. इतक्यात लहान मुलाच्या रडण्याचा आवाज पाण्यातून ऐकू आला. त्या आवाजाच्या अनुरोधाने महाराज पाण्यात शिरले. इतक्यांत पाण्यात उत्तम प्रकाश पडला. त्याबरोबर महाराजांनी एकदम पाण्यात बुडी मारून ती मूर्ति प्रेमाने घेतली आणि वर आले. भिक्षेच्या वेळी महाराजांना नदीवर जाण्याचे कारण काय ते काहीच न समजल्यामुळे नानासाहेब वगैरे सर्व मंडळी तेथे जमली होती. महाराज मूर्ति घेऊन वर आले तेव्हा श्रीदत्तप्रभूंची इच्छा सर्व मंडळीना समजली. लगेच ऊन पाणी, सुगंधी तेल, पंचामृत आणले व महाराजांनी अत्यंत प्रेमार्द्र चित्ताने दत्तमूर्तीची महापूजा केली. आरती, मंत्रपुष्प झाल्यावर महाराजांनी एका अभंगांत या प्रभूच्या लीलेचे वर्णन केले आहे ते असे - 'मित्र मित्र जरि भांडती। तरि पुनः एक होती॥ दंपतीचा हो कलह। लवमात्र न तुटे स्नेह॥२॥ देवभक्तांचे भांडणे। पराभक्तीचं ते ठाणे॥३॥ वासू म्हणे हा विनोद। देतो दत्ता परानंद॥४॥' ज्ञानोत्तर भक्तीचे हे दिव्य दर्शन झाल्याने सर्व लोक विस्मयचकित झाले.

चिखलदा येथील व्यंकटराव, नानासाहेब, गंगाधरपंत, बाळा वैद्य इत्यादी मंडळीना त्यांच्या प्रार्थनेवरून महाराजांनी योगाचे काही शिक्षण दिले आणि मुख्य उपदेश हाच केला की, 'सगुण परमेश्वराची उपासना

करून मनुष्याने कृतार्थ व्हावे. सगुण उपासना केल्यावाचून ब्रह्मसाक्षात्कार होणार नाही. राजाला जसा आपल्या शिक्कामोर्तबाचा आणि कायद्याचा अभिमान असतो, तसाच देवाला आपल्या सगुणरूपाचा व वेदशास्त्राचा अभिमान आहे. शिक्कामोर्तब म्हणजे राजा नाही हे खरे, पण शिक्का-मोर्तबाशिवाय राजाचा व्यवहार होऊ शकत नाही आणि राजाशिवाय नुसत्या शिक्कामोर्तबालाही महत्त्व नाही. प्रजाजनांनी राजाचे कायदे पाळले म्हणजे राजाला जसा संतोष होतो, तसाच संतोष शास्त्रनियम पाळल्याने ईश्वराला होतो. करिता शास्त्रज्ञेप्रमाणे वागून ईश्वराची सेवा करा व आपले कल्याण करून घ्या.' याप्रमाणे सर्वांना उपदेश करून महाराज चिखलदा सोडून निघाले. ते शके १८२० मध्ये वैशाख शु.॥ १० या दिवशी नर्मदातीरावरील तिलकवाडा या गावी येऊन पोचले. त्यावेळी ठिकठिकाणी प्लेगचा त्रास विशेष असल्याने पुढे जाण्यास सरकारी प्रतिबंध होता. त्यामुळे तिलकवाड्यासच मुक्काम करण्याचे महाराजांनी ठरविले.

चातुर्मास ८ तिलकवाडा – शके १८२०

तिलकवाडा येथे मारुतीच्या मंदिरांत महाराजांचा चातुर्मास झाला. हे गाव बडोदा संस्थानांतील एक महाल आहे. नोकरीनिमित्ताने आलेले ७-८ दक्षिणी ब्राह्मण व इतर गुजराथी ब्राह्मण वगैरे मंडळींची वस्ती येथे बरी आहे. येथील मंडळी भाविक असल्याने सर्व लोक नित्य महाराजांचे दर्शनास येत असत. पिशाच्च, संततिप्रतिबंध इत्यादिकांवर महाराजांनी उपाय सांगावेत आणि श्रद्धा ठेवून लोकांनी ते उपाय करून सुखी व्हावे असा क्रम सुरू होता. त्याच गांवातील मणिशंकर नाव असणारा एक गुजराथी ब्राह्मण एके दिवशी महाराजांचेकडे आला व त्याने आपली पत्रिका दाखवून आपणास संतति न होण्याचे कारण महाराजांना विचारले. पत्रिका पाहून त्याला महाराजांनी सांगितले की, 'तुम्ही पूर्वजन्मांत सर्प मारला असल्यामुळे तुमच्या संततीला प्रतिबंध होतो. तो दोष दूर होण्याकरिता तुम्ही नागपंचमीव्रत करून नागबळी करा म्हणजे तुम्हाला

संतती होईल.' ही महाराजांची आज्ञा शिरसामान्य मानून त्या ब्राह्मणाने ते सर्व यथाविधी केले. त्यामुळे त्याला थोडक्याच काळात मुलगा झाला. तिलकवाड्यास रोज नर्मदाखंडाचे आख्यान चालू होते. तेथेच कूर्मपुराण आंध्रलिपीतील पोथीवरून देवनागरीत लिहून काढले. तिलकवाड्यास गोविंद आत्माराम करंजगांवकर या गृहस्थांचे बंधू व मातोश्री रहात असून गोविंदराव बडोद्यास रहात होते. काही उद्योग नसल्यामुळे गोविंदराव रिकामेच होते. त्यांना काहीतरी उद्योग लागावा म्हणून त्यांच्या मातोश्रीने महाराजांना काहीतरी उपाय गोविंदरावाकरता सांगावा अशी विनंती केली. पण आपणास काही यासंबंधी समजत नाही असे महाराजांनी प्रथम सांगितले. शेवटी त्या बाईंचा फारच आग्रह पाहून, 'तुमच्या मुलाला इकडे बोलावून घ्या म्हणजे मग पाहता येईल,' असे महाराजांनी सांगितले. त्याप्रमाणे बडोद्याहून गोविंदरावांना त्यांच्या मातोश्रीने बोलावून आणले. महाराजांची ती दिव्य मूर्ति पाहून गोविंदरावांचे मनात पूर्ण श्रद्धा उत्पन्न होऊन त्यांनी अनन्यभावाने महाराजांना वंदन करून ते निश्चिंत झाले. दुसरे दिवशी नदीवर स्नान करून ओल्याने येण्याबद्दल गोविंदरावांना महाराजांची आज्ञा झाली. त्याप्रमाणे ते स्नान करून आल्यावर महाराजांनी त्यांना एक मंत्र लिहून देऊन त्याचा जप करण्यास सांगितले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे अत्यंत श्रद्धेने गोविदरावांनी जप केला. त्याचे फळ म्हणून लगेच ८-१५ दिवसांतच त्यांना उत्तम नोकरीचा योग आला. वयाचे ५६ वर्षांपर्यंत त्यांनी नोकरी केली व पुढे स्वेच्छेने नोकरी सोडून पेन्शन घेतले. मध्यंतरी ते गरूडेश्वरी महाराजांचे दर्शनार्थ आल्यावेळी स्मार्ताग्नि ठेवण्याबद्दल महाराजांची त्यांना आज्ञा झाली होती. त्याप्रमाणे पत्नी होती तोपर्यंत त्यांनी अग्निसेवा केली. 'स्वधर्मा-प्रमाणे वागावे म्हणजे परमेश्वर कल्याण करील' असे त्यांना महाराजांचे नित्य सांगणे असे.

गणेश अनगरे या नावाचे गृहस्थ सरकारी नोकर होते. यांचे कुटुंब नर्मदाबाई यांना बरेच दिवस संतती नव्हती. यांचे माहेर तिलकवाड्यास होते. नर्मदाबाईंच्या मातोश्री वारूबाई करंजगांवकर यांचा एक नियम होता

की, नर्मदा प्रदक्षिणा करणारे जे कोणी तेथे येतील त्यांना विचारून ज्याला जे आवश्यक असेल ते भांडी, अन्न, वस्त्र इत्यादि देऊन त्याला सहाय्य करावयाचे. कोणी संन्यासी आल्यास त्यांना भिक्षेस बोलवावयाचे. असा नियम त्या बाईंचा बरेच दिवस चालू होता. महाराज तिलकवाड्यास आल्यावर तेथे दक्षिणी ब्राह्मणांची फारशी घरे नसल्यामुळे त्या बाईंच्या प्रेमाग्रहावरून त्यांचे घरी केव्हा केव्हा जात असत. एक दिवस असेच महाराज भिक्षेस आले असता किंचित् रागावून वारूबाई महाराजांना म्हणाल्या की, 'महाराज ! आपल्यासारख्या साधूंची सेवा करून आम्हाला काय फळ मिळाले ? मुलीला (नर्मदाबाईला) अद्यापि मूलबाळ झाले नाही.' ते तिचे म्हणणे ऐकून महाराज म्हणाले की, 'तुमच्या मुलीला मुलगा होईल. काळजी करू नका. पण पाचव्या महिन्यांत शूलपाणीश्वराच्या देवळात त्याची गव्हाच्या कोंड्याची तुळा करून मग त्याला घ्यावे म्हणजे सर्व कल्याण होईल. त्याचे नाव वासुदेव असे ठेवावे.' याप्रमाणे महाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे लवकरच नर्मदाबाईस मुलगा झाला. त्या मुलाच्या मुंजीस महाराजांनीच मुहूर्त काढून दिला होता. मुंज झाल्यावर त्याला महाराजांनी विद्याप्रद मंत्र देऊन त्याचा जप रोज करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तो पुढे मोठा होऊन त्याला काठेवाडमध्ये चूडानरेशांचेकडे गायन वादन मास्तराची नोकरी लागली. याच वासुदेव अनगरे याची वेणूबाई नांवाची बालविधवा मावशी योगाभ्यास करीत असे. समाधीपर्यंत या बाईंचा अभ्यास झालेला होता. तिलकवाड्याहून ओल्याने एक दिवसाआड महाराजांच्याकरिता ताकाचे मडके डोक्यावर घेऊन वेणूबाईने गरूडेश्वरी जावे असा तिचा नियम असे.

एकदा गुरुवारी एकादशी होती. त्यादिवशी महाराजांचे दर्शनास गरूडेश्वरी जावे असे ठरवून वासुदेव, त्याची आई नर्मदाबाई व तेथील फौजदार हर्डीकर यांची पत्नी व मुले इतकी मंडळी दुपारी गरूडेश्वरी जाण्याकरिता निघाली. गरूडेश्वरी वारंवार येत जाऊ नये असे नर्मदाबाईस महाराजांनी बजावून सांगितले असताही विशेष दर्शनाच्या ओढीमुळे त्यादिवशी ती महाराजांची आज्ञा मोडून निघाली. वाटेतच संध्याकाळ

झाली. अंधार पडून शेवटी रस्ता चुकला व मंडळी भलत्याच रस्त्याला लागली. पुढे एका ठिकाणी कडा तुटलेला असून रस्ता बंद झाला. सर्व मंडळी घाबरली. मुले तर घाबरून रडू लागली. रस्त्यातच सर्व मंडळीनी बसून महाराजांची प्रार्थना सुरू केली. तेव्हा एकदम थोड्या अंतरावर एका बाजूस श्रीगुरुदेवदत्त असा महाराजांचेसारखा आवाज झालेला सर्वांनी ऐकला. त्याबरोबर ती मंडळी उठली व त्या आवाजाच्या अनुरोधाने त्या दिशेला निघाली. थोडेसे पुढे गेल्यावर पुन: तसाच आवाज ऐकू आला. याप्रमाणे तो शब्द ऐकत ऐकत त्याचे मागोमाग ती मंडळी शेवटी गरूडेश्वरी सुरक्षित येऊन पोचली. त्यावेळी तेथे भजन चालले होते. भजन संपल्यावर ही तिलकवाड्याची मंडळी महाराजांचे दर्शनास गेली. महाराजांनी लगेच रागावून सांगितले, आज एक वेळ तुम्हाला श्रीदत्तमहाराजांनी रस्ता दाखविला. यापुढे तुम्ही चुकल्यास आपण जबाबदार नाही. हे महाराजांचे रागाचे भाषण ऐकूनही दर्शन घडल्याने सर्वांना पूर्ण समाधान वाटले.

प्रो. गायनाचार्य वासुदेव गणेश अनगरे यांनी पाठविलेल्या आठवणी : जन्म अहमदाबाद मुक्कामी, अनगरे कुटुंबात सन २१-१२-१९०७ रोजी सायंकाळी दिवे लागता मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचे दिवशी सौ. नर्मदाबाई गणेश अनगरे यांचे पोटी झाला. सौ. नर्मदाबाईस (सरस्वतीस) बरेच वर्ष संतती नसल्याने त्यांच्या मातोश्री गं. भा. वारूबाई आत्माराम करंजगांवकर यांस वारंवार खेद होई की, आपली मुलगी सौ. नर्मदा आज २६-२७ वर्षांची झाली. पण अद्याप संतती नाही. पण परमेश्वरी इच्छा काही निराळीच असल्याने व त्या नर्मदा प्रदक्षिणेस जाणाऱ्या साधुसंतांची सेवा तन मन धनाने करीत होत्या. त्यामुळे त्यांची सेवा फळा आली व एके दिवशी श्री. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीची (श्री. टेंबेस्वामी) भेट झाली. त्यावेळी फक्त तीनच दिवस भिक्षेसाठी श्री स्वामीमहाराज आजोळी येत असून माझ्या आजीचा (गं.भा.वारुबाई) परिचय झाला व त्यावेळी मातोश्रींना दर्शनाचा लाभ घडला. सहज गुरुवर्यांनी चौकशी केली होती की, मुली तुझे सासर वगैरे कुठे आहे ? त्यावर मातोश्रींनी सर्व सांगितले होते. पुन्हा काही वर्षानंतर गुरुवर्य

श्री प. प. वासुदेवानंदांची स्वारी चातुर्मासासाठी माझ्या आजोळी (नर्मदाकाठी असलेले तिलकवाडा) नर्मदा तटावर मुक्कामासाठी आली. त्यावेळी पुन्हा त्यांचा परिचय माझ्या आजीशी अतिशय घरोब्याचा झाला. वारंवार माझ्या मातोश्री पण दर्शनास जाऊ लागल्या. पण गुरुवर्यांचा मुक्काम हलण्याच्या वेळी दोनतीन दिवस माझ्या मातोश्री काही अडचणींमुळे गुरुवर्यांचे दर्शनास जाऊ शकल्या नाही. त्यामुळे सहजच लीलेने माझ्या आजीस गुरुवर्यांनी प्रश्न केला. कायहो वारुबाई सौ. नर्मदा काय रागावली की काय, आज तीन दिवसात तिचे काही दर्शनच नाही. आम्ही काय तिचे वाकडे केले आहे. आजीचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असल्याने व गुरुवर्यांवर अत्यंत विश्वास व प्रेम असल्याने एकदम रागावल्या व म्हणाल्या, आपण तिला मुलगी म्हणता तर तिला अद्याप काहीच संतती नाही हे आपणास कसे बरे वाटते ? त्यावर गुरुवर्य हसून म्हणाले, 'अहो वारुबाई, माझेजवळ काय मुलांची झाडे थोडीच आहेत, की एखादे फळ तोडून द्यावे, असो. तिला उद्या घेऊन या. पाहू श्रीदत्तभगवान काय करतात ते. दोन तीन दिवसानंतर माझ्या मातोश्री नेहमीप्रमाणे त्यांच्या दर्शनास गेल्या असता श्रीगुरु हसत हसत म्हणाले काय नर्मदा काय रागावली होतीस काय ? त्यावर मातोश्रीने उत्तर दिले की, महाराज आपणावर काय म्हणून रागावू. मला अडचण आल्यामुळेच चार दिवस येऊ शकले नव्हते. इतक्यात आजी आल्या व म्हणाल्या काय हो महाराज माझी बोलणी लक्षात आहेत ना. त्यावर बराच वेळ गुरुवर्य शांत बसले व म्हणाले, मुली तुला एकच मुलगा होईल पण ७ वर्षे तो तुझ्याजवळ ठेव समजून सांभाळ, मग पुढे जशी दत्तभगवानांची इच्छा असेल तसे होईल. नंतर काही दिवसांनी गुरुवर्य चातुर्मास समाप्तीनंतर पुढे गेले व नंतर माझा जन्म झाला तो त्यांच्याच आशीर्वादाने दि. २१-१२-१९०७ रोजी मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचे दिवशी झाला. संतांचे आशीर्वादाने लहानपणापासूनच संतांच्या भेटी घ्याव्या व परमेश्वराकडे लक्ष लावून काहीतरी जन्माचे सार्थक करून घेण्याची इच्छा बलवत्तर होती.

सन १९१३ ते १९१४ श्रीगुरुवर्यांचे प्रत्यक्ष दर्शन, मंत्रदीक्षा व मुंज

वयाचे सातवे वर्षी, पुन्हा गुरुवर्यांचा कायमचा मुक्काम श्रीक्षेत्र गरूडेश्वरी आला. माझ्या वयाच्या चौथ्या वर्षानंतर माझ्या आजी परलोकवासी झाल्या. पण माझ्या मावशी गं. भा. वेणूबाई या तिलकवाड्यासच होत्या. त्यांना गुरुवर्यांचा सुगावा लागताच मुंबईस माझ्या मातोश्रीस कळविले की, मुलाला घेऊन ताबडतोब निघून या. कारण गुरुवर्य टेंबेस्वामींचे कायमचे वास्तव्य आता श्रीक्षेत्र गरूडेश्वर जे तिलकवाड्याहून तीन कोसांवर आहे तेथे झाले असून तुझ्या मुलाला पाहावे असे म्हणत आहेत तरी यावे. पत्र पाहताच मातोश्री मला गुरुवर्यांचे चरणाचे दर्शन घेण्यास घेऊन आल्या. तिला पाहताच महाराज म्हणाले की, नर्मदा, आता तर तुझ्या म्हातारीला नातू झाला हे पाहून आनंद झाला होता ना ? जे भगवंताचे मनात असते तसेच घडत असते. असो, मुलाचे नाव काय ठेवले आहेस ? तिने सांगितले की, आपण मला ठेव ठेवण्यास दिली होती. मी अद्याप नाव बीव काहीच ठेवले नाही. मी गुरुवर्यांचे समोर बसलो होतो. त्यांनी ताबडतोब मातोश्रीस व मावशीस सांगितले की, याच्या वजनाचा रवा आणा व याला तराजूत बसवून वजन करा. मग त्याचे नाव ठेवू. तसे केल्यावर मातोश्रीस म्हणाले, हा तुझा वासुदेव घे व वसंतपंचमीस याची मुंज लाव. मग माझ्याकडे आण, असे म्हणून मला आईचे पदरात घातले. गुरुवर्यांचे आज्ञेप्रमाणे ताबडतोब मुंज करून गुरुवर्यांचे दर्शनास घेऊन आली. त्यावेळी गुरुवर्य म्हणाले, काय रे ब्राह्मण झालास ना, गायत्री करीत जा. कधी त्रास होणार नाही. झाला तरी तोच सहनशक्ती देईल. मी तुला एक मंत्र देतो. तो बिनचूक रोज १० वेळा तरी करीत जा. असे म्हणून त्यांचे मांडीवर बसवून मला सरस्वतीचा मंत्र दिला व त्याचे जोरावर आजपर्यंत मला त्यांचेच आशीर्वादाने यश मिळत आहे. मी रोज एक माळ करीत असतो व संगीतासारखी दैवी विद्या त्याच मंत्राचे जोरावर प्राप्त करू शकलो.

प.पू. श्री. टेंबेस्वामीचा प्रथम अनुभव : आत्महत्या करणाऱ्या इसमास महाराजांनी वाचविले. ही हकीकत त्यांच्या प्रत्यक्ष तोंडून ऐकलेली आहे. ती लिहून धाडीत आहे. माझे वडील ठाणा मुक्कामी

मोतीलाल शेठच्या चाळीत राहात असत (१९१३). त्यावेळी समोरच्या बंगल्यांत प्राणशंकर दवे नावाचे एक इंग्लिश फर्मचे मॅनेजर राहात असत. ब्राह्मण अतिशय कर्मनिष्ठ होता. पगार पण चांगला होता. त्यांचा व माझ्या वडीलांचा परिचय झाला. त्यांच्यावर (प्राणशंकरवर) एक बिकट प्रसंग आला. ज्याच्या कारणान त्यांची वृत्ती आत्महत्येकडे वळली व त्यातून महाराजांनी त्यांना कसे वाचविले हे त्यांच्याच (प्राणशंकरच्याच) तोंडून ऐकले आहे ते पुढीलप्रमाणे आहे. प्राणशंकर ज्या फर्ममध्ये काम करीत होते त्यांतच त्यांच्या हाताखाली एक दूरचे नातलग व खास मित्रही काम करीत होते. दोघांचा एकमेकांवर अतिशय विश्वास होता. तेव्हा एकदा काही कारणास्तव प्राणशंकर चार एक महिन्याच्या रजेवर गेले. तेव्हा रजेवर जाताना मित्राच्या सांगण्यावरून व मित्रावर अतिविश्वासामुळे त्यांनी काही कोऱ्या कागदांवर सह्या करून दिल्या. आता म्हणतात ना 'विनाशकाले विपरीत बुद्धी' होते. तशीच काही गत प्राणशंकरच्या मित्राची झाली व त्याची बुद्धी बिघडली. त्याची वृत्ती प्राणशंकरशी कपट करून लाखो रूपये कमविण्याकडे वाढू लागली व स्वत:च्या स्वार्थ-सिद्धीसाठी त्याने प्राणशंकरचा विश्वासघात केला. प्राणशंकरने मित्रावर अपूर्व विश्वास ठेवून ज्या कोऱ्या कागदांवर सह्या करून दिल्या होत्या त्या कागदांचा उपयोग त्याच्या मित्राने लाखो रुपयांच्या उलाढाली करण्यासाठी केला व लाखो रुपयांचे खोटे नाटे हिशेब करून ठेवले. आता रजेची मुदत संपताच प्राणशंकर आपल्या कामावर हजर झाले. त्यावेळी आपले केलेले करारनामे व कारस्थाने उघडकीस येऊ नये व आपण दोषी ठरून पकडले जाऊ नये म्हणून प्राणशंकराचा मित्र इरादापूर्वक दोन-चार महिन्यांच्या रजेवर गेला. ह्यानंतर नियमानुसार फर्ममध्ये ऑडिट सुरू झाले. त्यावेळी फर्मच्या हिशेबात लाखो रुपयांचे घोटाळे आढळून आले व त्यात प्राणशंकर निर्दोष असतांनाही दोषी ठरून गेले. कारण कागदांवर सह्या त्यांच्या होत्या. त्यांचे ऑफिसर त्यांच्याकडचे होते व ते समजत होते की, 'प्राणशंकर निर्दोष आहे'. पण प्राणशंकरच्या सह्यांनी सर्वांचा घात केला होता. त्या त्याला दोषी ठरवीत होत्या. त्यांच्या साहेबांचा

नाइलाज झाला होता. सत्य हकीकत माहीत नसतांना पण ते प्राणशंकरसाठी काही करू शकत नव्हते. पैशाच्या घोटाळ्यांत सहीशिक्क्याचे सुद्धा पुरावे मिळाल्यामुळे सकारने प्राणशंकरला पकडण्याचा निश्चय केला. ही सर्व परिस्थिती प्राणशंकरला समजून चुकली होती व आपण निर्दोष असूनही पकडले जाऊन जास्त बेअब्रू न व्हावी म्हणून त्यांनी घरत्याग करण्याचा निश्चय केला व रातोरात स्वपत्नीस व ऑफिसरला एक चिठ्ठी लिहून ठेवली, 'मी निर्दोष आहे. ह्या सर्व कार्यात माझा हात मुळीच नाही. पण मित्रावरचा अतिविश्वास आज माझा घातक बनला आहे. त्या कारणाने सर्वांचा नाइलाज झाला. माझ्या सह्या मला दोषी ठरविण्यास पर्याप्त आहेत. आता जास्त अब्रूचे पाणी होऊ नये म्हणून मी घर सोडून जात आहे. माझा कोणीही तपास करू नये.' अशा चिठ्ठ्या ठेवून ते घर सोडून निघून गेले. मध्यप्रांताकडे जाऊन वेष पालट करून राहिले. प्राणशंकरच्या गृहत्यागामुळे ऑडिटच्या माणसांना त्यांचा जास्त अविश्वास उत्पन्न झाला व पलायनाची वृत्ती त्यांना जास्त दोषी ठरवू लागली. त्या कारणाने फर्ममधून सर्व स्थळी शोध सुरू झाला, पण कुठेही त्यांचा पत्ता लागला नाही. होता होता मध्य प्रदेशचे पोलीस त्यांच्या शोधास लागले. ही बातमी त्यांनी वर्तमानपत्रांतून वाचली. त्यांच्या शोधाच्या प्रयत्नांची बातमी ते रोज वर्तमानपत्रांतून वाचीत होते. पण जेव्हा मध्यप्रदेशच्या पोलीसच्या हातात त्यांच्या शोधाचे कार्य आले तेव्हा ते घाबरले व पकडले न जावे म्हणून त्यांनी आत्महत्या करण्याचे ठरविले. मरण्याचा निश्चय करून एका डोहाजवळ आले व मरण्यापूर्वी एक पत्र सविस्तर लिहून ठेवले. ज्यात त्यांनी स्वत:ला निर्दोष ठरविले होते व पत्नी, पुत्र, पत्ता व जातीसंबंधी लिहून ठेविले. (हे स्थळ मध्यप्रदेशात ओंकारेश्वर जवळच्या ज्योतिर्लिंग जवळचे आहे. ह्यावेळी महाराज ओंकारेश्वर मुक्कामी होते.) चिठ्ठी व कपडे बाजूस ठेवून पोटास दगड बांधून डोहाजवळ आले व पाण्यात उडी मारणार तोच कोणी एका संन्यासी बाबांनी येऊन त्यांना मागे ओढले व संन्यासी बाबा म्हणाले, 'मूर्खा निर्दोष असूनही आत्महत्या करतोस ! खरा गुन्हेगार तर पकडला

गेला आहे व तो त्याच्या कर्माची फळे भोगून राहिला आहे. तुझ्या फर्मची माणसे तुझा शोध करीत आहेत. जा येथून मोरटक्का स्टेशनवर जा. तेथे तुला तुझे ऑफिसर व गुन्हेगार वगरे सर्व मंडळी भेटतील. परत जा. तू निर्दोष ठरला आहेस. म्हणून सर्वजण तुझा पत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर त्यांना भेटून सर्वांच्या मनाचे समाधान कर.' असे सांगून संन्यासी बाबा दिसेनासे झाले. बिचारे प्राणशंकर गेले तर होते आत्महत्या करण्यास पण दैवगती कांही निराळीच होती. अशारितीने बेअब्रू होऊन आत्मघाताचा अपमृत्यू त्यांच्या दैवास मान्य नव्हता. म्हणून ह्या संन्यासीबाबांनी त्यांना मृत्यूच्या प्रत्यक्ष मुखातून परत खेचून घेतले व मोरटक्का स्टेशनवर धाडले. संन्यासीबाबांच्या वचनावर विश्वास ठेवून बैरागी अवस्थेस प्राप्त झालेले प्राणशंकर मोरटक्का स्टेशनवर आले व गाडी आल्यावर सर्व ठिकाणी घिरट्या घालू लागले. तेव्हा शेवटच्या डब्यात त्यांच्या आरोपी मित्रास सहा पोलीसांच्या ताब्यात बंदी अवस्थेत पाहिले तेव्हा त्यांचा संन्यासीबाबांच्या वचनावर दृढ विश्वास बसला व ते आता निर्धास्तपणे फर्स्टक्लासच्या डब्याकडे फिरू लागले. त्यावेळी त्यांच्या ऑफिसरचे लक्ष त्यांच्याकडे गेले. परंतु ह्यांची वेषभूषा व बदललेला अवतार पाहून हे प्राणशंकरच आहेत असा विश्वास त्यांना बसेना. पण त्यांच्या चालीवरून ऑफिसरने त्यांना ओळखले व गाडीतून उतरून त्यांना मिठी मारली व निर्दोष असतानाही गृहत्याग केल्याबद्दल बराच ठपका दिला व त्यांच्या नजरेसमोरच त्यांच्या मित्रास सजा केली. 'करावे तसे भरावे' ह्या नियमानुसार बिचारा मित्र सजा पावला व ऑफिसरने पुढे जाता प्राणशंकरांना फर्मचे भागीदार बनविले. आता प्राणशंकरना मृत्यूच्या मुखांतून परत आणणारे संन्यासीबाबा कोण होते हे त्यांना सुद्धा माहीत नव्हते. पण एकदा प्राणशंकर असेच आमचे घरी सहज आले होते. त्यावेळी त्यांनी आमच्या घरात प. पू. श्री. टेंबेस्वामींचा फोटो पाहिला. फोटो पाहिल्याबरोबर आमच्या आईस त्यांनी विचारले व सांगितले की, 'हे संन्यासीबाबा कोण आहेत ? कुठे असतात ? ह्यांनीच मला ओंकारेश्वरी एका डोहात मी आत्मघातासाठी जात असताना

वाचविले आहे व त्यांच्याच सांगण्यावरून मी मोरटक्का स्टेशनवर आलो व माझ्या ऑफिसर लोकांना भेटलो होतो. ह्यांचे दर्शन घेतल्याखेरीज मी आता अन्नपाणी घेणार नाही. जे घेईन ते त्यांच्या मुक्कामी घेईन.' त्यांचा निर्णय ऐकून आमच्या आईने त्यांना समजावून सांगितले 'हे आमचे गुरु आहेत व प. पू. श्री. टेंबेस्वामी गरूडेश्वर मुक्कामी असतात. येथून बरेच लांब आहे. म्हणून अन्नपाणी न घेण्याचा विचार करू नका. पण त्यांनी काही ऐकले नाही. तत्क्षणी आमच्या आईबरोबर ते श्री क्षेत्र गरूडेश्वरी आले. तेव्हा महाराजांनी आमच्या आईस विचारले 'काय ग नर्मदे ! कोणाला बरोबर घेऊन आली आहेस ? त्या आत्महत्याऱ्याला ना ! कुठे आहे तो बोलव.' आत्महत्यारा प्राणशंकराला आमची आई महाराजांकडे घेऊन गेली. महाराजांनी त्यांना थोडा ठपका दिला व मग आशीर्वाद देऊन निरोप दिला. आत्महत्येच्या प्रसंगानंतर काही वर्षानंतर प्राणशंकर ह्यानी महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन घेतले व त्यांचे कृपापात्र बनले. हे प्राणशंकर गुजराथेत गोधरा जवळील शेहेरा गावचे निवासी होते. त्यांचा मुलगा पुढे अमेरिकेस जाऊन इंजिनियर झाला व आनंदाने जीवन व्यवहार चालवू लागला.

अनुभव दुसरा (स्वानुभव) : प. पू. टेंबेस्वामी प्रत्यक्ष दत्तावतारी आहेत. ह्याची प्रचिती (आळंदीकरांचा) मी ग्वालियर मुक्कामी १९३१ सालांत पुढील अभ्यास करण्यासाठी सुप्रसिद्ध गायक शिरोमणी राजगायक पं. श्री. कृष्णराव शंकर पंडित ह्यांचेकडे गेलो असता प्रथम विद्यालयांत उतरलो. नंतर तपासाअंती कळले की, समोरच्या घरात उत्तम जागा आहे. मालक पण चांगले आहेत. म्हणून मी त्यांच्याकडे जागेचे भाडे विचारण्यासाठी गेलो असता दोन रुपये भाडे असल्यामुळे मी त्यांना दोन रुपये ॲडव्हान्स दिले व आठ आणे साफसफाईसाठी दिले. त्यांनी मला विचारले की, 'रहाण्यास केव्हापासून येणार ?' मी त्यांना सांगितले, 'उद्या सकाळीच सामान घेऊन येतो.' ते म्हणाले, 'किती मंडळी आहेत ?'मी एकटाच आहे व श्री. कृष्णराव पंडितांकडे संगीताच्या अभ्यासासाठी आलो असल्यामुळे येथे तीन वर्षे एकटाच राहणार आहे.

घरी आई, वडील, पत्नी, मुलगा, आजी वगैरे मिळून कुटुंबात २५-३० मंडळी आहेत. पण विद्यार्जनासाठी मी एकटाच आलो आहे. त्यावर घरमालक गंगाधरपंत आळंदीकर हे एकदम संतापले व अद्वातद्वा बोलू लागले. मला म्हणाले की, 'माझे घर तुमच्यासारख्या उपटसुंभाला देण्यासाठी नाही, कारण माझ्या घरी तरण्या लेकी, सुना आहेत. म्हणून आपले पैसे घ्या व चालू लागा. त्यांना त्यांच्या श्रीमंतीचा गर्व होता. मी त्यांना शांत चित्ताने एवढेच म्हटले, 'पंत, आपण माझ्या वडीलांसमान आहात. पण एक गोष्ट लक्षात ठेवा की, परदेशांतून येणारी सगळीच मुले वाईट असतात असे जाणून घेऊ नका. कारण पाचही बोटे सारखी नसतात. हे शब्द ऐकून पंतांच्या तळपायाची आग मस्तकास पोचली व मला म्हणाले, 'जास्त शहाणपणा करू नका. नाही तर भैयाच्या हातून धक्का मारून बाहेर काढावे लागेल.' मी म्हणालो, 'पंत, एवढी वेळ येऊ देणार नाही. मी जातो. आपणास त्रास दिला त्याबद्दल माफ करा.' तेथून निघून मी विद्यालयात गेलो व विचारात बसलो होतो की, ग्वालियरला आपल्याला घर मिळणे कठीण आहे. मला फार वाईट वाटले. इतक्यात सोनुभैया मोरघोडे या नावाचे माझेबरोबर शिकणारे विद्यार्थी माझेजवळ आले व म्हणाले, 'का हो काय विचारात आहात ?' मी त्यांना घडलेली हकीगत सांगितली. तेव्हा ते म्हणाले, 'चला माझ्याबरोबर. माझे राम मंदिर आहे. तेथे बाहेरच्या पडवीत तुम्ही स्वत:चे खर्चाने लहान बांबूची खोली करून घेतली तर उत्तम जागा होईल. मी वडीलांना सांगून जागा देववीन.' त्याप्रमाणे मी तिकडे गेलो. जागा पाहून मला आनंद झाला. त्यावेळी पाच रुपयात उत्तम लांबलचक खोली मी बनवू शकलो व तेथे राहू लागलो. ती जागा विद्यालयापासून दीड मैल अंतरावर व जवळच गुरुवर्यांनी (टेंबे स्वामींनी) स्थापलेले दत्तमंदिरही होते. तेथे मी राम मंदिरांत चार महिने राहिलो. इतक्यात रामनवमी आली व त्यादिवशी पहाटे चिटणीस गोटातील प्रथम पाहिलेल्या घराचे मालक श्री. गंगाधरपंत आळंदीकर रामाच्या दर्शनास आले होते. त्यावेळी मी गाण्याची मेहनत करीत बसलो होतो. माझा आवाज बारीक असल्यामुळे आळंदीकरांस

शंका वाटली की, कोण बाई गात आहे ? त्यांनी मोरघोडे ह्यांना विचारले, 'का हो पंत आज ८० वर्षांपासून रामोत्सव होत आहे. पण ह्यावर्षी ही नायकीण कोण बोलावली आहे ?' पंत पण जरा चेष्टेखोर असल्यामुळे त्यांना म्हणाले, 'काय करावे बुवा ! एक बाई आली आहे व ती म्हणते की आज माझा प्रोग्रॅम ठेवा. आज तिचा प्रोग्रॅम ठेवला आहे.' आळंदीकर कुतुहलाने पंतांना म्हणाले, 'कशी बाई आहे ती पाहू का ?' पंत म्हणाले, 'नायकीणच आहे.' आळंदीकर खोलीवर आले व आत आले. आत येऊन मला पाहून त्यांना आश्चर्य वाटले. पुढे आले व पाहू लागले. त्यांना वाटले 'मी ज्या गृहस्थाला घरातून काढले होते तेच हे दिसत आहेत. थोडे पुढे येऊन मी कोणापुढे मेहनत करीत आहे हे ते पाहू लागले. मी त्यावेळी नित्यनियमाप्रमाणे श्री. प. टेंबेस्वामींच्या फोटोसमोर मेहनत करीत होतो. फोटो पाहिल्यावर त्यांना गहिवरून आले व ते साष्टांग नमस्कार करून म्हणाले, मी तुझा गुन्हेगार आहे. त्यादिवशी तू म्हणालास की, पाची बोटे सारखी नसतात. ती गोष्ट आज मला पूर्ण अनुभवास आली, आता ह्या खोलीत तुला राहता येणार नाही. माझी खोली तुझ्यासाठी तैयार आहे. मी आता मुलाला माझी गाडी घेऊन पाठवितो व तू तिकडे घरी ये.' मी म्हणालो, 'येथे आता माझी चांगली सोय झाली आहे. आपण कशाला त्रास घेता ?' ते म्हणाले, 'मी क्षणभरही तुला येथे राहू देणार नाही.' मी त्यांना म्हटले, 'मी तर एकटा आहे हे आपणास माहीत आहे. तरी आता मला तिकडे का नेता ?' त्यावर ते म्हणाले, ह्याचे कारण घरी गेल्यावर सांगेन. येथे सागंण्यासारखे नाही.' ते घरी गेले व गाडी पाठविली व मला घरी घेऊन गेले. दोन दिवसानंतर सर्व कुटुंबजनांना वर माझ्या खोलीत आणून सर्वांची ओळख करून दिली. एकंदर कुटुंब १२-१५ मंडळीचे होते. त्यात तीन मुले, तीन सुना, दोन मुली, आपण स्वत: दोघे, दोन-तीन नातवंडे होती. स्वत:च्या पत्नीकडे हात दाखवून म्हणाले, 'ही माझी पत्नी' (माझे घराशेजारी एक औदुंबराचे झाड होते. त्याकडे बोट दाखवून म्हणाले) हे झाड मला गुरुवर्य टेंबेस्वामींनी स्वहस्ते दिले आहे. कारण ह्या माझ्या पत्नीस एका

ब्रह्मसमंधाने पछाडले होते व त्या ब्रह्मसमंधास गुरुवर्य टेंबेस्वामींनी मुक्ति दिली व हे झाड मला देऊन त्याची प्रदक्षिणा व पूजन करण्याची आज्ञा माझ्या पत्नीस दिली आहे. आता ब्रह्मसमंधाने पछाडण्याचे कारण मी त्यांना विचारता जी त्यांनी सत्य हकीकत सांगितली तीच येथे अक्षरश: देत आहे.

आळंदीकर म्हणाले, 'माझे लग्न लहानपणी झाले होते व माझा मूळ धंदा भिक्षुकीचा असल्याकारणाने मी वयाच्या २० व्या वर्षी ग्वालियर किल्ल्यावर पौर्णिमेस एका सरदाराकडे सत्यनारायणाची पोथी वाचण्यास गेलो असता रात्री १०॥ वाजून गेले होते. परत येण्याचा मार्ग राजवाड्याच्या मागून होता व त्यावेळी एकांत होता. मी एकटाच त्या मार्गाने घरी जात असता दूर उभा राहिलेला एक टांगा दिसला त्यात तीन माणसे होती. मी तेथे गेल्यावर मला त्यांनी धरले व विचारले, 'काय रे, बामणा चंडीपाठ येतो का ? (सप्तशतीचा पाठ) मी नेहमी वाचीत असल्यामुळे व भिक्षुकीचा धंदा असल्यामुळे मी होय म्हटले, तेव्हा त्या तिघांनी माझे डोळे बांधले व मला म्हणाले, घाबरू नकोस. आमच्या-बरोबर चल. आम्ही तुला मारीत नाही. पण आम्हाला रेड्याचे बलिदान द्यावयाचे आहे म्हणून तुला नेत आहोत. तुला आम्ही सुखी करू. त्यानंतर १-१॥ तास गाडी चालवून दूर नेली व एका भुयारात नेले. तेथे कालिकेची मूर्ती होती. समोर रेडा बांधला होता. मी बलिदानाचे मंत्र म्हटल्यावर त्यांनी रेड्याचा वध केला व पुन्हा डोळे बांधून गाडीतून राजवाड्याच्या मागे आणून सोडले. डोळे सोडून मला १२५ रुपये दिले (ग्वालियरी रुपये) व म्हणाले, 'आपण दर पौर्णिमेस येथे येत चला व आम्ही आपल्याला ही रक्कम दरवेळी देऊ. कोणास सांगितले तर परिणाम चांगला होणार नाही. आम्ही डाकू आहोत.' असा क्रम सतत १२ वर्षे चालू होता. त्यानंतर तर बरेच पैसे त्यांनी दिले. शेवटच्या पौर्णिमेस त्यांनी सांगितले की, 'आपण आपल्या मंडळींना घेऊन या. त्यांना पण काही देण्याची आमची इच्छा आहे. तरी विनासंकोच आपण आणाल तर उपकार होतील. कारण आम्ही १२ वर्षांपेक्षा जास्त एके स्थळी राहू शकत नाही. म्हणून येथून

दुसरीकडे जाणार आहोत.' पुढच्या पौर्णिमेस मी पत्नीसह तेथे गेलो. त्यावेळी त्यांनी आमची फारच संभावना केली व हजारो रुपयांचा माल दिला. त्यात दागदागिने, चांदीची भांडी व इतर वस्तू होत्या. त्या पैशावर मी गर्भश्रीमंत झालो व आताचे ऐश्वर्य त्यांचेच आहे. त्या दागिन्यांपैकी अमुक दागिने माझ्या पत्नीने घातले त्यावेळी ती नाना प्रकारचे चाळे करू लागली. त्यानंतर १० वर्षांपर्यंत तिची पिशाच्चबाधा दूर करविण्यासाठी पुष्कळ उपचार केले, यात्रा केल्या. ज्याठिकाणी ही बाधा दूर होण्याची स्थळे होती त्या स्थळी गेलो. पण काही निकाल लागेना. शेवटी गाणगापुरास गेलो. तेथे काही दिवसानंतर दृष्टांत झाला. तो दत्तात्रेयांनी दिला की, 'मी स्वतः वासुदेवानंदसरस्वती ह्या नावाने नर्मदा किनारी गरूडेश्वरी वास्तव्य करीत आहे. तरी उद्या पहाटे सूर्योदयापूर्वी पत्नीसह माझी हद्द सोड नाही तर पत्नी गमावशील.' त्यावेळी माझेजवळ पुरते पैसे नव्हते. त्यामुळे मी २४ तासांची परवानगी मागितली. पण दत्तात्रेयांनी सांगितले की, 'पुण्याला तुझी सोय झाली आहे. लवकर हद्द सोड.' त्यावर मी पत्नीस घेऊन पुण्यापर्यंत आले. पुण्याला स्टेशनवर उभा होतो. इतक्यांत समोरच्या गाडीत त्यावेळी राज्य करीत असलेले देवास संस्थानचे संस्थानिक दिसले. त्यांचे नातलग ग्वालियरला रहात होते. मला त्यांनी जवळ बोलावून विचारले, 'पंत ग्वालियरला केव्हा जाणार ?' मी म्हणालो, 'पुढच्या आठवड्यांत जाणार आहे.' तेव्हा ते म्हणाले, हे ३०० रुपये घ्या व घरी पोचते करा. दृष्टांताप्रमाणे पैसे मिळाल्यामुळे माझा पूर्ण विश्वास बसला की, 'गरूडेश्वरी असलेली प.पू. श्री वासुदेवानंद-सरस्वतीची मूर्ती प्रत्यक्ष दत्तअवतारीच आहे व तेथे गेल्यावर माझ्या पत्नीची बाधा दूर होईल.' मी पुण्यास न उतरता सरळ गरूडेश्वरी आलो. पत्नीस होडीतून बाहेर निघण्यास पुष्कळ विनंती केली पण ती उतरेना. शेवटीं स्वामींना सांगितले. पण स्वामी म्हणाले, नर्मदेच्या हद्दीत मी काही करू शकत नाही. बाईला वर आणा मग इलाज होईल. बाईला वर आणण्यास २६ माणसांची मदत घ्यावी लागली व महाप्रयासाने ती होडीतून बाहेर येऊ शकली. वर आल्यावर स्वतः श्रींनी पाणी शिंपडले

त्यावेळी त्या बाईच्या शरीरातील पिशाच्चाने सांगितले की 'ह्या गृहस्थान बाईच्या अंगावर जे दागिने घातले आहेत ते माझे होते. त्या कारणाने मी तिला धरले आहे. आपले हातून माझी मुक्ति व्हावी अशी माझी इच्छा आहे. पण त्यापूर्वी ह्या गृहस्थांकडून वचन घ्या की, माझ्यासाठी दरवर्षी काही करावयास हवे, मी तिला त्रास देणार नाही' व त्या पिशाच्चाने मला पैसा कसा मिळाला हे श्रीना सांगितले. श्रींनी त्यास सांगितले की, जे झाले ते झाले. आता तू या बाईस सोड व तू सांगशील ते ते करतील. पिशाच्चाने ते कबूल केले. नंतर श्रींनी सर्व मंडळीस सांगितले 'नर्मदेत जाऊन उभे रहा. ह्या बाईवर पाणी शिंपडताच ती नदीत जाऊन पडेल. तिला इजा न होऊ देता नीट व्यवस्थित धरा व मग वर आणा.' त्याप्रमाणे करताच बाई नदीत पडली व कोणत्याही प्रकारे इजा न होता सुखरूप बाहेर आली. त्यावेळी सर्वांना आनंद झाला. त्यानंतर महाराजांच्या सांगण्याप्रमाणे श्रींच्या देखरेखीखाली मी दोनतीन दिवस तेथे राहून कार्य केले. त्यामुळे मी सुखी झालो आहे. अशी माझी हकीकत आहे. हा फोटो तुझ्याजवळ पाहिल्यानंतर मला एकाएकी प्रेरणा झाली की, ही व्यक्ति सांगत होती की, पाचही बोटे सारखी नसतात हे मला पटले. मला त्यांनी विचारले, 'ह्या फोटोचा व तुझा संबंध काय ?' मी त्यानंतर सांगितले, 'माझा जन्मच श्रींच्या कृपेमुळे झाला आहे व माझ्या मातोश्रीस त्यांनी मुलीप्रमाणे मानले असून माझ्या मातृकुटुंबावर श्रींचे अत्यंत प्रेम होते.' हे ऐकताच आळंदीकरांना माझ्याबद्दल बरेच प्रेम वाटले व सतत तीन वर्षे माझा अभ्यास चालू असेपर्यंत माझे पुत्रवत् पालन केले व मला घरची आठवण येऊ दिली नाही. ही हकीकत आळंदीकरांच्या तोंडून ऐकलेली आहे.

आश्विन मासात महाराज तिलकवाड्याहून निघाले व ते माणि-नागेश्वर, कंभेश्वर, गंगनाथ महादेव इत्यादि देवतांची दर्शने घेऊन व कर्नाळी, चांदोद, व्यास, शुक इत्यादि क्षेत्रे पाहून बरकाळजवळ अत्रिमहर्षींच्या आश्रमात येऊन पोचले. तेथे एक अनसूयामातेचे स्तोत्र व एक पद महाराजांनी केलेले आहे. तेथून निघाल्यावर कार्तिक वद्य पक्षांत

शिनोर या गावी येऊन तेथे मार्कंडेश्वराचे मंदिरात महाराजांनी मुक्काम केला. येथे एक दीड महिना मुक्काम झाला. या गावी रामशास्त्री प्रकाशकर म्हणून एक ब्राह्मण राहात असत. एक संन्यासी आपले गावात आले आहेत असे समजल्यावरून ते महाराजांचेकडे गेले. तरूण वय असल्यामुळे साहजिक थोडासा ताठा होता. तेथे येऊन रामशास्त्रींनी उभ्यानेच नमस्कार केला व मर्यादा न ठेवता कसेतरी बसले. महाराजांनी तिकडे लक्ष दिले नाही. ते आपल्या चांदीच्या दत्तमूर्तीकडे पाहात बसले होते. त्यांना रामशास्त्री मोठ्याने म्हणाले, 'का महाराज ! कोणीकडून आला !' महाराजांनी नुसते बोटांनी अमूक दिशेकडून आल्याचे सांगितले. नंतर 'तुमचा पूर्वीचा गाव कोणता ? तुमचे पूर्वाश्रमांतील नाव काय ? काय उद्योग करीत होता ? कोठे शिकला ?' असे एकसारखे बरेच प्रश्न रामशास्त्रींनी महाराजांना केले. तेव्हा महाराजांनी रागावून उत्तर दिले 'तुमचा कोण संबंधी बेपत्ता झालेला असल्यास तो आपण नाही.' हे महाराजांचे रागाचे भाषण ऐकून रामशास्त्रीही रागावून घरी चालते झाले.

महाराज राहात होते त्याचे खालचे भागात लीलानंदसरस्वती म्हणून एक स्वामी ६-७ वर्षे राहात होते. यांचे चातुर्मास अधिक झाले असल्याने यांना महाराज वंदन करीत असत. त्यावेळी त्यांनी म्हणावे, 'महाराज ! मुद्रा, दंडसूत्र, कटिसूत्र आमचे काहीच आश्रमास अनुसरून नसल्याने आपणाकडून वंदन करून घेण्यास संकोच वाटतो.' ते ऐकून महाराजांनी त्यांना जानवी जमविण्यास सांगितले. ती जमल्यावर कटिसूत्र, दंडसूत्र सर्व त्यांना व्यवस्थित करून दिले. दोघांचाही परस्पर संभाषणाचा योग नित्य येत असे. एकदा बोलता बोलता सहज महाराज म्हणाले 'काय करावे, रामचंद्रासाठी आपण येथे आलो. तो तर इकडे येत सुद्धा नाही. एकदा फक्त येऊन गेला.' असे महाराजांचे बोलणे ऐकून लीलानंदांनी रामचंद्रशास्त्रींना बोलावून आणून त्यांना त्याबद्दल विचारले असता ते म्हणाले की, 'टेंबेस्वामी विद्वान असले तरी ते फार संतापी असल्याने त्यांचे आमचे जमणार नाही. त्यांचेकडे आपण जाणार नाही.' असे लीलानंदांना सांगून रामशास्त्री परत गेले. त्या गावातच आपल्या

मामाकडे ते राहात असत. तेथे एक पोक्त बाई बहुश्रुत अशी असून तिचे रामचंद्रशास्त्रींवर फार प्रेम होते. यांनी महाराजांच्याकडे जाऊन काहीतरी शिकावे असे तिला वाटे. कारण महाराजांची विद्वत्ता तिला अवगत झाली होती. म्हणून तिने व मामांनी फार आग्रह केल्यामुळे रामशास्त्री पुन्हा महाराजांचेकडे आले, पण अद्यापि त्यांचे औद्धत्य कायम होते. कसातरी नमस्कार करून एका बाजूस बेफिकीरपणाने बसले. महाराजांनी बोलण्यास सुरुवात केली. 'तू काय शिकलास ?' असा महाराजांचा प्रश्न ऐकून 'आपले वेदाध्ययन झाले असून कौमुदी काव्य वगैरे झाले आहे. सध्या आपण एके ठिकाणी भागवत पुराण सांगतो.' असे रामशास्त्रीनी सांगितले. नंतर त्यांना 'जन्माद्यस्य यतोन्वयात्' हा श्लोक सांगण्यास महाराजांनी सांगितले. तेव्हा रामशास्त्री म्हणाले की, मला अशा वेदांत श्लोकांचे विवेचन करता येत नसल्यामुळे ते श्लोक कसेतरी सांगतो.' यावर महाराज म्हणाले की, 'अरे ! मुख्य समजणे आवश्यक असलेले जर समजले नाही तर भागवत वाचनाचा उपयोग काय ?' हे ऐकून रामशास्त्रींना राग आला. ते पाहून शांतपणे महाराज म्हणाले, 'मात्रे अध्यात्मनिवेदनं। किं तद्ध्यात्मं। जीवब्रह्मयोरैक्यप्रतिपादनं। तदहं कथं विजानीयम्। यावत्पूर्णो न वत्सरः।' ही वाक्ये महाराजांच्या मुखातून ऐकण्याबरोबर एकदम एक वर्षापूर्वी घडलेल्या स्वप्नाची आठवण रामशास्त्रींना झाली. लगेच सर्व राग शांत होऊन कंठ दाटून आला. अंगावर रोमांच येऊन नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या आणि एकदम उठून महाराजांचे पुढे येऊन रामशास्त्रींनी साष्टांग नमस्कार घातला. स्वप्नांत पाहिलेली ती हीच मूर्ती अशी खात्री झाली. थोड्या वेळाने महाराजांनी रामशास्त्रींना आज्ञा केली, 'आता घरी काही उद्योग न करता इकडे येऊन अभ्यास सुरू कर. पंचदशी व भागवताचा पहिला श्लोक सुरू करू.' हे ऐकून त्याप्रमाणे रामशास्त्रींनी महाराजांचे जवळ अभ्यास सुरू केला. सर्व वेळ त्यातच जात असे. फक्त आन्हिक व भिक्षा यासाठी काही तास जात असत. एकदा असाच पाठ चालू असता आपली पाणी पिण्याची नरोटी प्रसाद म्हणून रामशास्त्रींना महाराजांनी दिली. ती त्यांनी घरी ठेवली.

याप्रमाणे चालू असता महाराज एके दिवशी कोणासही न सांगता तेथून निघून गेले. नंतर रामशास्त्रींना स्वप्नांत येऊन महाराजांनी सांगितले, 'उद्विग्न न होता योगायोगाने जितके मिळाले तितके सांभाळून उपासना चालू ठेवावी. दंडाचे लक्ष्मीवस्त्र व कटीसूत्र कोनाड्यात राहिले आहे ते नर्मदेच्या प्रवाहांत सोड किंवा तुजकडे ठेव.' याप्रमाणे आज्ञा ऐकून रामशास्त्रींना समाधान झाले. त्यांनी ते लक्ष्मीवस्त्र व कटीसूत्र आपलेजवळ ठेवले, महाराजांचे दर्शन होण्यापूर्वीची रामशास्त्रींची हकीकत थोडक्यात अशी की, रामशास्त्रींचे वडील बडोद्यास रहात असून रामशास्त्री वेदाध्ययनाकरिता शिनोरास आपल्या मामाकडे रहात असत. त्यांच्या अठराव्या वर्षी वडील प्लेगने वारल्यामुळे त्यांना फार दु:ख झाले व घरातून कोठेतरी निघून जाण्याचा त्यांनी विचार केला. त्यावेळी रात्री रामशास्त्रींच्या स्वप्नात एक संन्याशी आले आणि म्हणाले की, 'तुझ्या जाण्याने मातोश्रींना किती दु:ख होईल हा तू विचार केलास काय ? कर्दमऋषी वनात निघून गेले तरी कपिलमुनी आपल्या मातेला सोडून न जाता त्यांनी तिला अध्यात्मोपदेश करून शोकरहित केले.' हे स्वामींचे भाषण ऐकून रामशास्त्री त्यांना म्हणाले, 'अध्यात्म म्हणजे काय ?' स्वामी म्हणाले, 'जीवब्रह्मांचे ऐक्य प्रतिपादन हेच अध्यात्म.' त्यावर रामशास्त्री म्हणाले की, 'ते मला कसे समजेल ?' तेव्हा स्वामी म्हणाले, 'तू सध्या उपदेशास अयोग्य असल्यामुळे एक वर्षानंतर हे सर्व तुला कळेल.' हा सर्व संवाद स्वप्नांत संस्कृतांतच झाला. ते संन्याशी रामशास्त्रीचे स्वप्नांत वारंवार येऊन त्यांना सूचना करीत असत व आज्ञेप्रमाणे घडून न आल्यास चांगले मारीतही असत. याप्रमाणे रामशास्त्र्यांना उपदेश करण्याबद्दल देवांचे सांगणे झाल्यावरून महाराज शिनोरास आले होते. प्रथम महाराज तेथे भुसावळी या मोहोल्यातील विठ्ठल मंदिरांत उतरले होते. त्या मंदिराच्या पंचांपैकी एका गुजराथी ब्राह्मणाने दुसऱ्या सोईस्कर जागेत मार्कंडेयाच्या माडीवर महाराजांची राहण्याची व्यवस्था करून दिली होती. दुसरे खेपेस महाराज त्याच देवळात उतरले होते. 'आणखी एक खेप इकडे होईल' असे महाराज

त्यावेळी बोलले होते. शिनोरास आलेल्या दिवशी रामशास्त्रींचे मामा विनायकभटजी गौतम पंचवटीहून आलेले यांचे घरी महाराज भिक्षेस गेले. पण त्यादिवशी रामशास्त्रीच्या वडीलांचे वर्षश्राद्ध असल्यामुळे रामशास्त्रींनी भिक्षा नाही असे सांगितले. तेव्हा महाराज म्हणाले, 'सृनृत भाषणाने यति विन्मुख गेल्याचा दोष लागत नाही' असे सांगून शास्त्रवचनही म्हणून दाखविले.

शिनोरास महाराजांचा मुक्काम असता त्यांच्या दर्शनास एके दिवशी एक विधवा गुजराथी वृद्ध बाई आली. तिने एक मोठा द्रोण भरून खडीसाखर महाराजांच्या पुढे ठेवली होती. महाराजांनी त्या द्रोणाकडे ढुंकूनही पाहिले नाही व इतरही कोणाला ती खडीसाखर घेण्यास सांगितले नाही. २-३ दिवस तो द्रोण तेथेच पडून होता. रामशास्त्रींनी ती खडीसाखर न घेण्याचे कारण महाराजांना विचारले. तेव्हा महाराज म्हणाले की, 'तीन दिवसात त्या द्रोणावर माशी तरी बसलेली तू पाहिलीस काय ?' हे महाराजांचे सांगणे ऐकून नंतर रामशास्त्रींनी तिकडे लक्ष ठेवले. तेव्हा त्यांना दिसून आले की, जवळ माशा पुष्कळ असून त्या द्रोणावर एकही माशी बसत नाही. हे महाराजांचे सांगणे खरे आहे. मग याचे कारण रामशास्त्रींनी विचारले असता, 'तुला समजून काय करावयाचे ? जिची साखर तिने न्यावी.' असे सांगून महाराज स्वस्थ बसले. नंतर त्या बाईने अत्यंत खिन्न होऊन ती खडीसाखर परत नेली. पुढे चौकशी केल्यावर, ती बाई पूर्ववयांत अतिशय दुराचारी असल्याचे समजले. तेव्हा महाराजांची सर्वज्ञता सर्वांना पटली. शिनोरास महाराजांचे जवळ रामशास्त्रींचे ग्रंथवाचन चालू होते. भागवतांतील वेदस्तुतीसारखे विषयसुद्धा अत्यंत सुबोध पद्धतीने सांगण्याची महाराजांची शैली होती. एकदा आपण पाठ घेताना प्रश्न विचारून महाराजांना निरूत्तर करू असे ठरवून रामशास्त्री तसा काही विषय पाहून आले. त्यादिवशी पाठास सुरुवात झाल्याबरोबर महाराज त्यांना म्हणाले की, 'विद्या शिकणाऱ्याने आपली विद्या पूर्ण होईपर्यंत तरी शिकविणाऱ्यास मी प्रश्न विचारून निरूत्तर करीन असे विचार मनामध्ये आणता कामा नये.' एवढेच महाराज

बोलले व त्यादिवशी रामशास्त्री जो विषय विचारणार होते तो विषय आपण स्वत:च प्रसंगाने काढून त्याचे अत्यंत सोपपत्तिक विवेचन केले. त्यामुळे रामशास्त्रींचा गर्व पूर्णपणे जिरून गेला. रोज सायंकाळी नर्मदेच्या घाटावर संध्येकरिता दक्षिणी ब्राह्मण जमत असत. महाराजही त्यावेळी तेथे जात. त्यांनी एकदा असे पाहिले की, ब्राह्मण मंडळी घाटावर कपडे काढून ठेवून पाण्याशिवाय लघुशंकेस जातात हे पाहून महाराजांनी एकदा पुराणाचे वेळी प्रसंग पाहून 'आचार: प्रथमो धर्म:' हा विषय काढला व त्याचे सांगोपांग विवेचन केले. त्या वेळेपासून सर्व ब्राह्मण मंडळी लघुशंकेस जातांना पाणी नेऊ लागली व नित्य वैश्वदेव करू लागली. एकदा असेच महाराज व लीलानंदस्वामी दोघें सायंकाळी घाटावर चालले होते. रस्त्यात काही लहान मुले पतंग उडवीत होती. त्याचा दोरा दोघांनाही लागला. संध्याकाळचे वेळी पुन्हा स्नान करण्याचा त्रास पडणार हे पाहून लीलानंदस्वामी म्हणाले की, आम्हाला 'संन्याशांनासुद्धा ही पोरे किती त्रास देतात ?' पण महाराज म्हणाले की, 'अहो त्रास कशाला मानावा ? ही आपलीच मुले आहेत. यांचा त्रास कसा मानता येईल ?' हे महाराजांचे शांत बोलणे ऐकून लीलानंद गप्प बसले. महाराजांना शौचाचा विकार बराच होता. एकदा एक संग्रहणीचा रोगी महाराजांकडे आला असता त्याला त्याबद्दल उपाय सांगून 'आपणासही ही व्याधी आहे. तो पूर्वाश्रमांतच एकाने आभिचरिक प्रयोगाने आपल्या पाठीमागे लावला आहे. ताक, सुरण, जायफळ व एखादे वेळी अफू यांचा उपयोग हा रोग वाढल्यास करण्यात येतो' असे म्हणाले. रामशास्त्रींच्या व त्यांच्या मामांच्या घरी दत्तोपासना पूर्वी नव्हती. रामशास्त्रींचा जन्म झाल्यावर एका ब्राह्मणाने त्यांच्या मामांना गुरुचरित्राची पोथी आणून दिली व त्यांना ती नित्य वाचण्यास सांगितली. त्याप्रमाणे मामांनी गुरुचरित्र वाचण्याचा नियम ठेवला होता. पुढे दत्तजयंतीचा उत्सव आला तेव्हा गुरुचरित्र सप्ताहाकरिता ती पोथी आणण्यास महाराजांनी मामांना सांगितले. तेव्हा मामांनी पोथी आणून दिली. त्यावेळी महाराज सहज थट्टेने बोलले की, 'तुम्ही वैदिक मंडळी ! प्राकृत गुरुचरित्राकडे पाहणार

देखील नाही. तर वाचन कोठले ? हे ऐकून मामांनी आपण रोज वाचीत असल्याचे सांगितले. नंतर एक दोन दिवसातच रामशास्त्रीच्या मामांना दत्तमंत्राचा उपदेश महाराजांनी केला. एके दिवशी पाठ चालू असता महाराज रामशास्त्रींना म्हणाले की, 'लवकरच एक नेहमी भटकत फिरणारा अक्षर-शत्रू मनुष्य येणार' हे ऐकून रामशास्त्रींना वाटले असेल कोणीतरी पूर्वीचा ओळखीचा मनुष्य. नंतर २-३ दिवसांनी एक मध्यम वयाचा बरोबर फक्त दोन पंचे, तांब्या व काठी इतकेच सामान असलेला एक गुजराथी ब्राह्मण महाराजांचे दर्शनास आला. तो शिनोरास सर्वांच्या ओळखीचा होता. पूर्वी तो वारंवार इकडील भागात गुळाचा व्यापार करण्यास येत असे. तोच गृहस्थ यावेळी अत्यंत विरक्त बनून महाराजांचेकडे आलेला होता. महाराज आठ दिवसपर्यंत त्याच्याशी बोललेच नाहीत. रोज तो पहाटे स्नान करून महाराजांचे माडीवर एका बाजूस बसून राही. महाराज भिक्षेस निघाले की तो बाहेर कोठेतरी जेवण उरकून पुन्हा महाराज परत येण्याचे आत येऊन बसे. पुढे 'एकदा येथे तू का बसून राहतोस ?' असे महाराजांनी त्याला विचारले असता 'हेच समर्थपाय माझा उद्धार करतील अशा विश्वासाने मी या पायांजवळ शरण आलो आहे.' असे सांगून त्या ब्राह्मणाने आपली पूर्वीची सर्व हकीकत महाराजांना सांगितली. ती अशी. माझे गाव तेल्लंगपूर. लहानपणी अल्लडपणामुळे मला लोक गांडा म्हणजे वेडा म्हणत. माझे मूळ नाव कल्याण, माझे लग्न वयाच्या आठवे वर्षीच झाल. शिक्षण झाल्यानंतर काही दिवस शाळेत व नंतर व्यापाऱ्याकडे माझी नोकरी झाली. पण मन:शांति नसल्यामुळे साधुपुरुषांचे शोधार्थ मद्रासपर्यंत फिरलो, पण संतांची भेट झाली नाही. माझे उपास्य दैवत महादेव असून मी जातीचा ब्राह्मण आहे व ब्राह्मणजातीतीलच सद्गुरु मला मिळावेत अशी माझी इच्छा आहे. काही दिवस मी पांदेचरीस नोकरीस होतो. पण लवकरच माझी ती नोकरी सुटली. त्यामुळे मी परत घरी आलो. पण मला त्यावेळी चित्ताच्या तळमळीमुळे अन्नपाणीही गोड लागेना. आईबाप जिवंत असल्याने तपश्चर्येकरिता बाहेर पडता येईना. घरची चांगली श्रीमंती

होती, पण कोणत्याही विषयापासून सुख, समाधान काही मला मिळेना. म्हणून व्यापाराचे निमित्त करून नर्मदातीरावर राहून तेथील ब्राह्मणांची सेवा करण्यात काळ घालवू लागलो. परंतु हे वडीलांना पसंत पडले नाही. ते मला त्याबद्दल फार कटू बोलले. म्हणून मी व्यापार बंद केला व वसुलीच्या निमित्ताने घरातून बाहेर पडलो. नंतर बैराग्याच्या वेषात ओंकारेश्वराच्या झाडीत एका वडाखाली राहू लागलो. सद्गुरु केव्हा भेटतील ही उत्कंठा मला सारखी लागली होती. मला लोक तेव्हापासून ब्रह्मचारी म्हणू लागले. नंतर काही दिवसांनी पांडुरंग महाराज म्हणून एक समर्थ पुरूष नर्मदातीरावरच होते. त्यांचेकडे जाऊन मी सर्व हकीकत त्यांचेपुढे सांगितली. त्यांचा असा नियम होता की, भिक्षा मागून धान्य आणावे व ते स्वतः दळून नर्मदा प्रदक्षिणा करणाऱ्यांना ते अन्न घालावे. त्यांनी तयार केलेले अन्न चोरांनी चोरी करून एके रात्री खाल्ले. त्याबरोबर त्यांची पोटे फुगली व त्यांचे प्राण जाण्याची पाळी आली. तेव्हा ते चोर पांडुरंग महाराजांना शरण आले. नंतर त्या सर्वांना महाराजांनी पुन्हा अन्न देऊन व उपदेशाने त्यांची वृत्ती सुधारून परत पाठवून दिले. नर्मदामाता महाराजांचेवर प्रसन्न होत्या. त्यांनी माझी स्थिती पाहून सांगितले की, 'अरे या भयंकर अरण्यात साधू कसे सापडतील ? तू नेमावर येथील सिद्धनाथाच्या देवळात जपानुष्ठान कर. म्हणजे तेथेच तुला सद्गुरुंचा शोध लागेल.' अशा त्यांच्या आज्ञेप्रमाणे मी नेमावर येथे येऊन अनुष्ठान करू लागलो. तेथे काही मंडळींचेकडून आपली वार्ता समजल्यामुळे आपणास शरण आलो. तरी आपण माझ्यावर कृपा करून मला कृतार्थ करावे. ही आपली सर्व हकीकत त्या ब्राह्मणाने महाराजांना सांगून आपले येण्याचे कारण सांगितले. त्या ब्राह्मणास लोक गांडाबुवा असे म्हणत होते. गांडाबुवांचे वृत्त ऐकून घेऊन महाराज नुसते हसले. पुढे काही दिवसांनी त्यांना बरोबर घेऊन महाराज सिनोरहून निकोदा या गावी आले. तेथे एका शंकराच्या देवळात गांडाबुवांना राहण्यास सांगून महाराज म्हणाले, 'तू येथे शंकरासमोर योगाभ्यास कर. श्रद्धेप्रमाणे शंकरपरमात्मा तुला फळ देतील.' एवढे सांगून त्यांना योगाभ्यासाची दिशा दाखवून दिली व

महाराज पुढे निघून गेले. नंतर काही दिवसांनी गांडाबुवा महाराजांचे दर्शनास आले असता महाराजांनी त्यांना आज्ञा केली की, 'तू प्रथम आईबापांकडे जाऊन क्षमा माग आणि त्यांची प्रेमाने आज्ञा घेऊन चातुर्मासाचे सुमारास द्वारकेस आपणाकडे ये.' याप्रमाणे आज्ञा झाल्यामुळे गांडाबुवा घरी निघून गेले.

शिनोर येथे कृष्णराव पेंढारकर म्हणून एक मनुष्य कोर्टात उमेदवार होते. ते रोज महाराजांचे दर्शनास नियमाने येत असत. महाराजांना भिक्षेचे वेळी गांवातील दक्षिणी ब्राह्मणांची घरे पेंढारकर दाखवीत व एक कळशी भरून घेऊन ते पाणी पुढे टाकीत पेंढारकरांनी जावे व महाराजांनी त्या जागेवरून पाठीमागून जावे असे चालले होते. तीन घरची भिक्षा महाराजांनी आणावी, येताना नर्मदेच्या पाण्यात ती माधुकरीची झोळी बुडवून मग मंदिरात यावे. तेथे पेंढारकरांनी गाईच्या शेणाने जागा सारवून ठेवलेली असे, तेथे मधुकरी ठेवावी. नंतर अन्नाचे तीन भाग करून त्यापैकी एक नर्मदामातेस व दुसरा गाईस देऊन तिसऱ्या भागाचे सेवन आपण करावयाचे. एखादे दिवशी विटाळ वगैरे झाल्यास ते अन्न नर्मदेत सोडून उपवास करावयाचा. पाठप्रवचन मात्र त्यादिवशीही नित्याप्रमाणे चालूच रहावयाचे. पेंढारकरांची सात्त्विक वृत्ती पाहून त्यांना महाराजांनी एक मंत्र देऊन त्याचे अनुष्ठान करण्यास सांगितले. ते त्यांनी श्रद्धेने केल्याबरोबर त्यांना चांगली नोकरी लागली. पुढे मामलेदाराच्या जागेपर्यंत त्यांची नोकरी होऊन शेवटी पेन्शन मिळाली. नोकरीवर असताना काही आरोप त्यांच्यावर आला होता. पण महाराजांच्या कृपेने त्या संकटातून ते मुक्त झाले.

गांडाबुवांना आपल्या आईबापांचेकडे पाठवून महाराज गिरनार पर्वतावर आले. तेथे श्रीदत्तपादुकांना वंदन करून, सोरटी सोमनाथाचे दर्शन व्हावे म्हणून माघ महिन्यात प्रभास क्षेत्रात आले. सोमनाथाचे पुजारी बाळंभट मोडे यांचे आग्रहावरून महाराज काही दिवस प्रभास क्षेत्रात राहिले. तेथे बडोद्याचे दिवाण वगैरे मंडळी दर्शनार्थ आली. महाराजांची संगती त्यांना घडल्यामुळे त्या लोकांच्या आचाराविचारांत पूर्ण परिवर्तन

घडून आले. सर्वांनी नास्तिक्य टाकून आपल्या आचारधर्माप्रमाणे वागण्यास सुरुवात केली. प्रभासपट्टणात महाराजांना द्विसाहस्री गुरुचरित्रावर टीका लिहिण्याबद्दल देवांची आज्ञा झाली. त्यावेळी मूळप्रत सुद्धा जवळ नव्हती. तरीही आज्ञेप्रमाणे टीकेस आरंभ केला व दिव्य-स्मृतीने ९ अध्यायापर्यंत तेथे टीका झाली. त्याबद्दलचे महाराजांचे पत्र असे आहे. 'तूर्त येथे विशेष पाठ देण्याचे वगैरे नसल्यामुळे रोज दोन घटका गुरुचरित्रावर टीका लिहिण्याचे होत असते. स्तुति व पहिले चार अध्याय आताच पुरे झाले. संस्कृत टीका करणेची लहर लागली आहे. तूर्त बाराशे झाली. पुढे कशी लहर लागेल कोण जाणे. श्रीदत्त.' सावंतवाडीच्या रामभाऊ सबनीसांचे चिरंजीव गजानन बापू सबनीस हे त्यावेळी द्वारकेस मामलेदार होते. ते महाराजांना येऊन भेटले. त्यांची मुंज पूर्वाश्रमात महाराजांचे हस्ते झाली होती, हे दोघांच्याही लक्षात येऊन परस्परांची पूर्ण ओळख पटली. सबनीसांच्या मनांत महाराजांचेविषयी आदर निर्माण झाला. त्यांची वृत्तीच पूर्णतया पालटून गेली. गरूडेश्वरीही महाराजांचे दर्शनार्थ ते गेले होते. प्रभासक्षेत्राहून निघून महाराज प्राची-सरस्वतीस जाऊन पोचले. या ठिकाणीच येऊन श्रीकृष्ण परमात्मा निजधामास गेले होते. तेथे वंदन करून महाराज पोरबंदर म्हणजे सुदामपुरी या ठिकाणी आले. तेथे काही दिवस वास्तव्य करून नंतर ज्येष्ठ मासात श्रीक्षेत्र द्वारका या सातव्या मुक्तिपुरीत महाराज येऊन पोचले.

चार्तुमास ९ द्वारका – शके १८२१

द्वारकेत आल्यावर श्रीशंकराचार्यांच्या शारदा-मठांत महाराजांचा मुक्काम होता. यावर्षी पाऊस नसल्याने या भागात भयंकर दुष्काळ पडलेला होता. चारा नसल्याने पाच रुपयाससुद्धा म्हैस घेण्यास कोणी कबूल होईना. आपल्या बायका मुलांनासुद्धा सोडून देण्यापर्यंत पाळी आलेली होती. गायकवाड सरकाराने त्यावर्षी अडीच लाख रूपये लोकांना अन्नासाठी वाटले होते. महाराजांच्या येण्याने तेथील सर्व लोकांना आनंद वाटून चार्तुमासात मुक्काम येथेच करण्याबद्दल सर्व

लोकांनी महाराजांना विनंती केली. त्याप्रमाणे येथेच शके १८२१ सालचा चार्तुमास झाला. दक्षिणी ब्राह्मणांची वस्ती द्वारकेत असल्यामुळे भिक्षेची अडचण भासली नाही. द्वारकेस येतेवेळी गुजराथ प्रांतांतूनच महाराजांना यावे लागले. त्या प्रांतात दक्षिणी ब्राह्मणांची घरे अगदीच कमी. त्यामुळे महाराजांना ३३ दिवस, भिक्षा मिळाली नाही. गुजराथी ब्राह्मणांचेकडून मिळालेले खारीक, खोबरे खाऊनच रहावे लागले. पण धर्मरक्षणाचे उद्देशाने महाराजांनी तसे भयंकर शरीरकष्टही सहन करून द्वारकेची यात्रा पुरी केली. अशा त्रासामुळे रक्त पडले. संग्रहणीचा विकार जास्ती बळावला. केव्हातरी पाणी प्याल्याबरोबर तो विकार वाढत असे. म्हणून पाणी न पिता मिळेल तेथे महाराज ताकच घेत असत. प्रारब्ध भोगूनच संपविले पाहिजे अशा निर्धारामुळे त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न कधीच महाराजांचेकडून झाला नाही. असे कष्ट नेहमी होत असूनदेखील नेहमीच्या कार्यात कधीच खंड पडला नाही. एकंदर चार महिने द्वारकेत महाराजांचा मुक्काम झाला.

महाराजांनी येथील शंकराचर्यांच्या गादीचा स्वीकार करावा म्हणून ग्रामस्थ मंडळींनी महाराजांना आग्रहाची विनंती केली. पण महाराजांनी हे काम आपण पत्करणार नाही असे सर्वांना स्पष्ट सांगितले. पण तरीसुद्धा पुढे दोन वर्षेपर्यंत तेथील मंडळी ते पीठ स्वीकारण्याबद्दल महाराजांना आग्रह करीत होतीच. महाराजांनीही जेव्हा आता यापुढे हा आग्रह आपणास बिलकूल खपणार नाही असे सांगितले तेव्हा नाइलाजाने मंडळी गप्प बसली. द्वारकेत असताना द्विसाहस्त्री गुरुचरित्राची टीका दहाव्या अध्यायापासून सुरू करून ती पूर्ण केली. मूळ ग्रंथ जवळ नसतानाच ही टीका झाली. मूळ गुरुचरित्र १५ वर्षांपूर्वी माणगांवी तयार झाले होते. त्या मूळ श्लोकांचे यावेळी नुसते स्मरण करूनच टीका झाली. याचे स्वतःमहाराजांनाही आश्चर्य वाटले. त्यासंबंधी महाराजांचे एका पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. 'आश्विन वद्य ७ शके १८२१ द्वारका, सौराष्ट्र देश, श्रीक्षेत्र प्रभास येथे ९ अध्यायांची टीका झाली. बाकीची आनर्त देश, श्रीक्षेत्र द्वारका येथे १४ अध्याय पूर्ण झाले. ही टीका होणे येवढा ह्या

व्यक्तीचा अधिकार नाही. रामो हरी करणाऱ्या मुखाचे हे महात्म्य नव्हे. तर श्रीस्वामींचा अनुग्रह व स्वहृदयस्थ स्वमहिमख्यापक श्रीगुरुप्रसाद जाणावा.' द्वारकेत असतानाच एका गुजराथी गृहस्थाच्या सांगण्यावरून गुरुचरित्रावर महाराजांनी चूर्णिकाही लिहून तयार केली. पूर्वी महाराजांनी आज्ञा केल्याप्रमाणे गांडाबुवा घरी आईबापांना भेटून त्यांची परवानगी घेऊन द्वारकेत महाराजांचेकडे आले. त्यांनी सांगितले 'आईबापांनी आपणास तीन अटी घातल्या आहेत. एक - मरणाचे वेळी त्यांचेजवळ उपस्थित रहाणे, दुसरी - त्यांचे और्ध्वदेहिक कृत्य पार पाडणे व तिसरी माझ्या मुलीचे लग्न लावून देणे. अशा तीन गोष्टी करण्याचे वचन घेऊन आईबापांनी मला जाण्यास परवानगी दिली आहे.' ते गांडाबुवांचे भाषण ऐकून महाराजांनी सांगितले, 'काही हरकत नाही.' 'श्रद्धेप्रमाणे कार्यसिद्धी होऊन जाईल.'

महाराजांनी गांडाबुवांची एकदा परीक्षा पाहिली. तो प्रकार असा - द्वारकेतून दुसरे दिवशी निघावयाचे होते. आदले दिवशी महाराज गांडाबुवांना म्हणाले की, 'आज बेटात जाऊन श्रीकृष्णप्रभूंचे दर्शन घेऊन रविवारी बोटीने प्रभासपट्टणास जा. तेथे बाळंभट भोंडे यांची मुलगी द्वारकाबाई आपले दर्शन नसल्याने शोक करीत आहे.तिच्या मनाचे समाधान करून राजकोट येथे आपणास येउन भेटावे.' अशी महाराजांची आज्ञा होण्याबरोबर गांडाबुवांनी निघण्याची तयारी केली. ते पाहून जवळच्या मंडळींनी महाराजांना सांगितले 'आज आता शुक्रवारची रात्र झाली. यावेळी रस्त्याने जाणे धोक्याचे आहे. पायाने जाण्यास वेळ लागेल, तर याला उद्या पाठविल्यास बरे होईल.' हे लोकांचे बोलणे ऐकून महाराज गांडाबुवांकडे पाहून फक्त हसले. सद्गुरुंचा अभिप्राय त्या एकनिष्ठ सेवकाचे तत्काळ ध्यानात आला आणि लगेच निश्चय करून गुर्वाज्ञा पालन करण्याकरिता गांडाबुवा तेथून निघाले. रात्र आहे कसे जावे असा काहीही विचार मनात न आणता पायीच प्रवास करून मध्यरात्रीचे सुमारास समुद्रतीरावर पोचले. तेथे त्याचवेळी एक गलबत बेटात जाण्यास तयार होते. त्यात बसून रात्री दोनचे सुमारास बेटात पोचले. तेथे

नारायणराव महालकारी यांचेकडे मुक्काम केला. दुसरे दिवशी शनिवारी सकाळी नित्यकर्म आटोपून श्रीकृष्ण परमात्म्याचे दर्शन घेतले व तेथून दुपारीं निघाले. लगेच रविवारी सकाळी द्वारकेस गांडाबुवा हजर. हा चमत्कार पाहून महाराजांच्या अचिंत्य शक्तीबद्दल सर्व लोकांना आश्चर्य वाटले. महाराज शनिवारीच राजकोटला निघून गेले होते. नंतर दुपारच्या बोटीने गांडाबुवा प्रभासपट्टणास गेले. दुसरे दिवशी द्वारकाबाईच्या घरी जाऊन तिचे समाधान करण्याचा त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. पण तिचे समाधान काही होऊ शकले नाही. तेव्हा निरूपायास्तव गांडाबुवा तेथून निघून प्राचीसरस्वती, गिरनार ही स्थाने पाहून राजकोटास महाराजांचा मुक्काम होता तेथे येऊन दाखल झाले. महाराज त्यापूर्वीच द्वारकेहून राजकोटास आलेले होते. सर्व प्रवास सुखाचा झाल्याचे गांडाबुवांनी महाराजांना सांगितले. द्वारकाबाईंचे दुःख कमी न झाल्यामुळे तिला महाराजांनी प्रभासाहून बोलावून घेतले व तिला उपदेश करून तिच्या मनाचे पूर्णपणे समाधान केले. त्यावेळी तिच्या मनाला शांती मिळाली. आत्मीय मानलेल्या भक्ताबद्दल महाराजांचा वात्सल्यभाव कसा होता याबद्दलचे हे एक उदाहरण आहे. राजकोटला महाराजांचे दर्शनार्थ मोठे मोठे इंग्रजी शिकलेले अधिकारी येत असत. पण महाराजांचे ते दिव्य चरित्र पाहिल्याबरोबर त्यांची मान महाराजांचे चरणी आपोआपच नम्र होत असे व ते महाराजांचे दास बनत असत. एके दिवशी कोणी माणसे नसताना एक दयानंदांचा शिष्य महाराजांचे जवळ येऊन त्यांचा अधिक्षेप करू लागला. तेव्हा महाराज शांतपणाने त्याला म्हणाले 'बाबा ! तुझा आमचा काही संबंध नसतांना तू उगाच का बोलतोस ? आम्हाला मारण्याची तुझी इच्छा असल्यास मार व तुझ्या मनाचे समाधान करून घे.' असे म्हणून महाराजांनी खरोखरच आपला गाल त्याचे पुढे केला. तो आता महाराजांना मारणार इतक्यांत हा प्रकार समोरच्या माडीवरून एका बाईने पाहून ती मोठमोठ्याने ओरडत खाली आली व सर्व मंडळींना तिने ती हकीगत सांगितली. लगेच मंडळी महाराजांचेकडे धावत आली, पण तो शिष्य त्यापूर्वीच पळून गेला होता. महाराज राजकोटहून निघाले ते

बढवाण, विरमगाव या गावावरून सिद्धपूर येथे येऊन पोचले. गांडाबुवाही बरोबर होतेच. तेथे सरस्वती नदीची स्तुती करून वंदन केले आणि हाटकेश्वराचे मंदिरात वास्तव्य केले. तेथे तीन महिने वास्तव्य झाले. दत्तजयंतीचा उत्सव ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणांत झाला. तेथे गीतेवर रोज प्रवचने होत होती. पाटणागावाहून बंबमहादेवसरस्वती या नावाचे एक संन्याशी सिद्धपूर येथे महाराजांचेकडे आले. त्यांचे इच्छेप्रमाणे महाराजांनी त्यांना रुद्रभाष्य समजावून सांगून काही वेदान्तही समजावून सांगितला. आणखी काही संन्याशी व ब्रह्मचारी तेथे रहात होते. त्यांपैकी एक ब्रह्मचारी कर्नाटकातील होता. तो बदरीनारायण, बदरीकेदार, गंगोत्री इत्यादी यात्रा करून आलेला होता. त्याला तेथे संग्रहणीच्या त्रासामुळे अत्यंत अशक्तता आली होती. त्या ब्रह्मचाऱ्याची खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवण्याबद्दल महाराजांनी तेथे येणाऱ्या सर्व मंडळींना सांगून पाहिले, पण तिकडे कोणीच लक्ष दिले नाही. ते पाहून त्या ब्रह्मचाऱ्याची १५ दिवस व्यवस्था ठेवण्याबद्दल महाराजांनी गांडबुवांस सांगितले. त्याप्रमाणे गांडाबुवा त्यांच्याकडे लक्ष पुरवू लागले. १५ दिवसांनी त्या ब्रह्मचाऱ्याचा अंतकाळ जवळ आला असे पाहून महाराज त्याचेजवळ जाऊन त्याला म्हणाले की,'तुझ्याजवळ जे गंगाजल आहे ते तू सर्व अंगास लावून पिऊन टाक व ईश्वरनामस्मरण कर.' त्याचप्रमाणे त्याने केले व थोडक्याच वेळात दत्त दत्त असे नामस्मरण करीत महाराजांकडे पहात पहात त्याने प्राण सोडला. सत्संगतीमुळे तो सद्गतीस गेला. त्यानंतर महाराजांनी गावातील गृहस्थ मंडळींना बोलावून त्यांची चांगलीच हजेरी घेतली. तेव्हा या मंडळींनी क्षमा मागून यापुढे यावच्छक्य आपण अतिथी सत्कार करीत जाऊ असे कबूल केले. याच गावात कृष्णंभट वैजापूरकर या नावाचे एक प्रेमळ गृहस्थ डाकोरजीचे पुजारी रहात असत. काही दुष्ट संगतीमुळे त्यांना गांजाची सवय लागली. ती इतकी की, रात्रंदिवस त्या गुंगीतच ते रहात. आपल्या पतीची ती दुरावस्था पाहून त्यांच्या स्त्रीला वाईट वाटून ती महाराजांना शरण गेली व तिने पतीला सुधारण्याबद्दल महाराजांना उपाय विचारला. महाराजांनी त्याच्या गळ्यात बांधण्याकरिता

ताईत मंत्रून दिला व काही गोळ्याही देऊन 'त्या गोळ्या पतीस खाण्याकरिता आपण दिल्या आहेत असे सांगून त्याला खाण्यास सांगा.' असे त्या स्त्रीस सांगितले. त्याप्रमाणे त्या स्त्रीने आपल्या पतीस महाराजांची आज्ञा कळविताच कृष्णभटजीनी ताईत आपल्या गळ्यात बांधून त्या गोळ्याही खाल्ल्या. एकदा ते महाराजांच्या दर्शनास आले असता 'कसे काय' म्हणून विचारले. तेव्हा त्यांना लज्जा वाटून त्यांनी महाराजांचे पाय धरून सांगितले 'आपल्या कृपेनेच मी दुःसंगतीतून मुक्त झालो. आता माझ्यावर कृपा करावी व काही सेवा घ्यावी.' नंतर महाराजांनी त्यांना मंत्रोपदेश केला. पुढे ते महाराजांचे एकनिष्ठ भक्त झाले. प्रतिवर्षी महाराज असतील त्याठिकाणी जाऊन महाराजांचे दर्शन घेण्याचा त्यांचा नियम होता. मुक्त्याला येथे त्यांनी शेवटचे दर्शन घेतले. गुरुकृपेने शेवटी त्यांचा अधिकार मोठा वाढला. शेवटी आजारी झाल्यामुळे त्यांनी आतूर संन्यास घेतला. अंतःकाल जवळ आला असे पाहून त्यांनी घरातील सर्व मंडळींना सांगितले 'आता मला बरे वाटते. तुम्ही सर्व जेवण करून या.' या त्यांच्या सांगण्याप्रमाणे सर्व मंडळी जेवणास निघून गेली असे पाहून कृष्णंभटजी उठून रणछोडजीच्या मूर्तीसमोर जाऊन बसले आणि महाराजांचे त्यांनी ध्यान केले. नंतर एकदम मोठ्याने प्रणवोच्चार करून लगेच देह सोडला. महाराजांच्या कृपेनेच त्यांना याप्रमाणे उत्तम गती मिळाली.

सिद्धपुराहून दत्तजयंती झाल्यावर महाराज निघाले व डाकोरास येऊन पोचले. आपण डाकोरास येत असल्याचे शिनोरास रामशास्त्रींना पत्रद्वारे महाराजांनी कळविले होते. त्याप्रमाणे रामशास्त्री, त्यांचे बंधू बाळकृष्णशास्त्री व महाराजांचे जवळ काही योगाचे शिक्षण घेतलेला एक गुजराथी ब्राह्मण असे तिघेजण मार्गशीर्ष वद्य द्वितीयेलाच डाकोरास येऊन पोचले. तेथे ते तीन दिवस राहिले तरी महाराज आले नाहीत, तेव्हा त्यांनी पंचमीस संध्याकाळी निघण्याचे ठरविले. त्याच दिवशी संध्याकाळी ही मंडळी निघण्याच्या तयारीत असता महाराज आले व दारातूनच म्हणाले की, 'ज्यांची जाण्याची तयारी असेल त्यांनी भेट होताच जावे.' याप्रमाणे

एकाएकी महाराजांना पाहताच सर्वांनी उठून नमस्कार केला. त्याच दिवशी अर्थातच कोणी गेले नाही. नंतर सांजसंध्या वगैरे झाल्यावर महाराजांनी द्विसाहस्त्रीची पोथी रामशास्त्रींना वाचण्यास दिली. नुकतीच ती टीका व चूर्णिका द्वारकेस तयार झाली होती. त्याचवेळी त्या ग्रंथावर काही प्रवचन महाराजांनी एका वर्गाची पदे म्हणण्यास रामशास्त्रींना सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी पदे म्हणताच आपण स्वतः त्याच्या जटा, घन, पंचसंधि, माला, रथक्रम, दंडक्रम इत्यादी विकृती महाराजांनी म्हणून दाखविल्या व रामशास्त्रींचेकडूनही म्हणून घेतल्या. दुसरे दिवशी पहाटे शौचमुखमार्जन झाल्यावर रामशास्त्रींना बरोबर घेऊन महाराज गोमती नदीवर गेले. नदीला पाणी थोडे होते पण तेथेच स्नान वगैरे आटोपून परत आले. नंतर डाकोरनाथाचे दर्शनास जावयाचे आहे काय ? असे रामशास्त्रींनी विचारले असता महाराजांनी 'नाही' असे सांगितले. याचे कारण महाराज आदले दिवशी सायंकाळी आले त्यावेळी एका भजनी बाईच्या सांगण्यावरून डाकोरनाथांच्या दर्शनाकरिता देवळात गेले. पण दरवाजा एकाएकी बंद झाला. हे पाहून डाकोरनाथाची दर्शन देण्याची इच्छा नाही असे म्हणून महाराज परत आले व पुनःतिकडे गेले नाहीत.

याप्रमाणे त्यादिवशी संध्याकाळपर्यंत मुक्काम झाला. सायंकाळी पाच वाजता बोलणे चालू असतानाच दंडकमंडलू घेऊन श्रीगुरुदेवदत्त म्हणून महाराज एकदम उठून उभे राहिले. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. दोन चार दिवस तेथे राहण्याबद्दल मंडळींनी आग्रह केला पण 'आता जाऊ या' असे म्हणून महाराज निघाले. रामशास्त्री बरोबर होते. त्यांनी शिनोरास चलण्याबद्दल आग्रह केला. पण महाराज म्हणले की, 'एकदा शिनोरास येणे झाले आहे. आता पुन्हा काय आहे ?' हे उत्तर ऐकून रामशास्त्रींनी सांगितले की, 'तर मग आपण जाल तेथे मी पायाने येतो' हे ऐकून शेवटी शिनोरास येण्याचे महाराजांनी कबूल केले व तू गाडीने जा असे रामशास्त्रीला सांगितले. तरी रामशास्त्री चालतच पाठीमागून निघाले. तेव्हा रागाने मागे वळून महाराज त्यांना म्हणाले की, 'आता तू मागे फिरतोस की नाही ?' हा राग पाहिल्याबरोबर मात्र

रामशास्त्री निरुपायास्तव मागे फिरले व त्याच रात्री गाडीने बडोद्यास येऊन मार्गशीर्ष वद्य अष्टमीस संध्याकाळी शिनोरास येऊन पोचले. त्यावेळी तेथील मंडळी रामशास्त्रींना म्हणाली की, 'तुम्ही महाराज येणार म्हणून तेथे दर्शन घेण्यास डाकोरला गेला आणि महाराज तर परवांच संध्याकाळी संध्येचे वेळी घाटावर आले. ' हे ऐकून रामशास्त्रींना आश्चर्य वाटले. षष्ठीला संध्याकाळी पाच वाजता तर डाकोरहून महाराज निघाले आणि लगेच तासा दीड तासातच शिनोरास पोचले. ही आश्चर्य वाटण्यासारखीच गोष्ट आहे. नंतर संध्या वगैरे आटोपून रामशास्त्री महाराजांचे दर्शनास गेले. तेव्हा महाराज नुसते हसले. यावेळी शिनोरास महाराज तीन महिने राहिले होते. त्यावेळीही रामशास्त्रींचा बराच अभ्यास झाला. एकदा महाराज रामशास्त्रींना म्हणाले, 'आतापर्यंत झालेला अभ्यास नीट टिकवशील तर तुला त्याचा पुष्कळ उपयोग होईल.' ही महाराजांची वाणी ऐकून रामशास्त्री म्हणाले की, 'मुक्काम हलविण्याचा विचार या वाणीवरून दिसतो तरी मला आपल्याबरोबर न्यावे.' हे ऐकून महाराज म्हणाले की, पुन्हा भेट होईल व त्यावेळी शेवटपर्यंत तू रहाशील. या सांगण्याप्रमाणे शेवटी गरूडेश्वरी भेट झाली आणि महाराजांच्या समाधिकालापर्यंत रामशास्त्री जवळ राहिले व शिनोरास सांगितलेल्या वाक्यातील गूढार्थ त्यावेळी त्यांच्या लक्षात आला.

जगला या नावाचा कोळी जातीतील मनुष्य त्याचे लग्न ठरविताच घरातून पळून निघाला तो शिनोरास येऊन थांबला. थंडी, वारा, पाऊस सहन करून तो रहात असे. जडभरताप्रमाणे त्यांचे देहाकडे लक्षही नसायचे. तो तेथे दोन वर्षे रहात होता. एकदा महाराज तेथे असताना घाटावरून स्नान करून येत होते. त्यावेळी जंगलाने त्यांचेपुढे येऊन हात पसरून त्यांना अडविले. तेव्हा महाराज त्याला पाहून म्हणाले की, 'तू येथे रहातोस काय ? रात्री मार्कंडेयाच्या मंदिरात ये.' असे त्याला सांगून महाराज पुढे निघून गेले. संध्याकाळी महाराजांनी मंडळींना सांगितले 'आज रात्रीपासून गीता सांगावयाची आहे.' हे ऐकून रात्री सर्व मंडळी जमली. जगलाही अगदी वेळेवर येऊन एका बाजूला बसला.

याप्रमाणे गीताश्रवणास जगला रोज नियमाने येत होता. गीतेचे १७ अध्याय सांगून झाल्यावर त्यादिवशी तो म्हणाला की, 'यापुढे काही आपणास ऐकावयाचे नाही.' असे सांगून तो निघून गेला. पुढे एक-दोन महिन्यांनी त्यांचे देहावसान झाले.

यावर्षी या भागांत सर्वत्र दुष्काळ असून शिवाय कॉलराही होता. त्यामुळे अनेक माणसे मृत्युमुखी पडत असत. महाराजांचेबरोबर यावेळी गांडाबुवा होते. त्यांच्याकडून येणाऱ्या पुष्कळ श्रद्धाळू माणसांना महाराजांनी औषध देऊन बरे केले. जंगलातून लाकडे आणवून त्याचा व्यापार करणारे कबाडी म्हणून लोक इकडे आहेत. त्यापैकी कबाडीदादा म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या एका गृहस्थाचा मुलगा विनायक परीक्षेत नापास झाल्यामुळे खिन्न होऊन महाराजांचे जवळ आला व त्याने विनंती केली की, 'महाराज, मी परीक्षेत नापास झाल्यामुळे मला आता नोकरी मिळणार नाही. त्यामुळे घरी चरितार्थ चालविणे फार कठीण आहे. तरी माझ्यावर कृपा करावी.' हे त्यांचे भाषण ऐकून महाराजांनी त्याला मंत्र व त्याचा विधी लिहून देऊन त्याला अनुष्ठान करण्यास सांगितले. त्याने श्रद्धेने अनुष्ठान केल्याबरोबर वरच्या मोठ्या अधिकाऱ्याने त्याला बोलावून घेऊन त्याच्या बापाच्या नोकरीवर लगेच त्याची नेमणूक केली. मंत्रशक्तीचा प्रभाव याही काळात दिसून येऊ शकतो. श्रद्धा मात्र पाहिजे. तेथून महाराज निघाले व चिखलदा गावी येऊन पोचले.

चातुर्मास १० चिखलदा – शके १८२२

शिनोरहून निघून वैशाख वद्य अमावस्येला चिखलदा मुक्कामी महाराज येऊन पोचले. तेथील मंडळी पूर्वी परिचित झालेलीच होती. तेथे नर्मदातीरावरील राम-मंदिरात महाराजांचा मुक्काम झाला. नर्मदेच्या पलिकडे बडवाणी म्हणून एक संस्थान आहे, तेथील राजे ठाकोरसाहेब महाराजांचे भक्त होते. सर्व मंडळींनी चिखलदयास चातुर्मास व्हावा अशी आग्रहाची विनंती केल्यामुळे तेथेच शके १८२२ मध्ये महाराजांनी चार्तुमास केला. याचवेळी महाराजांची अनुज्ञा मिळवून, महाराजांनी

केलेले गुरुचरित्र सावंतवाडीचे नारोपंत उकिडवे छापीत होते. त्याच समयी दुसऱ्याच एका गृहस्थाने गुरुचरित्र छापीत असल्याबद्दल महाराजांचे परवानगीशिवाय जाहिरात दिली होती. ती उकिडव्यांचे पाहण्यात येऊन त्यांनी ती जाहिरात महाराजांकडे पाठवून पत्रात लिहिले 'या अपरिचित मनुष्याने पुस्तक छापणे सुरू केले आहे तरी याचेवर खटला का करू नये ?' असे नारोपंतांचे पत्र तेथे मंडळींनी पाहिले. त्यावेळी तेथे बसलेले एक दुसरीकडचे गृहस्थ बोलले की, महाराजांच्या वृत्तीत लोकैषणा, वित्तेषणा यांचा काही संबंध नसल्यामुळे कोणीही ग्रंथाला नावे ठेवली किंवा तो शिरी धरला म्हणून त्याचा हर्षविषाद महाराजांना काहीच नाही. लोकांच्या उपयोगाकरिता कोणी छापत असल्यास चांगलेच आहे.' याप्रमाणे त्या परकी गृहस्थाने तेथे उद्‌गार काढले. महाराजांनी स्वतः ग्रंथ छापण्याबद्दल खास परवानगी अशी कोणालाच दिलेली नाही. 'अप्रतिषिद्धमनुमतं भवति' या न्यायाने कोणी कोणी काही ग्रंथ छापून काढले इतकेच.

सावंतवाडीचे राहणारे विश्वनाथ चिटणीस यांना काही पिशाच्चबाधा असल्यामुळे अन्न मुळीच पचत नसे. अन्न खाल्ले की ते उलटून पडावे. त्यामुळे ते फार अशक्त झाले होते. ते आपल्या बंधूस बरोबर घेऊन चिखलदा मुक्कामी महाराजांचे दर्शनास आले. महाराजांना नमस्कार करून आपली सर्व हकीकत त्यांनी सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले की, 'कुलदेवतेची आराधना तुमच्या कुळांतील माणसांचेकडून योग्य प्रकारे घडत नाही. त्यामुळे ही पीडा होत आहे. आता कुळातील मंडळी इतस्ततः असल्याने आपल्या पुरताच विचार करणे भाग आहे.' असे त्यांना सांगून महाराजांनी त्यांना दत्तमंत्र व देवीमंत्र दिला व गोरख-चिंचेतील औषधही दिले. नंतर घरी परत आल्यावर त्यांनी मंत्रजप केला, त्यामुळे त्यांची प्रकृती हळूहळू बरी झाली. प्रकृतीस्वास्थ्याकरिता ते एकदोन वेळा महाराजांच्याकडे गेले होते.

या प्रांतात यावर्षी पुष्कळ माणसे दुष्काळामुळे व महामारीच्या उपद्रवामुळे मरण पावली. त्यामुळे चातुर्मास संपताच महाराज चिखलदा

सोडून नर्मदातटाकी मंडलेश्वर मुक्कामी आले. तेथे चार पाच महिने मुक्काम झाला. तेथे फारसे मंडळींचे येणेजाणे नव्हते. कर्नाटकातील एक सरकारी नोकर काही आरोप आल्यामुळे वेषांतर करून चिखलदा मुक्कामी येऊन महाराजांच्या जवळ राहिले. त्यांचे नाव अप्पा निगडीकर म्हणून होते. हेही मंडलेश्वरी येऊन योगाभ्यास करू लागले. मंडलेश्वर हे गाव इंदूर संस्थानातील एक जिल्ह्याचे ठिकाण होते. तेथील अधिकारी हे ब्राह्मण असून भाविक होते. ते नित्य महाराजांचेकडे येऊन भागवतातील वेदस्तुति समजावून घेत असत. वामनराव जेलर हेही देशस्थ ब्राह्मण रोज दर्शनास येत होते. तेथील इनामदारांचीही महाराजांचेविषयी आदरबुद्धी होती. त्यांचे घरांतून महाराजांचेकडे रोज ताजे ताक येत होते. विश्वेश्वराच्या मंदिरासमोरील एका धर्मशाळेतील मोकळ्या पडवीत महाराज रहात असत व रात्री निजण्याकरिता दुसऱ्या एका बंदिस्त धर्मशाळेत जात. रात्री तेथेच गणेशपुराण सांगत असत. पुराण झाल्यावर तेथेच एका पाटावर एक छाटी अंथरून व एक पांघरण्यास घेऊन निजत असत. वामनरावांच्या गाईस एके दिवशी रात्री बराच आजार निर्माण झाल्यामुळे तिला त्यावेळी हळूहळू महाराजांच्या निद्रास्थानी आणले. वामनरावांचा शब्द ऐकून महाराज लगेच उठून अंधारातच बाहेर गेले व कोठून तरी औषध आणून त्यांनी औषध दिल्याबरोबर ती गाय उत्तम बरी होऊन तत्काल घरी गेली.

इंदूर येथे राहणारे सखारामशास्त्री टिल्लू म्हणून प्रसिद्ध नैय्यायिक होते. त्यांनीसुद्धा वारंवार महाराजांचेजवळ येऊन वेदस्तुती, ब्रह्मस्तुती, उपनिषद्भाष्य इत्यादि विषय समजावून घ्यावेत. पण महाराजांनी प्रसंगाने असे म्हणावे की,'या नैय्यायिकांना आपण काय सांगू शकणार ? आपणास न्यायशास्त्राचा गंध देखील नाही. जसे समजले तसे सांगावयाचे.' निरभिमानवृत्ती हेच पूर्ण ज्ञानाचे चिन्ह आहे. मंडलेश्वरी तापाची साथ सुरू झाली. तेव्हा गोळ्या तयार करवून आजारी लोकांना द्याव्यात. मंत्र व यंत्र यांचाही उपयोग करीत असत. नरसोबाचे वाडीहून गुंडभट खोबारे पुजारी आले होते. त्यांच्या विनंतीप्रमाणे

'कृष्णवेणी-पंचगंगायुतिस्थं' हे वाडीवर्णनात्मक स्तोत्र तयार करून गुंडभटजीच्या जवळ वाडीच्या एका ब्राह्मणासाठी दिले. महाराज मंडलेश्वरी असताना तेथे त्यांच्या दर्शनार्थ मुद्दाम सावंतवाडी भागातील चार ब्राह्मण आले होते. १. शंकरभटजी सप्रे हे महाराजांचे पूर्वाश्रमापासून मोठे भक्त. हे राहणार सावंतवाडीचे, चांगले सदाचारसंपन्न होते. यांनी भिक्षावृत्तीवर शेवटपर्यंत अग्निसेवा केली. महाराजांचे बरेचसे ग्रंथ छापण्याचे काम यांचेकडून झाले. २. सखारामपंत निगुडकर हे भडगावास वकिली करत असत. ३. सितारामपंत निगुडकर हे सावंतवाडीस सबजज्ज असून उत्तम निःपक्षपाती न्यायाधीश म्हणून प्रसिद्ध होते. यांना महाराजांनी दत्तमंत्राचा उपदेश दिला होता. यांची महाराजांच्या ठिकाणी मोठी श्रद्धा होती. यांना एकदा 'काम, क्रोध व लोभ हे त्रिविध नरकद्वार सोडावे.' असा महाराजांचा दृष्टांत होण्याबरोबर लगेच यांनी सबजज्जाची नोकरी सोडून दिली व सदाचरणांत सर्व काळ घालवू लागले. 'अनायासेन मरणं' इतकीच याची मागणी देवाजवळ होती. या प्रार्थनेप्रमाणेच सहज बोलता बोलताच यांना मृत्यू आला. चौथे ब्राह्मण कोलगावचे राहणारे गणेश सातवळेकर हे आले होते. महाराजांचे दर्शनाविषयी यांना घरी असताना इतकी तळमळ लागली होती की, त्या भरात ते एके दिवशी घरातून न सांगता निघून गेले. पण वडिलांनी त्यांना शोधून परत आणले. पण यांची वारंवार तशी प्रवृत्ती पाहून 'मी महाराजांचे दर्शन करून परत येईन' अशी गुरचरित्राची पोथी हातात धरून यांना शपथ घेण्यास लावले आणि नंतर यांना महाराजांचे दर्शनास जाण्याची परवानगी घरातील मंडळींनी दिली. त्याचप्रमाणे ते मंडलेश्वरी येउन पोचले. त्यांनी महाराजांचेजवळ वेदस्तुती, ब्रह्मस्तुती, मनन यांचा अभ्यास केला व पुढे उत्तरायण लागल्यावर महाराजांनी काही उपनिषदे सांगून यांना अनुग्रह दिला. महाराजांचा प्रसाद झाल्यावर पुढे काही दिवसांनी भाष्यचिंतनिका करीत हे विश्वेश्वराचे मंदिरात दुपारी बसले असता श्रीदत्तमहाराजांनी संन्यासीरूपाने यांना दर्शन दिले, त्यामुळे यांचे चित्त शांत झाले. शेवटी इच्छा नसताही कबूल केल्याप्रमाणे घरी यावे लागले. त्यानंतर नरसोबावाडीस दोन वेळ व

गरूडेश्वरास एक वेळ असे तीन वेळ महाराजांचे दर्शन सातवळेकरांना घडले. महाराजांनी यांना योगाची माहिती सांगितली व औषधाविषयीचे अनुभव स्वहस्ताने लिहून देऊन तोच व्यवसाय चालू ठेवण्याबद्दल आज्ञा केली. महाराजांचे गुरुस्वामी काही दिवस मंडलेश्वरी राहिले होते. एक तरुण घरांतून भांडून आलेला होता. त्यांनी त्याला संन्यास दिला होता. तो शिष्य त्यावेळी त्यांचेबरोबर होता. एकदा भिक्षेस गेल्यावेळी एका गृहस्थाची माळच चोरून आणली. ते पाहून महाराजांनीं गुरुस्वामींना स्पष्ट सांगितले. 'अनधिकारी माणसाला संन्यासदीक्षा दिली असता अशी स्थिती होते. अशा माणसाला तुरूंगांत घालावे.' याप्रमाणे महाराजांचे कडक भाषण ऐकून लोकांनी त्या स्वामींना दुसऱ्या गावी पोचविले.

सावंतवाडीचे सप्रे यांनी अग्निहोत्र घेण्याची आपली इच्छा महाराजांचे जवळ व्यक्त केली. त्यावेळी महाराज म्हणाले की, 'शारीरिक व आर्थिक दृष्टीने अग्निहोत्र चालविणे कठीण जाईल. सध्या स्मार्ताग्नि आहेच तेवढी अग्निसेवा पुरे' असे महाराजांनी सांगितले. तथापि पुढे सप्रे यांची बलवत्तर इच्छा पाहून महाराजांनी तसा निषेध केला नाही. ही महाराजांची संमतीच समजून सप्रे यांनी अग्निहोत्र घेतले व आजन्म भिक्षा मागून अग्निनारायणाची सेवा केली.

एकदा एकाने महाराजांना स्वतःला उद्देशून प्रश्न केला, 'संन्याशी माणसाने मातोश्रींची भेट घ्यावी व जन्मभूमी पहावी असे लोक म्हणतात. तेव्हा याचा अभिप्राय काय आहे ?' हा प्रश्न ऐकून महाराजांनी त्याबद्दल खुलासा केला की, संन्याशाने इतर कोणासही वंदन करू नये पण माता दिसल्याबरोबर तिला मात्र वंदन केले पाहिजे. पण मुद्दाम मातोश्रींची भेट घेतली पाहिजे असे नाही. तसेच संन्यास घेतल्यावर जन्मभूमी पाहणे म्हणजे मूल प्रपंचाधिष्ठान पाहणे व त्यातच लीन होणे आस मुख्य अर्थ आहे.' याप्रमाणे खुलासा केला.

मंडलेश्वरी महाराजांना रोज ताप येऊ लागला. पण स्नानादिक विधी कधीही बंद पडले नाहीत. मंडळी पाठ ऐकण्याकरिता येऊन बसली म्हणजे महाराजांना थंडी वाजण्यास सुरूवात व्हावी. त्यावेळी मंडळींना

सांगत, 'थोडे बसा, हे हीव घालवून येतो,' असे सांगून निजण्याचे खोलीत जात व प्राणायामादिकांनी ती थंडी घालवून लवकरच बाहेर परत येऊन पाठ सुरू करीत. ताप अंगात असेच. तरी पाठ कधीही बंद ठेवला नाही. लोकांनी, 'ताप आहे आज पाठ राहू दे' असे सांगितले तरी महाराज म्हणत की, ताप रोजचाच आहे. तो राहीना का, भोग संपला की तो जाईल,' असे सांगून पाठ सुरू करावयाचा. औषध तर महाराज कधीच घेत नसत. एकदा एकाने आपणाजवळ मात्रा आहे ती घ्यावी अशी विनंती केली. महाराज त्याला म्हणाले की, 'आपणाजवळ त्रिमात्रांचा संग्रह आहे. आता फक्त अर्धमात्रेचाच प्रश्न आहे. उपदेशानंतर त्रिमात्रांप्रमाणे तिचाही संग्रह होईल. फक्त आता अर्धमात्रेची जरूरी असल्याने तुमच्या सगळ्या मात्रेचा काही उपोयग नाही.' या वाक्यातील गूढार्थ सर्वांना समजणे अशक्य आहे. ताप येत असताही महाराज भिक्षा घेतच असत. सातवळेकर म्हणाले 'महाराज ! आपणास ताप अंगात असताना अन्न जाते तरी कसे ?' त्यावर महाराज म्हणाले, 'अहो, आपण अन्न खाल्ले पाहिजे. तापाचा व अन्नाचा संबंध काय ?' पुढे सातवळेकरांनाही ताप येऊ लागला. तो महाराजांनी बांधला पण अन्नद्वेष गेला नाही. यावेळी महाराजांच्या उपदेशाचा उपयोग झाला. पुढे प्रसंगाने सातवळेकरांना ताप आला तरी महाराजांचे वाक्य लक्षात असल्यामुळे तापातही ते अन्न खात असत.

एकदा सर्वत्र पुनर्विवाहाबद्दल वाद चालू होता. याबद्दल एखादा खंडनपर लेख महाराजांनी लिहून द्यावा म्हणून मंडळींनी आग्रह केल्यामुळे महाराज लिहिण्याकरिता बसले. लेखणी हातात घेतली मात्र लगेच 'लेखणी खाली ठेव' असे देवांचे सांगणे झाले. झाले, तो लेखही राहिला व लिहिण्याचेही बंद झाले. पुढे एक वर्ष झाल्यावर एका ठिकाणी एक दौत व जवळच एक काडी पडलेली महाराजांना दिसली. तेव्हा ती काडी हातांत घेऊन श्रीदत्त इत्यादि काही अक्षरे कागदावर लिहिल्यावर देवांच्या आज्ञेची आठवण होऊन काडी खाली ठेवली. लगेच देवांनी सांगितले की, 'आपण काही इतर लिहिण्यास बंदी केली नव्हती. तो लेख

लिहिण्यासच फक्त बंदी होती.' हा देवांचाअभिप्राय समजल्यावर पुन्हा लिहिण्यास आरंभ झाला.

'गुरुस्वामी नारायणानंद सरस्वती हे आजारी आहेत, त्यांची सेवा करण्यास जावे' असे देवांचे सांगण्यावरून महाराज मंडलेश्वराहून निघाले व फाल्गुन अखेर इंदूर येथे पोचले. महाराज गावाबाहेर आले हे समजताच सर्व प्रमुख ब्राह्मण मंडळी स्वागतासाठी बाहेर आली व सर्वांनी साष्टांग नमस्कार करून गावात येण्याविषयी महाराजांना आग्रहाची विनंती केली. 'आपण शहरात रहात नाही. अडचणी असतात' असे महाराजांनी सांगितले. तेव्हा त्या सर्व अडचणी दूर करतो. आपण यावे असा मंडळींचा आग्रह पाहून चार दिवसच मुक्काम राहील असे महाराज म्हणाले. त्याप्रमाणे सरकारी बागेजवळ सुबरायाच्या वाडचात महाराजांची रहाण्याची व्यवस्था केल्यावर महाराज तेथे येऊन उतरले. त्या वाडचातच वेदशास्त्र पाठशाळा होती. अप्पा निगडीकर यांना गुरुस्वामींच्या शुश्रुषेकरिता महाराजांनी पुढे पाठवून दिले. चार दिवस झाल्यावर अधिक राहण्यास सवड नाही असे महाराजांनी सांगितले. पण काही उपदेशामृताचा लाभ व्हावा असा सर्वांचा आग्रह पाहून शेवटी तेथे १८ दिवस महाराजांचा मुक्काम झाला. मंडळींच्या इच्छेप्रमाणे तेथे सर्वानुक्रम व गायत्रीभाष्य सांगितले. भिक्षेची वेळ सोडून बाकीचा सर्व वेळ सांगण्याचे काम चालू होते तरीही ते संपले नाही. मोठमोठी विद्वान मंडळी दर्शनास व श्रवणास येत. महाराजांचे अगाध ज्ञान पाहून सर्व चकित झाले. पुढे मंडळींची आणखीही श्रवणाची इच्छा होती. पण उज्जनीहून 'गुरुस्वामी फार आजारी आहेत. वासुदेवानंद आल्यावाचून आपणास बरे वाटणार नाही असे गुरुस्वामी म्हणतात.' असे पत्र आल्यावरून महाराज इंदुराहून निघून उज्जनीस गेले.

इंदुरास एकदा एका माणसाने महाराजांना येऊन विचारले , 'माझी गाय चुकली आहे ती केव्हा सापडेल ?' हा त्याचा प्रश्न ऐकून महाराजांनी सांगितले की,'आपण काही ज्योतिषी नाही.' पण शेवटी त्या माणसाचा विशेष आग्रह पाहून सांगितले 'गाय गोठ्यांत येऊन उभी राहिली आहे.'

त्याने घरी येऊन पाहिले तर खरोखरच गाय गोठ्यात होती. हे पाहून त्याला आश्चर्य वाटले.

एका गृहस्थाने विचारले की, 'आपण देवस्वरूप झाला. आता आपणास ही मूर्तिपूजा कशाला पाहिजे ?' हे ऐकून महाराज म्हणाले की, 'ज्या मूर्तीच्या पूजेने ही स्थिती मिळाली त्या मूर्तीला विसरणे योग्य कसे होईल ? तथापि तसा श्रद्धावान कोणी पूजा करणारा भेटला तर ही मूर्ति त्याला देता येईल.'

उज्जनीस गेल्यावर महाराजांनी गुरुस्वामींची सेवा उत्तम प्रकारे केली. त्यांना औषधोपचार करून बरे केले. तेथेही मंडळींची उपाधि मागे होतीच. तेथे श्रीमद्भागवत सांगणे सुरू झाले. पुराण श्रवणास पुष्कळ मंडळी जमू लागली. गुरुस्वामींना किंचित् याबद्दल हेवा वाटू लागलेला पाहून शेवटी त्यांना मनस्ताप देणे नको असा महाराजांनी विचार केला व आता त्यांची प्रकृतीही बरी झाली होती. त्यामुळे तेथे राहण्याचे काही कारण उरले नाही. तेव्हा महाराज उज्जनीहून गुरुस्वामींची आज्ञा घेऊन निघाले आणि वैशाख मासात महत्पूर येथे येऊन पोचले.

चातुर्मास ११ महत्पूर – शके १८२३

महत्पूर येथे मंडळीच्या आग्रहावरून महाराजांनी चातुर्मास करण्याचे ठरविले. सुमारे सहा महिने त्यांचा तेथे मुक्काम होता. तेथील मंडळीच्या सांगण्यावरून महाराजांनी दत्त पुराणांतील सर्व कथांचा संग्रह करून दत्तमहात्म्य या नावाचा एक प्राकृत ओवीबद्ध, रसाळ असा ग्रंथ केला व तेथेच त्रिशती गुरुचरित्र म्हणून तीनशे श्लोकांचे एक संस्कृत काव्यही तयार केले. या ग्रंथाबद्दल महाराजांचे पत्र असे आहे, 'श्रा. शु. ११ - काही लोकांचा येथे आग्रह असा होता की, सविस्तर दत्तमहात्म्य असावे. त्यावरून ओवीबद्ध तृतीयाष्टकापासून सहाव्या अष्टकापर्यंत ओव्या लिहिल्या. प्रायः प्रत्यही १०८ होत गेल्यामुळे तेवढाच अध्याय ठेवला. उद्या ५० वा अध्याय पुरा होईल. सुमारे साडेपाच हजार ग्रंथ झाला. आता पुढे लिहिण्याची इच्छा होत नाही.

नारायण.'

सटीक गुरुचरित्र छापून झाल्यावर सावंतवाडीहून सप्रे यांनी महाराजांचेकडे पाठविले ते अशुद्ध बरेच राहिले, काय करावे, असे विचारले. त्यावर महाराजांचे पत्र असे आहे, 'श्रा. व ११ महत्पूर, छापलेल्या पुस्तकांत अशुद्धे राहिली तरी राहोत. 'गच्छतःस्खलनं क्वापि' हा न्याय सर्वत्र आहेच. शुद्धिपत्र मात्र द्यावे म्हणजे झाले. नारायण !'

ग्वाल्हेर संस्थानात गुणा छावणी म्हणून एक लष्करी ठिकाण आहे. तेथील एक सर्जन डॉक्टर विश्वनाथराव ताटके म्हणून होते. ते उत्तम डॉक्टर म्हणून प्रसिद्ध असून महाराजांचे भक्त होते. त्यांच्या पायाला हाड्या व्रण झाल्यामुळे तो पाय आतून सडू लागला. वैद्य-डॉक्टरांचे पुष्कळ उपाय झाले पण गुण काही येईना. शेवटी पाय कापल्याशिवाय काही उपाय नाही असा सर्व डॉक्टरांनी निर्णय दिला. शेवटी ताटके सर्जन महाराजांना शरण आले. महाराज म्हणाले, 'तुम्ही सर्वांना औषध देणारे. तुम्हाला औषध कोणी द्यावे ?' असे बोलून त्यांना एक मंत्र लिहून देऊन त्याचा जप करण्यास सांगितले व पायास पोटीस बांधण्यास सांगून शिवाय औषधही दिले. डॉक्टरांनी अनुष्ठान वगैरे केल्यावर हळूहळू त्यांचा पाय अगदी पहिल्याप्रमाणे चांगला झाला. ते पाहून सर्व डॉक्टर मंडळींना आश्चर्य वाटले ही बातमी ऐकून अनेक लोक श्रद्धेने महाराजांचे दर्शनास येऊ लागले. डॉ. विश्वनाथराव ताटके पूर्वी नास्तिक वृत्तीचे होते. पण महाराजांची भेट झाल्यापासून त्यांचा तो नास्तिकपणा पूर्णपणे गेला. संध्येपासून सर्व ब्रह्मकर्म महाराजांजवळ शिकून पुढे ते आचारधर्माने वागू लागले. महाराजांचे ते एकनिष्ठ भक्त होते. यांनीच श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथ स्वतःच्या खर्चाने छापून प्रसिद्ध केला.

महत्पुरात असताना कार्तिक पौर्णिमेस ग्रहण आले. तेव्हा त्यावेळी क्षिप्रा नदीचे स्नान करून नंतरच महत्पूर सोडावे अशी महाराजांची इच्छा होती. पण त्याचे अगोदरच महत्पूर सोडून गंगातीरी ब्रह्मावर्तास जाण्यास महाराजांना श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाली.पण स्नान करून जावे या उद्देशाने महाराज तेथेच राहिले. त्याच रात्री भयंकर विषारी नाग

महाराजांना चावला. आता पुढे काय परिणाम होतो याची काहीच कल्पना करता न आल्यामुळे सर्व मंडळी अत्यंत दुःखद मनःस्थितीत होती. औषध तर केव्हाही घ्यावयाची पद्धती नव्हती. सर्पदंश झाल्याबरोबर महाराज समाधि स्थितीत बसून राहिले. तीन-चार तासांनी समाधीतून उठले. तथापि विषाचा जोर कमी झाला नव्हता. त्याचे वेठ सारखे येतच होते. पुन्हा महाराजांनी समाधि लावली. याप्रमाणे दोन दिवस निघून गेले. नंतर विषाची बाधा बरीच कमी झाली. पण मस्तक मात्र फारच जड झाले होते. त्याचे कारण पहात असता सर्पदंश झालेल्या जागी सापाचा दात मोडून पायात राहिला आहे असे दिसून आले. तो दात काढून टाकल्याबरोबर मस्तक हलके झाले. महत्पूर सोडीपर्यंत विष पूर्णपणे उतरले नव्हते. पुढे दहावे दिवशी महत्पूर सोडल्याबरोबर विष पूर्णपणे उतरून पाय चांगला बरा झाला. पुढे सूर्यग्रहण होते. त्यावेळी महत्पुराहून महाराज निघून आलोट या गावी आले. तेथे त्यांनी अनादिकल्पेश्वरांचे स्तोत्र करून वंदन केले. तेथे काही दिवस राहिले.

सखाराम कानडकर या नावाचा मुलगा आलोट गावी रहात होता. बाप मेल्यामुळे आई, लहान भाऊ, बहीण या सर्वांची पोषणाची जबाबदारी त्याचेवर पडली. वयही त्यांचे लहान होते. पुढे जीवन चालावे म्हणून त्याने हरिकीर्तन करण्यास आरंभ केला. त्या व्यवसायात त्याला चांगले यश मिळू लागले. हे त्याच्या शत्रूला सहन न झाल्यामुळे त्याने प्रसंग पाहून एकदा कानडकर याला पाण्यातून शेंदूर पाजला. त्यामुळे आवाज बसला. कीर्तनही अर्थातच बंद पडले आणि दारिद्र्यामुळे प्रपंचाची फारच ओढाताण होऊ लागली. त्यामुळे फार त्रासून जाऊन आत्महत्या करावी असेही विचार त्याचे मनात येऊ लागले. इतक्यात महाराज महत्पुरास आहेत हे समजल्यावरून तो तेथे गेला व महाराजांचे पुढे साष्टांग नमस्कार घालून त्याने अत्यंत दीनपणाने आपली झालेली दूरवस्था महाराजांना निवेदन केली आणि याबद्दल काहीतरी उपाय सांगावा अशी त्यांना विनंती केली. त्याची हकीकत ऐकून घेऊन महाराज म्हणाले, 'तू चार महिने आपणाजवळ रहा म्हणजे तुझी इच्छा पूर्ण

होईल.' हे ऐकून तो म्हणाला की, 'घरी प्रपंचाची अडचण असल्यामुळे आपणास आपले बरोबर राहता येणार नाही.' त्या मुलाची परिस्थिती जाणून महाराजांनी त्याला सांगितले की, तू आलोटला जा. तेथे आपण येणारच आहोत. तेथे आल्यावर भेट म्हणजे तुझे कार्य होईल. पुढे सूर्यग्रहणाचे सुमारास महाराज आलोटला गेले. तो मुलगा वाट पहातच होता. तो लगेच महाराजांचे दर्शनास गेला. तेव्हा त्याला महाराजांनीं एका वनस्पतीचा रस पिण्यास दिला व त्याच रसाने त्याचे जिभेवर एक मंत्र लिहून त्या मंत्राचा जप ग्रहणात करण्यास सांगितले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या मुलाने ग्रहण लागल्यापासून ते सुटेपर्यंत क्षिप्रा नदीच्या पाण्यात उभे राहून एकनिष्ठेने जप केला. त्याबरोबर त्याचा आवाज उत्तम, सुरेल होऊन बुद्धिही चांगली तरतरीत झाली. स्मरणशक्ति वाढली. 'तुझे काम झाले. तू आता जा.' असे महाराजांनी सांगताच तो महाराजांना वंदन करून आपले घरी निघून गेला. पुढे त्याचा कीर्तनव्यवसाय उत्तम प्रकारे चालू होऊन पैसा पुष्कळ मिळाला. सखाराम कानडकर पुढे कीर्तनाचार्य या नावाने ते प्रसिद्ध झाले.

आलोटहून निघून मार्गशीर्षात महाराज सांरगपुरास आले. खेचरी मुद्रेनिमित्त जिव्हा छेदनाकरितां गांडाबुवांना गुणाछावणी येथे डॉ. विश्वनाथराव ताटके यांचेकडे पाठविले होते. त्यांचे जिव्हाछेदन उत्तम पार पाडले. नंतर आप्पा निगडीकर व व्यंकटराव स्टेशनमास्तर हे दोघे डॉ. ताटके यांचेकडे जिव्हाछेदनाकरिता आले. जिभेखालची शीर तोडावयाची असते. हे काम फारच नाजूकपणाने झाले पाहिजे. तेथेच दुसऱ्या एखाद्या मोठ्या शिरेला धक्का लागला तर प्राण जाण्याचाच प्रसंग. आप्पा निगडीकर व व्यंकटराव यांचा खेचरीचा योग नव्हता असेच म्हणावे लागते. त्यांची शीर काढण्याचे काम चालू असता दुसरीच शीर तुटली आणि भयंकर रक्तस्त्राव होऊ लागला. डॉक्टरांनी रक्त थांबविणेकरिता पुष्कळ उपाय केले पण रक्तस्त्राव थांबेना. हे पाहून डॉक्टरांना भीती वाटून त्यांनी तार करून महाराजांना सर्व हकीकत कळविली. तेथून सांरगपूर चाळीस कोस. तार पोचताच महाराज

सांरगपूरहून निघून, दुसरे दिवशी गुणाछावणीस पोचले आणि दोघांच्याही जिभेची स्थिती एकदा पाहून त्यावर एक वनस्पती वाटून लावली. त्याबरोबर थोडक्याच वेळात रक्तस्राव थांबून दोघेही सावध झाले. हे महाराजांचे अद्‌भूत सामर्थ्य पाहून डॉक्टरांनाही मोठे आश्चर्य वाटले. व्यंकटरावांच्या जिभेखाली एक मांसाचा गोळा वाढला आणि अप्पांची शीर बरोबर तुटली गेली नाही, त्यामुळे त्या दोघांनाही पुढे खेचरी मुद्रेचा अभ्यास करून उपयोग झाला नाही. 'तुम्हाला अशक्तपणा आलेला आहे. सबब तुम्ही हवा मानवेल त्याठिकाणी जाऊन रहा. यापुढे आपणाबरोबर येऊ नका.' असे महाराजांनी सांगितले असताही ती आज्ञा न मानता व्यंकटराव व अप्पा निगडीकर हे दोघेही महाराजांचे बरोबरच ब्रह्मावर्तास जाण्यास निघाले. गांडाबुवांनी भडोच मुक्कामी राहून योगाभ्यास सुरू केला. तेथून महाराज निघाले ते क्षेत्रवतीच्या तीरावर भेलसा या गावी येऊन काही दिवस राहिले. तेथे एक महाराजांचे भक्त गोविंदराव पंडित या नावाचे गृहस्थ होते. त्यांना त्यावेळी महाराजांनी योगाभ्यासाचे शिक्षण दिले.

महाराज सारंगपुरास होते, तेव्हा सावंतवाडीच्या मंडळींनी, इकडील भागात येणे कधी होईल ? असे विचारले होते. याबद्दल महाराजांनी जे पत्र पाठविले ते असे, 'पौ. ३० नारायण. हा देह तिकडे येण्याची इत्यादि इच्छा करणेची गरज नाही.' क्षणभंगुर नश्वर देहापेक्षा यशःकाय कायम रहाणार नाही काय ? (जयति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः । नास्ति येषा यशःकाये जरामरणजंभयम्) जरी यशःकायाने शंकासमाधान भाषाणादिक कसे घडेल ? म्हणणे तर प्राकृत लोकांकरिता भक्ति ज्ञानरसभरित दत्तमाहात्म्य प्रसिद्ध झाले आहे. शिवाय संस्कृत, प्राकृत अनेक ग्रंथांची प्रसिद्धी झाली. तेणे शंकासमाधान होईल, नारायण !'

भेलशाहून निघून महाराज जालवण मुक्कामी आले. तेथे सरकारी देवळात चार महिने वास्तव्य झाले. तेथील काही वयोवृद्ध विद्वान मंडळीना अरणे म्हणावयाची होती. पण आजपर्यंत सांगणारा कोणी योग्य मनुष्य सांगणेस भेटला नव्हता. महाराज ईशकृपेने तेथे आल्याबरोबर

सर्वांना आनंद होऊन सर्वांनी महाराजांचे जवळ अरणे व उपनिषदे म्हटली व त्याचा अर्थही समजावून घेतला. श्रीदत्तमहाराजांनीच महाराजांच्या रूपाने येऊन ही आपली फार दिवसांची इच्छा पूर्ण केली असे त्या मंडळीना वाटले. त्या गावात काही ग्रामण्यानिमित्त बरेच दिवस दोन तट पडले होते. हे पाहून महाराजांनी सांगितले 'तुम्ही दोनही पक्षांच्या मंडळींनी मनातील वैरभाव टाकून जर एकी केली तरच आपण येथे राहू.' हे महाराजांचे स्पष्ट मत पाहून शेवटी सर्व मंडळीनी एकी करण्याचे ठरविले. तेथे महाराजांचा शिष्य बाळा जोशी म्हणून होता. त्याने दत्तजयंतीचे दुसरे दिवशी पारण्याकरिता गावातील दोनही पक्षांचे मंडळींना एकवाक्यता करून एकत्र भोजनास नेले आणि हे फार दिवसांचे ग्रामण्य पूर्णपणे संपले. जालवण्यास पुष्कळ मंडळींनी महाराजांचा अनुग्रह घेतला. तेथे दत्तउपासना सर्वांची सुरू झाली. तेथील मंडळी गुरुद्वादशी व दत्तजयंती यादिवशी पादुकांचे पूजन करून चांगला उत्सव करतात. जालवणाहून महाराज ब्रह्मावर्तास जाण्याकरिता निघाले. अप्पा निगडीकर व व्यंकटराव यांना आज्ञा नसतानाही महाराजांचे बरोबर निघाले.

चातुर्मास १२ ब्रह्मावर्त – शके १८२४

ब्रह्मावर्त क्षेत्रात चैत्र शु ॥ १३ स दुपारच्या वेळी महाराज येऊन पोचले. ही येथे येण्याची तिसरी खेप. यावेळी याठिकाणी अडीच वर्षे मुक्काम झाला. म्हणजे लागोपाठ तीन चातुर्मास येथे झाले. अंताजीपंत यांच्या घाटावरील राम मंदिरातच महाराज रहात होते. दोन खोल्या व मध्ये सोपा असे घरासारखेच हे राम मंदिरात आहे. महाराज आले असे समजल्याबरोबर पूर्वीची सर्व मंडळी दर्शनास धावून आली. कुशल प्रश्न वगैरे झाल्यावर सर्वांना आजपासून अध्ययनाकरिता या असे त्यांनी सांगितले. नंतर गंगेवरून महाराज स्नान करून आले व नित्यकर्म आटोपून भिक्षेस गेले. तीन घरची भिक्षा आणून ती सेवन केली. इतक्यात अध्ययनाकरिता मंडळी आलीच. त्यांच्या त्याच्या आवडीप्रमाणे उपनिषदे, भाष्य, पंचदशी, जीवन्मुक्तिविवेक, मनुस्मृति इत्यादि विविध

ग्रंथांचे अध्यापन महाराज करीत असत. लहान मुलांना संध्यादि ब्रह्मकर्म व काही काव्यही सांगत असत. वैदिक मंडळीही तेथे येऊन पदे सर्वानुक्रम वगैरे शिकत. काही लोक योगाभ्यास शिकत तर काहीना वैद्यकाचेही शिक्षण महाराजांचेकडून मिळत असे. एक दिवस मुलांना समासचक्र शिकविण्याचे काम चालू होते, त्यावेळी 'कृष्णश्वासौ सर्पश्च कृष्णसर्पः' हे मुलांना सांगता सांगताच महाराजांना समाधि लागली. कोणी रोगी अल्यास त्याला औषधेही देण्याचे काम चालू होते. हा खर्च व्यंकटराव वगैरे मंडळी करीत. पिशाच्च बाधा, रोगपीडा वगैरे जाण्याकरिता यंत्रे लिहून देत. मंत्र तंत्रही सांगून अनुष्ठानही करवून घेत असत. शकुन, प्रश्नपत्रिकाही पाहण्याचे काम मधून मधून चालू असे. श्रीमद्भागवत एकादशस्कंधावर तिसरे प्रहरी पुराण होत असे. त्यावेळी विषय नीट समजावा म्हणून पाच सहा मंडळी पोथ्या घेऊन श्रवणास येत असत. भक्ति, ज्ञान, वैराग्य या गुणांची वाढ लोकांमध्ये व्हावी या उद्देशाने पुराण चालू होते. या श्रवणाने पुष्कळ मंडळी परमार्थ मार्गाकडे वळली होती. संध्याकाळी महाराज भक्तांचेकडून आलेल्या पत्रांना उत्तरे स्वतः लिहून पाठवीत असत.

द्वारकेकडे जात असता मध्ये बरेच दिवस भिक्षा न मिळाल्यामुळे खारीक, खोबरे असे खाऊनच महाराजांना काल काढावा लागला. त्यामुळे संग्रहणीचा विकार जडला होता. ब्रह्मावर्तास पाणी पिण्यात आल्यामुळे तो विकार बळावला, त्यामुळे शौचाला वारंवार जावे लागत असे. शौचास जाऊन आल्यावर प्रत्येक वेळी थंड पाण्याने स्नान होत असे. संकेश्वर करवीर मठावरील विद्यमान् शंकराचार्य गुरु स्वामिमहाराज शिरोळकर हे त्यावेळी आपल्या पूर्वाश्रमात ब्रह्मावर्तास महाराजांचे सान्निध्यात राहाण्याकरिता मुद्दाम गेले होते. त्यांनी त्यावेळी प्रत्यक्ष पाहिलेली स्थिती सांगितली. ती अशी -'ब्रह्मावर्तास उन्हाळ्यात गंगा नदीचा प्रवाह घाटापासून बराच दूर गेलेला असतो. महाराजांनी शौचास जाऊन यावे आणि भर दोन प्रहरी ती तापलेली वाळू तुडवीत प्रवाहापर्यंत जाऊन स्नान करून परत यावे. पुन्हा शौचाला गेले की तशीच पद्धत. ज्या

तापलेल्या वाळूकडे नुसते दुपारी पाहणेसुद्धा असह्य, अशी वाळू दोन तीन फर्लांग तुडवीत शांतपणाने जावयाचे व परत तसेच शांतपणे यावयाचे. एवढे दृश्य पाहूनच 'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः' ही जीवन्मुक्त स्थिती महाराजांची होती हे सहज सर्वांच्या लक्षात येत होते. अशा ब्रह्मनिष्ठ, देहावर त्यांची बिलकूल आसक्ति नाही अशा महात्म्याच्या दर्शनाने व भाषण, सान्निध्य इत्यादिकांचा लाभ ईशकृपेने झाल्याने आम्ही धन्य झालो.' ही ब्रह्मावर्तास घडलेली हकीकत श्रीशंकराचार्य महाराज प्रेमार्द अंतःकरणाने अद्यापिही सांगत असतात. महाराज औषध तर कधीच घेत नसत. फक्त ताक तेवढे घेत असत. इतका शौचाचा नित्य उपद्रव होत असूनही नित्य व्यवसायात खंड कधीच पडला नाही. एके दिवशी फार रक्त पडले. त्यावेळी महाराज म्हणाले, 'आज देह हलका झाला. १५ खेपा झाल्या.' या स्थितीबद्दल खिन्नता कधीच नाही. याबद्दलचे महाराजांचे एक बोधप्रद पत्र पुढीलप्रमाणे आहे -

'ब्रह्मावर्त. पौष शु॥ २ शके १८२४. नारायण. द्वारकेस जातेवेळी रस्त्यांत ३३दिवस भिक्षा न झाली व कोठे कोठे कोणी खजूर, खोबरे दिले. त्या सेवनाने काही दिवस रक्त पडून संग्रहणीवर आज तीन वर्षे पल्ला पोचला व पाणी प्यायल्यावर जास्त उपद्रव. हे जाणून ताकावर तीन वर्षे घालविली. गेल्या ज्येष्ठ शुद्ध द्वादशीस पाणी पिण्यात आल्याने जास्तीच उपद्रव जाहला व त्याचा प्रतिकार करण्याची मुळीच इच्छा नाही. कारण (भोगादेव क्षयः कार्योनान्यत्प्रारब्धकर्मणः) मग उगीच तन्निमित्तक विचार कशाला करावा ? देहबुद्धीनेही कदाचित् पाहिले तरी ही 'क्षुद्रव्याधिश्वचिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यताम्' यापरता दुसरा विचार करावयास नकोच. कादाचित् कोणी म्हणेल की शरीरकष्टाने ईश्वराचे भजन तरी कसे घडेल ? तर स्वल्पोपद्रवाने भजनाला आज अडथळा येईल तर अंती 'शतवृश्चिकदष्टस्य या पीडा सऽनुभूयते' अशा कष्टात तरी 'अंतकाले च मामेव' इत्यादि कसे घडावे ? तर हा दृढ होण्याचा कित्ताच गिरवला जातो. कळावे, नारायण !'

वरील पत्रावरून देहादिकाविषयी महाराजांची अनासक्ति लक्षात

येईल. वैशाख महिन्याच्या अखेरीस महाराजांचे पूर्वाश्रमातील कनिष्ठ बंधू सीतारामभट (भलोबा) हे महाराजांचे दर्शनास येऊन तेथेच राहिले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे येथे सीतारामबुवांनी गायत्री पुरश्चरण केले. येथे राहणारे व्यंकप्पा नावाचे एक गृहस्थ महाराजांचे बरोबर एके दिवशी फार कडक्याक्याने भांडले. महाराज स्वस्थ ऐकत होते. महाराजांच्या बरोबरची लहान दत्तमूर्ति त्या राममंदिरातच रामचंद्राचे मूर्तीजवळच ठेवलेली होती. तेथेच तिची नित्य पूजा होत असे. याप्रमाणे आषाढ पौर्णिमेस गुरूपूजन करून शके १८२४ मध्ये बारावा चातुर्मास महाराजांनी ब्रह्मावर्तास केला.

रोज प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे ते ते विषय शिकविण्याचे काम चालू होतेच. त्याबरोबरच लहानमोठ्या शिकणाऱ्यांचेकडून मध्ये मध्ये कीर्तन करवून घेत, पुराण सांगून घेत व ते ऐकण्यास तेथे स्वतः बसत असत. अत्यंत हौसेने सर्वांना शिकवून ते कौतुकही पाहाण्याकरिता स्वतः तेथे असावयाचे ! खरा ब्रह्मानिष्ठ पुरूष सर्वही व्यवहार अगदी साक्षेपाने करतो. त्यात यत्किंचितही न्यून होऊ देत नाही, याचे उदाहरण म्हणजे महाराजांचे दिव्य चरित्र आहे. कीर्तनाकरिता पूर्वरंग व आख्यानाची पदे स्वतः तयार करून देत असत. याप्रमाणे त्यावेळी सात आठ मंडळी कीर्तन पुराणात तयार झाली होती. यांपैकी रामचंद्र खरे, शंकरशास्त्री शिरोळकर (हे पुढे संकेश्वर करवीर मठाचे शंकराचार्य झाले), गोपाळ राजाध्यक्ष अशी बरीच मंडळी होती. त्या प्रसंगाने महाराजांनी तेथे पुष्कळ पदे, कविता, स्तोत्रे इत्यादि तयार केली. रामचंद्र खरे हा नित्य स्नान संध्यादि अनुष्ठान करून माधुकरी मागून ब्रह्मावर्तात राहात असे. याचे मनात महाराजांचे विषयी अत्यंत पूज्यता बुद्धी असल्यामुळे महाराजांनी तयार केलेली आख्याने पूर्वरंग पाठ करून याने कीर्तन करीत असावे. वालावली येथील पूर्वाश्रमांतील जयरामशास्त्री उपाध्ये-प्रज्ञानानंद सरस्वती नावाचे संन्याशी ब्रह्मावर्तास महाराजांचे जवळ राहिले होते.

गोपाळ राजाध्यक्ष म्हणून एक गौड ब्राह्मण रत्नागिरीकडचा राहाणारा होता. तो बदरीनारायणाची यात्रा करून ब्रह्मावर्तास येऊन राहिला होता. माधुकरी मागून दत्तभजन करण्यात काळ घालवीत असे.

महाराजांची सर्वत्र पसरलेली कीर्ति ऐकून त्याला महाराजांचे दर्शन केव्हा घडेल अशी सारखी तळमळ लागली होती. त्याच्या पूर्वपुण्याने त्याला त्याच ठिकाणी महाराजांचे दर्शन झाल्यामुळे अत्यंत आनंद झाला. महाराजांच्या संगतीत त्याचा काळ आनंदात जाऊ लागला. एकदा त्याने 'आपणांस कीर्तन करण्याची फार हौस आहे, तरी ती महाराजांनी पुरवावी' अशी प्रार्थना एकांतात महाराजांना केली. अधिकार नसताही महाराजांच्या कृपेने त्याची इच्छा पूर्ण झाली. त्याच्याकडून महाराजांनी कीर्तन तयार करवून एकादशीस त्याचे कीर्तन करवूनही घेतले. तो जेव्हा कीर्तन करण्यास उभा राहिला तेव्हा हा 'मधुकऱ्या काय कीर्तन करणार ?' असा लोकांनी प्रथम त्याचा उपहास केला. पण त्याने महाराजांचा पूर्ण आशीर्वाद ग्रहण केलेला असल्याने प्रथमपासूनच रंगदेवता प्रसन्न होती. हे पहिलेच कीर्तन ऐकून सर्व लोक आश्चर्यचकित झाले. पुढे पुढे स्वतःच गुरुचरित्रांतील कथानकावर राजाध्यक्षांनी आख्याने तयार करावीत व ती महाराजांना वाचून दाखवून ती कीर्तने करावीत असा क्रम चालू झाला.

नरसोबावाडीजवळ शिरोळ येथील राहणारे शंकरराव कुळकर्णी यांचा ड्राईंगचा अभ्यास पूर्ण झाला होता. घरचीहि परिस्थिती उत्तम. पण त्यांना विरक्ती उत्पन्न झाल्यामुळे असलेली उत्तम नोकरी सोडून देऊन ते औंधला राहू लागले. रोज ज्ञानेश्वरी, दासबोध असे संतांचे ग्रंथ वाचण्याचा त्यांना नाद होता, ते पुढे काशीस गेले तेव्हा ज्ञानेश्वरीतील योगनिरूपण वाचून त्यांना योगाभ्यास करण्याची इच्छा झाली. कोठे जावे या विचारात ते असता तारकमठातील प्रज्ञानंदसरस्वती यांनी त्यांना सांगितले, 'ब्रह्मावर्तास वासुदेवानंदसरस्वती हे योगी पुरूष राहतात, तेथे तुम्ही चला.' हे ऐकून शंकरराव कुळकर्णी ब्रह्मावर्तास आले व महाराजांना साष्टांग नमस्कार करून आपली योगाभ्यासाची इच्छा महाराजांचेजवळ निवेदन केली. त्यावेळी महाराजांनी त्यांना योगाभ्यास सांगण्याचे कबूल करून षट्क्रिया शिकविल्या व त्यांना सांगितले 'खरा आनंद वेदान्ताच्या अभ्यासावाचून मिळणे शक्य नाही, पण वेदान्तग्रंथ संस्कृतमध्ये आहेत.'हे ऐकून शंकरराव म्हणाले, 'मी आपल्याजवळ

राहतो. मला आपण सर्व शिकवावे.' नंतर महाराजांनी त्यांना नारायणशास्त्री एकसंबेकर यांचेकडे जावयास सांगितले. मग शंकरराव एकसंबेकरांकडे आले व त्यांनी त्यांना महाराजांची आज्ञा सांगितली. त्याप्रमाणे नारायणशास्त्रींनी त्यांचेकडून प्रथम वेदाध्ययन करवून घेऊन शास्त्राभ्यासही त्यांना सांगितला. याप्रमाणे शंकरशास्त्रींचे ब्रह्मावर्तास पूर्वी राहणे असता त्यांना महाराजांनी आख्याने, वेदान्त निरूपणारूप अशी करून दिली. त्यावरून दर एकादशीस शंकरशास्त्री ब्रह्मावर्तास कीर्तन करीत असत. केशवशास्त्री जोशी यांचेकडे स्वतः हातानी लिहिलेली ब्रह्मसूत्रभाष्याची पोथी महाराजांनी दिली आणि ती पोथी शंकरशास्त्रींना द्यावी असे त्यांना सांगितले. ती पोथी शंकरशास्त्रींची भेट न झाल्यामुळे केशवशास्त्रींनी वाडीस दीक्षित महाराजांचेकडे ठेवली होती. पुढे एक दीड वर्ष ती तेथेच होती. पुढे वाडीस महाराजांचे दर्शनार्थ शंकरशास्त्री आले असता ती पोथी त्यांना महाराजांनी देवविली. पुढे थोड्याच दिवसात मार्कंडेय ब्रह्मचारी यांचेकडून श्रृंगेरीची हकीकत समजल्यावर शंकरशास्त्री तिकडे शास्त्राभ्यास करण्यास गेले. तेथे न्यायवेदान्तादि शास्त्रांचा अभ्यास करून परत आल्याबरोबर पुढे थोडक्याच दिवसांत त्यांना जगद्गुरु पीठावर बसण्याचा योग आला. त्यामुळेच आपणांला महाराजांनी सूत्रभाष्याची पोथी दिली असे ते वारंवार म्हणत असत.

ब्रह्मावर्तास दीपावळीचा सण आला. तेव्हा दत्तमूर्तीच्या पूजेकरिता पंचामृतादि पूजासाहित्यांनीं भरलेली पाच पन्नास ताटे मंडळींनी आणली आणि दत्तमूर्तीची अत्यंत प्रेमाने पूजा केली. सुगंधित फुलांचा तर मोठा ढीगच पडला होता. मूर्ति लहान असल्याने ती फुलांचे राशीत बुजून जाई. पुन्हा ती काढून वर ठेवावी व पुन्हा फुले घालावीत असा क्रम चालला होता. उत्सवात भजन, कीर्तन, पुराण इत्यादि कितीतरी कार्यक्रम नित्य चालू होते. गावातील सर्व उत्सवापेक्षा महाराजांच्या दत्तमूर्तीचा उत्सव फारच मोठा झाला. ते पाहून महाराजांचेवरील ईशकृपा सर्वांचे लक्षात आली. सर्व मंडळींनी अत्यंत प्रेमाने त्या दत्तमूर्तीचे पूजन केले. महाराजांचे अंतःकरणातही उपास्यदेवतेविषयी उत्कट प्रेम होते. त्यामुळे

प्रभूंनीच भक्तवात्सल्य प्रकट करण्याकरितांच आपला उत्सव मोठ्या थाटाने करून घेतला. पुढे दत्तजयंतीचा उत्सव तर यापेक्षाही मोठ्या प्रमाणात झाला. गुरुचरित्राचे दहा वीस पाठ, भजन, कीर्तन इत्यादि अनेक कार्यक्रम सारखे चालू होते. श्रोते मंडळींना त्या कार्यक्रमामुळे स्वयंपाक, जेवण, झोप याकरिता सुद्धा वेळ मिळेना. काही काही श्रोते मंदिरातच सारखे पडून असत. शेवटच्या दिवशी समाराधना होऊन चार पाचशे पान झाले. रात्री लळीत झाले. दुसरे वर्षी विश्वेश्वराचे मंदिरात हा उत्सव झाला.

ब्रह्मावर्तास सुभेदार म्हणून एक कण्वशाखीय घराणे चांगले श्रीमंत होते. त्यांचे वाड्यातील छत्रात एकदा ४/५ बैरागी अन्नाकरिता आले व जाताना त्यांनी तेथील काही लाकडे न विचारता नेली. त्यामुळे सुभेदरांनी त्यांना तुरुंगात घातले. जाताना ते बैरागी मालकाजवळ येऊन संतापाने म्हणाले 'आम्हाला त्रास दिल्याबद्दल ईश्वर तुझे हाल हाल करील' असे बोलून ते गेले. यानंतर सुभेदारांचे वडील बंधू मरण पावले. एके दिवशी मध्यरात्रीच्या वेळी एक स्त्री सुभेदारांच्या वाड्यातून बाहेर पडून रडत रडत गंगाकिनाऱ्याकडे गेली. महाराजांनी ती कोण होती ते ओळखून दुसरे दिवशी सुभेदारांचा पुतण्या आल्यावेळी त्याला महाराज म्हणाले, 'माधवराव ! काल रात्री लक्ष्मी तुमच्या वाड्यातून बाहेर पडून रडत रडत निघून गेली. तरी यापुढे फार सावधगिरीने वागावे.' हे महाराजांचे बोलणे ऐकून तो खिन्न झाला. एकदा ग्वाल्हेर येथील गोपालाचार्यांचे एक शिष्य महाराजांचे दर्शनास आले. नित्याप्रमाणे महाराजांचे पुराण चालू असता मध्येच त्या शास्त्रीबुवांनी महाराजांचे सांगणे व्याकरणशास्त्राच्या विरूद्ध आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केला. पण महाराजांनी अनेक ग्रंथांचे आधार दाखवून, सौम्यपणानेच आपण केलेले समास व अर्थ योग्य मानण्यास हरकत नाही असे त्यांना सांगितल्यावर त्या शास्त्रीबुवांचे समाधान झाले. नंतर पुन्हा रात्री त्या शास्त्रीबुवांनी महाराज एकटेच आहेत असे पाहून विचारले की, 'महाराज ! आपण संन्यासाश्रमी असता मूर्तिपूजा का करता ? संन्याशाने मूर्तिपूजा करावी याबद्दल शास्त्राधार कुठे

आहे ? आपण गायत्रीजप करतो पण मूर्तिपूजेवर तर आपला बिलकुल विश्वास नाही ! हे शास्त्रीबुवांचे म्हणणे महाराजांनी शांतपणाने ऐकून घेतले आणि त्यांना महाराज म्हणाले की, 'शास्त्रीबुवा ! निर्गुण उपासनेचा अधिकार ज्याने मिळविला त्याने सगुण उपासना केलीच पाहिजे असे नाही. आपला अधिकार मोठा असल्याने आपणाला मूर्तिपूजा करण्याचे कारण नाही. पण ही मूर्तीच आम्हाला सोडून जात नाही. मग आम्ही पूजा करावी किंवा न करावी ते आता तुम्हीच सांगा.' असे महाराजांचे म्हणणे ऐकून शास्त्रीबुवांनी महाराजांना सांगितले 'आपणच मूर्तीला सोडून द्या म्हणजे झाले.' हे शास्त्रीबुवांचे म्हणणे ऐकून 'बरे तसे करु' असे त्यांना सांगून त्यांचे समाधान केले. पुढे एके दिवशी शास्त्रीबुवांना घेऊन महाराज गंगेवर गेले. बरोबर दत्तमूर्ति घेतलीच होती. स्नान केले आणि ती मूर्ति गंगेच्या प्रवाहात ठेवून महाराज तीरावर आले मात्र, तो इतक्यात चमत्कार असा दिसून आला की, जलप्रवाहांत समर्पण केलेली ती अंगुष्ठप्रमाणे दत्तमूर्ति महाराजांच्या समोर येऊन तयार ! हे पाहिल्याबरोबर मात्र शास्त्रीबुवांचा निर्गुणोपासनेबद्दल असलेला अहंकार लयाला जाऊन ते सगुणोपासना करू लागले. नामदेवादि भक्ताप्रमाणे महाराजांचे बरोबर देव खरोखरच बोलतात अशी त्यांची खात्री झाली. या त्यांच्या वागण्याने लोकांच्या मनात त्यांच्याविषयी श्रद्धा उत्पन्न झाली. पुढे दशाहारात शास्त्रीबुवांना पुराण सांगणेची इच्छा झाली. परंतु दुसऱ्या कोणत्या तरी मंदिरांत सांगावे, कारण येथे महाराजांचे पुराण चालू आहे, असा त्यांनी विचार केला. पण महाराजांनी रामंदिरांतील आपले चालू असलेले पुराण बंद करून तेथेच शास्त्रीबुवांना पुराण सांगण्यास सांगितले व आपण स्वतः पुराण श्रवणास बसले. श्रोतृवर्ग अन्यत्र येणार नाही म्हणून येथेच पुराण करविले. 'समः सर्वोपकारकः' हे साधूलक्षण या चरित्रावरून लक्षात येईल. हे महाराजांचे दिव्य चारित्र्य पाहून शास्त्रीबुवा मात्र महाराजांचे निस्सीम भक्त झाले. दत्तजयंतीचा उत्सव झाल्यावर महाराज एकदा ध्यानस्थ बसले असता, त्या गावात प्लेग सुरू होणार याबद्दल महाराजांना एक दृष्य दिसले. काही पिशाच्च मंडळी यवनरूप घेऊन आपल्या पदरात

असलेला पदार्थ गावभर फेकण्याचे काम करीत आहेत असा देखावा महाराजाना दिसला. त्याचवेळी त्यांचेपैकी एक यवन महाराजांचेकडे येऊन त्यांना म्हणाला 'उद्यापासून या गावावर आमचा हल्ला होणार आहे, तरी आपण हे गाव सोडून दुसरीकडे चला.' असे त्यांचे म्हणणे ऐकून महाराज त्याला म्हणाले की 'ज्याचे आज्ञेने आपण येथे आलो त्याची आज्ञा झाल्याशिवाय आपणास येथून हालता येत नाही.' याप्रमाणे महाराजांचे व त्या मनुष्याचे वरीलप्रमाणे देवळात बोलणे झाले. ते ऐकून एका बाईने ग्रामस्थ मंडळींना सांगितले 'ईश्वराच्या अवकृपेमुळे या गावात लवकरच प्लेग सुरू होणार आहे. तरी सर्वांनी बाहेर राहण्यास जावे. ' हे समजल्याबरोबर पुष्कळ मंडळी बाहेर राहाण्यास गेली. काही गावातच राहिली. माधवराव हा सुभेदारांचा पुतण्या घरातच राहिला. शेवटी प्लेगने त्याची आहुती घेतली. पुढे त्याच्या बायकोने इस्टेटीचा वाटा मिळण्याबद्दल दावा केला; त्यांत खर्च बराच आल्याने सुभेदारसाहेबांना अत्यंत विपत्ति आली. साधूंचा शाप याप्रमाणे या युगातही नाशक होतो यांचे हे प्रत्यक्ष उदाहरण आहे. प्लेग कोणाला होणार ते महाराज अगोदरच सांगत असत. पण महाराजांचे न ऐकता लोभाने जे घरीच राहत ते मृत्युमुखी पडत. अशी दहावीस माणसे गेली. नंतर एकदा आप्पा निगडीकर यास प्लेग होणार असे महाराजांना सांगणे झाले. त्यांना भीति वाटेल म्हणून स्पष्ट न सांगता फक्त मृत्यूची चिन्हे तेवढी महाराजांनी सांगून ठेवली. पुढे अप्पांना प्लेग झाला व महाराजांनी सांगितलेली मृत्युलक्षणे आप्पांना दिसू लागली. तेव्हा आपणास संन्यास घेण्याची इच्छा असल्याचे आप्पांनी महाराजांना सांगितले. लगेच त्यांना आतुरसंन्यास देऊन पद्मासन घालून बसविले व त्यांच्याकडून तीन वेळा प्रेषोच्चार करवून घेतला. शेवटी दीर्घप्रणव व उच्चार करीत असताच अप्पांचे देहावसान झाले. त्यांच्या मरणाबद्दल महाराजांच्या एका पत्रांत प्रशंसोद्‌गार काढले आहेत. ते पत्र असे - ''पौ. वद्य ७ शके १८२४ चार वर्षे बरोबर आप्पा या नावाचे कर्नाटक ब्राह्मण होते. त्यांनी साबेसुबेपणी संन्यास घेऊन तत्काळ तीन वेळा प्रणव म्हणून दहोत्सर्ग केला. हे मरण योग्यांनासुद्धा दुर्मिळ.

कळावे. नारायण.'' आप्पांच्या देहाचे विसर्जन झाले. इतक्यात महाराजांनाही प्लेगने गाठले. त्या रोगाचे तेथे काही चालले नाही हे निराळे. 'आपण उपास्यदेवतेच्या आज्ञेशिवाय ही जागा सोडून जाणार नाही.' असे स्पष्ट त्या रोगदेवतेस महाराजांनी पूर्वीच सांगितले होते. पण शेवटी तो रोग महाराजांच्या मुखावाटे निघून गेला आणि प्रकृति पूर्वीप्रमाणे झाली. महाराज प्लेगने आजारी असतानाच समश्लोकी गुरुचरित्र करण्याबद्दल त्यांना देवांची आज्ञा झाली व कशी रचना असावी वगैरे सर्व देवांनी सांगितले. त्याप्रमाणे समश्लोकी हा ग्रंथ ६७५० श्लोकांचा ४५ दिवसात तेथे पूर्ण झाला. या ग्रंथाबद्दल महाराजांचे एक पत्र आहे. ते असे - ''ब्रह्मावर्त चै. वद्य १३-१८२५. ब्रह्मावर्तास असताना गावात प्लेग असल्यामुळे सर्व लोक गावाबाहेर गेले. काही वृद्ध मात्र गावात राहिले होते. त्यावेळी तेथे समश्लोकी करण्याचे सांगणे झाले. तेथे एक लेखी जुने पुस्तक ५१ अध्यायांचे होते. त्यावरून संस्कृत करण्याचे सांगणे झाले. हे मोठे काम कधी व कसे संपावे असे त्यावेळी मनात येताच पुन्हा सांगणे झाले की, तूर्त पाठ वगैरे देण्याचे नसल्यामुळे २००/२५० श्लोक होऊन महिना सव्वा महिन्यात ग्रंथ पुरा होईल. असे म्हणून सुमारे ६७५० श्लोकसंख्या दाखविली. नंतर त्या गुरुचरित्राची जास्त संख्या पाहून ६/२६/३६/३७/४१/४२ या अध्यायांतील ओव्या अर्थानुसंधानास अडचण न येणाऱ्या कमी करून समश्लोकी केल्यावर संख्या भरते. तरी कसे करावे काय अशी प्रार्थना केल्यावर तसे करण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणे ग्रंथ झाला. आता कमीजास्त करता येत नाही.'' हा ग्रंथ कसा होत गेला याबद्दल ग्रंथाच्या शेवटी दोन श्लोकात महाराजांनी सांगितले आहे की, 'प्रत्येक दिवशी शंभरपेक्षा अधिक श्लोक झाले. त्यातच पाच दिवस, तर दोनशेपेक्षाही अधिक श्लोक तयार झाले.' अशा अर्थाचा उल्लेख आहे. दोनशे श्लोक एका दिवसात नुसते लिहून सुद्धा होणार नाहीत. मग त्यांची नवीन रचना तर दूरच राहिली. शिवाय रोजचे प्रासंगिक कार्यक्रम,आजारीपण अशी एकंदर स्थिती असताना इतकी श्लोकरचना रोज होत असे. यावरून महाराजांच्या दिव्य शक्तीची कल्पना

कोणासही येऊ शकेल. ब्रह्मावर्तास महाराजांचे पूर्वाश्रमातील बंधू सिताराम ऊर्फ भलोबा येऊन राहिले होते. त्यांनी महाराजांचे आज्ञेप्रमाणे तेथे गायत्रीपुरश्चरण केले. महाराजांनी माणगाव सोडल्यापासून त्यांची व सितारामबुवांची हीच प्रथम भेट. त्यावेळचे एक महाराजांचे पत्र असे - ''येथे भला येऊन पाच महिने राहिला आहे. पूर्वीचा दैवयोग काय होता तो असो. पण तूर्त येथे वेदान्ताचे पाठ चालतात. त्याबरोबर श्रवणाचा व पठणाचा उद्योग बराच चालविला आहे. त्याला जा अथवा रहा असे काहीच सांगितले नाही. चार पढतात त्यात का पढेना ? सन्मार्ग आहे व गंगास्नान होत आहे. नारायण.''

ब्रह्मावर्तास आप्पा खाडिलकर म्हणून एक ब्राह्मण होता. त्याला एकदा रक्ताची हगवण सुरू होऊन तो फार अशक्त झाला. त्यावेळी त्याच्या आईला कोणी तरी असा उपाय सांगितला की 'तुम्ही पंचपक्वाने तयार करून ते अन्न मुलावरून उतरून कोणास तरी खावयास घाला म्हणजे तुमचा मुलगा बरा होईल.' हे ऐकून आप्पाच्या आईने तसे अन्न आपल्या मुलावरून उतरवून व्यंकटरावाला भिक्षेला बोलावून खाऊ घातले. याने आप्पाला बरे वाटले. पण व्यंकटरावाला तो अप्पांचा रोग जडला आणि तो दिवसेंदिवस अशक्त होत चालला. 'तू उतार खाल्यामुळे तुझी ही अवस्था झाली आहे. तू यातून बरा होशील असे काही दिसत नाही.' असे महाराजांनी व्यंकटरावास सांगितले. व्यंकटरावाने बरे होण्याकरिता पुष्कळ उपचार केले; पण त्याला यश आले नाही. शेवटी दम्याची व्यथा जडून त्यांतच त्याचे देहावसान झाले. आप्पा निगडीकर व व्यंकटराव महाराजांची आज्ञा मोडून त्यांचेबरोबर आले होते. त्यामुळे दोघांचीही अशी दशा झाली. ब्रह्मावर्तासच महाराजांनी 'लघुमननसार' या नावाचा वेदान्तावर ग्रंथ लिहिला. महाराजांचे पूर्वाश्रमातील दुसरे बंधू हरिभट उर्फ दत्तोबा हे ब्रह्मावर्तास महाराजांना भेटण्यास आले होते. ते येण्यापूर्वीच सितारामबुवा आले होते. त्यांच्याकडून मातोश्रींचे देहावसान झाल्याचे वृत्त महाराजांना जेव्हा समजले तेव्हा महाराजांनी लगेच स्नान केले. वैशाख शुद्ध ३ शनिवार शके १८२४ हा महाराजांच्या मातोश्रींचा

निर्वाण दिवस आहे. हरिभटजी आल्यावर त्यांना महाराजांनी सांगितले 'तुमच्याकडे आलेल्या कोनकरांच्या मिळकतीस शाप असल्यामुळे तिचा अभिलाष न धरता तुम्ही ती सोडून द्या. तसेच मातोश्री निवर्तल्यामुळे तेथील पुण्याई संपली आहे, याकरिता माणगावास आता काही राहणार नाही.' असे महाराजांचे सांगणे ऐकूनही हरिभटजींनी कोनकरांची मिळकत सोडून न दिल्यामुळे टेंबे यांचा वंश राहिला नाही. पुढे काही दिवस लोटल्यावर प्लेग कमी होऊन चैत्र महिन्यापासून मंडळी गावात रहाण्यास येऊ लागली. तीन महिने गाव बाहेर होता. लोक जमल्यावर पूर्वीप्रमाणे सर्व कार्यक्रम सुरु झाले. प्लेग निवारणार्थ हरिभजन हाच उपाय आहे असे महाराजांचे सांगणे ऐकून तेथील मंडळींनी भजनसप्ताह चालू केले. सर्व मंडळी अहोरात्र निष्ठेने भजन करीत होती. महाराजांच्या दिव्य सामर्थ्याचा प्रभाव पाहून सुभेदार वगैरे श्रीमंत मंडळीही आनंदाने भजन करू लागून द्रव्यसाहाय्यही उत्सवाकरिता करू लागली. याप्रमाणे तेथे लागोपाठ सात भजनसप्ताह झाले. त्याकरिता महाराजांनी सांगितलेले नाममंत्र - १ सप्ताह- शिवहरशंकर गौरीशंकर. २ सप्ताह - हरेराम हरेराम राम राम हरे हरे । हरेकृष्ण हरेकृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे. ३ सप्ताह - श्रीपादश्रीनृसिंह-स्वामी । श्रीमद्दत्तात्रेयमौनी. ४ सप्ताह - गणेश गौरीहरनंदन । विघ्नविनाशन गजानन. ५ सप्ताह - हरिहर गणपती भास्करशक्ति स्वरूप ईशो वरदो जयति। ६ सप्ताह - जय पुरुषोत्तम । शरद सत्तम. ७ सप्ताह - शिवहरशंकर । गौरीशंकर. याप्रमाणे सात सप्ताह झाल्यावर 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या नाममंत्राचा सप्ताह केला. पुढे दशाहारार्थ भागीरथीप्रीत्यर्थ एक सप्ताह केला. 'भागीरथीशी जय पावन गंगे । जान्हवि तारय पातक भंगे' या मंत्राने तो नववा सप्ताह झाला. प्रत्येक सप्ताहसप्तमीचे वेळी मुक्तद्वार ब्राह्मणभोजन होऊन सांगता उत्तम होत असे. इतरही सर्वांना अन्नसंतर्पण होत असे. आषाढ पौर्णिमेस व्यासपूजा करून हा शके १८२५ चाही चातुर्मास महाराजांनी ब्रह्मावर्तासच केला.

चातुर्मास १३ ब्रह्मावर्त – शके १८२५

ब्रह्मावर्तास येऊन महाराजांना एक वर्ष होऊन गेले होते. 'नित्य-श्रीर्नित्यमंगलम्' सर्व काळ आनंदाचा सर्व मंडळींना जात होता. शके १९२४ प्रमाणे १८२५ चा चातुर्मासही येथेच झाला. एकदा एक बाई प्रसूतीचे वेळी अडली. त्यामुळे तिच्या घरची मंडळी महाराजांचे जवळ येऊन रडू लागली. महाराजांनी त्या सर्वांना आश्वासन देऊन, त्या बाईची काही मंत्रप्रयोगाने तात्काळ सुटका केली. याप्रमाणे महाराजांची कीर्ति सर्व ठिकाणी पसरल्यामुळे काशी, प्रयाग इत्यादि स्थानाहून तिकडे येण्याविषयी महाराजांना आग्रहाची पत्रे येऊ लागली. पण उपास्य-देवतेच्या आज्ञेवाचून महाराजांना कोठेच जाता येत नसल्याने येता येत नाही एवढेच उत्तर सर्व पत्रांना महाराजांचेकडून गेले. तेव्हा काशीस राहाणारे मोठे अधिकारी संन्यासी महाराजांचे दर्शनार्थ मुद्दाम काशीहून ब्रह्मावर्तास आले. हे मोठे उपासक व ज्ञानी असून चाळीस वर्षे भागवताचे अखंड सप्ताहरूपी तप त्यांचे झालेले होते. दोघेही अधिकारी पुरूष. एकमेकांना पाहिल्याबरोबर दोघांच्याही नेत्रातून आनंदाश्रूंचा प्रवाह सुरू झाला. तेथील अध्ययन वगैरे नित्य चालू असणारे कार्यक्रम पाहून शांताश्रमस्वामी तेथे इतके रमून गेले की, त्यांना महाराजांना सोडून परत काशीस जावे असे वाटेचना. त्यांचा मुक्काम तेथे चार महिने झाला. दूरदूरचे विद्यार्थी अध्ययनाकरिता महाराजांचेजवळ येऊन राहिले होते. तेथे कार्तिक महिन्यांत महाराजांनी सप्तशती गुरुचरित्र या नावाचा सातशे ओव्यांचा प्राकृत ग्रंथ तयार केला. गुरुचरित्रातील कथा यात साररूपाने दिलेल्या आहेत. प्रत्येक ओवीतील तिसरे अक्षर असे वाचले असता भगवद्गीतेतील पंधरावा अध्याय तयार होतो. तेथे अध्ययनाकरिता येऊन राहिलेल्या मंडळीत रत्नागिरी जिल्ह्यातील पालघरचा राहणारा विष्णुबुवा पटवर्धन म्हणून एक ब्राह्मण होता. याचे वय सुमारे तीस वर्षांचे होते. इंग्रजी शिक्षण काही झाले होते. बायको वारल्यामुळे त्रासून घरातून हा गृहस्थ बाहेर पडला होता. काशीहून महाराजांचे दर्शनार्थ विष्णुपंत येथे आले होते. यांचा स्वभाव प्रेमळ असून हे भजन-कीर्तन करीत असत.

एकदा हे कीर्तन करीत असता एक सुंदर स्त्रीला पाहून यांचे मनात दुष्ट वासना उत्पन्न झाली. कीर्तन संपल्याबरोबर सीताराम बुवांच्या नावाने चिठ्ठी लिहून ठेवून विष्णुपंत डोळ्यांना शिक्षा करण्याकरिता म्हणून रानात गेले व तेथे त्यांनी शेराचा व रुईचा चीक आपल्या डोळ्यात घातला. त्यामुळे डोळ्यांना इजा होऊन काही दिसेना. अन्न नाही, पाणी नाही अशी अवस्था झाली. रानात एका शिपायाने या ब्राह्मणाची ही मरणोन्मुख अवस्था पाहून याला बटाटे उकडून खाऊ घातले व गावात आणून सोडले. ही गोष्ट महाराजांना समजल्याबरोबर त्यांनी विष्णुपंतांची कानउघाडणी केली. विवेकानेच हळूहळू मन स्वाधीन करून घ्यावे. असे साहसाने नुसते बाह्य इंद्रियाचें दमन करणे योग्य नाही. अशा घोर कृतीचा काही उपयोग नाही, हा महाराजांचा अभिप्राय. शेवटी अंधारकोठडीत ठेवून उपचार केल्यावर विष्णुपंतांचे डोळे बरेच सुधारले. पुढे एके दिवशी ते बाहेर बसले असता डोळ्यात धूळ गेली. त्यामुळे पुनः बिघाड उत्पन्न झाला. नंतर तेथील सुभेदार वगैरे मंडळींनी त्याला कानपूर येथे सिव्हिल सर्जनकडे पाठविले. त्याची शुश्रुषा सीतारामबुवांनी करावी. इतक्यात बेळगाव भागातील वेंकटय्या, एक ब्राह्मणाचा मुलगा महाराजांची सेवा करण्याकरिता म्हणून ब्रह्मावर्तास आला. त्याला महाराजांनी सांगितले, 'विष्णुपंतांचे जवळ कानपुरास राहून त्यांची सेवा करावी, त्या अनाथ ब्राह्मणाची केलेली सेवा आपणास पोचेल.' ही महाराजांची आज्ञा मान्य करून तो मुलगा कानपुरात विष्णुपंतांचे सेवेकरिता येऊन राहिला. पुढे विष्णुपंतांचे डोळे बरे झाल्यावर ते दोघेही ब्रह्मावर्तास आले. तथापि डोळ्यात थोडी कसर राहिली होती. महाराजांनी त्यांना सांगितले - 'आता जरूरीपुरते तुमचे काम झाले आहे. नर्मदातीरावर ईश्वरभजन करून राहावे.' याप्रमाणे महाराजांची आज्ञा मान्य करून ते मंडलेश्वर येथे राहिले. विष्णुपंतांचा स्वभाव पूर्वीपासून हट्टी होता. पूर्वी पंढरपुरात एका गृहस्थाबरोबर भांडण झाल्यामुळे त्यांनी आपली जीभ कापून घेतली होती व नाशिकला असतानाही असाच भजनासंबंधी काही तंटा झाला व त्यावेळीही अशीच जीभ कापून घेतली. वेंकटय्या हा नंतर काही दिवस

महाराजांचे जवळ होता. त्याला काही शिक्षण दिले. नंतर आणखी काही भजनसप्ताह तेथे झाले. त्यापैकी एक नाममंत्र-'नृसिंहमूर्ते । जय हतभीते ।' असा होता. हनुमान जयंतीनिमित्त एक भजनसप्ताह झाला. त्यावेळचा नाममंत्र 'अंजनिसुता रुद्रावतारा । जय रामदूता भवभयवारा' असा होता. याप्रमाणे तेथे नित्य उत्सवाचा आनंद सर्व लोकांना मिळू लागला. पण महाराजांना फारच उपाधि होऊ लागल्यामुळे तिसऱ्या चातुर्मासात मौन धरण्याचे महाराजांनी ठरविले. त्यापूर्वी आपल्या जवळच्या दत्तमूर्तीची काहीतरी व्यवस्था करावी असा विचार महाराजांनी केला. त्यामुळे ती मूर्ति रुसून गंगेत जाऊन बसली. मूर्ती दिसेनाशी झाल्यावर महाराजांना बरे वाटले, बरे झाले, आपली उपाधि कमी झाली. पण इतक्यात गंगेकडून रडण्याचा आवाज कानी आला. त्या अनुरोधाने गंगातीरावर महाराज आले. तेथे शोध करताच ती मूर्ति सापडली. हे चरित्र पाहून महाराजांनी मूर्तिची व्यवस्था करण्याचा विचार सोडून दिला. पण उपाधीचा त्रास पाहून महाराज म्हणाले 'ही मूर्ति कोणी चोरून का नेत नाही ?' हे बोलणे वेंकटय्याने ऐकून त्याने ती मूर्ति नेली. ते महाराजांना समजल्यावर महाराज त्याला म्हणाले की 'नुसती मूर्ति मिळाली म्हणजे काम झाले नाही. ती नीट जपली पाहिजे. फुकटचा हत्ती मिळाला तरी तो पोसण्याची शक्ति नसेल तर काय उपयोग ?' हे महाराजांचे बोलणे लक्षात ठेवून वेंकटय्या त्या मूर्तिची पूजा करीत मंडलेश्वरी राहिला होता. पुढे तो मेल्यावर त्या मूर्तिचे काय झाले ते कळत नाही. मूर्ति नेली त्या वेळीच महाराज म्हणाले, 'ही मूर्ति जेथे जाईल त्याच्या सर्वस्वाचा नाश होईल. कारण आपणाइतकी पाळणूक कोणाकडूनही होणार नाही.'

चातुर्मास १४ ब्रह्मावर्त – शके १८२६

पूर्वी ठरविल्याप्रमाणे या चातुर्मासात आषाढ पौर्णिमेपासून महाराजांनी मौन धारण केले पुराणसुद्धा बंद होते. विशेष काही सांगणे असल्यास पाटीवर लिहून दाखवीत. बहुतेक सर्व काळ समाधीतच जात असे. दोन-तीन दिवसांनी केव्हा तरी भिक्षा होत असे. गोपाळराव

राजाध्यक्ष यांनी गुरुचरित्रातील कथानकांवर कीर्तनोपयोगी अशी आख्याने तयार केली व ती महाराजांना वाचून दाखविली. महाराजांनी 'नारायण' एवढेच शब्द उच्चारून समाधान दर्शविले. गंगेचा प्रवाह पलिकडे गेला व महाराजही येथून लवकर जाणार असे दिसू लागले. हे पाहून दुसरीकडे जाऊन राहण्यास त्याने महाराजांची आज्ञा मागितली. तेव्हा 'नेमावर येथे नागेश्वराच्या मंदिरात राहून गायत्री पुरुश्चरण करावे. खर्चास काही पाहिजे काय ?' असे त्याला पाटीवर लिहून सांगितले. त्याने आज्ञा मान्य करून निघण्याची तयारी केली. 'आपणास काही नको, फक्त पुनर्दर्शन व्हावे.' अशी विनंती राजाध्यक्षांनी केली. महाराजांनी बरे आहे असे दर्शविताच ते निर्दिष्ट स्थानी निघून गेले.

पुढे लवकरच महाराजांना आज्ञा झाली, 'नरसोबाचे वाडीची व्यवस्था फार बिघडली आहे. तेथे अनाचार चालू आहे, तरी तेथे जाऊन व्यवस्था करावी आणि आपली छाटी मिळेपर्यंत तेथे राहावे.' चातुर्मासानंतर काशीकडे जाण्याचा महाराजांचा विचार होता; पण इकडे जाण्याची आज्ञा झाल्यामुळे महाराज वाडीस येण्याकरिता ब्रह्मावर्तांहून चातुर्मास संपताच निघाले. सर्व मंडळीना वाईट वाटले. कानपुराहून मंडळी दर्शनार्थ आली होती. नमस्कार केल्यावर 'दत्तभजन करून आनंदी राहा' असे सर्वांना प्रेमाने सांगितले. नंतर ब्रह्मावर्तापासून जवळच सिद्धेश्वर नावाचे लिंग ब्रह्मदेवाने स्थापन केले आहे. त्या मंदिरात महाराज आले. ब्रह्मावर्तात राममंदिरासमोर गंगातीरावर एका झोपडीत महाराजांची तपश्चर्या चालू होती. ती झोपडी गंगेच्या प्रवाहात वाहून गेली. त्यानंतर त्याच जागेवर महाराजांचे स्मारक म्हणून सुभेदारांनी कायम स्वरुपाची कुटी बांधली आहे. तेथे एक दत्तमंदिरही हल्ली बांधले आहे. महाराज निघाले तेव्हा शिवदत्त नावाचा एक गृहस्थ महाराजांनी जाऊ नये म्हणून मंदिराच्या दारात आडवा पडून राहिला. पण ते केव्हा कसे निघून गेले हे त्याला कळले सुद्धा नाही. महाराज पुढे यमुनातीरावरील काल्पी गावात जाऊन नंतर जालवणास गेले. तेथे एक यवन महाराजांना शरण येऊन अनुग्रह करावा म्हणून त्याने विनंती केली. तेव्हा त्याला एक कुराणातील

वाक्य सांगून त्याचा जप करण्यास सांगितले. जालवणाहून महाराज झाशीस येऊन तेथून पिछोरा मुक्कामी आले. तेथे चार मुक्काम झाले. तेथे आपल्याजवळ असलेले सामान, धाबळी, कंथा, लहान भोपळ्याचा कमंडलू हे एका ब्राह्मणाकडे देऊन ते ब्रह्मावर्ती पाठविण्यास त्याला सांगितले. त्याप्रमाणे त्या सर्व वस्तू ब्रह्मावर्ती पाठविल्यावर महाराज रहात होते तेथे त्या वस्तू ठेवून तेथील मंडळी नित्य पूजा, उत्सव करू लागली.

पिछोराहून निघून महाराज रावेर या गावी आले. तेथे भिक्षेकरिता चिटणीस यांचे घरी गेले. तेव्हा चिटणीसांची मेहुणी अस्पर्श असल्यामुळे घराबाहेर एका मशिदीजवळ जाऊन उभी राहिली. लगेच तिचे शरीर अत्यंत जड होऊन ती आजारी पडली. ही हकीकत महाराजांना समजल्यावर शुद्धीनंतर पाचवे दिवशी तिला आपणासमोर आणण्यास महाराजांनी चिटणीसांना सांगितले. त्यादिवशी ती महाराजांचे दर्शनास आल्याबरोबरच ती मोठ्याने ओरडू लागली. 'तू कोण आहेस व या बाईस का धरलेस' असे महाराजांनी त्या पिशाच्चाला विचारले. तेव्हा या मशिदीचा मालक जिंद आहे. हे लोक माझ्या मशिदीजवळ राहातात. पण मशीद कधीच दुरुस्त करीत नाहीत. म्हणून मी या बाईस धरले. असे त्या पिशाच्चाने महाराजांना सांगितले. तेव्हा पुन: महाराज त्याला म्हणाले की, 'या बाईचा काहीच अपराध नसता केवळ तुझ्या मशिदीजवळ उभी राहिली इतक्याच कारणास्तव तू हिला त्रास देत आहेस, तरी तुला शिक्षा जरूर केली पाहिजे. आपण काही मशीद दुरुस्त करण्यास यांना सांगणार नाही.' तेव्हा त्याने अत्यंत काकुळतीस येऊन प्रार्थना केल्यावरून ती मशीद दुरुस्त करण्याविषयी चिटणीसांना आज्ञा केली. त्यांनी त्याप्रमाणे करताच तो जिंद निघून गेला. रावेरहून महाराज भेलसा या गावी आले. तेथे नरसोबावाडी येथील महाराजांचे प्रिय शिष्य दीक्षितस्वामी महाराजांना भेटले. दीक्षितांची पत्नी प्लेगने वारली व पुढे ते स्वत:ही प्लेगने आजारी झाल्यामुळे त्यांनी आतुरसंन्यास घेतला होता. दंडधारणाविधी आपल्या गुरुमहाराजांच्या हस्ते व्हावा अशी त्यांची इच्छा त्यांनी ब्रह्मावर्तास महाराजांना पत्राद्वारे कळविलीही होती. त्यावेळी महाराजांनी त्यांना

'देवाची इच्छा असेल तसे घडेल; वाडीसच राहावे' असे उत्तर पाठविले होते. पण दीक्षितस्वामींना तळमळ फार लागली. काहीच सुचेना. शेवटी सीतारामबुवांची तार आल्याबरोबर नुकतेच आजारातून उठले होते. तरी दीक्षितस्वामी तसेच गुरुमहाराजांचे दर्शनार्थ ब्रह्मावर्तास निघून आले. पण तेथून महाराज गेले असे समजताच शोध करीत ते निघाले असता भेलसा मुक्कामी त्यांना महाराजांचे दर्शन झाले. तेव्हा त्यांचे चित्त शांत झाले. वेत्रवती नदी 'स्नानसमयी व कलौ वेत्रवती गंगा' असे महाराज त्यांचेबरोबर बोलले. नंतर दीक्षितस्वामींना महाराजांनी सांगितले की, 'नरसोबावाडीस जाण्याबद्दल श्रीदत्तमहाराजांची आपणास आज्ञा झाली आहे. त्याप्रमाणे लवकर येणे घडेल. तुम्ही रेल्वेतून पुढे जावे.' ही महाराजांची आज्ञा झाल्यावर दीक्षितस्वामी वाडीस येऊन महाराज तेथे येणार असल्याची वार्ता त्यांनी सर्व मंडळींना सांगितली. त्याप्रमाणे वाडीतील सर्व मंडळी महाराजांची वाट पाहू लागली. भेलसाहून निघून महाराज हुशंगाबादेस आले. तेथे एकदा चार विद्यार्थी महाराजांच्या दर्शनास आले. त्यांनी विनंती केली की, आम्ही यावर्षी परीक्षेस बसणार आहोत. तरी पास होण्याकरिता काही उपाय सांगावा. हे ऐकून महाराज म्हणाले 'आपणास काही माहीत नाही. आपण काही ज्योतिषी नाही. आणखी कोणास तरी विचारा.' ते ऐकून त्या मुलांनी जयराम मुजुमदार यांचे द्वाराने पुन्हा आपली विनंती कळविली. तेव्हा प्रत्येकाला मंत्र सांगून रोज त्या मंत्राचा १०८ जप परीक्षा होईपर्यंत करण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्रद्धेने त्यांनी केल्यामुळे ती मुले पास झाली.

हुशंगाबादेहून हळूहळू प्रवास करीत एके दिवशी सकाळी दहा वाजण्याचे सुमारास महाराजांची स्वारी नरसोबावाडीस येऊन दाखल झाली. बरोबर फक्त दोन छाट्या, दंड, भोपळ्याचा कमंडलू व उपनिषदांची एक लहान पोथी इतके सामान होते. महाराज इतक्या लवकर येतील अशी कल्पना वाडीच्या मंडळींना नसल्यामुळे ती मंडळी स्वस्थ होती. महाराज एकदम श्रीदत्तपादुकांसमोर येऊन उभे राहिले. 'नमो ब्रह्मदेवा' हे पद म्हणून प्रार्थना केली व वंदन करून वरती श्रीनारायण-

स्वामींचे समाधीचे दर्शन घेऊन स्वामी ब्रह्मानंदाचे माडीवर जाऊन बसले. महाराज आले ही बातमी गावात समजताच पुजारी मंडळी दर्शनास आली. सर्वांचे नमस्कार झाल्यावर महाराजांनी कुशल विचारले. तास, दीड तास प्रेमाने बोलणे चालले होते. त्यादिवशी सकाळी मिरजेच्या घाटावर स्नान झाले होते. पुन्हा स्नान करून व काही नित्यकर्म, वेदपठण इत्यादि करून ध्यानस्थ बसताच समाधी लागली. तासभर या स्थितीत गेला. महाराजांना केव्हाही सहज समाधी लागत असे. वाडीस यावेळी झालेल्या ४८ दिवसांच्या मुदतीत बरेच वेळा समाधी लागली होती. समाधी उतरेपर्यंत सर्व मंडळी उभी होती. समाधीतून व्युत्थान झाल्यावर महाराज भिक्षेस निघाले. वाडीवर महाराजांचे विशेष प्रेम असल्यामुळे भिक्षेचा तीन घरांचा नियम या ठिकाणी न पाळता लोकांच्या समाधानार्थ अधिक घरांतून भिक्षा घेतली. भिक्षा झाल्यावर गावातील मंडळी महाराजांचेजवळ येऊन बसू लागली. संध्याकाळपर्यंत दर्शनाचा क्रम सारखा चालू होता. नारायणराव नंदगावकर म्हणून वाडीत त्यावेळी पोस्टमास्तर होते. त्यांना महाराजांच्या दर्शनाविषयी अतिशय तळमळ लागली होती व ते दर्शनाकरिता ब्रह्मावर्ताकडे जाणारही होते. इतक्यात त्यांना महाराजांचे दर्शन झाल्यामुळे मोठे समाधान वाटले. सायंसंध्ये-करिता महाराज कृष्णापंचगंगा संगमावर गेले. तेथून सुमारे आठ वाजता श्रीदत्तपादुकांचे दर्शन करून ब्रह्मानंदांच्या मठात आले. तेथेच नेहमी मुक्काम असे.

दुसरे दिवसापासून महाराजांचा उपदेश करण्याचा नित्यक्रम सुरू झाला. पहाटे चार वाजता उठून काही योगप्रक्रिया सांगत. नंतर सूर्योदयाचे पूर्वी शौचमुखमार्जनादि उरकून स्नान होत असे. नित्यकर्मे आटोपल्यावर खाली देवदर्शन करून वर मठात परत येत. नंतर कित्येकांना संध्यादि ब्रह्मकर्माचे शिक्षण देऊन कित्येकांना उपनिषदे सांगत. मध्यान्हकाळचे आन्हिक आटोपल्यावर तीनपासून सात घरातून भिक्षा घ्यावयाची. सर्वच प्रेमीमंडळी त्यामुळे क्रमाक्रमाने भिक्षेस जात असत, भिक्षा झाल्यावर ज्योतीष, वैद्यक, मंत्र, तंत्र इत्यादि विषयांचे प्रश्न पुढे येत. त्यांना सर्वांना

व्यवस्थित सांगणे होत असे. पुढे आलेल्या पत्रांची उत्तरे पाठविली जात. चार वाजल्यावर श्रीमद्भगवतातील वेदस्तुति व ब्रह्मस्तुति हे विषय सांगितले जात. तसेच गुरुचरित्राच्या टीकेतील कठीण विषयही विचारणाऱ्यांना समजावून दिले जात. सायंसंध्येकरिता संगमावर जात. तेथेही काही विषयांची चर्चा चालूच असे. श्रींचे पालखीची तिसरी प्रदक्षिणा सुरू झाल्यावर संगमाहून उठून देवाकडे यावे आणि तेथे वंदन करून वर मठात येणे होत असे. तेथे रात्री बारा एक वाजेपर्यंत मंडळी बसलेली असतच. नंतर अंगावरच्या छाटीवरच २-३ तास निद्रा होत असे. याप्रमाणे दीड महिना वाडीत नित्य आनंदोत्सव चालला होता. यावेळी महाराजांचे दर्शनास लांबलांबची मंडळी आली होती. त्यांच्या त्यांच्या कामनेप्रमाणे त्यांना उपाय सांगण्याचे काम नित्य चालू होते.

वाडीस महाराज येऊन सुमारे एक आठवडा होऊन गेला. पुढे एके दिवशी रात्रीचे वेळी, आपणास दंड देण्याविषयी दीक्षितस्वामींनी महाराजांना विनंती केली. शिष्यपरीक्षेचाच तो प्रसंग. महाराज त्यांना म्हणाले, 'तुम्हांला दंड देण्याबद्दल आपणास आज्ञा झालेली नाही, करिता तुम्ही दुसऱ्या कोणाकडून तरी दंड घ्यावा.' हे ऐकून दीक्षितस्वामींना फारच वाईट वाटले. त्यांनी महाराजांना आपला निर्धार शेवटी नाईलाजाने ऐकविला 'गुरुदेव, मला दंड करण्याची जर आपली इच्छा असेल तर आपणापासूनच मला दंड मिळाला पाहिजे, नाहीतर हा शिष्य दंडाशिवायच राहील. शिष्याची सर्व चिंता गुरुमाऊलीलाच आहे. यापेक्षा मी अधिक काय बोलणार ?' हा आपला निश्चय त्या आपल्या सर्वज्ञ गुरुनाथाजवळ निवेदन करून दीक्षितस्वामी रात्रभर अश्रू ढाळीत तेथेच उभे राहिले. 'जीवनाविणे मासोळी' प्रमाणे अंतरात सारखी तळमळ चालली होती. ती सर्वसाक्षी प्रभूला कळल्यावाचून कशी राहील ? पहाटेच्या सुमारास आपल्या अनुग्रहीत शिष्याला दंड देऊन कृतार्थ करण्याबद्दल महाराजांना देवांची आज्ञा झाली. 'महाराज आता उठतील. आपले भवितव्य गुरुमाउलीच्या इच्छेवरच सर्वस्वी अवलंबून आहे.' देवा ! माझे दुरित अद्यापि संपले नाही काय ? याप्रमाणे विचार करीत दीक्षितस्वामी

त्या वंदनीय सद्गुरुचरणांकडे अत्यंत दीन होऊन सारखे पाहात उभे होते. डोळ्यातून सारखा अश्रूप्रवाह चालू होता. पहाटे चार वाजण्याचा समय होता. इतक्यात 'स्वामी ! तुम्ही रात्रभर येथेच उभे आहात ? बरे तर आता तुमच्या इच्छेप्रमाणे दंड धारणाची तयारी करा. तुमची इच्छा पूर्ण होईल.' अशी श्रीगुरूंची अमृतमय वाणी कानावर पडल्याबरोबर दीक्षितस्वामीजींनी गुरुमाउलीच्या पायांवर मस्तक ठेवून ते तयारी करण्याकरिता आनंदाने निघून गेले. पूर्वसूचनेप्रमाणे कोलगावचे गणेश सातवळेकर यांनी दंड आणलाच होता. प्रायश्चित वगैरे सर्व विधी झाला. महाराजांनी दीक्षितस्वामीजींना दंड दिला व त्यांचे नांव 'नृसिंहसरस्वती' असे ठेवले. हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. मितभाषी, शांत, दात, एकांतप्रिय असे होते. स्वभाव अत्यंत प्रेमळ होता. महाराजांचे आज्ञेप्रमाणे वाडीतच श्रीदत्तपूजा, उत्सवादि कार्य करीत दीक्षितस्वामीजी पुष्कळ वर्षे राहिले होते. पण तेथील मंडळींच्या दूरदृष्टीने किंवा बाहेरच्या मंडळींच्या सुकृताने दीक्षितस्वामीजींनी वाडी सोडण्याबद्दल सद्गुरूंची आज्ञा मिळवून वाडीतून बाहेर पडले. त्यामुळे अमरापूर येथील देवस्थानचा जीर्णोद्धार होऊन तेथे 'श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ' म्हणून एक संस्था स्थापन होण्याचा योग आला. गुरूंच्या आज्ञेचे पालन कसे करावे हे दीक्षितस्वामीजींच्या वागण्यावरून समजून येणारे आहे. 'प्रसंगच आल्यास वाडी सोडावी.' अशी त्यांना पत्रद्वारा महाराजांची आज्ञाही होती. एके दिवशी पालखी चालू असता नित्याप्रमाणे खाली दर्शन करून महाराज वर येण्यास निघाले. येता येता काही पायऱ्या चढून वर आल्याबरोबर समाधी लागली. त्यावेळी हातातील कमंडलू कट्ट्यावर पडला. पण चमत्कार असा झाला की, तो कमंडलू कोठेही भंगला नाही. कमंडलू एकाएकी पडल्यामुळे समाधिअवस्था असावी असे लोकांना वाटले. त्याच स्थितीत वर श्रीनारायणस्वामींचे मंदिरात हळूहळू महाराज येऊन बसले. कोणाशीही बोलणे वगैरे काही नाही. समाधिअवस्थेतच होते. बाहेर जमलेल्या सर्व मंडळींना मात्र आज काही तरी विशेष प्रकार होणार असे वाटू लागले. थोडक्याच वेळात 'चारही फडांतील वृद्ध पुजारी

मंडळींना हाका मारा' अशी महाराजांची आवेशयुक्त वाणी ऐकू आली. ती आज्ञा समजल्याबरोबर सर्व पुजारी मंडळी जमा झाली. ते पाहून महाराजांचे मुखांतून शब्द बाहेर पडू लागले ते असे 'तुमच्या चालू आचरणाचा श्रीना कंटाळा आला असून त्यात काही सुधारणा करण्याकरिता आपणास इकडे आणले आहे. तुम्ही तुमच्या पूर्वजांच्याप्रमाणे वागत नाही. तुमचे आचरण बिघडले आहे. ते तुम्ही सुधारावे; नाही तर तीन वर्षे झालेली काहीच नाही अशी भयंकर शिक्षा होईल.' हे महाराजांच्या मुखांतून निघालेले शब्द ऐकून सर्व मंडळी भीतिग्रस्त झाली, सर्वांनी अत्यंत नम्र होऊन प्रार्थना केली 'झालेल्या सर्व अपराधांची क्षमा करून या आम्हा बाळगोपाळांचेकडून पूर्वजांप्रमाणे योग्य, इष्ट ती सेवा करवून घ्यावी.' अशी मंडळींनी प्रार्थना केल्यावर महाराज थोड्या वेळाने पूर्वस्थितीवर येऊन ब्रह्मानंदाचे माडीवर स्वस्थानी येऊन बसले. तथापि पूर्ण देहभानावर स्वारी नव्हती. तीनचार घटका सर्व मंडळी, महाराजांचा आणखी काही आदेश होईल म्हणून वाट पाहात तेथेच बसली होती. पण नंतर महाराज काहीच बोलले नाहीत. नंतर एका गृहस्थाने विचारले, 'श्रीचा रोष जाण्यास काय करावे ?' हे ऐकून महाराजांनी उत्तर दिले, 'आपल्याला काही कळत नाही. आपणही तुमच्यासारखेच एक आहोत.' हे उत्तर ऐकून सर्व खिन्न झाले. वाडीस महाराजांचा मुक्काम असल्याचे ऐकून दूरदूरची मंडळी दर्शनाकरिता येऊ लागली. एकदा सातवळेकर, उकिडवे, सप्रे इत्यादि मंडळी सावंतवाडीहून दर्शनाकरिता आली. पुष्कळ दिवसांनी महाराजांचे दर्शन झाल्यामुळे त्या मंडळींना अवर्णनीय असा आनंद झाला. त्या सर्व मंडळींनी महाराजांचा फोटो घ्यावा अशा इच्छेने कुरुंदवाडहून एका फोटोग्राफरना बोलावून आणले व महाराजांचे पुढे आपली इच्छा व्यक्त केली. महाराज म्हणाले, 'हृदयांत ठेवावयाचे सोडून कागदावर फोटो कसला काढता ? काही जरूरी नाही.' हे महाराजांचे म्हणणे ऐकून आता फोटोची सर्व तयारी केली आहे, असे मंडळी म्हणाली. तेव्हा 'बरे तर चला' असे बोलून महाराज खाली कट्ट्यावर येऊन बसले. त्यावेळी घेतलेला हाच महाराजांचा पहिला फोटो आहे.

सिद्धासन घालून स्वारी बसलेली असून डावा हात पायावर पोटाकडून ठेवलेला व उजव्या हातात दंड घेतलेला असा हा फोटो आहे. जवळच भोपळ्याचा कमंडलू आहे. सावंतवाडीचे कारभारी विनायकराव गुप्ते व पेडण्याचे एक प्रभू गृहस्थ महाराजांचे दर्शनास आले. महाराज खाली दत्तमंडपाजवळ बसले होते. त्यांचे समोर जाऊन नमस्कार करून गुप्ते बसले. त्यांना पहाताच महाराज त्यांच्याकडे पाठ करून बसले. ते पाहून गुप्ते महाराजांच्या समोर गेले. तेव्हा महाराजांनी त्यांच्याकडे पुन्हा पाठ केली. मग मात्र गुप्ते समोर न जाता पाठीमागूनच महाराजांना म्हणाले की, 'माणगावी केव्हा येणे होईल ?' हे ऐकून महाराज म्हणाले, 'काही काम नाही.' पुन्हा गुप्ते म्हणाले, 'मातृभूमीकडे संन्याशाने यावे असे आहे ना ?' महाराज म्हणाले, 'तोच मार्ग धरला आहे, पूर्ण साधेल तो सुदिन.' याप्रमाणे बोलणे झाल्यावर गुप्ते निघून गेले. झालेल्या प्रकारामुळे ते सावंतवाडीस गेल्यावर महाराजांची निंदा करू लागले. पुढे १-२ वर्षांतच त्यांना कामावरून कमी करून संस्थानचे हद्दीत पुन्हा पाय न ठेवण्याबद्दल ताकीद देण्यात आली. अधिकार नसताना हे वेदोक्त कर्म करीत असत, ते महाराजांना खपले नाही.

बागल म्हणून एक शिरोळास मामलेदार होते. ते एकदा महाराजांचे दर्शनास येऊन त्यांनी महाराजांना प्रश्न केला 'सध्या जिकडे तिकडे बुवा दिसतात, तर यातील खरे कोण व खोटे कोण हे आमच्यासारख्या अज्ञ माणसांनी कसे ओळखावे ?' हा प्रश्न ऐकून महाराज म्हणाले, 'साधु होऊनच साधूला ओळखता येते. इतरांना ते कळावयाचे नाही.' हे महाराजांचे उत्तर कानावर पडतांच मामलेदार गप्प बसले. तात्यासाहेब इनामदार म्हणून कवठे गुळंद येथील राहाणारे गृहस्थ आपल्या पत्नीसह महाराजांचे दर्शनास आले. त्यांनी नमस्कार करून महाराजांना विनंती केली की, 'आपल्या आज्ञेप्रमाणे या स्त्रीबरोबर मी विवाह केला. पण आज ४२ वर्षे झाली तरी संतति नाही;' असे बोलून त्यांनी स्त्रीची पत्रिका पुन्हा महाराजांना दाखविली. ती पाहून महाराज म्हणाले, 'ही स्त्री तर वंध्या आहे.' ते ऐकून तात्यासाहेब म्हणाले, 'आपणच अशी वंध्या स्त्री

आम्हाला दिली.' नंतर महाराज हसले आणि तात्यासाहेबांना एक अनुष्ठान लिहून देऊन नारळ प्रसाद दिला. घरी जाताना तात्यासाहेबांनी महाराजांचा एक फोटो उपाध्यायांचेकडून आणविला. पण तो चांगला नाही असे वाटल्यावरून तो बदलून दुसरा फोटो आणून मग घरी गेले. रात्री दोघा पतिपत्नीना दृष्टांत झाला. महाराज स्वप्नात येऊन म्हणाले, 'माझे स्वरूप तुम्हाला पसंत पडले नाही करिता प्रसाद परत द्या.' असे सांगून प्रसादाचे दोनही नारळ महाराजांनी स्वप्नांत परत घेतले. हे स्वप्न पडल्यापासून त्या दोघा पतिपत्नीना वाईट वाटत होते. पुढे महाराजांचे दर्शनास जाऊन त्यांनी घडलेली हकीगत सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले की, काल एकाने अशीच गोष्ट सांगितली, 'मी निजलो असता एकाने चापट मारून सांगितले की, मूर्खा माझ्याकडे पाय करून निजलास? हे ऐकून मी लगेच जागा होऊन पाहातो तो खरेच फोटोकडे पाय करून निजलो होतो. पुन्हा असे होऊ नये म्हणून देवानेच शिक्षा केली असावी असे वाटून स्वस्थ राहिलो. अशी गोष्ट काल एकाने सांगितल्याचे महाराजांनी तात्यासाहेबांना सांगितले व यापुढे वर्तन सुधारण्यास सांगून त्यांना पुन्हा नारळ-प्रसाद दिला. तो प्रसाद घेऊन ते घरी गेले. पुढे त्यांना एक मुलगा व एक मुलगी झाली.

माणगावी महाराजांनी पूर्वाश्रमात शंभूशास्त्री साधले यांचेजवळ थोडेसे काव्य वाचले होते. पुढे त्यांनीच आपल्याकडे शिक्षणास येण्याची महाराजांना बंदी केली होती. त्यांचे चिरंजीव गजाननशास्त्री साधले हे मुंबईस रहात असत. त्यांच्या पत्नीच्या नाकातून रक्त पडत असे. वैद्य डॉक्टरांचे उपायाने काहीच गुण येईना, म्हणून ते पत्नीसह महाराजांचे दर्शनास वाडीस आले व त्यांनी बरोबर आणलेली फळे, छाटी, धाबळी, कमंडलू हे सामान नमस्कार करून महाराजांचे पुढे ठेवले. महाराजांनी ते सामान वाटून टाकले आणि येण्याचे कारण गजाननशास्त्रींना विचारले. त्यांनी ते सांगितल्यावर महाराजांनी त्यांना तीन भस्माच्या पुड्या करून दिल्या व गावी गेल्यावर तुंब्याच्या रसांतून ते नाकात घालण्यास सांगितले व दोघांनाही संततीकरिता मंत्र लिहून दिला. पुढे महाराजांची आज्ञा घेऊन

साधले गावी आले व त्यांनी ते औषध घालताच तीन दिवसात पत्नीच्या नाकातील रक्त पडण्याचा तो पुष्कळ दिवसांचा रोग पूर्ण बरा झाला. पुढे त्यांनी ते मंत्रजपाचे अनुष्ठान केल्यावर त्यांना एक मुलगी व एक मुलगा अशी संतती झाली. त्यांच्या बंधूसही संतती नव्हती. त्यांच्या कुटुंबास अश्वत्थप्रदशिक्षणा घालण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी करताच त्यांनाही मुलगा झाला. वाडीस अण्णाजी कृष्ण पुजारी यांना लोकांचे देणे फार होते. ते नेहमी खिन्न मुद्रेने महाराजांचे जवळ जाऊन बसत. एके दिवशी महाराजांनीच त्यांना विचारले, 'काय कर्ज वगैरे नाही ना ? सर्व ठीक आहे ना ?' हे ऐकून अण्णाजी कृष्ण यांनी सांगितले, 'महाराजांच्या कृपेने सर्व ठीक आहे. पण पोस्टमनची नोकरी करून प्रपंच कसा चालेल व कर्ज कसे मिटेल ?' हे त्यांचे बोलणे ऐकून महाराजांनी त्यांना पाक तयार करण्याची कृती सांगितली. त्याप्रमाणे पुढे त्यांनी 'शक्तिवर्धक पाक' म्हणून पाक तयार केला. त्याचा बराच खप होऊन सर्व कर्जांतून आण्णाजी कृष्ण पुजारी हे पूर्ण मुक्त होऊन सुखाने नांदू लागले.

सखारामबापू गेंडे म्हणून एक पुजारी वाडीत आहेत. त्यांना पूर्वी सर्वत्र विटाळ आहे असा भास होत असे. त्यांचे उत्पन्नही तंट्यामुळे त्यांना मिळत नसे. महाराजांनी त्यांना 'दत्तमाला मंत्राचा जप' करण्याबद्दल पत्राने कळविले होते. त्याप्रमाणे त्यांनी श्रद्धेने अनुष्ठान करताच तो सर्व भास दूर होऊन उत्पन्नही कुळांकडून वेळोवेळी मिळू लागले. हे गृहस्थ अत्यंत सात्विक वृत्तीचे असून उत्तम फोटोग्राफर आहेत.

याप्रमाणे वाडीत महाराजांचा मुक्काम असता अनेक लोकांनी येऊन आपले मनोरथ पूर्ण करून घेतले. लहान मुलांचे रोग बरे झाले. भूतपिशाच्च बाधा दूर झाल्या. कित्येक मुली आपापल्या पतिगृही नांदू लागल्या. महाराजांनी वाडीतील लोकांना त्यांच्या प्रार्थनेवरून काही आचरणाचे नियम करून दिले. पण काही पुजारी मंडळीना ते पसंत न पडल्याने त्यांनी त्यावेळी महाराजांची निंदा केली. पुढे पुजारी मंडळीनी श्रीचा कट्टा धुण्याचा वार्षिक समारंभ करून संप्रोक्षण विधी केला आणि श्रीचा प्रसाद होण्याकरिता दोन महारुद्र केले. त्यावेळी महाराज स्वत:

पूजेस बसत. पहिल्या महारुद्राची सांगता बाळंभट खोबरे यांचे घरी झाली. चार पाचशे पान झाले. त्यावेळी महाराज प्रसादास आले होते. दुसरी सांगता झाल्यावर पुजाऱ्यांनी श्रींची एक छाटी महाराजांचे अंगावर घातली. ते वस्त्र मिळाल्याबरोबर पूर्वी सांगणे झाल्याप्रमाणे उत्तरेकडे जाण्याची आज्ञा मिळाली असे समजून आपला येथून निघण्याचा विचार महाराजांनी मंडळीना कळविला. ते ऐकून सर्व मंडळीना अत्यंत दुःख झाले. मंडळीनी राहण्याविषयी महाराजांना पुष्कळ आग्रह केला. पण 'देवांच्या आज्ञेबाहेर आपणास जाता येत नाही' असे महाराजांनी सर्वांना सांगितले. तथापि श्रीनारायणस्वामींचा पुण्यतिथीचा उत्सव चैत्र ३० आहे तो तरी करून जावे असे मंडळीनी सांगितल्यावरून चार दिवस मुक्काम वाढला. उत्सव संपल्याबरोबर निघण्याचे ठरले. मंडळींनी पुष्कळ आग्रह केला; पण 'आपणास श्रींची आज्ञा उल्लंघन करता येणार नाही' असे महाराजांनी सर्वांना स्पष्ट सांगितले, त्यामुळे नाईलाज झाला. शेवटी वैशाख शुद्ध प्रतिपदेस वाडीहून निघण्याचे ठरले. त्यादिवशी सकाळी दहा वाजल्यापासून सर्व स्त्री-पुरुष, आबालवृद्ध मंडळी महाराजांचे दर्शन घेऊन प्रसाद घेऊन जाऊ लागली. संध्याकाळी चार वाजेपर्यंत हे काम सारखे चालू होते. त्यावेळी इतकी गर्दी झाली की, तीन तीन तास थांबून सुद्धा महाराजांचे दर्शन होण्याचा योग येईना. शेवटी सायंकाळी चार वाजता महाराज उठले आणि आपल्या छाटच्या वगैरे सामान घेऊन खाली श्रीदत्तपादुकांचे दर्शनार्थ मंडपांत आले. तेथे श्रीसन्निध बसून प्रार्थना केली व चारी फडातील पुजाऱ्यांना तसेच इतरांनाही पुष्पप्रसाद स्वहस्ते देऊन महाराजांनी उपदेश केला की- 'आपल्या पूर्वजांप्रमाणे सदाचार न सोडता श्रींची सेवा करावी, म्हणजे सर्व संकटातून पार पडाल. नित्य ब्रह्मकर्म झाल्यावर थोडे तरी गुरुचरित्र वाचल्याशिवाय अन्न घेऊ नका, म्हणजे काही कमी पडणार नाही. श्रीनृसिंहसरस्वतींना येथेच ठेवले आहे. त्यांच्या आज्ञेने वागावे. वारंवार हेच सांगणे 'श्रींचे पाय सोडू नका.' याप्रमाणे सांगून व श्रींना वंदन करून महाराज उठले आणि मंडपाबाहेर पडणार इतक्यात १०-१५ मुले उभी राहून 'गुरुराया जाऊ नका हो। टाकुनिया

आम्हा दीनासी। साहवेल विरहा कैसे। तुजविणे सर्व उदासी।' हे पद सद्गुरु श्रीनृसिंहसरस्वती गाणगापुराहून निघाले त्यावेळच्या हकीकतीचे अत्यंत करूणरसपूर्ण असे म्हणू लागली. त्यावेळी सर्वांच्याच नेत्रांतून अश्रू वाहू लागले. सर्वांचे ते विलक्षण प्रेम पाहून महाराजही गहिवरले. कसेबसे सर्वांचे समाधान करून वर श्रीनारायणस्वामींचे मंदिरात उत्सवमूर्तीचे दर्शनास गेले. दर्शन करून बाहेर येऊन पाहातात तो शेकडो लोक प्रसाद घेण्याचे राहिले आहेत. हे पाहून तेथेच कट्ट्यावर बसून अर्ध्या तासात प्रसादाचे काम कसे बसे उरकून महाराज निघाले. गावातील सुवासिनींनी महाराजांना ओवाळले. रस्त्यातही ठिकठिकाणी सुवासिनींनी महाराजांचे मस्तकावर अक्षता टाकून ओवाळले. कन्यागती श्रींची स्वारी पालखीतून शुक्लतीर्थाकडे गंगास्नानास जाते, त्यावेळी जसा सुवासिनींचा आरतीचा थाट होतो त्यापेक्षा अधिक यावेळी समारंभ झाला, असे वृद्ध मंडळी सांगतात. याप्रमाणे पुढे भजन करीत, श्रींच्या व महाराजांच्या नावाचा जयजयकार करीत सर्व मंडळी निघाली होती. महाराज सर्वांच्या मधून चालले होते. गावातून निघून जोडलिंबाच्या मारूतीपर्यंत सर्व मंडळी महाराजांचे बरोबर आली. तेथे महाराजांनी उभे राहून सर्वांच्या अंगावर कमंडलुंतील पाणी शिंपडले व वर हात करून सर्वांना आशीर्वाद देऊन परत जाण्यास सांगितले. 'तुम्ही सर्वचजण इकडे आल्यावर तिकडे श्रींची धूप पालखी इत्यादि कार्ये कोण करणार ? तरी लवकर परत जा' असे महाराजांनी सांगितले. तरी लोकांचे पायच वळेनात. शेवटी मोठ्या कष्टाने मंडळी महाराजांना नमस्कार करून परत फिरली. काही मंडळी शिरोळपर्यंत भजन करीत महाराजांच्या बरोबर आली. शके १८२७ वैशाख शु॥ १ महाराज एक घटका रात्रीचे वेळी शिरोळास पोचले. तेथे भोजनपात्र म्हणून श्रीदत्तांचे स्थान आहे, तेथेच महाराज उतरले. श्रीनृसिंहसरस्वतीही बरोबर होते. तेथे तीन मुक्काम झाले. महाराज येणार म्हणून तेथील बाबुराव कुलकर्णी यांनी व त्यांचे चुलत्यांनी देऊळ झाडून, दिवाबत्ती करून व्यवस्था केली होती. पाणीही चांगले भरून ठेवले होते. पंचगंगा तेथून एक मैल लांब असल्यामुळे रात्री

तिकडे जाणे शक्य नव्हते. महाराज वाडीस असता रोज सायंकाळी संगमावर जात. तेथील महाराजांची घाटावर बसण्याची जागा बाबूराव रोज धुऊन ठेवीत असत. शिरोळ येथे मंदिरांत आल्याबरोबर श्रीस वंदन करून महाराजांनी स्नान केले. सर्वांचे फराळपाणी झाले. महाराजांनी लिंबाचे तयार केलेले सरबत थोडे घेतले. इतके होईपर्यंत मध्यरात्र झाली. नंतर सर्व मंडळी निद्रावश झाली.

पहाटे उठून महाराज पंचगंगेवर जाऊन स्नान करून आले. नित्यकर्म झाल्यावर जिज्ञासू मंडळींना उपनिषदे सांगितली. भिक्षा झाल्यावर आलेल्या आर्त लोकांना पीडानिवारणार्थ योग्य ते उपाय सांगण्यातच संध्याकाळ होत असे. वाडीतील दादो नारायण पुजारी यांचे पत्नीचे अंगांतील पिशाच्च शिरोळास गेले. मिरजेकडून येणे विषयी मिरज मळेकरीणबाईंनी आग्रह केला. पण त्यांना आज काही सांगता येत नाही असे उत्तर मिळाले. वाडीला येणारी मंडळी येथेही येत. त्यामुळे येथेही बरीच यात्रा जमत असे. वाडीतील बऱ्याच मंडळीनी येथे अनुग्रह घेतला.

वैशाख शु॥ ४ सोमवारी भिक्षा झाल्यावर महाराज शिरोळहून पुढे जाण्यास निघाले. निघताना वाडीप्रमाणेच गर्दी झाली. वाजत गाजत गावाबाहेर एक मैल आल्यावर नृसिंहसरस्वती व इतर सर्व मंडळींना महाराजांनी तीर्थ दिले व आशीर्वाद देऊन सांगितले 'प्रत्यक्ष परमेश्वर नांदत आहे. निष्ठा ठेवून वागा म्हणजे झाले.' याप्रमाणे सांगून सर्वांना परत पाठविले. नंतर २०-२५ मंडळीसह महाराज मिरजेच्या घाटावर येऊन पोचले. तेथे एकदोघांना मंत्र लिहून दिले. कोणी महाराजांच्या सभोवती लोटांगणे घातली. कित्येकांनी पाय चुरले. पाठ रगडली. तेव्हा महाराज म्हणाले, 'या देहाला कोणाचा स्पर्शसुद्धा नव्हता. पण येथे काही बोलता येत नाही. असो.' या घाटापासून मिरज गांव ३-४ मैल आहे. तेथून ताक आले होते ते महाराजांनी सायंसंध्या झाल्यावर घेतले. नंतर श्रींचा धावा वगैरे नरहरिबुवांनी आपल्या नियमाप्रमाणे म्हटल्यानंतर मंडळी निजली. दुसरे दिवशी महाराज स्नान करीत असता मंडळी प्रवाहात त्यांचे खाली उभी राहिली. त्यावेळी आपल्या हाताने कृष्णाबाईंचे पाणी सर्वांच्या

अंगावर घातले. मंडळींनीही महाराज स्नान करून वर आल्यावर महाराजांच्या पायावर पाणी घालून तीर्थ घेतले. नित्यकर्म झाल्यावर उपनिषदांची पोथी तपासून दिली. तोपर्यंत एक वाजला. नंतर भिक्षा झाली.

येथेही मंडळी इतकी जमली की, गावात नारळ विकत मिळेनात. मिरजेच्या फोटोग्राफरनी येथे एक फोटो घेतला. नंतर सर्वांना निरोप देऊन महाराज पंढरपुराकडे निघाले. वाडीस येताना तेथील मंडळींनी राहण्याचा आग्रह केला होता. त्यावेळी परत येतांना पाहू असे त्यांनी सांगितले होते, म्हणून स्वारी तिकडे वळली. रस्त्यात कमळापुरला मुक्काम झाला असता रात्री एक आजानुबाहू पुरुष महाराजांचे स्वप्नांत येऊन म्हणाला की, 'तुम्ही सर्वत्र फिरता, कविताही करता, मग आमच्याकडे तुमचे लक्ष का नाही ?' महाराज जागृत झाल्यावर हे पुरुष कोण म्हणून महाराजांनी देवांना विचारले. तेव्हा देव म्हणाले, 'हे अक्कलकोटचे स्वामी असून यांची इच्छा तुम्ही अक्कलकोटास यावे व आपले चरित्र काव्यरूपाने लिहावे अशी दिसते.' हे देवांचे म्हणणे ऐकून महाराज म्हणाले, 'ही जिव्हा श्रीदत्तचरणी समर्पण केली आहे. श्रींची आज्ञा होऊन माहिती मिळाल्यास कवित्व करता येईल.' असे म्हणून महाराज दुसरे दिवशी निघाले. 'पंढरपुरास जाऊन पुढे अक्कलकोट मार्गाने जातो,' असे महाराजांनी सांगितल्यावर देवांनी सांगितले, 'अक्कलकोटास जाऊन मग गाणगापुरास जावे. गाणगापुरास पादुकांचे फक्त दर्शन करावे व तेथे त्रिरात्र मुक्काम करून मौन धरावे.' याप्रमाणे देवांच्या सांगण्याचा खुलासा मागाहून झाला. तो असा - गाणगापुरांत तुकाराम नांवाचा मोठा गुरुभक्त ब्राह्मण केवळ फलाहार करून तीन वर्षे सेवा करीत होता. सद्गुरु दत्तात्रेयांचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे अशी त्याची उत्कट इच्छा होती. त्याला महाराजांच्या रूपाने दर्शन देणेचे असल्याने तिकडे जाण्याची महाराजांना आज्ञा झाली. त्याप्रमाणे गाणगापुरास जाण्याकरिता महाराज निघाले. प्रवासात अतिसाराचा उपद्रव फार झाला. तरी तसे अक्कलकोटास स्वामींचे दर्शन करून पुढे गाणगापुरास येऊन पोचले. तेथे मठांत

श्रीपादुकांचे दर्शन झाले; पण प्रत्यक्ष दर्शन न झाल्यामुळे महाराज पापविनाशतीर्थावर आले व दर्शन झाल्यावाचून उठावयाचे नाही असा निश्चय करून तेथे त्रिरात्र मुक्काम केला. नंतर 'संगमावर दर्शन होईल' म्हणून सांगणे झाले. त्याप्रमाणे तेथे जाऊन दर्शन घेतले आणि देवांना विचारले, 'गाणगापूरचा मठ सोडून जाणार नाही अशी आपली प्रतिज्ञा असता आज असे कसे झाले ?' तेव्हा दत्तप्रभू म्हणाले, 'मठांत अनाचार वाढल्यामुळे इकडे राहतो ?' असे सांगून गुप्त झाले. तेथे देवांच्या आज्ञेप्रमाणे तुकाराम नांवाच्या ब्राह्मणास 'जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा' हे अष्टक करून दिले. 'गाणगापुरी अठराशे सत्तावीस शकांमधील। उदेले स्तोत्र हेचि आधिव्याधि हरी हे कुधी।' असा या अष्टकात शेवटी उल्लेख आहे. वाडीत महाराजांचा मुक्काम असताना पुजारी मंडळींनी प्रार्थना केली होती, 'गंगालहरीप्रमाणे एक कृष्णालहरी आम्हाला म्हणण्याकरिता तयार करून द्यावी.' या विनंतीप्रमाणे वाडीत कृष्णालहरी होण्याचा योग आला नाही. पुढे गाणगापुरी जाताना कृष्णामाईने महाराजांना प्रत्यक्ष दर्शन देऊन कृष्णालहरी करण्याची आज्ञा केली. त्यावेळी श्रीदत्तप्रेरणेने ५१ श्लोकांत कृष्णालहरी केली. फार लवकर अत्यंत स्फूर्तीने हे श्लोक मुखांतून बाहेर पडले. हे श्लोक रचण्याचे वेळी प्रत्यक्ष कृष्णाबाई पुढे येऊन उभ्या राहात होत्या. ५१ श्लोकांची रचना झाल्यावर 'पुरे' असे सांगून भगवती कृष्णामाता अंतर्धान पावली. गाणगापुराहून निघून हुमणाबादवरून गंगाखेड येथे वैशाख वद्यांत महाराज येऊन पोचले. तेथेच गोदातीरी दशाहार झाला. तेथेच महाराजांचा संन्यासाश्रम झाल्याने बरीच मंडळी ओळखीची होती. तेथून कारंजपुरास चातुर्मास करावा या हेतूने निघाले. वाटेत परळी वैजनाथाचे दर्शन करून माहूर क्षेत्री गेले. दत्तात्रेय, रेणुकामाता इत्यादिकांचे दर्शन करून औंढ्या नागनाथाचे दर्शनार्थ आले. तेथून येवले गावावरून हिंगोलीस येऊन पोचले. रात्रभर तेथे मुक्काम करून सकाळीं अनुष्ठान संपवून निघाले. त्यावेळी पाऊस बराच झाल्यामुळे रस्त्यावर मुंग्या आपली व्यवस्था लावण्याकरिता फिरत होत्या. त्यामुळे जपून पाहून चालावे लागे. यामुळे दुपारपर्यंत पाच मैलच

चालणे झाले. मध्ये पांगरी नावाच्या गावी भिक्षा करून एक दिवस मुक्काम केला. दुसरे दिवशी सकाळी प्रयागला जावे म्हणून महाराज निघाले. तो उत्तरेकडे रस्त्यात फारच मुंग्या दिसल्या. पाय टाकता येईना. तेव्हा देवांचे स्मरण करून ज्या दिशेस मुंग्या नाहीत तिकडे जाण्याचे ठरविले. पूर्वेकडे व दक्षिणेकडेही मुंग्या फार दिसल्या. शेवटी पश्चिमेकडे पाहिल्यावर तिकडे मुंग्या दिसल्या नाहीत. ते पाहून पश्चिमेस जाण्याची प्रभूंची इच्छा दिसते असे समजून महाराजांनी पश्चिम दिशा धरली. पाऊस सारखा येतच होता. शेवटी तेथून १२ मैलावर असलेल्या नरसी या गावात महाराज ज्येष्ठ वद्यात येऊन पोचले. महाराजांचे दर्शन होण्याबरोबर ग्रामस्थ मंडळींनी 'श्रीगुरुदेवदत्त' असे मोठ्याने म्हणून महाराजांना साष्टांग नमस्कार घातले. महाराजांनी सर्वांचे क्षेमकुशल विचारून राहाण्याकरिता सोईस्कर जागेचा तपास केला. मंडळींनी गांवातील देवळे, श्रीमंतांचे वाडे वगैरे स्थाने दाखविली, पण ती महाराजांना पसंत पडली नाहीत. स्थाने पहात पहात महाराज सीतारामभटजी अष्टेकर या यजु:शाखी ब्राह्मणाच्या घरापर्यंत आले. त्यांच्या दारात एक अश्वत्थ व एक औदुंबर असे दोन वृक्ष होते. ते पाहिल्याबरोबर हे स्थान बरे आहे असे म्हणून तेथेच रहाण्याचे महाराजांनी ठरविले. सितारामभटजी गंगातीरचे राहणारे पण काही अडचणींमुळे नरसीस येऊन राहिले होते. पाऊस कमी झाल्यास पुढे जावे असा महाराजांचा विचार होता. पण पावसाचा फारच जोर झाला व कयाधू नदीस महापूर येऊन रस्ता बंद झाला. त्यामुळे येथेच चातुर्मास करण्याचे ठरवून महाराजांनी आपले आसन राम मंदिरात ठेवले.

चातुर्मास १५ नरसी – शके १८२७

महाराजांचा शके १८२७ चा चातुर्मास आषाढ पौर्णिमेपासून नरसी येथे सुरू झाला. त्यादिवशी व्यासपूजा झाली. एक महिनाभर प्रथम महाराजांची योग्यता येथील मंडळीच्या लक्षात आली नाही. त्याप्रमाणो एक महिना महाराजांना विशेष उपाधी झाली नाही. पुढे मात्र मंडळी फार जमू लागली. तेथे महाराजांची बसण्याची जागा अगदी लहान

असल्यामुळे मंडळींना आत प्रसादास जाता येईना. तेव्हा फार गर्दी झालेली पाहून दुसरे रूप घेऊन महाराज बाहेर येऊन अश्वत्थाच्या पारावर बसले. आतील लोक बाहेर आल्याबरोबर त्यांना महाराज दिसले व बाहेरच्या मंडळींनाही आत दिसले हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. नरसी हे गाव लहान असले तरी महाराजांच्या वास्तव्याने त्याला मोठ्या क्षेत्राची शोभा आली. महाराज सकाळी गंगेस जात, त्यावेळी लोक दर्शनास येत. त्यांची हकीकत तेथेच ऐकून त्यांना लगेच उपाय सांगितला जात असे. पुढे पुढे तेथील मंडळीही महाराजांच्याबरोबर कयाधू नदीवर स्नानास जाऊ लागली. दोन तीनशेपर्यंत स्नानास जाण्याच्या मंडळीची संख्या झाली. महाराजांनी वर स्नान केल्यावर खाली सर्वांनी स्नान करावे. महाराज स्नान करून परत येतांनाही कित्येक मंडळी आपल्या घरासमोर दर्शन करीत.

सकाळी अनुष्ठान आटोपल्यावर कोणाला काव्य, कोणाला भागवत, कोणला पंचदशी, कोणाला नित्यकर्म याप्रमाणे शिकविण्याचे काम चालत असे. यापैकी तुकारामशास्त्री माहूरकर, श्रीराम, बाबा मोहरीकर वगैरे मंडळींनी हा लाभ घेतला. नरसी मुक्कामी महाराजांनी 'दत्तचंपू' हे काव्य तयार केले. तसेच तेथे पुष्कळांना रोगमुक्त केले. येथील एक मारवाडी चुनीलाल नावाचा होता. त्याला मस्तकशुळाचा फार त्रास होता. त्याने हा रोग जाण्याकरिता पुष्कळ उपाय केले पण गुण आला नाही. महाराज आल्यावर त्याने आपली व्यथा महाराजांना सांगितली. तेव्हा 'आपण काही वैद्य नाही, साधू नाही. यातील आपणास काही समजत नाही' असे त्याला सांगून महाराजांनी प्रथम त्याला घालवून दिले पण त्याने महाराजांचे पाय सोडले नाहीत. महाराज गंगेवर स्नानास जातेवेळी रस्त्यांतच नमस्कार करून त्यांचेबरोबर पुढे जावे व महाराज स्नान करून परत येईपर्यंत त्यांचेबरोबर रहावे, असा चुनीलालचा क्रम बरेच दिवस चालू होता. एकदा महाराजांना त्याची दया येऊन त्यांनी त्याला विचारले की, 'आपणापासून तुझा काय फायदा होणार आहे ? कशाला आपल्या नादी लागलास ?' ही महाराजांची वाणी ऐकून त्याने

अत्यंत गहिवरून सांगितले की, आपल्याशिवाय मला तारणार कोणी नाही. पुष्कळ उपाय केले. आपण मला आता तारा किंवा मारा, आपले पाय सोडणार नाही.' हे त्याचे बोलणे ऐकून महाराजांना दया आली व त्यांनी समोरच्या झाडाकडे बोट करून त्याला सांगितले, 'जा, त्या झाडाची साल स्त्रियांचे अंगावरील दुधात उगाळून डोक्यावर घाल म्हणजे बरे होईल.' ही महाराजांची आज्ञा ऐकून ती साल काढून रात्री उगाळून डोक्यावर घालताच त्याचा निम्मा मस्तकशूळ कमी झाला. अत्यंत आनंदाने त्याने ही बातमी सकाळीच महाराजांना सांगितली. तेव्हा 'असेच काही दिवस चालू ठेव म्हणजे दत्तकृपेने बरे होईल.' या सांगण्याप्रमाणे काही दिवस त्याने उपाय चालू ठेवताच त्याचा मस्तकशूळ पूर्ण नाहीसा होऊन तो महाराजांचा परमभक्त झाला.

नरसीस विश्वनाथ जोशी म्हणून एक ब्राह्मण कचेरीत उमेदवार होते. ते शेवटी महाराजांच्या दर्शनास आले. महाराजांचा अनुग्रह व्हावा ही त्यांची इच्छा; पण नरसीहून महाराजांचा मुक्काम लवकर हालल्यामुळे तो योग जमला नाही. पुढे पवनीच्या चातुर्मासांत ती त्यांची इच्छा पूर्ण झाली. दर गुरुवारी संप्रदायानुसार ते भजन करीत असतात. पवनीहून अनुग्रह घेऊन आल्यावर वकिलीची परीक्षा द्यावी असे त्यांना वाटले व भगवत्साहाय्य असावे म्हणून बासरक्षेत्री त्यांनी गुरुचरित्राचे दोन सप्ताह केले. पण स्वप्न वगैरे काहीच झाले नाही. त्यामुळे त्यांना विषाद वाटला. पण त्याच दिवशी रात्री स्वप्नांत महाराज आले व सर्व चौकशी करून 'प्रयत्न केल्यावर काय सिद्ध होणार नाही ?' असे म्हणाले. नंतर विश्वनाथराव जागे झाले व त्या स्वप्नामुळे त्यांना समाधान वाटले. त्याच वर्षी वकिलीचा अभ्यास करून विश्वनाथराव परीक्षेस बसले पण परीक्षेत यश मिळाले नाही. ही हकीगत कुरुडगड्डीस महाराजांना जाऊन विश्वनाथरावांनी सांगितली व आपले वचन असत्य कसे झाले ? मी यापुढे परीक्षेस बसणार नाही. असे त्यांचे बोलणे ऐकून महाराज म्हणाले, 'असा वेडेपणा करू नकोस, परीक्षेची फी भरण्यास अद्यापि किती अवकाश आहे ?' विश्वनाथराव म्हणाले, 'एक महिना अवकाश आहे.' तेव्हा

महाराज म्हणाले, 'हैद्राबादला फी भरून घरी जा.' ही आज्ञा मान्य करून त्याप्रमाणे फी भरून विश्वनाथराव घरी आले. पुढे त्यांचा वेळ आजारी-पणात व दाजूर वगैरे भागात महाराजांचेबरोबर फिरण्यातच गेला, अभ्यास काही झाला नाही. पण महाराजांचे स्मरण करून ते परीक्षेस बसले व महाराजांचे कृपेने त्यांना त्या वर्षी परीक्षेत उत्तम यशही मिळाले. ते सध्या हिंगोलीस वकिली करीत असतात.

नरसीस असताना महाराज एके दिवशी माध्यन्हसमयी नदीवर स्नानास एकटेच गेले होते. त्याचवेळी एक बाई पाणी आणण्याकरिता नदीवर गेली. तो तिला असा चमत्कार दिसला की, 'तिरावर महाराज एका झाडाखाली मांडी घालून बसले आहेत. मांडीवर सुंदर सहा महिन्यांचे बाळ आपल्या डाव्या हाताचा अंगठा तोंडात धरून महाराजांकडे पहात आहे आणि महाराजही त्याच्याकडे सारखे पहात आहेत.' हा चमत्कार पाहून तिला पाणी नेण्याची शुद्ध न राहून तीही त्या दृष्याकडे एकाग्र चित्ताने पाहात राहिली. काही वेळाने महाराजांची नजर सहज त्या बाईकडे गेली. त्याबरोबर ते बाळ दिसेनासे झाले व ती बाई एकदम मूर्च्छित होऊन खाली पडली. महाराजांनी त्या बाईजवळ येऊन तिच्या तोंडात पाणी घालून तिला सावध केले आणि 'तू पुण्यवान आहेस. ही हकीगत कोणाला सांगू नकोस, जा.' असे सांगितल्यावर ती बाई पाणी घेऊन घरी गेली. पुढे तिच्या तोंडून सर्व लोकांना ही हकीगत कळल्यामुळे फार विस्मय वाटला.

नरसोबावाडीतून महाराज निघाल्यावर वाडी गावचे आसपास प्लेग सुरू झाला. आता येथेही हा रोग झाल्यास फार त्रास होईल अशी भीति वाटून त्या सर्व मंडळींनी संकटनिवारणार्थ श्रीनृसिंहसरस्वतींची प्रार्थना केली. त्यावेळी त्यांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचे भजन अहोरात्र करण्यास सांगितले. त्याप्रमाणे वाडीत ब्रह्मानंदांचे मठांत श्रींच्या पादुका व महाराजांचा फोटो ठेवून भजनास सुरूवात झाली व हे वृत्त महाराजांना कळविले. महाराजांनी याबद्दल संमती कळवून संकट दूर होईल असा आशीर्वादही दिला. पुढे ईशकृपेने प्लेग झाला नाही. तेव्हा

मंडळीनी अधिक उत्साहाने महाराज वाडीस येईपर्यंत भजन चालू ठेवण्याचा निश्चय केला व तो महाराजांना कळविला. 'पाय गंगेला लागले म्हणजे तिकडे परततील' असे महाराजांचे उत्तर आले. पुढे एके दिवशी पालखी चालू असता गर्दीत गुंडू खोंबारे याचे हातून उत्सवमूर्ती खाली उतरली. हा भयंकर प्रसंग पाहून सर्व मंडळी घाबरली व गावावर संकट येणार असे सर्वांनाच वाटले. याच्या शांतीकरता उपाय विचारण्यास गुंडूभट खोंबारे महाराजांची भेट होईल म्हणून गाणगापुराकडे गेले. पण महाराज न भेटल्यामुळे परत आले. पुढे महाराजांचा मुक्काम नरसीला असल्याचे समजल्यावरून पुजारी मंडळी नरसी मुक्कामी येऊन त्यांनी घडलेली हकीकत महाराजांचे कानावर घातली. तेव्हा पालखीतून खाली येण्याचे कारण महाराजांनी देवांना विचारले असता देवांनी क्रोधयुक्त मुद्रा करून सांगितले की, पुजारी लोक तू घालून दिलेल्या नियमाप्रमाणे वागत नसून उलट तुझी निंदा करतात. माझ्या पादुकांवर अशुद्ध पदार्थ घालतात. तरी पंच नेमून परभारे व्यवस्था ठेवली पाहिजे. त्या देशाच्या लोकांची वागणूक बिघडल्यामुळे त्या देशाचाच कंटाळा येतो. नाकातली घाण बंद होत नाही म्हणून त्यांना शासन झाले पाहिजे.' हे श्रींचे उत्तर महाराजांनी पुजारी मंडळींना सांगितले व म्हणाले, 'तुम्ही जर दुर्वर्तन सुधारून योग्य प्रकारे श्रींची सेवा करणार नाही तर परिणाम काय भयंकर होईल ते कळणार नाही. यासाठी वर्तन सुधारून देवसेवा करा म्हणजे कल्याण होईल. नाहीतर तुमचा देव जाणे आणि तुम्ही जाणे. झाल्या अपराधाबद्दल श्रींची क्षमा मागून करूणात्रिपदीने रोज प्रार्थना करावी. मायबाप दयाळू दया करीलच व सर्वारिष्ठ निरसन करून रक्षण करील. 'योगिनी वरदानादि भवेत्तस्यान्यथाकथम्। तथापि दमहर्तुंस्तत्पादौ वंद्यौ पुनः पुनः.' यासाठी त्यालाच शरण जावे', असा महाराजांनी वाडीच्या पुजारी मंडळींना उपदेश केला. तेव्हापासून करूणात्रिपदी वाडीस रोज पालखीपुढे म्हणतात. महाराजांचे आज्ञेप्रमाणे इष्ट ते वर्तन न सुधारल्यामुळे वारंवार संकटाचे प्रसंग येतात.

याप्रमाणे नरसी गावातील लोकांचे दोन महिने अत्यंत आनंदांत

गेले. चातुर्मास संपल्याबरोबर तेथून निघण्याबद्दल महाराजांना देवांनी आज्ञा दिली. ही वार्ता सहज महाराजांच्या मुखांतून निघाली. ती ऐकून सर्व लोक कष्टी झाले.

भाद्रपद शुद्ध १४ सायंकाळी पुराण संपल्यावर महाराज सहज म्हणाले, 'उद्या क्षौर करून सीमोल्लंघन करावयाचे आहे.' ही गोष्ट महादेव नांवाच्या एका न्हाव्याने ऐकली. अनायासे उद्या महाराजांची सेवा घडेल. त्यांच्या शरीराला हात लागून आपण धन्य होऊ असे महादेवास वाटून त्याने आपला मनोदय एका ब्राह्मणाकडून महाराजांचे कानावर घातला. तेव्हा महाराजांनी त्याला अनुमति दर्शविली. त्या न्हाव्यास फार आनंद झाला. पौर्णिमेस अगदी पहाटे तो येऊन बसला. क्षौर झाल्यावर महाराजांचे पायांतील काटे काढण्यास मंडळींनी महादेवास सांगितले. त्याप्रमाणे त्याने पाय धुऊन पाहिले असता वीस काटे निघाले. नंतर स्नानविधी होऊन नित्याचे अनुष्ठान झाले. त्यादिवशी उपोषणच होते. सीमोल्लंघनासाठी दंडास परशुमुद्रा बांधली. ते पाहून महाराज आज निश्चित निघणार असे सर्व लोकांना वाटून त्यांनी महाराजांना 'आणखी दोन दिवस रहावे. आपण चातुर्मासाची सांगता करणार आहोत, तरी आजच जाऊ नये' अशी विनंती सर्वांनी केली, तेव्हा महाराज म्हणाले, 'कसला चातुर्मास व कसली सांगता ? देवाप्रीत्यर्थ काय करणे ते करा' असे महाराजांचे म्हणणे ऐकले तरी मंडळी आग्रह सोडीनात, म्हणून पुढे दोन दिवस मुक्काम वाढला. लोकांनी दुसरे दिवशी चातुर्मासाची सांगता केली. पौर्णिमेच्या दिवशी महाराज सीमोल्लंघनास निघाले. तेव्हा मंडळींनी नाना वाद्ये आणली. ज्या रस्त्याने महाराज जाणार होते तिकडून प्रत्येक दरवाजासमोर रांगोळ्या काढल्या. आरत्या ओवाळीत वाजतगाजत महाराजांना नेले. गावच्या सीमेपर्यंत एक कोस मंडळी गेली. तेथे एका शमीवृक्षाजवळ महाराज बसले व भगवद्गीतेतील अकरावा अध्याय म्हटला. नंतर आरती करून प्रसाद वाटल्यावर पुन्हा वाजत गाजत महाराज गावातील आश्रमात परत आले. नंतर दुसरे दिवशी नित्यकर्म आटोपल्यावर महाराज निघाले. उठून श्रीदत्तप्रभूंचे स्मरण केले व

'श्रीगुरुदेवदत्त' असे म्हणून सीतारामभटजींच्या घरातून बाहेर पडले. सर्व मंडळी बरोबर चालू लागली. 'महाराज जाऊ नका' असे सर्व म्हणत होती. पूर्व दिवसाप्रमाणेच वाद्ये वाजत होती. महाराजांच्या नावाचा जयजयकार चालू होता. अशा थाटाने स्वारी चालली होती. तीनचारशे मंडळी बरोबर होती. याप्रमाणे एक कोसापर्यंत मंडळी आली. इतक्यात पुढील गावची मंडळीही महाराजांना नेण्याकरिता समोरून वाद्ये वाजवीत आली. तेव्हा महाराज तेथे थांबून सर्वांना म्हणाले, 'आता आपल्या स्नानाची वेळ झाली. तुम्ही सर्व घरी चला, तुम्ही असे बरोबर आलात तर आम्हाला नित्य कर्मेसुद्धा करता येणार नाहीत. आपण आता गंगेवर स्नानास जाणार.' हे महाराजांचे म्हणणे त्या जवळच्या गावातील कुलकर्ण्याने ऐकताच तो तसाच चिखलात महाराजांचे पुढे दंडवत् पडला. ते पाहून महाराज उभे राहिले व त्याची इच्छा काय आहे ते विचारल्यावर तो कुलकर्णी म्हणाला, 'नरसीगावी महाराजांचा निवास दोन महिने झाला. तसाच आमच्या या गोटे गावी एक दिवस मुक्काम करून सर्वांना प्रसाद द्यावा. तसेच या सर्व मंडळींनीही प्रसादास आले पाहिजे. या गावात आमचे एकच घर ब्राह्मणाचे आहे. तरी परगावची मंडळी महाराजांना भिक्षा करण्याकरिता येऊन बसली आहेत.' हे त्या कुलकर्ण्याचे म्हणणे ऐकून महाराजांनी ते कबूल केले व गोटेगावच्या देवळात जाऊन बसले. गावातील सर्व मंडळींना आनंद वाटला. नंतर महाराज नदीवर स्नानास गेले. ती सर्व मंडळीही महाराजांचेबरोबर स्नानास गेली. चुनीलाल मारवाडी याची इच्छा महाराजांच्या पायावर एकदा डोके ठेवण्यास मिळावे अशी पुष्कळ दिवसांपासून होती. त्या इच्छेने महाराज गंगेच्या तीरावर आल्यावेळी तो त्यांचेसमोर हात जोडून उभा राहिला, महाराज म्हणाले, 'काय शेटजी ? अजून काय इच्छा आहे ?' तेव्हा शेटजींनी आपली इच्छा भीतभीत व्यक्त केली. ती ऐकून महाराज हसून म्हणाले की, 'आता तर मोठा कठीण प्रसंग आला. प्रत्येकाने जर असा प्रसंग आणला तर येथून जाणे कसे होईल ? दंडत्याग करणे भाग पडेल.' हे महाराजांचे बोलणे ऐकून त्या मंडळींची निराशा झाली व त्यांच्या

डोळ्यांत अश्रू आले. ते पाहून महाराज त्यांना म्हणाले, 'येथल्या येथेच तुमची काय इच्छा असेल ती पूर्ण करून घ्या. पुढे मात्र कोणाचे ऐकले जाणार नाही आणि नरसीची सर्व मंडळी येथूनच मागे परता. कारण प्रत्येक ठिकाणी ही मंडळी असाच प्रसंग आणणार.' इतके बोलून महाराज तेथेच वृत्तिनिरोध करून स्तब्ध उभे राहिले. त्यावेळचा तो देखावा मोठा पाहण्यासारखा होता. साक्षात् दत्तप्रभूच उभे आहेत असे सर्वांना वाटले. नंतर मारवाड्याने पायावर डोके ठेवले. पुष्कळ दिवसांची इच्छा पूर्ण झाल्याने त्याला फार समाधान वाटले. या संधीचा फायदा सर्व स्त्रीपुरुषांनी घेतला. सर्वांना महाराजांचे पायावर डोके ठेवण्यास मिळाले. हे सर्व होईपर्यंत दोन तास मोडले. नंतर महाराज देहभानावर आले. सर्व मंडळींनी 'श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज की जय' असा जयजयकार केला. महाराजांनी सर्वांना आशीर्वाद दिला. महाराजांचे स्नान व आन्हिक होईपर्यंत मंडळी तेथे उन्हांत बसली. नंतर देवळांत येऊन महाराजांनी भिक्षा केली. सर्वांची जेवणे आटोपल्यावर महाराज निघाले. पूर्वीप्रमाणे सर्व मंडळीही बरोबर निघाली. पुढे दोन मैलांवर नदीच्या तीरावर महाराजांनी आरती केली व नदीपलिकडे महाराज गेले. मग निरुपायास्तव आलेली सर्व मंडळी मागे परतली. नदीच्या पलिकडेही पुढील गावची तीन-चारशे मंडळी महाराजांना नेण्यासाठी वाद्यांसह आली होतीच. याप्रमाणे त्या गावी एक रात्र मुक्काम करून दुसरे दिवशी महाराज तेथून निघाले. याप्रमाणे वाशीमपर्यंत मंडळी सारखी महाराजांच्या बरोबर होती. चौथे दिवशी महाराज वाशीमला पोचले. वाशीमच्या मंडळींनीही महाराजांना गावात नेऊन श्रीकरुणेश्वराच्या देवळात आग्रहाने दोन दिवस ठेवून घेतले. तेथे सखाराम देशपांडे यांचा मुलगा असाध्य रोगांतून मुक्त झाला. गोविंद दीक्षित अग्निहोत्री यांना महाराजांच्या कृपेने मुलगा झाला.

वाशीम येथे नारायणराव धनागरे म्हणून वकील आहेत. महाराज तेथे गेले तेव्हा त्यांचे वडील अत्यंत आजारी होते. घरातील सर्व मंडळी हवालदिल झाली होती. अशावेळी महाराज दुपारी भिक्षेस त्यांच्या घरी गेले. महाराजांना ती गोष्ट समजताच करुणेश्वराच्या देवळात येण्यास

त्यांच्या वडीलांना सांगितले. त्याप्रमाणे नारायणराव धनागरे यांचे आजोबा त्या देवळात गेले. लगेच महाराजांनी एक यंत्र लिहून दिले व ते ताईतात घालून आजारी माणसाच्या गळ्यांत घालण्यास सांगितले आणि तो ताईत जमिनीवर कधीही ठेवू नका असेही सांगितले होते. पुढे त्याप्रमाणे करताच मरणाच्या द्वारी असलेले धनागरे यांचे वडील हळूहळू पूर्ण बरे झाले. पुढे काही दिवसांनी तो ताईत काही प्रसंगाने काढून एका कोनाड्यात ठेवला. तो तेथे तसाच राहिला. नंतर स्मरण झाल्यावर जाऊन पाहिले तर कोनाड्यातील सर्व सामान जळून राख होऊन पडलेली होती. तो ताईतही अर्थातच गेला. वाशीमहून महाराज तिसरे दिवशी जाण्यास पुढे निघाले. नरसी, हिंगोली इत्यादि गावची मंडळी बरोबर येतात असे पाहून त्यांना महाराज म्हणाले, 'यापुढे कोणीही येऊ नये. नाहीतर आपले जाणे भगवदिच्छेने कसे व कोणीकडून होईल ते सांगता येणार नाही.' हे ऐकून सर्व मंडळींनीं वेशीपर्यंत येतो असे सांगून दोन कोसपर्यंत महाराजांचे बरोबर प्रवास केला. तेव्हा महाराज एका झाडाच्या छायेत जाऊन बसले आणि सर्वांना म्हणाले की, 'मंडळी जर मागे फिरणार नाहीत तर येथून पुढे जाणे होणार नाही.' असे स्पष्ट सांगताच सर्व मंडळी महाराजांचा जयजयकार करीत मागे फिरली. फक्त वाशीमचे तीन व इतर दोन अशी पाच भक्त मंडळी तेथे राहिली. त्यांचेसह महाराज पुढे निघाले ते मंगलोर वगैरे गावावरून तीन दिवसांनी कारंज नगरास सकाळी पोचले. हे गाव श्रीनृसिंहसरस्वतींचे जन्मस्थान असून येथे श्रीनृसिंहसरस्वती दत्तमहाराजांचे देवालय महाराजांचे भक्त काशीचे ब्रह्मानंदस्वामी यांनी बांधले आहे. तेथे काळ्या मारूतीच्या मंदिरांत महाराजांचा मुक्काम झाला. स्नानादि सर्व आटोपून भिक्षा झाली. तेथे दोन दिवस मुक्काम करून महाराज एकटेच पुढे निघाले. सर्व मंडळींना परत पाठवले.

कारंजा येथे महाराजांचा मुक्काम ज्या मारुतीच्या मंदिरांत होता. तेथील पुजारी पूजेचे वेळी मारुतीस नैवेद्य दाखविल्याबरोबर तो खाऊन टाकीत व नंतर पूजा समाप्त करीत. महाराज आले त्यावेळी त्यांच्यासमोर नैवेद्य भक्षण करणे त्यांना बरे न वाटून त्यांनी त्यादिवशी नैवेद्य खाल्ला

नाही. त्यादिवशी महाराज ध्यानस्थ बसले असता श्रीदत्त न येता श्रीमारुतिराय ध्यानात आले. आपणास भूक लागली असून खावयास काही पाहिजे अशा अभिप्रायाने तोंड उघडून पुढे उभे असल्याचे दिसले. ध्यान आटोपल्यावर ही गोष्ट महाराजांनी तेथील पुजाऱ्यांना सांगितली. ती ऐकून मारुतीपुढचा नैवेद्य त्यांनी लगेच खाऊन टाकला. मग महाराजांच्या ध्यानात मारुतिराय आले नाहीत. नंतर महाराजांनी पुजाऱ्यांना सांगितले , 'देवाला भक्ति फार प्रिय आहे. तरी तुम्ही कोणाचीही भीड न धरता आपल्या नियमात व भावनेत बदल करू नका.' कारंजाहून महाराज अमरावतीस गेले. तेथे जगदंबेचे दर्शन करून निघाले, ते हळूहळू आश्विन वद्यात मूळतापीस येऊन पोचले. पहाड चढण्याच्या त्रासाने शौचाचा उपद्रव फारच वाढल्यामुळे तेथे सुमारे एक महिनाभर महाराजांचे वास्तव्य झाले. दत्तमंदिरांत मुक्काम होता. वेदान्तादि विषयांचे शिक्षण देणे, भूतबाधादि निरसनार्थ उपाय सांगणे, औषधोपचार करणे इत्यादि कार्ये याठिकाणी चालू होतीच. यात कधीही खंड पडला नाही.पुढे शौचाचा उपद्रव काही कमी झाला. दिवाळी झाल्यावर महाराज तेथून निघाले ते चित्रकूट, पयस्विनी-मंदाकिनी संगम करून हुशंगाबादेस मार्गशीर्ष मासारंभी आले. तेथे दत्तमंदिरांत वास्तव्य होते. तेथील अनुग्रहीत मंडळींच्या इच्छेवरून पुराण सांगितले. नंतर पुढे लवकरच महाराज तेथून निघाले व साची मुक्कामी काही दिवस राहून पुढे भेलसा या गावी आले. तेथे अनुग्रहीत मंडळी फार होती. त्यांच्या आग्रहावरून दत्तजयंतीचा उत्सव तेथेच केला. तेथे दूरदूरचे लोक दर्शनास येत होते. उत्सवांत सकाळी एक शास्त्रीबुवा संस्कृत गुरुचरित्र वाचीत व दुपारी महाराज त्याचा अर्थ सांगत असत.

दत्तजयंतीचा उत्सव झाल्याबरोबर आजच पुढे जावे अशी महाराजांना देवांनी आज्ञा केली. उत्सवाची सांगता होणे असल्याने एक दिवस रहाण्याबद्दल मंडळीचा आग्रह पडला. महाराजांनी सांगितले, 'आपणास आज्ञेबाहेर जाता येत नाही, करिता आजच निघाले पाहिजे.' हे ऐकून मंडळी म्हणाली, 'आपले रहाणे जर होत नसेल तर उद्या आम्ही

चूल पेटविणार नाही व सहस्र भोजनाचे हे सर्व सामान गंगाबाईस समर्पण करू .' ही मंडळींची विनवणी ऐकून महाराजांनी देवांची आज्ञा व मंडळींची इच्छा दोघांचाही मान राखण्याकरिता त्यादिवशी ग्रामांतर करून दुसरे दिवशी पुन: भेलशास परत आले. नंतर तेथील सहस्रभोजनाचा कार्यक्रम उत्तम पार पडून सर्वांना समाधान वाटले. त्याच रात्री महाराज ध्यानस्थ असता त्यांच्या गालावर एक जोराने थप्पड बसली व त्यामुळे त्यांचा एक डोळा व कान अगदी कामातून गेले. देवांची जाण्याची आज्ञा पूर्णपणे पाळली गेली नाही त्याची ही शिक्षा हे महाराजांच्या लक्षात आले व त्यांनी देवांची प्रार्थना केली, 'आपली आज्ञा तंतोतंत पाळली गेली नाही हे खरे, पण हे स्वत:च्यासाठी नसून सर्व ब्राह्मणांच्या समाधानासाठी करावे लागले आणि हे जर आपणास पसंत नसेल तर दुसराही शिल्लक राहिलेला कान व डोळा घालवून टाका म्हणजे पुन्हा चूक होण्याची भीती नाही.' ही महाराजांची निश्चयाची वाणी ऐकून श्रीदत्तप्रभू हसले व तत्काल गुप्त झाले. महाराजांचा तो दुखावलेला कान व डोळा पूर्ववत तत्काल दुरुस्त झाला हे सांगणे नकोच. भेलशाहून महाराज निघाले ते वेत्रवतीतीरावर बासोदा गावी आले. तेथे ग्वाल्हेरचे चित्रकार हनुमंत गोपाळ फाळके हे सहकुटुंब महाराजांचे दर्शनास आले. त्यांचे कुटुंबास पिशाच्चबाधा होती. त्यांना महाराजांनी तीर्थप्रसाद देऊन मुगावली मुक्कामी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे महाराज मुगावलीस गेल्यानंतर फाळकेही तेथे गेले. तेथे दत्तमंदिरांत औदुंबर वृक्षाखाली फाळके यांना दत्तमंत्र सांगितला व एक ताईत देऊन तो कुटुंबाचे गळ्यांत बांधण्यास सांगितले. 'लवकरच सर्व बाधा दूर होऊन कल्याण होईल,' असा आशीर्वादही महाराजांनी त्यांना दिला व प्रसादाचा नारळ बाईंच्या ओटीत घातला. पुढे एक महिन्यांतच त्या बाईची बाधा दूर होऊन नऊ महिन्यांनी त्यांना मुलगाही झाला. फाळके यांची महाराजांचेविषयी उत्तम निष्ठा आहे. यांनी ग्वाल्हेर येथे एक दत्त मंदिर बांधले असून, दत्तपुराण हा महाराजांचा मोठा ग्रंथ यांनीच छापून काढला. यांचा मुक्काम ग्वाल्हेरलाच आहे. मुगावलीस चार-पाच दिवस राहून महाराज पुढे पौष

मासात जालवण येथे गेले. तेथे २०-२५ दिवस राहिले. तेथील मंडळी महाराजांची मार्गप्रतीक्षा करीतच होती. पूर्वीची अनुग्रहीत मंडळी तेथे होतीच, महाराज तेथे आल्याबरोबर भजन, पुराण, कीर्तन इत्यादि कार्यक्रम सारखे सुरू झाले. तेथे दोन भजन सप्ताह झाले. त्यांची सांगताही चांगली झाली. तेथे इतका प्रसाद वाटला जात असे की, तो खाता खाता मंडळींच्या तोंडाला मिठी पडली. तेथेच श्रीगुरुप्रतिपदेचा (माघ वद्य १) उत्सव थाटाने झाला. तो झाल्यावर महाराज ब्रह्मावर्ताकडे निघाले.

प्रवास करीत करीत फाल्गुनाचे आरंभी महाराज ब्रह्मावर्तास पोचले. येथे येण्याची ही महाराजांची चौथी खेप. यावेळी येथे मुक्काम जास्ती होईल असे वाटले होते. पण २०-२५ दिवसच येथे मुक्काम झाला. महाराज तेथे आलेले समजताच सर्व मंडळी दर्शनार्थ आली. नित्यकर्म आटोपून भिक्षा झाल्यावर पुराणभजनादी कार्यक्रम सुरू झाले. एकदा देवांनी महाराजांना सांगितले, 'येथे एक परमहंस आले आहेत.' महाराज म्हणाले, 'आज्ञा असेल तर दर्शनास जाता येईल.' पण दत्तगुरु म्हणाले, 'तेच इकडे येतील.' याप्रमाणे सांगणे झाल्यावर महाराज त्यांचीच वाट पहात होते. दुसरेच दिवशी सकाळी भाष्य पाठ चालू असता ते परमहंस महाराजांचेकडे आले. त्याबरोबर त्यांना मोठ्या मानाने आसनावर बसविले. ते दिगंबर असून स्थूल शरीराचा अभिमान त्यांना काहीच नव्हता. गंगेच्या वाळवंटात नेहमी पडून रहात. तहान, भूक, थंडी, वारा कोणत्याही द्वंद्वाकडे लक्ष द्यावयाचे नाही, निरंतर ध्यानमग्न राहावयाचे अशी यांची स्थिती होती. महाराजांचेकडे पहात काही वेळ ते परमहंस आसनावर बसून राहिले. थोड्या वेळाने काही भाषण न करता ते गंगातीरावर निघून गेले. यांचेविषयी एकदा महाराजांचे उद्‌गार असे निघाले होते की, 'असे परमहंस दुसरे कोणी पाहाण्यात आले नाहीत.'

ब्रह्मावर्तास कुशाबा ऊर्फ कृष्णाजी पटवर्धन नावाचे एक चांगले सात्त्विक ब्राह्मण होते. त्यांचा एक हात हाड्या व्रणाने सडत चालला होता. कोणत्याही औषधाने गुण येईना. महाराज एके दिवशी त्यांचे घरी

भिक्षेस गेले, तेव्हा महाराजांना पाहून तो ब्राह्मण रडू लागला. तेव्हा त्याचे सांत्वन करून महाराज म्हणाले, 'शरीर लवकरच पडेल. दत्तस्मरण करीत राहा.' हे महाराजांचे सांगणे ऐकून ते नामस्मरण करू लागले. त्याच रात्री कुशाबांना दृष्टांत झाला की, 'पूर्वजन्मी गोविंदभटजींच्या देण्यापैकी तुम्ही त्यांचे ३५ रुपये देणे आहेत. त्यामुळे हा रोग आहे. पैसे देऊन टाकल्यावर शरीर पडेल.' हे स्वप्न पाहून दुसरे दिवशी कुशाबांनी गोविंदभटजींच्या मुलाला बोलावून आणले व मी पूर्वजन्मी तुझ्या बापाचे ३५ रुपये देण्याचे आहेत, ते घे असे सांगून ते पैसे कुशाबांनी त्या मुलाला दिले. हे एवढे कार्य झाल्याबरोबर कुशाबांचे देहावसान झाले. महाराजांना पुढे काशीस जाण्याची आज्ञा झाल्यामुळे ब्रह्मावर्ताहून महाराज निघाले. उन्हाळ्याचे दिवस व काशीच्या मार्गावर दक्षिणी ब्राह्मणांची वस्ती नसल्यामुळे भिक्षेचा त्रास होईल तरी यावेळी थांबावे अशी सर्व लोकांनी प्रार्थना केली असताही 'देवांची आज्ञा मोडावयाची नाही' म्हणून महाराज ब्रह्मावर्ताहून फाल्गून अखेर निघाले. वाटेत सर्व प्रकारचे कष्ट सोशीत प्रयागला येऊन पोचले. तेथे त्रिवेणीसंगमावर स्नान करून निघाले ते काशीस चैत्र शुद्ध अष्टमीस येऊन पोचले. तेथे मणिकर्णिकास्नान व विश्वेश्वरदर्शन करून तारक मठांत येऊन उतरले. काशीतील विद्वान व संन्यासी मंडळी महाराजांची वाट पुष्कळ वर्षे पहात होते. तो योग आल्याबरोबर सर्व मंडळी दर्शनाकरिता येऊ लागली. काशीतील ४० चातुर्मास झालेले ८० वर्षांचे प्रसिद्ध संन्यासी श्रीस्वयंप्रकाशस्वामी यांनी तर महाराजांचे पुढे येऊन साष्टांग नमस्कार घातला व महाराज नको म्हणत असताही त्यांचा त्यांनी फार गौरव केला. महाराज स्वयंप्रकाशस्वामीना वंदन करण्यास उठले असता त्यांनी सांगितले, 'आपण तुमचे वंदन घेणार नाही.' असे सांगून त्यांनी महाराजांना हाताला धरून खाली बसविले. नंतर काशीतील शे-दोनशे संन्याशांनी महाराजांना वंदन केले. त्यानंतर शास्त्री, पंडित, विद्यार्थी व इतर मंडळीनी नमस्कार केले. तेथे महाराजांचा मोठा सत्कार झाला. महाराजांचा मुक्काम या मोठ्या क्षेत्रात बरेच दिवस होईल अशी सर्व लोकांची अपेक्षा होती, पण त्रिरात्र मुक्काम करून पंचक्रोशीची यात्रा

करण्याबद्दल आज्ञा झाली. तेथे एक प्रसिद्ध संन्यासी महाराजांची भेट व्हावी अशी फार दिवसांपासून उत्कंठा बाळगून होते. त्यांच्या देहावसानापूर्वी ३-४ तास त्यांची भेट घेऊन महाराजांनी त्यांचे समाधान केले. महाराज पंचक्रोशीस निघाले तेव्हा बरीच मंडळी त्यांचेबरोबर निघाली. रामेश्वरास सर्व मंडळी येऊन पोचली. तेथे वरुणा नदी व अहिल्याबाईंचा उत्तम बांधलेला घाट आहे. तेथे आल्यावर, 'तू येथे श्राद्धान्न खाण्याकरिता आलास काय ?' असा महाराजांना दृष्टांत झाला. तेव्हा चौकशी केली असता समजले की, 'पंचक्रोशीच्या यात्रेस आलेली मंडळी त्या त्या ठिकाणी श्राद्ध न करता महाराजांना भिक्षा वाढीत होती. त्यावेळी श्राद्ध केल्याशिवाय भिक्षा घालू नये' असे महाराजांनी सर्वांना सांगितले. पण ज्यांना मुळी श्राद्धच करावयाचे नव्हते, अशापैकी एकाने महाराजांना तशीच भिक्षा घातली. नैवेद्य दाखवून महाराजांनी घास तोंडात घालताच तो घशांत अडकला. महाराज एकदम घाबरले. तो घास काढून टाकताच सावध झाले व ध्यानस्थ बसले. देवांनी सांगितले की, 'आता पुढे न जाता वाडीचा रस्ता धरावा.' ही देवांची आज्ञा महाराजांनी मंडळींना सांगितली. तेव्हा 'एवढी सुरू केलेली पंचक्रोशीची तरी यात्रा पुरी करून जावे' असे मंडळीचे म्हणणे पडल्यावरून महाराजांनी पंचक्रोशीची वाट धरली. तोच पोटांत शूळ उत्पन्न झाल्यामुळे पुढे न जाता इथूनच वाडीकडे जाण्यास निघावे असे महाराजांनी ठरविले. पण मंडळींनी त्यांना जाऊ न देण्याकरिता त्यांचे सभोवती जमून गराडा घातला. पण त्यावेळी असा चमत्कार झाला की, त्या ५०-७५ मंडळींतून महाराज एकाएकी दिसेनासे झाले, ते एकाएकी प्रयागला प्रकट झाले. तेथे संगमावर महाराज स्नानास गेले असता तेथील मुख्य प्रयागबळ म्हणाले, 'येथे येणाऱ्या यात्रेकरूंकडून आम्ही काहीतरी घेत असतो. त्याप्रमाणे आपणही आमचे मागणे पुरवावे.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'आपण संन्यासी आपणाजवळ काय आहे.' तेव्हा प्रयागबळ म्हणाले, 'आपणाकडून जे मिळेल ते इतरांकडून मिळणार नाही, तरी आमची इच्छा पूर्ण करावी.' असे म्हणून त्यांनी आपली इच्छा एवढीच सांगितली,

'आपण वर स्नान करावे. आम्ही खाली स्नान करतो.' ही गोष्ट महाराजांनी कबूल करून तेथे तसा स्नानविधी झाला. बराच वेळ झाला असे पाहून महाराज त्या प्रयागबळांना म्हणाले, 'आता घरी लवकर चला. यजमान आले असतील.' ते ऐकून प्रयागबळ म्हणाले, 'आपले दर्शन हेच दुर्लभ आहे. आपल्या कृपेने घरी द्रव्य पुष्कळ आहे व यापुढेही मिळेल. पण हे दर्शन मात्र पुन: मिळणार नाही.' असे त्यांचे निष्ठेचे बोलणे ऐकून महाराज स्वस्थ राहिले. महाराज पंचक्रोशीची यात्रा न करता एकदम प्रयागास गेले. हे काशीतील मंडळीस समजताच स्वयंप्रकाशस्वामी, कृष्णानंदसरस्वती व इतरही बरीच मंडळी महाराजांना भेटण्याकरिता प्रयागला गेली. यात्रा पुरी न करण्याचे कारण विचारता 'देवांची आज्ञा' म्हणून महाराजांनीं उत्तर दिले. प्रयागला चातुर्मास करण्याची महाराजांची इच्छा होती, पण नृसिंहवाडीच्या मंडळींनी महाराज पुन्हा यावेत म्हणून अहोरात्र भजन चालविले असल्यामुळे देवांनी महाराजांना तिकडे जाण्याची आज्ञा केली. त्यामुळे भर उन्हाळ्यात महाराजांना वाडीच्या प्रवासास निघावे लागले. 'वाडीकडे येणे होत आहे' असे पत्र तेथून वाडीस श्रीनृसिंहसरस्वतींना पाठविले. ते पाहून सर्व वाडीकरांना अत्यंत आनंद झाला.

प्रयागहून निघून महाराज वैशाखारंभी ब्रह्मावर्तास येऊन पोचले. तेथे यावेळी महाराजांचा मुक्काम १० दिवस झाला. रात्री रोज भजन होत असे. तेथे गोपाळबुवा राजाध्यक्ष भक्तच होता. याने एकदा 'आपणास मंत्रोपदेश करून अनुग्रह व्हावा' अशी आपली इच्छा कागदावर लिहून तो कागद महाराजांचे पुढे ठेवला, तो वाचून पाहून महाराजांनी त्याला तिसरे दिवशी मंत्रोपदेश करून कृतार्थ केले. गोपाळबुवांना अतिशय आनंद झाला. महाराजांच्या पायावर मस्तक ठेवून पूजा केली व नंतर आरती केली. त्यादिवशी महाराजांनी गोपाळबुवांचेकडे भिक्षा घेतली.

सावंतवाडीचे अग्निहोत्री शंकरभट सप्ते यांना वाताचा उपद्रव झाल्याचे कोलगावचे सातवळेकर यांनी महाराजांना कळविले. तेव्हा मालामंत्राचा जप करावा व कुचला घ्यावा असे महाराजांनी त्यांना

कळविले. सातवळेकरांनी कुचला शुद्ध करून दिला. तो घेऊनही यावा तसा गुण आला नाही, तेव्हा महाराजांनी त्यांना डाग घेण्यास सांगितले. त्यापासून मात्र त्यांचा तो विकार गेला. ब्रह्मावर्तास १० दिवस राहून महाराज दक्षिणेकडे निघाले. वाटेत पुष्कळ मंडळी दर्शनाकरिता आतूर झालेली होती. त्यांना दर्शन देत देत जालवणमार्गे वैशाख वद्यात सिप्री मुक्कामी येऊन पोचले. महाराजांचे पूर्वी भेलशास असलेले योगाभ्यासी शिष्य, गोविंदराव पंडित यावेळी सिप्रीस राहत होते. इतरही परिचित मंडळी पुष्कळ होती. कारण महाराज या गावी पूर्वी तीन वेळा आले होते. तेथे दोन प्रहरच्या वेळी महाराज एका ब्राह्मणाच्या घरी गेले असता तेथील एका मुलीने त्यांना सांगितले, 'तुम्ही येथे उतरू नका. गावाबाहेर चला.' हे त्या मुलीचे म्हणणे ऐकून ही बुद्धी मुलीची नसून ईशप्रेरणाच आहे असे समजून महाराज गोविंदराव पंडितांचे घरी आले. त्यावेळी ते जेवावयास बसले होते. महाराज आले हे समजल्याबरोबर ते जेवण सोडून उठू लागले. तेव्हा 'तुमचे जेवण होऊ दे, आपण येथे बसतो,' असे महाराज म्हणाले. पण गोविंदराव काही जेवण करीत नाहीत असे पाहून महाराज म्हणाले, 'भिक्षेशिवाय अन्न घेणेचे नाही. तरी थोडा सत्तू द्या. आज सत्तूचीच भिक्षा.' असे म्हणून त्यादिवशी सत्तूचीच भिक्षा केली आणि पुढेही त्या मुलीच्या सांगण्याप्रमाणे गावात न जाता सत्तूवरच बरेच महिने काढले. भिक्षेनंतर दशाहार येथेच करावा अशी सर्व मंडळींनी प्रार्थना केली. तेव्हा महाराज म्हणाले, 'यापुढे आपले गावात राहाणे होणार नाहीं.' तथापि मंडळींचा आग्रह पाहून सिप्रीजवळ बाणगंगा नांवाचे तीर्थ आहे तेथे राहून दशहारा करण्याचे ठरविले. मंडळी गावातून तेथे दर्शनास जात. तेथे दशाहाराचा उत्सव थाटाने पार पडला.

सिप्रीस दशहारा करून महाराज गुणाछावणीवरून सारंगपुरास आले. तेथे गावाबाहेर एका शंकराचे मंदिरांत मुक्काम झाला. एका गृहस्थाने महाराज रात्री आलेले पाहून ती बातमी गावात कळविली, त्याबरोबर गावातील सर्व मंडळी अपरात्रीच दर्शनास बाहेर आली. सर्व मंडळींनी त्रिरात्र तरी मुक्काम व्हावा अशी विनंती केली, पण महाराजांनी

ती मान्य केली नाही. माणगावची मूर्ती येथे होती. तिचे दर्शन करून महाराज निघाले ते देवास संस्थानमध्ये आले. तेथील राजेसाहेबांनी महाराज या रस्त्याने येतील तरी त्यांना आपल्या वाड्यांत आणण्याकरिता रस्त्यावर नोकर ठेवले होते व एक संन्याशी येतील त्यांना घेऊन या म्हणून सर्व नोकरांना सांगून ठेवले होते. महाराजांना पाहिल्याबरोबर सर्व राजसेवक त्यांच्याजवळ गेले व राजेसाहेबांची इच्छा त्यांनी महाराजांना सांगितली; तेव्हा महाराज म्हणाले, 'तुमचा राजा मोठा आहे, तो आमच्यासारख्या संन्याशाला बोलावणार नाही, ते दुसरे कोणी तरी पालखीतील संन्यासी असतील. शोध करा.' हे महाराजांचे शब्द ऐकून त्या मंडळींना भुरळ पडून त्यांनी महाराजांना पुढे आग्रह केला नाही. याप्रमाणे देवासच्या राजांची इच्छा तीव्र असूनही तो योग चुकला. आपण बांधलेल्या दत्तमंदिरांत प्रथम महाराजांच्या हस्ते पूजा व्हावी असे राजेसाहेबांना वाटत होते. पण महाराज त्यावेळी सर्वांना चुकवून पुढे निघून गेले. वाटेत इंदूरवरूनच आले पण गांवात गेले नाहीत. भोरकुवा येथे त्यांना इंदूरचे गृहस्थ भेटले. त्यांची महाराजांच्या दर्शनाची फार दिवसांची इच्छा तेथे पूर्ण झाली. त्या गृहस्थांनी इंदूरला जाऊन ही बातमी सखारामशास्त्री टिल्लू यांना सांगितली. ती समजताच टिल्लूशास्त्री ताबडतोब महाराजांचे दर्शनास इंदूरहून आले. त्यादिवशी एकादशी असल्यामुळे उदईक भिक्षा होईल असे सांगून महाराजांनी सखारामशास्त्रीचे समाधान केले. मग दुसरे दिवशी बलवाडा येथे सखारामशास्त्रींनी एका झाडाखाली भिक्षा केली. आणखी दोन स्वयंपाक निराळे करविले होते. याप्रमाणे तिघांकडील भिक्षा घेऊन टिल्लूशास्त्रींची इच्छा महाराजांनी पूर्ण केली. नंतर प्रवास करीत करीत महाराज ओंकारेश्वरास येऊन पोचले. तेथे एक दक्षिणी ब्राह्मण अधिकारी होता; पण तो आचारधर्माने वागत नाही हे महाराजांना प्रथम ठाऊक नसल्यामुळे त्याच्या आईच्या आग्रहावरून त्याच्या घरी महाराज भिक्षेस गेले व त्यादिवशी भिक्षा तेथेच केली. त्याचवेळी त्या अम्मलदाराने एका मोठ्या पिंपात बसून स्नान केले व संध्या, वैश्वदेव न करता तसाच येऊन जेवावयास बसला. हे पाहिल्या-

बरोबर महाराज त्याच्या आईला म्हणाले की, 'आज तुमच्या घरचे हे अपवित्र अन्न पोटात गेले, ते उलटी करून काढून टाकले पाहिजे. तुमचा मुलगा पिंपात स्नान करून संध्या, वैश्वदेव न करता जेवला. त्याला आपल्या कुलाचा अभिमान नाही. त्याचे अन्न अपवित्र आहे. ब्राह्मणांनी आपलाच आचार सोडल्यामुळेच त्यांना दैन्यावस्था आली असून पदोपदी त्यांचा अपमान होत आहे.' हे महाराजांचे भाषण ऐकल्याबरोबर त्या गृहस्थाला पश्चात्ताप होऊन त्याने हात जोडून महाराजांना विनंती केली, 'झालेल्या अपराधांची क्षमा करावी. यापुढे आपण जसे सांगाल तसे मी वागण्यास तयार आहे.' हे त्याचे पश्चात्तापाचे बोल ऐकून महाराजांना त्याची दया आली व त्याला ब्रह्मकर्म शिकविण्याकरिता मुद्दाम काही दिवस महाराज तेथे राहिले. त्याला सर्व नित्यकर्म शिकवून तो ते करू लागल्यावर ओंकारेश्वराहून निघून महाराज बढवाईस आले. गावांत फक्त तीनच मुक्काम केले. तेथून नर्मदातटाकी, खेडेघाटी धर्मशाळेत येऊन राहिले व त्या वर्षीचा चातुर्मास महाराजांनी तेथेच केला.

चातुर्मास १६ बढवाई – शके १८२८

बढवाई हे गाव इंदूर संस्थानांत नर्मदातीरावर आहे. तेथे खेडेघाटी धर्मशाळेनजीक एका झोपडीत राहण्याचे महाराजांचे ठरले. ती झोपडी दुरूस्त केली. गावापासून दोन मैल अंतरावर हे स्थान नर्मदातटाकी एकांतात आहे. लोकांची उपाधी नको म्हणून महाराज तेथे येऊन राहिले, पण तेथेही गर्दी झालीच. एकदा महाराज गर्दीस कंटाळून अरण्यांत जाऊन बसले. तेथेही लोक आलेले पाहून महाराज म्हणाले, 'जंगलात गेले तरी हे लोक सोडीत नाहीत तरी आता जावे तरी कोठे ?' तेव्हा देव म्हणाले , 'तू कुठेही गेलास तरी लोक असेच मागे लागणार; तरी जंगलांत न जाता गावाजवळच राहा.' महाराजांचा चातुर्मास यंदा बढवाईस आहे हे समजताच ठिकठिकाणची मंडळी दर्शनास येऊ लागली. इंदूरहून सखारामशास्त्री टिल्लू, हिंगोलीहून हणमंतशास्त्री, ब्रह्मावर्ताहून नानाशास्त्री व गोपाळबुवा, गुजराथेतून गांडाबुवा, महाराजांचे पूर्वाश्रमांतील बंधू

सीतारामबुवा, नरसोबावाडीहून नंदगांवकर इत्यादी मंडळी तेथे जमली होती. महाराजांची तेथील दिनचर्या अशी होती, पहाटे उठल्यावर तेथील योगाभ्यास करणाऱ्या गृहस्थांना आसने, प्राणायाम शिकवीत. पुढे स्नान, अनुष्ठान झाल्यावर वेदान्तकेसरी, पंचीकरण, मांडुक्योपनिषद् इ. पाठ चालत. नंतर मंडळी महाराजांची पूजा करीत. ती झाल्यावर स्नान, आन्हिक होऊन भिक्षा होत असे. यावेळी फक्त सत्तू, ताक व फळे यावरच चातुर्मास काढला. अन्न घेतले नाही. सत्तू सुद्धा तीन घासच खात असत. रामभाऊ बापट यांनी रोज गावातून सत्तू व ताक आणण्याचे काम निष्ठेने करावे. सर्वांचा स्वयंपाक होऊन जेवणे चालू असता महाराज तेथे बसत. नंतर एक तास विश्रांती होऊन पुन्हा पाठास सुरुवात होई. मध्येच पत्रोत्तरे लिहिण्याचे कामही चालू असे. महाराजांचे पुराणही होत असे. कोणी काही प्रश्न केल्यास त्याला योग्य उत्तरेही देत. रात्रीपर्यंत सारखी दर्शनेच्छु लोकांची रीघ लागलेली असे. दर्शनास आलेल्या लोकांनी आणलेल्या फळांचा पर्वतप्राय ढीग पडत असे. देवाला नैवेद्य दाखवून ती फळे दुपारी लोकांना वाटण्यात येत असत. धर्मशाळेत नेहमी दोनशेपर्यंत मंडळी असत. सर्वांची जेवणाची व्यवस्था तेथेच केली जात असे. भिक्षेपूर्वी थोडा वेळ असल्यास महाराज ध्यानस्थ बसत. कोणाला औषधे, कोणाला बाधानिवारणार्थ उपाय, संतती, संपत्ति वगैरेवर उपाय, मंत्र, यंत्र, व्रते, प्रदक्षिणा इत्यादि उपाय सांगण्यातच संध्याकाळ होऊन जाई. नंतर सायंसंध्या वगैरे झाल्यावर भगवद्भजन मध्यरात्रीपर्यंत चालत असे. विष्णुबुवा, गोपाळबुवा, रामभाऊ व इतरही हरिदास वगैरे मंडळी भजनात इतकी रंगून जात असत की, त्यावेळी ती प्रेमाने नाचत असत. महाराजांनाही ते प्रेमळ भजन ऐकून आनंद वाटत असे. याप्रमाणे मध्यरात्रीपर्यंत भजन चालत असे. नंतर प्रसाद वाटल्यावर सर्व मंडळी निजण्याकरिता धर्मशाळेत जात. भजनाचे वेळी प्रसंगी बसण्यास जागासुद्धा मिळत नसे इतकी गर्दी होऊन जाई.

तेथेच राहणारे पेन्शनर पोस्टमास्तर त्र्यंबकराव यांचे तोंडातून रक्त पडत होते. औषधाचा काही उपयोग होईना. महाराज तेथे येण्याबरोबर

त्रिंबकरावांनी सर्व स्थिती सांगितल्यावर त्यांना औषध वगैरे देऊन महाराजांनी त्यांना रोगमुक्त केले. इंदूरचे शिवाजीराव होळकर बढवाईस रहात होते. ते एकदा कारभाऱ्यांसह महाराजांचे दर्शनास आले. कारभाऱ्याने पुढे येऊन ती वार्ता महाराजांना सांगितली, तेव्हा महाराज त्याला म्हणाले, 'वेड्याच्या दर्शनाचा काय उपयोग ? हे येथे आलेले लोक वेडे आहेत, हाही त्यातीलच एक वेडा आहे. तरी तुम्ही अशा वेड्यांच्या नादी न लागता घरी जाऊन सुखाने रहा.' हे महाराजांचे शब्द निघण्याची कारणे म्हणजे त्या कारभाऱ्याने किंवा त्याच्या मालकाने असे शब्द महाराजांचेविषयी काढलेले असावेत. नाहीतर महाराजांनीही स्वत:विषयी असे उद्‌गार कधीच काढले नाहीत. एकदा इंदूरच्या महाराणीसाहेब दर्शनास येणार होत्या. त्यांच्या नोकराने महाराजांना तसे सांगितले व तेथे त्यावेळी कोणी असू नये असे तो म्हणाला. तेव्हा महाराज म्हणाले, 'येथे राजा रंक दोन्हीही सारखेच. आपल्याजवळ नेहमी माणसे येत राहणारच. आपण कोणाला जा म्हणणार नाही व कोणी जाणारही नाही.' महाराजांचे निस्पृहतेचे बोलणे ऐकून तो नोकर निघून गेला.

एकदा महाराज स्नानास गेले असता पाय घसरून कमरेत लचक भरली. रात्री नर्मदा मातेने स्वप्नात येऊन मंत्र सांगितला. तो म्हटल्या-बरोबर लचक बरी झाली. पुढे नानाशास्त्री ब्रह्मावर्तकर यांना महामारीचा उपद्रव सुरू झाला. हे कळताच महाराजांनी देवांची प्रार्थना केली, 'देवा ! या आपल्या बालगोपाळांना त्यांच्या घरी सुखरूप नेऊन पोचवा. भाद्रपद पौर्णिमेस आपण येथून निघतो.' या प्रार्थनेप्रमाणे नानाशास्त्री महामारीतून वाचले. एकदा महाराज एका श्रीमंताच्या घरी भिक्षेस गेले. ती श्रीमंत बाई बाहेर येऊन महाराजांकडे तिने पाहिले व आपल्या नोकरास सांगितले की, पानावर सर्व पदार्थ वाढून या स्वामींना ते पान द्या. अशा संन्याशाला असे पदार्थ मिळणे कठीण. हे भाषण ऐकून महाराज हसले. लक्ष्मीच्या मदाने महाराजही कळून आले नाहीत. पौर्णिमेच्या दुसरे दिवशी आपले घरी भिक्षा करून निघावे अशी तेथील तहसीलदाराने प्रार्थना केल्यावरून

महाराज पौर्णिमेस तेथे राहिले. दुसरे दिवशी त्यांचे घरी भिक्षा झाली. दोन महिन्यात अनेक श्रीमंत मंडळींनी तेथे येऊन समाराधना केल्या. पक्वान्ने खाऊन लोक कंटाळून गेले. पौर्णिमेस महाराज सर्व लोकांसह सीमोल्लंघनास जाऊन आले. दुसरे दिवशी तहसीलदारांचे घरी भिक्षा करून महाराज निघाले. नर्मदेच्या पलिकडे चार मोठ्या नौका, फुलांच्या माळा, पताका वगैरे लावून तयार केल्या होत्या. सुगंधी धूप घातला व दीपही नौकेत लावून ठेवले. त्यापैकी एका नौकेत महाराज व त्यांच्यासमोर काही मंडळी बसली व इतर तीन नौकांतून बाकीची भक्त मंडळी बसली. नौका चालू लागल्याबरोबर सर्वांनी महाराजांच्या नावाचा जयजयकार केला. भजन, गायन सुरू झाले. याप्रमाणे अत्यंत आनंदात त्या नौका परतीरास येऊन पोचल्या. तीरावर उतरून जवळच असलेल्या सनावद गावी महाराज येऊन राहिले. तेथून नरसोबावाडीच्या मंडळींना रेल्वेने पुढे जाण्यास सांगितले. त्यापैकी नरू अण्णाजी या गृहस्थांना महाराजांचे बरोबर पायी प्रवास करावा असे वाटून त्यांनी महाराजांना आपली तशी इच्छा सांगितली. पण 'तुम्हाला आमच्याबरोबर चालणे होणार नाही. शिवाय वाटेत उपास तापास तुम्हाला झेपणार नाहीत. करिता तुम्ही रेल्वेने पुढे चला. आम्ही मागाहून येतो !' असे महाराजांनी सांगताच ते निघाले. वाटेत महालयश्राद्धासाठी नाशिकला ते एक दिवस राहिले. तेथे ते ज्वराने आजारी पडले. तेथेच त्यांना आतूर संन्यास दिला. नंतर वाडीस आल्याबरोबर चार-पाच दिवसात ते समाधिस्थ झाले. नानाशास्त्र्यांनाही ब्रह्मावर्ती महाराजांनी परत जाण्यास सांगितले. पण तेही रमत गमत पुढे महिन्या दीड महिन्याने ब्रह्मावर्तास पोचले. तेथे ज्या दिवशी पोचले त्याच दिवशी त्यांना महामारीचा उपद्रव पुन: सुरू होऊन त्यांचे देहावसान झाले. चातुर्मासाकरिता आलेल्या मंडळींचे रोग, ती मंडळी आपापल्या घरी जाईपर्यंत महाराजांनी रोखून धरले होते.

सीतारामबुवा व गांडाबुवा बरोबर होते. सनावद येथील मुक्कामात सीतारामबुवांच्या वडिलांची श्राद्धतिथी आली, तेव्हा महाराजांनी सांगितले, 'आज पाऊस येणार आहे, करिता तुम्ही गावात जाऊन

स्वयंपाक करा.' हे महाराजांचे म्हणणे ऐकून गांडाबुवा म्हणाले, 'आता तर पावसाचे चिन्ह मुळीच नाही. पाऊस कसला येतो ?' असे बोलून तेथे घाटावरच स्वयंपाक केला. श्राद्धकर्म संपते न संपते इतक्यात पाऊस सुरू झाला. सर्व मंडळी घाबरून गेली. गांडाबुवांनी त्यावेळी महाराजांची क्षमा मागितल्यावर तात्पुरता पाऊस बंद होऊन नंतर मंडळींची जेवणे झाली.

तेथून सर्व मंडळींना आपापल्या स्थानी जाण्यास आज्ञा करून महाराज पुढे निघाले. त्यादिवशी पितृतिथी असल्याने सीतारामबुवा मागाहून निघाले. महाराज अरण्यातून निघाले. वाटेत एका गावी आले तेव्हा तेथील कुलकर्ण्याने महाराजांना सांगितले, 'या अरण्यातील रस्त्याने तुम्ही जाऊ नका. रस्ता चुकाल. तिकडे रहदारी बिलकूल नाही. मी वाटल्यास रेल्वेचे तिकीट काढून देतो.' पण महाराजांनी ते मान्य न करता ते त्या अरण्यातूनच निघाले. रस्त्यात एक जंगली मनुष्य भेटून त्याने, 'तुम्ही कुठे जाणार ? कोठून आलात, एकटेच का चालला ?' असे हिंदी भाषेत विचारले. महाराजांनी मराठीतून त्याला सर्व सांगितले. तेव्हा तो म्हणाला, 'मला याच रस्त्याने जावयाचे आहे. माझ्याबरोबर या, मी तुम्हाला रस्ता दाखवतो.' असे म्हणून तो मनुष्य पुढे चालला. याप्रमाणे थोडक्यातच एका गावाजवळ त्या माणसाने महाराजांना आणून सोडले व 'स्नान करून या गावात भिक्षा करा' असे सांगून दिसेनासा झाला. नंतर महाराज गावात आले. त्यांना मंडळींनी विचारल्यावरून, 'आपण अमुक रस्त्याने एकटेच सकाळी निघून दीड प्रहरात येथे आलो. एका मनुष्याने रस्ता दाखविला.' असे महाराजांचे म्हणणे ऐकून सर्वच आश्चर्यचकित झाले. एक दिवसातही जो मार्ग संपणार नाही तो एक प्रहरात संपवून महाराज तेथे पोचले हे मोठेच आश्चर्य होय.

त्या गावात भिक्षा करून महाराज पुन: जंगलातील रस्त्याने पुढे निघाले. थोडेसे पुढे गेल्यावर वयाने लहान, तेज:पुंज असा एक मनुष्य महाराजांना भेटला. त्याने महाराजांना आपल्या झोपडीत बोलावून तो भाकरी देऊ लागला. महाराज त्याला म्हणाले, 'आपण भिक्षेशिवाय काही घेत नाही आणि भिक्षाही ब्राह्मणाशिवाय इतरत्र घेत नाही.' ते

महाराजांचे बोलणे ऐकून तो पुरुष म्हणाला, 'अजून आपला द्वैतभाव गेला नाही तर ?' महाराज एवढेच म्हणाले, 'श्रीदत्तप्रभूच्या आज्ञेबाहेर आपणास जाता येत नाही.' याप्रमाणे बोलून आणखी काही त्याच्या प्रश्नांची उत्तरे दिल्यावर तो पुरुष गुप्त झाला. एका गावी कल्याणजी नावाच्या माणसाचा मुलगा फार आजारी पडला. तो लवकरच मरणार अशी स्थिती दिसू लागली. कल्याणजीने जाऊन महाराजांना हा वृत्तांत सांगितल्यावर महाराजांनी त्या मुलाकरिता एक यंत्र लिहून दिले. ते गळ्यात बांधताच तो मुलगा पूर्ण बरा झाला. पुढे ते यंत्र हरवताच मुलाला पुन्हा ताप येऊ लागला. पुन्हा महाराजांचेकडून यंत्र आणवून ते बांधताच ताप नाहीसा झाला. आर्य समाजाचे दयानंदसरस्वतींचे एक अनुयायी येऊन एकदा महाराजांचे बरोबर वितंडवाद करू लागले. त्यावेळी महाराज काही न बोलता स्वस्थ बसले. तेथे एक महाराजांचा भक्त ब्राह्मण होता. त्याला राग येऊन त्याने मंत्रप्रभावाने त्यांचे वाक्स्तंभन केले. तीन दिवस झाले तरी त्याला बोलता येईना. तेव्हा तो शरण आल्याने त्या ब्राह्मणास सांगून तो स्तंभन मंत्र परत घेवविला. त्याला परत बोलता येऊ लागले असे पाहताच तो पळून गेला. सीतारामबुवा महाराजांच्या मागून एक दिवसानेच निघाले. पण वेगाने चालून सुद्धा महाराजांना गाठण्यास त्यांना पाच दिवस लागले. येताना महाराज पंढरपुरास जाऊन नंतर वाडीकडे आले. रस्त्यात फक्त तीनच भिक्षा एका महिन्यात झाल्या. सनावदे गावाहून निघाल्यावर तापीच्या तीरावर एक भिक्षा, दुसरी मार्गातील एका गावात व तिसरी पंढरपुरात. बाकीचे दिवस नुसता जलाहार. भाद्रपद कृष्ण चतुर्थीस सनावदे मुक्कामाहून निघून आश्विन कृष्ण षष्ठीला नरसोबावाडीस येऊन पोचले. पंढरपुराहून नरसोबावाडी ८०-९० मैल असून हा प्रवास फक्त एकच दिवसात झाला. पंढरपुरी आश्विन वद्य पंचमीस दुपारी भिक्षा करून निघाले ते आश्विन कृष्ण षष्ठीस दुपारी वाडीस येऊन पोचले.

नरसोबावाडी – शके १८२८ (साधा मुक्काम)

शके १८२८ आश्विन व।। ६ दिवशी दुपारी ११-१२ वाजता महाराज

नरसोबाचे वाडीस येऊन पोचले. मंडळी सारखी महाराजांची वाटच पाहात होती. महाराज गावाबाहेर आल्याबरोबर त्यांना गावच्या सीमेवरून मोठ्या समारंभाने वाजत गाजत आणावे असा वाडीच्या मंडळींचा विचार होता. पण महाराज एकदम श्रीदत्तपादुकांसमोर येऊन उभे राहिल्यावर मग सर्व गावात महाराज आल्याची वर्दी गेली. तशा दुपारच्या जेवणाच्या वेळी देखील ही बातमी समजताच गावांतील लहान थोर सर्व मंडळी घाटावर महाराजांच्या दर्शनार्थ जमा झाली. महाराज खाली श्रीदत्तपादुकांचे दर्शन घेऊन वर येताच सर्व मंडळींनी साष्टांग वंदन करून डोळे भरून ती दिव्य मूर्ति पाहून घेतली व नंतर सर्व आपापल्या घरी परतले. महाराज ब्रह्मानंदस्वामींच्या मठात येऊन उतरले. नंतर आलेल्या मंडळींबरोबर थोडे बोलणे झाल्यावर माध्यान्हिक आटोपून भिक्षा झाली. परगावच्या यात्रेकरूंना महाराजांच्या दर्शनाची उत्कंठा असल्याने त्या त्या पुरोहितांनी आपापल्या यजमानांना लगेच महाराज आल्याचे पत्रद्वारा कळविले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे गांडाबुवा, विष्णुबुवा पटवर्धन ही मंडळी पूर्वीच रेल्वेने वाडीस येऊन पोचली होती. श्रीनृसिंहसरस्वती-स्वामिमहाराजांना तर बरेच दिवसांनी श्रीगुरुस्वामींचे दर्शन झाल्यामुळे अत्यंत समाधान वाटले.

महाराजांचा नित्य कार्यक्रम दुसरे दिवसापासून सुरू झाला. पहाटे चार वाजता उठल्यावर प्रभुस्मरण होऊन प्रथम श्रीनृसिंहसरस्वतींना संन्यासपद्धतीचे शिक्षण दिले जात असे. नंतर शौचमुखमार्जन, स्नान होई. प्रात:संध्यादि नित्यानुष्ठान झाल्यावर महाराज खाली श्रीदत्तपादुकांचे वंदनास जात. नंतर श्रीनारायणस्वामींची पूजा झाल्यावर, श्रीनारायण-स्वामींच्या धर्मशाळेत गीताभाष्य, उपनिषद्भाष्य इत्यादिकांचे पाठ चालत. नंतर सदाशिव ब्रह्मेंद्रकृत ब्रह्मसूत्रवृत्ति व जीवन्मुक्तिकविवेक सांगत असत. यावेळी गावातील सर्व जिज्ञासू मंडळी श्रवणाकरिता उत्सुकतेने येत असत. येथील परमगणेशभक्त विख्यात पुराणिक वक्रतुंडबुवा कवीश्वर हेही श्रवणास येऊन एका बाजूला बसत. सर्व मंडळी जमल्यावर महाराजांनी आरंभाचे वेळी विचारावे, 'वक्रतुंडबुवा आले की

नाही ?' बुवांनी लगेच उठून हात जोडून आपण आल्याचे सांगून वंदन करून बसावे. नंतर पाठास आरंभ होई. दहा वाजेपर्यंत पाठ झाल्यावर आलेली यात्रेकरू मंडळी महाराजांची पूजा करीत असत. अशा रोज १०-१२ पूजा होत असत. यावेळी महाराजांचा मुक्काम वाडीत सुमारे दोन महिनेपर्यंत होता. तोपर्यंत हजारो रुपये मिळाले. हे सर्व द्रव्य तेथील पुजारी मंडळीच घेत असत. समोर नारळ, केळी वगैरे कोणी ठेवल्यास महाराज त्यांना स्वत: प्रसाद देत. पण त्यात काही पैसे कोणी ठेवले असल्यास तो प्रसाद दुसऱ्याकडून देववीत. वरती द्रव्य ठेवलेले पाहून 'हा केर तुम्ही केव्हा काढणार' असे पुजाऱ्यांना महाराज विचारीत असत. बारा वाजल्यावर महाराज भिक्षा घेण्याकरिता निघत. पाच घरी भिक्षा घेतली जाई. लोक आपल्या दारापुढे सडा घालून रांगोळ्या काढून महाराजांची वाट पहात असत. बरोबर श्रीनृसिंहसरस्वतीही असत. भिक्षा घेऊन ती श्रीनारायणस्वामींचे मठात किंवा ब्रह्मानंदांचे मठात संपवीत असत. 'अष्टौ ग्रासा मुनेर्भक्ष्या:' या वचनास साजेल असाच महाराजांचा नित्य आहार असे. तिखट, गोड वगैरे तर वर्ज्यच. भिक्षा झाल्यावर ती पत्रावळ काढून जागा सारविण्याकरिता नित्य अनेक स्त्रियांची अहमहमिका सुरू होत असे. एक ब्राह्मणेतर बाई रोज मठाबाहेर येऊन आपणास महाराजांचे उच्छिष्ट काढण्यास मिळावे म्हणून उत्कंठेने बसत असे पण तिला बरेच दिवस तो योग आला नाही. शेवटी ती निराश झाली. पण त्यावेळी तेथे येण्याचा नियम काही तिने सोडला नाही. तिची भावना महाराजांनी ओळखली होती. एके दिवशी भिक्षा झाल्यावर बाहेर हात धुण्याचे वेळी येत असता महाराजांच्या हातातील भाताचे शीत रस्त्यात पडले. पडले कसले, पाडले. लगेच त्या सेवेच्छू बाईस महाराज म्हणाले, 'बाई ! एवढे शीत काढून जागा साफ करा पाहूं !' ही महाराजांची आज्ञा ऐकून त्या बाईला अत्यंत आनंद वाटून तिने ती सेवा लगेच केली. तिची इच्छा याप्रमाणे महाराजांनी पूर्ण केली. भिक्षा झाल्यावर आलेल्या पत्रांना उत्तरे लिहिण्याचे काम महाराज करीत. समक्ष तेथे आलेल्या मंडळींना मंत्र, जप वगैरे लिहून देत असत.

दुपारी सुमारे तीन वाजल्यावर महाराज श्रीनारायणस्वामींच्या कट्ट्यावर येऊन बसत. पुष्कळ मंडळी महाराजांना आपापल्या कामना सांगून त्यावर उपाय विचारून घेत असत. संध्याकाळपर्यंत हाच कार्यक्रम सुरू असे. महाराज वाडीस आल्याची वार्ता समजल्यापासून हजारो लोक महाराजांचे दर्शनास येऊन आपले संकट त्यांचे पुढे मांडीत. महाराजही सर्वांना उपाय सांगत. साखरेचे पदार्थ आपणापुढे व देवापुढे ठेवण्यास महाराजांची बंदी होती. परदेशी साखर अत्यंत अपवित्र असल्याने तिचा स्पर्श झाल्यासही आपण स्नान करतो असे महाराज प्रसंगाने बोलले होते. मेणबत्ती व परदेशी कापूरही असाच वर्ज्य होता. सूर्यास्तापर्यंत शेकडो लोकांना त्यांच्या त्यांच्या कामनेप्रमाणे उपाय सांगून महाराज सायंसंध्ये-करिता कृष्णापंचगंगा संगमावर नित्य जात असत. संध्यावंदनोत्तर श्रीनृसिंहसरस्वती महाराजांना वंदन करीत असत. नंतर तेथेच पीठावर बसून महाराज कृष्णालहरी सांगत. एकदा कृष्णालहरीतील 'मुखं ते सह्याधः सदय हृदयं ते नरहरेः, पुरेऽप्यांघ्रेनाभिः प्रपदयुगलं प्राच्यविषये' हा श्लोक सांगण्याचे काम सुरू झाले. त्याचवेळी इकडे देवाचे मंडपांत धूप, आरती सुरू झाली. यावेळी महाराजांना असे प्रेमाचे भरते आले की, त्यांचा कंठ दाटून डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. बोलणेच बंद झाले. थोडचा वेळाने महाराज म्हणाले, 'दयासागर प्रभू या ठिकाणी भक्तकार्याकरिता येऊन राहिला आहे, ही केवढी भाग्याची व आनंदाची गोष्ट आहे ? प्रभूंचे भक्तवात्सल्य अवर्णनीय आहे.' काही दिवसांनी कृष्णालहरी सांगून झाल्यावर श्रीमदाचार्यांची शतश्लोकी सांगण्याचे काम सुरू झाले. महाराजांची प्रवचनपद्धती पाहून सर्व विद्वज्जनांना महाराजांची सर्वज्ञता पूर्णपणे कळून चुकली. श्रींच्या पालखीची तिसरी प्रदक्षिणा सुरू झाल्यावर महाराज संगमावरून उठत व खाली श्रींचे दर्शन घेऊन ब्रह्मानंदांचे मठांत वर येऊन बसत. शेजारती होईपर्यंत त्यावेळीही काही सकाम मंडळी प्रश्न विचारण्याकरितां येतच असत.

श्रींची शेजारती झाल्यावर श्रीनारायणस्वामींच्या कट्ट्यावर महाराज येऊन बसत. नंतर भजनास आरंभ होई. महाराजांना भजनाची फार आवड

असे. भजनाचे वेळी महाराजांनी केलेले व इतरही संतांचे अभंग, पदे वगैरे म्हटली जात. विष्णुबुवा पटवर्धन वगैरे शिष्यमंडळी भक्तिरसपूर्ण भजन करीत असत. बारा वाजता भजन संपवून महाराजांची आरती व पुष्पांजली वाहण्याचा कार्यक्रम होत असे. नंतर प्रसाद घेऊन मंडळी घरी जात. तेथून पुढे महाराज ग्रामस्थांच्या विनंतीप्रमाणे त्यांना ब्रह्मकर्म शिकवीत. नंतर दोन वाजता शय्येवर नुसते लवंडायचे; चार वाजता पुन: उठून पूर्वीप्रमाणे कार्यक्रम सुरू. फक्त दोनच तास काय ती विश्रांती. पण महाराजांची मुद्रा कधीही कंटाळलेली दिसली नाही. त्या दोन महिन्यांच्या अवधीत तेथील सर्व मंडळींना पुष्कळ द्रव्य मिळाले.

गुरुद्वादशीचा उत्सव नेहमी पुजारी मंडळीच करतात. पण त्या वर्षी कोल्हापूर सरकारकडून उत्सवास प्रतिबंध झाल्यामुळे सर्व मंडळी चिंताक्रांत होऊन महाराजांचे जवळ गेली व वर्षाप्रमाणे निर्विघ्न उत्सव पार पडावा म्हणून सर्वांनी महाराजांचेजवळ प्रार्थना केली. तेव्हा महाराजांनी सांगितले, 'तुम्ही वहिवाटीप्रमाणे कोठीपूजन करा, प्रभूकृपेने उत्सव निर्विघ्न कडेला जाईल.' ही महाराजांची आश्वासनपर वाणी ऐकून सर्वांची चिंता दूर झाली व त्या वर्षीचा उत्सव कोणतेही विघ्न न येता व्यवस्थित पार पडला. आश्विन वद्य दशमीस महाराज प्रात:काली स्नानाकरिता श्रीकृष्णातीरावर आले असता, त्यांना श्रीदत्तप्रभूंचे प्रत्यक्ष दर्शन घडले. नित्याचे आन्हिक आटोपल्यावर श्रीदत्तपादुकांचे दर्शनाकरिता महाराज नियमाप्रमाणे आले. त्यावेळी वंदन चालू असतानाच महाराजांची समाधी लागली. तसेच महाराज वर ब्रह्मानंदांचे मठांत येऊन बसले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत समाधीस्थिती होती. त्यावेळी रामेश्वराचे यात्रेस तत्काल जाणेबद्दल महाराजांना दत्तप्रभूंचे सांगणे झाले. ही आज्ञा लोकांना समजताच सर्वांना वाईट वाटले. त्यांनी आणखी काही दिवस वास्तव्य होण्याबद्दल विनंती केली. पण महाराजांना ही देवाची आज्ञा मोडता येईना. तेव्हा सर्व पुजारी मंडळींनी महाराजांनी जाऊ नये म्हणून संतधारेचे अनुष्ठान सुरू केले. त्यावेळी 'पुजाऱ्यांचा आग्रह आहे. तरी आताच वाडी न सोडता पुन: आज्ञा होईपर्यंत येथेच

थांबावे.' असा पुनः दत्तप्रभूंचा आदेश महाराजांना झाला. महाराज देवांना म्हणाले की, 'अजून हा देह किती विकावयाचा तो विकावा.' नंतर महाराजांनी देवाची राहण्याविषयी पुनः झालेली आज्ञा सांगताच सर्वांना आनंद झाला. त्याच दिवशी 'वहिवाटीप्रमाणे पुजाऱ्यांनीच उत्सवाचे प्रयोजन करावे,' असा सरकारी हुकूम मिळाल्यामुळे तर मंडळींचा आनंद द्विगुणित झाला. त्यादिवशी महाराज सायंकाळपर्यंत समाधीतच होते. पण असा एक चमत्कार झाला की, बेळगांवचे कालकुंद्रीकर वाडीस आले होते. त्यांच्या पत्नीनी त्यादिवशी सकाळी येऊन महाराजांना भिक्षेचे निमंत्रण दिले होते व त्या दुपारी स्वयंपाक तयार करून महाराजांची वाट पहात बसल्या. त्याचवेळी महाराज दुसरे रूप धारण करून भिक्षेस निघाले. काही मंडळीही त्यांच्या पाठीमागून निघाली. पण रामचंद्रयोगींच्या मंदिरा-सन्निध येण्याबरोबर ते रूप अदृष्य झाले. त्याचवेळी गावाबाहेर वेशीतून येणाऱ्या मंडळींना महाराजांचे दर्शन झाले व महाराजांनी प्रसादही दिला. त्यांनी गावात येऊन आपणास दिलेला प्रसादही दाखविला. हा चमत्कार समजल्यावर गांडाबुवांच्याने काही राहवेना. त्यांनी रोजच्यावेळी सायंसंध्येस गेल्यावेळी संगमाच्या घाटावर हा प्रश्न महाराजांना केला. तो ऐकून महाराज हसले व म्हणाले की, 'आपल्याला काही माहिती नाही. आपण तर सर्वांसमक्ष मठांत समाधिस्थितीतच संध्याकाळपर्यंत होतो.' हे महाराजांचे सांगणे ऐकून सर्व मंडळी आश्चर्याने थक्क झाली. सर्वांनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातले. रात्री कालकुंद्रीकरांच्या पत्नीनेही आज दुपारी महाराज भिक्षेकरिता आपणाकडे आल्याचे सांगितले. त्यावरूनही महाराजांच्या लोकोत्तर सामर्थ्याविषयी सर्व लोकांची खात्री झाली.

त्यावर्षी दोन एकादशा स्मार्त व भागवत आल्या होत्या. महाराजांची एकादशी दुसरी होती. त्याच दिवशी गुरुद्वादशी असल्याने प्रसाद काही घेता यावयाचा नाही. आता काय करावे, अशा विचारात महाराज असता श्रीदत्तप्रभूंनी त्यांना विचारले की, 'मी स्मार्त की भागवत ?' महाराज म्हणाले की, 'दोन्हीही आपलीच स्वरूपे आहेत.' देव म्हणाले, 'मग

कोणतीही एकादशी केली तरी चालेल.' हा निर्णय झाल्यामुळे पहिली एकादशी करून महाराजांनी दुसरे दिवशी प्रसादभिक्षा केली. गुरुद्वादशीस बनामध्ये पात्रे वाढून झाल्यावर महाराज आले व तेथेच त्यादिवशी प्रसाद घेतला. सर्व मंडळीच्या पंक्तीतून महाराज स्वत: एकदा फिरून आले. त्यादिवशी यात्रेकरूंची गर्दी फारच झालेली होती.

गुरुद्वादशीचे दिवशी अन्नपूर्णेची पूजा होऊन नैवेद्य होण्याचे पूर्वी एक बाई काही अन्न घेऊन जात होती. तिला पकडून एका पुजाऱ्याने तिची कडक शब्दांत निर्भत्सना केली. ही गोष्ट देवांना आवडली नाही. त्यांनी बटूचा वेष घेऊन त्या पुजाऱ्यास दंडाने फार मार दिला. तो इतका की तो पुजारी शेवटी त्या माराने बेशुद्ध होऊन खाली पडला. तो बटु मात्र कोणालाही दिसला नाही. फक्त पुजाऱ्यास तेवढा दिसला. बाकीच्या मंडळींनी त्या बेशुद्ध पडलेल्या पुजाऱ्यास त्याच्या घरी पोचविले. मार असह्य असल्यामुळे तो पुजारी अत्यंत तळमळू लागला. तेव्हा सर्व मंडळींनी महाराजांना ही गोष्ट सांगितली. महाराज म्हणाले, 'प्रसादाच्या वेळी अपशब्द बोलल्याबद्दल हे प्रायश्चित्त आहे. तुम्ही सर्व श्रीदत्तपादुकांजवळ जाऊन प्रार्थना करा व या प्रसादाचे अन्न त्याच्या अंगाला चोळा म्हणजे तो बरा होईल.' या सांगण्याप्रमाणे सर्वांनी करताच त्या पुजाऱ्याला बरे वाटले. त्याच्या अंगावरील माराचे वळ पुढे महिनाभर लोक पाहात होते.

एका बाईने आपले काम झाल्यावर देवाच्या उत्सवात पोळ्या करीन असा नवस केला होता. त्याप्रमाणे तिचे काम झाल्यावर तिने उत्सवांत काही पोळ्या केल्या. तेव्हा एका पुजाऱ्याने त्या बाईची टिंगल केली, व'गर्भाधानाच्या दिवसाप्रमाणे या नाजूक पोळ्या कशाला केल्या ?' हे ऐकून त्या बाईस वाईट वाटले व ती रडू लागली. तेव्हा श्रीदत्तप्रभूंनी त्याही पुजाऱ्यास वरीलप्रमाणे चांगला बेदम मार दिला. 'वज्रादपिकठारोणि' असे अपराध्याविषयी प्रभूंचे चित्त आहे. नरकचतुर्दशीचे दिवशी पहाटे सर्व मंडळी देवाकडे जमली व त्यांनी महाराजांना अभ्यंगस्नान घातले. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामींचे हस्ते

महाराजांची षोडशोपचार पूजा मंडळींनी करविली. शेवटी 'जय जय श्रीमद्गुरुवर स्वामिन् परमात्मन् हंसा' ही आरती म्हणून मंत्रपुष्पांजली झाल्यावर सर्वांनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातले. श्रीदत्तपादुकांवर दिपवाळीत पाच दिवस ऊन पाणी घालण्याची पद्धत आहे. एक मोठा हंडा भरून तापत ठेवलेला असतो; त्यातील पाणी घेऊन लोक पादुकांवर घालतात. पाणी फार कढत आहे की थंड आहे इकडे कोणाचे लक्ष असणार ? त्यावेळी असे झाले की श्रीपादुकांवर अत्यंत कढत पाणी घालून लोक निघून गेले. पण त्याचा परिणाम असा झाला की, महाराजांच्या लघवीच्या द्वारातून रक्त पडू लागून अत्यंत त्रास होऊ लागला. देवांना विचारताच देव म्हणाले की, 'एक दिवस तुम्हाला ऊन पाणी घातले तर तुमची ही दशा ! मग पुजारी रोज आपणावर कढत पाणी घालतात; आपली काय दशा होत असेल ?' हे ऐकून महाराजांनी चौकशी केली असता पुजाऱ्यांनी सांगितले, 'पाणी कढत आहे याची चौकशी न होता तसेच पाणी घातले जाते. ही गोष्ट खरी आहे.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'तुमच्या अपराधाबद्दल आपणास शिक्षा झाली आहे. तरी तुम्ही सर्वांनी देवापुढे नारळ ठेवून इत:पर व्यवस्थित पाणी घालू अशी प्रार्थना करावी.' त्याप्रमाणे पुजारी मंडळींनी प्रार्थना करताच महाराजांची व्यथा कमी झाली. आयुष्यात फक्त चार-पाच वेळाच भक्तांच्या आग्रहास्तव ऊन पाण्याने स्नान करण्याचा प्रसंग महाराजांचेवर आला.

एका भक्ताच्या प्रार्थनेवरून महाराजांनी 'साकारतातारकासा कापिसार रसापिका' असा श्लोक त्याला दिला. एका ब्राह्मणाचा मुलगा पिशाच्च बाधा झाल्यामुळे वाडीस सेवेकरिता येऊन राहिला होता. एक वर्ष झाले तरी त्याची बाधा दूर झाली नाही. त्याचे आई-बाप त्याला नेण्याकरिता आल्याबरोबर तो मुलगा बेशुद्ध होऊन पडला. त्याच्या आईबापांनी त्याला बरा करण्याबद्दल महाराजांची प्रार्थना केली. त्यावेळी महाराज म्हणाले की, 'देवाला तुमचा मुलगा पाहिजे असल्याने त्यानेच पिशाच्च सोडून त्याला येथे आपल्याजवळ आणून ठेवले आहे. तरी मुलाला येथेच सोडून तुम्ही घरी चला. त्याची आशा धरू नका.'

हे महाराजांचे सांगणे ऐकून नाइलाजाने मुलाला वाडीतच सोडून ते आई-बाप निघून गेले. पुढे तो मुलगा वाडीतच देवाची सेवा करीत राहिला.

एकदा एक बाई महाराजांचेकडे येऊन तिने प्रार्थना केली की, 'आपणास मूलबाळ नाही, तरी कृपा व्हावी.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'बाई ! संन्याशाकडे कुठली मुलेबाळे ? तुम्ही खाली देवाचे दरबारात जाऊन मागा म्हणजे मुले मिळतील.' असे सांगून तिला देवाकडे प्रार्थनेस पाठविले. माणगांवचे एक महाराजांचे प्रीतीतील गृहस्थ महाराजांचे दर्शनार्थ आले. त्यांची दोन लग्ने होऊनही त्यांना संतती नसल्याचे त्यांनी महाराजांना सांगितले. महाराजांनी त्यांना सोन्याचा पाळणा ब्राह्मणास दान करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी घरी जाऊन केल्याबरोबर त्यांना संतती झाली.

असाच एक पिशाच्चबाधा असलेला ब्राह्मण कोकणांतून महाराजांचे दर्शनाकरिता वाडीस आला. महाराजांचे दर्शन झाल्याबरोबर ते पिशाच्च अंगांत येऊन बोलू लागले. त्याने महाराजांना सांगितले की, 'महाराज, मी या मुलाचा बाप असून हा माझे नियम पाळीत नसल्यामुळे मी याला त्रास देत आहे. ते नियम असे की, मी रोज घरी विष्णुसहस्त्रनामाचे पाठ करीत होतो व घरी येणाऱ्या अतिथीस जेवू घालीत होतो. हे माझे नियम या मुलाने पाळल्यास मी याला त्रास देणार नाही.' हे त्या पिशाच्चाचे भाषण ऐकून महाराजांनीं त्या ब्राह्मणाला त्याप्रमाणे वागण्यास सांगितले. नंतर तो ब्राह्मण घरी येऊन बापाच्या इच्छेप्रमाणे वागू लागल्याबरोबर त्याची बाधा दूर झाली.

माणगांव येथील एका गृहस्थाची संतती वाचत नव्हती. त्याचेकडून महाराजांचे सांगण्याप्रमाणे घरातील वडील माणसांनी मंगळाचे व्रत करविल्यानंतर त्याची संतती वाचू लागली. इंदूरचे वासुदेवराव ठाकूर यांचे कुटुंबाची प्रकृती नेहमी ठीक नसे. त्याकरिता ते मुद्दाम इंदुरहून महाराजांचे दर्शनार्थ वाडीस येऊन त्यांनी आपली हकीकत महाराजांना सांगितली. त्यावेळी महाराजांनी त्यांना सांगितले, 'तुमच्या कुळातील एका

सत्पुरुषाच्या समाधीची पूजाअर्चा होत नसल्याने हा त्रास होते. तरी ती व्यवस्था प्रथम करा म्हणजे कुटुंबास आरोग्य लाभेल.' त्याप्रमाणे ठाकूर यांनी आपल्या मूळ गावी जाऊन बऱ्याच प्रयासाने ती जमिनीत असलेली समाधी शोधून काढली. नंतर तिची पूजेची योग्य ती व्यवस्था करतांच त्यांचे कुटुंबाची प्रकृती उत्तम आरोग्यसंपन्न झाली. वेंगुर्ल्याचा एक कुष्ठी ब्राह्मण आपला रोग जाण्याकरिता वाडीत पाच-सहा वर्षे सेवेस राहिला होता. त्याने एकाच्या सांगण्यावरून एकदा कृष्णातीरावर जाऊन महाराजांना आपली हकीकत निवेदन केली. महाराजांनी त्याला दुसरे दिवशी भेटण्यास सांगितले. पण त्या दिवशी काम न झाल्यामुळे पुन्हा दुसरे दिवशी भेटण्यास सांगितले. नंतर महाराजांनी देवास त्याब्राह्मणा-बद्दल विचारले असता, 'त्याने गर्दभाला पुरण खाऊ घातल्यास तो रोगमुक्त होईल' असे देवाचे सांगणे झाले. त्याप्रमाणे महाराजांनीं त्या ब्राह्मणाला करण्यास सांगितले व आपल्यासमोर कोणीतरी ठेवलेल्या पैशांतून त्याला पैसे खर्चास घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाने तेथील एक रुपया घेऊन सर्व सामान आणून पुरण तयार करविले व वनात जाऊन गर्दभास खाऊ घालून तो ब्राह्मण दुपारी महाराजांचे स्नानाचे वेळी कृष्णातीरावर आला व त्याने प्रवाहात महाराजांच्या खाली जाऊन स्नान केले. तीन बुड्या मारून वर येताच तो रोगमुक्त झाला.

मागील खेपेस महाराज वाडीहून पंढरपूरमार्गे बार्शीस आले. तेथे माणगांवचे दत्तुशास्त्री साधले राहत असत. यांना बार्शीस बावडेकरशास्त्री असे लोक म्हणत असत. यांचे घरी महाराज एकदा दुपारचे वेळी 'श्रीगुरुदेवदत्त' म्हणून येऊन उभे राहिले. सर्व मंडळींनी येऊन त्यांना बसण्यास आसन दिले. नंतर भिक्षेचीही योग्य ती व्यवस्था झाली. तेथेच बाळू साधले म्हणून माणगांवचे गृहस्थ राहत असत. त्यांच्या घरांतील मंडळींची नावे घेऊन महाराजांनी त्या सर्वांची चौकशी केली. नंतर हेच वासुदेवानंदसरस्वती अशी सर्वांची ओळख पटून सर्वांचे मनात महाराजांचे विषयीचा आदर अधिक वाढला. पुढे बाळू साधले सांगलीस वेदाध्ययनासाठी गेले होते. महाराज वाडीस आल्याचे समजल्यावरून ते

मुद्दाम सांगलीवरून महाराजांचे दर्शनास आले व त्यांनी आपणास एखादा मंत्र जप सांगण्याविषयी महाराजांना विनंती केली. त्यावेळी महाराजांनी त्यांना सांगितले, 'ब्राह्मणांस गायत्रीमंत्र हाच मुख्य मंत्र असल्याने त्याचेच पुरश्चरण करून ब्राह्मणाने कार्यसिद्धी करून घ्यावी. तसेच आपल्या कुलदेवतेचा मंत्रजपही त्याने करावा. आपल्या कुळातील कोणी तपस्वी पुरुषाने ती देवता प्रसन्न करून घेतली असेल तीच कुलदेवता. ती कुलातील माणसांचे रक्षण करते. करिता तुम्ही याप्रमाणे कुलदेवतेचा व गायत्रीचा मंत्र नित्य जपत चला. इतर मंत्रांचे भानगडीत तुम्ही पडू नका. आता वाडीस आला आहात तर गुरुचरित्राचा सप्ताह करा व 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचे भजन करीत चला. याप्रमाणे महाराजांनी सांगताच बाळंभट साधले तसेच सांगलीस गेले.

सावंतवाडीचे अग्निहोत्री सप्ते यांना महाराजांनी येऊ नये असे कळविले असताही ते वाडीस जाण्यास निघाले. पण वाटेत त्यांना तापाने गाठल्यामुळे तसेच परत घरी जावे लागले. महाराजांची आज्ञा अनुल्लंघनीय आहे. वाडीतील एका पुजाऱ्याच्या मनात, पूजेकरिता महाराजांचेकडून पादुका घ्याव्यात असे आले. पण मागण्याचा योग मात्र बरेच दिवस आला नाही. एकदा महाराज सहज त्यांना म्हणाले, 'तुम्हांला देवांनी अक्षयपादुका दिल्या असता इतर पादुकांची तुम्ही इच्छा कशाला करता ?' ही मनातील गोष्ट महाराजांनी बोलून दाखविलेली पाहून त्या पुजाऱ्यांना मोठे आश्चर्य वाटले. एक श्रीमंत गृहस्थ आपल्या पत्नीस पिशाच्चपीडा होऊ लागल्यामुळे वाडीस पत्नीसह येऊन राहिला होता. तीन महिने सेवा करूनही काही गुण नाही असे पाहून त्याने महाराजांना सर्व हकीगत सांगितली. महाराजांनी एकदा त्याच्या पत्नीकडे पाहून दुसरे दिवशी भेटा असे त्या गृहस्थास सांगितले. त्याप्रमाणे तो गृहस्थ दुसरे दिवशी महाराजांचे दर्शनास आला असता महाराज त्याला म्हणाले, तुमच्या पूर्वजांकडे एका ब्राह्मणाची बाराशे रुपये ठेव होती, ती त्याला परत मिळाली नाही. त्यामुळे तो ब्राह्मण पिशाच्च होऊन पीडा देत आहे. तरी ती रक्कम येथे ब्राह्मण भोजनाकरिता खर्च करा, म्हणजे तुमची पत्नी

बरी होईल.' ही महाराजांची आज्ञा ऐकून त्या श्रीमंत गृहस्थाने तारेने घरून तितके पैसे मागवून ते महाराजांचे पुढे आणून ठेवले. महाराजांनी ते पैसे एका पुजाऱ्याकडे देऊन रोज ब्राह्मणसंतर्पण करण्यास सांगितले व हे पैसे संपेपर्यंत घरी कोणीही जेवू नये असे सर्वांना सांगितले. त्याप्रमाणे अन्नदान सुरू झाले. हळूहळू त्या बाईस आराम पडू लागला. ज्या दिवशी तो पैसा सर्व संपला त्या दिवशी पिशाच्चाला सद्गति मिळून ती बाईही त्या त्रासातून पूर्ण मुक्त झाली. कोलगांव सावंतवाडी येथील राहणारे गणेश सातवळेकर हे यावेळी वाडीस महाराजांचे दर्शनाकरिता आले. महाराजांच्या संगतीचा लाभ व्हावा म्हणून त्यांनी काही दिवस वाडीत मुक्काम केला. उपनिषत्पाठाचे वेळी शेवटी महाराजांचे पायांवर मस्तक ठेवण्यास मिळावे अशी त्यांची इच्छा होती. पण महाराज कोणालाच शिवून घेत नसल्यामुळे बरेच दिवस त्यांची ती इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. एकदा त्यांनी धीर करून महाराजांना तसे विचारले. तेव्हा त्यादिवशी मात्र महाराजांचे चरणावर मस्तक ठेवण्याची त्यांची इच्छा पूर्ण होऊन त्यांना धन्यता वाटली. त्यांनी द्विसाहस्त्री गुरुचरित्राची एक लहान प्रत लिहून महाराजांना अर्पण केली व अनेक व्याप सारखे पाठीमागे असताही महाराजांनीं वेळात वेळ काढून सातवळेकरांना ते गुरुचरित्र समजावून सांगून त्यांची तीही इच्छा पूर्ण केली. तसेच विंचू, सर्प, दृष्टी, सुलभ प्रसूती इत्यादिकांकरिता मंत्रही त्यांना लिहून दिले. कृष्णामाईच्या डोहांत पाय घसरून ते पडले असता मंडळींनी त्यांना वर काढले. महाराजांचीच कृपा ते समजत असत. नंतर ते गावी जाण्यास निघाले व महाराजांचे दर्शनास आले असता महाराज त्यांना एवढेच म्हणाले, 'उद्या का जाता सातवळेकर !' पण त्यांनी सांगितले, 'टांगा ठरविला असून टांगेवाल्याने संचकारही नेला आहे.' हे ऐकून महाराज 'बरे तर' असे म्हणाले. पण त्यादिवशी तो टांगेवालाच न आल्याने त्यांचे जाणे शेवटी राहिलेच. दुसरे दिवशी निघतांना दर्शनास सातवळेकर गेले; तेव्हा महाराजांनी एकाकडे पाहून थट्टेने विचारले, 'काहो ! सातवळेकर कालच गेले असतील नाही !' नंतर त्यांनी घडलेली गोष्ट सांगितली व महाराजांची

आज्ञा घेऊन घरी गेले. एकदा सातवळेकरांनी महाराजांना विचारले, 'आपणास पुनर्जन्म आहे काय ?' तेव्हा महाराज म्हणाले, 'होय. हा तर अरुणोदय आहे.' महाराजांनी त्यांना एकदा लेखनासंबंधीं पुढील गोष्ट सांगितली. भुसावळला असताना पुष्कळ मंडळी दर्शनार्थ येत. त्यांना पुढे पुढे सद्वासना उत्पन्न होऊन ती मंडळी शास्त्रविहित कर्म करू लागली. एकदा सर्व लोकांनी महाराजांना विनंती केली, 'आपल्याजवळ आलो असता आमचे विचार उत्तम व स्थिर राहतात. पण घरी गेल्यावर मात्र मनाची चलबिचल सुरू होते. स्नेही मंडळींच्या मनाचे समाधान करता येत नाही, त्यामुळे ती मंडळी थट्टा करतात. करिता आमच्या मनाचे स्थैर्य कायम राहून दुसऱ्यांचेही समाधान आम्हाला करता येईल, असा एखादा लेख आपण आम्हांला लिहून द्यावा.' ही त्या मंडळींची विनंती ऐकून महाराजांनी लेख लिहिण्यास सुरुवात केली. पण लगेच ताप येऊ लागल्यामुळे ते लेखन त्यावेळी तसेच राहिले. पुन्हा दोन वेळा असा प्रयत्न केला. पण त्यावेळीही पूर्ववत् स्थिती झाली. तिसऱ्या वेळी मात्र ताप निघेना व देवांचे सांगणे झाले, 'तुला याच स्थितीत ठेवले म्हणजे लिहिण्याचे चाळे सुटतील.' हे ऐकून देवाला लेख लिहिणे आवडत नाही असे वाटून महाराजांनी ते काम बंद केले व पूर्वीचे लिहिलेले कागदही फाडून टाकले. तेव्हा प्रकृती उत्तम झाली. वाडीतील दीक्षितस्वामींचे वडील बंधू दत्तू दीक्षित यांची कन्या सीताबाई भिलवडीस दिली होती. पण नवऱ्याने ती कृष्णवर्णाची म्हणून तिला एक शेत देऊन विभक्त ठेवले होते. ती आपल्या शेतात कष्ट करून धान्य पिकवून खात असे. मागे वाडीस महाराज आले त्यावेळी ती दर्शनास आली होती. तिने त्यावेळी महाराजांच्या चरणांची धूळ एका डबीत भरून नेली होती. पुढे एकदा तिच्या शेतावर धान्य मळून तयार झाले होते. इतक्यात एकदम मोठा पाऊस येऊ लागला, तिने लगेच महाराजांचे स्मरण करून ती डबीतील महाराजांची चरणधुली खळ्याभोवती टाकली व 'मी या संकटांतून मुक्त झाल्यावर वाडीस येऊन ब्राह्मणसमाराधना करीन, मला एवढे अन्नदान महाराजांनी करावे.' अशी मनोमन महाराजांची प्रार्थना केली व त्यावेळी

तिच्या खळ्यावर पावसाचा एक थेंबही न पडता तिच्या धान्याचे संरक्षण झाले. नंतर महाराज वाडीस आल्याचे समजताच ती वाडीत आली व आपला नवस तिने गांडाबुवांचेजवळ सांगून आज समाराधनेचे वेळी महाराजांनी भिक्षेस यावे अशी विनंती केली. त्याप्रमाणे तिच्या समाराधनेचे वेळी जाऊन महाराज वगैरे सर्वांनी भिक्षा घेऊन तिचे समाधान केले. बेळगांव येथे कालकुंद्रीकर म्हणून धनिक गृहस्थ होते. त्यांचे वडीलांची वाचा कोणी मंत्रप्रयोग केल्याने बंद झाली. बोलता येईना व काही स्मरणही राहीना. महाराज वाडीस आल्याचे समजल्यावरून कालकुंद्रीकर आपल्या वडीलांना घेऊन वाडीस महाराजांचे दर्शनास आले. महाराजांनी त्यांना पाहिल्याबरोबर 'यांच्यावर कोणी मंत्रप्रयोग केल्यामुळे यांची अशी दशा झाल्याचे सांगितले व आहे या स्थितीतच यांचे राहणे बरे. अंतसमयी यांना पूर्ववत् स्मरणशक्ति येईल' असे सांगितले. असे महाराजांचे सांगणे ऐकून कालकुंद्रीकर वडीलांना घेऊन घरी गेले. पुढे अंतकाळच्या वेळी त्यांच्या वडीलांना उत्तम स्मृतिलाभ झाला. त्यांनी आपल्या घरातील मंडळीना सांगितले, 'मी परवा द्वादशीस या लोकांतून जाणार, तरी मला लक्ष्मीनारायणाचे दर्शनाकरिता कालकुंद्रीस घेऊन चला.' याप्रमाणे त्यांना कालकुंद्रीस नेले. तेथे एकादशीस उपोषण करून द्वादशीस लक्ष्मीनारायणाचे दर्शनास गेले वेळी मुखाने हरिस्मरण करीत त्यांनी प्रभूला साष्टांग नमस्कार घातला तो अखेरचाच. पुन्हा ते उठलेच नाहीत. महाराजांच्या सांगण्याप्रमाणे शेवटी त्यांचे कल्याण झाले. वाडीहून दोन मैलावर मोळा म्हणून अरण्य कृष्णातीरावर आहे. त्याठिकाणी एका साधू पुरुषाच्या सांगण्यावरून वाडीतील मंडळी कार्तिक पौर्णिमेनंतर वनभोजनास जात असत. यावर्षी सर्वांच्या आग्रहावरून महाराजही तेथे गेले होते. बरोबर नृसिंहसरस्वती वगैरे शिष्यमंडळी होती. वाडीतील प्रसिद्ध प्रासादिक पुराणिक वक्रतुंडबुवा कवीश्वर हेही बरोबर होते. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' हे भजन महाराज बाहेर निघाले म्हणजे होत असे. त्याप्रमाणे भजन करीत मंडळी महाराजांचेसह मोळ्यात पोचली. नंतर महाराजांची

भिक्षा व सर्वांची भोजने झाल्यावर वक्रतुंडबुवा कवीश्वर यांनी पुराणसेवा केली. महाराजांचा अधिकार पूर्णपणे जाणणारे ते होते. त्यांनी त्यादिवशी भविष्यपुराण व इतरही पुराणातील वचनावरून श्रीदत्तात्रेयांचे कलियुगात श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंहसरस्वती व योगिराज असे जे तीन अवतार होणार त्यापैकी पहिले दोन अवतार होऊन गेले, तिसरा योगिराज म्हणजेच महाराज आहेत असे अत्यंत श्रद्धापूर्वक प्रतिपादन केले. पण महाराज ते कशाला अंगाशी लावून घेतील ? त्यांनी त्यावेळी सांगितले, 'योगिराज अवतार अद्यापि व्हावयाचा आहे. आपल्यावर उगीच हा आरोप नको.' हे महाराजांचे वाक्य ऐकूनही भाविक मंडळीची श्रद्धा तशीच कायम राहिली. असो. संध्याकाळी सर्व मंडळी महाराजांचेसह भजन करीत गावात आली. गावात प्रत्येकाच्या दरवाज्यासमोर रांगोळ्या घालून सुवासिनी स्त्रिया आरत्या घेऊन तयार होत्या. महाराज येताच सर्वांनी महाराजांना ओवाळून नमस्कार केले. तो समारंभ फारच पहाण्या-सारखा झाला. नारायणस्वामींच्या कट्ट्यावर नित्याप्रमाणे एकदा महाराज बसले असता कीर्तन सुरू झाले. कीर्तन ऐकता ऐकतांच महाराजांना समाधी लागली. त्यावेळी थंडीवाऱ्याच्या भीतिने मंडळीनी सभोवती पडदे लावले; त्यामुळे ते समाधीदर्शन फारसे कोणालाही झाले नाही. योगी पुरुषाचे समाधीस्थितीतील दर्शन म्हणजे साक्षात् ब्रह्मस्वरूपदर्शनच आहे, ही माहिती त्यावेळी कोणास असणार ? महाराजांचे व्युत्थान झाल्यावर त्यावेळी पडदा लावण्याचे कारण नव्हते. अरण्यातसुद्धा अशी समाधी लागते इत्यादि महाराजांनी सांगितले. या अवस्थेत महाराजांना वाडीहून निघण्याची आज्ञा होते काय म्हणून मंडळी सचिंत होती. पण तसे काही घडून आले नाही. त्यामुळे सर्वांना आनंद झाला. ती समाधी पुढे एक तासानंतर उतरली. महाराजांचा पूर्वाश्रमातील एक भाचा पिशाच्च-बाधेने त्रस्त होऊन महाराजांना शरण आला. महाराजांनी विचारल्यावरून त्याने आपली हकीकत त्यांना सांगितली ती अशी 'आपले आजोबा असताना एक ब्राह्मण घरी आला. जेवण झाल्यावर त्याने बत्तीस रुपये आपल्या आजोबांचेजवळ ठेवण्यास दिले व काही दिवसांनी परत येऊन रुपये नेईन

असे सांगून तो निघून गेला. त्याचे नावाची व स्थलाचीही चौकशी त्यावेळी कोणी केली नाही. पुढे काही दिवसांनी तो ब्राह्मण परत आला. पण त्यावेळी त्याला सांगूनही त्याने आपले पैसे नेले नाहीत. पुन्हा काही तो ब्राह्मण परत आला नाही. पैसे मात्र त्याचे राहिले. पुढे लवकरच आजोबा वारल्यावर आमच्या वडीलांना तो ब्राह्मण पिशाच्च होऊन पीडा देऊ लागला. या पीडेतून सुटका व्हावी म्हणून दोन वेळा नारायणबळी केला तरी त्याची पीडा कमी होत नाही, तरी आपण कृपा करून त्या त्रासातून सोडवावे.' ही त्याची हकीकत ऐकून महाराजांनी त्या पिशाच्चास बोलावून त्यासंबंधी विचारले. तेव्हा त्याने घडलेल्या सर्व गोष्टी खऱ्या असल्याचे सांगून, अद्यापि मला गती न मिळाल्याने याने आणखी एक वेळ आपणासमक्ष नारायणबळी करावा अशी इच्छा प्रदर्शित केली. नंतर महाराजांनी त्याला तसे करण्यास सांगून पैसे नसल्यास सीतारामबुवा व्यवस्था करतील असे सांगितले. नंतर त्याने त्याप्रमाणे करताच तो पीशाच्चपीडेतून मुक्त झाला. पिशाच्चालाही सद्‌गति मिळाली.

एका बाईला एक ब्रह्मराक्षस फार पीडा देत होता. एखादेवेळी त्याने वाऱ्याचे रूपाने त्या बाईस आभाळात नेऊन नंतर कोठेतरी दूर नेऊन ठेवावी. ती बाई त्यावेळी बेशुद्ध झालेली असे. पुढे पुष्कळ वेळाने सावध झाल्यावर तिने शोध करीत आपल्या घरी यावे. हा त्रास असह्य झाल्याने ती बाई आपल्या आईस बरोबर घेऊन वाडीस येऊन राहिली होती. वाडीतही एकदा त्या राक्षसाने तिला भर दुपारी सर्व मंडळी पहात असता एकदम आकाशात नेऊन कोठेतरी दूर ठेऊन दिले. त्यावेळी तिच्या आईने घाबरून येऊन महाराजांना ही हकीकत सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले की, 'ती बाई पश्चिम दिशेला असून सुरक्षित आहे. संध्याकाळी परत येईल. घाबरू नका.' त्याप्रमाणे ती बाई सावध होऊन सायंकाळी आपले घरी परत आली. पुढे तिच्या बापाने विनंती केल्यावरून महाराजांनी एक यंत्र करून दिले. ते तिच्या गळ्यात बांधताच ती त्या पिशाच्चाच्या पीडेपासून मुक्त होऊन आपल्या घरी गेली. सखाराम हरी नावाचा वाडीतील एक पुजारी कोणाच्या तरी सांगण्यावरून योगाभ्यास करू

लागला. पण त्यात काही चूक झाल्यामुळे त्याचे मस्तक फिरले. महाराजांनी त्याला सुधारण्याकरिता काही औषध व जप सांगितला. पण दुर्दैवाने ते त्याने न केल्यामुळे त्याची उन्मादावस्था शेवटपर्यंत गेली नाही. एक गृहस्थ, आपल्या मुलास वेड लागले आहे असे समजून त्याला घेऊन महाराजांचे दर्शनास आला व त्याने महाराजांना मुलाची हकीकत अशी सांगितली 'हा मुलगा ५-६ वर्षांपर्यंत चांगला वागत होता. पण पुढे एकाएकी याची अशी अवस्था झाली. तरी कृपा करून आपण याचे वेड घालवावे.' हे बोलणे ऐकून महाराजांनी त्या मुलाकडे पाहिले. तेव्हा तो मुलगाही महाराजांकडे टक लावून पाहू लागला. सुमारे १०-१५ मिनिटे दोघे एकमेकांकडे पहात होते. नंतर महाराजांनी त्याचे बापास सांगितले 'या मुलाचे वेड बरे हाण्यासारखे नाही, पण ते अपायकारक नाही एवढे मात्र खास, उलट कल्याणकारकच ठरेल.' हे ऐकून तो गृहस्थ मुलाला घेऊन आपल्या गावी गेला. नंतर महाराजांनी मंडळीना सांगितले की, 'हा मुलगा कोणीतरी पूर्वजन्मीचा योगभ्रष्ट पुरुष आहे. याने लोकांची उपाधी नको म्हणून हे वेड्याचे सोंग मुद्दाम घेतले आहे. दक्षिणेत हा मोठा सिद्ध पुरुष आज आपल्या पहाण्यात आला.' हे ऐकून सर्व मंडळीना कौतुक वाटले. कोल्हापूरहून प्रो. विजापूरकर व पुण्याहून प्रो. भानू हे दोघे प्रसिद्ध प्राध्यापक वाडीस महाराजांचे दर्शनार्थ आले होते. दोघांनीही महाराजांचे बरोबर थोडा वेळ अध्यात्मचर्चा केली. पण तेवढ्यात महाराजांच्या पूर्ण ज्ञानाने ते दोघेही दिपून गेले. सायंकाळी श्रीनारायणस्वामींचे कट्ट्यावर महाराजांचेसमोर प्रो. भानूंचे व्याख्यान झाले. आचार्यमतास विरोध न करता व्याख्यान व्हावे असे त्यांना महाराजांनी प्रथमच सांगितले होते. एक संन्यासी महाराजांची भेट घेण्याकरिता मुद्दाम काशीहून आले होते. ते वाडीत पंधरा दिवस होते. रामेश्वराकडे जाण्याकरिता महाराजांना ज्यावेळी देवाची आज्ञा झाली त्याचवेळी त्या संन्याशालाही उत्तरेकडे जाण्याची आज्ञा झाल्यामुळे ते परत काशीकडे निघून गेले. कुरुंदवाड संस्थानचे अधिपती बाळासाहेब पटवर्धन हे रोज महाराजांचे दर्शनास येऊन घटकाभर का होईना सत्संगतीचा लाभ घेतल्यावाचून रहात नसत. त्यांना

एकदा रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या. उपचार करूनही गुण न आल्यामुळे सर्व मंडळींनी घाबरून एक मनुष्य वाडीस महाराजांचेकडे तातडीने पाठविला. कुरुंदवाड व वाडी यामध्ये फक्त एक मैलाचेच अंतर आहे. पंचगंगा नदी ओलांडली की, लगेच कुरुंदवाडची हद्द लागे. महाराजांनी त्या राजदूतास काही गोळ्या दिल्या अणि श्रीमंतांनी गोप्रदान करावे असे सांगितले. त्याप्रमाणे व्यवस्था झाल्याबरोबर तो उपद्रव आपोआप कमी झाला. संन्यासानंतर एकंदर तीन वेळा महाराजांचे येणे वाडीस झाले. त्यात प्रथम खेपेची एक वाडीस घडलेली गोष्ट चित्ताकर्षक अशी आहे. वाडीत वैजनाथ म्हणून एक ब्राह्मण रहात असे. तो आपणांस अक्कलकोटच्या स्वामींचा शिष्य म्हणवीत असे. रोज सकाळी उठल्यावर एक तांब्या हातात घेऊन त्याने दहा अकरा वाजेपर्यंत फिरावे. नंतर तास दोन तास अंगाला सारखी माती लावून नदीत स्नान करावे. संध्या नाही, पूजा नाही. वाडीत बरेच दिवस राहून देवाला कधी तांब्याभर पाणीसुद्धा त्याने घातले नाही. लोकांनी त्याला पुष्कळ सांगावे. पण तो उलट सांगे 'मी समंधीबाधेचा मनुष्य आहे. मला पिशाच्च काहीच सुचू देत नाही.' ही त्याची वाणी ऐकून लोकांनाही ते खरे वाटले व त्यांनी त्याचा नाद सोडून दिला. वास्तविक तो ब्रह्मनिष्ठ पुरुष होता हे पुढे महाराजांच्या सांगण्यावरून सर्वांना कळले. एक आखूड पंचा नेसण्यास व एक अंगावर घेण्यास, याशिवाय तिसरे वस्त्र त्याच्याजवळ दिसले नाही. कोणी जेवणास बोलावले तर त्याचे घरी जावे. दक्षिणा एक दोन पैशापेक्षा त्याने कधी जास्ती घेतली नाही. दक्षिणेचे पैसे नंदगांवकर मास्तरांचेकडे तो ठेवीत असे. त्यातून वस्त्रे फाटल्यास त्याने घ्यावीत. हिशोब मात्र स्वतःच ठेवावा. याप्रमाणे जवळजवळ पंचवीस वर्षे त्याने वाडीत घालविली, पण त्याची शिल्लक इतके दिवसात आठच रुपये भरली. वैजनाथ नेहमी खरे बोलत असे. एका दत्तकाच्या खरेखोटेपणाविषयी वैजनाथास साक्षीदार म्हणून न्यायालयात नेले होते. न्यायाधीशांनी त्यावेळची स्थिती विचारताच वैजनाथाने सांगितले की, 'त्यावेळी जमलेली मंडळी पाने मांडा, भात वाढा, द्रोण द्या असे म्हणत होती' अशी खरी घडलेली

हकीकत लहान मुलाप्रमाणे वैजनाथाने सांगितली.

वैजनाथचे एकंदर आठ रुपये साठलेले होते हे वर्णन पूर्वी आलेलेच आहे. गांडाबुवा एकदा त्यांना म्हणाले 'तुम्ही इतके दिवस वाडीत राहून देवाची एकदासुद्धा पूजा केली नाही, तरी तुमच्या आठ रुपयांतून देवाला महापूजा करूया.' हे ऐकून वैजनाथ म्हणाले, 'मला बंधूंस भेटण्याकरिता जावयाचे असल्यामुळे ते पैसे त्याकरिता मी मुद्दाम ठेवले आहेत.' हे त्यांचे बोलणे ऐकून तेथे जमलेली मंडळी म्हणाली की, 'हा कितीतरी वर्षे असेच सांगतो. पण एकदासुद्धा बंधूस भेटण्यास गेला नाही. तरी याचे न ऐकता याच्या पैशातून महापूजा करा.' पण या लोकांच्या म्हणण्यास वैजनाथने दाद दिली नाही. महाराज मंडळीना म्हणाले 'तुम्हाला अद्यापि त्याच्या बोलण्याचा अर्थ समजला नाही. त्याला समंधाची बाधा म्हणजे त्या भगवंताचीच बाधा आहे. तो बंधूस भेटण्यास जाणार म्हणजे शरीर टाकून ब्रह्मस्वरूपात लीन होणार. ते रुपये शरीराच्या शेवटच्या व्यवस्थेकरिता म्हणून त्याने ठेवले आहेत. तो ब्रह्मनिष्ठ पुरुष आहे. त्याची खरी योग्यता तुम्हाला कळून येणार नाही.' याप्रमाणे महाराजांचे भाषण ऐकून सर्व मंडळी स्वस्थ बसली. शेवटी गांडाबुवांचा विशेष आग्रह पाहून महाराजांनी महापूजा करण्याबद्दल वैजनाथास सांगितले. त्याने महाराजांची आज्ञा लगेच मान्य केली. पण 'माझ्याकरिता आपणच महापूजेस बसावे. मला बसवणार नाही,' असे त्याने महाराजांना सांगितले. महाराज म्हणाले की, 'तुम्ही सात रुपये महापूजेकरिता खर्च करा व एक रुपया शिल्लक ठेवा. तुम्ही आज त्या समंधास सांगितले म्हणजे तो तुम्हाला त्यावेळी सोडील.' असे सांगितल्यावर त्याने ते कबूल केले. नंतर मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीस महापूजा करण्याचे ठरले. त्यादिवशी 'आपणही तिकडे भिक्षा करणार व गावातीलही सर्व मंडळीनी तिकडेच भोजनास यावे,' असे महाराजांनी सांगितले. सात रुपयात सर्व गांवप्रयोजन कसे होणार अशी लोकांना चिंता पडली. पण महाराजांच्या संकल्पशक्तीची त्यांना काय कल्पना ? वैजनाथांच्या सात रुपयांचे सामान आणले गेले. लगेच इतर सर्व मंडळींनीही भराभर आपल्या घरचे सामान

आणून त्यात टाकले. एक हजार पात्रांचा स्वयंपाक तयार झाला. प्रभूंची महापूजा व नैवेद्य आटोपल्यावर कट्ट्यावर व रस्त्यावर सुद्धा पात्रे मांडली. सर्व मंडळी बसल्यावर वैजनाथास बरोबर घेऊन महाराज त्या पंक्तीतून एकदा सर्वत्र फिरून आले व नंतर भिक्षेकरिता बसले. अन्नावर महाराजांची छाटी झाकली होती. सर्व मंडळी ते अन्न वाढीत होती. त्यादिवशी दोन हजार मंडळीचे भोजन झाले. शेकडो मंडळीनी अन्न वाढून घरी नेले व शिवाय पुष्कळ अन्न शिल्लकही राहिले. गुरुचरित्रातील भास्कर ब्राह्मणाच्या तीन पात्रांच्या सामग्रीतून चार हजार पात्रे गाणगापुरांत जेवली ही गोष्ट त्यादिवशी सर्वांच्या दृष्टीसमोर उभी राहिली. अन्नाची गोडीही त्यादिवशी सर्वांना अवर्णनीय अशी वाटली. त्या वेळेपासून वैजनाथांचा खरा अधिकार लोकांना कळून आला. महाराजांचे दिव्य सामर्थ्य प्रत्यक्ष पाहून सुद्धा त्यांची अवहेलना करणारी दुर्जन मंडळी त्यावेळी होती. त्यांनी नेहमी महाराजांची निंदा करावी. गाईच्या स्तनाजवळ राहणाऱ्या कृमींना जसे दूध मिळत नाही त्याप्रमाणे त्यांची अवस्था होती. महाराजांची परीक्षा घेण्याकरिता त्यांनी एका ब्राह्मणाला पाठविले. त्याने आपल्या हाताला चिंध्या गुंडाळल्या व एकदा संध्याकाळी महाराज स्नानास नदीवर गेले होते तेथे येऊन त्याने महाराजांना नमस्कार करून विनंती केली 'माझा हात फार ठणकत आहे, तरी कृपा करून काहीतरी उपाय सांगावा.' हे ब्राह्मणाचे बोलणे ऐकून महाराजांनी काही औषधाचा लेप हातावर घालण्यास त्या ब्राह्मणाला सांगितले. तो ब्राह्मण आपल्या कंपूत येऊन त्याने महाराजांची यथेच्छ निंदा केली. यांना काही कळत नाही. उगीच लोक नादी लागतात. वगैरे वगैरे. देवांला मात्र ही गोष्ट सहन झाली नाही. त्या ब्राह्मणाने जो हात बांधून महाराजांना दाखविला होता तो हात खरोखरच सारखा ठणकू लागला. त्याला कुष्ट होऊन तो हात सडत चालला. ही व्यथा सुरू होताच तो ब्राह्मण महाराजांना शरण आला. पण महाराज म्हणाले, 'आपणाला काहीच समजत नाही. तू देवांकडे जा. देव काय ते करतील.' शेवटी तो रोग वाढून त्यातच त्याचा अंत झाला. साधूंचा छळ केल्याचे हे

प्रायश्चित्त ! रोज दुपारी महाराज भिक्षेकरिता गावात जात असत. त्यावेळी मध्ये कोणी नमस्कार केला तर महाराजांनी उपोषण करावे. त्यामुळे महाराज भिक्षेस निघाले असता नमस्कार करू नका असे सांगण्याकरिता कोणीतरी बरोबर असे. दत्तजयंतीचे उपोषण महाराजांना होते. दुसरे दिवशी भिक्षेकरिता महाराज निघाले असता एका यात्रेकरूने मध्येच अकस्मात नमस्कार केला. झाले ! त्यादिवशीही पुन: उपोषणच घडले. पण नित्याच्या कार्यक्रमात मात्र खंड केव्हाच पडला नाही. उपोषणाचे दिवशी घेतलेच तर थोडे ताक व एखादे फळ इतकेच महाराज घेत असत. नारायणशास्त्री एकसंबेकर म्हणून एक सदाचारसंपन्न विद्वान् ब्राह्मण महाराजांचे दर्शनाकरिता एकदा वाडीस आले. यांच्यावर महाराजांचे प्रेम होते. काही एखादा विशेष शास्त्रार्थ पाहण्याचा प्रसंग आल्यास यांच्याकडे जाण्यास महाराज लोकांना सांगत असत. हे शास्त्रीबुवा सांगलीस कृष्णातीरी पाठ प्रवचन करून रहात होते. वाडीत आल्यावर त्यांनी एक दोन वेळा महाराजांचा तो कार्यक्रम पाहिला आणि स्पष्टपणे महाराजांना विचारले की, 'संन्यास घेतल्यावर लोकांना मंत्रतंत्र सांगणे या उपाधीची जरूर काय ?' हे भाषण ऐकून महाराज त्यावेळी काही बोलले नाहीत. नंतर दुपारी सहज बोलता बोलता महाराजांनी शास्त्रीबुवांना विचारले, 'तुम्हाला आता पाठीमागे काही उपाधी नसताना संन्यास का घेत नाही ? हा पाठप्रवचनाचा उपद्व्याप तुमच्या-सारख्या शास्त्रज्ञाला कशाला पाहिजे ?' हे ऐकून शास्त्रीबुवा म्हणाले, 'आमचे हे देहप्रारब्ध असे आहे त्याला इलाज नाही.' महाराज लगेच म्हणाले, 'तुम्हाला तेवढे देहप्रारब्ध आणि दुसऱ्याला ते नाही की काय ?' इतकेच महाराज बोलले पण यावरून आपण विचारलेल्या प्रश्नाचे हे उत्तर आहे अशी शास्त्रीबुवांची खात्री झाली.

श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर यांनी आपल्या मुलाच्या दुसऱ्या कुटुंबास मुलगा होण्याबद्दल महाराजांना उपाय विचारला. महाराजांनी त्यांना वाडीत नारायण नागबळी करण्यास सांगितले. पण त्यांनी आपल्या उपाध्यायाकडून तो विधी कुरुंदवाडचे घाटावरच केला. पुढे त्यांच्या

मुलाला मुलगी झाली. दुसरे खेपेस महाराज आल्यावर बाळासाहेबांनी असे संकल्प वैषम्य का झाले म्हणून महाराजांना प्रश्न केला असता, 'तुम्ही वाडी सोडून दुसरीकडे ते कर्म केल्याचे हे फळ' असे महाराज म्हणाले. प्रोफेसर विजापूरकरांनी एकदा महाराजांना विचारले, 'हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्याची आज स्थिती आहे काय ?' महाराज म्हणाले, 'स्वराज्य मिळण्यास अजून पुष्कळ अवधी आहे.' महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सर्व घडून आले. महाराजांना भेटण्याकरिता करवीरचे शंकराचार्य येणार होते. ते सुचविण्यास त्यांचा अधिकारी महाराजांचेकडे आला. त्याला महाराजांनी स्पष्ट सांगितले, 'आपण कोणाला या अगर जा काहीच सांगत नाही. शिवाय शंकरचार्यांची व्यवस्था येथे कशी होणार ? तुमच्या हद्दीत आम्ही आहोत असे वाटत असेल तर आता कुरुंदवाडच्या हद्दीत जाऊन राहू' हे महाराजांचे निस्पृहतेचे भाषण ऐकून शेवटी शंकराचार्यांनी येण्याचे रहित केले. सरस्वतीबाई नावाची एक वेश्या स्त्री विरक्त होऊन वाडीस देवसेवेकरिता राहिली होती. त्या बाई उत्तम गाणार असल्याने दीक्षितस्वामींच्या आज्ञेने त्या रोज करुणात्रिपदी म्हणत असत. एकदा त्यांनी उत्तम तालसुरावर महाराजांचे पुढे करुणात्रिपदी म्हटली. त्यांची भक्ति पाहून महाराजांनी त्यांना 'भावे नमू श्रीगुरुच्या पदासी' हे गुरुस्तोत्र लिहून दिले व काही ध्यानाभ्यासही सांगितले. त्याप्रमाणे सरस्वतीबाईंनी आमरण सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे वागून मानव देहाचे सार्थक केले. महाराजांच्या पादुका भजनाच्या वेळी असाव्यात म्हणून नृसिंहसरस्वती प्रभृति मंडळींनी विनंती केली असता आजपर्यंत कोणालाही पादुका दिल्या नसताही मंडळींची भक्ति पाहून महाराजांनी लाकडाच्या पादुका पायात घालून दिल्या. त्या पादुकांची पूजा 'यथा देवे तथा गुरौ' वचनाप्रमाणे नित्य करीत असत. ज्यावेळी नृसिंहसरस्वती वाडीतून औरवाडला गेले त्यावेळी त्या पादुकाही त्यांचेबरोबरच तिकडे गेल्या. त्या पादुका वाडीच्या पलिकडे अमरापूर (औरवाड) येथील श्रीअमरेश्वर मठात सध्या आहेत. याप्रमाणे महाराजांच्या वात्सल्यामुळे दोन महिनेपर्यंत वाडीतील सर्व लोक आनंदात होते. इतक्यात महाराज

मार्गशीर्ष कृष्ण सप्तमीस सकाळी नित्याप्रमाणे श्रीदत्तपादुकांसमोर वंदन करण्याकरिता गेले असता तेथेच समाधी लागली व त्या अवस्थेतच रामेश्वराकडे जाण्याची महाराजांना आज्ञा झाली. लोकांची गर्दी होऊन उगीच उपाधी होईल म्हणून दुपारी निघेपर्यंत ही वार्ता महाराजांनी कोणालाच सांगितली नाही. दुपारी भिक्षा झाल्याबरोबर महाराज खाली श्रीदत्तपादुकांना वंदन करण्यास गेले. यावेळी वंदनाची वेळ नसता महाराज कसे आले असा लोक विचार करतात न करतात इतक्यांत महाराजांनी सर्वांना सांगितले की, 'आपणास जाण्याबद्दल देवांची आज्ञा झाल्यामुळे आताच आपण वाडी सोडून जाणार आहोत.' ही बातमी अत्यत वेगाने गावात पसरली. सर्व मंडळी घरेदारे सोडून महाराजांच्या दर्शनाकरिता देवांकडे धावत सुटली. देवांचा कट्टा माणसांनी भरून गेला. प्रसाद घेण्याची फारच गर्दी झाली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत प्रसाद देण्याचे काम चालू होते. नंतर बराच वेळ झाला असे पाहून महाराज जाण्याकरिता उठले. 'प्रभूची सेवा अनन्यभावाने करा. एकीने राहून नित्य दिगंबराचे भजन करा, तुमचे कल्याण होईल.' असे सांगून महाराज संगमाच्या रस्त्याकडे वळले. रस्त्यात गावातील सर्व सुवासिनींनी महाराजांना ओवाळले. श्रीदत्तप्रभूंचा, श्रीमहाराजांचा जयजयकार करीत व दिगंबराचे भजन करीत सर्व मंडळी चालली होती. संगमाचे घाटावर आल्यावर नृसिंहसरस्वती व आणखीही काही संन्यासी यांनी महाराजांना वंदन केले. नंतर सर्व मंडळींनी प्रार्थना केली, 'रामेश्वराहून लवकरच परत येऊन या सर्व लेकरांना दर्शन देण्याची कृपा महाराजांनी करावी.' याप्रमाणे अत्यंत गहिवरून प्रेमाश्रू ढाळीत सर्व लोकांनी प्रार्थना केली असता महाराज म्हणाले, 'आमचे येणे तुमच्या स्वाधीन आहे. तुम्ही भजन जितक्या उत्कट भावनेने कराल तितके लवकर येणे होईल.' असे सर्वांना आश्वासन देऊन महाराज नदीपार झाले. सर्व मंडळी हंबरडा फोडून रडू लागली. 'महाराज ! एक वेळ मागे वळून कृपादृष्टीने आम्हाकडे पाहा तरी हो !' असा सर्वांचा आक्रोश चालू असताच महाराज पुढे निघून गेले. नंतर बरीच मंडळी तेथून परत फिरली. वाडीहून निघतांना संध्याकाळ होऊन

गेली. म्हणून त्या दिवशी महाराजांचा मुक्काम कुरुंदवाडचे घाटावरच झाला. तेथे श्रीदत्तदर्शन करून महाराज घाटावर काही वेळ बसले. बरोबर शे-दोनशे वाडीची मंडळी होतीच. इतक्यात महाराज घाटावर येऊन उतरल्याची बातमी कुरुंदवाडला समजल्याबरोबर तेथील संस्थानिक व ग्रामस्थ मंडळी महाराजांचे दर्शनास घाटावर आली.नंतर नृसिंहसरस्वतीना वाडीस जाण्याची आज्ञा करून महाराज स्नान करण्याकरिता संगमावर आले. तेथे स्नानाच्या वेळी सर्वांच्या विनंतीवरून महाराजांनी आपल्या हातांनी नदीचे पाणी सर्वांचे अंगावर शिंपडले. सायंसंध्या करून महाराज कुरुंदवाडच्या घाटावरील दत्तमंदिरात येऊन बसले. तेथे नित्याप्रमाणे भजन करून वाडीकर मंडळी बहुतेक आपापल्या घरी परत आली, तरी पाचपन्नास मंडळी तेथे राहिलीच. महाराज वाडीस असताना बाळासाहेब कुरुंदवाडकर रोज महाराजांचे दर्शनास येऊन घटकाभर बसून परत जात असत. महाराज ज्या दिवशी वाडीहून निघाले त्या दिवशी बाळासाहेब मिरजेस गेले होते. लगेच एक स्वार पाठवून त्यांना मिरजेहून बोलावून घेतले. त्यांनी रात्रीच घाटावर येऊन महाराजांचे दर्शन घेतले व 'आपले येणे आजच होणार हे ठाऊक नसल्यामुळे मी मिरजेस गेलो तरी अपराधाची क्षमा व्हावी,' अशी प्रार्थना बाळासाहेबांनी केली. महाराज म्हणाले, 'तुम्ही येथे नव्हता म्हणूनच आजचा मुक्काम येथे झाला.' हे ऐकून बाळासाहेबांना अत्यंत आनंद झाला. नंतर दुसरे दिवशी भिक्षा येथेच व्हावी अशी बाळासाहेबांनी विनंती केली, ती महाराजांनी मान्य केली. लगेच मोठ्या उत्साहाने स्वयंपाकाची तयारी सुरू झाली. वाडी व कुरुंदवाडीतील सर्व मंडळींना भोजनाचे निमंत्रण दिले गेले. बाळासाहेब, दाजीसाहेब व भाऊसाहेब त्रिवर्गांनी निरनिराळे स्वयंपाक करून महाराजांना भिक्षा घातली. त्यादिवशी हजार दीडहजार पान झाले. सर्व व्यवस्था उत्तम होती. श्रीमंतांचे बरोबर महाराज स्वतः पंक्तीतून हिंडून आले व नंतर भिक्षेस बसले. बरोबर नृसिंहसरस्वती व इतर तीन चार स्वामी भिक्षेस होते. तो थाट अत्यंत अवर्णनीय होता. भिक्षा झाल्याबरोबर महाराज पुढे जाण्यास निघाले. महाराजांना वाजत गाजत नेण्याची राजे

साहेबांची इच्छा होती, पण ती मान्य न करता महाराज त्वरेने निघाले. श्रीमंतही महाराजांचे बरोबर पायीच चालत निघाले. नंतर कुरुंदवाडात प्रथम विष्णुचे व नंतर दत्ताचे दर्शन करून श्रीमंतांचे आग्रहावरून महाराज राजवाड्यात गेले. त्या राजवाड्याचे व राजपुरुषांचे महद्भाग्यामुळे महाराजांची पायधूळ त्या वास्तूत पडून ती पवित्र झाली. महाराज त्यावेळी म्हणाले, 'आजपर्यंत पुष्कळ राजधान्यांतून जाण्याचा प्रसंग आला पण राजवाड्यात जावयाचे नाही व राजकीय भिक्षा घ्यावयाची नाही असा आपला नियम असल्यामुळे तसा योग कोठेच येऊ शकला नाही. पण आज बाळासाहेबांनी मात्र आपल्या प्रेमबलाने आम्हाला तो नियम मोडावयाला लावला.' हे महाराजांचे बोलणे ऐकून बाळासाहेबांना धन्यता वाटली व सर्व मंडळींनाही बाळासाहेबांची गुरुभक्ति व खरी योग्यता कळून आली. राजवाड्यातून महाराज लवकर बाहेर पडले. नंतर देवीचे दर्शन घेऊन महाराज गावाबाहेर पडले. तेथपर्यंत श्रीमंतांच्या स्वाऱ्या बरोबरच होत्या. तेथूनच परत फिरण्यास महाराजांनी त्यांना आज्ञा केली. राजेसाहेबांनीही तेथे रस्त्यातच महाराजांना साष्टांग नमस्कार घातला व अशीच कृपादृष्टि अखंड राहण्याबद्दल प्रार्थना केली. त्यावेळी त्यांचा कंठ दाटून येऊन डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. ते पाहून महाराजांनी त्यांना सांगितले, 'गोब्राह्मणांचे संरक्षण करणे हा राजधर्म आहे. त्याचे परिपालन करून श्रीगणपतीची सेवा करीत रहा, तुमचे पूर्ण कल्याण होईल.' असा आशिर्वाद देऊन महाराज पुढे निघून गेले. सर्व मंडळीही त्या दिशेला नमस्कार करून व महाराजांचे गुणवर्णन करीत आपापल्या स्थानी परत आली. कुरुंदवाडहून निघण्यासही संध्याकाळ झाली. तेथून जवळच कुरुंदवाडचे वाडीत श्रीदत्तप्रभूंची फुलबाग आहे. तेथेच वाडीतील बट्टु पुजारी यांचा मळा आहे. त्या मळ्यातच त्यावेळी रात्री महाराजांचा मुक्काम झाला. दुसरे दिवशी त्या मळ्यातच भिक्षा करून महाराज पुढे निघाले व तेरवाड येथील श्रीमुक्तेश्वरांचे मंदिरात येऊन त्यादिवशी मुक्काम केला. तेथे मुक्तेश्वरांचे वंशज बाळाबुवा तेरवाडकर यांच्या विनंतीप्रमाणे त्या दिवशी तेरवाडास भिक्षा होऊन पुढे निघाले.

त्यादिवशी सायंकाळी सदलगे या गांवात विठ्ठल मंदिरात महाराज येऊन पोचले. रात्री येथील मंडळींनी महाराजांच्या पुढे तालास्वरात भजन सुरु केले. त्यावेळी एका गृहस्थांनी 'नमू आदिरूपा ओंकारस्वरूपा । विश्वाचिया रूपा पांडुरंगा' हा अभंग म्हटला. त्याचा शेवटचा चरण 'तुका म्हणे जेथे नाही मी तू पण । स्तवावे ते कवणे कवणालागी' हा ऐकत असतानाच महाराजांचे देहभान नाहीसे होऊन त्यांना समाधी लागली. ही अवस्था तीन तासपर्यंत होती. नंतर समाधी उतरल्यावर सर्व मंडळींना प्रसाद दिला व 'नमू आदिरूपा' हा अभंग म्हणणाऱ्यास नारळ प्रसाद देऊन महाराज म्हणाले, 'तुकाराम साधूंची योग्यता मोठी आहे. ती त्यांची अभंगवाणी कानावर पडताच अनुभवास येते.' ही महाराजांची वाणी ऐकून महाराजांची गुणग्राहकता सर्वांना कळून आली. याप्रमाणे सदलग्याचा कार्यक्रम झाल्यावर दुसरे दिवशी महाराज मलिकवाड येथे वेदगंगेच्या तीरावर आले. तेथपर्यंत बरीचशी वाडीची मंडळी बरोबर होती व बाळासाहेब कुरुंदवाडकरही प्रत्येक मुक्कामावर लागेल ती कमीजास्त व्यवस्था लावण्याकरिता स्वतः जातीने हजर असत. वाडीला शतश्लोकी सांगण्यास सुरवात केली होती, ती येथे वेदगंगातीरावर संपवून सर्व मंडळीस तेथून परत फिरण्यास महाराजांनी आज्ञा केली. मग मात्र सर्व मंडळी तेथून परतली. जेथे जेथे महाराज जात तेथील देवीची, नदीची स्तुती करून पुढे जाण्याचा महाराजांचा नियम होता. ही सर्व स्तोत्रे नवीन छापलेल्या महाराजांच्या स्तोत्रादि संग्रहात दिलेली आहेत. तेथून पुढे हिरण्यकेशी नदीतीरावर संकेश्वर या आचार्यमठाचे गांवी महाराज आले. तेथे स्नानादि आटोपून निघाले ते बेळगांवचे अलिकडे एका गांवातील कालकुंद्रीकर यांचे मळ्यात येऊन उतरले. दुसरे दिवशी तेथे महाराजांची भिक्षा झाली. कालकुंद्रीकरांनी त्यावेळी अन्नसंतर्पण चांगले केले. बरीच मंडळी जेवली. तेथून दुसरे दिवशी निघून शृंगपुरावरून महाराज केंगेरी या गावी आले. तेथे चिदंबर दीक्षितमहाराज यांचे मोठे स्थान आहे. कर्नाटकात पेशवाईचे काळांत चिदंबर दीक्षित म्हणून मोठे सत्पुरुष होऊन गेले. यांचे वडील मल्हार दीक्षित. त्यांनी चिदंबर क्षेत्रात जाऊन अनुष्ठान

केले, तेव्हा त्यांना महादेवांचे प्रसादाने चिदंबर दीक्षित हे पुत्र झाले. जन्मतःच यांच्या कानावर बिल्वदळ व अक्षता होत्या. हे शंकराचे अवतार होते. त्यांना दोन बायका असून नित्य हजारो मंडळी यांचे घरी जेवत असत. एका तांब्यातून लागेल तेवढा पैसा काढून हे खर्चाकरिता देत असत. गुर्लहोसूर येथे यांनी अनेक मोठमोठे यज्ञ केले. यज्ञातील प्रसाद यांनी शेवटचे बाजीराव यांना दिला. तो त्यांनी घेऊन आपल्या आश्रितांचे जवळ दिला. त्यामुळे त्यांचे राज्यही तिकडेच गेले. असो. महाराजांनी येथे चिदंबर दीक्षितांचेवर संस्कृत व प्राकृतही स्तोत्र केले आहे. येथे असलेले गोव्यातील रामचंद्र कामत यांनी भक्ति उत्पन्न होण्यास सुलभ उपाय महाराजांना विचारला असता महाराजांनी तो उपाय नामस्मरण हाच असल्याचे सांगून त्याचे विधानही त्यांना सांगितले. तेथून निघून महाराज मलप्रभेचे तीरावर गुर्लहोसूर या श्रीचिदंबर दीक्षितांचे गावी येऊन पोचले. तेथील मठात चिंदबरभक्त मोठे अधिकारी असे कैवाल्यश्रमस्वामी रहात होते. त्यांच्या आग्रहामुळे त्याठिकाणी महाराजांचा ८-१० दिवस मुक्काम झाला. तेथील मुक्कामात कर्नाटकातील एक ब्राह्मण, पिशाच्च पीडेमुळे त्रस्त होऊन महाराजांकडे आला. तेव्हा त्याला महाराजांनी मृत्युंजयाचा जप करण्यास सांगितले. घरी आल्यावर त्यांच्या अंगात पिशाच्चाने संचार करून सांगितले, 'हा ब्राह्मण आणखी सहा महिन्यांनी मरणार आहे, मग मृत्युंजयाचा जप कशाला करता ?' हे पिशाच्चाचे बोलणे ऐकून त्याच्या घरची मंडळी घाबरून महाराजांचेकडे आली व त्यांनी ती घडलेली हकीकत महाराजांचे कानावर घातली, तेव्हा महाराजांनी सांगितले, 'पिशाच्चाने सांगितले ते खरे आहे. तो मृत्यु टाळण्या-करिताच त्याला तो जप करण्यास सांगितले आहे. तरी निष्ठेने तो जप व्हावा, श्रीदत्तकृपेने तो मृत्यू टळेल.' हे ऐकून ती मंडळी समाधानाने घरी गेली. गुर्लहोसूर येथे बाबा गर्दे म्हणून प्रसिद्ध वेदान्ती रहात असत. त्यांनी सिद्धारूढस्वामींबद्दल महाराजांचे पुढे गोष्ट काढली, तेव्हा महाराज रागावून म्हणाले, 'शास्त्राविरुद्ध वर्तन करणाऱ्या या स्वामींना साधू कसे समजावे ? भिंतीवर उपनिषदे लिहिणे शास्त्रात कोठे सांगितले आहे ? असल्याचे नावसुद्धा

आपल्यापुढे काढू नका.' हे महाराजांचे रागाचे बोलणे ऐकून गर्दे स्वस्थ बसले. गुर्लहोसूरनजीक डोंगरावर यल्लम्मा म्हणून श्रीरेणुकामातेचे स्थान आहे. तेथे दर्शनास जाऊन महाराजांनी देवीची स्तुती केली. महाराज आले म्हणून तेथील लिंगाईत पुजाऱ्यांनासुद्धा आनंद झाला व त्यांनी मोठ्या उत्सवाप्रमाणे त्यादिवशी देवीची पूजा बांधून महाराजांचे विषयी आदरभाव व्यक्त केला. तेथून निघून घटप्रभा, विश्वामित्री या नद्यांच्या तिरावरून जाता जाता तुंगभद्रातीरावर हंपी क्षेत्रात विद्यारण्यास्वामींच्या मठात येऊन महाराज उतरले. तेथील विरूपाक्षाचे मंदिर फार भव्य असून तेथे मोठमोठी अनेक गोपुरे आहेत. हेच विजयनगरचे राज्य विद्यारण्यस्वामींनी स्थापन केले होते. तेथून ऋष्यमूक पर्वत, पंपासरोवर, किष्किंधा इत्यादि ठिकाणी स्नान, दर्शन, स्तुती करून महाराज शेषाचल पर्वतावर येऊन दाखल झाले. तेथे कार्तिकस्वामींचे दर्शन घेऊन स्तुती केली. हे स्तोत्र द्वयर्थीषडानन स्तोत्र म्हणून स्तोत्रादि संग्रहात छापले आहे. या ठिकाणीच कुमारशिक्षा हा ग्रंथ लिहिला. तेथून बाहुदा, करतोया या नद्यांच्या तीरावरून भार्गवक्षेत्रात महाराज आले. तेथून श्रीरंग, श्रीशैल्य, मल्लिकार्जुन वगैरेंचे दर्शन करून व्यंकोबाचे गिरीवर महाराज येऊन पोचले. तेथे देवाला प्रत्यक्ष स्पर्श कोणालाही करू देत नाहीत. त्याकरिता तेथे महाराज मुद्दाम राहिले. पण नंतर व्यंकटेशांनी पुजाऱ्यांना दृष्टात दिल्याप्रमाणे त्यांनी महाराजांचा शोध करून महाराजांना देवांपर्यंत नेऊन दर्शन व स्पर्श करू दिला. नंतर तेथून पुढे कालहस्ती, शिवकांची, विष्णुकांची, पक्षीतीर्थ इत्यादि स्थाने पहात पहात महाराज पिनाकिनी नदीच्या तिरावर आले. तेथे त्या दिवशी मुक्काम केला. दुसरे दिवशी अधिक चैत्र पौर्णिमा क्षौराचा दिवस होता. क्षौर झाल्यावर नदीत बुडी मारण्याइतकेही पाणी नसल्यामुळे स्नान कसे करावे याचा विचार महाराज करू लागले. तेव्हा तेथील ब्राह्मणांनी आम्ही तुम्हाला बुडी मारता येण्यासारखा खळगा काढून देतो असे सांगितले. नंतर दुसरे दिवशी क्षौर झाल्यावर स्नानाकरिता महाराज नदीत उतरले. त्यावेळी नदीचे पाणी एकदम वाढू लागले. ते वाढता वाढता महाराजांच्या छातीइतके झाले.

नंतर उत्तम प्रकारे बुडी मारून महाराजांचे स्नान झाले. त्यावेळी तत्काल पिनाकिनी स्तुतीपर असा एक श्लोक महाराजांच्या मुखातून बाहेर पडला, तो असा,

याधिमासवशाच्चैत्र्यां कृतक्षौरस्य मेल्पका ।
स्नापनायक्षणात्वृद्धा साद्धा सेव्या पिनाकिनी ॥१॥

क्षौर झालेल्या दिवशी उपोषणच असल्याने भिक्षा झाली नाही. तेथून चिंदबरक्षेत्री येऊन चिदंबरेश्वराची स्तुती केली. तेथे सुंदरशास्त्री म्हणून एक शास्त्री संस्कृत भाषेचा अभिमान बाळगणारे होते. प्राकृत ग्रंथ लहान मुलांचेकरिता आहेत अशी त्यांची समजूत होती. त्यांनी महाराजांना आग्रहाने ठेवून घेतले. नंतर बोलता बोलता महाराज त्यांना म्हणाले, 'शास्त्रज्ञत्वाचा अभिमान असेल तर भक्ति कधीच उत्पन्न होणार नाही आणि भक्ति नाही तर देवाची कृपा नाही आणि मुक्तीही नाही. करिता श्रीदत्तकृपा व्हावी म्हणून तुम्ही श्रीगुरुचरित्र वाचन करीत चला. व्यर्थ आयुष्य घालवू नका.' हे महाराजांचे म्हणणे मान्य करून त्यांनी संस्कृताभिमान सोडून ते मराठी गुरुचरित्र वाचू लागले. याप्रमाणे महाराजांचा मुक्काम चिदंबरक्षेत्रात असता कोणीतरी दीड शहाण्याने महाराज समाधिस्थ झाले अशी खोटीच बातमी उठविली. वाडीच्या मंडळींना ही बातमी ऐकून वाईट वाटले व ती मंडळी नृसिंहसरस्वतींची आज्ञा घेऊन महाराजांचा शोध करण्यास निघाली. ती मंडळी प्रथम थेट रामेश्वरास गेली. तेथे महाराजांचा शोध न लागल्यामुळे तंजावरास आली. पण तेथेही जेव्हा काहीच पत्ता लागेना तेव्हा ती बातमी खरी असावी असे त्यांना वाटू लागले. ही गोष्ट महाराजांना योगसामर्थ्याने समजल्याबरोबर ते सुंदरशास्त्रींना सांगून तेथून निघाले आणि मायावरम्च्या बाजारात वाडीच्या मंडळींना अकस्मात भेटले. महाराज दिसल्याबरोबर त्या सर्व मंडळीना वर्णनातीत आनंद झाला. नंतर महाराजांनी विचारल्यावरून येण्याचे कारण त्या मंडळींनी सांगितले. तेव्हा महाराज म्हणाले की, 'यापुढे तुम्ही अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका. हे शरीर पडण्याची जागा सर्वांना अगोदर माहीत होईल.' असे सांगून त्या

मंडळीसह कावेरी तीरावर येऊन मुक्काम केला. नंतर भिक्षा आटोपून वाडीकर मंडळींना वाडीस पाठवून दिले. तेथून तंजावर येथे ज्येष्ठ शुक्ल एकादशीस येऊन व तेथे दोन दिवस राहून पुढे रामेश्वरी जाण्याकरिता निघाले. तेथून श्वेतारण्य, कुंभकोण, मदुरामीनाक्षी इ. क्षेत्रे पहात पहात रामेश्वरी येऊन पोचले. तेथे एक दिवस मुक्काम झाला. तेथे काही तंजावरची मंडळी आली होती. त्यांच्या विनंतीप्रमाणे तंजावरास चार्तुमासाकरिता येण्याचे महाराजांनी मान्य केले. नंतर रामेश्वराहून आषाढ शुद्ध द्वितीयेस निघाले ते दोन अडीचशे मैलांचा प्रवास १०-१२ दिवसात करून आषाढ शुद्ध चतुर्दशीचे दिवशी तंजावरास येऊन पोचले. तंजावरास विमलांबा देवीचे रम्य स्थान पाहून महाराजांचे मन रमले. तेथे कावेरी नदी असून जवळच संध्या मठ आहे. तेथे महाराज राहिले. कावेरी नदीचे नाव येथे वेणू नदी असे आहे. या वर्षीचा चातुर्मास तंजावर येथेच झाला.

चातुर्मास १७ तंजावर संध्यामंडप – शके १९२९

शके १८२९ आषाढ पौर्णिमेपासून तंजावर येथे महाराजांचा चातुर्मास सुरु झाला. महाराजांचे यथाशास्त्र आचरण व पूर्ण ज्ञान पाहून तेथील लोक त्यांना देवाप्रमाणे मानू लागले. ब्रह्मावर्तास श्रीगुरुसंहिता म्हणजेच संस्कृत समश्लोकी गुरुचरित्र महाराजांनी केले होते. त्या ग्रंथावर या ठिकाणी चूर्णिका म्हणजे मूळ ग्रंथाचा गद्यात्मक गोषवारा लिहिण्या-विषयी देवांची आज्ञा झाल्यावरून ती चूर्णिका येथे लिहिली. एकदा एक दिगंबर असे तेजस्वी साधुपुरुष महाराजांकडे आले. रात्रभर त्यांचे व महाराजांचे बोलणे झाले. पहाट झाल्याबरोबर ते कोठे निघून गेले ते काही समजले नाही. एकदा तेथीलच एका ब्राह्मणाची स्त्री महाराजांचे दर्शनास आली. तिला बरीच वर्षे दम्याचा विकार असल्यामुळे ती अत्यंत गांजून गेली होती. तिला गांडाबुवांनी महाराजांचे चरणतीर्थ दिले. तिने तीर्थ घेतले मात्र, एकदम जोराने तिला वांती झाली. त्यावेळी सर्व कफ आपोआप बाहेर पडला. नंतर हळूहळू ती त्या असाध्य रोगापासून मुक्त

झाली. तंजावरजवळच एका खेड्यात एक ब्राह्मण रहात होता. त्याच्या भावाला दुष्टसंगती लागल्यामुळे तो घरातील पैसे वाटेल तसे खर्च करू लागला. कोणाचेही ऐकेना. ही आपल्या भावाची अवस्था पाहून तो ब्राह्मण महाराजांना शरण आला व त्याने भावाची दुःस्थिती महाराजांना सांगून त्याची सन्मार्गाकडे प्रवृत्ती होण्याकरिता कांहीतरी उपाय सांगण्या-विषयी महाराजांना विनंती केली. महाराजांनी त्याला एक यंत्र तयार करून देऊन त्याची रोज पूजा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो ब्राह्मण घरी जाऊन नित्य त्या यंत्राची पूजा करू लागताच त्याचा भाऊ दुष्ट संगती सोडून देऊन महाराजांचा निस्सीम भक्त झाला. तंजावरात महाराज अवधूतराव यांचे घरी भिक्षेस जात असत. त्यांचे बंधू कुप्पूस्वामी फार भाविक होते. त्यांना महाराज एके दिवशी म्हणाले, 'तुम्हाला काय मागणेचे ते मागून घ्या.' तेव्हा कुप्पूस्वामी म्हणाले, 'बाकी कोणतीच इच्छा नाही. फक्त आमचे आपणास स्मरण नेहमी असावे म्हणजे आमचा उद्धार होईल, इतकेच आपल्या पायाजवळ मागणे आहे.' महाराज म्हणाले, 'ज्याच्या घरचे अन्नाचे एक शीत जरी पोटात गेले तरी तो देखील अविस्मरणीय आहे. मग तुमचे तर अन्न, चातुर्मास आमचे पोटात गेले, तुमचे विस्मरण आम्हाला कसे होईल ?' कुप्पूस्वामी म्हणाले, 'अनेक जीवांचे अन्न आपल्या उदरात आहे पण त्या सर्वांपेक्षा आमचे विशेष स्मरण आपणास राहिले तरच आमचे पूर्ण कल्याण होईल.' याप्रमाणे त्यांची भक्ति पाहून 'तथास्तु' म्हणून महाराजांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्याप्रमाणेच पुढे त्यांना वेळोवेळी महाराजांचे दृष्टान्त होत असत. कुप्पूस्वामींचा रामू नावाचा एक लहान मुलगा होता. तो रोज महाराजांचे दर्शनास येई व नमस्कार करून स्वतःच नारायण म्हणून तेथे उभा राही. रोज त्याला महाराज खडीसाखरेचा खडा देत असत. तो कर वसूल करूनच तो परत जात असे. असाच एकदा तो दर्शनास आला त्यावेळी तेथे खडीसाखर नव्हती. म्हणून महाराजांनी त्याला गुळाचा खडा दिला. रामूने तो घेऊन लगेच महाराजांच्या अंगावर फेकला. तेव्हा 'रामूने आम्हाला मारले मारले' म्हणून थट्टेने महाराज ओरडले. लगेच रामूचे

बडील त्याला मारण्याकरिता धावलेले पाहून महाराज त्यांना म्हणाले, 'नका नका लेकराला मारू नका, इतका मार देण्यासारखा त्याने काय अपराध केला आहे ? सोडा त्याला आणि याचे आयुष्य अवघे चारच महिने राहिले आहे. तरी याच्यावर राग करू नका.' असे त्यावेळी अत्यंत कनवाळूपणांने महाराज म्हणाले. पुढे तो मुलगा खरोखर चारच महिन्यांनी देवाघरी गेला. याठिकाणी नरसोबावाडीहून पुजारी मंडळींचे महाराजांना एक पत्र आले. वाडीत प्लेग सुरु झाल्यामुळे काही उपाययोजना त्याच्या शांतीकरता करण्याविषयी त्या पत्रात पुजाऱ्यांनी विनंती केली होती. त्याप्रमाणे महाराजांनी दत्तप्रभूंची प्रार्थना करताच प्रभू म्हणाले की, 'गंगातीरावरून या लोकांना सन्मार्ग दाखविण्याकरिता तुम्ही दोन वेळा वाडीस येऊनसुद्धा तेथील लोकांनी आपले आचरण सुधारले नाही. सबब यांना यावेळी चांगलीच शिक्षा आम्ही करणार आहोत. तुम्ही आता मध्ये पडण्याचे कारण नाही.' हा प्रभूंचा आदेश महाराजांनी वाडीकर मंडळींना कळविला व 'यावेळी बरीच मंडळी मृत्युमुखी पडतील, काही दिवस वाडी सोडावी,' असे कळविले. त्यावेळी वाडीवर फार मोठी संकटे आली. टांगेवाले व पुजारी यांचे भांडण इतके विकोपाला गेले की, टांगेवाल्यांचा पुढारी परसू जोगळे याने अनेक लोकांबरोबर मारामारी केली, घरांना आगी लावल्या. त्याच्या भीतीने पुष्कळ लोकांना गाव सोडण्याची देखील पाळी आली. महाराजांची टवाळी करणाऱ्या एका गृहस्थाला तर जीवाच्या भीतीने पळूनच जावे लागले. अशी संकटे भोगूनही माणसाचे अंतस्तिमिर जात नाही हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. तंजावरलाच महाराजांनी कृष्णालहरीवर संस्कृत टीका लिहिली. भाद्रपद पौर्णिमेस चातुर्मास संपल्यावर अवधूतरावांचे विनंतीवरून त्यांचे घरी दुसरे दिवशी भिक्षा करून महाराजांनी तंजावर सोडले. जाता जाता एका ब्राह्मणाला महामारीचा उपद्रव सुरू झालेला महाराजांनी पाहिला. लगेच त्याला औषधाने बरा करून घरी पाठविले. नंतर सत्यमंगल, जंबुकेश्वर, कोटिलिंग इत्यादि क्षेत्रे पहात पहात कावेरीतीरावर श्रीरंग मुक्कामी शृंगेरी मठाचे शंकराचार्य आहेत असे समजल्यावरून त्यांचे

दर्शनार्थ महाराज श्रीरंगमुक्कामी आले. तेथे गेल्यावर श्रीशंकराचार्यांच्या सन्निध जाऊन महाराजांनी त्यांना वंदन केले. महाराजांना पाहिल्याबरोबर आचार्य म्हणाले, 'आपल्या दर्शनाची पुष्कळ दिवसांची असलेली इच्छा ईश्वराने आज पूर्ण केली.' नंतर महाराजांनी आचार्यांची व शारदाम्बेची स्तुती केली. परत आचार्यांनीही महाराजांचे वर्णनपर स्तोत्र केले व महाराजांच्या भिक्षेची व्यवस्था केली. भिक्षा वगैरे आटोपल्यावर आचार्यांनी सर्व लोकांना उद्देशून महाराजांचेबद्दल चार शब्द सांगितले ते असे, 'शिष्यमंडळींनो ! तुम्ही आज येथे आलेल्या या महान् संन्याशांना ओळखले नाही. करिता दोन शब्द त्यांचेबद्दल आम्ही सांगतो. हे प्रत्यक्ष दत्तप्रभूच मातापित्यांच्या अत्यंत पुण्याईने त्यांच्या पोटी आले. आद्य शंकराचार्यांच्याप्रमाणेच हे धर्मसंस्थापनेचे कार्य करीत आहेत. वर्णाश्रम-धर्माचे परिपालन कडकडीतपणाने हे करीत असून अनेक लोकांचा उद्धार यांचेकडून झालेला आहे. आसेतुहिमाचल पायानेच सर्व यात्रा करून त्यांनी कर्म, उपासना व ज्ञान यांचा अधिकारी जीवांना उपदेश करून त्यांना कृतार्थ केले आहे. करिता यांना पूर्ण आयुष्य लाभून यांचे हातून धर्मस्थापनेचे कार्य नित्य घडो, एवढीच परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.' याप्रमाणे प्रत्यक्ष आचार्यांचे महाराजांचे गौरवपर भाषण ऐकल्या-बरोबर सर्व मंडळींनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातले. नंतर महाराजांना आचार्य म्हणाले, 'आद्य शंकराचार्यांचे जन्मस्थान कालाटी म्हणून आहे. तेथे त्यांच्या मूर्तीची स्थापना करण्याकरिता आपण जात आहोत.' याप्रमाणे आचार्यांचे भाषण ऐकून महाराज म्हणाले, 'आपण वर्णन केल्याप्रमाणे आपली तितकी योग्यता नाही.आपल्यामुळेच या आचार्य पीठास शोभा आली. आपला सत्यसंकल्प ईश्वर पूर्ण करील.' याप्रमाणे परस्परांची भाषणे ऐकून सर्व मंडळींनी उभयतांना दंडवत नमस्कार घातले. आचार्यांची परवानगी घेऊन महाराज सत्यमंगल गावी आले. तेथे देवाचे सांगणे झाले, 'कावेरी तीरावरच संचार करावा. पुढील भागांत प्लेग असल्याने तिकडे जाऊ नये.' या आज्ञेप्रमाणे भवानी व कावेरी यांच्या संगमावर महाराज कार्तिक शुद्धात आले. तेथेच कार्तिक

मासातील क्षौर होऊन १५-२० दिवस मुक्काम झाला. तेथे असताना गुंटूर जिल्ह्यापैकी अमरावती गावातील लक्ष्मणशास्त्री नावाचे गृहस्थ आले. त्यांच्या मुलाच्या व मुलीच्या नाकात व्रण झाल्यामुळे त्यांना अत्यंत त्रास होत होता. त्यावर काही उपाययोजना व्हावी अशी लक्ष्मणशास्त्रींनी महाराजांना विनंती केली. महाराजांनी त्यांना आपल्या जवळचे वाकेरीचे भाते देऊन ते उगाळून दोघांच्या नाकास लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे काही दिवस करताच त्या व्रणाच्या त्रासातून ती मुले कायमची मुक्त झाली. भवानी गावाहून महाराज कार्तिक मासाचे अखेरीस निघाले ते कर्नूल स्टेशनपासून कावेरी तीरावर नेलोर या गावी श्री. सदाशिव ब्रह्मेंद्रस्वामी-महाराजांची जीवंत समाधी आहे तेथे येऊन पोचले. त्या समाधीस वंदन करून स्तोत्रही केले. सदाशिव ब्रह्मेंद्रस्वामीमहाराजांचा अधिकार फार मोठा होता. 'परतो व्युत्थान' असणाऱ्या सहाव्या ज्ञानभूमिकेपर्यंत ते पोचले होते. 'स्वानंदरसोन्मत्तः स्वांगं विस्मृत्य यो नरीनर्ति' इत्यादी काही श्लोकांचे सदाशिवब्रह्मेंद्रस्तोत्र महाराजांनी केलेले आहे. शृंगेरीच्या शंकराचार्यांनी यांचे स्तोत्र केले आहे. यांनी ब्रह्मसूत्रवृत्ति व योगसुधाकर असे दोन ग्रंथ केलेले छापले आहेत. या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून त्यांचे चरित्र दिलेले आहे. एक दोन दिवस त्या स्थानात मुक्काम करून महाराज तंजावरास परत आले. दत्तजयंतीचा उत्सव अवधूतराव यांचेकडे झाला. तेथून मार्गशीर्ष वद्यात भवानी गावी भेटलेल्या लक्ष्मणशास्त्रींच्या गावी अमरावतीस आले. त्यांच्या मुलामुलींच्या नाकातील व्रण तपासून त्यांना वाकेरीचे भात आणखी आणवून देणेची व्यवस्था केली. तेथून फिरत फिरत चिदंबर क्षेत्रावरून त्रिपुरापुरास आले. नंतर कालहस्तीवरून श्रीशैल्यपर्वताच्या पायथ्याशी कृष्णातीरी येऊन नंतर समुद्रतीराने संचारास आरंभ झाला. तेथून फिरत फिरत कृष्णातीरावर एका गावी फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस सायंकाळी महाराज येऊन पोचले. दुसरे दिवशी पौर्णिमेस क्षौर होते. गावात जाऊन कोठेतरी राहण्याकरिता महाराज जागा शोधू लागले. तेव्हा त्या गावाच्या लोकांनी काहीच सहाय्य न करता 'संन्यास घेऊन दारोदार कशाला हिंडता ? तुम्ही राहणारे कोठले ? तुमचे नाव सांगा ?'

याप्रमाणे महाराजांची टिंगल केली. महाराज काही न बोलता गावाबाहेर कृष्णातीरी एका झाडाखाली येऊन राहिले. दुसरे दिवशी क्षौर विधीची अद्यापी काहीच तजवीज झाली नाही. लोक सरळ बोलायला देखील राजी होईनात. ते पाहून महाराजांनी श्रीकृष्णामातेपुढेच आपले गाऱ्हाणे मांडले. महाराज म्हणाले की, 'माते ! आपल्याविषयी आम्ही इतका अभिमान बाळगीत असता आपणास या देहाचा काहीच अभिमान नाही काय ? उद्या या गावात जर क्षौराची तजवीज झाली नाही तर पुढे यावज्जीव आपण क्षौर करणार नाही व दंडत्याग करून इच्छेप्रमाणे आपण कोठेही फिरत राहू. आजपासून आपली आज्ञा पाळण्याचे काहीच कारण दिसत नाही.' याप्रमाणे प्रेमकलह करून महाराज प्रार्थना करून निजले. श्रीकृष्णामातेने स्वप्नात महाराजांना दर्शन देऊन सांगितले की, 'उद्या क्षौरविधीची सर्व व्यवस्था होईल. मला तुमच्याबद्दल पूर्ण अभिमान आहे.' हे मातेचे भाषण ऐकून महाराजांनी स्तुती केली व नंतर श्रीकृष्णामाता गुप्त झाली. नंतर गावातील सर्व प्रमुख लोकांना एकाचवेळी त्याच रात्री स्वप्न पडले. स्वप्नात कृष्णामातेने त्यांना भयंकर स्वरूप दाखवून रागाने सांगितले, 'दुष्टांनो ! मोठे तपस्वी संन्यासी तुमच्या गावी आले असता तुम्ही त्यांना उतरण्याकरिता जागासुद्धा दिली नाही. उलट त्यांची निंदा केली. यामुळे तुमच्यावर लवकरच मोठे संकट येईल, करिता तुम्ही त्या स्वामींना शरण जाऊन त्यांची कृपा संपादन करा व उद्या त्यांच्या क्षौराची व्यवस्था करा म्हणजे तुमचे कल्याण होईल. असे न केल्यास सर्वांचा नाश होईल.' असे स्वप्न पडताच सर्व लोक खडबडून जागे झाले व त्यांनी एकमेकांना आपले स्वप्न सांगितले. सर्वांना एकदम एकसारखेच स्वप्न पडलेले पाहून सर्व मंडळी घाबरून गेली. सकाळी थोडे दिसू लागताच ती सर्व मंडळी मिळून कृष्णातीरावर महाराजांचा शोध करत आली. तेथे एका झाडाखाली महाराज स्वस्थ बसलेले दृष्टीस पडताच सर्व लोकांनी साष्टांग नमस्कार करून विनंती केली की, 'आमचे पाप आड आल्यामुळे काल आपला आदरसत्कार न करता आपली निंदा करण्याची दुर्बुद्धि आम्हाला झाली, तरी आमचे अपराध पोटात घालून

आमच्याकडून सेवा करवून घ्यावी.' त्या सर्व मंडळींचा हा विशेष आग्रह पाहून महाराज उठून त्या गावात गेले. नंतर तेथे त्या दिवशी क्षौरविधी यथाशास्त्र झाला. नंतर त्या गावात १५ दिवस मुक्काम झाला. सर्व लोकांनी महाराजांची सेवा करून आपल्या अपराधाचे परिमार्जन केले. तेथून महाराज कृष्णातीराने फिरत फिरत मोगलाईत कोटिलिंग क्षेत्रात आले. तेथे दहा दिवस वास्तव्य करून पुन्हा संचारास निघाले असता फिरत फिरत मुक्तीश्वरपूर म्हणजे मुक्त्याला या गावी येऊन पोचले. मद्रास इलाख्यापैकी कृष्णा जिल्ह्यातील नंदीगड तालुक्यात हा गाव कृष्णातीरावर आहे. तेथे त्यावर्षी चातुर्मास करावा असे महाराजांनी ठरविले.

चातुर्मास १८ मुक्त्याला – शके १८३०

मुक्त्याला येथील ब्राह्मण सदाचारसंपन्न, विद्वान आहेत हे पाहून महाराजांना ते स्थान पसंत पडले. तेथे सर्व तेलंगी ब्राह्मण राहात असून त्यांच्या स्त्रियासुद्धा उत्तम संस्कृततज्ञ आहेत. तेथील लोकांची भाषा जरी तेलगु व द्राविडी होती तरी संस्कृत भाषा पुष्कळ लोकांना येत असल्यामुळे महाराजांना काही अडचण भासली नाही. महाराजांचे अगाध ज्ञान पाहून तेथील सर्व मंडळींच्या मनात त्यांच्याविषयी आदर उत्पन्न झाला. तेथेच शके १८३० आषाढ पौर्णिमेस महाराजांनी व्यासपूजा करून चातुर्मास केला, तेथे विशेष कोणी मंडळींचे फारसे येणे नसल्याने महाराजांना विश्रांतीही चांगली मिळाली. तेथील मुक्कामातच युवशिक्षा, वृद्धशिक्षा व स्त्रीशिक्षा हे ग्रंथ महाराजांनी केले. तेथून चार्तुमास संपल्यावर भाद्रपद वद्यात निघाले ते ताडवाईवरून फिरत फिरत नागेश गावी आश्विन वद्यात आले. तेथून निघून दिवाळीच्या अमावस्येस हंसलादेवीसन्निध आले. येथे कृष्णा नदी व समुद्र यांचा संगम झाला असून या स्थानास कृष्णासागर असे नाव आहे. तेथे तूळसंक्रांतीनिमित्त स्नान करून महाराज पुढेही ८-१० कोस गेले. तेव्हा सप्तगोदावरीकडे जाण्याविषयी महाराजांना देवाचे सांगणे झाले. त्या आज्ञेप्रमाणे महाराज तेथून परतून नागेश क्षेत्रात

संन्याशाकरिता असलेल्या मठात येऊन राहिले. येथून निघून मच्छी बंदरासमीप कृष्णा जिल्ह्यातील पेडकल्लापल्ली या गावी येऊन दोन दिवस राहिले. नंतर सप्तगोदावरीकडे गेले. त्या प्रांतात संन्याशांना फार मान आहे. लोकही मोठे श्रद्धाळू आहेत. गोदातीरी येऊन स्नान उरकून गोदावरीची स्तुती केली. सात मुखांनी समुद्रास गोदावरी मिळत असल्याने या स्थानास सप्तगोदावरी असे नाव पडले आहे. १ राजमहेंद्री जवळ वासिष्ठा कोटिलिंगस्थान, २ कौशिका, ३ गौतमी, ४ बुद्ध गौतमी, ५ भारद्वाजा, ६ आत्रेया, ७ तूर्या अशी त्या सप्त प्रवाहांची नावे आहेत. कार्तिक वद्यात महाराजांना देवांनी सांगितले, 'आता सरळ काश्मीरकडे चलावे.' हे ऐकून महाराजांनी देवांना स्पष्टच सांगितले, 'आपण काही काश्मीरकडे जाऊ इच्छीत नाही. देवाला वाटत असेल तर तंतुक किंवा गंगानुजाप्रमाणे हा देह कोठेही नेऊन ठेवावा.' हे महाराजांचे बोलणे ऐकून देव म्हणाले, 'काश्मीरमध्ये जाण्याचे तुम्ही का टाळता ? तेथे सगळे गौड लोक राहातात म्हणून संकोच वाटतो की काय ? आता तुम्हाला वर्ण, आश्रम, जाती हा संकोच धरण्याचे कारण काय ?' हे ऐकून महाराज काहीच बोलले नाहीत आणि काश्मीरकडे न जाता गोदातीरीच संचार करू लागले. बेदवाडपल्ली या गावी येऊन तेथेच दुसरे दिवशी दत्तजयंती केली. हे गाव राजमहेंद्रीजवळ आहे. तेथून हळूहळू कोगूर, पालर इत्यादी गावावरून राजमहेंद्रीस येऊन पोचले. तेथे पौष पौर्णिमेचे क्षौर झाले. तेथून जवळच परमानंदस्वामी म्हणून उत्तम संन्यासी होते. त्यांनी बोलावल्यामुळे नावेतून त्यांच्या भेटीस जाऊन आले. ती नाव त्यादिवशी ब्राह्मणच चालवीत होते. यावेळी महाराजांच्या बरोबर ब्रह्मानंदसरस्वती होते. राजमहेंद्रीस येते वेळी कोगूरगांवी त्यांची भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी महाराजांना विनंती केली की, 'आपली भेट व्हावी ही पुष्कळ दिवसांची इच्छा ईश्वरकृपेने आज पूर्ण झाली. आता आपण राजमहेंद्रीस येऊन पुढे जावे. तेथे आचार्य मठांत आपल्या हस्तेच श्रीदत्तमूर्ति व पादुका यांची स्थापना करण्याची उत्कट इच्छा आहे. तरी आपली अनुमति असावी.' हे ब्रह्मानंदांचे बोलणे महाराजांनी मान्य केल्यावर ब्रह्मानंद पुढे राजमहेंद्रीस

निघून गेले. महाराज नंतर पौष वद्यांत पीठापूर या गावी आले. तेथेच श्रीपादश्रीवल्लभांचा जन्म झाला. ते जन्मस्थान महाराजांनीच तेथे गेल्यावर लोकांना दाखवून दिले. तोपर्यंत त्या स्थनाची तेथील लोकांनाही माहिती नव्हती. त्या जन्मस्थानी महाराजांनी पादुकांची स्थापना केली. त्या गावात काही ब्राह्मण श्रीपाद या आडनावाचेच आहेत. पीठापुराहून महाराज पौष अखेर निघाले हे काकीनाडा येथे येऊन राहिले. दर्शस्नान तेथेच झाले. या ठिकाणीच नरसोबावाडीची मंडळी महाराजांना भेटली. वाडीची पुजारी मंडळी महाराजांना आणण्याकरिता निघाली होती. ती काकीनाड्यास येऊन रस्त्याने 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' असे भजन करीत महाराजांचा शोध करीत चालली होती. मधून मधून देवाचा व महाराजांचा जयजयकारही करीत होती. तो ओळखीचा आवाज ऐकून महाराज बाहेर एका झाडाखाली येऊन उभे राहिले आणि 'नारायण नारायण' म्हणून मोठ्याने म्हणू लागले. तो आवाज ऐकून सर्व वाडीकर मंडळी तेथे येऊन पाहतात तो प्रत्यक्ष महाराजांची स्वारी उभी. आपल्या श्रमाचे चीज झालेले पाहून सर्व मंडळींना अत्यंत आनंद वाटून त्यांनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातले. याप्रमाणे महाराजांचे दर्शनाने आनंदित होऊन वाडीकर मंडळी तेथे राहिली. एके दिवशी महाराजांची समाधी लागली व दत्तप्रभू त्यांच्याद्वारा वाडीकरांना उद्देशून बोलू लागले, 'तुम्हाला आचरण सुधारण्याबद्दल या स्वामींच्याकडून अनेक वेळा सांगितले तरी तुम्ही आपला आचार सुधारीत नाही; तरी आता या स्वामींस आम्ही काश्मीरला पाठवून देणार आहोत.' हे भाषण पुजाऱ्यांनी ऐकल्याबरोबर त्यांनी नमस्कार करून प्रार्थना केली, 'आम्ही आपली लेकरे आहोत. आमच्या अपराधाची क्षमा करून आमच्याकडून सेवा घ्यावी. आपल्या आज्ञेप्रमाणे आम्ही वागू.' असे पुजाऱ्यांनी सांगितल्यावर थोड्या वेळाने महाराज देहभानावर आले. नंतर पुजाऱ्यांना चांगल्या वर्तनाने राहण्या-बद्दल ताकीद करून त्यांना परत पाठवून दिले.

शृंगेरी मठाचे शंकराचार्य महाराजांचा मोठा आदर ठेवत असत. त्यांनी महाराजांची भेट झाल्यावेळी महाराजांनी केलेले ग्रंथ काही बरोबर

असल्यास मागितले. तेव्हा बरोबर काहीच ग्रंथ नव्हते म्हणून महाराजांनी एक 'मंत्रगर्भ स्तोत्र' तेवढे आचार्यांना लिहून दिले. ते पाहून अत्यंत संतोष होऊन मागाहून पुस्तके पाठविण्यास आचार्यांनीं महाराजांना सांगितले. पुढे दत्तमाहात्म्य, गुरुचरित्र वगैरे ग्रंथ शृंगेरीस पाठविले गेले. तसेच एक स्तोत्र करून ते आचार्यांजवळ राहणारे ब्रह्मानंदसरस्वती यांचेजवळ दिले व ते आचार्यांना वाचून दाखविण्यास सांगितले. ब्रह्मानंदसरस्वतींच्या विनंतीवरून पूर्वी कबूल केल्याप्रमाणे महाराज राजमहेंद्रीस आले. तेथे आचार्यांच्या मठांत मुक्काम झाला. ब्रह्मानंदसरस्वतींनी त्या ठिकाणी माघ पौर्णिमेच्या दिवशी त्रिमुखी दत्तमूर्तीची व दत्तपादुकांची स्थापना महाराजांच्या हाताने करविली. महाराज त्यावेळी म्हणाले, आजपर्यंत एकमुखी दत्तमूर्तीच्याच स्थापना त्या त्या ठिकाणी केल्या, पण आज मात्र ब्रह्मानंदांचे आग्रहाने त्रिमुखी दत्तमूर्तीची स्थापना केली. मूर्तीची स्थापना झाली त्या दिवशीच एक पिशाच्चग्रस्त बाई तेथे जाऊन ओरडू लागली. तिला महाराजांनी मंत्र सांगितला; त्याचा जप करून ती त्रासातून मुक्त झाली. ब्रह्मानंदसरस्वती मूळ तेलंगण प्रांतातील राहणारे.बेझवाड्याजवळ मंगळगिरी या गावात गोविंदराजू या घराण्यात यांचा जन्म झाला. यांना पूर्वी रामचंद्र ऊर्फ रामप्पा असे म्हणत. ते पूर्वाश्रमांत असतांना वाडीस येत. त्यावेळी तेथे महाराजांची भेट झाली होती. पुढे संन्यास घेऊन त्यांनी सर्व यात्रा केल्या. पुन्हा कोगूरगावी महाराजांची व ब्रह्मानंदांची भेट झाली. नंतर त्यांनी मुद्दाम महाराजांच्या हस्ते राजमहेंद्रीस वरीलप्रमाणे स्थापना केली. भक्तवत्सल हे त्या दत्ताचे नाव ठेवले. महाराज कोगूर येथे असताना गुरुस्वामी नारायणस्वामी समाधिस्थ झाल्याची वार्ता समजली. त्यावेळी दंडस्नान इत्यादि विधि केला. राजमहेंद्रीस लोकांचा उपसर्ग महाराजांना फार होऊ लागल्यामुळे तेथून नदीच्या पलिकडे महाराज गेले. तेथून इच्छेश्वर, भीमेश्वर, इत्यादिकांचे दर्शन करून पुढे निघून गेले. केव्हा केव्हा महाराजांनी लोक पाठीमागे येऊ लागले म्हणजे दगड घेऊन लोकांना मारण्याचा आविर्भाव करावा. केव्हा केव्हा समाधि अवस्थेतच चालू लागावे इतका लोकांचा त्रास महाराजांना होत असे. पुढे शेवटी

गरुडेश्वरी महाराजांचे चातुर्मासात ब्रह्मानंदसरस्वती राहिले होते. कोगूर गावात श्रीपादआप्पाशास्त्री अय्यर यांची बहीण वारंवार बेशुद्ध पडे. डॉक्टर वैद्यांनी वातविकाराचे निदान करून पुष्कळ प्रयत्न केला. पण काहीही गुण आला नाही; म्हणून तिला महाराजांच्या-कडे आणले. महाराजांनी तिला पाहिल्याबरोबर 'हिला पिशाच्चबाधा असल्यामुळे औषधाने गुण येणार नाही' असे स्पष्ट सांगितले. तेव्हा ते शास्त्री म्हणाले, 'पिशाच्चयोनि आहे हे मला मान्य आहे; पण त्यांचा मनुष्याशी संबंध येतो हे मात्र खरे वाटत नाही.' तेव्हा महाराज म्हणाले, 'तो संबंध असतो की नाही ते तुम्ही प्रत्यक्षच पाहा.' एकवीस वेळा विटेपुढे धूप घालून करण्यास सांगितले व एकवीस दिवसानंतर ते पिशाच्च बोलू लागले असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी केल्याबरोबर ठरलेल्या दिवशी त्या पिशाच्चाने येऊन आपणास पिशाच्चयोनी प्राप्त होण्याचे व या बाईस पीडा देण्याचे कारणही सांगितले. नंतर आपणास जाण्याची इच्छा नसताही महाराजांचा ताप सहन होत नसल्यामुळे आपण जाण्यास तयार आहोत, पण माझ्याकरिता तुम्ही अमुक एक विशिष्ट कार्य करा असे त्या पिशाच्चाने सांगितले. त्याच्या इच्छेप्रमाणे त्याने सांगितलेले कार्य करताच ते पिशाच्च निघून गेले व ती बाई पूर्ण बरी झाली. या अनुभवावरून पिशाच्चही माणसाला त्रास देऊ शकते हे त्या शास्त्रीबुवांना पूर्णपणे पटले. या भागात महाराज असताना त्यांचा शोध करीत सीतारामबुवा येथे येऊन पोचले व आपणास हरिहरला संन्यास घेण्याबद्दल दृष्टान्त झाल्याची गोष्ट त्यांनी ब्रह्मानंदांचेकडून महाराजांचे कानावर घातली. तेव्हा महाराजांनी 'उद्धरेदात्मनात्मान' हा श्लोक सीतारामबुवांना सांगण्यास ब्रह्मानंदांना सांगितले. तो निरोप ऐकून आपणास काही महाराज संन्यास देत नाहीत असे सीतारामबुवांना समजून येऊन ते या कामी निराश झाले. पुढे फाल्गुन पौर्णिमेस कृष्णातीरी एका ठिकाणी क्षौर करून महाराज बेझवाड्यास येऊन पोचले. उत्तरोत्तर जनसंपर्क वाढून महाराजांना त्रास होऊ लागला. तेव्हा महाराजांनी लोकवस्तीचा मार्ग सोडून अरण्यातील मार्गांनीच जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे फिरत फिरत ते वैशाखारंभी गोदावरीतीरी

मंथनकाळेश्वर येथे आले. तेथे पुन्हा पूर्वीप्रमाणे उत्तरेकडे जाण्याची देवांची आज्ञा महाराजांना झाली. पण ती जागा निरुपाधिक आहे असे पाहून तेथेच चार्तुमास करावा या विचाराने महाराज तेथेच राहिले. पण दत्तमहाराजांनी पुन्हा दृष्टान्त देऊन सांगितले की, 'अद्यापि चातुर्मासाला अवकाश आहे तरी पुढे चलावे, येथे राहू नये.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'पुढे गेल्यास लोकांची पीडा फार होईल म्हणून येथे जंगलांतच चातुर्मासाचे ठरविले आहे.' देव म्हणाले, 'अशा अरण्यातील अवघड जागी चातुर्मास न करता पुढे जाणे चांगले.' याप्रमाणे देवांनी पुष्कळ सांगितले तरी महाराज तेथेच राहिले. ते पाहून दत्तप्रभू साहेबाचा वेष घेऊन व घोड्यावर स्वार होऊन तेथे आले व रागाने हातातील वेताची छडी महाराजांना दाखवून म्हणाले, 'चल ऊठ, येथे राहण्याची काय जरूर आहे ?' येथून जर गेला नाहीस तर या छडीने चोपून काढीन. जातोस की नाही सांग ? असे ते अत्यंत क्रोधाचे भाषण ती उग्रमूर्ति, तो वेष वगैरे सर्व पाहून महाराजांनी, 'तव कोपा वंदू रूद्रा । तव चापा वंदू भद्रा' अशा अंभगाने प्रभूची स्तुती केली, तेव्हा तो राग शांत होऊन प्रभूंची मुद्रा प्रसन्न दिसू लागली. नंतर महाराज म्हणाले, 'आपल्या इच्छेप्रमाणे पुढे निघण्याचे ठरवितो.' हे ऐकून श्रीदत्तभगवान् गुप्त झाले. असाच एकदा पूर्वीही महाराजांना प्रसंग आला होता. पूर्वी महाराजांना दक्षिणेकडे जाण्याची आज्ञा झाली असता मनात तिकडे जावयाचे नसल्याने त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. त्यावेळी कानात एकसारखा ठणूठण् असा आवाज होऊ लागला. त्यामुळे अतिशय त्रस्त होऊन महाराज दक्षिणेकडे जाऊ लागले. तेव्हा तो शब्द आपोआपच बंद झाला. रस्त्यात एका गावी ब्राह्मणाचे एकच घर असल्यामुळे तेथे भिक्षा कशी करावी असा महाराजांना विचार पडला. तेव्हा घरातील बाईने सांगितले, 'माझी या गावात तीन घरे आहेत. मी तीन ठिकाणी स्वयंपाक करते, आपण भिक्षा घ्यावी.' तिच्या सांगण्याप्रमाणे महाराजांनी तिच्या तीन घरातून भिक्षा घेतल्यामुळे त्या बाईलाही आनंद झाला. मंथनकाळेश्वरा-हून महाराज निघाले ते नागभीडतळोदी येथे आले. तेथे आन्हिक वगैरे आटोपून एका औदुंबराचे

झाडाखाली स्वस्थ बसले असता तेथे एका ब्राह्मणाच्या बाईने येऊन महाराजांना विचारले, 'येथील बालाजी मंदिरांत मूर्ति स्थापन करण्याची इच्छा आहे ती सफल होईल की नाही ?' ते ऐकून महाराज म्हणाले, 'तुझ्या मुलाचे गांजाचे व्यसन सुटेल तर होईल' या महाराजांच्या सांगण्याप्रमाणे तिने आपल्या मुलाला ते व्यसन सोडण्यास सांगितले. तेव्हा तो मुलगा चिडून म्हणाला, 'माझे ते व्यसन तर सुटणार नाहीच, पण ते सोड म्हणून कोणी सांगितलेलेही मला खपणार नाही.' ही आपल्या दिव्य मुलाची प्रतिज्ञा बाईने महाराजांच्या कानावर घातली. तेव्हा महाराज म्हणाले, 'तर मग तुमची इच्छा पूर्ण होणार नाही.' शेवटी तसेच घडले. त्या गावातील भागवतवार यांच्या आईस ब्रह्मसमंधाची पीडा होती; याबद्दल महाराजांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, 'या बाईची पीडा पूर्णपणे जाणार नाही, पण प्रयत्न केल्यास पीडा कमी होईल.' असे सांगून तिला एक मंत्र लिहून दिला. त्या मंत्राच्या जपाने त्या बाईची पीडा पुष्कळच कमी झाली. याप्रमाणे मंथनकाळेश्वराहून महाराज निघाल्यानंतर हळूहळू प्रवास करीत करीत ज्येष्ठ मासाच्या अखेरीस, वैनगंगेच्या तीरावर असणाऱ्या पवनी या गावात येऊन दाखल झाले. प्रथम तेथील लोक महाराजांना गावात राहूसुद्धा देईनात. तेव्हा महाराज तेथील विठ्ठल मंदिरांत राहिले व गांडाबुवा मुरलीधराचे मंदिरात राहिले.

चातुर्मास १९ पवनी – शके १८३१

या वर्षीचा चातुर्मास पवनीसच करण्याचे महाराजांनी ठरवून त्याप्रमाणे आषाढ पौर्णिमेस व्यासपूजा झाली. प्रथम महाराजांची योग्यता लक्षात न आल्यामुळे तेथील मंडळींकडून महाराजांस फार त्रास झाला. उन्मत्तपणे वाटेल तसे महाराजांना बोलणे, भिक्षेचीसुद्धा व्यवस्था न करणे असे प्रकार तेथील मंडळीनी आरंभी केले. पण ते सर्व महाराजांनी शांतपणे सहन केले. पवनीस पद्मावती पुरी असे पुराणातरी नाव आहे. तेथे वेनगंगा नावाची नदी आहे. महाराजांनी वेनगंगेचे स्तोत्र केले आहे. ते स्तोत्रादिसंग्रहात छापलेले आहे. चार्तुमासाचे वेळी महाराजांचा कमीत

कमी दोन महिने तरी मुक्काम एका ठिकाणी निश्चित असे व त्यावेळी दर्शनार्थ दूरदूरची मंडळी तेथे येत असत. त्याप्रमाणे पवनीसही हजारो मंडळी महाराजांचे दर्शनास येऊ लागली. तेथील सर्वांची भोजनाची व्यवस्था करण्याचे काम सीतारामबुवांचेकडे सोपविले होते. रोज त्या ठिकाणी ब्राह्मणभोजने होत असत. धर्माविरूद्ध वागणाऱ्या लोकांना पंक्तीमध्ये येण्यास मज्जाव होता. अशा लोकांना महाराज दर्शनसुद्धा देत नसत. याप्रमाणे ठिकठिकाणची मंडळी महाराजांचे दर्शनास येऊ लागलेली पाहून मग मात्र पवनीच्या मंडळीचे डोळे उघडले. नंतर त्यांनी महाराजांची क्षमा मागितली व ते सर्व महाराजांचे पूर्ण भक्त बनले. बाहेरून हजारो लोक पवनीस येऊ लागले. त्यावेळी पवनीच्या आसपासच्या गावातून प्लेग जोरात होता. दूषित हवेतून मंडळी येतात त्यामुळे आपल्याही गावात हवा बिघडण्याची भीति आहे असे सर्वांना वाटू लागले. इतक्यांत गांडाबुवा राहत होते त्या मुरलीधराच्या देवळात उंदीर पडल्याची वार्ता महाराजांचे कानावर गेली. महाराजांनी लगेच श्रीदत्तमहाराजांची प्रार्थना केली की, 'प्रभो ! आपल्या आज्ञेप्रमाणे येथे चातुर्मासास आरंभ झाला असून सर्व बालगोपाळ मंडळी येथे दर्शनाकरिता जमली आहेत. यापैकी कोणी मेला तर आपणास न्यूनता येईल. म्हणून आपणास चातुर्मास संपण्यापूर्वीच निघून जाणे भाग आहे.' हे ऐकून देवांनी सांगितले, 'चातुर्मास संपेपर्यंत येथे कोणालाच त्रास होणार नाही. तरी चातुर्मास सोडून जाऊ नये.' असे देवांचे आश्वासन मिळाले. तेव्हा महाराजांनी सर्वांना सांगितले, 'चातुर्मास संपेपर्यंत येथे कोणतीच भीति नाही. तोपर्यंत कोणीही कोठेही राहण्यास हरकत नाही.' हे ऐकून सर्वांना धीर आला. तेथे येणाऱ्या लोकांची व्यवस्था नाना दशपुत्रे, विठ्ठलराव काळीकर इत्यादि मंडळी करीत होती. महाराज पवनीस आले, त्यावेळी प्रथम वैजनाथाच्या देवळात तीन दिवस राहिले. नंतर दशपुत्रे त्यांच्या विठ्ठल मंदिरांत राहाण्यास गेले. पहिल्या दिवशी नाइकांच्या घरी भिक्षेस गेले, पण ते गुजराथी असल्याचे समजल्यामुळे भिक्षा तशीच ठेवली. दुसरे दिवशीही काही कारणाने उपवास घडला.

तिसरे दिवशी भटांचे घरी भिक्षेला गेले असता त्यांनी महाराजांची फारच चौकशी चालविली. तेव्हा महाराज त्यांना म्हणाले, 'आलेल्या अतिथीस भिक्षा घालणे एवढे गृहस्थाचे काम आहे. जास्ती विचारपूस करू नये' असे महाराज बोलत आहेत इतक्यात भटांची उमरेड येथे दिलेली मुलगी उमाबाई बाहेर आली. तिने महाराजांना ओळखून सर्व लोकांना त्यांची माहिती करून दिली. तिला ब्रह्मावर्त मुक्कामी महाराजांचे दर्शन झाले होते. नंतर ती स्वतः महाराज राहात होते त्या देवळात जाऊन रोज झाडलोट करू लागली. मग हळूहळू मंडळींची ये-जा सुरू झाली. महाराज राहात होते त्या मंदिरांत नानाशास्त्री दशपुत्रे पुराण सांगत होते. त्यांना एकदा पुराणांतील श्लोक अडलेला पाहून महाराजांनी त्याचा सविस्तर अर्थ समजावून सांगितला. तसेच आणखीही काही श्लोकांचे दोन-दोन-तीन-तीन अर्थ करून दाखविले व अशा अर्थाचे पुस्तक तुमच्या घरातच आहे ते शोधून पहा असे महाराजांनी नानाशास्त्रींना सांगितले. नानाशास्त्रींनी घरी जाऊन त्या पुस्तकाचा शोध करताच ते सापडले. तेव्हापासून त्यांच्या मनात महाराजांच्या विषयी आदरभाव निर्माण होऊन त्यांनी तेथील सर्व मंडळींना महाराजांची खरी योग्यता फार मोठी असल्याचे सांगितले. त्यामुळे तेथील सर्व लोक अनुयायी झाले. दशपुत्रे यांचा मुलगा बाळशास्त्री कीर्तन करीत असे. त्याला महाराजांनी नवीन आख्याने तयार करून दिली व कीर्तनांत प्रत्यक्ष श्रुतिवाक्य म्हणावयाचे नाही अशी त्याला ताकीद केली. एकदा बाळशास्त्रींचे कीर्तन महाराजांचे समोर चालू असता चुकून एक श्रुतिवाक्य त्यांनी उच्चारले. ते ऐकल्या-बरोबर एकदम 'श्रीगुरुदेवदत्त' म्हणून महाराज जाण्याकरिता उठले. ते पाहून बाळशास्त्रींनी लगेच महाराजांना नमस्कार करून चुकीची क्षमा मागितली व स्वतःच्या तोंडात मारून घेतले. तेव्हा पुन्हा अशी चूक न करण्याबद्दल ताकीद करून महाराज आपल्या जागेवर पुन्हा बसले. गोविंदराव इनामदार नावाचे एक गृहस्थ महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांना ताप आल्यामुळे ते मुरलीधर मंदिरातील एका खोलीत निजले असता तेथे उंदीर पडला. तेव्हा तेथील कारकुनाने त्यांना दुसरीकडे नेण्याबद्दल महाराजांचे

कानावर घातले व उंदीर पडल्याचेही सांगितले. त्याबद्दल महाराजांनी देवांना विचारले. तेव्हा देव म्हणाले, 'भाद्रपद वद्य प्रतिपदेपर्यंत या गांवात प्लेग येणार नाही, तरी तोपर्यंत येथे राहण्यास हरकत नाही. नंतर मात्र राहू नये.' ही गोष्ट महाराजांनी सर्वांना कळविल्यामुळे सर्व लोक निश्चित झाले. रोज लोक महाराजांना गंधाची उटी वगैरे लावून महाराजांची महापूजा करीत असत व भोजनाचा भंडाराही बराच मोठा होत असे. सर्व जातींच्या लोकांना भरपूर अन्न मिळत असे. एकदा एक आंधळा ब्राह्मण वेश्येला बरोबर घेऊन पवनीस आला व त्या बाईस बिऱ्हाडी ठेवून महाराजांचे दर्शनास आला व आपले डोळे बरे होण्याकरिता उपाय सांगण्यास त्याने महाराजांना विनंती केली. तेव्हा महाराज त्याला एकदम बोलले, 'त्या बाईला सोडून मग इकडे या म्हणजे पाहू.' हे ऐकताच तो ब्राह्मण खजील होऊन निघून गेला. एका भक्ताने महाराजांचे जवळ येऊन 'मला भवसागरातून तारा' अशी प्रार्थना केली. महाराज त्यावेळी नदीवर स्नानास निघाले होते. त्याला नदीवर घेऊन गेले व आपण एकदम नदीच्या पात्रात शिरून त्यालाही आपल्या पाठीमागून येण्याविषयी महाराजांनी सांगितले आणि 'बुडण्याची भीति नको' असेही सांगितले. पण त्याला नदीत जाण्याचे धैर्य झाले नाही. नंतर वर येऊन महाराज त्याला म्हणाले की, 'गृहस्था ! या साध्या नदीतून तरून जाण्याची जर तुझी छाती नाही तर तू भवसागरात कसा तरशील ? तुला तशी योग्यता येण्याकरिता श्रद्धेने भगवंताची उपासना केली पाहिजे.' असे सांगून महाराज देवळात गेले. पवनीस गांडाबुवांनी एकदा महाराजांच्या सर्वांगास केशरी गंधाची उटी लावून महापूजा केली. ते पाहून थत्ते यांनीही तशीच महापूजा केली, तेव्हा 'तुम्ही मंडळी अशी उटी रोज लावू लागला तर महाराजांना त्रास होईल.' याप्रमाणे गांडाबुवा, थत्ते यांना त्यादिवशी काही रागाने बोलले. त्याच दिवशी रात्री महाराज गांडाबुवांच्या स्वप्नात आले व त्यांच्या थोबाडीत मारून रागाने त्यांना म्हणाले, 'तू लोकांना रागाने का बोलतोस ? पुन्हा असे कोणाला बोलशील तर खबरदार.' असे स्वप्न गांडाबुवांना पडले. सकाळी उठून पाहताच गांडाबुवांचा गाल बराच सुजलेला दिसला. नंतर

त्यांनी दुर्गामावशींच्या सांगण्याप्रमाणे महाराजांची क्षमा मागताच तो गाल बरा झाला. पवनी येथील एका बाईचा नवरा रागाने घरातून निघून गेला होता. बारा वर्षे झाली तरी त्याचा काही पत्ता नव्हता. ती बाई अत्यंत दुःखात दिवस कंठीत होती. तिने एकदा महाराजांचे दर्शनास येऊन आपले दुःख सांगितले. तिच्याकडे फक्त एकदा महाराजांनी पाहिले आणि तिला सांगितले, बाई ! लवकरच तुमचा नवरा घरी परत येईल. असे तिला सांगून एक मंत्र लिहून दिला व त्याचा रोज मानसिक जप करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने श्रद्धेने जप सुरु करताच एक महिन्यातच 'आपण लवकरच येतो' असे तिच्या नवऱ्याचे पत्र आले व त्याप्रमाणे पुढे तो घरी येऊन राहिला. नर्मदातीरावरील मंडला - महापूर या गावचे भैरवप्रसाद नावाचे एक ब्राह्मणगृहस्थ एकदा महाराजांचेकडे येऊन त्यांनी महाराजांना आपली दुःखद कर्मकहाणी सांगितली. ते म्हणाले, 'आपणास चार मुले झाली व ती लगेच मृत झाली. पाचवा मुलगाही असाच जन्मल्याबरोबर मेला. त्याचवेळी एक जटाधारी बुवा अकस्मात् तेथे आला व त्या मुलाचे प्रेत त्याने उचलून नेले व आपणही दिसेनासा झाला. पुष्कळ चौकशी करूनही त्या बुवांचा पत्ता काही लागला नाही. अशा संकटात मी असता एकाने आपले नाव सांगितल्या-वरून मी आपणास शरण आलो आहे. माझ्याकडे आपण दयादृष्टीने पाहावे.' हे त्या ब्राह्मणाचे वृत्त ऐकून महाराज म्हणाले, 'तुमच्या वंशात एक पिशाच्च झालेला असून त्यानेच तुमच्या संततीचा नाश केला आहे. जटाधारी बुवाचे रूप घेऊन त्यानेच मुलाचे प्रेतही नेले. त्याची इच्छा पूर्ण करीपर्यंत तुमचा वंश वाढणार नाही.' नंतर भैरवप्रसादाने विचारल्यावरून ती पिशाच्चपीडा दूर होण्याकरिता त्याला महाराजांनी नारायणबली, विष्णुसहस्त्रनामाचे एक सहस्त्र पाठ व काही प्रायश्चित्ते सांगून त्यांना एक यंत्र लिहून दिले व घरी पाठविले. एकदा महाराजांचे दर्शनास काही मद्रासी बायका आल्या त्या विधवा असून सकेशा होत्या. त्यांना पाहताच महाराज तोंड फिरवून बसले. ते पाहून त्या बायकांनी याचे कारण विचारले. तेव्हा महाराजांनी सांगितले, 'शास्त्राविरूद्ध वागणाऱ्याचे तोंड आपण पाहणार नाहीं.' तेव्हा बायका

म्हणाल्या, 'केस व कुंकू काही आम्हाला नवऱ्यापासून मिळाले नाही. केस तर जन्मापासूनच आहेत. कुंकूसुद्धा लहानपणापासूनच लावले जाते. तरी नवरा गेल्यावर केस व कुंकू टाकण्याचे कारण काय ?' हे भाषण ऐकून महाराज म्हणाले, 'जन्मतः जसा लहान आकार असतो तसाच पुढेही का राहात नाही ? लहानपणाच्या, मोठेपणाच्या आकारात, वागण्यात, ज्ञानात सर्व दृष्टीने फरक का दिसतो ? तुम्ही जन्मतः जसे होता तसे होऊन या म्हणजे तुम्हाला दर्शन देता येईल.' असे महाराजांचे स्पष्ट मुद्देसुद भाषण ऐकताच त्या बायकांच्या मनावर परिणाम होऊन दुसरे दिवशी त्या केशवपन करून आल्या. नंतर त्यांना महाराजांचे दर्शन झाले. उमरेडचे श्रीमान गृहस्थ बळवंतराव नाईक यांनी महाराजांचे दर्शनास आल्यावेळी प्रार्थना केली, 'आपणाकडून काही सेवा घ्यावी' पण त्यावेळी महाराज काहीच बोलत नसत. पुढे काही दिवसांनी एका मध्यस्थांकडून आपली सेवेची इच्छा नाइकांनी महाराजांना कळविली. त्यावेळी त्यांची उत्कट इच्छा व भावना जाणून महाराजांनी त्यांना सांगितले, 'येथे पाण्याची व्यवस्था करावी लागते, त्रास पडतो, तरी ते काम तुम्ही करावे.' ही आज्ञा ऐकताच नाइकांना आनंद वाटून ते स्वतः घागर घेऊन नदीवर पाणी आणण्यास गेले व आपल्या घरी मुलांना, सुनांना सर्वांनाच ती सेवा करण्यास त्यांनी सांगितले. तेव्हा त्यांनीही महाराजांच्या दरबारात श्रीमंत गरीब सर्व सारखेच अशा वृत्तीने पाणी भरले. याप्रमाणे नाइकांची निरभिमान वृत्ती पाहून महाराज संतुष्ट झाले. नंतर एके दिवशी त्यांच्या महापूजेचा स्वीकार महाराजांनी केला व त्यांचे चिरंजीव लक्ष्मणराव नाईक यांना अनुग्रहही दिला. त्यादिवशी बळवंतराव नाइकांनी मोठा भंडारा केला. पुढे देवांस नमस्कार घालीत असताना यांचे देहावसान झाले. हे मोठे पुण्यात्मे असून महाराजांचे ठिकाणी यांची अत्यंत भक्ति होती. एकदा एक बाई दर्शनास आली. तिने महाराजांचे पुढे नारळ ठेवला व अधेलीच्या ऐवजी एक गिनी तिने चुकून पुढे ठेवली. पण असे पाहून तिच्या मनाची चलबिचल झाली. पण ती परत कशी घेता येईल या विचाराने ती तेथेच स्वस्थ बसून राहिली. महाराजांनी तिला ती गिनी परत घेण्याचे सांगितले

असता 'एकदा ठेवलेली परत घेता येणार नाही,' असे ती म्हणाली. नंतर महाराजांनी तिला प्रसाद म्हणून नारळ दिला. त्या बाईने घरी येऊन तो नारळ फोडताच त्यातून ती गिनी बाहेर पडली. हे पाहताच त्या बाईला अत्यंत आश्चर्य वाटले. कोल्हापूरकडील शंकरशास्त्री गुळवणी यांनी दर्शनास येण्याची इच्छा असल्याबद्दल महाराजांना पत्र पाठविले होते. आपणच वाडीस येऊ तेव्हा दर्शन घडेल तरी यावेळी इकडे येऊ नये' असे महाराजांनी त्यांना कळविले. पण त्यांना धीर न निघून ते पवनीस आले. तेथे येताच त्यांना ताप येऊ लागला. वैद्यांनी सांगितले, हा ताप ४० दिवस जाणार नाही. तेव्हा घाबरून शंकरशास्त्री महाराजांकडे आले व आज्ञा मोडल्याबद्दल क्षमा मागून त्यांनी कृपा करण्याबद्दल महाराजांची प्रार्थना केली. महाराजांनी त्यांना 'घाबरू नकोस' असे सांगून तीर्थ अंगारा दिला आणि तीर्थ अंगारा लावताच ताप उतरेल असे सांगितले. त्याप्रमाणे करताच रात्री घाम येऊन ताप उतरला. पुढे चातुर्मास संपेपर्यंत शंकरशास्त्री तेथे राहिले. तेथेच त्यांनी आपल्या मातोश्री, कनिष्ठ बंधू वामनराव व धाकटी बहीण गोदावरी यांना बोलावून घेऊन चातुर्मास समाप्तीचे पूर्वदिवशी महाराजांचेकडून अनुग्रह देवविला.

नरसोबाचे वाडीतील पुजारी संकटाने त्रासून महाराजांचे दर्शनास पवनीस आले होते. एकदा पंगत जेवणास बसली असता त्यांनी सत्याग्रह केला. ते म्हणाले, 'आमचे संकट दूर करण्याकरिता आपण जर वाडीस येण्याचे वचन दिले तरच आम्ही भोजन करू. आम्ही भोजन न करता व वाडीलाही न जाता वाट फुटेल तिकडे जाऊ.' हे ऐकून महाराजांनी देवांजवळ प्रार्थना केली. देवांनी सांगितले, 'आता चातुर्मास संपताच उत्तरेकडे न जाता वाडीकडे जावे.' ही देवांची आज्ञा महाराजांनी पुजाऱ्यांना कळविताच त्यांचे समाधान झाले व नंतर सर्वांनी आनंदाने भोजन केले. त्याच दिवशी भाष्यपाठ चालू असता महाराजांचे देहभान नाहीसे झाले व आवेशाने त्यांचे मुखांतून उद्‌गार निघाले, 'वाडीला येऊन काय बाजार मांडावयाचा आहे काय ?' हे बोलताना महाराजांची मुद्रा अतिशय उग्र दिसत असून अंगही लाल झालेले दिसत होते. दुपारी

भोजनाचे वेळी मंडळीनी असा त्रागा केला ते महाराजांना पसंत पडले नाही. महाराजांच्या द्विसाहस्री गुरुचरित्राचा स्वाहाकार करावा अशी इच्छा सावंतवाडीचे उकिडवे यांना झाली. त्याबद्दल त्यांना स्वप्न पडले होते. ही गोष्ट उकिडवे यांनी तेथील न्यायाधीशांना सांगताच त्यांनी याकरिता लागेल ती मदत करण्याचे त्यांना आश्वासन दिले. नंतर स्वाहाकार कसा करावा, त्याचे विधान कळविण्याबद्दल त्यांनी पवनीस महाराजांना पत्र घातले होते. त्यांना महाराजांनी कळविले, 'ऋषिप्रणीत ग्रंथाशिवाय अन्य ग्रंथांचा स्वाहाकार होऊ शकत नाही; तरी तुम्हाला काही कर्तव्य असल्यास गुरुचरित्राची १० पारायणे करून ब्राह्मणभोजन घाला.' या आज्ञेप्रमाणे उकिडवे यांनी सर्व केले. त्यावेळचे महाराजांचे पत्र असे - 'श्रावण शु ॥ ९, पवनी. मनुष्यांनी केलेले अनार्ष ग्रंथ याचे अनुष्ठान करू नये असे मंत्रशास्त्रात आहे. मग त्याचा स्वाहाकार करण्याचे कोणी सांगावे ? व हा ग्रंथ मी केला असाही अभिमान. श्रीगुरूंची जशी इच्छा असेल तसे घडो, अनुमोदन द्यावे अशी प्रवृत्ती होत नाही. गुरुचरित्र स्वाहाकारासंबंधी स्वतः निराधार उत्तर काहीच सांगता येत नाही. अतएव देवता, निर्वाप, हवनप्रकार वगैरे कामी काही अप्रामाणिक बोलता येत नाही. नारायण.' पवनीचा कार्यक्रम इतर ठिकाणाप्रमाणेच चालू होता. निरनिराळ्या ग्रंथांचे पाठ चालू होते. लघुरूद्र, महारुद्र, सहस्रभोजने इत्यादि कार्यक्रमही सारखे चालू होते. हजारो भक्त मंडळी नित्य येत असल्यामुळे पैसा पुष्कळ जमत असे. त्याचा विनियोग वरीलप्रमाणे होत असे. शिवाय येणारे शास्त्री, प्रवचनकार, पुराणिक, हरिदास इत्यादि सर्व गुणी मंडळींना भरपूर संभावनाही दिली जात असे. रोज पक्वान्ने खाता खाता लोकांना कंटाळा आला. इतका खर्च होत असूनही पैसा शेवटी बराच उरला. तेव्हा त्याच्यातून सुवासिनींना लुगडी, खण, ब्राह्मणांना धोतरे, दक्षिणा जाताना वाटली आणि शिवाय उरलेला पैसा वाडीच्या पुजाऱ्यांचे जवळ दिला. यातून पुढे वाडीस स्वाहाकार झाला. भाद्रपद पौर्णिमेपर्यंत याप्रमाणे नित्य आनंदोत्सव चालू होता. त्यादिवशी सायंकाळी महाराज सीमोल्लंघनास निघाले. वैनगंगेत उत्तम सजविलेल्या

नावा तयार ठेवल्या होत्या. महाराजांच्याबरोबर वेदघोष करीत ब्राह्मण मंडळी चालली. सर्व सुवासिनींनी महाराजांना आरत्या केल्या. एका फुलाच्या माळा घातलेल्या व दोन निशाणे लावलेल्या नावेत महाराज बसले व नाव परतीराकडे जाऊ लागली. हजारो लोक जमले होते. लोकांनी महाराजांचेवर पुष्पवृष्टी करून जयजयकार केला. संध्याकाळी सात वाजता नाव पलीकडच्या तीरावर पोचली. दिगंबराचे भजन सारखे सुरू होते. पलीकडे गेल्यावर वाडीकर मंडळींनी महाराजांची पूजा केली. नंतर महाराजांनी भगवद्गीतेचा अकरावा अध्याय म्हटल्यावर सर्वांना प्रसाद वाटला. पुन्हा नौकेत बसून महाराज अलिकडे येऊ लागले. प्रत्यक्ष दत्तप्रभूच येत असल्याचे लोकांना वाटले. पंधरा हजारांचे वर जनसमुदाय होता. त्यावेळी अनेक नावा बाजूने चालत होत्या. एक नाव बुडण्याची पाळी आली होती. पण महाराजांनी नुसता हात हालवून ती सुस्थितीत आणली. याप्रमाणे रात्री ११ वाजता महाराज अलिकडील तीरावर येऊन पोचले. नंतर काळीकर यांचे मुरलीधराचे मंदिरात स्वारी आली. तेथे काळीकरांनी सर्वही मंडळींना प्रसाद वाटला व गायनाचा उत्तम कार्यक्रम करविला. तो झाल्यावर सर्व मंडळी महाराजांना नमस्कार करून घरी गेली. दुसरे दिवशी विठ्ठलराव काळीकर यांनी ब्राह्मण समाराधना व महाराजांना भिक्षा केली. ती झाल्यावर सर्वांना प्रसाद, आशीर्वाद देऊन महाराज गावाबाहेर पडले. महाराजांचे पाऊल बाहेर पडताच आतापर्यंत थांबविलेला प्लेग जोराने गावात शिरून त्याने पुष्कळ संहार केला. पवनीहून निघून महाराज, गांडाबुवा व वाडीकर पुजारी मंडळी बोरी गावात मुक्कामास आली. सीतारामबुवा मागाहून एक दिवसांनी त्यांचे मुक्कामी आले. तेथून आज्ञा झाल्याप्रमाणे पुजारी वाडीस गेले. तेथे महाराज आले असे समजताच तेथील पटवाऱ्याची बायको अत्यंत आर्त होऊन महाराजांकडे आली व तिने सांगितले, 'काही दिवसांपूर्वी मला एक मूल झाले. त्याला फक्त तोंडच होते. बाकीचे अवयव काहीच नव्हते. ते विचित्र मूल पाहून मला भीति वाटून मी आजारी पडले, तरी आपण ही पीडा दूर करावी.' ते ऐकून महाराज त्या बाईस म्हणाले, 'तुमच्या वंशात

कोणी तरी पिशाच्च झाला असल्यामुळे अशी संतती झाली.' असे सांगून तिला एक यंत्र करून दिले. त्यामुळे ती त्या बाधेपासून मुक्त झाली. तेथून पुढे गोदातटाने जाण्याची महाराजांची इच्छा होती. पण गांडाबुवांच्या आग्रहाने माहूर-वरून जाण्याचे ठरले. माहूरच्या अलिकडे ७-८ कोसांवर शरभंगऋषींचा आश्रम आहे. येथे उनकेश्वराचे स्थान असून एक ऊन पाण्याचे व दुसरे थंड पाण्याचे अशी दोन कुंडे आहेत. शरभंगऋषींचा कुष्ठरोग बरा व्हावा म्हणून श्रीरामचंद्रांनी बाणांनी ही दोन कुंडे निर्माण केली. त्यांत स्नान करून शरभंगऋषी रोगमुक्त होऊन ब्रह्मलोकास गेले. त्या ठिकाणी दोन दिवस राहून महाराज पुढे निघाले. उनकेश्वराहून महाराज माहूरला आले. तेथे मातृतीर्थांत स्नान करून मंडळी डोंगरावर गेली. तेथे रेणुकामाता, श्रीदत्त, अत्रि, अनुसया यांचे दर्शन करून मंडळी खाली फुलसुंगी या गावी आली. गांडाबुवांना मात्र काही शारीरिक त्रासामुळे डोंगर चढता न आल्याने कोणतेच दर्शन घडले नाही. वाटेत एका ठिकाणी महाराज भिक्षेस गेले असता घरच्या बाईने डाव्या हातात भाकरीवर भात ठेवून व उजव्या हातात आंबील असलेले गाडगे घेऊन ती भिक्षा घालण्यास बाहेर आली. महाराज तिला म्हणाले, 'भात भाकरी पुरे झाली, आंबील ठेवून द्या.' ती बाई फारच काकुळतीस आलेली पाहून तिला आश्वासन देऊन महाराज आश्रमात परत आले व सितारामबुवांना पाठवून ते आंबिलीचे गाडगे आणवून प्रेमाने भिक्षा केली. भक्तवात्सल्याचे हे उदाहरण आहे. याप्रमाणे प्रवास चालू असता महाराजांना देवांचे सांगणे झाले, 'वाडीकडे न जाता मागे फिरावे.' पण महाराजांनी तिकडे लक्ष न दिल्यामुळे महाराजांना संधिवात होऊन इतका त्रास झाला की उठता बसतासुद्धा नीट येईना. ते पाहून महाराजांनी देवांची प्रार्थना केली, 'आपल्या आज्ञेनेच वाडीकर पुजाऱ्यांना वाडीस येऊ असे वचन दिले. मग परत जाऊन कसे चालेल ? तिकडे गेलेच पाहिजे. मग काही झाले तरी हरकत नाही. आपणास हे मान्य नसेल तर हे शरीर आपल्या ताब्यात आहे. आपण याचे वाटेल ते करू शकता. पण वचनभंग होणे बरे नाही.' अशी प्रार्थना करून देवाची स्तुति केली आणि तशा

कष्टमय स्थितीतच नित्य ७-८ कोस चालत प्रवास सुरू केला. २५ दिवसांपर्यंत हा संधिवाताचा त्रास होता. महाराज ऐकत नाहीत असे पाहून देवांनी महाराजांना भयंकर ज्वर उत्पन्न केला. तरीही वाडीच्या दिशेनेच प्रवास चालू होता. ते पाहून देवांनी दृष्टांत देऊन सांगितले, 'तू माझे ऐकत नाहीस तर गोदावरीच्या पलिकडे जाताना तुझ्यावर वॉरंट निघेल.' हे देवांचे सांगणे ऐकून महाराज पुढे निघाले. कार्तिक महिन्यात हिंगोलीस मुक्काम आला. तेथील सर्व मंडळी भक्तच असल्याने तेथे काही दिवस वास्तव्य झाले. तेथून महाराज आजेगावी आले. आजेगावचे कृष्णराव देशमुख यांची इनाम गावे निजाम सरकारने खालसा केली. ती हकीकत त्यांनी महाराजांचे चरणी निवेदन करताच 'दत्तमालामंत्रा' चे अनुष्ठान करण्यास महाराजांनी त्यांना सांगितले. त्यांनी ते अनुष्ठान उत्तम ब्राह्मणांकडून करविताच एका युरोपियन अधिकाऱ्याने त्यांची ती गावे मोकळी करून त्यांच्या ताब्यात दिली. कृष्णराव देशमुखांचे चिरंजीव शंकरराव हे क्षयाने आजारी पडले. वैद्य, डॉक्टरांनी ते दुखणे असाध्य म्हणून सांगितले असता त्यांनी महाराजांकडे येऊन सर्व सांगितले. ते ऐकून महाराज म्हणाले, 'हा क्षय नसून फक्त त्याची थोडी भावना आहे.' असे सांगून शीतोपलाचूर्ण इत्यादि काही औषधे सांगून धौती करण्यास सांगितले. ते करताच २-४ महिन्यांतच शंकररावांची प्रकृति उत्तम झाली.

महाराजांना भेटण्यासाठी येतो असा उमरावतीच्या गुलाबराव महाराजांनी एकदा निरोप पाठवला होता. तेव्हा महाराजांनी त्यांना परत कळविले, 'तुमचे आमचे अंतरंगात प्रेम आहेच. करिता प्रत्यक्ष भेटण्याची आवश्यकता नाही.' गुलाबराव हे सखीसंप्रदायातील असून स्त्रीवेष घेत होते. तरी असे नटदर्शन महाराजांना नको होते. आजेगांव वगैरे गावाहून महाराज रेणापुरास आले. तेथे दत्तजयंतीचा उत्सव मोठ्या थाटाने झाला. महाराज येणार म्हणून हजारो मंडळी वाट पाहत बसत. रस्त्यात-सुद्धा ७-८ शे पानांचा स्वयंपाक होत असे. रस्त्यांत पुढे पैसा पुष्कळ येई. मग त्यातून पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे अनेक सत्कार्यांत त्याचा विनियोग केला

जात असे. या भागांत महाराज असताना नरसोबावाडीची काही मंडळी ब्राह्मणेतरांच्या त्रासामुळे परागंदा होऊन महाराजांचे दर्शनास पुन्हा आली व आपले संकट त्यांनी निवेदन केले. महाराजांनी त्यांना एक मंत्र देऊन त्याचा जप श्रद्धेने करण्यास सांगितले. त्याप्रमाणे करताच त्या ब्राह्मणेतर मंडळींतच परस्पर वैमनस्य उत्पन्न होऊन त्यांची मारामारी झाली व त्यांच्या पुढाऱ्यांना पुढे मोठ्या शिक्षा झाल्या. महाराज गोदातटाकी गंगामसले या गावी आले. तेथे स्नानाकरिता नदीवर गेले असता महाराजांनी ताकीद केली असूनही मंडळी स्नानास उतरली. त्यात एक मनुष्य बुडाला. लगेच त्याला वर काढण्यात आले. पण तो गतप्राण झाला होता. महाराज म्हणाले, 'लोक सांगूनही ऐकत नाहीत. निष्कारण उपाधी देतात.' त्यावर गांडाबुवा म्हणाले, 'महाराजांची आज्ञा मोडल्याचे फळ याला मिळाले.' शेवटी महाराजांना दया येऊन त्यांनी कमंडलूतील पाणी त्याच्या अंगावर शिंपडले. त्याबरोबर त्या मनुष्याचा श्वास सुरु झाला व तो मनुष्य सावध होऊन उठून बसला. ते पाहून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. सर्वांनी महाराजांची पूजा करून स्तुति केली. नंतर गावात येऊन मोठी ब्राह्मण-समाराधना झाली. पुढे देवांच्या सांगण्याप्रमाणे महाराजांच्यावर वॉरंट निघाले. म्हणजे शौचाचे वेळी रक्त पडण्यास सुरवात झाली. पण तशाही स्थितीत प्रवास करीत महाराज बार्शीस आले. तेथे अंबरीषवरद श्रीभगवंतास वंदन करून मकरसंक्रांतीस पंढरपुरास आले. तेथे पर्वकाळात चंद्रभागेचे स्नान करून पांडुरंगाचे दर्शन घेतले. तेथून वाडीस येण्याकरिता महाराज निघाले. ही बातमी वाडीच्या मंडळींना अगोदर समजल्यामुळे बरीच मंडळी वाडीहून अर्जुनवाड येथे दत्तमंदिरात महाराजांना वाडीस नेण्याकरिता वाद्ये वगैरे घेऊन आली होती. दीक्षितस्वामीही होतेच. तेथे महाराज आल्यावर सर्वांनी वंदन केले. नंतर स्नान, भोजन झाल्यावर वाजत गाजत महाराजांना बरोबर घेऊन सर्व मंडळी पौष शुद्ध १३ या दिवशी संध्याकाळी वाडीस येऊन पोचली. महाराज श्रीदत्तपादुकांना वंदन करून वर ब्रह्मानंदांचे मठात आले. तेथे सर्वांनी आरती करून साष्टांग नमस्कार घातले. महाराजांच्या येण्याने

सर्वांना अत्यंत आनंद वाटला. सीतारामबुवांनी तीर्थविधी श्राद्ध वगैरे केले व मोठे ब्राह्मणसंतर्पण करून सुवासिनींना खण वाटले. पूर्वीप्रमाणे पाठप्रवचन, चर्चा, आर्त लोकांना उपाय सांगणे, इत्यादि कामे सुरु झाली. महाराज आल्यामुळे आनंद व्यक्त करण्याकरिता वाडीतील वैदिक मंडळींनी महाराजांची आज्ञा घेऊन संहिता स्वाहाकार केला. पवनीचा उरलेला पैसा वाडीस पाठविला होता. त्यातून हा स्वाहाकार दहा दिवस मोठ्या समारंभाने झाला. हजारो लोकांची जेवणे झाली. सर्व वैदिक शास्त्री लोकांना दक्षिणाही पुष्कळ वाटली. यावेळी गोव्यातील प्रसिद्ध शास्त्रज्ञ वासुदेवशास्त्री धुपकर आले होते. त्यांनी महाराजांच्या इच्छेप्रमाणे एके दिवशी ऐन वेळी उभे राहून 'दृष्टान्तो नैव दृष्टः' या आचार्यांचे श्लोकावर व 'सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय' या अभंगावर उत्तम कीर्तन केले. ते ऐकून महाराजांना समाधान वाटले. त्यावेळी बडोद्याचे एक सरकारी कामगार अत्यंत आजारी पडून देवाचे दृष्टांताप्रमाणे वाडीस महाराजांकडे आले. यांना पूर्वी देवांनी दृष्टांतात 'गांडाबुवांचेसह नाशिकची यात्रा कर' असे सांगितले होते. पण त्यावेळी रजा न मिळाल्यामुळे ते घडले नाही. त्यामुळे त्यांचे कुटुंब मरणे, नोकरी जाणे इत्यादी रूपाने देवांनी त्यांना शिक्षा केली. शेवटी त्यांना संग्रहणी होऊन रोज दोन दोन शेर कफ पडू लागला. अगदी आसन्नमरण स्थिती झाली. नंतर देवांचे सांगण्यावरून वाडीस येऊन त्यांनी महाराजांना सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून त्यांना महाराजांनी श्रीदत्तपादुकांवर महारुद्राभिषेक करण्यास सांगितले. व त्यांना औषध देण्यास गांडाबुवांना सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी देवाजवळ प्रार्थना करून महारुद्रास आरंभ केला. गांडाबुवांनी त्यांना चित्रकाचे मूळ रोज ताकात उगाळून ते भातात घालून खाण्यास सांगितले. त्याप्रमाणे करताच सर्व रोगांतून बरे होऊन ते गृहस्थ पुन्हा पूर्ववत् आपल्या कामावर हजर झाले. सावंतवाडीच्या भागातील एक ब्राह्मण पिशाच्चपीडेमुळे त्रासून वाडीस येऊन राहिला होता. त्याच्या आजाने एका ब्राह्मणाची बागाईत जमीन हरण केली होती. त्यामुळे तो ब्राह्मण पिशाच्च होऊन त्याने त्याचे कुटुंब, मुलगा यांना मारले व आता

या नातवालाही तो छळू लागला. पवनीस महाराजांचे दर्शनास तो पिशाच्चत्रस्त ब्राह्मण गेला होता व तेथे महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्याने वाडीस येऊन अनुष्ठान सुरू करण्याबरोबर पिशाच्चाने त्याचे अंगावर सूज उत्पन्न केली. त्यामुळे त्याला काही अनुष्ठान करता येईना. महाराज वाडीस आल्यानंतर त्यांनी त्याला तीन लक्ष गायत्री जप व ४९ गुरुचरित्र सप्ताह करण्यास सांगितले. पिशाच्चाने त्याला पाऊण लाख जप करण्यास सांगितला होता. पण 'कलौ चतुर्गुणं प्रोक्तं' या वचनाप्रमाणे वरील संख्या महाराजांनी सांगितली. पिशाच्चाच्या इच्छेप्रमाणे महाराजांनी त्याला तीर्थ दिल्यावर ते पिशाच्च देह सोडून गेले. पुढे त्या ब्राह्मणाने महाराजांचे सांगण्याप्रमाणे सर्व अनुष्ठान पूर्ण केले व पिशाच्चाच्या इच्छेप्रमाणे ब्राह्मणसमाराधना करून तो त्या पीडेतून मुक्त झाला. सातारा जिल्ह्यात एका गावात एक कारकून महाराजांचा भक्त होता. चांगला मुलगा व्हावा म्हणून त्या दोघा पतीपत्नींनी देवांची सेवा केली. नंतर त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव गोदू ठेवले. तिला जननेंद्रिय नव्हते. पुढे ती मोठी झाल्यावर तिचे लग्न झाले. पण पुढे आपण स्त्री नसून पुरुष आहोत असे तिला वाटू लागले. ती स्वतःच मिरजेस दवाखान्यात येऊन तिने आपले ऑपरेशन करवून घेतले. तो खरोखरच पुरुष आहे असे सिद्ध झाले. नंतर त्या मुलाला घेऊन आईबाप महाराजांचे दर्शनार्थ येऊन सर्व हकीकत त्यांना तेथे सांगितली व आपल्या कृपेने मुलगा मिळाला असे सांगितले. पुढे महाराजांचे आज्ञेने त्या मुलाचे मौजीपर्यंत मागील सर्व संस्कार करून मौजही केली व काही दिवसांनी त्याचे लग्नही झाले. बार्शीचे दत्तुशास्त्री साधले हे अक्कलकोटस्वामींचे शिष्य वाडीस महाराजांचे जवळ येऊन आपणास येथे सोमयाग करून संन्यास घेण्याचा आहे असे त्यांनी महाराजांना कळविले. त्यांना महाराज म्हणाले, 'येथे श्रीदत्त संन्यासी वेषाने राहत असल्याने पशुयाग करणे योग्य नाही. अक्कलकोटचे महाराज साक्षात् दत्तावतार त्यांची परवानगी मिळवून वाटल्यास तुम्ही सोमयाग करा.' असे त्यांना सांगितले. महाराज दर्शनास येणाऱ्या लोकांना अंगारा देत असत. ते पाहून बावडेकर बुवांनी म्हणजे दत्तुशास्त्रींनी 'या राखेने काय

होणार ? लोक वेडे आहेत' असे उद्‌गार काढले. ते ऐकून महाराज म्हणाले 'तुमच्यासारख्यांनी' असे उद्‌गार काढणे बरोबर नाही. त्याच दिवशी रात्री बावडेकरबुवांचे पोटात भयंकर शूळ उत्पन्न झाला. त्यांना महाराजांकडे नेले असता 'अंगाऱ्याची चेष्टा केल्याचे ते फळ ! आता पोटात अंगारा घ्या म्हणजे शूळ थांबेल' असे महाराजांनी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे देवाची क्षमा मागून अंगारा पोटात घेताच त्यांची पोटदुखी थांबली. बावडेकरबुवा अक्कलकोटला स्वामींच्या सेवेत होते. तेथे एकदा शृंगेरीकडील शास्त्री येऊन बावडेकरबुवांना म्हणाले, 'तुम्ही या वेड्याजवळ न राहता शृंगेरीस या, म्हणजे तुम्हाला शास्त्र शिकवू.' हे ऐकून शृंगेरीस जाण्याचा विचार बावडेकरबुवांनी केला. रात्री खोलीत कडी लावून ते निजले असता अक्कलकोटचे महाराज तेथे आले. त्यांचा हात लागताच दाराची कडी निघाली. लगेच बावडेकर जागे झाले. महाराजांची त्यावेळची तेजःपुंज मूर्ति पाहून बावडेकरांना तर त्यांच्याकडे पहाता येईना. पुढे महाराज पंडिताप्रमाणे संस्कृत उत्तम बोलू लागले व 'संस्कृत शिकण्यास केव्हा जाणार ? या शास्त्री लोकांनी कामादि विकार जिंकले आहेत काय ?' इत्यादी बोलून गुप्त झाले. नंतर बावडेकरबुवांना पश्चात्ताप झाला. पुढे अक्कलकोटच्या महाराजांनी आपली खेळणी त्यांचेकडे पाठवून दिली. ती त्यांनी देवपूजेत ठेवली होती. यावेळी आजरेकरबुवा आले होते. तसेच अमळनेरकरबुवाही सर्व मंडळींसह महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांचे त्यादिवशी उत्तम भजन झाले. महाराजांनी त्यांचा उत्तम मान राखून त्यांना प्रसाद म्हणून नारळ दिला. महाराजांचे पूर्वाश्रमातील भाचे हे महाराजांकडे येऊन त्यांनी संततीला अडणच येत असल्याचे सांगितले. तेव्हा तुझा चुलता पिशाच्च होऊन पीडा देतो असे महाराज म्हणाले व त्याला गती मिळण्याकरिता त्रिपिंडी श्राद्ध कर म्हणून महाराजांनी सांगितले, तेव्हा अस्तामुळे आपण त्रिपिंडी श्राद्ध आता करीत नाही असे त्या भाचाने सांगताच त्याला 'चालता हो' म्हणून महाराज रागाने म्हणाले. पुढे त्याने मुलाचे टिपण दाखविले. त्यात काही सुधारणा महाराजांनी केली व त्याला घरी जाण्यास सांगितले. पुढे

तीन-चार वर्षे ते श्राद्ध झाले नाही. त्यांची आई पुढे गरुडेश्वरी गेली असता तिलाही ते श्राद्ध मुलाकडून लवकर करविण्यास महाराजांनी सांगितले. नंतर ते श्राद्ध होताच त्यांची मुले जगू लागली. घरातील पीडाही गेली. पेडणे येथील एक गृहस्थ महाराजांकडे येऊन परसात वानरांचा फार त्रास होतो असे सांगू लागले. तेव्हा महाराजांनी त्यांना यंत्र करून दिले व ते परसात ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे करताच तेथील वानरांचा त्रास आपोआपच कमी झाला. एक वैष्णव ब्राह्मण वाडीस आला. पण तेथे कोणी वैष्णव ब्राह्मण न मिळाल्यामुळे त्याने श्राद्ध केले नाही. रात्री त्याला विंचू चावून त्याची प्राणांतिक अवस्था झाली. तेव्हा तो महाराजांचेकडे आला असता त्याला महाराजांनी 'शिवनामोच्चारण कर व तीर्थश्राद्ध कर म्हणजे हा देवाचा कोप शांत होईल' असे सांगितले. तेव्हा त्याने त्याप्रमाणे केल्यावर त्याच्या वेदना कमी झाल्या.

कोल्हापूर प्रांतातील वठार गावातील नरहरी दिवाण हे वाडीस महाराजांचे जवळ येऊन राहिले होते. त्यांच्या मातेकडून एकनाथ महाराज आठवे पुरुष होते. त्यांना महाराजांचे सहवासाने वैराग्य उत्पन्न होऊन ते परमार्थाकडे वळले. पंधरा वर्षांचे त्यांचे वय होते. महाराज वाडीहून गेल्यावर ते गाणगापुरास गेले. तेथे स्वप्नात त्यांना श्रीदत्तदर्शन झाले. नंतर पंढरपुरी येऊन त्यांनी हरिहर महाराजांचा अनुग्रह घेतला. हरिहर महाराजांनी संन्यास घेतला. त्यांचे नांवही त्यांचे गुरूंनी 'वासुदेवानंदसरस्वती' असे ठेवले होते. हे महाराजांचे गुरुबंधु असून चांगले अधिकारी होते. पुढे दिवाण हे गुरुंच्या आज्ञेप्रमाणे योगाभ्यास करण्याकरिता महाराजांचेकडे आले. त्यांना महाराजांनी योगाची माहिती देऊन पैठणास जाऊन अभ्यास करण्यास सांगितले. पैठणात असताना एका अग्निहोत्रीबुवांनी यांना संस्कृत शिकण्याचा आग्रह केल्यामुळे ते त्यांच्याकडे संस्कृत शिकू लागले. पुढे महाराजांचे दर्शन झाले. त्यावेळी महाराज त्यांना म्हणाले, 'तुला संस्कृत शिकण्यास कोणी सांगितले ? सांगितल्याप्रमाणे अभ्यास करून मोक्षलाभ करून घे.' हे ऐकून त्यांनी तो नाद सोडून दिला. यांनी पायानेच तीर्थयात्रा केल्या. महाराजांचे दत्तपुराण

व दत्तमाहात्म्य यावर हे पुराण सांगत असत. हेच पुढे अष्टच्याचे दत्तमहाराज म्हणून प्रसिद्धीस आले. यांची समाधी सांगलीपासून जवळच अष्टे मुक्कामी आहे. वासुदेव मराठे नावाच्या गृहस्थास कुष्ठरोग झाला. सर्व अंग सडले. डॉक्टरांनी शेवटी हात टेकले. काहीच गुण आला नाही. तेव्हा मराठे महाराजांचेकडे येऊन त्यांचेबरोबर राहू लागले. तंजावरला महाराज असताना तेथे दर्शनास खूप गर्दी जमत असे. एकदा त्या गर्दीत एका बाईने आपले मेलेले मूल फडक्यांत गुंडाळून ठेवून दिले व आपण दूर जाऊन उभी राहिली. पुढे मंडळी गेल्यावर ते पाहाताच त्यात मेलेले मूल निघाले. महाराजांचे कानावर ही गोष्ट जाताच महाराज म्हणाले, 'ते मूल मेलेले नाही. बायका निष्काळजी असतात. त्याला न पाजता ती बाई कुठेतरी गेली असेल. हे भस्म त्याच्या अंगाला चोळा' असे सांगून भस्म दिले. ते चोळताच ते मूल सावध होऊन रडू लागले. नंतर त्याची आई जवळ येऊन तिने ते मूल घेतले व 'आपली दोन मुले पूर्वी गेल्यामुळे यावेळी हा प्रयत्न केला, क्षमा करा.' असे ती म्हणाली. हे ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. ही गोष्ट मराठ्यांनी प्रत्यक्ष पाहिल्यामुळे ते महाराजांचे बरोबर राहू लागले. पुढे वाडीस आल्यावर महाराजांनी त्यांना सांगितले, 'तुम्ही कृष्णपंचगंगा संगमातील वाळूने अंग घासून स्नान करा.' याप्रमाणे त्यांनी केल्यावर अंग बरे झाले. नंतर पुढे सहा महिन्यांनी कृपादृष्टीने त्यांचेकडे पाहताच त्यांची सर्व बोटे पूर्ववत् झाली. ही त्यांची प्रकृती उत्तम झालेली पाहून डॉक्टर लोकांनीसुद्धा तोंडात बोट घातले. 'आपण महाराजांच्या कृपेने बरे झालो.' असे मराठ्यांनी सर्वांना सांगावे. 'आपण याला बरा केला नसतांना हा लबाड बोलतो याला हाकलून द्या.' असे महाराज विनोदाने म्हणत असत. वाडीस रथसप्तमीपासून कृष्णाबाईचे उत्सवास आरंभ होत असतो. त्यादिवशी सकाळी गांवातून कृष्णवेणीची मूर्ति वाजत गाजत देवाकडे आणली. ते ऐकून महाराज पाठ सांगता सांगताच उठून बाहेर आले. ती मूर्ति पाहिल्याबरोबर महाराजांचे डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. पुस्तक हातातून गळून पडले. कृष्णालहरीचा पहिला श्लोक म्हणण्यास सुरुवात केली, पण सारखे हुंदके येऊ लागल्यामुळे तो श्लोक

काही तडीस जाईना. पंढरपूरची एक बाई संतति नसल्यामुळे वाडीस आली होती. तिने महाराजांचे दर्शनास येऊन आपली हकीकत सांगितली, 'पांडुरंगाची सेवा पुष्कळ केली, संतानगोपालमंत्राचा जपही तीन वेळा केला, पण काही उपयोग झाला नाही.' हे बाईचे म्हणणे ऐकून तिला महाराजांनी पुन्हा संतानगोपाल-मंत्राचा जप करण्यास सांगितले. शेवटी इच्छा नसतानाही महाराजांची आज्ञा म्हणून तिने तो जप केला. त्याबरोबर दुसरे वर्षीच तिला मुलगा झाला. ब्रह्मानंदाचे माडीवर एकदा महाराज बसले असताना खाली धूप पडला. ते ऐकताच महाराजांचे मन प्रेमाने भरून येऊन डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. मंडळींनी याचे कारण विचारताच महाराज म्हणाले, 'प्रभूचे भक्तवात्सल्य आठवून आपली स्थिती अशी होते. गिरनार, माहूर अशा अवघड जागी भक्तांना येण्यास त्रास पडेल म्हणून भक्तवत्सल परमात्मा या उघड्या मैदानावर येऊन बसला आहे.' हे ऐकून मंडळींना महाराजांच्या शुद्ध प्रेमाची कल्पना आली. महाराजांचे मुक्कामात तेथील विद्यार्थ्यांच्या पुराणक्र्या, कीर्तन म्हणणे इत्यादि कार्यक्रम सारखे चालू असत. नारायणस्वामींच्या उत्सवात महाराज स्वतःच नारायण-स्वामींचे चरित्रावर पुराण सांगत असत. महाराजांचेजवळ भिक्षेचे वेळीसुद्धा पाच पन्नास मंडळी बसून रहात असत. बेळगावचे पुठ्ठोपंत कालकुंद्रीकर यांची बहीण मुचंडीकर कुलकर्णी यांचेकडे दिली होती. तिला वाडीस महाराजांचे दर्शनास न्यावे म्हणून तिच्या सासऱ्यास कालकुंद्रीकरांनी विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले, 'आमचा कुलदेव येडूरचा विरूपाक्षेश्वर आहे, तेथे जात असल्यास सुनेस न्या' असे म्हणून कशीतरी परवानगी दिली. वाडीस कालकुंद्रीकर बहिणीला घेऊन आल्यावर महाराजांनी कालकुंद्रीकरांना नारळ प्रसाद दिला, पण त्यांच्या बहिणीस मात्र दिला नाही आणि सांगितले, 'त्यांचा कुलदेव विरूपाक्ष आहे त्याचा प्रसाद घ्या. दत्त काही कुलस्वामी नाही.' शेवटी कालकुंद्रीकरांच्या आग्रहावरून बहिणीला प्रसाद दिला. वाडीस मधल्या खेपेस महाराज आले होते, तेव्हा त्यांना पुजारी म्हणाले, 'तुम्ही, ते गुजराथी ब्राह्मण गांडाबुवा यांचेबरोबर भिक्षेस असता. करिता

प्रायश्चित्त घेतल्यावाचून देवाला शिवू नका.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'आपण यापुढे देवालाच शिवत नाही म्हणजे झाले.' असे म्हणून पुढे देवास शिवणेचेच महाराजांनी सोडले. लांबून वंदन करून जात असत. पुढे तिसऱ्या खेपेस महाराज वाडीस आले त्यावेळी कन्यागत असल्यामुळे महाराजांना देवांची महापूजा करण्याबद्दल पुजाऱ्यांनी विनंती केली. महाराज म्हणाले, 'तुमच्याच सांगण्यावरून एकदा देवाला शिवण्याचे सोडले. आता आपण पुन्हा शिवणार नाही.' असे म्हणून महाराज स्वस्थ राहिले. तेव्हा एका पुजाऱ्याने तक्रार केली, 'आपण देवास शिवत नसल्यामुळे देव तेथे आहे की नाही अशी शंका सर्व लोकांना व आमच्या घरच्या बायकांनासुद्धा येते. त्यामुळे आमचे नुकसान होते.' ते ऐकून महाराज रागावून म्हणाले, 'आपण राहिल्याने तुमचे नुकसान होत असेल तर आम्ही जाण्याकरिता देवावर संततधार धरा. देवांच्या आज्ञेवाचून आपण जाणार नाही.' असे स्पष्ट सांगितले. कृष्णामाईचे पाणी त्यावेळी अगदीच कमी झाले आणि कन्यागताच्या यात्रेमुळे पाण्यात पिंड वगैरे टाकल्याने ते पाणी नासून महामारीचा उपद्रव सुरू झाला. एक दोन मृत्यूही झाले. ते पाहून सर्व लोकांनी महाराजांना विनंती केली असता श्रीदत्तपादुकांवर अभिषेक करण्यास महाराजांनी सांगितले. तेव्हा लोकांनी जिज्ञासेने विचारले, 'अभिषेकाने महामारी कशी जाते ? त्याचा काय संबंध ?' ते ऐकून महाराजांनी खुलासा केला, 'मृत्युरूप परमेश्वराच्या महामारी इत्यादि शक्ति आहेत. तरी मृत्युरूप परमेश्वरास अभिषेकाने शांत केले म्हणजे त्या शक्तिही शांत होतात.' हे ऐकून नंतर सर्व मंडळीनी महारूद्राभिषेक केला. त्यामुळे महामारी शांत झाली. जमखिंडीचे जोगळेकर वैदिक उत्तम घनपाठी प्रसिद्ध होते. त्यांना काही धनासंबंधी संशय होता. महाराजांनी लगेच प्रमाण दाखवून त्यांचा संशय दूर केला. तसेच कुंडाची माहिती आपल्याप्रमाणे इतरांना नाही असा अभिमान जोगळेकरांना होता व त्यांनी महाराजांची परीक्षा पाहण्याकरिता त्यांना काही प्रश्न विचारले. लगेच महाराजांनी ग्रंथातील श्लोक म्हणून दाखवून त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. ते महाराजांचे अलौकिक

बुद्धिसामर्थ्य पाहून जोगळेकर आश्चर्यचकित झाले. त्यांचा अभिमान तत्काळ नाहीसा झाला. सावंतवाडीचे अणावकर एकदा वाडीस महाराजांचे दर्शनास आले. पूर्वाश्रमांत त्यांचा व महाराजांचा उत्तम परिचय होता. काही गोष्टी झाल्यावर महाराजांनी त्यांना पूर्वीच्या समंधाविषयी विचारले असता तो हल्ली येत नसल्याचे अणावकरांनी सांगितले. पुढे थोड्याच वेळाने पाठ सुरु झाला असता एकदम तो समंध अणावकरांचे अंगात येऊन बोलू लागला, 'आज आपण पुष्कळ दिवसांनी माझे स्मरण केल्यामुळे मी आलो. या अणावकराने आपणाजवळ पुष्कळ गोष्टी खोट्या सांगितल्या. असो, मी सध्या शंकरांच्या पिशाच्चगणावरील मोठा अधिकारी आहे; तथापि माझे हे प्रारब्ध अजून संपले नाही. बरे तर जातो. दत्तमहाराज इकडे येत आहेत. ते येण्यापूर्वी येथून गेले पाहिजे.' इतके बोलून तो समंध निघून गेला.

महाराज एकदा सकाळी संगमावर स्नानास गेले. पाण्यात बुडी मारली. बऱ्याच वेळाने वर आल्यावर सर्वांना हातांतून आणलेला कोरडा अंगारा दिला आणि 'काशीरामेश्वराच्या यात्रेला जाऊन येण्यास इतका वेळ लागला, हा अंगारा तेथलाच आहे' असे त्यांनी सांगितले. एकदा एक साठी उलटलेला सामवेदी ब्राह्मण महाराजांचेकडे येऊन सामवेद म्हणण्याचा आग्रह धरून बसला. महाराजांनी 'खाली दत्ताजवळ म्हणा' असे त्यास सांगितले. तरी तो आग्रहाने बसला. त्यावेळी त्याला काहीच स्मरण होईना. एकदम सर्व ज्ञान नाहीसे झालेले पाहून तो फारच घाबरला. त्याने महाराजांना साष्टांग नमस्कार घालून त्यांची क्षमा मागितली. नंतर महाराजांनी साममंत्र त्याला म्हणून दाखविला. तो ऐकून महाराज सर्वज्ञ असल्याबद्दल त्या ब्राह्मणाची खात्री झाली. त्यावर्षी चैत्र मासांत श्रीनारायणस्वामींचा उत्सव महाराजांचे सान्निध्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात झाला. त्या उत्सवात महाराज माधुकरी आणीत असत. एकदा महाराज ध्यानस्थ असता वाडीत महामारी सुरू होणार असे सांगणे झाले. महाराजांनी पुजारी मंडळींना सांगितले, 'वाडीवर संकट येणार आहे. तरी श्रीपादुकांवर अतिरुद्राभिषेक करा.' याप्रमाणे करताच त्या रोगाचा उद्भव

झाला नाही. वैशाख पौर्णिमेस महाराजांना देवांनी विचारले 'वाडीत अजून किती दिवस रहावयाचे आहे ?' महाराज म्हणाले, 'आपली इच्छा नाही. आज्ञा झाली, की निघणे होईल.' पुढे दोन दिवसांनी 'शृंगेरीस चलावे' अशी देवांची आज्ञा झाली. महाराजांनी याबद्दल कोणासच काही सांगितले नाही. भिक्षा झाल्याबरोबर महाराज पुस्तके गांडाबुवांजवळ देऊन दंडकमंडलू घेऊन खाली देवदर्शनास गेले व उत्तरद्वारातच वंदन करून पंचगंगा ओलांडून पलीकडे निघूनही गेले व एकसंबे गावात जाऊन मुक्काम केला. महाराज एकदम निघून गेले. त्यामुळे सर्व मंडळी घाबरून पाठीमागे गेली. नृसिंहसरस्वतीही होतेच. त्यावेळी न कळविताच एकाएकी निघणे झाल्यामुळे मंडळींना पूर्वीप्रमाणे वाजंत्री लावून मिरवणूक वगैरे काहीच करणे झाले नाही. महाराजांचीही तशी इच्छा नव्हती. एकसंबे गावात सर्व मंडळी वाडीहून येऊन त्यांनी नमस्कार करून प्रार्थना केली की, 'वाडीस चातुर्मास होईल असे वाटत होते.' महाराज म्हणाले, 'देवांचे आज्ञेने निघणे झाले. तुम्ही दुर्गुण टाकून एकनिष्ठतेने प्रभूची सेवा करा म्हणजे आमचे पुन्हा येणे होईल.' याप्रमाणे सर्वांचे समाधान केले. मंडळी तेथे एक दिवस राहून महाराजांचे आज्ञेने परत आली. नंतर महाराज टाकळी, बेळगांव या गावावरून पुढे मलप्रभातीराने प्रवास करीत करीत गुर्लहोसूर येथे येऊन पोचले. तेथे कैवल्याश्रमस्वामींच्या आग्रहावरून दशहारा संपेपर्यंत मुक्काम झाला. तेथे चिदंबरनाथांचे मंदिरांत वास्तव्य होते. तेथे महाराजांचे दर्शनास वाडीकर मंडळी आली. त्यांच्या प्रार्थनेवरून सर्व रोगप्रशमनार्थ 'भूतप्रेत-पिशाच्चाद्याः' इत्यादि श्रीदत्तात्रेयांचे स्तोत्र महाराजांनी त्यांना तयार करून दिले व 'या स्तोत्राचे शुचितेन त्रिकाल पठण करावे म्हणजे कोणतीही रोगबाधा होणार नाही' असे सांगितले. गुर्लहोसून येथे महाराजांचे दर्शनास शेकडो मंडळी सारखी येत होती. रोज ४-५ शे मंडळी भोजनाकरिता असत. रोज भजन, कीर्तन, पुराण इत्यादि कार्यक्रम सारखे सुरु होते. प्रसिद्ध वेदान्ति बाबा गर्दे महाराजांचा समागम व्हावा या हेतूने मुद्दाम ते तेथे आले होते. दशहारा संपताच गुर्लहोसूरहून महाराज निघाले व धारवाडास मदिहाळमध्ये

दत्तमंदिरात राहिले. तेथे गांडाबुवांना महाराजांनी सांगितले, 'या जनसंमर्दात श्रीदत्तांनी सांगितलेला लक्ष गायत्री जप तुझ्याकडून होणार नाही. तर तू भडोचला जाऊन जप व ब्राह्मण संतर्पण कर. पुढे कळवू तेथे यावे.' याप्रमाणे आज्ञा झाल्यावर महाराजांना भिक्षा करवून गांडाबुवा धारवाडहून परत गेले. धारवाडला मदिहाळमध्ये महाराजांचा मुक्काम असता वाडीचे धुंडीराजबुवा कवीश्वर हे दर्शनास आले होते. त्यांचा स्वभाव अत्यंत दाक्षिण्ययुक्त असल्याने यांचेवर महाराजांचे विशेष प्रेम होते. पिताजी निवर्तल्यावर वाडीतच शुक्लवृत्तीने राहून प्रभूंची सेवा करावी अशी यांची इच्छा होती. परंतु प्रपंचात राहून परमार्थ साधावा असे महाराजांनी त्यांना सांगितले व कांही मंत्रानुष्ठान सांगितले. ते त्यांनी श्रद्धेने केले व महाराजांची आज्ञा म्हणून सर्वत्र पुराणप्रवचनादिद्वारा धर्मजागृतीचे कार्य यावच्छक्य चालू ठेवले. मदिहाळला आल्यावर महाराजांना आपण भिक्षा वाढावी असे धुंडिराज-बुवांचे मनांत फार होते. पण त्या गर्दीत त्यांची दाद कशी लागणार ? महाराज जाण्याचे दिवस आले तरी यांना अवसर मिळाला नाही. पण सर्वज्ञ गुरुमाऊलीला प्रेमळ भक्ताचे निर्मल अंतःकरण समजले. दुसरे दिवशी धुंडिराजबुवांना भिक्षेची तयारी करण्याची आज्ञा सद्गुरुंनी केली. अत्यंत आनंदित होऊन बुवांनी एका बाजूस पाक करून महाराजांना भिक्षा वाढली. यामुळे त्यांना कृतार्थता वाटली. यांची संतोषी, समाधानयुक्त वृत्ती पाहून महाराजांचे यांचेवर विशेष लक्ष होते. गरुडेश्वरी असतांना धुंडिराजबुवा महाराजांचे दर्शनास गेले होते. त्यांना तेथे महाराजांनी बरेच दिवस ठेवून घेतले. बुवांनी गावी जाण्याचे ठरवावे. रोज कोणीतरी नवी मंडळी येतच असत, त्यांना महाराजांनी म्हणावे की, 'का हो ! पुराणिकबुवांचे पुराण तुम्ही कधी ऐकले आहे काय ? फार चांगले सांगतात.' हे ऐकून त्या नवीन मंडळींनी अर्थात्च 'नाही' म्हणून सांगावे. मग महाराजांनी बुवांना म्हणावे की, 'बुवा ! आज तुम्ही पुराण सांगून या मंडळींची इच्छा पूर्ण करा. मग उद्या चला.' ही आज्ञा कशी मोडता येईल ? अर्थात्च त्या दिवशी बुवांचा मुक्काम झालाच. असे प्रेमाने बरेच दिवस त्यांना ठेवून घेऊन जाताना

नारळ, प्रसाद व एक छाटी देऊन पूर्ण आशीर्वाद दिला. धारवाडहून महाराज निघाले ते जाता जाता तुंगभद्रा-तीरावर हावनूर या गावी येऊन पोचले. तेथे ब्राह्मणवस्ती बरीच असल्याने तेथेच चातुर्मास करण्याचे ठरविले.

चातुर्मास २० हावनूर – शके १८३२

महाराज हावनूर येथे त्रिपुरान्तकेश्वराच्या देवळात राहिले होते. तेथे गेल्यावर त्रिपुरान्तकेश्वर व तुंगभद्रा यांची स्तुती केली. गुरुपौर्णिमेच्या दिवशी महाराजांनी यथाशास्त्र व्यासपूजा केलेली पाहून तेथील सर्व मंडळीचे मनांत महाराजांचेविषयी पूर्ण आदर उत्पन्न झाला. सर्व मंडळी आपापल्या घरी महाराजांना भिक्षेस बोलावू लागली. वैष्णवांच्या घरी मात्र महाराज भिक्षेस जात नसत. येथे आषाढ व ॥ १३ स वामनरावजी गुळवणी महाराजांचा शोध करीत आले. ते येण्याबरोबर 'येथे चातुर्मास असल्याबद्दल कोणालाही पत्र पाठवावयाचे नाही.' असे महाराजांनी त्यांना सांगितले. नंतर येथे ८-१० दिवस राहून ते आज्ञेने परत गेले. कानडी प्रांत असूनही महाराजांची कीर्ति हळूहळू सर्वत्र पसरू लागली. त्यामुळे तेथेही पुष्कळ लोक जमू लागले. गोपाळबुवा राजाध्यक्ष महाराजांना शोधीत अखेर तेथे येऊन पोचले. त्यांनी रोज रात्री भजन सुरू केले. त्यावेळी बरीच दाटी जमू लागली. कानडी मंडळींनासुद्धा ते भजन ऐकून आनंद होत असे. रात्री भजन संपून महाराजांची आरती होई. मग प्रसाद घेऊन मंडळी घरी जात.

गोपाळबुवांनी एकदा अखंड भजन सप्ताह केला व शेवटी गावात भिक्षेस निघाले. आणखीही बरीच मंडळी वाद्ये वाजवीत निघाली. दिगंबराचे भजन करीत भिक्षा खूप जमली. सर्व ग्रामस्थ मंडळींना प्रसादास बोलावले. सर्वांनी मिळून स्वयंपाक केला. पाचशे पान त्यादिवशी जेवले. जेवताना महाराजांनी सर्वांना श्लोक म्हणावयास सांगितले. त्यातच एका मुक्या मुलालाही 'तू श्लोक म्हणतोस काय ? म्हण.' असे सांगताच तो श्लोक म्हणू लागला. सर्व आश्चर्यचकित झाले. एकदा रात्री भजन सुरु

असता शेषगिरी नावाचा एक वैष्णव ब्राह्मण आपल्या बहिणीस घेऊन तेथे आला. बहिणीचे लग्न झाल्यावर काही दिवसांनी तिचे पाय अगदी आखडून गेल्यामुळे तिला चालताही येत नव्हते व अलिकडे ३-४ वर्षे दिसतही नव्हते. त्याने ती हकीकत महाराजांचे कानावर घातली असता भजन संपल्यावर तिला घेऊन येण्यास महाराजांनी त्यास सांगितले. भजन संपल्यावर त्या बाईच्या अंगावर महाराजांनी कमंडलूतील पाणी शिंपडले व ते तिच्या पायास व डोक्यास लावण्यास सांगितले. तसे करताच तिच्या अंगातील पिशाच्च एकदम 'जातो जातो' असे ओरडले. नंतर महाराजांनी त्या पिशाच्चास त्याची इच्छा पाहून तुला सद्गति मिळेल असे सांगताच ते पिशाच्च तत्काळ त्या बाईला सोडून गेले. त्याबरोबर ती बाई एकदम उठून चालू लागली व तिला उत्तम दिसूही लागले. तिला आणताना उचलून आणले होते पण जातांना ती आपल्या पायांनी चालत गेली; ते पाहून सर्व लोक आश्चर्याने थक्क झाले. वैष्णव लोकही त्यामुळे महाराजांचे भजनी लागले. हावेरी स्टेशनपासून हावनूर २०-२२ मैल आहे. हावेरीचे स्टेशनमास्तर दक्षिणी ब्राह्मण असून ते महाराजांचेकडे येणाऱ्या यात्रेकरूंची व्यवस्था चांगली ठेवीत असत. त्यांनी महाराजांचे दर्शनास येणेकरिता रजेचे दोन अर्ज केले पण रजा मिळाली नाही. शेवटी चातुर्मास समाप्तीचे आदले दिवशी त्यांना रजा मिळून ते महाराजांचे दर्शनास आले. त्यावेळी महाराज त्यांना म्हणाले, 'तुम्ही अर्ज केला तेव्हाच रजा मिळाली असती तर येणाऱ्या यात्रेकरुंची व्यवस्था कशी झाली असती ? ही तुम्ही देवांचीच सेवा केली, ती देवांस पोचली. हा प्रसाद घ्या.' असे सांगून त्यांना कोठीतून एक रेशमी वस्त्र व दहा रूपये देऊन नारळ प्रसाद दिला. ते महाराजांचे बोलणे ऐकून स्टेशनमास्तरांना धन्यता वाटली. रट्टेहाळीचे यज्ञेश्वर दीक्षित हे श्रीनारायणस्वामींचे कन्यावंशज आपल्या मामाच्या घरी राणीबिन्नूर येथे लहानपणी रहात होते. त्यांच्या मस्तकाला एक गळू होऊन त्याला अनेक छिद्रे पडली व त्यांतून सारखा पू वाहू लागला. पुष्कळ औषधोपचार करूनही गुण आला नाही. शेवटी त्यांचे मामा रामप्पा नाईक यांनी यज्ञेश्वर दीक्षितांना महाराजांचेकडे आणले व ती आपल्या भाच्याची

हकीकत त्यांना सांगितली. महाराजांनी कृपादृष्टीने पाहून सर्व तपासले व आतून एक लांब मुळी रामप्पांना आणून दिली आणि लिंबाच्या रसात उगाळून गळेवाला लेप लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे करताच दुसरेच दिवशी पू वाहण्याचे बंद होऊन आठ दिवसात ते गळू नाहीसे झाले. तेथील शाळा मास्तर गोविंदराव फाटक यांचे हातास कुष्ठरोग झाल्यामुळे त्या हाताने त्यांना खाताही येत नव्हते. त्यांची प्रार्थना ऐकून त्यांना महाराजांनी काही जपानुष्ठान सांगून वर औषधही लावण्यास दिले. ते लावून जप करताच त्यांचे कुष्ठ जाऊन हात उत्तम झाला. हिंगोली गांवातील श्रीमंत मारवाडी यांच्या मातोश्रींना वस्त्राचेही भान रहात नसे. त्यांना महाराजांनी एक यंत्र करून दिले होते. व त्याचा सर्व विधीही सांगितला होता. त्याप्रमाणे केल्यावर त्या बाईंची पिशाच्चबाधा दूर होऊन त्यांची प्रकृती उत्तम झाली. त्यांना घेऊन हेमराज मारवाडी हावनूरला महाजांचे दर्शनास आले होते. हावनूरला एक वैष्णव संप्रदायांतील बाई बरीच वर्षे अंथरूणावर पडूनच होती. तिला उठता येत नव्हते. पुष्कळ लोकांनी तिला महाराजांकडे नेण्यास सांगूनही महाराज स्मार्त म्हणून तिला तिच्या मंडळींनी महाराजांकडे आणले नाही. नुसते जाऊन तिची हकीकत महाराजांचे कानावर घातली. 'त्या बाईला समक्ष पाहिले पाहिजे' असे महाराज म्हणाले. नाईलाजाने तिला महाराजांचे समोर उचलून आणले, तिला पाहताच महाराज म्हणाले की, 'हिला रोग नाही तर पिशाच्चबाधा आहे.' नंतर तिच्या अंगावर पाणी मंत्रून टाकताच ते पिशाच्च बोलू लागले. 'पूर्वजन्मी या बाईने आपणास फार छळल्यामुळे मी पिशाच्च होऊन हिला पीडा देत आहे. आपल्या दर्शनाने मी पवित्र झालो. आपल्या आज्ञेप्रमाणे मी हिला सोडून जातो.' असे त्या पिशाच्चाने सांगितले. नंतर त्या बाईस महाराजांनी एक यंत्र करून देऊन काही जपही सांगितला. तो जप पूर्ण होताच ती बाई उत्तम बरी होऊन हिंडू फिरू लागली. ते पाहून वैष्णव मंडळींचे मनातही महाराजांचेविषयी पूज्यभावना निर्माण झाली. चातुर्मास पूर्ण होताच भाद्रपद पौर्णिमेस महाराजांनी सीमोल्लंघन केले. बरोबर गांवातील मंडळी आली होती. सीमेचे पलिकडे गेल्यावर गीतेचा

अकरावा अध्याय महाराजांनी म्हटला. नंतर प्रसाद वाटून भजन करीत सर्व मंडळी परत आली. लगेच महाराजांनी जाण्याची तयारी केली. सर्व लोकांनी आणखी काही दिवस राहण्याची विनंती केली. पण ती न ऐकता महाराज तेथून पुढे निघाले. तुंगभद्रा तीरावर गळगनाथ देवस्थानात चिक्काप्पाशास्त्री म्हणून एक विद्वान् प्रेमळ ब्राह्मण रहात होते, त्यांचे घरी भिक्षा करून महाराज परत हावनूरला आले. त्याच साली तूळ राशीस गुरु आल्यामुळे तुंगभद्रेला गंगा येऊन मिळते त्या पर्वकाळांत महाराजांनी तेथे स्नान केले व सुवासिनी स्त्रियांना हळदीकुंकू देऊन खण दिले. शास्त्री-मंडळींना उपरणी व लहान मुलांना खाऊ दिला. हावनूरहून निघून महाराज तुंगभद्रा-वर्धासंगमावरून आगठीस आले. तेथून राणीबिन्नुरनजीक कुपेलूर येथे नवरात्र करून शिमोग्यावरून शृंगेरीस आले. त्यावेळी तेथे आचार्य नव्हते. नंतर मठात गादीस वंदन करून आचार्यांची स्तुती केली. तेथून हरिहर क्षेत्रास जाऊन शृंगेरीस पुन्हा परत आले. तेथे तुंगभद्रेच्या परतीरावर नृसिंहवनांत महाराजांचा मुक्काम १५ दिवस होता. तेथून एक मैलावर वैकुंठपुरी नावाच्या गावात भिक्षेस जात. शृंगेरीहून निघून अरण्य मार्गाने कार्तिकात बनवासी येथे येऊन राहिले. दत्तजयंती तेथेच झाली. तेथेच षट्पंचाशिका नावाचे वेदान्तपर स्तोत्र तयार करून तेथील अधिकारी शिष्यांना दिले. तेथील मधुकेश्वराच्या मंदिरात महाराजांचा मुक्काम दीड महिन्यापेक्षा अधिक होता. येथे मधुकेश्वर म्हणून एक शिवलिंग दीड पुरुष उंचीचे असून, नंदिकेश्वरही दोन पुरुष उंचीचा आहे. महाराज बनवासी येथे असताना एका ब्राह्मणाने येऊन आपली हकिकत त्यांना सांगितली. ती अशी, 'मी नवीन घर बांधले की एक पिशाच्च मला आधी सूचना देऊन ते घर जाळून टाकते. अशी त्याने माझी दहा घरे जाळली. तरी कृपा करून मला या त्रासातून सोडवा.' हे ऐकून महाराजांनी त्या पिशाच्चाला बोलावून विचारले असता त्याने सांगितले, 'याने मला पूर्वजन्मी फार त्रास दिल्यामुळे त्याचा हा सूड मी उगवून घेत आहे.' नंतर त्याने सांगितले, 'माझ्याकरिता काही चांगले कार्य करण्यास सांगून त्यामुळे माझी मुक्तता होत असल्यास मी आज्ञेप्रमाणे जाण्यास तयार

आहे.' हे ऐकून महाराजांनी त्या ब्राह्मणास काही अनुष्ठान सांगितले. ते केल्यावर पिशाच्चपीडा दूर होऊन त्याचे घर टिकले. बनवासीहून महाराज निघाले. अरण्यांतून येत असता समोरून हत्तीचा कळप येत असलेला दिसला. बरोबरची मंडळी घाबरली. महाराजांनी देवांची प्रार्थना केली व तेथेच जमिनीवर झाडाखाली उभे राहिले तो हत्तींचा कळप काहीही न करता दूर निघून गेला. नंतर पुढे शिरसीवरून सिद्धेश्वर येथे आले असता तेथे त्यांना नेण्याकरिता गोकर्णाहून बळवंतराव भागवत व दैवरात गजानन शर्मा हे दोघे आले. त्यांच्या आग्रहावरून महाराज गोकर्णास गेले. तेथे अहिल्याबाईंचे छत्रात मुक्काम होता. तेथे ऋङ्मंत्रावर सकाळी प्रवचन व सायंकाळी वासुदेवमनन सुरू होते. गोकर्णास दहाबारा दिवस राहून मकरसंक्रांतीच्या पर्वकालाचे स्नान करून महाराज निघाले. त्यावेळी तेथील मंडळींनी १। मणाचा तिळगूळ वाटला. तेथून पुढे कृष्णातीरी कोटितीर्थावर पौष पौर्णिमेस क्षौर करून पुढे २-३ दिवसांनी तेथून निघाले व गुर्लहोसुरास आले. नंतर तेथून गलगली या गावी आले. महाराज गलगलीस दोन महिने होते. तेथील एका बाईचा मुलगा महाराजांना नवस केल्याने आजारातून बरा झला. म्हणून त्या बाईने महाराजांचे पुढे ११००/- रूपये दक्षिणा म्हणून आणून ठेवले. महाराज म्हणाले, 'हे पैसे आम्हाला नकोत. तुम्ही परत न्या.' त्या बाईंनी सांगितले की, 'मी हे पैसे परत नेणार नाही. नको असतील तर नदीत टाकून द्या.' हे ऐकून महाराजांनी ते पैसे तेथील एका पुजाऱ्याकडे देऊन त्यातून कीर्तन, पुराण इत्यादि कार्य करविले. त्या गावात वैष्णव ब्राह्मण फार असून ते स्मार्तांचा द्वेष करीत. समाराधनेसाठी त्यांनी भांडी मागितली असता ती त्यांनी न दिल्यामुळे दुसऱ्या गावाहून स्वयंपाकाची मोठी भांडी आणावी लागली. गलगली हे गालव मुनींचे क्षेत्र. सच्छील, प्रेमळ मंडळी, ब्राह्मण वस्तीही बरी, म्हणून महाराज तेथे राहिले. तो तेथे असा प्रकार ! पुढे लवकरच वैष्णव लोक एकदम आजारी पडले. तेव्हा ते भीतिने महाराजांना शरण आले असता महाराज जास्तीच संतापून म्हणाले, 'तुम्ही ब्राह्मण म्हणविता आणि संतर्पणाला भांडी देत नाही ? तर तुमच्यापेक्षा

महार चांगले. तुम्ही तोंड दाखवू नका, चालते व्हा.' हे रागाचे भाषण ऐकून सर्वांनी क्षमा मागितली. तेव्हा त्यांना शिवाचा मंत्र देऊन त्याचा जप केला तरच ज्वरमुक्त व्हाल असे महाराजांनी सांगितले. त्यांनी नाइलाजाने प्रत्येकाने १२०० जप करताच त्यांचा ज्वर नाहीसा झाला. महाराज गलगलीहून निघाले असता मग त्यांना वैष्णव ब्राह्मण राहण्याचा आग्रह करू लागले ! पण महाराजांनी त्यांना स्वच्छ नाही असे सांगून ते निघाले. ती मंडळी त्यांचे पाठीमागे धावू लागली. ते पाहून महाराजांनी रस्त्यात एक रेषा काढली आणि सांगितले, 'जर ही रेषा ओलांडून याल तर तुमचा वंशक्षय होईल.' हे ऐकतांच मंडळी भीतीने परत फिरली. गलगलीत महाराजांचे मुक्कामात तेथील ब्राह्मण मंडळींनी सर्वांचे कल्याणार्थ, संहितेचे तीन, पवमानाचे सात व रूद्राचे दोन असे एकंदर बारा स्वाहाकार केले. हजारो मंडळी आली होती. सर्व विद्वज्जनांना उत्तम संभावना झाली. गांडाबुवांनाही महाराजांनी मातेचे शिवरात्री व्रताचे उद्यापन करण्यास सांगितले. त्या आज्ञेप्रमाणे गांडाबुवांनी लघुरुद्र-स्वाहाकारपूर्व त्या व्रताचे उद्यापन करून ते मातृऋणांतून मुक्त झाले.

एकदम गुप्त होणे, दूर जाणे इत्यादि कामांसाठी सिद्धीचा उपयोग आपण फक्त तीन वेळा केला असे महाराजांनी एकदा सहज बोलता बोलता सांगितले. जमखंडीचे शाळामास्तर आपल्या मातोश्रींना घेऊन महाराजांचेकडे आले. त्यांच्या मातोश्रींचे सांधे जखडून गेल्यामुळे त्यांना चालता येत नव्हते. महाराजांनी त्या बाईंना पिशाच्चबाधा असल्याचे सांगितले. इतक्यात त्या पिशाच्चाने अंगात येऊन सांगितले, 'माझ्या जागेवर या बाईने लघुशंका केल्यामुळे मी हिला पीडा देत आहे. आपले दर्शन झाले, आता मी हिला सोडतो.' असे सांगून ते पिशाच्च निघून गेले. लगेच त्या बाई बेशुद्ध पडल्या. थोड्या वेळाने सावध होऊन त्या चालत घरी गेल्या. गलगलीहून निघून महाराज फाल्गुन अखेरीस जैनापूरला येऊन दत्तमंदिरांत उतरले. तेथे 'दत्तात्रेयं महात्मनं वरदं भक्तवत्सलं' हे स्तोत्र केले. तेथे एक लिंगाइताची बाई दर महिन्यास शेवटी तीन दिवस बेशुद्ध होऊन पडत असे. महाराजांनी तिला दत्तमंदिरात किंवा औदुंबरास

प्रदक्षिणा घालण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने प्रदक्षिणा सुरु करताच हळूहळू ती पूर्णपणे बरी झाली. तेथून कृष्णातीराने प्रवास करीत महाराज मलप्रभाकृष्णासंगमावर चैत्र अमावास्येस येऊन पोचले. तेथे नारायण-स्वामींची पुण्यतिथी करून पुढे छायाभगवतीचे दर्शनास गेले. हे स्थान विश्वामित्रांचे तपस्थान असून अगदी निर्जन डोंगरात आहे. एकही झाड नाही. येथे अक्षयतृतीयेस फक्त यात्रा जमते. गायत्रीच्या पादुका व छायाभगवती यांची पूजा येथे होते. गलगलीसच गांडाबुवा महाराजांना येऊन भेटले व आज्ञेप्रमाणे जप पूर्ण केल्याची हकीकत त्यांना सांगितली. छायाभगवतीहून महाराज गांडाबुवांचेसह पुढे गेले. तेथून निघतांना महाराजांना पुढे व्याधी होणार असल्याबद्दल दृष्टांत झाला आणि पुढे कोपरगांवी नरसिंहाचे स्थानात येताच महाराजांना ज्वर येऊ लागला. दोन दिवस थांबूनही ज्वर हटत नाही असे पाहून महाराज तसेच पुढे निघाले. या प्रांतात पैसे खर्च करूनही दही, दूध, ताक काहीच मिळेना. गांडाबुवांचे धैर्य गळाले. वैष्णव वस्ती फार आणि ते तर स्मार्तांचा द्वेष करणारे. या अडचणीमुळे महाराजांना ताकसुद्धा मिळेना. तरी प्रवास चालूच होता. कृष्णा-भीमासंगमावर कडलूर गांवापासून एक-दीड कोसांवर एक गाव आहे. तेथे जोशांचे घरी ताक मिळेल असे समजल्यावरून गांडाबुवा त्या घरी गेले व 'बरोबरचे स्वामीमहाराज आजारी असून चार-पाच दिवस त्यांनी भिक्षा केली नाही. तरी थोडे ताक आपण त्यांचेकरिता वाटल्यास किंमत घेऊन द्या,' अशी कळकळीने गांडाबुवांनी त्या घरच्या बाईस विनंती केली. पण घरचा मालक म्हणाला, 'चार-पाच दिवस भिक्षा नाही, स्वामी जिवंत कसा राहिला ?' असे अद्वातद्वा बोलून त्याने गांडाबुवांना घालवून दिले. नंतर दोघे कोस-दीड कोस चालून कडलूर गावी आले. तेथे गांडाबुवांनी गावात जाऊन ताकाचा तपास केला तेव्हा 'अजून ताक होण्यास अवकाश आहे, तुम्ही थोड्या वेळाने या' असे एका बाईने सांगितले. तेव्हा गांडाबुवा परत मुक्कामावर आले व महाराजांना ती वार्ता सांगून स्नानाकरितां गेले. वैशाख महिना, दुपारची वेळ, तहान फार लागली, त्यामुळे थोड्या वेळाने

महाराज स्वतःच उठून गांडाबुवा येण्याचे अगोदरच त्या बाईचे घरी गेले व त्यांनी ताक मागितले. पण त्यावेळी घरच्या मालकाने महाराजांचेवर वाटेल तसे तोंडसुख घेऊन त्यांना शेवटी ताक न देताच घालवून दिले. महाराज आपले परत मुकाट्याने आपल्या मुक्कामी आले व गांडाबुवा आल्यावर तेथे ताक आणण्यास जाऊ नकोस असे सांगून घडलेली हकिकतही सांगितली. ती ऐकून गांडाबुवांना वाईट वाटले. जगद्वंद्य पुरुषाला ताकही न देणारा हा ब्राह्मण काय भाग्याचा आहे ही विचारणीय गोष्ट आहे ! नंतर पुढे प्रवास करीत महाराज श्रीपादश्रीवल्लभांचे स्थानी कुरुगडी येथे वैशाख वद्य ६ रोजी येऊन पोचले. याच्या सर्व बाजूंनी कृष्णेचा प्रवाह असून तेथे जंगलच आहे. त्यामुळे या बेटात पूर्ण एकांत आहे. सेंट्रल रेल्वेच्या रायचूर व कृष्णा स्टेशनहून हे स्थान १८-२० मैल आहे. तेथे तपश्चर्येला उपयुक्त अशी एक सुंदर गुहा आहे. तेथे नदीत खडक असल्यामुळे नाव चालत नाही. भोपळ्याच्या सांगडीवरून जावे लागते. 'या स्थानी चातुर्मास करावा म्हणजे पुष्कळ मंडळी येऊन हे स्थान प्रसिद्ध होईल' असे श्रीपादश्रीवल्लभांनी महाराजांना सांगितल्यामुळे महाराज येथे आले. तसेच तेथील वडील पुजारी भीमाण्णा यालाही एक महिना अगोदर देवांनी दृष्टांत देऊन सांगितले, एक महिन्यांनी आमचे एक परमभक्त संन्यासी येथे येतील. त्यांची व्यवस्था उत्तम ठेव. नाहीतर तुला शिक्षा होईल.' अशी व्यवस्था देवाने करून ठेवली होती.

चातुर्मास २१ कुरुगड्डी – शके १८३३

कुरुगड्डी गाव म्हणजे कृष्णाप्रवाहातील एक बेट आहे. यालाच कुरवपूर म्हणतात. येथेच श्रीपादश्रीवल्लभांचे तप होऊन ते आश्विन वद्य द्वादशीस येथे अदृश्य झाल्याची कथा गुरुचरित्रात आलेली आहे. येथे तेलगू व कानडी भाषा आहेत. दोन मैल रुंद कृष्णेच्या प्रवाहामध्ये हे बेट एक मैल लांब, अर्धा मैल रुंद असे आहे. एका टोकास दत्तमंदिर व दुसऱ्या टोकास गाव व मध्ये शेते आहेत. मंदिरांत श्रीदत्तपादुका आहेत. बेटाच्या दुसऱ्या बाजूस असलेल्या प्रवाहाचे तीरावर एका दगडावर श्रीपाद-

श्रीवल्लभांच्या पावलांचे ठसे पुष्कळच उठलेले दिसतात. एका खडकावर नमस्कार घातल्याप्रमाणे सर्व शरीराचा ठसा उठलेला आहे. या स्थानात सेवेकरी थोडेच असतात. त्यांच्या कामाचा निर्णय येथे लवकर लागतो. गावात पुजारी व कुलकर्णी अशी दोनच ब्राह्मणांची घरे होती. पुजारी तीन बंधू, एकाच घरात तीन खोल्यांतून रहात होते. कोणाचीही लग्ने झालेली नव्हती. महाराजांनीच धाकट्या भावाचे वल्लभाण्णाचे लग्न करून दिले. महाराज कुरुगड्डीस आल्यावर श्रीपादश्रीवल्लभांच्या पादुकांना वंदन करून तेथे राहिले. पहिले दिवशी भिक्षा झाली. तेथे ब्राह्मणांची दोनच घरे असल्याने दुसरे दिवशी उपोषण घडले. शिवाय तेथील पुजाऱ्यांचा तो शूद्रवत आचार पाहून महाराजांना तेथे रहावेसे वाटेना. तेव्हा श्रीपाद-श्रीवल्लभांनी ब्रह्मचारी वेषाने महाराजांचेकडे येऊन त्यांना सांगितले, 'ही भूमी रजकभक्ताने मला दिली आहे. नैवेद्य, नंदादीप यातून चालू आहे, तरी येथे भिक्षा घेण्यास हरकत नाही. या लोकांच्या आचारांचेकडे लक्ष देऊ नये. मुख्यतः द्रव्यशुद्धि व भावशुद्धि येथे असल्यामुळे त्यांचे आम्हाला चालते, तर तुम्हाला का चालू नये ? तुम्ही यापुढे कोणालाही पायाचे तीर्थ देऊ नये व अनधिकाऱ्यास मंत्रही देऊ नये. येथे येणाऱ्यांनी गाणगापूर व वाडीप्रमाणे शुचितेन वागाव.' असे सर्व श्रीपादश्रीवल्लभांनी महाराजांना सांगताच तेथील पुजाऱ्यांचेकडे महाराज भिक्षा घेऊ लागले. येथे महाराज येण्यापूर्वी पाऊस अगदी नव्हता. नंतर तेथे आलेल्या मंडळीकडून महाराजांनी ऋश्यशृंग मंत्राचा जप करविताच उत्तम पाऊस पडला. महाराजांचा चातुर्मास येथे सुरु झाला. हळूहळू ही वार्ता सर्वत्र पसरून मंडळी दर्शनार्थ येऊ लागली. पावसाळ्यामुळे चारी बाजूंनी नदीचा प्रवाह भरून चाललेला. सामानसुमान तेथे काहीच मिळत नाही. प्रत्येक वस्तू रायचूरहून सांगडीवरून आणावयाची. अशा स्थितीत मंडळींची ये-जा वाढली. तेव्हा गांडाबुवांनी तेथे एक चांगली जागा तयार करून तेथे एकत्र स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. प्रत्येकाला जागा, भांडी निराळी मिळणे अशक्य, म्हणून ही सोय त्यांनी केली. रायचूरचे व्यापारी, सर्व अधिकारी मंडळी तेथे येऊन मदत करू लागली. तुळजाराम

पतंगे या व्यापाऱ्यांनी दिवाळीपर्यंत सर्व सामान वेळोवेळी आणून दिले. अशा जंगलातही रोज येणाऱ्या मंडळींना पक्वांन्नांचे जेवण मिळत असे. एकदा महाराज भिक्षा घेऊन आले. अद्यापि मंडळींची पात्रे वाढावयाची होती. ती वाढून झाल्याबरोबर महाराज भिक्षेची झोळी घेऊन आले. झोळीत हात घालताच जोराने विंचू चावला. नंतर महाराजांनी भिक्षा न करता सर्वांना जेवण करण्यास सांगितले. पण मंडळी ऐकेनात. नंतर नित्य पाठाचे एक स्तोत्र म्हणावयाचे गडबडीत राहिले होते. ते म्हणून महाराज तसेच भिक्षेस बसले. नंतर सर्व मंडळीही जेवू लागली. 'त्या दिवशी लक्ष्मणराव नाईक उमरेडकर यांना काही यंत्र वगैरे देण्याच्या गडबडीत नित्याचे एक स्तोत्र म्हणावयाचे राहिले, त्यामुळे विंचू चावला.' असे महाराजांनी त्याचे कारण सांगितले आणि म्हणाले, 'एक स्तोत्र म्हणावयाचे राहिले तर देव रागावून आम्हाला विंचू चावतो, मग तुम्ही रोज कितीतरी देवाचे कृत्य विसरता, तुम्हाला देव किती शिक्षा करतील याचा विचार करा.' एकदा महाराज समाधी स्थितीत असता त्यांच्या हातात देवांनी मृत चिमण्या, पक्षांची अंडी, विष्ठा इत्यादी पदार्थ टाकले. ते पाहून महाराजांनी ते फेकून दिले. तेव्हा देव म्हणाले, 'हे असे गलिच्छ पदार्थ रोज आमच्या अंगावर पडतात, ते आम्ही कसे सहन करीत असतो, हे तुम्हाला कळण्याकरिता तुमच्या हातात हे पदार्थ टाकले.' दुसरे दिवशी महाराजांनी प्रत्यक्ष वटवाघळांनी मारलेली मृत चिमणी देवावर पडलेली पाहिली. लगेच ती काढून जागा स्वच्छ केली व देवळास दार लावून आतीलही सर्व चिरा चुन्याने बुजवून सर्व व्यवस्था केली. आषाढ शु ॥११ स कृष्णाबाईने महाराजांचे स्वप्नात शूद्र रूपाने जाऊन आपणास डाळ तरी द्या असे सांगितले. त्यावर्षी मलप्रभातिरी महाराजांनी दशाहार केला होता, त्यामुळे कृष्णाबाईंना काही मिळाले नव्हते. नंतर आषाढी पौर्णिमेस महाराजांनी व्यासपूजा केली व सायंकाळी गावातील शूद्रांना बोलावले. नंतर कृष्णामातेची उत्तम पूजा करून भिजलेल्या डाळीचा नैवेद्य दाखवून ती डाळ जमलेल्या शूद्र लोकांना भरपूर वाटली. त्यामुळे ते तृप्त होऊन घरी गेले. कृष्णाबाई तेथे शूद्र स्वरूपात असल्याने शूद्र

स्त्रियांची ओटी भरून सर्वांना डाळ वाटली. कुरुगड्डीस असलेल्या गुहेत एक सर्प रहात होता. त्याला महाराजांनी ती जागा सोडण्यास सांगितले. तेव्हा तो त्या गुहेतून निघून बाहेर एका अश्वत्थाच्या झाडावर जाऊन राहिला. पण रोज तेथून तो महाराजांचे दर्शन घेऊन जात असे. महाराजांचे आज्ञेप्रमाणे त्याने कोणास पीडा दिली नाही व लोकांनीही त्याला दुखविले नाही. ती गुहा स्वच्छ करून तेथे महाराज समाधीसाठी बसू लागले. गांडाबुवा कुरुगड्डीस पादुकांवर पाणी घालीत. पण देवांचे सांगण्यावरून ते महाराजांनी त्यांना बंद करण्यास सांगितले. 'नरसोबाचे वाडीस जर पादुकांवर गांडाबुवा पाणी घालीत नाहीत तर येथे का ?' असे देव म्हणाले. नंतर गांडाबुवांनी पाणी बंद करून देवांची क्षमा मागितली. एकदा एक गृहस्थ आपली पैशाची पिशवी व कपडे ठेवून स्नानाकरिता नदीत उतरले. ते पाहून एका बाईने ती पैशाची पिशवी लांबविली. ते गृहस्थ स्नान करून येऊन पहातात तो पैशाची पिशवी नाही. त्यांनी ती गोष्ट महाराजांना सांगताच एका पिशाच्चाला त्या चोरीचा शोध करण्यास महाराजांनी आज्ञा केली. त्याने लगेच बाईस भीति दाखविताच ती बाई महाराजांचेकडे येऊन तिने ते सर्व पैसे दिले व अपराधांची क्षमा मागितली. शेषो कारगदेकर यांच्या प्रार्थनेप्रमाणे महाराजांनी त्यांना वेंकटरमणांचे पद करून दिले व सर्वांचे कष्टनिवारणार्थ 'श्रीपादश्रीवल्लभं त्वं सदैव' हे स्तोत्र केले. 'तेथे येणाऱ्या यात्रेकरूंना राहण्याकरिता धर्मशाळा बांधावी', असे रायचूरकर मंडळींना महाराजांनी सांगितले होते. सोलापूरच्या एका ब्राह्मणाची बायको आजारी होती. तिला महाराजांनी एक यंत्र हातात बांधण्याकरिता तयार करून दिले, त्यामुळे तिची प्रकृती बरी झाली. गावी गेल्यावर त्यांनी पुन्हा डॉक्टरांचे औषध सुरु केले. लगेच देवांनी स्वप्नात त्या बाईस सांगितले, 'तुझा विश्वास आमच्यावर नाही. तर ते आमचे यंत्र परत दे.' असे सांगून ते यंत्र तिच्या हातातून काढून जवळच टाकले. ती बाई जागी होऊन पाहते तो हातात यंत्र नाही. थोडे शोधताच ते दूर जाऊन पडलेले सापडले. नंतर ती सर्व हकीकत महाराजांना कळवून दुसरे यंत्र मागितले. तेव्हा महाराजांनी कळविले, 'देवांनी ही गोष्ट नाकारल्यामुळे

दुसरे यंत्र मिळणार नाही.' असे उत्तर आले. ती बाई पुन्हा आजारी पडली. नंतर कुरुगड्डीस दर्शनार्थ पुन्हा जाऊन प्रार्थना करताच महाराजांनी देवांकडे क्षमा मागण्यास सांगून एक यंत्र व स्तोत्र तिला दिले. देवळाच्या आत असेपर्यंत महाराजांना कोणीही नमस्कार वगैरे करावयाचा नाही व त्यांची पूजा-आरती करावयाची नाही अशी सर्वांना महाराजांची ताकीद होती. नरसोबावाडीसही अशीच पद्धत ठेवली होती. पुण्याचे रघुनाथ चिमणाजी थत्ते यांचे कुटुंबास पिशाच्चबाधा होती, म्हणून ते कुरुगड्डीस येऊन त्यांनी त्याबद्दल प्रार्थना केली. महाराजांनी देवांना विचारले तेव्हा 'त्यांची व्यवस्था आपण नरसोबावाडीस करू, तुम्हाला ती काळजी नको.' असे देवांनी महाराजांना सांगितले. ते ऐकून थत्ते वाडीस सेवेकरिता बरेच दिवस जाऊन राहिले होते. तेथील एक श्रीपाद नावाचा ब्राह्मण आपल्या आईबापांचे श्राद्ध करीत नव्हता. त्याच्या बापाने पितृरूपाने महाराजांचेकडे येऊन ही हकीकत कळविली व आपल्या मुलास श्राद्ध करण्याची आज्ञा करण्यास सांगितले. महाराजांनी श्रीपादास बोलावून आणून श्राद्ध करण्याविषयी सांगितले, पण त्याने ते न ऐकल्याने त्याच्या बापाने त्याला पीडा देऊन त्याचा प्राण घेतला. एकदा वऱ्हाडातील हरदा गावचा वामनराव नावाचा एक म्हातारा ब्राह्मण महाराजांचेकडे आला व त्याने विनंती केली, 'चातुर्मास संपताच महाराजांनी उटी गावी येऊन माझ्याकडून स्वाहाकार करवावा.' ही त्यांची विनंती त्याची श्रद्धा पाहून महाराजांनी मान्य केली. इतक्यात त्याच्या अंगावर एक मोठे चिंचेचे पोते पडले व तो ब्राह्मण, खाली पडून बेशुद्ध झाला. पण महाराजांनी त्याचे अंगावर तीर्थ शिंपडताच तो सावध झाला. नंतर महाराजांनी उटी गावी जाऊन त्याच्या इच्छेप्रमाणे त्याचेकडून रुद्रस्वाहाकार आपल्या समक्ष करविला. कुरुगड्डीस जाताना भोपळ्याच्या सांगडीवरून किंवा भोपळे बांधलेल्या बाजेवर बसून जाण्याची पद्धत आहे. तेथे नाव घालीत नाहीत. पण तेथील मामलेदारांनी तेथे पडलेल्या एका जुन्या नावेतूनच जाण्याचा आग्रह धरला, त्यामुळे नावाड्याने नाइलाजाने नाव घातली. ती मध्ये येताच भोवऱ्यात सापडून बुडण्याचा प्रसंग आला. आत बायका-मुलांसह

मामलेदार बसले होते. त्यांनी देवांची प्रार्थना केली, 'नाव सुखाने कडेला लागताच आम्ही बाजेवरून येऊन महापूजा करू,' असा त्यांनी नवस केला. नंतर ती नाव एकदाची अलिकडच्या तीरास लागली. नंतर बाजेवरून ते अधिकारी कुरुगड्डीस आले. देवदर्शन करून महाराजांचे दर्शनास सर्वजण आले. महाराजांनी केस राखलेल्या मामलेदारांना पाहिल्याबरोबर तेथून उठून दुसरीकडे गमन केले. त्या दिवशी मामलेदारांना जेवणास परवानगी न मिळाल्याने उपोषण घडले. त्यांची सर्व मंडळी जेवली. दुसरे दिवशी मामलेदारांनी क्षौर वगैरे केले. पण क्षौर केल्यामुळे त्यादिवशी महाराजांची पूजा करता आली नाही. तरीही त्यादिवशी जेवणास परवानगी मिळाली. तिसरे दिवशी त्यांनी महाराजांची व देवाची महापूजा करून भंडारा केला. त्या दिवसापासून ते मामलेदार फार आस्तिक झाले. कुरुगड्डीस जाणाऱ्या यात्रेकरूंकडून नावाडी लोक फार पैसे घेत. ही गोष्ट महाराजांना समजताच त्यांनी नावाड्यांना बोलावून आणून तसे न करण्याबद्दल ताकीद केली व एका माणसाने बाजेवरून जाणे असल्यास आठ आणे द्यावेत. स्वतंत्र भोपळ्याच्या सांगडीवरून जाण्याकरिता प्रत्येकाने एक रूपया द्यावा व ओझ्याकरिता एका ओझ्याच्या रांजणास आठ आणे अशी व्यवस्था करून दिली. रायचूरचे कोमटी व्यापारी तुळजाराम पतंगे यांनी या चातुर्मासात नेहमी सर्व सामान आणून द्यावे. त्यांच्या बायकोस व सुनेस पिशाच्च बाधा होती. त्यांनी महाराजांचे जाण्याचे वेळी त्याबद्दल विचारले असता महाराज काही बोलले नाहीत. ते खिन्न झालेले पाहून महाराज निजत असलेले पोते गांडाबुवांनी त्यांना दिले आणि सांगितले, 'हे पोते घरात ठेवून याची नित्य पूजा करा व याच्या दशा भिजवून ते पाणी पिशाच्च पीडा असणाऱ्यांना द्या म्हणजे सर्व बरे होईल. त्याप्रमाणे श्रद्धेने करताच त्यांच्या घरातील पीडा दूर झाली. तेथे महाराजांच्या मस्तकावर कावळ्याने तीन वेळा चंचूप्रहार केला. ज्याला असा कावळा चंचूप्रहार करील त्याचे आयुष्य सहा महिन्यांपेक्षा अधिक नसते.' असे महाराज म्हणाले आणि 'या देहावर आता कोणी प्रेम करू नये' असे सांगितले. या अरिष्टाच्या

शांतीकरिता वेनगंगा संगमावर गोदावरीचे स्नान करण्यास श्रीदत्तप्रभूंनी महाराजांना सांगितले होते. एकदा एक संन्यासी योगाभ्यास शिकण्याकरिता महाराजांचेकडे आले. पण त्यांचा अधिकार नसल्यामुळे 'आपणास काही शिकविता येत नाही' असे त्यांना महाराजांनी सांगितले. त्यावेळी त्याने रागावून महाराजांचेवर पुष्कळ तोंडसुख घेतले आणि लगेच रागाने तेथून निघाले. नावाड्यांनी त्यांचेकडून दुप्पट पैसे घेतले. पुढे रायचूरला जाताना गाडी उलटून त्यांना बरेच लागले. दंड मोडला. कमंडलू फुटला व शेवटी सर्व लोकांनी 'सत्पुरुषांवर रागावण्याचे हे प्रायश्चित्त भोगा' म्हणून त्यांची खूप टिंगल केली. चातुर्मास समाप्तीचे दिवशी वाजत गाजत महाराजांना न्यावे अशी सर्व मंडळींची इच्छा होती. पण महाराजांनी सकाळी क्षौरविधी आटोपून दुपारी एका माणसाला बरोबर घेऊन नदीतून थोडे चालत जाऊन पलिकडे एका कोरड्या जागेवर महाराज गेले व तेथे गीतेचा विश्वरूपाध्याय म्हणून सीमोल्लंघन करून परत आले. कोल्हापुरात राहणारे शेषो कारदगेकर हे येथे महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांना संतती नव्हती व कर्जही बरेच होते. महाराजांचे कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा महाराजांनी संतती होईल म्हणून नारळ प्रसाद दिला. पुढे त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली व कर्जही सर्व फिटले. रायचूरचे लक्ष्मणराव वैद्य यांना मुले होऊन ती जात असत. लोकांच्या सांगण्यावरून एकदा ते मातोश्रीस व पत्नीस घेऊन महाराजांचेकडे आले व महाराजांनी 'का आला ?' म्हणून विचारले. तेव्हा 'उगीच आलो' असे म्हणाले. महाराज म्हणाले, 'दुसऱ्याच्या आग्रहानी आला आणि उगीच का म्हणता ?' नंतर त्यांच्या मातोश्रींनी सर्व हकीकत सांगितल्यावर महाराजांनी त्यांना सांगितले, 'तुमच्या कुलातील नागपूजेचा आचार बंद पडला आहे. तो तुम्ही सुरू करा. श्रावण महिन्यात वारूळाची पूजा करून शेवटच्या दिवशी सोन्याचा नाग दान करा. पाच पंचमीस वारूळपूजा करा.' त्याप्रमाणे त्यांनी एक महिनाभर वारुळाची पूजा केली. शेवटच्या दिवशी प्रत्यक्ष नाग आला. तो भिऊन मागे परतणार इतक्यात झाडीतून एका भिल्लाने येऊन भिऊ नका

म्हणून धीर दिला व दोघांनी मिळून त्या नागास दूध पाजताच तो नाग व भिल्ल दोघेही गुप्त झाले. व्रत समाप्त झाल्यावर आता तुम्हाला दीर्घायुषी मुलगा होईल म्हणून त्यांना स्वप्नात महाराजांनी सांगितले. नंतर मुलगा झाल्यावर महाराजांनी त्याच्या आईस व सुइणीस मुलगा आयुष्यमान् आहे असे सांगून षष्ठादेवीस त्याचे मस्तकावर चांगले लिही असे सांगितले. त्या मुलाचे नांव 'वासुदेव' असे ठेवले. महाराजांनी कुरुगड्डीस गुरुद्वादशीपर्यंत मुक्काम केला. नंतर गुरुद्वादशी करून व तेथे सर्व लोकांना उपदेश करून महाराज तेथून निघाले. कृष्णातीरानेच परळी वैजनाथकडे येण्यास निघाले. प्रथम मलप्रभासंगमी जावे असा विचार होता. पण देवांची आज्ञा झाल्याप्रमाणे कृष्णातीर सोडून गोदातीराने प्रवास चालू झाला. नंतर तुळजापुरी येऊन जगदंबेची स्तुती करून दर्शन घेतले. तेथून वांजरातीरावर दत्तजयंती करून गोदावरी तीरावर आले. पूर्वी कावळ्याने मस्तकास स्पर्श केला होता त्याबद्दल आज्ञा झाल्याप्रमाणे गोदावरी संगमावर स्नान करून तेथे त्रिरात्र मुक्काम केला. गोदावरी संगमावरून महाराज परळी वैजनाथाचे दर्शन घेऊन तेथे पाच दिवस राहिले. त्यावेळी तेथील श्रीमंत नागरिक नानासाहेब देशपांडे यांनी महारुद्र स्वाहाकार केला. त्यावेळी खूप यात्रा जमली होती. परळीहून निघून महाराज गोदातीरावर राजूर या गांवी पौषारंभी येऊन पोचले. तेथे संहितास्वाहाकार करण्याची इच्छा सितारामबुवांनी महाराजांचेजवळ व्यक्त केली असता महाराज म्हणाले, 'पैसा भरपूर आहे काय ?' तेव्हा 'नाही' असे सीतारामबुवा म्हणाले. 'बरे तर करा' अशी महाराजांची अनुज्ञा घेऊन सीतारामबुवांनी राजूरास संहितास्वाहाकार केला. तेथे फार मोठा जनसमुदाय जमला होता. महाराजांनी बोलावले आहे असे खोटेच पत्र सीतारामबुवांनी पाठविल्या-मुळे वाडीहून नृसिंहसरस्वतीही आले होते. त्यांना पाहताच 'वाडी का सोडली ?' म्हणून महाराजांनी रागाने विचारले. तेव्हा सीतारामबुवांनी खरी हकीकत सांगताच महाराजांचा राग शांत झाला. या स्वाहाकाराचे वेळी हंपी विरुपाक्ष मठाचे शंकराचार्य, टाकळीचे दाजीमहाराज, हैद्राबादचे भटजीबापू इत्यादि मोठमोठी मंडळी आली होती. परळीचे

नानासाहेब देशपांडे यांनी या यज्ञात देखरेखीची मेहनत बरीच घेतली. तेथील मुसलमान तालुकदारही चार दिवस कचेरी बंद ठेवून बंदोबस्तासाठी तेथे येऊन राहिले होते. वेदपाठस्तुतीची पुस्तके महाराजांनी स्वतः आपल्या हातांनी सर्व अधिकारी विद्वानांस वाटली. आठ दिवस सोहळा अप्रतिम झाला. एक लाखावर मंडळी येऊन गेली. नित्य हजारो मंडळी भोजनाकरिता येत असत. शेवटी महाराज स्वाहाकाराच्या मंडपात एक प्रहरभरच जाऊन बसले. त्यावेळी महाराजांचे पुढे पैशाचा पाऊस पडला. १९ वेळा मोठ्या पाट्यांतून रूपये भरून गेले, एक भाट्याच दोन लाख रूपये देतो म्हणाला, पण महाराजांनी ती गोष्ट मान्य केली नाही. एक लक्ष भोजन यावेळी सहज झाले असेल. यावेळी वझूरचे दामोदरस्वामीही आले होते. जाताना वझूरास मला दर्शन देऊन जावे अशी प्रार्थना करून दामोदरस्वामी गेले. स्वाहाकार पूर्ण झाल्यावर त्याच रात्री वझूरास निराळ्या रूपाने दामोदरस्वामींना दर्शन देऊन महाराज आले. सकाळी वझूरास लोकांना ही गोष्ट कळली. वझूराहून निघून महाराज पिंपरीवरून आवंढ्या नागनाथाचे दर्शनास गेले. हे बारा ज्योतिर्लिंगांतील मुख्य स्थान आहे. तेथून पिंपरीवरून उटी गावी आले. तेथे वामनरावांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्याकडून रुद्र स्वाहाकार करविला. घरची मंडळी त्यांना वेडा म्हणत. पण त्यांची खरी श्रद्धा पाहून महाराजांनी देवांच्या खजिन्यातील दोन हजार रूपये देऊन त्यांच्याकडून स्वाहाकार करविला. त्यामुळे वामनरावांची कीर्ति सर्वत्र पसरली. या स्वाहाकारातील एकंदर व्यवस्था पाहून महाराजांनाही संतोष झाला. या प्रांतातील लोकांना वामनरावांचे निमित्ताने महाराजांचे दर्शनाचा लाभ झाला. या प्रांतात त्यावेळी निरनिराळ्या ठिकाणी एकंदर वीस स्वाहाकार, अग्निहोत्र्यांचे दोन चातुर्मास्य याग व दोन ठिकाणी श्रीदत्तपादुकांची स्थापना इतकी धार्मिक कार्ये झाली. पण सर्व कार्यात वामनरावांचा स्वाहाकार श्रेष्ठ प्रतीचा ठरला. त्यांच्या श्रद्धेचे फल त्यांना मिळाले. याप्रमाणे त्या प्रांतात महाराजांचा संचार चालू असता प्रत्येक गावी मोठाच समारंभ होत असे. एका गावाहून निघताना वाद्ये वाजवीत. मागील गावच्या मंडळींनी त्यांना

पोचवायचे व पुढील गावच्या मंडळींनी तसेच त्याना आपले गावी न्यावयाचे, असा क्रम सारखा सुरू होता. असेच एकदा महाराज जिंतूरवरून पूर्णानदीचे तीरावर बामनी गावी जात असता रस्त्यात एका मारुतीचे देवळात हनुमानजयंती करून दुपारी त्या गावी पोचले. तेथे ग्रहण करून चार दिवस राहिले, नंतर पाथरीस आले. तेथील श्रीमान् गृहस्थ बाळेराव चौधरी यांचे एक मोठे रान पडीत पडले होते. ते शेत कोणी करू लागल्यास तो लगेच मृत होत असे. फक्त त्यात जनावरांनी चरावे. 'याबद्दल काय करावे ?' असा प्रश्न चौधरी यांनी विचारला असता महाराजांनी सांगितले, 'या शेतात एक फकीर मयत झाला असून तो जिंद झाला आहे. तो येथे कोणालाही पीक काढू देत नाही. तरी त्याच्या शांतीकरिता तुम्ही पुष्कळसे फकीर येथे बोलावून त्यांचेकडून नमाज पढवा आणि त्यांना पोटभर भोजन द्या, म्हणजे तुम्हाला पीक मिळेल. असे प्रतिवर्षी करावे.' या सांगण्याप्रमाणे करताच ते शेत लागवडीस आले. पाथरीहून हिंगोली वगैरे भागात जाऊन महाराज गोदातिरी गोंड या गावी आले. तेथे रेणुकामातेचे स्थान आहे. तेथे जाऊन वंदन केले. त्या गावी आंबादास कायर या ब्राह्मणाने महाराजांच्या आज्ञेने महारुद्र स्वाहाकार करणेच ठरविले होते. महाराज तेथे येताच आरंभ झाला. त्यात चौधरी प्रभुती पाथरीकर मंडळी व्यवस्थापक होती. पूर्णाहुतीचे दिवशी शामराव चौधरींचे घरची मंडळी दर्शनास आली होती. त्यातच त्यांची दोन वर्षांची मुलगीही आली होती. तिला एकाएकी मृत्यु आला. तेव्हा चौधरी मंडळी त्या प्रेताजवळच बसून राहिली. दक्षिणेचे पैसे त्यांचेकडे होते. त्यांचेकडे मनुष्य गेला असता ते आले नाहीत. तेव्हा खरी गोष्ट समजताच महाराज तेथे आले व कमंडलूतील पाणी तिच्या अंगावर शिंपडले. ताबडतोब तिचा श्वासोच्छ्वास सुरू झाला व ती सावध होऊन आईचे स्तनपान करू लागली. ते आश्चर्य पाहून सर्वांनी महाराजांचे नावाचा जयजयकार केला. नंतर पाथरीकर मंडळीनी सर्वांना दक्षिणा दिल्यावर हा समारंभ पार पडला. शामराव चौधरींनी आपले पुरोहित आप्पादेव व आण्णादेव यांची अरणे म्हणण्याची इच्छा पूर्ण करण्याबद्दल महाराजांना

विनंती केली. ती महाराजांनी मान्य करून त्या दोघांना घेऊन महाराज गोपेगावी अरण्यात गेले. तेथे एका कडुलिंबाच्या झाडाखाली बसून १७ दिवस त्यांना अरणांची संथा सांगितली. नंतर जेथे संथा सांगितली ती जमीन गवत पसरून जाळून टाकली. याचे कारण महाराजांनी सांगितले की, 'या जागेवर कोणी गर्भिणी स्त्री, गाय, म्हैस आल्यास त्यांचा गर्भपात होईल म्हणून ही जमीन दग्ध केली आहे.' तो कडुलिंबाचा वृक्ष गोड झाला. लोक त्याचा पाला श्रद्धेने औषध म्हणून घेतात आणि त्याने त्यांचे रोगही कमी होतात. याला सर्व लोक 'दत्ताचा लिंब' असे म्हणतात व नवसही करतात. तेथे दत्तपादुका स्थापन करून गांडाबुवांस तेथे ठेवावे असे महाराजांच्या मनात प्रथम होते. पण त्या शेताच्या मालकाने परवानगी न दिल्यामुळे ते घडून आले नाही. नंतर गुंजगांवी गांडाबुवांना राहण्यास सांगितले. ते संन्यास घेऊन तेथे येऊन राहिले. तेथेच त्यांचे देहावसान झाले. तेथे पादुका स्थापन केल्या असून मोठे दत्तमंदिरही बांधले आहे. येथे मोठा उत्सव होत असतो. देऊळगाव-राजा येथील रंगनाथ पुराणिक यांना नाकातून रक्त पडण्याचा त्रास फार दिवस होता. त्यांनी मिरज वगैरे ठिकाणी जाऊन पुष्कळ उपचार केले, पण काहीच गुण न आल्याने ते उदास झाले होते, पण दैवयोगाने त्या भागात त्यांना महाराजांचे दर्शन झाले. त्यांची अवस्था ऐकून महाराजांनी त्यांना गंगावती नावाची वनस्पती दाखविली व तिचा रस नाकात घालण्यास सांगितले. तीन दिवसात त्या ब्राह्मणाचा तो दुर्धर रोग पूर्णपणे बरा झाला. महाराज गोपेगावाहून गोदावरीचे हृदयस्थान मंजिरथ या गावी आले. तेथे जमलेल्या सर्व वैदिक मंडळीनी महाराजांना विचारले, 'जटा,घन, क्रम इत्यादी रूपाने वेदमंत्र का म्हणावेत ?' ते ऐकून महाराज म्हणाले, 'जसे गाण्यामध्ये आलाप, ताना, एकाड, दुकाड वगैरे प्रकारांनी मनोरंजन होते. तसेच वेदमंत्राच्याही या निरनिराळ्या विकृतीच्या म्हणण्याने ईश्वराला संतोष होऊन ऐकणाऱ्यासही आनंद वाटतो. सामवेद गायन देवाला प्रिय आहे.' मंजीरथाहून उकडगावी वैशाख अखेरीस येऊन तेथे महाराजांनी दशाहार केला. नंतर राक्षसभुवनाजवळ पंचाळेश्वरी दर्शन करून महाराज

पैठणास आले. तेथे नाथांच्या मठातच भिक्षा झाली. तेथे नाथांनी मंदिर बांधून मूर्तीची प्रतिष्ठापना केली होती. पण त्या जागेवरून ती मूर्ति कोणी हलविली होती त्यामुळे पुन्हा त्या मूर्तीची प्रतिष्ठा बारा वर्षे होऊनही झाली नाही. महाराजांनी ती जागा स्वतः पाहिली व मूळ जागेतच काहीही फेरफार न करता मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यास सांगितले. तसे करताच ते काम निर्विघ्न होऊन मूर्तीही स्थिर झाली. महाराजांनी नाथमहाराजांचा अधिकार फार मोठा असल्याचे सांगितले. पैठणहून महाराज दौलताबादला आले. तेथे जनार्दनस्वामींचे दर्शन करून वेरूळ येथील ज्योतिर्लिंग घृष्णेश्वराचे दर्शन केले. तेथून कन्नड वगैरे ठिकाणी फिरून खानदेशात चाळीस गावाजवळ आले व गांडाबुवांना आज्ञा केली, 'अशा सारख्या फिरण्यात ब्रह्मदेवाचे आयुष्य मिळाले तरी ते संपेल आणि शेवटी पश्चात्ताप करावा लागेल. करिता तू भडोच शहरी राहून आत्मानात्म विवेकाचा अभ्यास कर. तू गेलास म्हणजे बाकीची मंडळी कंटाळून निघून जातील. तेथे उपाधी वाटल्यास अन्यत्र जा व एकांतात राहून वृत्ती शांत कर. आपण नर्मदातिरी निवाऱ्याची जागा मिळाल्यास चातुर्मास करू, नाहीतर पुढे कोठेतरी करू.' असे सांगताच गांडाबुवा महाराजांचे आज्ञेप्रमाणे महाराजांची प्रार्थना करून निघून गेले. महाराज पुढे तापीचे स्नान करून खेडीघाटला आले. तेथील परिचित मंडळींनी एक दिवस ठेवून घेतले. तेथून ते चिखलद्यास जाण्यास निघाले. वाटेत नर्मदातिरी धर्मपुरीस बिल्वामृतेश्वराच्या देवळांत येऊन मुक्काम केला. तो दिवस आषाढ शुद्ध द्वादशी हा होता. तेथे रात्री अकरा वाजेपर्यंत मंडळींबरोबर महाराजांचे बोलणे झाले. नंतर सर्व मंडळी देवालय बंद करून घरी गेली. महाराज एकटेच तेथे होते. दुसरे दिवशी सकाळी मंडळी मंदिराचे दरवाजे उघडून आत आली, पण तेथे त्यांना महाराज दिसले नाहीत. दाराला लावलेली कुलपे तशीच असता महाराज गेले कोठे म्हणून मंडळी शोध करीत असता दुसरे दिवशी बातमी समजली की, धर्मपुरीहून ५० मैलांवर चिखलदा या गावी महाराज दुसरे दिवशी सकाळीच येऊन पोचले आहेत. ही बातमी ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. नंतर महाराजांनी तो चातुर्मास

चिखलदा मुक्कामी केला.

चातुर्मास २२ चिखलदा – शके १८३४

चिखलदा हे गाव इंदूर संस्थानमध्ये आहे. नर्मदेच्या अलिकडे बढवाणी संस्थान आहे. तेथील राजे ठाकोरसाहेब महाराजांचे भक्त होते. पूर्वी शके १८२२ चा चातुर्मास महाराजांचा चिखलदा येथे झाला होता. तेथे महाराज येण्याबरोबर सर्व भक्तमंडळी जमली. पौर्णिमेस व्यासपूजा होऊन चातुर्मास सुरु झाला. तेथे नित्यक्रमाप्रमाणे रोज भाष्यपाठादि चालू होते. त्या प्रांतात त्यावेळी महामारी उपद्रव चालू होता. त्यामुळे तिकडे लोकांना जाण्यास बंदी असल्यामुळे गर्दी कमी झाली. त्यायोगाने महाराजांना काही विश्रांती मिळू लागली. चिखलद्यास गुरुपौर्णिमेचे दिवशी लोकांच्या स्वयंपाकाकरिता म्हणून नर्मदेच्या पुजाऱ्यांचे जागेत महाराजांनी एक छप्पर बांधविले. देवांच्या खजिन्यातून त्याकरिता खर्च केला. महाराजांचे पुढे येणारा पैसा हा 'देवांचा खजिना' होता. महाराज त्याला केर मानत असल्यामुळे त्या पैशावर मालकी देवाचीच होती. छप्पर बांधल्यावर देवांनी दृष्टांत देऊन महाराजांना सांगितले, 'आमच्या पैशातून बांधलेल्या छप्परात पुजाऱ्याने राहता कामा नये. तरी ते तू पाडून टाक.' महाराज म्हणाले की, 'आजचा दिवस जाऊ दे उद्या पाहू.' पण देवांस ते न पटून त्यांनी ते छप्पर रात्रीचे पाडून टाकले. महाराज चिखलद्यास आहेत हे समजताच सिद्धपुराहून धोंडोपंत कोपरकर यांना दर्शनास जावे असे वाटले. त्यांनी महाराजांना पत्राने आज्ञा मागितली, पण 'येथे येण्याचे फार त्रास पडतील तरी येऊ नका' असे महाराजांनी त्यांना कळविले. तरी दर्शनाच्या उत्कट इच्छेने धोंडोपंत सहकुटुंब चिखलद्यास जाण्याकरिता निघाले. बरोबर आणखीही काही मंडळी निघाली. इंदूरला सखारामशास्त्री टिल्लू भेटले. त्यांना हे वर्तमान समजताच तेही निघाले. मोरटक्का स्टेशनवर उतरले व तेथून नावेने तिसरे दिवशी चिखलद्यास पोचले. पण महामारीमुळे त्यांना गावात जाण्यास प्रतिबंध झाला. तेव्हा सर्व मंडळींना घाटावरच सोडून धोंडोपंत व सखारामशास्त्री गावात महाराजांचे दर्शनास

आले. त्यांना पाहताच महाराजांनी रागावून विचारले, 'पत्र मिळाले की नाही ?' धोंडोपंत म्हणाले 'पत्र मिळाले, पण दर्शनाची प्रबल इच्छा झाल्यामुळे आम्ही आलो. तरी क्षमा असावी.' महाराज म्हणाले, 'आता दर्शन झाले तर परत चला.' हे ऐकून सखारामशास्त्रींनी नमस्कार करून सांगितले, 'आज चार दिवस प्रवासात अन्न मिळाले नाही. आज प्रदोष, पुन्हा रस्त्यात कोठे सोडावा ?' हे ऐकून महाराज म्हणाले, 'बरे तर प्रदोष सोडून चला' याप्रमाणे ती वेळ निघून गेली. नंतर सर्व मंडळींनी प्रदोष सोडून विश्रांती घेतली. दुसरे दिवशी त्यांनी समाराधना केली. नंतर ती मंडळी काही दिवस तेथे होती. महामारी तेथे येऊन 'मला बळी पाहिजे, मी उपाशी आहे' असे महाराजांना म्हणाली असता महाराज म्हणाले की, 'तुला येथून गेले पाहिजे. तुझ्याकरिता सप्तशतीचे पाठ व हवन केले जाईल.' याप्रमाणे ते सुरु केल्यावर कोणासही महामारीचा त्रास झाला नाही. एका माणसाने भक्ति उत्पन्न होण्याचा उपाय विचारला असता महाराज म्हणाले, 'भक्तिमार्गाचे ग्रंथ - ज्ञानेश्वरी, भागवत, भक्तिविजय इत्यादि वाचल्याने मनःशुद्धि होऊन ईश्वरभक्ति मनात उत्पन्न होईल.' महाराजांनी एकदा तेलंगणातील गोष्ट सांगितली. एक विद्यार्थी दर्शनास आला व त्याला विचारले असता 'परीक्षेत उत्तम यश मिळावे म्हणून मी दर्शनास आलो' असे त्याने सांगितले. त्याच्या प्रथमा व मध्यमा अशा दोन परीक्षा झाल्या होत्या. त्याने भगवद्गीतेवरील मध्वाचार्य व रामानुजाचार्य यांची भाष्ये वाचली असून आता श्रीशंकराचार्यांचे वाचीत होता. त्याला विचारले, 'या तीनही मतात तुला कोणते मत पटले ?' पण त्याला काही उत्तर देता आले नाही. त्याला आपण एक गोष्ट सांगितली, एका गुरूकडे दोघे शिष्य अभ्यास करीत असताना त्यांना गुरूंनी एके दिवशी 'तत्वमसि' या महावाक्याचा अर्थ करण्यास सांगितले. तेव्हा एकाने 'तत् त्वं असि' म्हणजे 'ते ब्रह्मच तू आहेस' असा अद्वैतपर अर्थ केला व दुसऱ्याने 'तस्य त्वं असि' - 'त्या देवाचा तू (भक्त) आहेस' असा द्वैतपर अर्थ केला. हे ऐकून गुरूला आश्चर्य वाटले. पुष्कळ ग्रंथ वाचूनही मनातले द्वैत काही गेले नाही. अंतःकरण शुद्ध नसेल तर अध्ययन फुकट

आहे. अंतःकरणाची अशुद्धता कर्ममार्गाने घालविली म्हणजे खरे ज्ञान प्रकट होते. एकदा सकाळी भाष्याचा पाठ चालू होता, त्यावेळी बढवाणीचे राजे ठाकोरसाहेब दर्शनास आले असे आत नोकराने येऊन सांगितले. महाराजांनी निरोप पाठविला की, 'आता भाष्यपाठ चालू आहे. आता दर्शन होणार नाही.' पूर्ण निस्पृहतेचे हे उदाहरण आहे. एकदा कोठीच्या बाहेर एक मिरची दारात पडली होती. ती लगेच उचलून कोठीवाल्याकडे देऊन त्याला सांगितले की, 'ही दत्ताच्या कोठीतील मिरची वाया जाणे चांगले नाही.' व्यवहार व परमार्थ दोहोतही 'क्षणशःकणशैश्चव विद्यां वित्तंच साधयेत्' असे दक्षतेने वागले पाहिजे. यादृष्टीने एका मिरचीचाही संग्रह केला पाहिजे. चातुर्मास संपल्यावर महामारीचा त्रासही कमी झाला व नर्मदेचे पाणीही कमी झाले, त्यामुळे बरीच मंडळी सारखी येऊ लागली. पुष्कळ पैसा जमला. त्यातून लग्न, मुंज, व्रतोद्यापन अशी लोकांची अनेक कार्ये सारखी होत होती. रोज पक्वान्न भोजन चालू होते. मंडळी एकंदर किती जेवली याची तर गणतीच नाही. बढवाणीचे ठाकोरसाहेब स्वतः तेथील सर्व व्यवस्था पहात होते. तेथे एक ग्वाल्हेरची श्रीमंत सरदार घराण्यातील बाई अगदी निरभिमान वृत्तीने महाराजांच्या सेवेत निमग्न होती. त्यावेळी महाराज म्हणाले, 'अंगी नम्रपणा असला तरच मोठेपणा मिळतो !' चिखलद्यास ६-७ महिने महाराजांचे राहणे झाले. तेथून निघाल्यावर नर्मदाकिनारी कातरखेडा या गावी महाराज जात असता जिंतूरचे अग्निहोत्रबुवा वगैरे मंडळी रस्त्यात भेटली. त्यांना पहाताच महाराज म्हणाले, 'अग्निहोत्रीबुवा ! तुमची इच्छा गायत्रीपुरश्चरण करण्याची असेल तर ती लवकर पूर्ण करा, पण अन्नसंतर्पणात तुपाची कसर बिलकुल करू नका.' हे ऐकून अग्निहोत्रीबुवा म्हणाले, 'आपणाजवळ पैसा नाही तर हे कसे घडावे ?' महाराज म्हणाले, 'पैशाची काळजी नको. ते आपोआप त्यावेळी मिळतील आणि देवांच्या कार्यासाठी ऋण काढले तरी हरकत नाही. त्याची जबाबदारी देवांवर राहील.' हे ऐकून अग्निहोत्रीबुवा म्हणाले, 'आपल्या कृपेने अग्निनारायणाची सेवा निर्विघ्न चालू आहे. तसे हेही कार्य पार पडेल, पण

महाराजांनी या कार्याचे वेळी आले पाहिजे.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'येणे होईल. टाकळीकर दाजीबुवांना त्यावेळी बोलवावे. आज येथेच रहा. येथे डेहीसरकार येणार असल्याचे समजते. त्यांचेकडून पैशाची मदत होईल.' ते ऐकून अग्निहोत्रीबुवा म्हणाले, 'आपली कृपादृष्टी असली म्हणजे पुरे. राजांचे पैसे घेऊन हे कार्य आपण करू इच्छित नाही व देवकार्याकरिता आजपर्यंत कोणाजवळ याचनाही केली नाही. तशी या वेळीही करणार नाही.' हे त्यांचे बोलणे ऐकून महाराज प्रसन्न झाले व त्यांना घरी जाण्यास अनुज्ञा दिली. अग्निहोत्रीबुवा घरी येऊन दाजीबुवांना बोलावण्यास टाकळीस गेले व त्यांना महाराजांची आज्ञा सांगितली. त्यावेळी त्यांच्यावर एका दुष्ट माणसाने मारणप्रयोग केला असल्याने त्यांना रक्त पडत होते. ते म्हणाले, 'मला या दुखण्यातून महाराजांनी बरे केले तर मी येईन.' अग्निहोत्रीबुवांनी सांगितले, 'आपण दोघेही थोर पुरुष आहात. आपले हे संकट दूर होईल.' असे सांगून ते घरी गेले. पुढे चांगला मुहूर्त पाहून अग्निहोत्रीबुवांनी गायत्रीपुश्चरण सुरु केले व ते संपल्यावर हवनास आरंभ केला. दाजीबुवांची प्रकृति उत्तम बरी झाली असूनही त्यांनी जिंतूरास जाण्याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा ते स्नानसंध्या करीत बसले असताना एकदम त्यांचे दंडावर मार बसला व सांगणे झाले की, 'तुला बरे केले असता जिंतूरास का गेला नाहीस ?' हे ऐकताच तेथूनच एका वस्त्रानेच बावीस कोस पायी चालत दाजीबुवा पूर्णाहुतीचे दिवशी जिंतूरास पोचले. त्यावेळी महाराज कातरखेड्याचे अरण्यातून गरुडेश्वरास जात होते, पण दिलेले वचन पूर्ण करण्याकरिता दुसऱ्या रूपाने जिंतूरासही आले होते. त्यांना नमस्कार करून घडलेली सर्व हकीकत दाजीबुवांनी सांगितली. त्यावेळी सर्व मंडळींनी महाराजांचा जयजयकार केला. महाराजांचे आशीर्वादाने पैसा पुष्कळ मिळून तो समारंभ व्यवस्थित पार पडला. जिंतूरास दत्तपादुकांची स्थापना झाली आहे. महाराज चिखलद्याहून निघाले ते कातरखेडा येथील शूलपाणीश्वरास वंदन करून अरण्यातून गरुडेश्वराकडे निघाले. शूलपाणीश्वराचे जंगलात अश्वत्थामा वास करतो. ते फारच घोर अरण्य असून धड पाऊलवाट सुद्धा नाही. तेथून

जात असता एकदा एका भिल्लाने येऊन महाराजांना विचारले, 'आपणास कोठे जाणेच आहे ?' तेव्हा महाराज म्हणाले, 'गरुडेश्वरास.' तो म्हणाला, 'तर मग माझ्या पाठीमागून या,' असे सांगून तो चालू लागला व महाराज त्याचे पाठीमागून निघाले. गरुडेश्वर आल्यावर त्याने सांगितले, 'ते समोर मंदिर आहे तेथे चला,' असे सांगून तो निघाला. इतक्यात महाराजांना काही संशय येऊन त्यांनी त्या भिल्लास विचारले, 'तू कोण आहेस ते खरे सांग'. तेव्हा तो म्हणाला, 'मी अश्वत्थामा असून या जंगलात रहातो.' असे सांगून तो दिसेनासा झाला. नंतर महाराज गरुडेश्वराच्या देवळाच्या ओट्यावर येऊन उतरले. तो दिवस चैत्र वद्य षष्ठी शनिवार होता.

चातुर्मास २३ गरुडेश्वर – शके १८३५

गरुडेश्वर हा गाव नर्मदा किनाऱ्यावर असून तेथे भिल्ल जातीच्या लोकांचीच थोडीशी वस्ती आहे. नदीतून वहात आलेली लाकडे धरणे, मासे पकडणे हेच त्या लोकांचे उद्योग. एक दोन दुकाने आहेत. तिलकवाडा किंवा नांदोद येथून सर्व सामान आणावे लागते. गरुडेश्वर, नारदेश्वर, करोटेश्वर अशी लहान लहान मंदिरे येथे आहेत. येथे शंकरांचा प्रसाद होण्याकरिता गरुडाने तपश्चर्या केल्यामुळे या स्थानास गरुडेश्वर असे नांव पडले. येथे विष्णुपंत सोमण यांचे एक किराणा मालाचे दुकान होते. तेथे महाराज आले त्यावेळी त्यांची रहाण्याची सोय काहीच नव्हती. एक मनुष्य आत बसेल अशा नारदेश्वराच्या मंदिरात बसून महाराज अनुष्ठान करीत असत व बाहेर एका दगडावर निजत असत. फक्त विष्णुपंत सोमण यांचेकडेच माधुकरीची सोय होती. गरुडेश्वरी महाराज आहेत ही बातमी लवकरच सर्वत्र पसरली व दर्शनाकरिता मंडळींची ये-जा सुरू झाली. तेथे फार ऊन होते म्हणून मंडळींना बसण्याकरिता एक लहानसा मंडप घातला. रामशास्त्री प्रकाशकर वैशाख शु।। ७-८ से सुमारास दर्शनाकरिता आले. त्यांना महाराजांनी सांगितले, 'येथून आता आपले कोठे जाणे होणार नाही.' विष्णुपंत सोमणांच्या घरी जी भिक्षा मिळेल ती

खावी ७आणि मंडपात रहावे असा क्रम काही दिवस चालला. नंतर तेथे वासुदेवशास्त्री फणसे आले व ते रोज महाराजांना माधुकरी आणून देऊ लागले. गुजराथी माणसांकडील फळांची वगैरे भिक्षा घेत असत. धोंडोपंत कोपरकर काही दिवसांनी सहकुटुंब दर्शनास आले. त्यांनी फणसपोळी, मोहाचे नारळ, फणसाचे वाळलेले गरे असे पदार्थ आणले होते. त्यापैकी फणसपोळी तेवढी भिक्षेचे वेळी घेणेस ठेवून बाकी सर्व पदार्थ मंडळींना वाटून दिले. धोंडोपंत काही दिवस तेथेच राहिले. त्यांनी महाराजांचेकरिता एक झोपडी बांधली. त्यात अर्ध्या जागेत महाराज बसत व अर्ध्या जागेत सामान होते व स्वयंपाकही तेथे होत असे. या झोपडीस पर्णकुटी असे म्हणत. या जागेवर असलेला कडुलिंब १८३५ चैत्र प्रतिपदेस प्रसाद म्हणून त्याची पाने घेतल्यावर तो गोड झाला. नवीन बांधलेल्या पर्णकुटीची वास्तुशांति वैशाख शुद्ध एकादशीस झाली. मंडळी जास्त येऊ लागली हे पाहून परशुरामभाई कुबेर इंजिनियर यांनी स्वयंपाकाकरिता निराळी जागा बांधली. गरुडेश्वरी एक साधु लिंबाचे झाडाखाली रहात होते. कोठीतून जे काही मिळे तेवढ्यातच समाधान मानून ते रहात असत. महाराजांचे समाधीकालापर्यंत ते तेथे रहात होते. त्यांनी कोणाकडेही याचना केली नाही. मंडळींना त्यांच्या अधिकारा-प्रमाणे कोणाला गीताभाष्य, कोणाला दत्तभावसुधारस इत्यादि विषय समजून देण्याचा महाराजांचा क्रम सुरू झाला. सकाळी श्रीदत्तमूर्तीवर लघुरुद्राभिषेक वगैरे यथासंभव होत असे. तेथे रहाण्याकरिता परगांवच्या एक दोन बायकाही आल्यामुळे महाराजांना ती घरची भिक्षेचीही सोय झाली. महाराज फक्त वऱ्याची भाकरी, भात, ताक, भेंड्याची किंवा सुरणाची आळणी भाजी इतकेच भिक्षेचे वेळी घेत. फळाच्या पुष्कळ करंड्या रोज येत असूनही तिकडे महाराजांनी ढुंकूनही पाहिले नाही. संध्याकाळी काही विषय समजावून सांगत. रात्री महाराजांचे समोरच भजन होत होते. भजन झाल्यावर सर्व मंडळींना हरभऱ्याच्या किंवा मुगाच्या डाळीची पोटभर उसळ, सांजा, फळे वगैरे मिळत असे. तेथे रात्री स्वयंपाक नसल्याने ही अशी व्यवस्था केली होती. तेथे सत्यदत्तपूजा

पुष्कळ होत असत. त्याकरिता गुळाचा सांजा, सवा मणाचा करण्याची पद्धत होती. बडोदा वगैरे ठिकाणची बरीच मंडळी येऊ लागली. तेव्हा एका बाजूस पत्रे टाकून ५-५० मंडळींस बसण्याकरिता निवाऱ्याची जागा केली. तेथे जमणाऱ्या मंडळींनी एकचित्ताने मानापमान सोडून सर्व कामे करावीत. कोणी पाणी आणावे, कोणी लाकडे जमवावीत, कोणी पळसाची पाने आणून पत्रावळी कराव्यात, कोणी स्वयंपाक करावा. श्रीदत्तप्रभूंचा नैवेद्य झाल्यावर सर्वांचे जेवण होत असे. स्वयंपाकाकरिता कढया असत. पुढे पुढे तर रोज ३-४ शे पान होऊ लागले. पुढे येणाऱ्या पैशातून सर्व खर्च चालत असे. रोज पोळ्या व कधीतरी पक्कान करीत असत. 'आज अमुक मंडळी येणार आहेत, अशा पद्धतीचा स्वयंपाक करा' असे महाराज सकाळीच सांगत असत. मंडळी दुपारी बारा एकच्या सुमारास येत असत. शृंगेरीहून ब्रह्मानंदतीर्थ व नीलूर मठातून ब्रह्मानंद सरस्वती गरुडेश्वरी आले. त्या दोघांनीही तेथेच महाराजांचे बरोबर चातुर्मास केला. ब्रह्मानंदतीर्थ अधिकारी होते. त्यांचा व महाराजांचा परिचय नव्हता. ब्रह्मानंदसरस्वतींचा परिचय पूर्वीच झालेला होता. त्यांनी महाराजांनी तुमचे बरोबर एकदा चातुर्मास करू असे सांगितले होते. त्याप्रमाणे हा योग आला. ग्वाल्हेरचे बळवंतराव भागवत गोकर्णास नोकरीस होते. त्यांना ब्रह्मानंद तीर्थांचेकडून संन्यास देववून दंड देवविला. त्यांचे प्रद्युम्नानंदतीर्थ असे नाव ठेवले. पाऊस फार लागल्यामुळे नर्मदेचे पाणी फारच चढले. त्यामुळे लोक चिंताक्रांत होऊन महाराजांचेकडे आले व हे संकट त्यांचे कानावर घातले. ते ऐकल्याबरोबर महाराज दंड घेऊन नर्मदेवर आले व प्रार्थना केली की, 'माते ! आता आपला पूर येऊ नये. नाहीतर आपल्या भक्तांना त्रास होईल.' असे बोलून नर्मदाजलास महाराजांनी आपला दंड लावला. तो दंड स्पर्श होण्याबरोबर पाणी ओसरू लागले. श्रावण महिन्यांत धोंडोपंत कोपरकर पुन्हा दर्शनास आले. नर्मदेला त्यावेळी बराच मोठा पूर आला होता. चांदोदपासून तिलकवाडचास येण्याकरिता ४०-५० मंडळी नावेत चढली. पण पाण्याला जोर असल्यामुळे नाव चढेना. उलटते की काय अशी भीति वाटू

लागली. तेव्हा धोंडोपंतांनी व सर्वांनी महाराजांची प्रार्थना केल्याबरोबर नाव प्रवाहातून वर चढून गरुडेश्वरास पोचली. सर्व मंडळींनी येऊन साष्टांग नमस्कार घातले. त्यांना पहाताच महाराज म्हणाले, 'नाव बुडते असे समजल्याबरोबर देवाची प्रार्थना केली होती.' धोंडोपंत म्हणाले, 'नाव खाली जाऊ लागताच आपली प्रार्थना करून आपल्या नावाचा जयघोष केला, त्यामुळे आजचा अपघात टळला.' मुंबईच्या एका पारशाचा मुलगा वाईट संगतीने बिघडून पैसा घालवू लागला. पुढे पुढे त्याला देहाचीही शुद्धी राहिली नाही. त्याचे आईबाप गरुडेश्वरी येऊन त्यांनी ही मुलाची गोष्ट महाराजांना सांगितली. महाराजांनी एक यंत्र करून देऊन ते त्या मुलाचे हातात बांधण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी ते यंत्र मुलाचे हातात बांधल्यावर तो हळूहळू सन्मार्गाला लागून व्यापारधंदा पाहू लागला. काही मुसलमानही रोगार्त होऊन महाराजांचेकडे आले असता त्यांना औषध व कुराणातील मंत्र सांगून महाराजांनी बरे केले. भडोचहून मणिभाई उमरेडकर यांचा एकुलता एक मुलगा गणपती भ्रमिष्ट होऊन गरुडेश्वरी दर्शनाकरिता आला. महाराजांनी त्याच्याकडे नुसते कृपादृष्टीने पहाताच तो उत्तम बरा होऊन घरी गेला. भडोच येथील एक भोळसट ब्राह्मण गुरुपौर्णिमेचे दिवशी महाराजांचे दर्शन घेण्याकरिता निघाला. चांदोद येथे आल्यावर एका ब्राह्मणाने त्याला बोलण्यात गुंतवून त्याची गरुडेश्वरी जाण्याची नाव चुकविली. तेव्हा तेथे महाराजांनी प्रकट होऊन त्याला दर्शन दिले व त्याची पूजा घेऊन त्याला प्रासाद दिला. हेच महाराज असे मात्र त्याने ओळखले नाही. तो तेथूनच परत भडोचला गेला. त्याने महाराजांचा फोटो पाहिला तेव्हा त्याची खात्री झाली की, आपण ज्यांची पूजा केली ते हेच महाराज. नंतर तो गरुडेश्वरी आला. तेथे महाराजांना प्रत्यक्ष पाहिल्याबरोबर त्याला अतिशय आनंद झाला. नवसारीचा एक पारशी तेथे येऊन त्याने 'आपणास एक जिंद अन्नाचा घाससुद्धा खाऊ देत नाहीं. काल मात्र आपले दर्शन करून जेवणास बसताच अन्न पोटात गेले. करिता मी आपणास सोडीत नाही.' असे त्याने सांगताच महाराजांनी त्याला एक यंत्र करून देऊन त्या पीडेतून मुक्त केले. तेथे पारसी लोक

बरेच येत असत. बडोद्याहून श्रीसिद्धनाथाचे मंदिरातील महत श्रीगणपतीबुवा मंडळींसह दर्शनार्थ आले होते. तेथे महाराजांना नमस्कार करून त्यांनी आपल्या मनात काही विचार आणले. ते जाणून महाराज लगेच म्हणाले, 'इकडे येताना आपणास अश्वत्थामा भेटला व त्याच्याबरोबर काही संभाषणाचाही योग आला.' हे ऐकून गणपतिबुवा म्हणाले, 'हीच गोष्ट मी आपणास विचारणार होतो.' याप्रमाणे मनातले विचार महाराजांनी सांगितलेले पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटले.

बडोदे येथील डॉक्टर चिंतामणराव गोळे यांची संतती वाचत नव्हती. पाच सहा मुले गेली. शेवटी एक मुलगा झाला. पण त्यालाही अपस्माराने पछाडले. पुष्कळ उपाय झाले पण गुण येईना. तेव्हा त्यांनी गरुडेश्वरी धोंडोपंतांना महाराजांचा अंगारा पाठविण्यास लिहिले. त्याप्रमाणे महाराजांनी अंगारा अभिमंत्रण करून दिला. तो त्या मुलाला लावताच तो मुलगा उत्तम बरा झाला. एक बाई महाराजांचे दर्शनास आली. दर्शनाचे वेळी पुढे नारळ ठेवून पाया पडत असता तिची नथ खाली पडली. पण त्यावेळी तिला ते समजले नाही. सायंकाळी तिला नथेची एकदम आठवण झाली. पुष्कळ शोध करूनही कोठे सापडेना. तेव्हा त्या बाईने महाराजांचेकडे येऊन नथेची वार्ता सांगितली आणि प्रश्नोत्तरी पहा असे महाराजांना ती म्हणाली. महाराजांनी सांगितले 'प्रसादाचा नारळ फोडला म्हणजे नथ मिळेल' असे ऐकताच तिने घरी येऊन तो नारळ फोडला तोच त्या नारळातून ती नथ बाहेर पडली. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. भाविक लोकांचेकरिता महाराजांनी, आत्मानात्मविचार व चित्तसद्बोधनक्षत्रमाला हे प्राकृत ग्रंथ तयार केले. याप्रमाणे वागणारास ती पुस्तके दिली जात. दत्तभावसुधारस म्हणून गुरुचरित्रातील सर्व कथा घेऊन केलेले स्तोत्र रोज म्हणण्यासाठी दिले जात असे. सावंतवाडीचे रामभाऊ सबनीसांचे चिरंजीव बडोदा स्टेटमध्ये अधिकारी होते. ते श्रावणामासात महाराजांचे दर्शनास आले. त्यांना आल्याबरोबर 'डोक्यावरचे केस काढल्याशिवाय दर्शन होणार नाही' असे कळविल्या-मुळे ते केस काढून शेंडी ठेवून दर्शनास आले. तेथे राहण्यास विशेष जागा

नसल्यामुळे सकाळी उठून परत जावे असे त्यांनी ठरवून रात्रीच महाराजांची अनुज्ञा घेऊन ठेवली. सकाळी सर्व मंडळींसह सबनीस निघाले. त्यावेळी नारदेश्वर मंदिरांत नित्याप्रमाणे भाष्यपाठ चालू होता. सबनीसांच्या मंडळींना असे वाटले की, जाताना आपण तीर्थप्रसाद घेऊन जावे. निघण्याची वेळ आली होती, इतक्यात महाराजांचेकडून एक मनुष्य तीर्थप्रसाद घेऊन आला व त्याने सांगितले, 'पाठ सुरू असताना महाराजांना एकदम आठवण झाली म्हणून त्यांनी हा तीर्थप्रसाद पाठविला आहे.' तो तीर्थप्रसाद घेऊन सर्वांना गहिवरून आले. मुंबईस आनंदराव रामकृष्णराव तालचेरकर यांची नात कुमारी इंदिराबाई यांचा साखरपुडा इंदूरचे महाराज श्रीमंत सवाई तुकोजीराव होळकर यांचेबरोबर शके १८३४ मध्ये इंदूरलाच झाला. पुढे इंदूरचे महाराज युरोपच्या सफरीस गेले, त्यामुळे लग्नाचे काही निश्चित झाले नव्हते. अशा स्थितीत दहा अकरा महिने गेले. त्यावेळी वरील गृहस्थाच्या सूनबाई कृष्णाबाई तालचेरकर यांनी आपली भाची कु. इंदिराबाई हिचे टिप्पण वाडीचे महाराज दत्तात्रेय पुजारी यांचेमार्फत महाराजांचेकडे पाठविले. महाराजांनी टिप्पण पाहून कळविले, 'यात राजयोग दिसत नाही.' तेव्हा नारायण दत्तात्रेयांनी लिहिले, 'मुलीचे टिप्पण गुरुमहाराजांचे हातात गेले म्हणजे हे लग्न होणारच अशी आमची भावना आहे. तरी कृपा व्हावी.' तेव्हा शेवटी महाराजांनी लिहिले, 'मुलीकडून निष्काम शिवाराधना व्हावी' व 'देवेंद्राणि नमस्तुभ्यं' या मंत्राचा जप करावा. 'मार्गशीर्ष मासात कार्य होईल' असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे इंदूरचे महाराज दोन तीन महिन्यातच परदेशातून येऊन मार्गशीर्ष शुद्ध दशमी सोमवार शके १८३५ या दिवशी कु. इंदिराबाईंबरोबर राजेसाहेबांनी विवाह केला. नंतर त्यांचे नाव सौ. महाराणी साहेब इंदिराबाई होळकर असे पडले. महाराजांचे ठिकाणी यांची निष्ठा फार मोठी आहे. गरुडेश्वर येथे यांनी नर्मदेस घाट बांधला आहे. माणगांव, कुरुगड्डी, कारंजा इत्यादि स्थानांतूनही अनेक देणग्या देऊन गुरुमहाराजांची शुद्ध भावाने सेवा केलेली आहे. रोज रात्री भजन संपल्यावर प्रसाद वाटला जाई. एकदा रात्री सबनीस तेथे होते.

मंडळी ३-४ शे होती. प्रसादाचे भांडे लहान होते. हा प्रसाद सर्वांना कसा पुरेल अशी शंका सबनीसांना आली. प्रसाद वाटण्याचे काम सुरू झाले. सर्वांना प्रसाद वाटून झाल्यावर ते भांडे महाराजांचे समोर आणून ठेवले. तेव्हा महाराज म्हणाले, 'त्याचे झाकण काढा, पाहू किती प्रसाद राहिला आहे ? आत अद्यापि बायकांना वाटावयाचा आहे.' ते ऐकून त्या माणसाने प्रसादाच्या भांड्यावरील झाकण काढले. त्यावेळी सबनीसांनी त्या भांड्यात पाहिले तो ते अद्यापि अर्धे अधिक भरलेले दिसून आले. कृष्णजयंतीस उत्सव करण्याकरिता जागा साफ करण्याचे काम सुरु झाले. महाराज स्वतः जाऊन जागा साफ करू लागले. मग काय विचारावे ? सर्व मंडळी जमून त्यांनी ती जागा अल्पकाळात साफ करून बैठक घातली. दोन ग्यासच्या बत्त्या लावल्या. कीर्तन झाल्यावर भजन सुरु झाले. इतक्यात नर्मदेच्या पलिकडे पाऊस पडू लागल्याचे दिसले. आता हा पाऊस इकडेही येऊन मध्येच भजन थांबवावे लागणार असे वाटून सबनीस वगैरे मंडळी चिंतातूर झाली. महाराजांनी सहज एकदा आकाशाकडे पाहिले आणि सांगितले, 'पावसाची धास्ती नको, भजन चालू द्या.' नंतर भजन संपवून मंडळी पर्णकुटीत आली आणि कृष्णजन्म झाला. इतक्यात जोराचा पाऊस सुरू झाला. तेव्हा महाराज म्हणाले, 'सबनीस ! हा घ्या मघाचा पाऊस.' ते चरित्र पाहून सबनीस थक्क झाले.

एकदा एक ब्राह्मण महाराजांचे दर्शनास आला. ज्वरामुळे तो अशक्त झाला होता. काही दिवसांनी तो निघाला. तेव्हा महाराज त्याला म्हणाले, 'तुम्हाला लांब जावयाचे आहे, तरी थोडे साबुदाणे बरोबर घ्या, तुम्हाला सबनीस साबुदाणे देतील.' बाहेर सबनीस बसले होते त्यांनी हे शब्द ऐकले. तेव्हा त्यांना चिंता उत्पन्न झाली की, आता या ब्राह्मणाला येथे साबुदाणे कोठून द्यावेत अशा काळजीत ते असता गरुडेश्वर तालुक्याचे अव्वल कारकून त्यांना भेटण्याकरिता आले. ते बोलता बोलता सहज म्हणाले, 'या कुग्रामात महाराजांचे वास्तव्य झाल्यापासून सर्व जिन्नस आमच्या घरी आम्हाला भरपूर मिळू लागले, आता एका मुंबईच्या गृहस्थाने जाताना साबुदाणे ठेवून दिले.' हे वाक्य ऐकताच सबनीसांना

आश्चर्य वाटून त्यांनी लगेच ते साबुदाणे आणवून त्या ब्राह्मणास दिले. बडोदा येथील विठ्ठल सोनाराने दत्तमूर्ति करून आणली. तिची प्रतिष्ठापना रामचंद्रशास्त्री प्रकाशकर यांनी चार ब्राह्मणांसह आश्विन शुद्ध ९ रोजी धोंडोपंत कोपरकर यांचे हस्ते करविली. नंतर ब्राह्मणद्वारा पूजा अर्चा सुरु झाली. पर्णकुटीत लहानशा सिंहासनावर ती मूर्ती ठेवली होती. वाडीप्रमाणेच त्रिकाल पूजा वगैरे सुरु झाली. तिचा संस्कार झाला नव्हता. म्हणून देवांच्या सांगण्यावरून यथाविधी अर्चा केली. देवांपुढे येणारे विशिष्ट द्रव्य माणगांवप्रमाणेच नरसोबाचे वाडीस पाठविले जाई. एकदा द्वादशीस भिक्षा आणून महाराज पारायण करण्यास बसले. इतक्यात एका सुवासिनीने महाराजांच्या पत्रावळीवर पटकन् लिंबाची फोड वाढली. तेव्हा लगेच महाराज उठून म्हणाले, 'या मुलीला संन्याशांचे नियम माहीत नाहीत असे दिसते. बरे असो.' नंतर हात पाय धुऊन आचमन करून आसनावर येऊन बसताच मंडळींची प्रश्नोत्तरे सुरू झाली. दोन दिवसांचा उपवास होऊनही मुद्रा निर्विकार होती. मंडळींच्या आग्रहामुळे एक लाकडी पेलाभर ताक तेवढे घेतले.

एकदा दोघे पतीपत्नी महाराजांचे दर्शनास आली होती. त्यापैकी बाईस महाराजांचा उपदेश घ्यावा अशी इच्छा होऊन तिने महाराजांना विनंती केली. तेव्हा महाराज थट्टेने म्हणाले, 'तुम्हाला उपदेश देणे बरोबर नाही, कारण तुम्ही जप करताना यजमान आले तर त्यांना सांगाल, चुलीवरचे अन्न वाढून घ्या.' असे म्हणताच तो नवराही म्हणाला की ही असाच मला त्रास देते. असो. असा महाराजांचा स्वभावही विनोदी होता. शेवटी त्या बाईस उपदेश मिळाला नाही. एके दिवशी श्रीदत्तमूर्तीची स्थापना केलेल्या जागी एक साप निघाला. तेव्हा महाराज सर्वांना म्हणाले, 'तुम्ही सर्व बाहेर जाऊन झोपा नाही तर रात्री मध्येच आपणाला उठवून सर्पदंशावर उपाय करण्यास सांगाल.' असे सांगून नंतर महाराजांनी त्या सर्पावर तांदूळ मंत्रून टाकले व 'तू कोणाच्या दृष्टीस पडू नको' असे सांगितले. तेथेच सर्व निजले. दुसरे दिवशी संध्याकाळी गीताप्रवचन चालू असता पुन्हा त्या सापाची गडबड सुरु झाली. तेव्हा त्याच्याजवळ जाऊन

महाराज त्या सापाला म्हणाले, 'अरे ! येथे तुझी गडबड नको. गीताप्रवचन सुरू आहे. तू येथून निघून जा.' हे ऐकताच त्या मंडळींच्या मधून तो साप बाहेर निघून गेला. बाहेर लोक त्याला मारण्यास धावले, पण महाराजांनी सांगितले, 'त्याला मारू नका, वाटल्यास नर्मदेवर नेऊन सोडा.' त्याप्रमाणे त्या सापाला नर्मदाप्रवाहात सोडून दिले. महाराजांच्यापुढे जमणारे द्रव्य तेथेच एका डब्यात घालून ठेवलेले असे. त्यातून सर्व सामान, धान्य वगैरे आणले जात असे. महाराज स्वतःद्रव्यास कधीच स्पर्श करीत नसत. एकदा धान्य पाठविणाऱ्या माणसास पैसे देऊन झाल्यावर त्या पेटीत तीनच रुपये राहिले. मंडळी तर रोज दोनतीनशे पर्यंत सहज असत. शेवटी ती गोष्ट सबनीसांनी महाराजांना सांगताच ते म्हणाले की, 'देवांच्या इच्छेने सर्व व्यवस्था होईल. काळजी कशाला ? पैसा नाहीच आला तर नर्मदेचे पाणी तर भरपूर आहे ना ?' हे ऐकून सबनीस स्वस्थ बसले. पुन्हा ८-१० दिवसांनी 'त्या सामान पाठविणारास पैसे द्या.' असे महाराजांनी सबनीसांना सांगताच सबनीसांनी ती पैशाची पेटी उघडली, तो आत सबंध पेटीभर सोन्याच्या गिन्या पसरलेल्या आहेत असे त्यांना दिसून आले. ते पाहून सबनीसांना आश्चर्य वाटले. महाराज वऱ्हाड भागांत असताना एकदा तिकडील अंबादास भाके या गृहस्थाच्या शेतांतून गेले. त्यामुळे त्यांच्या शेतांतून भरपूर उत्पन्न आले. ते पाहून त्या नवरा-बायकोची भक्ति महाराजांचेवर बसली. ते त्यावेळी गरुडेश्वरी आले व एकदम तीन हजार रूपयांच्या गिन्या महाराजांचेपुढे ठेवून गेले. त्यांना महाराज 'मालिक' असे म्हणत. 'कागदावर रामनाम लिहून तो कागद पिठाच्या गोळीत घालावा व अशा गोळ्या माशांना घालाव्यात', असे त्यांना महाराजांनी सांगितले होते. त्याप्रमाणे ते नित्य करीत असत. एकदा एक इंग्रजी पद्धतीने शिकलेले सुधारक विद्वान गृहस्थ येऊन महाराजांना म्हणाले, 'मी फार लांबून आलो आहे, मला काही वेदांतात शंका असल्याने त्यांच्या निरसनार्थ मी येथे आलो आहे.' ते ऐकून महाराज म्हणाले, 'इतके लांब कशाला आलात ? बाहेरून जरी तुम्ही सभ्य दिसत असला तरी आतून पूर्ण नास्तिक आहात. तुमचे जानवे तुटलेले आहे हे

सुद्धा तुम्हाला कळत नाही.' हे ऐकून त्याने कपडे काढून पाहिले तर खरोखरच जानवे दोन ठिकाणी तुटलेले दिसले. त्याने लगेच आपली चूक कबूल करून महाराजांची क्षमा मागितली. महाराज त्यांना म्हणाले, 'यथाविधी प्रायश्चित्त घेऊन धार्मिक आचरण पाळू लागल्यावर इकडे या.' असे बोलून त्यांना प्रसाद दिला व जाण्यास सांगितले. एकदा एक गुजराथी ब्राह्मण आपल्या वीस-बावीस वर्षांच्या मुलीला बेशुद्ध स्थितीत तेथे घेऊन आला व त्याने सांगितले, 'आज तीन दिवस ही बेशुद्ध स्थितीत आहे, तरी या त्रासातून हिची दया करून मुक्तता करा.'हे त्याचे बोलणे ऐकून महाराजांनी चालू असलेले प्रवचन बंद करून आपल्या कमंडलूंतील पाणी तिच्या अंगावर टाकले. त्याबरोबर ती मुलगी उठून बसून बोलू लागली. त्या पिशाच्चाने सर्व कारण सांगितले. नंतर महाराज तिच्या बापाला म्हणाले, 'तुम्ही हिला चांगल्या मांत्रिकाकडे घेऊन चला. हे काम सोडून आपणास बरेच दिवस झाले व तशी साधनेही आपल्याजवळ नाहीत. मांत्रिक लवकरच भेटेल. तोपर्यंत या मुलीला कोणतीही भीति नाही इतकी व्यवस्था केली आहे.' हे ऐकून तो मनुष्य मुलीला घेऊन निघून गेला. गुरुद्वादशीचा उत्सव या ठिकाणी फारच मोठ्या प्रमाणात झाला. लघुरुद्र पुष्कळ झाले. हजारो मंडळी जेवली. श्रीमंतांकडूनही अशी व्यवस्था होणार नाही. महाराज स्वतः पंक्तींत हिंडून सर्वांना 'स्वस्थपणे जेवा' असे सांगत होते. त्यादिवशी सर्व भोजन करणाऱ्यांना दक्षिणा दिली. एकदा सकाळी भाष्यपाठ संपल्यावर महाराज म्हणाले, आजपर्यंत जो प्रत्यक्ष उपदेश केला व ग्रंथ लिहिले त्या सर्वांचे सार आज सांगावयाचे आहे. 'मुक्तीचा लाभ करून घेणे हे मनुष्यजन्माचे मुख्य कर्तव्य आहे. त्याकरिता प्रथम मन स्थिर व्हावे या उद्देशाने वर्णाश्रमविहित धर्माचे यथाशास्त्र आचरण झाले पाहिजे. वेदांताचे श्रवण, मनन व निदिध्यासन नित्य करावे. मुख्यतः श्रवणाकडे अधिक लक्ष द्यावे. त्यामुळे मनातील आसक्ति कमी होईल. सात्विक प्रवृत्तीनेच मानवांची उन्नति होते. सात्विक प्रवृत्ती होण्याकरिता आहार हा हित, मित, मेध्य म्हणजे पवित्र असण्याकडे लक्ष दिले पाहिजे. आपली प्रकृती सात्विक

झाली हे ओळखण्याची खूण अशी की, 'स्वधर्मावर दृढ श्रद्धा, स्नानसंध्या, देवपूजा, पंचमहायज्ञ वेळेवर करणे, अतिथीसत्कार, गोसेवा, कथा, कीर्तन, भजन, पुराण यांचे श्रवण, सर्वांबरोबर गोड बोलणे, दुसऱ्याचे नुकसान होईल असे न वागणे, मातापितरांची सेवा करणे, स्त्रियांनीही सासरी राहून सासूसासरा व इतरही वडील माणसे यांच्या आज्ञेत पतीची दृढनिष्ठेने सेवा करणे इत्यादि गुण आपल्यामध्ये येणे, म्हणजे आपली प्रकृति सात्विक बनल्याची चिन्हे आहेत. उदरनिर्वाहाकरिता व्यापार, शेती, नोकरी, कोणताही धंदा केला तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञापालन हे कधीही सोडू नये. स्वकर्म केले तरच अंतःकरण शुद्ध होते. अंतःकरण शुद्ध झाले तर उपासना स्थिर होते, उपासना स्थिर झाली तर मनाला शांति मिळते आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो.' याप्रमाणे उपदेश करून महाराजांनी सात ज्ञानभूमिकाही सुंदर रीतीने समजावून सांगितल्या आणि 'हे सर्व थोडक्यांत सांगितले आहे, याप्रमाणे जो वागेल तो पूर्ण सुखी होईल' असे शेवटी सांगितले. एकदा गडी भांडी घासण्याकरिता नर्मदेवर गेला त्यावेळी एक मोठे पातेले त्याच्या हातातून सुटून प्रवाहाबरोबर वाहात जाऊ लागले. ते कळविताच महाराज नदीतीरावर येऊन म्हणाले, 'नर्मदामातेला हे पातेले घेऊन काय करावयाचे आहे ? बाल गोपाळांच्या जेवणाचा खोळंबा ती कशाला करील?' इतके महाराज बोलत आहेत इतक्यात ते पातेले लाटांच्या धक्याने हळूहळू महाराजांच्या पायाजवळ येऊ लागले. नर्मदामातेनेच ते आणून दिले. बडोदा येथील गणपती मंदिराचे महंत दर्शनास आले होते ते परत निघाले. त्यादिवशी संकष्टी असल्याने महाराज त्यांना म्हणाले की, 'तुम्ही रात्री संकष्टी सोडून जा, आता दुपारीच जाऊ नका. हाल होतील.' हे ऐकूनही ते न थांबता निघून गेले. त्यांना तिलकवाडचास पोहोचण्यासच रात्री दहा अकरा वाजले. त्याच दिवशी सबनीसही दुपारी निघणार होते, पण संकष्टीचे पारणे करून जाण्यास त्यांना सांगितल्यावरून ते राहिले. रात्री चंद्रोदयानंतर जेवण करून निघाले ते दहा अकरा वाजता

तिलक-वाड्यास पोहोचले. त्यावेळी महंत नुकतेच पोहोचून लाकडे गोळा करीत होते. त्यांनी वाटेत हाल झाल्याचे सांगितले. सबनीस म्हणाले, 'महाराजांच्या वचनाचा अवमान केल्याचे हे फळ आहे.' नंतर सबनीसांना ताबडतोब पन्हई मिळून ते दुसरे दिवशी कामावर हजरही झाले. महंतांना बडोद्यास पोचण्यास तीन दिवस लागले. गरुडेश्वरी दिवाळीचा उत्सव मोठ्या थाटात झाला. नदीतीरावर मोठे भांडे ठेवून पाणी तापविले. महाराजांना ऊन पाण्याचा त्रास होतो म्हणून सर्वांनी अत्तराच्या कुप्या महाराजांच्या पायावर ओतल्या व अंगासही अत्तर लावले. सर्व मंडळींना जोडप्यांनी अभ्यंगस्नान घालावयास लावून महाराज ते कौतुक पहात उभे राहिले. नंतर सर्व मंडळी नारदेश्वराचे दर्शनास गेली. तेथे आलेल्या पंधरा सुवासिनींना खण व लुगडी देवविली. त्याप्रमाणे पाच दिवस दिवाळी थाटात पार पडली. बडोद्यास एका श्रीमंत बाईचा मुलगा आजारी पडला. तिला पूर्वी महाराजांनी जप सांगितला होता. त्या बाईने आपला नोकर पाठवून मुलाची हकिकत कळविली असता महाराजांनी सांगितले, 'तिला पूर्वी सांगितलेला जपच तिने करावा म्हणजे मुलास बरे वाटेल; पण जपास रुद्राक्षाची माळ न घेता स्फटिकाची घ्यावी.' हे महाराजांचे बोलणे त्या नोकराने येऊन यजमानीण बाईस सांगितले. आपण रुद्राक्षाची माळ जपास घेतो हे महाराजांना कसे समजले असे तिला वाटले. नंतर ती स्फटिकाच्या माळेने जप करू लागली. तो मुलगा बरा झाला. दत्तजयंतीचा उत्सवही मोठ्या प्रमाणावर झाला. दोन-तीन हजारांवर मंडळी जमली होती. याप्रमाणे रोज अनेक मंडळी दर्शनास येऊन महाराजांचे कृपेने कृतकार्य होऊन जात होती. याप्रमाणे क्रम चालू असता शके १८३६ वैशाख महिन्यांत महाराजांच्या मूळच्या अतिसार रोगाने उचल खाल्ली व शरीर दिवसेदिवस क्षीण होत चालले. हे समजताच महाराजांना आराम पडण्याकरिता नरसोबाचे वाडीस पुजाऱ्यांनी देवावर संततधार अनुष्ठान सुरू केले; पण हे महाराजांना समजताच त्यांनी वाडीस कळविले, 'उगाच देवाला त्रास देऊ नका. हे शरीर अल्पावधीत पडणार आहे.' महाराजांनी देवाला विचारले, 'येथील मूर्तीची व्यवस्था

काय करावयाची ?' देवांनी सांगितले, 'आम्हाला येथेच रहावयाचे आहे. मूर्ति कोठेही पाठवू नये.' अशी आज्ञा झाल्यापासून देवांपुढे येणारा विषय वाडीस पाठविण्याचे बंद झाले. शेवटी महिनाभर महाराज पडूनच होते. पत्रोत्तरेही दुसऱ्याकडून लिहावीत. वैशाख अमावास्येस लळीत नावाचे उत्तम ज्योतिषी महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांना विचारताच त्यांनी सांगितले, 'महाराजांना ज्येष्ठ महिना फार वाईट आहे. तो निभावला तर प्रकृतीस आराम पडेल.' रामशास्त्री प्रकाशकर, धोंडोपंत कोपरकर इत्यादि मंडळी सेवेसाठी होती. महाराज नेहमी ध्यानांत निमग्न असत. सबंध दिवसातून ५-१० वाक्येच बोलत. केव्हा केव्हा पुष्कळ बोलत. त्या स्थानाची काहीतरी व्यवस्था व्हावी या उद्देशाने ब्रह्मानंदस्वामींनी तेथे एक पंचकमेटी नेमून दिली. यात १ श्रीनृसिंहसरस्वती, अध्यक्ष; २ रामचंद्र विठ्ठल अधिकारी, उपाध्यक्ष; ३ परशुराम कुबेरराम भट, कोषाध्यक्ष; ४ अमृतराव पुरुषोत्तम सबनीस, ५ लक्ष्मीशंकर हरिगोविंददास ठाणेकर, ६ प्रद्युम्नानंद तीर्थ हे तीन व्यवस्थापक अशी मंडळी होती. मंडळींनी महाराजांना औषध घेण्याबद्दल विनंती केली, पण महाराज म्हणाले, 'हा देह लवकरच सोडून जावयाचे आहे, करिता औषधाचे कारण नाही. शंकराचार्य बत्तीस वर्षेच राहिले, त्या मानाने हे शरीर जास्ती टिकले. या देहाला दोन वेळा सर्पदंश, तीन वेळा महामारी, एक वेळा संनिपात, एक वेळा प्लेग, दोन वेळा महाव्याधी, दोन वेळा कोड इतके रोग उत्पन्न झाले. संग्रहणी तर कायमचीच आहे. त्यावेळी कोणी औषध दिले ? जन्मापासून ज्या वैद्याला धरले आहे तो वैद्य यावेळीही आहेच. त्याची इच्छा असेल तसे होईल.' असे सांगून भीष्माचार्यांनी शेवटी म्हटलेले श्लोक सर्वांना म्हणून दाखविले. प्रथम महाराजांचा निर्वाणाचा समय ज्येष्ठ वद्य ८ हा होता. पण त्यादिवशी जाण्याची महाराजांची इच्छा नव्हती. म्हणून अष्टमी केव्हा लागणार ते विचारून, दुसऱ्याच्या सहाय्याने महाराज उठून समाधि लावून तीन तास बसले. नंतर देहभानावर आल्यावर महाराजांनी सांगितले 'आजचा निर्वाणाचा प्रसंग होता, पण तो टळला.'

दिवसेदिवस क्षीणता वाढत चालली. वेदना फार होत होत्या. शरीरात उष्णता इतकी वाढली की, शरीरावर सारखे थंडगार पाणी शिंपडावे लागे. तरी मुखाने 'दत्त दत्त' म्हणत व इतरांनाही दत्तनाम घेण्यास सांगत. ज्येष्ठ वद्य १४ स धोंडोपंतांना बोलावून सांगितले, 'उपनिर्दिष्ट मंत्राचा जप रोज १२०० करीत जा. गुरुद्वादशी, दत्तजयंती व गुरुप्रतिपदा हे उत्सव करून यथाशक्ति ब्राह्मण भोजन घालावे. त्यायोगाने अंत:करणशुद्धी होऊन कैवल्यपद मिळेल.' असे सांगून आपल्या अंगावरची छाटी काढून त्यांना दिली. धोंडोपंतांनी सद्गदित अंत:करणाने चरणी मस्तक ठेवून तो प्रसाद घेतला. ज्येष्ठ वद्य अमावास्येस फारच क्षीणता आली. नरसोबावाडीचे पुजारी अप्पाशास्त्री जेरे यांना जवळ बोलावून 'पूर्वी गृहस्थाश्रमात आपल्यावर आभिचारिक प्रयोग केल्याचे सांगितले व आपणांस त्याचा प्रतिकार करण्याची इच्छा नाही' असेही सांगितले. त्या शेवटच्या दिवशी सुद्धा नित्यकर्म करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. पण आचमनाचे पाणीच हातात राहीना. ते पाहून 'देवांची इच्छा' असे म्हणून स्वस्थ राहिले. 'आज अमावास्या संपल्यावर हा स्थूल देह सोडावयाचा आहे' असे सांगितले होते. अमावास्या संपून प्रतिपदा लागताच महाराज सिद्धासन घालून बसले. प्रथम पूर्वाभिमुख बसले होते, पण देवाकडे पाठ होते म्हणून पश्चिमेकडे देवांसमोर मुख केले. देवाकडे पाहून त्राटक केले व श्वासनिरोध करून दीर्घ प्रणवोच्चार करीत देहाचे विसर्जन केले आणि महाराज ब्रह्मरूपी लीन झाले. त्यावेळी आषाढ शुद्ध प्रतिपदा, मंगळवार, आर्द्रा नक्षत्र, उत्तरायण होते. रात्री सुमारे अकरा वाजण्याचा समय होता. सर्वांना गुरुमाऊलीच्या चिरवियोगाने अत्यंत दु:ख झाले. दुसरे दिवशी सकाळी महाराजांच्या देहावर सर्वांनी पवमान, पुरुषसूक्त, रुद्र इत्यादी मंत्रांनी अभिषेक केला. षोंडशोपचारे पूजा केली. बेल, तुळशी, फुले, इत्यादिकांच्या माळा गळ्यात घातल्या व पुष्पासनावर बसवून वाजत गाजत नर्मदातीरावर नेले. तेथेही पूजा करून नैवेद्य, फल, तांबूल, दक्षिणा समर्पण केली, दंडाचे तीन तुकडे करून मांडीवर ठेवले. कमंडलूस मध्ये भोक पाडून तो कमरेस बांधला. दोरांनी घट्ट बांधून कलेवर वर येऊ नये

म्हणून दगड बांधले आणि ते परमपवित्र मंगल शरीर शेवटी नर्मदामातेच्या जलांत सोडून दिले. नंतर सर्व मंडळी श्रीगुरुस्मरण करीत परत आली. याप्रमाणे श्रीगुरुदेवांचे चरित्र साररूपाने संकलित केलेले श्रीगुरुचरणी समर्पित होवो, हीच प्रार्थना !

त्वयि भक्तिं मे वर्धय दुर्हृत्तम् ईश नाशय अशेषम् ।
यच्च तवेष्टं तत्कुरु मयि भोः सर्वज्ञ वक्तुमसमर्थः ।।१।।

श्रीगुरुचरणारविंदार्पणमस्तु ! श्रीगुरुदेवदत्त !!

श्री. पां. अनगरे, जामनगर यांचेकडून आलेली हकीकत :

गुरुवर्य गरुडेश्वरी असतांना एक प्रसंग असा झाला की माझे मामा, मावशी व मातोश्री बसले असता आयुष्याच्या गोष्टी चालू होत्या. तेव्हा आमच्या मातोश्रींनी विचारले, 'महाराज आपण दुसऱ्यांचे आयुष्य किती आहे ते सांगता तर माझे आयुष्य किती आहे ते सांगा पाहू ?' हे ऐकून महाराज म्हणाले, 'तुझ्या मुलाच्या १६ व्या वर्षी तुझा मृत्यु आहे.' त्यावर मातोश्री म्हणाल्या, 'असे जर असेल तर मुलगा दिलात कशाला ? त्याच काय सुख मी पाहणार ? नसता दिला तर बरे होते. मुलाचा संसार मी काय पाहणार ?' त्यावर गुरुवर्य म्हणाले, 'तुझी इच्छा असेल तर तसे होईल. परंतु शेवटचे एक वर्ष तुला त्रास सोसावा लागेल. कबूल आहे ?' मातोश्रींनी हो म्हणताच 'दुसरी १६ वर्षे तुला देतो. ह्या मुलाच्या ३२ व्या वर्षी तुझा मृत्यू होईल. पण त्यापूर्वी एक वर्ष तुला वैधव्य येऊन वर्षभर आजारपण काढावे लागेल.' त्याचप्रमाणे शेवटी घडलेही खरे.

१९३८ च्या ३ मार्चला माझे वडील स्वर्गस्थ झाले. त्यानंतर वर्षानंतर आजारपणात मातोश्रींचा देहान्त झाला. माझे मामा श्री. बाळकृष्ण आत्माराम करंजगांवकर ह्यांची मुलगी गंगूताई बाळकृष्ण करंजगांवकर हिचे लग्न वयाच्या १७ व्या वर्षी श्री. शंकरराव विठ्ठल देशपांडे ह्यांच्याशी झाले. देशपांडे मंडळी अति नास्तिक व संत पुरुषांच्या वचनांचा अव्हेर करणारी होती. त्याचा परिणाम गंगूताईस भोगावा लागला व अजूनही भोगत आहे. एके वेळी गंगूताईच्या लग्नानंतर वर्षा सव्वा वर्षानंतर एकदा महाराजांशी सहज बोलताना आमच्या मावशी गं.भा.वेणूबाई ह्यांनी श्रींना सांगितले, ''महाराज आपण नर्मदेला जसा मुलगा दिला तसा गंगूला पण मुलगा द्या ना.'' ह्यावर महाराज म्हणाले, ''वेणूबाई नर्मदेच्या लग्नाला तर बरीच वर्षे झाली होती. गंगूच्या लग्नास अजून वर्ष सव्वा वर्षच झाले आहे. त्या कारणाने ह्यावेळी तो प्रश्नच अयोग्य आहे. तरी पण आत्ताच्या तुमच्या प्रश्नावरून प्रश्न कुंडलीत असे दिसत आहे की, गंगूच्या नशिबात एक मुलगा आहे. पण तो बापाच्या मुळावर आहे. त्या कारणाने पुत्रजन्मानंतर सहा महिनेपर्यंत मुलाच्या

बापाने मुलाचे तोंड पाहता कामा नये. जर सहा महिन्याच्या आत त्याने मुलाचे तोंड पाहिले तर वर्षाच्या आत मुलीला- गंगूताईला वैधव्य येईल.'' ही हकीकत मला आमच्या मातोश्री जेव्हा महाराजांच्या पायावर घालावयास घेऊन गेल्या होत्या त्यावेळची आहे. १९१३ साली ज्यावेळी श्रींचे वास्तव्य गरुडेश्वरी झाले तेव्हा त्यानंतर गंगूताईस मुलगा झाल्यावर मुलाच्या बारशासाठी शंकररावांच्या वडिलांना आमंत्रण देण्यात आले व त्यांना स्पष्ट सांगितले, 'महाराजांची आज्ञा सध्या शंकररावांनी मुलाचे तोंड न पहाण्याची आहे. जर त्यांनी सहा महिन्याच्या आत मुलाचे तोंड पाहिले तर त्याचे परिणाम चांगले होणार नाहीत.' परंतु त्यांनी ते न ऐकता महाराजांच्या वचनांचा अव्हेर केला व मुद्दाम शंकररावांना बारशासाठी पाठवले व घरात कोणी नसताना एकदा त्यांनी मुलाला पाळण्यातून उचलून घेतले.त्यावर गंगूताई त्यांना फार रागावली व म्हणाली, 'ह्याचे परिणाम चांगले होणार नाहीत. हे तुम्ही काय केले ?' त्यानंतर यथायोग्य वेळी गंगूताई सासरी गेली. पुढे चार-पाच महिन्यांतच श्री. शंकरराव ह्यांना क्षय झाला व वर्षाच्या आतच त्यांचा अंत झाला. अशा रितीने श्रींच्या शब्दांचा अनादर केल्याने गंगूताईस वैधव्य आले. मुलाची शांत झाल्यावर बापाने मुलाचे तोंड पहावे अशी महाराजांची आज्ञा होती व ती सहा महिन्यांच्या आत करावी असे सांगितले होते. पण मंडळी नास्तिक असल्याकारणाने सर्व घात झाला. गंगूताईचा मुलगा चिंतामण शंकर देशपांडे. त्याचे लग्न झाल्यावर व एक कन्या झाल्यावर त्याचाही क्षयातच शेवट झाला. महाराजांच्या आशीर्वादाने माझा पुढे बऱ्याच मोठमोठ्या राजे लोकांचा परिचय झाला. जोधपूर, बिकानेर, म्हैसूर, अल्वार, पोरबंदर, जामनगर, भावनगर वगैरे राजे लोकांकडे चांगलाच सन्मान झाला व म्हैसूर महाराजांकडून तीन सव्वा तीन तोळे सोन्यात मढविलेले पाचूचे शिवलिंग मला बक्षिस मिळाले आहे. ज्याच्या आजूबाजूस माणिक, हिरे व मोती आहेत व १९३२ मध्ये ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स (ग्वालीयर) मध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदकही मिळाले आहे.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामिमहाराज

स्मृति सौरभ

गुरो तुझी ही पदवारिधारा। ध्रुवो सदा कायिक दोष सारा।।
सदैव माझे मन, वाणि शुद्ध। करो तुझे नाम पवित्र सिद्ध।।



जितेन्द्रियगणाग्रणेरभिरतः परे ब्रह्मणि।
कलौ श्रुति पथावनेऽव्रितनयोऽवतीर्णः स्वयम्।।
करात्त सुकमण्डलुः कुमतखण्डने दण्डभृत्।
प्रदप्रणतवत्सलो जयति वासुदेवो यतिः।।

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

मंगल आशीर्वाद

गुरो तुझी ही पदवारिधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ।
सदैव माझे मन, वाणि शुद्ध । करो तुझे नाम पवित्र सिद्ध ।।१।।

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांचे जीवनचरित्र अथांग सागराप्रमाणे आहे. ते जेवढे मानवी बुद्धीच्या आवाक्यात येईल तेवढेच प्रकाशात येत असते. त्यांच्या जीवनातील सर्व घटनाप्रसंग ज्ञात होणे अशक्य आहे. मिळालेल्या माहितीतून प्रकाशित झालेल्या चरित्रावरून त्यांच्या विविध अलौकिक दैवीगुणांचा बोध होतो.

संत महात्म्यांच्या चरित्रातून सर्वही जीवांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणे नित्य मार्गदर्शन आणि सत्कर्माच्या प्रेरणा मिळत असतात. ''काय वानु आता संतांचे उपकार। मज निरंतर जागविती'' हे शब्द कृतज्ञतेने व्यक्त झाले आहेत.

श्री वासुदेव निवास प्रकाशनातर्फे ''प. प. श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज - स्मृति सौरभ'' ही छोटी पुस्तिका प्रकाशित होत आहे; ही श्रीस्वामिमहाराजांचीच कृपा आहे. यामध्ये श्रीस्वामिमहाराजांच्या चिखलदा भेटीतील घटना, प्रसंगांची विशेष माहिती आली आहे. ही माहिती प्रथमच प्रकाशात येत आहे.

या पुस्तिकेच्या वाचनाने सर्व भक्तांची श्रद्धा-भक्ती वाढून मनुष्य-जीवनाचे कल्याण व्हावे अशी श्रीदत्तप्रभूंच्या चरणी प्रार्थना आहे.

श्रीगुरुकृपाश्रित
दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर

श्रीवासुदेवनिवास
पुणे-४
मार्गशीर्ष शु.१५ श्रीदत्तजयंती
शके १९१४

॥ श्रीगुरुःशरणम्॥

प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज ''स्मृति सौरभ'' संबंधी

प्राक्कथन

अ. सि. पोटभरे

श्रीवासुदेवनिवास प्रकाशन

पुणे

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्।
मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मुक्तिमूलं गुरोः कृपा॥

श्रीसद्गुरु महाराजांचे पुण्यतिथी प्रसंगी त्यांचे गुरुदेव प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज यांच्या काही अप्रकाशित स्मृति श्रीवासुदेवनिवास प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्याचा सुयोग येत आहे. श्री स्वामी महाराजांचा 'स्मृतिसौरभ' सर्वांच्या चित्ताला प्रसन्नता देणारा आहे.

श्रीस्वामिमहाराजांचे भारतभ्रमण, वाङ्मय निर्मिती ही स्वच्छंदाने झालेली नसून श्रीदत्तछंदाने झालेली आहे म्हणून स्वामिकार्य अलौकिक ईश्वरीकार्य - जनमांगल्यवर्धिनी - झालेली आहेत.

श्रीस्वामींचा शिष्यपरिवार भारतभर पसरलेला आहे. त्यांच्या कृपेने कृतार्थ झालेले असंख्य भक्त अज्ञात आहेत. त्यांचे भ्रमण एकट्याने होत असल्याने त्यांच्यासंबंधी साकल्याने माहिती एकत्र करणेही असंभव आहे. तरी त्यांचा कीर्तिसुगंध आसेतु-हिमाचल दरवळत राहिला आहे. योगायोगाने म्हणजे ईश्वरीयोजनेच्या कृपेने श्रीस्वामिमहाराजांच्या सहवासात राहिलेल्या कै. गंगाधर अण्णाजी वैद्य, निसरपूर, मध्य प्रदेश यांचे, स्वामींसंबंधी लिहून ठेवलेले बाड, पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे हाती ४-५ महिन्यापूर्वी आले. ते पू. श्रीदत्तमहाराजांनी वाचून पाहिल्यावर त्यांना त्यातील अनेक घटना अज्ञात असल्याचे जाणवले. एकूण सर्व लेखनावरून त्यातील स्थल-काल-व्यक्तींच्या संदर्भावरून लेखन वास्तव नि सत्य असल्याची खात्री झाली. या लेखनामधील अप्रकाशित भाग प्रकाशित व्हावा हा मनाशी संकल्प झाला.

हे लेखन मोडीमध्ये असल्याने प्रथम ते बाळबोध लिपीत लिहून काढण्याचे काम मोडीलिपी जाणणाऱ्या गुरुभक्तांकडे सोपविले. यामध्ये गुरुभक्त श्री. आबा देशपांडे, वकील श्री. माधवराव पानसे आणि श्री. रामभाऊ देशपांडे, निवृत्त जिल्हा पोलीस उप-अधिक्षक यांनी परस्पर सहकार्याने हे कार्य अल्पावधीत पूर्ण केले. ही माहिती वाचून सर्वचजण श्रीस्वामिमहाराजांच्या अलौकिक गुणांनी प्रभावित झाले. श्रीस्वामि-महाराजांचे अलौकिकत्वाला ही सत्य घटनांची माहिती पुष्टीवर्धक व श्रद्धाभक्ती निर्माण करणारी असल्याने प्रकाशित करावी असे ठरले आणि आज या पुण्यदिवशी हा सुयोगही श्रीगुरुकृपेने आला आहे.

या लेखनातील माहितीच्या संदर्भात स्पष्टीकरण म्हणून पुढील माहिती देत आहे -

'श्रीगुरुदेवचरित्र' या श्री स्वामींच्या संक्षिप्त जीवनचरित्रात कै. श्री. बाळाभाऊ वैद्य, निसरपूर या स्वामीभक्ताचा उल्लेख - आठवणी आलेल्या आहेत. त्यांचे बंधू कै. गंगाधर अण्णाजी वैद्य महमदपूरकर, निसरपूर जिल्हा धार, मध्यप्रदेश यांनाही श्री स्वामींचा सत्संग आणि अनुग्रह प्राप्त झालेला होता. या कै. गंगाधरपंतांनी लिहून ठेवलेल्या आठवणी आहेत. यातील सर्व संदर्भस्थलांची व कालाची माहिती निर्विवाद सत्य व सुसंगत आहे. अशी माहिती आपल्याकडे स्वत:हून आली, याचेच आश्चर्य वाटते. सर्व ईश्वरीयोजना असतात हेच सत्य !

निसरपूर आणि चिखलदा एकाच तालुक्यातील जावळची गावे. चिखलदा नर्मदाकाठी म्हणून श्रीस्वामिमहाराजांचा तेथे चातुर्मास मुक्काम बराच काल घडून झाला. महाराज चिखलद्याला प्रथम इ.स. १८९८ मध्ये तिलकवाड्याचा ८ वा चातुर्मास संपवून अश्विन महिन्याचे शेवटी गेले. तेथे चैत्र शुद्धपक्षापर्यंत म्हणजे सुमारे पांच महिने राहिले. ही त्यांची चिखलद्यास चातुर्मास विरहित पहिली मोठी भेट. येथून महाराज द्वारकेकडे चातुर्मासासाठी गेले.

नंतर इ.स. १९०० मध्ये श्रीस्वामिमहाराज चातुर्मासानिमित्त चिखलदा येथे ज्येष्ठ व. (३०) अमावास्येला आले. म्हणजे द्वारकेचा

चातुर्मास झाल्यावर त्या भागात हिंडून परत जाताना येथे आले. द्वारकेचा ९ वा चातुर्मास झाला आणि १० व्या चातुर्मासासाठी चिखलद्यास आले, ही चिखलद्याची दुसरी भेट. यावेळी येथे चातुर्मासानंतर आश्विन वद्य १२ पर्यंत मुक्काम करून पुढे नर्मदा किनाऱ्याने धरमपूरी - महेश्वरक्षेत्र मंडलेश्वर येथे गेले. म्हणजे स्वामी महाराजांची ही नर्मदा प्रदक्षिणा चालू असल्याचे स्पष्ट होते.

चिखलद्यास स्वामिमहाराजांची तिसरी भेट इ.स. १९१२-१३ मध्ये झाली. त्यावेळीही येथे चातुर्मासानिमित्त राहिले होते. म्हणजे चिखलद्यास स्वामींचे दोन चातुर्मास झाले. यावेळी आषाढाचे प्रारंभी आले व चातुर्मास संपल्यानंतर पुढे माघ वद्य पक्षापर्यंत चिखलद्यास राहून पुढे गरुडेश्वराकडे प्रस्थान केले.

लेखनातील 'संवत्' हे विक्रम संवत् आहेत. ते इसवीसनापेक्षा ५७ ने अधिक आहेत (इ.स.+ ५७ = संवत्)

हे सर्व उल्लेख या लेखनात सुसंगत आलेले आहेत. या तीनही वेळी स्वामींचा सत्संग लाभलेले कै. गंगाधरपंत असल्याने ही माहिती वास्तवपूर्ण व प्रत्यक्ष अनुभवलेली अशी आली आहे. मूळ लेखनामध्ये घटना प्रसंगांना शीर्षके नव्हती ती लेख संपादित करताना घालून - माहितीला मुद्देसूद करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. बाकी मूळ लेखनात कुठेही बदल करण्याची आवश्यकता वाटली नाही.

लेखाच्या प्रारंभी दिलेल्या श्रीस्वामिमहाराजांच्या जन्मकुंडलीसंबंधी खुलासा करीत आहे.

कै. गंगाधरपंत वैद्य यांच्या बाडात श्रीस्वामींची फक्त कुंडली आली आहे. त्यासंबंधी वर्णन वगैरे नाही. पण योगायोग असा की याच काळात श्रीक्षेत्र नृसिंहवाडीच्या एका स्वामीभक्ताने त्याचे संग्रही असलेले श्रीस्वामींच्या कुंडलीचे व त्या कुंडलीचे तत्कालीन जाणकार ज्योतिषाने - शास्त्रीय भाषेत वर्णन केलेले कागद पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचेकडे आणून दिले. हे प्रकरणही या 'स्मृति-सौरभात' प्रारंभी देण्याविषयी पू. श्री दत्तमहाराज यांनी सुचविल्यावरून प्रारंभी दिले आहे.

कै. गंगाधरपंत यांनी पाठविलेल्या व या दुसऱ्या आलेल्या कुंडलीत शुक्र ग्रहाचे स्थानात बदल आहे. पहिल्या कुंडलीत शुक्र सप्तमात दाखविला आहे तर दुसऱ्या कुंडलीत अष्टमात दाखविला आहे. वाचकांपैकी ज्योतिषशास्त्र जाणकार यादृष्टीने कुंडलीचा अभ्यास करू शकतील. महापुरुषांच्या कुंडल्यांचा अभ्यास ज्योतिषास्त्र जिज्ञासूंना उपयुक्त असल्याने आणि सामान्य वाचकांनी फलिताचे कुतुहल म्हणून दिलेल्या कुंडलीचे वाचन करावे.

गुरुभक्त श्री प्रकाश जनार्दन जोशी हे बार्शीच्या श्री दादाशास्त्री जोशींचे सुपुत्र यांनी या पुस्तक प्रकाशनास केलेले सहकार्य उल्लेखनीय आहे.

'स्मृति सौरभ' पुस्तिकेला सहाय्यभूत झालेल्या स्वामीभक्तांचा उल्लेख केला नसला तरी प्रकाशन संस्थेला त्याची जाणीव आहे. या सर्वांबद्दल श्रीवासुदेवनिवास विश्वस्त आणि तदंगभूत श्रीवासुदेव निवास प्रकाशन कृतज्ञ आहे.

अ. सि. पोटभरे
श्रीवासुदेवनिवास प्रकाशनातर्फे

॥ श्री ॥

श्रीसद्गुरु परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती

जन्मकालः

गुरु पारिजातगत:
शनी उत्तमगत:
आत्मकारक गुरु:
जन्मस्थान-माणगांव
संस्थान सावंतवाडी
समाधीकाल-
शके १८३६
ज्येष्ठ व.३०
मंगळवार रात्रौ
ता.२४-६-१९१४
समाधिस्थान -
गरुडेश्वर (गुजरात)



लग्न ८/१८/४६
दिनमान ३१/४०
पश्चिमनतं ९/२०
उन्नत २०/४०
दशमभाव ५/२१/४२
सर्वर्क्ष ६१/४
भोग्य ५६/२४

तात्कालिक निरयन ग्रहा: लग्नं च -

रवि ३/२८°/२८	चंद्र ०/१°/४५
मंगळ ५/२९°/०	बुध ३/१२°/३३
गुरु ८/२९°/७	शुक्र ३/३°/१४
शनि १/२३°/४३	राहू १/५°/२

उपरिनिर्दिष्ट विभूति-कुंडलीत सुकृतादि द्योतक स्पष्ट योग कोणते आहेत याचा विचार संक्षेपाने करणेचा आहे. लग्नी परिहाशउदित आहे व कारकेश वर्गोत्तमी लग्नी आहे म्हणून 'सर्वज्ञ: स्याद्वेदशास्त्राधिकारी जीवेल्लोके सप्ततिर्वत्सराणां' या न्यायाने गुरु, वेद वेदान्त वेत्ता, सर्वांना कळेल अशी माहिती देणे, नियमित वर्तन, खडखडित वैराग्ययुक्त होते.

अहौ वा हारे वा, बलवति रिपौ वा सुहृदि वा ।
मणौ वा लोष्टे वा, कुसुमशयने वा दृशदि वा ।।
तृणे वा स्त्रैणे वा, ममसमदृशो यान्ति दिवसाः ।
सदा पुण्येऽरण्ये, शिवशिव शिवेति प्रजपतः ।।१।।

- सुभाषित रत्नभाण्डागार,
शांतरसनिर्देश, श्लोक ४२

अर्थ - सर्प असो किंवा पुष्पहार, बलवान् शत्रु अगर जिवलग मित्र असो, रत्नलाभ किंवा मातीचे ढेकूळ मिळो, पुष्पशय्या किंवा खडकावर निजावे लागो, जग कस्पटसदृश असो किंवा स्त्रीलंपटासम मोहक भासो,

सर्वत्र समदृष्टी (निर्विकार) असलेल्या (अशा) माझा एकंदर काळ (दिवस) शिव, शिव असा शिवनाम-जप करण्यातच (अत्यंत सुखोल्लासाने) जातो.

चित्तैकाग्र्य, धर्मिष्ठ, शास्त्रीय ज्ञानाचे शोध लावणे, सूत्रात्मक ग्रंथांची व्याख्या करणे इत्यादि 'गुरुणा सर्ववित्, ग्रंथकृच्च' यांचे हातून प्रासादिक गुरुचरित्र, ज्ञानबोधादि ग्रंथ जनतेस मार्गदर्शक निर्माण झाले. चंद्र उपासनस्थानात देवतानक्षत्री आहे. त्यामुळे ईश्वर-साक्षात्कारी, आत्मज्ञानी, ध्यानात निमग्न होऊन चमत्कार पाहणे साध्य होते. 'सदा योगाभ्यासव्यसनवशगोरात्ममनसोरविच्छिन्ना मैत्रीस्फुरति।'

चंद्र - सांख्ययोगशास्त्रज्ञ: भौमदृष्ट आहे; म्हणून ज्योति:शास्त्रवेत्ता - तद्वत् पंचपाक्षिक ग्रंथ सूत्रात्मक निर्माण झाला. थोर विभूतिकडे लोकांचा मार्ग नित्य (स्वत:ची अडचणी निवारणाचे उपायार्थ) शिलशिलाट असे. हा योग चंद्रापासून शनि द्वितीय म्हणून आहे. ''पुरग्रामस्थिताशेषै: पूजितो गुणवान् सुधी:। निपुण: सर्वकार्येषु चंद्राद्वित्तगते शनौ.'' सम्राटयोग (प्रव्रज्यायोग) - जन्मेशोन्यैर्यद्यष्टोर्कपुत्रं पश्यत्यन्यैर्जन्मपं वा बलोनं। दीक्षां प्राप्नोति॥

भौम निर्बल असून शनीशी त्रिकोण योग स्वदीप्तांशात केला आहे, व गुरु लग्नी वर्गोत्तमी आहे. गुरु परमहंसयोग सुचवितो व भौमही प्रव्रज्यायोग दाखवितो. केतु १२ वा अपवर्गद आहे. रक्तपट धारण, त्रिदंड, भगवद्भक्त हातावर अगर पायावर श्रीवृक्षचक्रादि रैखिक चक्र-विद्या, विनोद, तपबलसंपन्न (पूर्वजन्मी ऋषी असून) या जन्मी सत्तीर्थादि पुण्यकर्मोपभोग घेऊन शनीने मिथुन राशीवर येऊन रविला साडेसाती केली त्यावेळी अष्टम राशि चर उत्तर दिशेस प्रभू व चंद्राची आहे. तद्वत् स्वजन्मगावापासून उत्तरेस सोमोद्भवा नदी - नर्मदा नदी - तीरी रविक्षेत्री - शंकर (गरुडेश्वरी). सदर विभूति पुण्यपापनिर्मुक्त होऊन अन्ते निर्वाणं (गेली) प्राप। इति शम्॥

२

श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज स्मृति-सौरभ

।। श्री दत्त ।।

श्रीमान् सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती
कर्ता कारयिता स वै, तस्य सर्वमिदं खलु ।

प्रवेश

पक्षी हा आकाशाचा अंत लावण्याचे मनात आणील, तर ते घडणे शक्य नसते, त्याप्रमाणे श्री. प. प. भगवान् वासुदेवानंदसरस्वती स्वामि महाराजांचे चरित्र संपूर्ण माहिती मिळवून समजून घेणे अशक्य आहे. पण पक्षी यथाशक्ती आकाशात उंच गमन करितात त्या न्यायाने स्वामि-महाराजांचे चरित्र भक्तांकडून श्रवण केलेले, स्वत: अवलोकन केलेले आणि स्वामिमहाराजांच्या मुखाने ऐकिले ते, सांप्रत जेवढे स्मृतीत राहिले ते येथे नमूद केले आहे.

दि. ८-७-१९३४ इसवीचे इंदूरहून श्री. रा. रा. वासुदेव वामन ठाकुर साहेबांकडून पत्र आले त्यावरून हे चरित्र लिहिण्याचे काम करण्याची प्रवृत्ती झाली, हा ठाकुरसाहेबांचा उपकार मानणे अवश्य आहे.

हा स्मृतिसंग्रह लिहून ठेवणारा मी गंगाधर अण्णाजी वैद्य महंमद-पूरकर, मुक्काम निसरपूर, जिल्हा धार, मध्यप्रदेश. पू. स्वामींचा सहवास व मार्गदर्शनही लाभलेला एक सामान्य स्वामीभक्त. माझे बंधू ति. बाळाभाऊंचा व पू. स्वामिमहाराजांचा संबंध विशेष आला. त्यांना स्वामींकडून योगाचे खूप मार्गदर्शन झाले होते. त्यांचा उल्लेख श्रीगुरुदेवचरित्रात आला आहे. या स्मृतिंमध्ये सुद्धा त्यांचा उल्लेख ठिकठिकाणी आला आहे. मी ही सर्व माहिती अनुभवलेली, पाहिलेली व प्रत्यक्ष संबंध आलेल्या व्यक्तींकडून ऐकलेली आहे. मी लेखक नसल्याने सर्व माहिती एकापुढे एक अशी लिहीत आहे. या स्मृतिलेखनामुळे मी अन्त:करणाने श्रीस्वामींचा सहवास अनुभवीत आहे.

३

चिखलद्यास प्रथम आगमन
विपरीत करणी (शीर्षासन) चा लाभ

इ.स. १८९८ चा चातुर्मास पेटलावद येथे स्वामिमहाराजांनी करून नंतर चिखलदा येथे येण्यास निघाले. येताना मार्गात एका गावी मुक्काम केला. तेथील एका ब्राह्मणास पोटशूळाचा आजार होता. अन्न धकत नसे. तो ब्राह्मण व त्याची आई अशी दोघेच माणसे असून घरी बरीच गरिबी होती. स्वामिमहाराजांकडे तो ब्राह्मण आला व स्वत:चे कष्ट निवेदन करून विचारल्यावर 'विपरित करणी' योगातील एक क्रिया आहे, ती करण्याचे समजावून दिले व आपल्यासमक्ष ती त्याच्याकडून करवून 'नित्य याप्रमाणे एक घटका करीत जा' अशी त्याला आज्ञा दिली. ही क्रिया केल्याने त्या ब्राह्मणाचे लवकरच पोट दुखणे बंद झाले व दिवसेंदिवस त्याची क्षुधा वाढू लागली. ज्याला अर्धी भाकर सोसत नव्हती तो या उपायाने दीड दोन भाकरी प्रत्येकवेळी खाऊ लागला. तेव्हा त्या ब्राह्मणाची आई स्वामिमहाराजांजवळ येऊन वंदन करून सांगू लागली, 'महाराज, माझे मुलाचे पोटात काय ठेविले आहे की त्यामुळे त्या मुलाला प्रत्येकवेळी दोन दोन भाकरी खावयास पुरत नाहीत. त्याला मी इतके अन्न कोठून आणून खाऊ घालावे ?' हे भाषण ऐकल्यावर स्वामिमहाराजांस हसू आले व त्यांनी त्या ब्राह्मणीच्या मुलाला 'यानंतर विपरीत करणी करू नको' अशी आज्ञा दिली. थोड्या दिवसांनी क्रमाने हळूहळू तो ब्राह्मण मुलगा नेहमीच्या आहारावर आला व रोगमुक्त झालाच.

स्वामिमहाराजांनी विपरीत करणीचा अभ्यास केला होता. एक प्रहर म्हणजे तीन तास पावेतो विपरीत करणीचा अभ्यास केल्याने जठराग्नीची वृद्धी होते, जरा आलेली नष्ट होऊन अमृताचे प्राशन करावयास मिळून मृत्यूचे हरण करणारीही आहे. स्वामी महाराज म्हणाले, 'आपण विपरीत करणीचा अभ्यास करीत असताना अन्न खावयास जास्त लागे व शौचास

थोडे व तेही तिसऱ्या दिवशी व्हावे.' स्नानाचे पूर्वी शास्त्राज्ञेप्रमाणे शौचविधी करावा. योगातील क्रियेचे सामर्थ्य अघटित असते हे सत्य होय.

४

चिखलदा येथे दिवाळीत श्रीदत्तमूर्तींच्या अभ्यंगस्नानाचा प्रसंग

प्रथम इ.स. १८९८ साली आश्विन वद्य पक्षाचे अखेरीस श्रीस्वामी-महाराजांचे चिखलदा येथे आगमन होऊन श्रीगोपाळकृष्ण मंदिरात वास केला. थोड्या दिवसांनी ही जागा स्वामीमहाराजांस राहणेस गैरसोयीची असल्याने श्रीमारुतीचे मंदिराला लागून पश्चिमेकडील खोली आहे, ती राहण्यास योग्य असल्याने तिच्यात चैत्र शुद्ध १० इ.स. १८९९ पावेतो अर्थात् पाच महिने याठिकाणी मुक्काम करून नंतर गुजराथेत प्रयाण केले. सव्वा दोन वर्षे गुजराथ प्रांतात तिलकवाडा, सिद्धपूर म्हणजे मातृगया, श्रीद्वारका इ. गावी श्रीमहाराजांचे वास्तव्य झाले.

ह्यावेळी स्वामीमहाराजांचे जवळ श्रीदत्ताची सुमारे अंगुष्ठ प्रमाणाची, पंचधातूची, एकमुखी, दोन हाताची, लहान मूर्ती होती. येथे दिवाळीतील मूर्तीच्या अभ्यंग-उष्णोदक स्नानाचा प्रसंग घडला. मूर्ती नाहिशी होऊन नर्मदेत गेली होती. नर्मदेत मूर्तीच्या पायाचा भाग पाण्यात व डोके पाण्यावर अशा स्थितीत होती. माझे बंधू ति. बाळाभाऊ तेथे स्वामीमहाराजांचे बरोबर होते. नंतर अभ्यंगादि पंचामृत पूजा केली वगैरे प्रसंग आहे. (हा प्रसंग श्रीगुरुदेवचरित्रात सविस्तर आला आहे.)

पुढे ही मूर्ती नाहिशी झाली यासंबंधीचे वृत्त पुढे दिले आहे.

दत्तमूर्ती लहान व्यंकटबुवा ब्रह्मचारी यांना स्वामीमहाराजांनी ब्रह्मावर्त मुक्कामी दिली. (कोटेश्वरी राहणारे व्यंकटबुवा वयाने मोठे होते या कारणाने येथे लहान व्यंकटबुवा असे समजण्यासाठी लिहावे लागले). इ.स. १९११ चे वर्षी उन्हाळ्यात हे लहान व्यंकटबुवा नर्मदा प्रदक्षिणेस

निघून श्रीकोटेश्वराचे दक्षिण किनाऱ्यावर श्रीदत्तमूर्तीसह आले होते. लहान व्यंकटबुवा यांचे हे अखेर दर्शन आपल्यास झाले.

पुढे ते गुजराथेत गेल्यावर श्रीनर्मदा प्रदक्षिणा सोडून अबूच्या पर्वताकडे गेले. त्यांचा शोध पुढे लागला नाही व श्रीदत्तमूर्तीची पुढे काय व्यवस्था केली हे समजण्याचे साधन नाहीसे झाले.

हे लहान व्यंकटबुवा अत्यंत वैराग्यशील व स्वधर्माने वागणारे व स्वामी महाराजांचे भक्तांपैकी अद्वितीय असे भक्त होते. कित्येक विचारवान् पुरुषांची अशी कल्पना आहे की, स्वामिमहाराजांच्या कुटुंबाला (अन्नपूर्णा मातेला) लहान व्यंकटबुवा हा पुरुषजन्म आलेला आहे. शास्त्रात 'पुंजन्म लभते माता, पत्नी व प्रेषमात्रतः' असे वचन सापडते. स्वामिमहाराजांचे कुटुंबास गंगाखेड येथे देवाज्ञा झाली. त्यावर्षाच्या मानाने लहान व्यंकटबुवांचे वयमान तंतोतंत जुळते. काय असेल ते परमेश्वर जाणे ! आम्हां मनुष्यांकडून अशा गोष्टींचा उलगडा होणे अशक्य आहे.

५

नर्मदेचे स्वप्नात दर्शन

स्वामिहाराजांचे प्रथम आगमन चिखलद्यास झाले त्यावेळी त्यांनी सांगितलेली वार्ता येथे देतो. नेमावर येथे श्रीनर्मदेची मूर्ती आहे, ती पाहिली नसोन तेथे मूर्ती असल्याचेही माहिती नव्हते. नेमावरजवळ एक गाव आहे तेथे मुक्काम होता. रात्री स्वप्नात एक स्त्रीरूपी देवी दृष्टीस पडली. जाग आल्यावर विचार केला, स्वप्नात देवीचे दर्शन झाले पण कोठली व कोणती देवी आहे हे समजले नाही. दुसऱ्या दिवशी नेमावरास जाणे झाले. तेथे नर्मदेचे दर्शन करताच स्वप्नातील मूर्तीसारखीच श्रीनर्मदेची मूर्ती असल्याचे दिसून आले. व लक्षात आले की, स्वप्नात नर्मदा देवी येऊन दर्शन दिले होते. भावाशिवाय देवाची भेट दुर्लभ आहे.

६

भोवताली भरपूर पाऊस - स्वामी जेथे, तेथे थेंब नाही

सारंगपुरास रा. रा. कृष्णराव पुंडलिक राहात असत. ते निसरपुरी महाल दप्तरात असताना त्यांनी एक चमत्कार पाहिलेला सांगितला, तो येणेप्रमाणे - स्वामिमहाराज सारंगपुराहून पुढे जाण्यास निघाले, तेव्हा मुक्कामाचे गावी सहा मंडळी प्रथम जाऊन स्नान वगैरे करून पृथक् पृथक् स्वयंपाक वैश्वदेवादि आटोपून 'स्वामिमहाराज आले की भिक्षा घालून नंतर भोजन करू' असा संकेत केला व मार्गप्रतीक्षा करीत एका झाडाखाली बसले. थोड्या वेळात स्वामिमहाराज तेथे आले. नंतर माध्याह्निक आटोपून भिक्षा मागितली व ती ग्रहण करून आसनावर बसले तेव्हा अकस्मात पाण्याचे ढग उत्पन्न होऊन जोराने पाऊस पडण्यास प्रारंभ झाला. दीड तास पाऊस पडला. नाले, खाचरे, नद्या पाण्याने भरून वाहू लागल्या. आश्चर्य इतकेच की, ज्या झाडाखाली स्वामिमहाराज व मंडळी बसली होती त्या ठिकाणी एक थेंबही पडला नाही. सर्व मंडळीस तो चमत्कार पाहून आनंद झाला. स्वामिमहाराजांचे सामर्थ्य जाणण्यास कोणी प्रयत्न करील तर तो सिद्धीस जाणार नाही. पाणी बंद झाल्यावर मंडळींनी भोजन केले. पश्चात् पुढील गावी जाण्यास स्वामिमहाराज निघाले तेव्हा सर्व मंडळींनी वंदन करून आज्ञा घेऊन सारंगपुरास परत आले. तात्पर्य, योगाचे सामर्थ्य कोणाला जाणणे शक्य नाही. कृष्णराव पुंडलिकांनी स्वामिमहाराजांकडून मंत्रोपदेश घेतला असल्याचे त्यांनीच सांगितले होते.

७

मंडलेश्वर मुक्कामातील प्रसंग
स्वामी सर्व विद्यात पारंगत

मंडलेश्वरी श्री नर्मदाकिनारी जहागिरदारसाहेबांच्या धर्मशाळेत स्वामिमहाराजांनी वास केला. त्यांच्या भेटीसाठी उज्जैन येथून गुरुस्वामी म्हणजे नारायणस्वामी, ज्यांच्याकडून स्वामिमहाराजांनी दंड धारण केला, ते मंडलेश्वरी आले होते. चिखलद्याहून अप्पा देव उपनिषदे म्हणण्यासाठी स्वामिमहाराजांजवळ अध्ययन करण्यास गेले होते. दशोपनिषदे, ब्रह्मसूत्रे इत्यादि पुस्तके स्वामिमहाराजांनी आपल्या हाताने लिहून दिली आहेत. तसेच श्रीनर्मदा-उत्तर किनाऱ्यावर श्रीकोटेश्वर संस्थान - चिखलदा येथून पश्चिमेस सात मैलावर आहे. येथे व्यंकटराव नावाचे गृहस्थ कुटुंब वारल्यावर रेल्वे स्टेशनमास्तरची नोकरी सोडून श्रीनर्मदेची प्रदक्षिणा करून रहात होते, ते योगाभ्यासाची वृद्धी होण्यासाठी स्वामिमहाराजांजवळ मंडलेश्वरी जाऊन राहिले होते.

इ.स. १८९८ साली चिखलदा येथे स्वामिमहाराज असल्याचे समजले. तेव्हा कोटेश्वरहून चिखलदा येथे व्यंकटबुवा आले. ते मीठ खात नव्हते. त्यांनी श्रीकृष्णबुवा तोंडवाले, रामदासी यांचेकडून श्रीराममंत्राचा उपदेश घेतला होता. योगाभ्यासाने श्रीरामाचे ध्यान करणे सुलभ होईल असा विचार करून त्यांनी स्वामिमहाराजांजवळ बरेच दिवस योगाभ्यास शिकविण्याबद्दल प्रार्थना केली. भावशुद्धी नव्हती किंवा अन्य काही दोष असतील, त्यामुळे स्वामिमहाराजांनी व्यंकटबुवाला योगाभ्यास शिकविण्यास प्रारंभ बरेच दिवस केला नाही. एके दिवशी व्यंकटबुवांनी मनाचा निश्चय केला की, जोपावेतो स्वामिमहाराजांकडून योगाभ्यासाचे शिक्षण मिळणार नाही, तितके दिवस अन्नपाणी वर्ज्य करावे. हा निश्चय केला तो त्याच दिवशी स्वामिमहाराजांनी त्यांना बोलावले व योगाचे शिक्षणास सुरुवात केली. 'देव भक्तांचा भाव पहातो.' या गोष्टीची येथे आठवण येते व यावर्षी म्हणजे इ.स. १८९८ त माघ माहात्म्य ग्रंथ

(ओवीबद्ध प्राकृत) प्रत्येक ओवींचे प्रत्येक अक्षर श्रीदत्तमालामंत्राचे योजून तयार केला. ती पहिली प्रत आपल्यास प्रसादरूपाने स्वामि-महाराजांनी दिली आहे.

श्रीदत्तपुराण स्वामिमहाराजांनी स्वत: केलेला ग्रंथ, बारीक अक्षरात लिहिलेला स्वामिमहाराजांजवळ होता. त्याचा अर्थ संवत् १९५४ च्या मार्गशीर्ष महिन्यांत स्वामिमहाराजांनी सांगितला. या पुराणावर संस्कृत टीकाही स्वामिमहाराजांनी केली असून हे दत्तपुराण संस्कृत टीकेसह सांप्रत छापून तयार झाले आहे. मूळग्रंथ जो स्वामिमहाराजांजवळ असे. तो त्यांनी आम्हास इ.स. १९०१ चे साली प्रसाद रूपाने दिला. त्याची अक्षरे इतकी बारीक आहेत की चष्मा लावूनही ही अक्षरे वाचली जाणे शक्य नाही.

मंडलेश्वर येथे कांही महिने स्वामिमहाराजांचा मुक्काम होता. त्यावेळी तेथे रा. रा. अझमत अली खाँसाहेब सूभे असून ते ब्राह्मणांवर प्रेम करणारे होते. हिंदू धर्माचा द्वेष करीत नव्हते. स्वामिमहाराजांची परवानगी होऊन दर्शनाभिलाषा पूर्ण व्हावी एतदर्थ बरेच दिवस प्रयत्न करून त्यांनी स्वामिमहाराजांची आज्ञा होताच दर्शनाचा लाभ घेऊन आपल्या मनाचे समाधान करून घेतले. त्यावेळी तिथे रावसो. गोळे जज्ज होते. श्रीभागवतातील काही भाग स्वामिमहाराजांकडून त्यांनी समजून घेतला आहे.

श्रीस्वामिमहाराजांस सर्व विद्या अवगत असल्याने लहानांपासून मोठयांपावेतो कोणीही विद्यार्थीरूपाने त्यांचेकडे गेला तर त्या विद्यार्थ्याची इच्छा पूर्ण होत असे. वेद शिकणारांना वेद, शास्त्र म्हणणारास शास्त्रे, याज्ञिक समजून घेणारास याज्ञिक स्वामिमहाराजांनी शिकवावे. सूत काढणे, पत्रावळी लावणे, गोफ करणे, वस्त्र बनविणे अशा पुष्कळशा कला स्वामिमहाराजांस येत होत्या. विशेष त्यात असे पाहिले की, जेवढ्या वेळात स्वामिमहाराजांनी काम करावे तेवढ्या वेळात दुसऱ्या माणसाकडून ते काम एक अष्टमांश हिस्साही होणार नाही.

मंत्रशास्त्र, यंत्रशास्त्र समजून घेणारा विद्यार्थी स्वामिमहाराजांकडे

आला असता तोही आपली इच्छा पूर्ण करून घेई. बुद्धीबळाचा खेळ तर दूर राहून म्हणजे प्रत्यक्षपणे न पाहूनही एका पक्षाचे खेळणाऱ्यास डाव देण्याचे तोंडाने सांगून जय मिळवून द्यावा. याचप्रमाणे दशावतारी गंजीफा खेळण्याची त्यांना माहिती होती, पण ते स्वत: कधीही खेळत नव्हते व निरर्थक काळक्षेप त्यांनी केला नाही.

तात्पर्य, स्वत: धर्माचरण करून लहानापासून मोठ्या माणसापावेतो वळण लावण्यास कित्ता यारूपाने स्वामिमहाराजांनी दिनचर्या ठेवली होती. आळसाचे नाव स्वामिमहाराजांजवळ नव्हते. प्रात:काळचे चार वाजेपासून रात्रीचे बारा वाजेपावेतो अव्याहत त्यांचा उद्योग चालत असे. वाणी व मनाला त्यांचे गुण वाखाणताना मौनच धरावे लागेल.

८

कुशाग्र बुद्धी नि अलौकिक प्रतिभा

ह्याच साली सागरकडील रा. रा. भैय्याशास्त्री चिखलद्यास येऊन राहिले होते. स्वामिमहाराजांजवळ 'वेदांतकेसरी' या नावाचा ग्रंथ समजून घेण्यासाठी नित्य जात असत. एके दिवशी शास्त्रीबुवांनी स्वामि-महाराजांस प्रश्न केला, 'संस्कृत भाषेत नवीन श्लोक करावयास आपणास किती वेळ लागेल ?' यावर श्रींनी उत्तर दिले, 'जलदकलमी (लघुलेखक) असे दोन गृहस्थ लिहावयास बसतील व त्या दोघांस पृथक् श्लोक नवीन करून सांगण्यात येईल. तत्रापि दोघांकडूनही लिहिण्याचे काम होणार नाही. आपणास निरर्थक बसावे लागेल.' केवढी अलोट शक्ती कविता करण्याची !!

स्वामिमहाराज इ.स. १८९९ सालात चिखलदा येथोन द्वारकेस जाण्यास निघणारे आहेत असे लोकांना समजले, तेव्हा मार्गात एकादशी पाहण्यास पंचांगाची आवश्यकता लागेल असे रा. रा. रामभाऊ यांना वाटले. हे शास्त्री कोकणात राहत होते. काही दिवसांसाठी ते चिखलद्यास आले असल्याने त्यांनी स्वामिमहाराजांपुढे एक पंचांग आणून ठेवून

द्वारकेस जाताना बरोबर न्यावे. अशी आग्रहाची विनंती केली. त्यावर उत्तर मिळाले, ''ओझे आपल्यास नको. काडी घेऊन जमिनीवर हिशोब करावा म्हणजे एकादशी कधी आहे हे कळून येते.'' यावरून सर्व शास्त्रे स्वामिमहाराजांस करतलामलकवत् होती असे दिसून येते.

स्वामिमहाराजांचे मुखाने ऐकले आहे, ''आपण रघुवंश काव्यापैकी दुसऱ्या सर्गाचे सात श्लोक गुरुकडून समजावून घेतले होते व एकवेळ भाऊबंद निवर्तल्यामुळें अशौच आल्याने अमरकोश पाहून घेतला, तो ते दहा दिवस कांही उद्योग नव्हता म्हणून व हेंच आपले संस्कृत शिक्षण होय. स्वामिमहाराजांनी दहावे वर्षी, एका वृद्ध इसमास देवलोक झाला, त्याचे घरी गरुडपुराण वाचून अर्थ सांगितला. अकरावे वर्षी, एका ब्राह्मण गृहस्थाचे घरी ब्राह्मण मुलीचे लग्न झाले, तेथे चार विद्वानांसमोर स्वामिमहाराजांनी लगचा प्रयोग यथाविधी केला. मनुष्याचे हातून अशी कामे होणार नाहीत व अति अल्प शिक्षणाने मनुष्य विद्वान् होणार नाही.

९
अध्ययनातील शुचित्वाचा कटाक्ष

स्वामिमहाराजांनी दशग्रंथांचे अध्ययन दोन अडीच वर्षात गुरुघरी जाऊन केले व त्यावेळेपासून दप्तर बांधून ठेवले. पुनश्च दप्तर उघडण्याचे काम त्यांना पडले नाही. सर्व ग्रंथ त्यांना मुखाने अवगत होते; हा अनुभव सर्वांना आलेला आहेच.

एके दिवशी स्वामिमहाराज म्हणाले, वेदाध्ययन केले त्यावेळी त्याचा अर्थ लक्षात येत नव्हता. आता वेदाचा अर्थ, वर्ष ५० वयाबरोबर लक्षात येतो. ''**वेदांतील उदाहरणे पाहून वाईट मनाचे लोक अवनती करून घेतात; पण त्याच उदाहरणांवरून शुद्ध मनाचे लोक उन्नती करतात.**'' (हे गंगाधरपंतांचे विचारार्ह वाक्य आहे.)

स्वामिहाराजांनी संहिता म्हणण्यास गुरुगृही प्रारंभ केला असता ह्यांच्याजवळ क्रमाची संथा म्हणणारा एक ब्राह्मण पाठात चुकत होता.

ज्या ज्या वेळी त्याने चुकावे त्या त्या वेळी ऊं ऊं असा स्वामिमहाराजांनी उच्चार करावा. ते ऐकून तो क्रम म्हणणारा ब्राह्मण संतापला व गुरु माजघरांत होते त्यांच्याजवळ जाऊन गुरुंना सर्व वर्तमान त्याने कळविला. संहितेला नुकताच आरंभ होत आहे तोच क्रमाचे अध्ययन करणाऱ्याची चूक कशी माहीत झाली याबद्दल गुरुंना फार आश्चर्य वाटले. ते स्वत: पाठशाळेत येऊन कोणते ठिकाणी क्रम म्हणत असतांना ऊं ऊं केले ते ब्राह्मणास विचारले. तेव्हां क्रम म्हणणाऱ्या त्या ब्राह्मणाने गुरुंसमोर पाठ म्हणण्यास प्रारंभ केला व जेथे चुकीचे पूर्वी म्हटले होते तेथे त्याने पुनश्च चुकीचे म्हटले. तत्क्षणी स्वामिमहाराजांनी ऊं ऊं ऊं असा शब्द केला. गुरु योग्य होते. त्यांनी स्वामिमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला आणि क्रम म्हणणाऱ्या ब्राह्मणाच्या चुकीची दुरुस्ती गुरुंनी करून दिली. जो गुरुचाही गुरु आहे, त्याचे ठायी सर्व अघटित दिसून येते. श्रीकृष्णाने सांदीपनी गुरुंजवळ थोडे वेळात सर्व शास्त्रांचा अभ्यास केला त्याप्रमाणे श्रीस्वामि-महाराजांनी गुरुंजवळ जाऊन वेदाध्ययन केल्याचे दिसून येते. रा. रा. रामभाऊ बापट सावंतवाडीस गेल्याचे वेळी त्यांनी हे चरित्र तेथे ऐकलेले निसरपुरी सांगितले.

१०

सर्वज्ञतेची एक झलक
'विद्या दानेन वर्धते'

सर्व विद्या स्वामिमहाराजांस येत होत्या, हे वर लिहिले गेले आहेच. एकदा जमिनीची मोजणी करणारे कारकुनाकडे गृहस्थाश्रमात असले वेळी स्वामिमहाराज गेले व त्यांना म्हणाले, 'आम्हास मोजणीचे काम शिकणे आहे'. हा गृहस्थ स्वार्थी होता. त्याने 'बरे आहे, आमच्याबरोबर जंगलात चला.' असे सांगितले व त्याबरोबर स्वामिमहाराज जंगलांत गेले. शंकू लावून मोजणी सुरु करतांना स्वामिमहाराजांनी त्यासंबंधीची विचारपूस केली. त्यावेळी 'हळूहळू समजून येईल' असे उडवाउडवीचे बोलून

उभयतां बिऱ्हाडी आले. स्वामिमहाराजांनी सर्व प्रकार डोळ्यांनी पाहून घेतला व वहीत माप, हातनकाशा आदि टिपून घेतले. घरी आल्यावर स्वामिमहाराजांनी स्वत:चे भोजन आटोपून मापाचा गुणाकार करून ठेवला. त्यांचे गणित सर्व झाले होते. ब्रह्मसिद्धांतापावेतो स्वामिमहाराजांस गणिताची माहिती होती. या मोजणीदाराने जेवण केले व विश्रांती घेतल्यावर स्वामिमहाराजांस बोलावून गुणाकार करण्यास सुरुवात केली. त्याचे गुणाकार होण्यास दोन प्रहर लागले. नंतर तो स्वामिमहाराजांस म्हणाला, ''बघा भटजी, हे काम किती कठिण आहे.'' त्यावर उत्तर दिले, ''आम्ही तर भोजनानंतर गुणाकार केले व तुमचे पाचारण झाले त्यावेळी तुमचेजवळ येऊन बसलो आहे.'' तेव्हा थोड्या वेळात नवीन माणसालाा इतके लवकर गुणाकार कसे करता आले, याबद्दल त्या गृहस्थास आश्चर्य वाटले. त्याने गुणाकार स्वामिमहाराजांकडून मागवून पाहिले. सर्व बरोबर होते. नंतर ''मला ही गुणाकार करण्याची रीत शिकवावी'' असे तो मोजणीदार स्वामिमहाराजांस म्हणू लागला. त्यावर ''तुम्ही तर कोणालाही शिकविण्याची इच्छा ठेवीत नाही. विद्या दुसऱ्यास शिकविणाऱ्यास शिकविणे योग्य आहे. जो दुसऱ्यास विद्या शिकवीत नाही त्याला दिलेली विद्या वाया जाते, ती पसरत नाही'' असे उत्तर दिले.

११
योगातील शरीरशुद्धीच्या क्रिया आणि खेचरी-वज्रोलीचा अभ्यास

योगांतील खेचरी व वज्रोली मुद्रा गृहस्थाश्रमीच स्वामिमहाराजांच्या झाल्या होत्या. स्वामिमहाराजांनी स्वत:चे कुटुंबासही योगाभ्यास शिकविला होता. योगाभ्यास करण्यापूर्वी बस्ती, धौती आदि शरीरशुद्धीच्या क्रिया कराव्या लागतात. सावंतवाडीची ही गोष्ट आहे. चैत्र शुद्धातील श्रीरामनवमीचा दिवस होता. त्यादिवशी प्रात:काळी नदीवर

एकीकडे जाऊन बस्तीची क्रिया स्वामिमहाराजांनी केली. २/४ वेळी ही क्रिया केल्यावर आणखी पोटांतील मळ स्वच्छ करावा असे मनांत येऊन पुनश्च बस्ती केली. त्यामुळे चक्कर येऊन तासभर बेसावध झाले. पुढे शुद्धीवर आले व रामनवमीचे दिवसाची आठवण झाली. पण अंगांत शक्ती मुळीच नसल्याने थोडा वेळ चालावे, पुन्हा बसावे, असे करीत करीत घरी मंदिरात येऊन देवासमोर निजले. तेथे काही फळे जवळ होती ती निजल्या निजल्या खाल्ल्यावर हुशारी आली. यावरून शरीरातील सर्व मळ कदापिही विसर्जन होऊ नये, असे स्पष्ट झाले. पिचकारीने बस्ती घेणे तर अगदी सोपे आहे. पपयाची नळी घेऊन स्वामिमहाराजांनी बस्ती करावी. प्रथम गुदद्वारात नळी ठेऊन पाण्यात उकिडवे बसावे नंतर पाणी त्यानळीने पोटात ओढून बस्तीकर्म होते. खेचरी मुद्रेसाठी स्वामिमहाराज डॉक्टरकडे गेले नव्हते. आपले हाताने जिव्हाछेदन केले व वज्रोली मुद्रा देखील घरीच शिश्याची सळई तयार करून केली असे समजते. पुढे ही खेचरी मुद्रा साध्य झाल्यावर वनस्पतीने जिव्हा छेदण्याची युक्ती स्वामिमहाराजांस अवगत झाली होती. परंतु वनस्पतीने जिव्हाछेदन जास्त होऊन अभ्यास करणाऱ्यास कष्ट अधिक व्हावे. या कारणाने वनस्पती-पासून जिव्हारेषा छेदून खेचरी मुद्रा कोणाची केल्याचे दिसले नाही. विद्यार्थ्याचे जिव्हाछेदन स्वामिमहाराजांनी डॉक्टरकडून करावे.

१२
व्यसनी पुरुषाची सोबत नसावी

स्वामिमहाराज गृहस्थाश्रमी सावंतवाडीस असताना तेथे कधी साधू बैरागी आदिकरून नवीन माहात्मे लोक असल्यास त्यांचे दर्शनास अवश्य जात होते. त्यांच्याशी मैत्रीभाव ठेऊन त्यांना रक्कम, खाण्यापिण्याची चीजवस्तू वगैरे जी लागेल ती द्यावी. या रीतीने सेवा करून योग्य वेळ पाहून ध्यान लागण्यास काय उपाय करणे योग्य होईल, असा प्रश्न करीत असत. एके वेळीं गांजा ओढणारा एक बैरागी स्वामिमहाराजांना सांगता

झाला, ''तुम्ही ध्यानास बसण्याचे पूर्वी एक चिलम गांजा पिऊन नंतर ध्यान करण्यास बसत जा, त्यायोगाने ध्यान उत्तम लागेल.'' हे त्याचे बोलणे स्वामिमहाराजांस खरे वाटल्याने बाजारातून चिलम, तंबाखू, गांजा ही सामग्री आणून, गांजा धुवून त्यातील पाणी काढून तंबाखू त्यात मिळविली. नंतर तो चिलमेत ठेवून वर अग्नी घातला. पूर्वी गांजा चिलम पिण्याचा कधीच प्रसंग आला नव्हता. तत्रापि व्यसनी लोकांस व्यसन करतांना स्वामिमहाराजांनी पाहिले असल्याने कसेतरी करून तो गांजा प्याले. नंतर नित्याप्रमाणे परमेश्वराचे ध्यान करावयासाठी आसनावर बसले. रोज चित्ताचे स्थैर्य थोडे बहुत व्हावे; पण आज गांजा ओढल्याने चित्त स्थिर झाले नसोन जास्त चंचलता त्यांना प्राप्त झाल्याचे समजून आले. पुनश्च दुसरे दिवशी गांजा पिऊन आसनावर बसतात इतक्यात नाकांतून रक्त वाहू लागले. नंतर गांजा पिणे बंद केले. त्यादिवशी रोजच्या नियमापेक्षा अधिक प्रमाणात ईश्वरभजन करून अपराधाबद्दल क्षमा मागून, यानंतर गांजा पिणार नाही असा निश्चय करून परमेश्वराचे स्मरण करीत असतांच झोपी गेले. स्वप्नात श्रीदत्ताने सांगितले, ''पुनश्च गांजा पिऊ नको आणि प्रथम २ तोळे तूप सेवन कर. नंतर ध्यानाच्या अभ्यासास बसत जा.'' श्रींचे आज्ञेप्रमाणे काही दिवस तूपाचे सेवन केले. त्यापासून रक्त येणे थांबले. चित्ताचे चांचल्य कमी पडून क्रमाने आराम झाला. या उदाहरणावरून कळून येते की, नशा करण्याने माहात्मे बनत नसतात. नशाचा परिणाम फारच वाईट होत असतो हे स्पष्ट दिसत असूनही असंख्य लोक नशाच्या स्वाधीन होऊन दुसऱ्या निर्व्यसनी हजारो माणसांस बिघडवितात. ज्याला आपले हित करणे असेल त्याने नशा करणाऱ्या व्यसनी पुरुषाची सोबत कदापि करू नये.

१३

सौ. मातोश्रीसाहेब (स्वामींचे कुटुंब) यांना लोभाने योगात अडथळा

सावंतवाडीस स्वामिमहाराज गृहस्थाश्रमात असतांना श्रीदत्तासमोर एका बाईने अंगावरील सर्व अलंकार ठेवून ते श्रीदत्ताला समर्पण केले. स्वामिमहाराजांनी ते स्त्रियांना घालण्याचे अलंकार सुवर्णाचे पाहून एका कुटुंबवत्सल ब्राह्मणांस पाचारण करून विधिपूर्वक प्रदान करून दिले. स्वामिमहाराजांनी या केलेल्या दानाला सौ. मातोश्रीसाहेबांची (स्वामिमहाराजांच्या कुटुंबाची) सहानुभूति नव्हती. स्त्रियांना लोभ अधिक असतो. हा त्यांचा नैसर्गिक स्वभाव आहे. याचा परिणाम थोडा विलक्षण झाला. त्यादिवशी सौ. मातोश्रीसाहेब योगाभ्यास करावयास बसल्या असता पुष्कळ वेळ झाला; तथापि त्या उठल्या नाही. स्वामिमहाराज त्यांच्याजवळ गेले. नीट पाहिल्यावर लक्षात आले की, मस्तकांतून वायू खाली उतरण्यास प्रतिबंध झाला आहे. तत्क्षणी स्वामिमहाराजांनी भजन चालू केले. थोडा वेळ होताच मस्तकातून वायू खाली उतरून सावधानता आली. ही गोष्ट ती. स्व. बाळाभाऊंकडून माहित झाली. प्रथम स्वामिमहाराज संवत् १९५४ त चिखलदा येथे आले त्यावेळी ती.स्व.बाळाभाऊ यांनी योगाभ्यासाची माहिती संपादन करून त्यांचे समीप नित्य त्रिकाळी नियमपूर्वक जाऊन समक्ष योगाभ्यास करावा. कारण ते त्यावेळी चिखलदा येथे सरकारी वैद्यकीचे कामी नोकर असल्याने या कामी अडचण आली नाही. काम, क्रोध, लोभ या मनोविकारांनी योगाला प्रतिबंध होतो. म्हणून वासनाक्षय आणि मनोनाश यांचा अभ्यास - यासंबंधी विवेकपूर्वक दक्ष राहणे, हा अभ्यास साधकांनी कटाक्षाने चालू ठेवला पाहिजे.

१४

अदृश्य वस्तू बिनचूक सांगून पैज जिंकली !

गृहस्थाश्रमातील स्वामिमहाराजांची एक वार्ता आहे. एके वेळी घरी खर्चाची विशेष अडचण असल्याने स्वामिमहाराज पैसा मिळविण्यासाठी परगावी फिरावयास निघाले. लवकरच त्यांचेजवळ दोनशे रुपये जमले. नंतर एका गृहस्थाकडे स्वामिमहाराज जाऊन त्यास येण्याचे कारण सांगितले. त्यावर तो गृहस्थ म्हणाला, ''भटजी आमचे हाताचे मुठीत काय आहे हे सांगाल तर शंभर रुपये देईन. सांगणे चुकीचे निघाले तर तुम्ही आणलेले सर्व रुपये मला द्यावे लागतील.'' हे त्यांचे म्हणणे ऐकून दुसऱ्या चार गृहस्थांस स्वामिमहाराजांनी बोलावून ते वर्तमान सांगितले. सर्वजण तेथे बसले. नंतर स्वामिमहाराजांनी ज्योतिषाशास्त्राच्या आधारे मुठीत तांब्याचे नाणे (पाव आणा) असल्याचे जाणून व धारणेपावेतों योगाभ्यास झाला असल्याने खात्री करून घेतली की, पाव आणाच आहे. नंतर त्या गृहस्थास सांगितले, ''मुठ मोकळी करा, मुठीत पाव आणा आहे.'' ते वेळी मुठ मोकळी केली तर शंभर रुपये द्यावे लागणार; त्यामुळे तो म्हणाला, ''मुठीत पाव आणा नाही. नीट पुन्हा सांगा. आपली मिळवून आणलेली सर्व मिळकत मला मिळण्याची वेळ आली.'' स्वामिमहाराजांचा शास्त्रावर पूर्ण विश्वास होता. ते त्या गृहस्थास म्हणाले, ''शंभर रुपये जातील म्हणून मुठ उघडण्यास धैर्य होत नाही.'' तेव्हा तेथे चार लोक बसले होते त्यांनी त्या गृहस्थावर संतापून मुठ उघडण्यास सांगितले. खरोखर पाव आणाच होता. त्याचवेळी त्याने शंभर रुपये आणून दिले.

विशुद्ध कर्मनिष्ठ आचरण ठेवून संपादिलेली विद्या प्रसन्न असली म्हणजे गूढ रहस्य समजतात, गुप्त-अदृश्य दृश्ये दिसतात.

१५

स्वामींना अन्नाची ऋध्दी सिध्दी होती

एके वेळी गृहस्थाश्रमात असताना अरण्यात फिरण्यासाठी स्वामिमहाराज निघाले. तेव्हा एक भोळा गृहस्थ 'मी बरोबर येईन' असे आग्रहपूर्वक सांगू लागला. ''आपल्या बरोबर तुझ्याने चालवणार नाही व भुकेने व्याकूळ होशील'' असे उत्तर दिले. तथापि तो आग्रह करून स्वामिमहाराजांबरोबर जाण्यास निघाला. त्याचेजवळ एक शेर तांदूळ स्वामिमहाराजांनी देऊन ठेविले. अरण्यात खाण्यास कोठून मिळणार ? रोज त्या तांदुळापैकी सुमारे दीड पाव तांदुळाचा भात करून खावा असे करता करता आठ दिवस झाले. या भोळ्या गृहस्थास आश्चर्य वाटले. तो मनात म्हणाला, 'आठ दिवस झाले, रोज भात करून खातो, पण परत एकशेर तांदुळ तर शिलकेत आहेच.' त्याने ही गोष्ट स्वामिमहाराजांस सांगितली. ''तांदूळ एकशेर असलेले अजूनही संपले नाही.'' तेव्हा हा गृहस्थ आपल्याबरोबर ठेवण्यास योग्य नाही, असे पाहून त्याला घरी जाण्यास आज्ञा दिली. समर्थांचे सामर्थ्य कोणासही कळणार नाही.

गरुडेश्वरी स्वामिमहाराज असतांना असाच वरील प्रमाणे चमत्कार घडला. रा. रा. वे. शा. सं. माधवराव परांजपे श्रीनर्मदेची प्रदक्षिणा करीत येत असता त्यांनी तीन दिवस गरुडेश्वरी मुक्काम केला. नंतर पुढे निघण्यास तयारी केली व स्वामिमहाराजांस वंदन करून आज्ञा घेतली. स्वामिमहाराजांनी माधवरावजी यांना दोन शेर तांदुळ दिले. ते त्यांनी प्रसाद म्हणून पोटली बांधून झोळीत ठेविले. हे तांदुळ त्यांचेजवळ बारा महिने होते. तोपावेतो माधवरावजींस अन्नसामुग्रीची बरकत राहिली. दहापाच मंडळींचे भोजन नित्य होत असावे. कधीही कमीपणा आला नाही. एके दिवशी ते प्रसादाचे तांदुळ एका सोबत्याने माधवरावजीला न विचारता शिजवून टाकले. त्यामुळे अन्नाची ऋद्धीसिद्धी निघून गेली. ही गोष्ट स्वत: वे.मू. माधवरावजींकडून कळली आहे.

१६

कलियुगात वानप्रस्थाश्रम असाध्य आहे !

वानप्रस्थ आश्रमात अरण्यात कुटुंबासह जाऊन ब्रह्मचार्याने रहावे लागते. त्याप्रमाणे स्वामिमहाराज व सौ. मातोश्री उभयता अरण्यात रहात असता काही दिवस झाले. एके दिवशी रात्री सौ. मातोश्रीसो. लघुशंकेसाठी उठल्या व लघुशंका करून जलाने शरीरशुद्धी केली व आचमन करीत होत्या तो तेथे अकस्मात् एक पिशाच्च येऊन तो सौ. मातोश्री साहेबांस भीति दाखविता झाला. त्यावेळी स्वामिमहाराज निद्रिस्त होते. तथापि त्यांना सौ. मातोश्री साहेबांनी हाताने स्पर्श करणे भाग झाले. हाताचा स्पर्श होताच 'अपरात्री काय काम पडले ?' असे बोलून स्वामिमहाराज उठून बसले व भीतीचे कारण जाणून घेऊन त्या पिशाच्चाचा बंदोबस्त करून उभयतां निजले. एकाच आसनावर उभयता स्त्री पुरुषांनी निजावे अशी शास्त्राची आज्ञा आहे. पण परस्पर स्पर्श करू नये. उभयतांमध्ये दंड ठेवावा. नंतर निजावे असा नियम या आश्रमात सांगितला आहे. थोड्या वेळाने स्वामिमहाराजांना स्वप्न पडले की, या कलियुगांत वानप्रस्थाश्रम असाध्य आहे. घरी जावे. तेथेच या आश्रमाची सिद्धी होईल. नंतर प्रात:काळी उठून प्रातर्विधी आटोपून उभयतां स्वप्नात देवांनी आज्ञा दिल्याप्रमाणे अरण्यातून घरी परत गेले व घरी या आश्रमाचे नियम पाळून तो पूर्ण केला. धर्माचरणाची किती हौस ही !

१७

हिमालयातील थंडीचे निवारण सूर्यभेदी प्राणायामाने केले!
– वाघरूपात ईश्वरदर्शन –

स्वामिमहाराज बदरीनारायण आदि उत्तर यात्रेस गेले होते. एके दिवशी सोबतची मंडळी पुढे चालून गेली व मुक्कामावर त्यांनी रात्रभर आपल्याला रहावयास योग्य अशी जागा (चट्टी) वगैरेची तजवीज लावून

घेतली. मागाहून दोन तासांनंतर स्वामिमहाराजही त्या चट्टीवर आले; पण रहावयास आंत जागा नसल्याने तेथील चौकीदाराने सांगितले, 'ह्या ठिकाणी उतरण्यास जागा बाकी राहिली नाही. आपण फार रात्र करून आला, त्यामुळे माझा नाईलाज आहे.' 'ठीक आहे' असे स्वामिमहाराजांनी त्यास उत्तर दिले व त्या चट्टीच्या (धर्मशाळेच्या) बाहेर भिंतीला एक कोनाडा, त्यांत बसता येईल एव्हढा आहे, असे पाहून स्वामिमहाराज त्या कोनाड्यात बसले व रात्रभर सूर्यभेदी प्राणायाम करून थंडीचे निवारण केले. स्वामिमहाराजांजवळ अधिक वस्त्रे नव्हती. सर्वदूर चोहोंकडे बर्फ पसरलेला व रात्रीचा समय, त्यामुळे धर्मशाळेच्या आंतील लोकांस दु:ख झाले. त्यांना असे वाटले की, या भयंकर थंडीत स्वामिमहाराजांचे प्राण राहणार नाहीत. प्रात:काळी सूर्योदय झाल्यावर चट्टीच्या आत राहिलेले लोक बाहेर आले व कोनाड्यात स्वामिमहाराज आनंदयुक्त बसलेले असून शरीरावर घाम आलेला आहे; असे अवलोकन केले. तात्पर्य, योगाचे सामर्थ्य कोणीही जाणण्यास समर्थ नाही.

ह्याच प्रवासात मार्ग चालत असता स्वामिमहाराजांसमोर एक मोठा वाघ आला. त्याने स्वामिमहाराजांच्या खांद्यावर दोन पाय ठेविले व तोंड पसरून भयंकर गर्जना केली. स्वामिमहाराज वाघाला म्हणाले, "तू नरसिंह परमेश्वर आहेस तुला काय करण्याचे असेल ते आनंदाने कर !" हे शब्द ऐकून तत्क्षणी तो वाघ खांद्यावरील पाय खाली घेऊन निघून गेला. स्वामिमहाराजांचे अंत:करणाची परीक्षा करण्यास वाघाचे रूप घेऊन ईश्वरच आले होते.

१८

वाघासमोर स्वत: उभे राहून बरोबरच्यांना पुढे जाण्यास सांगितले

वाघाचे गोष्टीवरून स्वामिमहाराजांनी स्वत: सांगितलेल्या गोष्टींचे स्मरण झाले. स्वामिमहाराज पूर्वाश्रमी सावंतवाडीस असताना

श्रीनरसोबाचेवाडीस जात असत. एके वेळी उन्हाळ्याचे दिवस असून शुद्ध पक्ष होता. रात्रीची वेळ. बरोबर दहाबारा मंडळी. पायाने चालत जाण्याचे ठरविले. मार्गक्रमण करीत असता एक मोठा वाघ जीभ बाहेर काढून मार्गामध्ये बसलेला दृष्टीस आला. बरोबर आलेली मंडळी भयाने व्याकुळ झाली. कारण वाघ पाच हात दूर राहिला. पळून जाणे शक्य नव्हते. पुढे जावयास दुसरा मार्ग नव्हता. वाघाचे मागे एक हात जागा असून त्या जागेवर वाघाचे पुच्छ पडले होते. दोन हात जागा वाघ बसल्याने वाट रोकली गेली. केवळ दोन हात जागा वाघासमोर अवशेष होती. वाघाच्या जवळून वा समोरून जाण्याचे सामर्थ्य असणे शक्य नसते. असा तो भयंकर प्रसंग पाहून स्वामिमहाराज वाघाजवळ जाऊन त्याचे समोर, तोंड समोर करून उभे राहिले. व बरोबर असलेल्या सर्व मंडळीला स्वत:च्या मागून एकाएकाने पुढे जाण्यास आज्ञा दिली. ते समई (यी) स्वामिमहाराजांच्या सामर्थ्यावर सर्व मंडळींचा विश्वास असल्याकारणाने एक-एक मनुष्य स्वामिमहाराजांच्या पाठीमागून पुढे जाण्यास निघून गेले व पन्नास हात सर्व मंडळी निघून गेल्यावर स्वामि-महाराज त्या वाघासमोरून निघून जाण्यास त्या मंडळींजवळ दाखल जाहले. हा वाघ कसे रितीने बसला होता याची आकृति स्वामिमहाराजांनी करून दाखविली. त्यावेळी दहा-पाच मंडळी व मी हजर असल्याने ती वाघाची आकृति पाहूनच सर्वांना भीति उत्पन्न जाहली. स्वामिमहाराजांनी सिंहासन करून जीभ लांब बाहेर काढली व दोन्ही हात गुडघ्याचे समीप, जमिनीवर दोन्ही हातांची बोटे पसरून ठेविली होती. खेचरी मुद्रा झाली असल्याने जीभ लांब करणे स्वल्प असते. समर्थांची शक्ति अतर्क्य असते हे सत्य होय.

१९

चिखलद्यास द्वितीय आगमन

चिखलद्याला चातुर्मासासाठी आगमन (१० वा चातुर्मास)

पुनश्च इ.स. १९०१ चे जेष्ठ वद्य ३० ला स्वामिमहाराजांचे आगमन चिखलदा येथे होऊन श्रीनीळकंठेश्वर महादेवाच्या उत्तरेस धर्मशाळा होती, (सांप्रत ती जीर्ण होऊन शेष राहिली नाही) येथे आश्विन वद्य १२ पावेतो राहून श्रीनर्मदाकिनाऱ्याने धरमपुरी, महेश्वरक्षेत्र मंडलेश्वरी गेले.

स्वामिमहाराजांचे दुसरे वेळी चिखलदा येथे आगमन संवत् १९५७ सालांत झाल्याचे पूर्वी सांगितले आहेच. ह्या वर्षी श्रावण मास आला होता. पाऊस योग्य नसल्याने सर्व लोक काळजीत निमग्न झाले, असे पाहून स्वामिमहाराजांनी श्रीनीळकंठेश्वर महादेवास श्रीरुद्राभिषेक व श्रृंगऋषीचे मंत्राचा जप करण्यास मंडळीला आज्ञा दिली. नंतर पर्जन्य चांगला पडला. पिके उत्तम आली. या चातुर्मास्यात श्रीभागवतापैकी एकादश स्कंधाचा अर्थ श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरात तिसऱ्या प्रहरी नित्य सांगितला. भाद्रपद मासी श्रीगणेशचतुर्थीचे उत्सवात रोज रात्री स्वामि-महाराजांस भक्तजनांनी आपले घरी घेऊन जावे. तेथे तासभर अर्थासह पुराण सांगावे. नित्य एका एका भक्ताचे घरी पुराण सांगितले गेले व भाविक लोकांस संतोषित केले. 'माझे' घरी श्रीसूक्ताचा भाष्यासह अर्थ तोंडाने (पोथी नसून) सांगितला होता. गणपतीचे पूजन विवाहादि मंगल कार्यात प्रारंभी होत असते आणि गणपति हा शंकराचा पुत्र आहे तेव्हा शंकराच्या विवाहाचे समयी गणपतीचे पूजन केले किंवा नाही, असा कुतर्क करणारे श्रीनर्मदाप्रदक्षिणावासी लोक संशयाची निवृत्ती होण्यासाठी पृच्छा करीत; स्वामिमहाराजांना हे त्यांचे म्हणणे कळले. त्यादिवशी सर्व प्रदक्षिणावासी मंडळी आणि स्वामिमहाराज व गावांतील भिक्षुक मंडळीला नानासाहेब ढवळे यांचे घरी श्रीगणपतीचे दर्शनास प्राचारण होते. सर्व मंडळी रात्री तेथे दर्शनास आल्यावर स्वामिमहाराजांनी वेदाचा मंत्र व अर्थ सर्वांस सांगून गणपती ही देवता अनादि असल्याचे प्रतिपादन

केले. अर्थात् शंकराचे विवाहाचे समयी गणपतीचे पूजन केले होते असे सांगून कुतर्की लोकांचा संशय दूर केला.

२०
समर्थ रामदास आणि संत तुकाराम योगी आणि भक्त होते

एका गृहस्थाने संवत् १९५७ चे वर्षी स्वामिमहाराजांस चिखलदा येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे संबंधात प्रश्न केला की, त्यांच्या बुद्धीचे सामर्थ्य लोकोत्तर असण्याचे कारण काय असावे. त्यावर स्वामिमहाराजांनी उत्तर दिले, 'टिळक हे पूर्वजन्मी योगाभ्यासी होते. या जन्मी त्यांचा मार्ग चुकला आणि निराळीच दिशा घेऊन बसले. त्यांचा पुढचा मार्ग अंतरला. तसेच अण्णासाहेब किर्लोस्करांविषयीही. टिळकांप्रमाणेच तेहि मागील जन्मी योगाभ्यासी होते. पण प्रारब्ध प्रतिबंधाने पुढचा मार्ग मिळविणे सुटून यांनाही भलताच रस्ता लागला, असे स्वामिमहाराजांनी उत्तर दिले. नंतर समर्थ रामदास व तुकाराम महाराज हे उभयतां भक्त होते किंवा योगी होते असे स्वामिमहाराजांस विचारिले. त्यावरून हे उभयतां केवळ भक्तच नसून दोघेही योगी व भक्त होते असे त्यांच्याविषयी सांगून योगी उभयतां असल्याने त्यांच्याकडून अलौकिक, अमानुष कर्मे घडली आहेत.

२१
चातुर्मास वर्णन !

स्वामिमहाराज कोठेही देशी (दक्षिण भागात) किंवा परदेशी (महाराष्ट्रेतर भागात) गेले तरी भिक्षा (माधुकरी) मागून आणून एके वेळी दिवसा भोजन करीत होते. ब्राह्मणेतरांची भिक्षा त्यांनी कधीही घेतली

नाही. तंजावरला माधुकरी मागण्याचा तेथील वैदिक, शास्त्री मंडळींनी निषेध केला. पुडीला चलावे असा त्यांचा आग्रह शास्त्राप्रमाणे पडल्याने माधुकरीबद्दल, शास्त्रीय आधार श्रुतिसंमतीचे, स्वामिमहाराजांनी दाखविल्याने तंजावर येथील विद्वान् लोकांचे समाधान झाले. पण अन्नावर शूद्रादिकांची दृष्टी पडणे योग्य नाही, आणि मार्गाने चालताना गावातील शूद्र वगैरे लोकांनी भिक्षावस्त्रास (झोळी) पाहणे साहजिक आहे, यास्तव स्वामिमहाराज नित्य माधुकरी आणण्यास निघाले की, चार ब्राह्मण स्वामिमहाराजांच्या ४/४ हात दूर चारी दिशेलाा आसपास होऊन चालत असत व चोहोंकडून धुतलेले वस्त्र हातात घेऊन स्वामिमहाराजांस कोणाच्याही दृष्टीस पडू देत नव्हते.

स्वामिमहाराजांचा आहार अगदी अल्प व सात्विक असा होता. दूध ते कधी घेत नव्हते. भिक्षेत नकळत घातलेले तूप खाण्यात आले तर त्यांना वारंवार शौचास जावे लागे. स्वामिमहाराजांनी मंडळीस सांगावे की, पोटातून तूप सर्व बाहेर निघून जाईपावेतो शौचाचा त्रास होतो. यास्तव भिक्षेस कोणीही तूप घालू नये. शास्त्रात यतीने आठ ग्रास भोजन एकावेळी दिवसा करण्याचे सांगितले असल्या अन्वये बरेच वर्ष या नियमानुसार स्वामिमहाराज आठ ग्रास परिमित भोजन करीत असत.

शौच्याहून आले की, स्वामिमहाराजांनी प्रत्येकवेळी स्नान करावे. काशी, प्रयाग, बदरिकाश्रम इ. क्षेत्री स्वामिमहाराज गेलेले होते. 'श्रीगंगेच्या तटाकावर वेदांताचा विचार करीत आनंदाने रहावे' असे उद्‌गार त्यांनी एकेवेळी काढलेले श्रवण करण्यात आलेले होते.

स्वामिमहाराजांचा गंगेच्या विस्तीर्ण पात्रांत मुक्काम असतांना व शौचाचा उपद्रव त्यांना असताना ते कधीही किनाऱ्याच्या आंत शौचास बसले नाही. उन्हाने श्रीगंगेच्या पात्रातील रेती तापून पाय भाजावे, तत्रापि त्यांनी पायात खडावा घातल्या नाही. कदापि कोणतेही वाहन, गाडी, घोडा, रेल्वे वगैरे यावर बसून त्यांनी प्रवास केला नव्हता.

संवत् १९६३ चा चातुर्मास बढवाई मुक्कामी श्रीनर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर झाला. येथे दोन महिने म्हणजे आषाढ शु. १५ पासून भाद्रपद

शु. १५ पावेतो स्वामिमहाराजांनी दिवसा एक वेळी तीन चिमटी सत्तू व ताक एकत्र करून सेवन करावे. त्याशिवाय अन्य काहीच सेवन केले नाही. सात प्रहर एकसारखे परिश्रम करून इतके अल्प अन्नाच्या सेवनावर राहणारा स्वामिमहाराजांखेरीज दुसरा कोणी मनुष्य दृष्टीस पडणार नाही.

येथे ज्या ठिकाणी स्वामिमहाराजांचे वास्तव्य जाहले होते तेथे स्वामिमहाराजांचे स्मारक असे पक्के मंदिर बांधले असून पंचांमार्फत व्यवस्था, उत्सव होत असतो. श्रीमंत सौ. इंदिराबाई होळकर सरकार, यांचेकडून नंदादीप या देवालयात सुरू होऊन खर्चाची व्यवस्था करून दिली आहे. मंदिराजवळ फुलाचा बगीचा व कुव्वां (विहीर) तयार झाला आहे. रा. रा. लक्ष्मणराव या नावाचे गृहस्थ या मंदिरावर लक्ष ठेऊन सर्व व्यवस्था प्रेमपूर्वक सांप्रत बरेच वर्षापासून ठेवीत आहेत.

संवत् १९६९ चे वर्षी स्वामिमहाराजांचा मुक्काम चिखलदा येथे मारुतीच्या मंदिराच्या उत्तरेकडील कडछज्जांत झाला होता. ही जागा मरम्मत करून पाट घालून बांधली गेली आहे. हे काम वे.शा.सं. गोविंदभट उपाध्ये, जसवंत बंडाळे साहेब यांनी स्वतःचा रुपया लावून तयार केले. तेथे श्रीदत्ताच्या पादुका स्थापन केले असल्याने दरमहा रुपये १५ (पंधरा) श्रीमती सौ. इंदिराबाई होळकर सरकार, यांचेकडून पुजारी यांजला तनखा संवत् १९८५ पासून सुरू झाला आहे.

२२
दासबोध ग्रंथावर भाष्य !

ब्रह्मावर्त येथे स्वामिमहाराजांचा चातुर्मास झाला व त्यानंतरही मुक्काम तेथे राहिला होता. नित्य पुराणाचा अर्थ स्वामिमहाराजांनी सांगावा. माघ वद्य नवमी म्हणजे दासनवमीचे दिवशी नित्यपुराणाचा अर्थ सांगितल्यावर श्रोते मंडळींस म्हणाले, 'आज समर्थ रामदासनवमीचा दिवस आहे. दासबोध ग्रंथ कोणाकडे असल्यास मागवून घ्यावा. सायंसंध्येस थोडा अवकाश आहे तोंपावेतो होईल तेवढे वाचून घेऊ.'

हे ऐकून एका भाविक गृहस्थाने, 'होय, माझे घरी दासबोध ग्रंथ आहे; आत्ताच आणतो' असे बोलून लवकर घरी जाऊन दासबोधाचे पुस्तक आणिले व स्वामिमहाराजांस दिले. तेथे बसलेली मोठी मोठी मंडळी - शास्त्री, पुराणिक - ते वेळी उठून स्वामिमहाराजांस वंदन करून जावयास निघाली व 'हा ग्रंथ प्राकृत आहे, यात काय असणार !' असे ती म्हणाली. स्वामिमहाराज म्हणाले, 'जाऊ नका, जास्त वाचण्यास वेळही नाही. सायंसंध्येचा काल होईतो पाच दहा ओव्या वाचून घेऊ. नंतर सर्वच रोजच्या नियमाप्रमाणे संध्या करण्यास बरोबर चलू.' स्वामिमहाराजांच्या या आज्ञेबाहेर कोणालाही जाता आले नाही. शास्त्री आदि मोठी मंडळी परत जागेवर श्रवण करावयास बसली.नंतर स्वामिमहाराजांनी दासबोधाचे पुस्तक उघडले व समासाच्या मधूनच वाचावयास प्रारंभ केला. म्हणजे पोथीचे जे पान उघडतांना हाती आले तेच वाचावयास सुरू केले. दासबोधाची एक ओवी वाचून त्या ओवीचे अर्थाचा वेदमंत्र म्हणून भाष्यासह त्याचा अर्थ सांगितला. याप्रमाणे ५/७ ओव्या व त्यांच्या अर्थाचे वेदमंत्र म्हणून भाष्यासह त्या वेदमंत्राचा अर्थ सांगितला आणि सायंसंध्येचा काल समीप आला असे पाहून पोथी वाचणे बंद केले. त्यावेळी तेथे असलेल्या शास्त्री, वैदिक आदि मंडळींनी स्वामिमहाराजांस वंदन करून क्षमा मागितली. त्यांना, ग्रंथाची योग्यता ग्रंथाचे निरीक्षण केल्याशिवाय कळत नाही, ग्रंथास न पाहताच त्याला दोष देणे, हे विचारी माणसांस अयोग्य आहे असे स्वामिमहाराजांनी सांगितले. पूर्वीचे साधूसंत यांच्या ग्रंथावर स्वामिमहाराजांचे विशेष प्रेम होते. ती स्व. बाळाभाऊ वैद्य यांना रोज दासबोध ग्रंथ वाचण्यास स्वामिमहाराजांनी आज्ञा दिली होती व ते दासबोध वाचीत होते. वरील वृत्तांत स्वामिमहाराजांनी सांगितलेला जेवढा स्मरणांत होता तो येथे दिला आहे.

२३

'रामचरितमानस' गायकाचा सत्कार !

गोस्वामी तुलसीदासजी यांनी केलेल्या रामायणासंबंधाने एक महत्त्वाची गोष्ट स्वत: सांगितली ती येणेप्रमाणे - स्वामिमहाराज ब्रह्मावर्तास असतांना श्रीरामनवमीचे दिवशी एक पूर्वेकडील परदेशी ब्राह्मण तेथे आला व 'आज सायंकाळी थोडे तुलसीकृत रामायणाचे पुराण वाचण्याची इच्छा असलेली पूर्ण करावी. तबला पेटी मिळाल्यास उत्तमच होईल. जी वेळ सांगाल त्यावेळी हजर होईन.' अशी विनंती त्याने केली. नंतर स्वामिमहाराजांनी सर्व मंडळींस विचारून रात्रीचे दहा वाजता येण्यास त्या परदेशी ब्राह्मणास सांगितले व तबला पेटी गावातील गृहस्थास आणण्यास सांगून सायंकालीन कर्म करण्यास गेले. दिलेल्या वेळेवर सर्व मंडळी व स्वामिमहाराज श्रीराममंदिरात एकत्र होत आहेत, तोच हे परदेशी ब्राह्मण हजर होऊन पुराण वाचण्यास प्रारंभ केला. प्रथम एक चौपाई तोंडाने वाचून तीच चौपाई निरनिराळे रागांत गाऊन दाखविली. पश्चात वाद्य बंद करून त्या चौपाईचा अर्थ कथानकाला अनुसरून सांगून मग त्याच चौपाईचे अर्थांतर पाच-पाच, सहा-सहा प्रकारचे करून दाखविले. असे रीतीने दोन-तीन तास पुराण झाले. रात्रीचे बारा वाजले. तेथे असलेली सर्व मंडळी तल्लीन झाली. अशा प्रकारचा अर्थ व अर्थांतर करून अनेक रागांत एक-एक चौपाई म्हणणारा आजपावेतो दृष्टीस पडला नाही, आजच पाहिला; असे प्रत्येक व्यक्तीचे उद्‌गार निघाले. स्वामिमहाराजांसमोर अर्थ सांगणे देखील कठीण आहे. मग अर्थांतर करून प्रतिपादन करणे कठीण असल्याचे काय सांगावे ? स्वामि-महाराजांनी त्या ब्राह्मणांस गावातील मंडळींकडून योग्य संभावना देववून त्यांची बिदागी करविली. तुलसीकृत रामायणाची योग्यता फार मोठी आहे हे या उदावरणावरून सहज लक्षात येईल.

२४

योगमार्गातील मार्गदर्शन !

चिखलद्यास येण्यापूर्वी स्वामिमहाराज ब्रह्मावर्ती होते ते वेळी एक वृद्ध स्वामी चिखलद्यास आले होते. योगाभ्यास ब्रह्मावर्तास स्वामिमहाराजांजवळ केला अशी या वृद्ध यतींनी स्वामिमहाराजांची माहिती निवेदन केली होती. ती. बाळाभाऊंनी धौतीची माहिती या वृद्ध स्वामींजवळ प्रथम करून घेतली होती. नंतर लवकरच स्वामिमहाराज चिखलद्यास आले. चिखलदा हा गांव लहान असल्याने थोड्याच अवकाशात सर्वांना स्वामिमहाराज आल्याचे समजले. तेव्हा त्यांच्याकडे ती. बाळाभाऊ वैद्य गेले. नमस्कार करून प्रश्नोत्तरे झाल्यावर वेळ पाहून (एकांतात) योगाभ्यास शिकण्याची इच्छा प्रदर्शित केली. योग म्हणजे काय ? असे स्वामिमहाराजांनी त्यांना उत्तर देऊन उगी राहिले. ते वेळी ती. बाळाभाऊ म्हणाले, 'वृद्धस्वामींकडून धौतीची क्रिया मला कळली असोन आपलेपासून वृद्धस्वामींना योगाभ्यासाची पूर्वसाधने धौती, बस्ती, नेती इ. मिळाली असल्याचे मला समजले आहे. दुसरे माझ्यामागे कुटुंबाचा पाश राहिला नाही' आणि मी इंदुरास विद्याभ्यास करीत असतांना एका महात्म्याने सांगितले की, काही दिवसांनी अद्वितीय, अलौकिक संन्याशाची भेट व सहवास तुला घडेल आणि त्यांच्याकडून ध्यानादि विषयाची माहिती मिळेल' असे ती. बाळाभाऊने स्वामिमहाराजांस निवेदन केले. नंतर स्वामिमहाराजांनी त्याची योग्यता पाहिली व 'हठयोगप्रदीपिका' नामक पुस्तक मागवून नित्य थोडे थोडे समजावून देऊन स्वत:समोर नित्य त्रिकाळी अभ्यास करविण्याचे काम सुरू करून दिले.

इंदुरी काही दिवस दिवाण साहेबांकडे श्री गोंदवलेकर महाराज राहिले होते. त्यांनीच ती. बाळाभाऊ वैद्य यांना भविष्य कथन केले होते. त्याप्रमाणे अलभ्य दुर्मिळ लाभ प्राप्त झाला. ज्याला ज्याचेकडून लाभ मिळणे असेल त्याचेकडूनच तो मिळत असतो. दुसऱ्याकडून कदापि

लाभाची प्राप्ती होत नसते याचा सर्वांस अनुभव आहेच.

स्वामिमहाराजांजवळ ती. स्व. बाळाभाऊंनी बरेच वेळा विज्ञापना केली होती की, गंगाधराला एखादी मुद्रा सांगावी. याचे उत्तरी 'अरे तो योगभ्रष्ट आहे, पुष्कळ प्रारब्ध त्याचे भोगणे अवशेष आहे' असे सांगावे आणि असेच ओघाने प्रत्यक्षही स्वामिमहाराजांनी मला बरेच वेळी बजावले की, योगाभ्यास करावयास जाशील तर इकडील प्रदेशांत कोणी योगी पुरुष नाही. प्राण मस्तकातच राहिला तर खाली उतरविण्यास योगी पुरुषाची आवश्यकता लागते. प्राण मस्तकांत राहिल्यावर 'लोक मरण पावला' असे समजून पुढील विधि (दहनादि) करतील आणि यामुळे दोन्हीकडून आंचवशील. स्वामिमहाराजांची आज्ञा शिरसा ग्रहण करून शक्य होईल तोपावेतो सांभाळितो. बीमारीमुळे जो स्वामिमहाराजांची आज्ञा पाळण्यास अडथळा येतो त्याबद्दल क्षमा करण्यास ते समर्थ आहेत.

संध्या आदि कर्मात प्राणायाम करावा लागतो त्याची माहिती मला स्वामिमहाराजांकडून मिळाली आहे. एवढे येथे सांगणे आवश्यक आहे की, शरीरशुद्धी झाल्यावर प्राणायामाने मनाचे दोष दूर होऊन अमानुष सामर्थ्य मनाला प्राप्त होत असते हा अनुभव बऱ्याचवेळी मला आला आहे. श्रीमत् भागवतात 'प्राणायामं परं बलं' असे सांगितले आहे.

२५

आचारः प्रथमो धर्मः।

स्वामिमहाराजांचा मुक्काम सावरे या गावी असतांना त्यावेळी उन्हाळ्याचे दिवस होते. वे.शा.सं.रा.रा. गणपतिबुवा यांनी भांग वाटून पाणी मिळवून तयार केली. एक प्यालाभर भांग स्वामिमहाराजांपुढे ठेवून 'थंडाई आहे, घ्यावी' असे सांगितले. स्वामिमहाराजांनी उत्तर दिले नाही व भांगेकडेही न पाहता उद्योग चालू होता. असे पाहून पुनश्च ३ वेळा 'थंडाई ठेवली आहे, ही घ्यावी' असे गणपतिबुवांनी कळविले. तेव्हा स्वामिमहाराज म्हणाले, 'आपले जवळ प्रायश्चिताचे पुस्तक असल्यास

आणावे. गणपतिबुवांनी पोथी आणून स्वामिमहाराजांपुढे ठेवली. त्यातील मादक पदार्थ भक्षण करण्यास प्रायश्चित्त लागते, तो विषय स्वामिमहाराजांनी काढून तो गणपतिबुवास अवलोकन करण्यास सुचविले. तत्रापि गणपतिबुवांचे थंडाई घेण्याबद्दल बोलणे चालू असलेले बंद होत नाही असे पाहून स्वामिमहाराज म्हणाले, 'आपणास भांग पिणे नाही.' धर्माविरुद्ध वागण्याने दोष लागतो व अज्ञानी लोक मोठ्या माणसाचे आचरण पाहून त्या आचरणाप्रमाणे वागण्यास प्रवृत्त होतात. यास्तव हा भांगेचा पेला घेऊन जा. सारांश, धर्माचरणाने स्वत: वागून दुसऱ्यास कित्ता घालण्याचा स्वामिमहाराजांचा नियम अखेरपावेतो निरालस्य कायम होता, हे सर्वांस विदित आहेच.

२६
स्वामी सामर्थ्याचे प्रत्यय !

स्वामिमहाराजांनी स्वत:चे सामर्थ्य कोणास दाखविले नव्हते. लक्षावधी लोकांतून एखाद्याला तरी स्वामिमहाराजांचे सामर्थ्य कळले असे अनुमान करणे व्यर्थ होईल. परकायाप्रवेश ही विद्या स्वामिमहाराजांस अवगत होती. एक विशेष प्रकारचे आसन करून मंत्राचा जप केला असता ही विद्या साध्य होत असते. एके दिवशी स्वामिमहाराज गृहस्थाश्रमी असतांना त्यांनी परकाया प्रवेश करण्यासाठी सांगितलेले आसन करून तत्संबंधी मंत्राचा जप केला. त्याच दिवशी रात्री श्रीदत्त स्वप्नांत आले व 'तुला बाजार भरविणे आहे काय ?' असा प्रश्न केला. पुनश्च स्वामिमहाराजांनी ते आसन केले नसोन तो मंत्र परत जपला नाही. देव आपल्या भक्ताला अनर्थापासून सांभाळतो हे या उदाहरणावरून समजून येते.

भक्तजन-बायका, पुरुष इत्यादि स्वामिमहाराजांचे दर्शनास आले की त्यांनी नारळ, प्रसाद आदि पुढे ठेवावा. तो प्रसाद सर्वांना वाटून दिला जात असे. स्वामिमहाराजांनी तो प्रसाद कधी सेवन केला नाही. ज्यांनी जो

नारळ ठेवला त्याच माणसाला त्याचा ठेवलेला नारळ प्रसादरूपाने परत द्यावा. बरेच वर्षांपासोन स्वामिमहाराज साखर खात नव्हते व गुळ त्यांना सोसत नसल्याने वर्ज्य केला होता. बढवाई येथे मुक्काम असल्याचे वेळी एक चमत्कार घडून आला. नित्यनियमाचे संध्याकाळी भजन आटोपल्यावर स्वामिमहाराजांनी चि. रामभाऊ बापट यांना आंब्याचा प्रसाद वाटण्याची आज्ञा केली. मनुष्याची बुद्धी अल्पच ! चि. रामभाऊने आंबे मोजून पाहिले. ते कमी असून भजनास आलेली मंडळी अधिक होती. चि. रामभाऊला संकट पडले. त्यांना वाटले आंबे पुरणार नाही. पण स्वामिमहाराजांस कळविण्यास त्यांना धैर्यही होईना. शेवटी सर्व मंडळीला एकेक आंबा प्रसादार्थ चि. रामभाऊने वाटला. सर्वांना आंबे पुरले व एक आंबा अविशिष्ट राहिला होता. ते वेळी स्वामिमहाराज चि. रामभाऊला म्हणाले, 'उरलेला आंबा तुला घ्यावा.' ऋद्धी सिद्धी ज्याच्या दासी तेथे कोणत्याही गोष्टीत न्यून येत नसते. हे ह्या घडलेल्या गोष्टीवरून कळून येते.

चिखलदा येथे संवत् १९६९ चे वर्षी वरीलप्रमाणेच चमत्कारिक गोष्ट घडली ती समक्ष पाहिलेली येथे दिली आहे. दिवसा तिसरे प्रहरी एक कोकणस्थ ब्राह्मणाचा मुलगा - नांव राजा रसाळ वय वर्षे ८ याने एका वाटीत त्याचे घरचे बोराचे झाडाची बोरे सात ठेवून ती वाटी स्वामि-महाराजांसमोर प्रसादादाखल ठेवली. तेव्हा त्या मुलाला आज्ञा दिली की, ही बोरे मुलांना वाटून दे. त्या राजा नांवाच्या मुलाला संकोच झाला. त्याला समजून आले की मुले पुष्कळ असून बोरे थोडी आहेत. ती सर्व मुलांना पुरणार नाहीत. त्यामुळे त्याने बोराची वाटी उचलली नाही व मुलांना तो बोराचा प्रसाद वाटण्यास प्रारंभ केला नाही. या अवसरांत प्रसाद मिळावा या इच्छेने एका मुलाने स्वामिमहाराजांपुढे आपला हात केला त्याचे हातावर एक बोर वाटीतून दिले. इतक्यात दुसऱ्या मुलाने स्वामिमहाराजांपुढे प्रसादासाठी हात लांब केला त्याला एक बोर दिले. तोच तिसऱ्या मुलाने प्रसादानिमित्त हात पुढे केला. ते पाहून स्वामि-महाराजांनी त्या वाटीतून ३ बोरे डाव्या हातात घेऊन मूठ आवळली व

उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी या दोन बोटांनी एक एक बोर काढून प्रसाद देणे सुरु केले. मूठ उघडी केली नसोन प्रसाद देणे संपले तोपावेतो मूठ लाविली होती, ती तशीच कायम होती. सुमारे दहा मुलांना प्रसाद दिला गेला. त्यानंतर मोठी विद्वान्, शास्त्री, पुराणिक आदि मंडळींना तो बोराचा प्रसाद दिल्यावर बायका, मुली यांनाही बोराचा प्रसाद स्वामि-महाराजांनी दिला आहे. हा अलौकिक अद्‌भुत चमत्कार होत असलेला सुमारे १५ हातावर उभे राहून मी व चि. रामभाऊ बापट याने अवलोकन केला. सर्वांना हा बोराचा प्रसाद देणे झाल्यावर स्वामिमहाराजांची कृपादृष्टी माझ्या व चि. रामभाऊंवर झाली. उभयतां जवळ जाऊन प्रसाद घेऊन वंदन केले व परत जागेवर येऊन तो बोराचा प्रसाद सेवन केला. त्याची रुची अवर्णनीय लागली. असो. सर्वांना प्रसाद देणे संपल्यावर डावे हाताची मूठ उघडून हातातील ३ बोरे परत त्या बोरे असलेल्या वाटीत घातली व ती वाटी त्या राजा नावाच्या मुलाला दिली. या चमत्कारिक घडलेल्या कृत्यास, त्यावेळी तेथे पन्नासावर मंडळी होती, तत्रापि कोणालाही स्वामिमहाराजांची ती अद्‌भुत लीला समजली नाही. 'मम माया दुरत्यया' या भगवद्‌वाक्याचे येथे स्मरण होते.

२७

हिंगोलीतील वास्तव्यातील घटना !

वऱ्हाडांत हिंगोली नावाच्या गावी स्वामिमहाराजांचा चातुर्मास झाला ते वेळी तेथे गुरुबंधु गेले होते. त्यांचे तेथून पत्र आले. त्या पत्रातील दोन चमत्कार खाली दिले आहेत. सांप्रतही ते पत्र माझ्याजवळ उपलब्ध आहे.

हिंगोली या गावी एक विहिर होती. तिच्या पाण्यात किडे असल्याने कोणी त्या विहिरीकडे पहात नव्हते. एके दिवशी स्वामिमहाराजांनी त्या विहिरीच्या पाण्याने पाय धुतले. तेव्हापासून तिचे पाणी निर्मळ होऊन किडे नावशेषही राहिले नाही. सांप्रत गांवातील सर्व लोक त्या विहिरीचे

पाणी वापरीत आहेत. गावचे लोकांवर स्वामिमहाराजांनी हा चिरकाल उपकार करून ठेविला असे म्हणणे भाग आहे.

स्वामिमहाराज एके दिवशी नदीवर बसले होते. तेथे शेकडो लोक दर्शनास आले असल्याने गर्दी अधिक झाली होती. त्या नदीकडील मार्गाने दोन बायका बाहेरगांवाला जाण्यास निघाल्या. स्वामिमहाराजांचे दर्शन करून नंतर गावी जावे अशी त्या बायकांची इच्छा होती. पण गर्दी फार, त्यामुळे दोन घटका खोळंबूनही त्यांना दर्शनाचा लाभ मिळाला नाही. अखेर त्या बायका गांवाला जाण्यास रवाना झाल्या. थोडे दूर गेल्यावर एक नाला लागला. त्या ठिकाणी एका झाडाखाली स्वामि-महाराज बसलेले आहेत असे पाहून त्या आश्चर्ययुक्त झाल्या. त्यांनी स्वामिमहाराजांजवळ जाऊन वंदन केले व मनांत दोन ठिकाणी-नदीवर आणि नाल्यावर-एकाच समयी स्वामिमहाराज कसे बसले या गोष्टीचा तर्कवितर्क करीत इष्टगावी चालत्या झाल्या. त्याचवेळी स्वामिमहाराज नदीवर बसले होते तेथून एक गृहस्थ आला व नाल्याचे मार्गाने जाण्यास निघाला. त्याने नाल्याजवळ झाडाखाली स्वामिमहाराज बसलेले पाहून त्यांच्याजवळ गेला व वंदन केले. पण मनांत संशय आला - दोन ठिकाणी स्वामिमहाराजांस कसे बसतां आले ? या संशयाचे निवारणार्थ तो गृहस्थ गावी जाऊन पुनश्च नदीवर आला. तेथेही स्वामिमहाराज बसलेले असोन दर्शनार्थ गर्दी पूर्ववत् पाहून आश्चर्ययुक्त होऊन स्वामिमहाराजांच्या मायेने मोहित झाला. त्या मानवाला स्वामिमहाराजांचे अलौकिक सामर्थ्य कसे कळावे ? कळणे शक्य नाही.

२८

गुरुनिंदा निंद्य !

संवत् १९६३ चा चातुर्मास बढवाई येथे श्रीनर्मदातटाकी उत्तर किनाऱ्यावर स्वामिमहाराजांनी केला होता. तेथे एक गृहस्थ दूरदेशाचे आले. त्याने श्रीमत् भगवद्गीतेचा अर्थ मी लिहून आणला आहे तो

वाचतो; आपण श्रवण करावे अशी विनंती केली. ह्याला उत्तर दिले नाही. चार-पांच वेळां मी गीतेचा अर्थ लिहून आणला आहे तो श्रवण करावा, असे त्या गृहस्थाने सांगितले. तरीही त्याला उत्तर मिळाले नाही. एके वेळी स्वामिमहाराज एकटे बसले असे पाहून त्या गृहस्थाने त्यांच्या-जवळ जाऊन स्वत: लिहून आणलेल्या गीतेच्या अर्थाचे पूर्वी उपोद्घात लिहिलेला वाचण्यास प्रारंभ केला. 'श्रीमत् भगवद्गीतेवर आजपावेतो अनेक लोकांनी टीका, भाष्ये, अर्थ केले असोन शंकराचार्यांनीही गीतेवर द्राविडी प्राणायाम केला आहे.' 'द्राविडी प्राणायाम' ही अक्षरे स्वामि-महाराजांनी श्रवण केली, त्यावेळी येथे कोण आहे हा नरकांतील किडा; आमचे जगद्गुरुशंकराचार्य महाराजांना 'द्राविडी प्राणायाम' म्हणतो ? त्याचे हे पुस्तक नर्मदेत नेऊन टाका. अशी आज्ञा होतांच तेथे असलेली मंडळी त्या गृहस्थाजवळ आली आणि ते गीतार्थाचे लिहिलेले पुस्तक घेऊन नर्मदेच्या प्रवाहांत सोडून दिले. त्या गृहस्थाला स्वामिमहाराजां-समोर एक शब्दही बोलण्याचे सामर्थ्य राहिले नाही. तो थरथर कापूं लागला व स्वामिमहाराजांना साष्टांग नमस्कार घालून परत आपल्या गांवी निघोन गेला. स्वामिमहाराजांना अधर्म सहन करणे आवडत नव्हते. शास्त्रात देव आणि गुरु यांची निंदा ऐकू नये असे सांगितले असल्याने या आज्ञेला अनुरूप प्रतिकार केला व असे या गोष्टीवरून स्पष्ट कळून येते.

२९

चिखलद्यास तृतीय आगमन

चिखलद्यामध्ये २ रा चातुर्मास (स्वामींचा २२ वा चातुर्मास)

चिखलदा हा गांव होळकर सरकारचे राज्यापैकी असून श्रीनर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर आहे. येथे पूर्वी महाल कचेरी होती. इ.स. १९०६ पासोन महालाच्या सर्व कचेऱ्या निसरपुर या गांवी आल्याने चिखलदा गांवाची लोकवस्ती कमी झाली. संवत् १९६९ साली आषाढांत स्वामि-महाराजांचे आगमन झाले. चिखलदा येथे त्यावेळी मोजकी तीन घरे

दक्षिणी ब्राह्मणांची होती. माघ शुद्धपावेतो येथे श्रीस्वामिमहाराजांनी वास्तव्य केल्याने हजारो भाविक, श्रीमंत-गरीब जनांस दर्शनादि लाभाची प्राप्ती झाली. दूरदेशांतराहून आलेल्या भक्तांचे स्वामिमहाराजांनी सकल मनोरथ पूर्ण केले.

आलेल्यांचेसाठी सरपण वगैरे सर्व पदार्थांचा पुरवठा श्रीनर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यास चिखलद्याहून तीन मैलांवर स्वतंत्र बढवाण संस्थान आहे तेथील अधिकारी-वर्गाकडून व संस्थान डहीचे राजेसाहेब गणपत-सिंहजी यांजकडून होत राहिली. डही संस्थान चिखलदा येथून पश्चिमेस बावीस मैलांवर असून हे होळकर सरकारांचे निगराणीतील आहे.

३०
स्वामींचा आहार-पथ्यादि

स्वामिमहाराज संवत् १९६९ च्या अधिक आषाढ मासांत मंडलेश्वर महेश्वर धरमपुरी मार्गाने चिखलद्यास येऊन प्रथम आसन श्रीनर्मदेच्या मंदिरात ठेविले. हे श्रीनर्मदेचे मंदिर वे.मू. आप्पादेव चापेकर (भरत भटजी) यांनी सन १९०९ ईसवीत स्वकष्टार्जित द्रव्याने बांधले आहे, ह्या तिसऱ्या खेपेच्या स्वामिमहाराजांच्या आगमनाचे समयी चिखलदा येथे दक्षिणी ब्राह्मणांची मोजून ४ घरेच अवशेष होती. स्वामिमहाराज माधुकरीची भिक्षा मागून आणून सेवन करीत असत. निदान ३ घरे दक्षिणी ब्राह्मणांची असल्यास गांवात त्यांनी माधुकरी घेण्यास जावे. पुडीला कोणाचे घरी कधी गेले नव्हते. लवकरच निसरपुरास, स्वामिमहाराज चिखलद्यास आल्याचे कळले. त्याच दिवसापासोन चिखलद्यास मंडळी येणे सुरू झाले. निसरपुराची ४ घरे दक्षिणी ब्राह्मणांची आणि इंदूर येथील वे.मू.रा.रा. लक्ष्मणशास्त्री टिल्लू आदि तसेच भाविक लोक, नागपूरा-कडील भक्तजन, निरनिराळे गांवची मंडळी चिखलदा येथे येऊन राहिल्याने स्वामिमहाराजांस नित्य एकाच घरी भिक्षेला जाण्याचा प्रसंग आला नाही. स्वामिमहाराजांनी नित्य नवीन तीन किंवा पांच अथवा सात

घरी भिक्षेस जाऊन एकावेळी दिवसा भिक्षान्न सेवन करावे. स्वामि-महाराजांनी बरेच वर्षापासोन साखर सोडून दिली असोन गूळ, तूप, गव्हाची पोळी त्यांना सोसत नसे. ज्वारीची भाकर, भात, ताक, लिंबू, मीठ एवढेच पदार्थ स्वामिमहाराजांनी खाण्यात ठेविले असोन तेही अति अल्प प्रमाणांत सेवन करीत होते. सुमारे पावभर म्हणजे वीस तोळ्याचे आंत त्यांचा आहार होता. स्वामिमहाराजांस पाणी सोसत नव्हते. प्रथमागमनात संवत् १९५४ त त्यांनी पाणी भोजनोत्तर प्रहरभर वेळ निघाल्यावर परिमित - पाव किंवा दीडपाव पावेतो - पाण्याने दोन मासे वजन काळे मीठ घालून प्यावे. पण पुढे द्विरागमनापासोन संवत् १९५७ पासोन त्यांनी पाण्याचे ऐवजी ताक थोडे मीठ घालून पिण्यात ठेविले होते. ताक पिणे त्यांना सोसत असे. पण तेही अहोरात्रांत एकवेळ सेवन करावे. भक्तजनांकडून आलेला प्रसाद त्यांनी कधीच सेवन केला नाही. प्रसाद शिलकेत असला तर आलेल्या दर्शनार्थी भक्तजनांस वाटून दिला जात असे.

३१

या चातुर्मासात - पटकीची महामारी !

ह्या तृतीयागमनात संवत् १९६९ त आषाढ शु. १५ झाल्यावर स्वामिमहाराज श्रीनर्मदेच्या उत्तर दिशेच्या मंदिरातून आसन उचलून श्रीमारुतीच्या उत्तर दिशेच्या खोलीत येऊन राहिले. यावर्षी पाऊस पडण्यास विलंब लागला व श्रावण महिन्यांत पटकी - वांती जुलाब होऊन पुष्कळ माणसे या विकाराने मृत्युमुखात बळी पडली. या विकाराचे शमनार्थ स्वामिमहाराजांचे आज्ञेने सप्तशती पाठ इत्यादि अनुष्ठाने केली गेली. या बीमारीचे समयी कोणी परगावचे दर्शनार्थी आले तर त्यांना त्याच दिवशी परत जाण्यास सांगत. स्वामिमहाराजांना दर्शनार्थ येणाऱ्या मंडळींस परत जाण्यास सांगण्याचे कारण गावात राहण्यास जागा कोठे उरली नसोन ह्या पटकीचा जोर अधिक प्रमाणाने असल्यामुळे मृत

माणसांस जाळण्यासाठी लाकडे व गवऱ्या मिळणे कठीण झाले होते; हेच कारण होय. रसोड्याकडे लागणारी लाकडे बरेच दिवस संस्थान बडवाणी येथील खासगीचे दिवाण आदि मंडळींनी चिखलद्यास पाठविली असोन पानपत्रावळीची व्यवस्थाही काही दिवस त्यांचेकडूनच राहिली होती व पुढे अखेरपावेतो संस्थान डही धर्मदाय येथोन जाळावयाची लाकडे आल्याने चांगली मदत राहिली. पटकीचे औषध घेण्यास्तव स्वामिमहाराजांकडे बहुतेक लोक येत असत. त्या लोकांना औषध देतांना त्यांचा हात दुखण्यास लागावा. तत्राप त्यांनी कोणाला औषध देण्यास इन्कार केला नाही. शेकडो लोक या आजारातून मरणोन्मुख झालेली रोगमुक्त होऊन वाचली. श्रावण-मास संपल्यावर रोगाची पूर्ण निवृत्ती होऊन सर्वत्र शांतता पसरली. पर्जन्यही पडल्याने दुष्काळाची भीति राहिली नाही. त्यानंतर वे. मू. अप्पादेव चापेकर यांचेकडून (त्यांना यज्ञ करणारे यजमान करून) संहितास्वाहाकार श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरात देवासमोर स्वामिमहाराजांनी करविला. यास आठ दिवस लागले. होमाचे समयीं स्वामिमहाराजांनी नित्य येऊन बसावे. रोज ब्राह्मण भोजन याच मंदिरात व्हावे. नंतर पवमान स्वाहाकार एका गृहस्थाकडून एक, असे बारा गृहस्थांस यजमान करून केले. एक पवमानचा स्वाहाकार 'मला' यजमान करून सागरकडील नारायण शिवराम शेंडे यांना उपाध्याय (आचार्य) बनवून केला गेला. प्रत्येक स्वाहाकार करताना एखादा नवीन यजमान व आचार्य दरवेळी वेगळा नेमला जावा. तात्पर्य येथे विद्वान् भिक्षुक दूर देशातून येत असत. त्यांची या कामात संभावना अनायासे स्वामि-महाराजांचे आज्ञेने व्हावी.

याच लक्ष्मीनारायणाचे मंदिरात दोन वेळी रुद्राचा स्वाहाकार व एक वेळी गायत्री मंत्राचा स्वाहाकार झाला असून सुवासिनी स्त्रियांची व्रतोद्यापने सुमारे तीसावर केली होती. प्रथम दिवशी अधिवासन व दुसरे दिवशी होम करून सांगतानिमित्त ब्राह्मणभोजन केले जावे. त्यावेळी लक्ष्मीनारायणाचे मंदिर फारच उपयोगात आले होते. स्वाहाकार करताना अग्नि लागतो तो आगपेटीने ग्रहण केला नव्हता. अग्निस्थापन करण्याची

वेळ आली म्हणजे एक चष्मा वे.मू. अप्पादेवांचा आणून तो उन्हांत धरावा व त्याचा प्रकाश गौरीवर गौरीचा चुरा ठेवून त्यावर पाडावा. एका मिनिटाचे आंत अग्नि तयार व्हावा. हे पाहून कित्येक लोकांस असे वाटू लागले की या चष्म्याचा अग्नि उत्पन्न करणे हा स्वाभाविक धर्म आहे व तशी खात्री करण्यास्तव या लोकांनी अर्धा तास पावेतो तो चष्मा उन्हांत धरून अग्नी उत्पन्न होण्यासाठी प्रयत्न केला पण अग्नी उत्पन्न झाला नाही. पण स्वामिमहाराजांसमक्ष प्रत्येक स्वाहाकारात याच चष्म्याने अग्नि तयार केला गेला होता. देवाची लीला माणसाला कळणार नाही.

३२
ज्ञानदान आणि चातुर्मासवृत्त

या चातुर्मासात मंडलेश्वराहून वे.शा.सं. बाळशास्त्री, ह.भ.प. गोविंदबुवा हरदास योगाभ्यास करण्यासाठी येथे आले होते. यातून वे.मू. बाळशास्त्री यांना योगाचा उपदेश झाला नाही. मांडुक्य उपनिषदाचे भाष्य स्वामिमहाराजांनी समजावून दिले व गोविंदबुवाला योगाभ्यासाची प्रक्रिया सांगितली. नित्य सायंसंध्या झाल्यावर बऱ्याच मंडळींनी स्वामिमहाराजांजवळ संस्कृत समजावे ह्या हेतूने एकत्र व्हावे. त्यांना रघुवंश काव्य शिकवावे. योग्यता पाहून पुष्कळ मंडळींस ऐतरेय उपनिषद, त्यामध्ये आत्मषट्क शिकविले व भाष्यावरून या उपनिषदाचा अर्थ सांगितला आहे. मला तर प्रथमच्या आगमनात (संवत् १९५४ त) आत्मषटक भाष्यासह शिकविले असोन अध्यात्म रामायणांतील सुंदरकांड, अयोध्याकांड पुराण सांगतात असे समजावून संस्कृत येण्यास्तव द्व्यर्थी वगैरे चमत्कारिक श्लोक लिहून दिले होते, गोफ करण्यास शिकविला व रामगीतेचा अर्थ सांगितला व दुसरे आगमन झाले तेव्हा 'वासुदेवमनन' (वेदान्त) ईश, कठ, मुंडक यांचे भाष्य सांगून ईशादि सात उपनिषदे शिकविली.

श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरांत स्वयंपाक ब्राह्मणभोजन आणि

स्वाहाकार दोन महिनेपावेतो झाले. नंतर अगदी जवळ, लोंढेसाहेब यांची जागा स्वयंपाक करण्यास योग्य पाहून, व तेथे भोजनाची जागा उत्तम पृथक असोन सामान ठेवण्यास निराळी खोली अशी व्यवस्थित असल्याने स्वामिमहाराजांचा मुक्काम असेपावेतो ह्या जागेत स्वयंपाक व ब्राह्मण-भोजन नित्य होत राहिले. स्वामिमहाराजांनी ह्या स्वयंपाकातून भिक्षा बहुधा घेतली नाही. गावातून माधुकरी मागून आणावी आणि श्रीमारुतीच्या उत्तर दिशेकडील कडछणीत वास्तव्य होते तेथे भिक्षान्नाचे सेवन करावे. तेथेच पंधरा मिनिटे वामकुक्षी करून मंडळींच्या भोजनाचे वेळी लोंढे यांचे घरी यावे; सर्वांना आग्रहपूर्वक वाढवावे. वाडीहून भिक्षुक मंडळी आली होती त्यांचेशी विनोदपर भाषण करावे. वऱ्हाड नागपुरा-कडून श्रीमंत गृहस्थ समागमाच्या इच्छेने बरेच येथे येऊन राहिले होते. त्यावेळी गांव उजाड असोन, माणसांची गर्दी झाल्याने सुशोभित दिसावे. ब्रह्मचारी, शास्त्राध्ययन केलेले, स्वामींचा सहवास व्हावा यासाठी दूरदेशातून पाच-सहा मंडळी आली होती. कोणी कोणी ब्रह्मचाऱ्याने गावात व रसोड्यात माधुकरी मागून भोजन करावे व कित्येकांनी रसोड्यातच नित्य भोजनास यावे. सायंकाळी भजन आदि आटोपल्यावर मुगाची दाळ शिजवून तयार करावी; ती प्रसादानिमित्त सर्वांस मिळत असे.

आषाढ शु. १५ पावेतों स्वामिमहाराजांपुढील नगदीनाणे अप्पादेव उचलीत होते. यापुढे नगदी आलेली रक्कम माझ्याजवळ ठेवण्याची आज्ञा झाली. स्वामिमहाराजांजवळ असलेल्या मंडळींतून एकाने ती नगदीची रक्कम माझ्याजवळ आणून द्यावी किंवा मी हजर असतांना नगदी येईल ते उचलून घ्यावे. ह्या शिलकेचा विनियोग स्वामिमहाराजांची आज्ञा होईल तदनुसार ब्राह्मणभोजनप्रीत्यर्थ किंवा कोणास देणगी इत्यादि कामात केला जावा. स्वामिमहाराज नाण्याला स्पर्श करीत नसत. जास्त काय सांगावे ? लोकांकडून डाकमार्गाने मनीऑर्डर पाठविली तर त्यांनी सही करू नये व रुपये घेऊ नये; असे प्रत्यक्ष पाहण्यांत आले आहे. परगावाहून डाकमार्गाने पत्रे १०-१५ नित्य यावी. आलेल्या पत्रांची उत्तरे अवश्य पाठवावी. नरसी येथील कृष्णा किंवा बापू यांचे हातून पत्रांची उत्तरे

देण्याचे काम स्वामिमहाराजांनी ठेविले होते.

प्रत्येक सणाला नवीन पदार्थ करण्याबद्दल आज्ञा व्हावी. आणि सर्व मंडळींना आग्रहपूर्वक तो प्रसाद स्वामिमहाराजांनी खाऊ घालावा. मातापित्याचे लेकरावर प्रेम असते, त्यापेक्षा अधिक प्रेम स्वामि-महाराजांचे ठायी पाहण्यात आले.

साखरेचा संशय ही बनारस साखर, ही देशी साखर, ही मोरस साखर, ही पिसलेली साखर इत्यादि विशेष पसरल्याने साखर वापरणे अगदी बंद केले होते. यास्तव सर्व पदार्थ गुळाचे केले जावे. गुळाचे पदार्थांची गोडी अपूर्व असे. या गुळाच्या पदार्थांनी कोणास अरुची झालीं नसोन, कष्टही झाले नाहीत.

३३
साखरेशिवाय श्रीखंड आणि तेही उत्तम !

श्रीखंड दह्याचे होते आणि गूळ व दही एकत्र करून खाण्यास शास्त्राची आज्ञा नसल्याने कधी लोणी, गूळ, केशर या पदार्थांचे श्रीखंड करण्यास सांगावे. हे तयार केलेले श्रीखंड एक महिन्यापावेतो ठेविले तरी वाईट होत नाही आणि कधी किसमीस बारीक वाटून, दही, केशर, विलायची, जायफळ मिळवून श्रीखंड करवावे. या श्रीखंडाची रुची फारच चांगली लागावी. कोणाला या श्रीखंडाची परीक्षा करता येत नसे. बाकी लाडू, जिलेबी, घारगे वगैरे पदार्थ करण्याकडे गुळाचा उपयोग केला जावा व शास्त्राची आज्ञा भंग करण्याचे कारण रहात नसे. दुधाची खीर विशेष करून नेहमी व्हावी. या खिरीत गूळ घातला जात होता. खिरीचा स्वाद उत्कृष्ट लागावा. श्रीगणेशचतुर्थीच्या उत्सवाला गूळ खोबरे एकत्र करून त्याचे मोदक, करंज्या तयार करविल्या गेल्या. अनंतचतुर्दशीला घारगे व खीर केली गेली.

३४

चातुर्मासानंतरच्या कार्यक्रमांची दिवाळी !

दिपवाळीत सर्व मंडळींस सुमंगल स्नान करविले. श्रीनर्मदेवर पाणी तापवून अंगास सुगंधी तेल लावून ऊन पाण्याने स्नाने घातली गेली. कोजागिरी पौर्णिमेला रात्री श्रीनर्मदेवर स्वयंभू घाट कोरून बांधलेला आहे, या घाटावर दोनशे मंडळी अडचण न होता आनंदाने बसतील एवढा मोठा तो असल्याने स्वामिमहाराज व सर्व मंडळी गेली. या घाटावर दूध तापवून त्यात गूळ, जायफळ, वेलदोडे घालून सर्वांस पोटभर पाजण्यात आले. चिखलद्यास श्रीदत्तजयंतीला अधिक मंडळी एकत्र जाहली होती. सप्ताह समाप्ती झाल्यावर स्वामिमहाराज दिवसा दहा वाजतां मडळींचा आग्रह विशेष झाल्यामुळे बढवाणीस जाऊन सायंसंध्येला चिखलद्यास परत आले. रात्री कीर्तन झाले. दुसरे दिवशी पारणे थाटाने करण्यात आले. मंडळी जास्त झाल्याने भोजनास जागा लोंढे साहेबांची पुरली नाही; त्यामुळे परत श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरात आश्रय घ्यावा लागला. सर्व पुरुष, बायका, मुले यांना दक्षिणा भोजनाचे वेळी एकएक रुपया प्रत्येकी दिली गेली. ज्या सणाला जे अवश्य केले पाहिजे ते त्या सणाचे दिवशी करण्याविषयी श्रीस्वामिमहाराजांनी आज्ञा द्यावी. अश्विन शुद्धात श्रीसरस्वतीचे आवाहनाचे दिवशी सर्वांच्या पोथ्या एकत्र ठेवून तीन दिवस समारंभाचे पूजन, आरती केली गेली. दिपवाळीस त्रयोदशी व अमावास्येला लोंढे यांचे घरांत लक्ष्मीपूजन होऊन सर्व मंडळींना नगदी नाणे दिले गेले.

धनुसंक्रांत असतांना धंधुरमास झाले. एक धंधुरमास श्रीनर्मदेवरील घाटावरही केला गेला. या धंधुरमासाकडे लागलेला खर्च परशराम हरी देशमुख यांनी दिला होता. श्रीनर्मदेच्या घाटाचे कोरीव काम तीर्थरुप रा. रा. हरी संभाजी देशमुख हे चिखलदा येथे अमीन असताना सुरू केले गेले. सरकारकडून (होळकर सरकार साहेबाकडून) या घाटाकडे पांचशे रुपये दिले गेले. अंदाजे १५,००० (पंधरा हजार) रुपये खर्च झाला

असावा. या घाटाकडे प्रथमपासोन व देशमुखांची नोकरी सुटल्यानंतरही नारायणराव कृष्ण ढवळे आबादी कारकून यांची मदत शरीराद्वारे मनापासोन झाली आहे. येथील घाट कोरून तयार केला असल्याने तो कदापि फुटण्याचे किंवा प्रवाहांत वाहून जाण्याचे भय याला नाही. स्वामिमहाराज नित्य स्नानाला व सायंसंध्येला या घाटावर जात असत. बरोबर मंडळी व मुलेही दोन्ही वेळी नियमाने स्वामिमहाराजांबरोबर जाऊन भजन करीत परत येत होती.

३५

लष्कर राजघराण्यातील श्रीमती लक्ष्मीबाई जाधव यांची स्वामी भक्ती !

लष्कर येथील राजघराण्यातील श्रीमती लक्ष्मीबाई जाधव यावेळी म्हणजे स्वामिमहाराजांच्या तृतीयागमनात बरेच दिवस राहिल्या होत्या. यांनी चिखलदा येथील गांवाचे एकंदर लोकांस बायकामुलांसह एक दिवस भोजन देऊन, काही दिवसपावेतो ब्राह्मणांस पक्वान्नाचे भोजन दिले होते. यथासांग स्वामिमहाराजांची पूजा करून तिसरे प्रहरी पुराण नित्य व्हावे ते श्रवण करण्यास यांनी नियमाने येत असावे. यांचे बंधू त्यांच्यासोबत आले होते. स्वामिमहाराजांच्या दर्शनास अन्य राजघराण्यांतील मंडळी बरीच आली होती. परंतु जास्त दिवस राहिली नाहीत. कोकणातून व मुंबई येथील बरीच मंडळी नित्य दर्शनार्थ नवीन नवीन येत असत. सागर, जालवण वगैरे गावची पुष्कळ भिक्षुक मंडळी, कित्येक दर्शनार्थी व कित्येक द्रव्यार्थी असोन सर्वांचे मनोरथ परिपूर्ण झाले. सावंतवाडीहून रा. रा. नारायण गोविंद उकिडवे आले होते. त्यांना मंदिराच्या दुरुस्ती निमित्त स्वामिमहाराजांनी द्रव्य दिले. वाडीच्या बऱ्याच अनाथ बायका चिखलद्यास आल्या होत्या. त्यांना खर्चासाठी द्रव्य दिले गेले. सांप्रत खर्चाचे टाचण मजजवळ नसल्याने कोणास किती रुपये दिले

हे सांगणे शक्य राहिले नाही. याचवेळी नक्षत्रमालिका स्वामिमहाराजांनी तयार करून बडवाणी येथून छापून घेतली व बहुतेक भक्तलोकांला प्रसादरूपाने वाटली गेली.

३६
नवरात्रातील ज्ञान सत्र
सप्तशतीचा प्रत्येक श्लोक बीजमय आहे

भाद्रपद वद्य पक्षात स्वामिमहाराजांच्या बंधूंचे जामात इथे आले होते. स्वामिमहाराजांस विनंती केल्यावरून नवरात्रात सप्तशतीचा अर्थ सांगितला. सायंसंध्या झाल्यावर विद्वान्, भक्तलोक, स्त्रिया आदि एकत्र जमल्यावर अर्थ सांगण्यास प्रारंभ व्हावा. प्रथम दिवशी म्हणजे अश्विन शुद्ध प्रतिपदेस रात्री मंडळी ऐकण्यास एकत्र जमल्यावर अर्थ सांगण्यासाठी उपक्रमविधीने इष्टदेवाचे स्मरण करून नंतर सप्तशतीचा प्रथम श्लोक स्वामिमहाराजांनी वाचला व त्याचा कथेला अनुसरून अर्थ सांगितला. श्लोकाचा अर्थ स्पष्ट असल्याने तो येथे न देता केवळ श्लोक मात्र माहीत व्हावा एतदर्थ दिला आहे. (सावर्णिः सूर्यतनयो यो मनुःकथ्यतेऽष्टमः। निशामय तदुत्पत्तिं विस्तराद् गततो मम) प्रथम या श्लोकाचा कथानकाला अनुसरून अर्थ सांगणे झाल्यावर याच श्लोकाने ऱ्हीं बीज सिद्ध करून दाखविले. सुमारे अर्धा तास वेळ हे ही बीज तयार करण्याकडे लागला. माझे स्मरणांत तो अर्थ ह्यावेळी न राहिल्याने येथे देतां आला नाही. ईश्वरी इच्छा अगम्य आहे. असो.

स्वामिमहाराज म्हणाले सप्तशतीचे सातशे श्लोक असोन प्रत्येक श्लोकाने एकएक बीज तयार होते. असा बीज तयार करून अर्थ सांगण्याला कित्येक महिने लागतील. आपल्यास तर नऊ दिवसांत सर्व पोथी संपविणे आहे. यास्तव कथेला अनुसरून असलेला अर्थ सांगणेच इष्ट होईल. त्यानंतर स्वामिमहाराजांनी कथेचा अर्थ सांगून नऊ दिवसात पोथी संपविली.

वरील माहिती म्हणजे सप्तशतीच्या एकएक श्लोकाने एकएक बीज (मंत्र) तयार होतो हे यापूर्वी बहुतेकांस किंबहुना सर्व मंडळींस अवगत नव्हते. स्वामिमहाराज म्हणाले, ज्यांनी 'सिद्धान्तकौमुदी' ह्या व्याकरण शास्त्राचा ग्रंथ लिहिला त्या भट्टोजी दीक्षितांनी सप्तशतीवर भाष्य तयार करून सातशे श्लोकांनी सातशे बीजे (मंत्र) सिद्ध करून दाखविली आहेत. 'विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम्' ही उक्ति यथार्थ आहे.

स्वामिमहाराजांना सप्तशतीवरील भाष्य मुखावगत होते. त्यांचे ज्ञान अगाध असल्यामुळे कोणी मनुष्यप्राणी स्वामिमहाराजांस काय काय येत आहे, हे जाणण्यास शक्य होणार नाही. सप्तशतीचा अर्थ ऐकावयास मोठाली विद्वान् मंडळी ज्यांनी ३/३ शास्त्रे पाहून संपली, अशी शास्त्री मंडळी, पुराणिक लोक आणि भाविक आले होते. अजाण माणसासमोर अर्थ सांगणे कदाचित् सोपे होऊ शकेल, पण विद्वान् मंडळींच्या समोर पुराण वाचून त्याचा अर्थ सांगणे फार कठीण आहे.

स्वामिमहाराजांनी ऱ्हीं बीज सिद्ध करून दाखविले त्यावेळी खरगोण येथील रा. रा. नारायणराव संवत्सर तेथे बसले होते, त्यांना फार आनंद झाला. त्यांनी स्वामिमहाराजांच्या अपूर्व, अलौकिक विद्वत्तेबद्दल धन्यता प्रदर्शित केली. ह्या तृतीयागमनाचे समयी खरगोण येथील दशग्रंथी विद्वान् मंडळी तशीच शास्त्रीमंडळी चिखलद्यास येऊन त्यांनी स्वामि-महाराजांचे दर्शन करून कृतकृत्यता प्रदर्शित केली व स्वामिमहाराजांचा प्रसाद घेऊन ते परत गेले.

ह्यावेळी (संवत् १९६९ त) गायनकलाप्रवीण मंडळी, वाद्य वाजविणारी मंडळी, तमाशा करणारे, खेळ दाखविणारे आदिकरून जे जे लोक स्वामिमहाराजांकडे आले, त्यांना त्यांची योग्यता पाहून बिदागी दिली गेली. कोणीही मनुष्य विन्मुख, अपूर्णकाम परत गेला नाही.

रसोड्याकडे लागणारे रोजचे सामान - डाळ, तांदूळ, गूळ, तूप, भाजी, मिर्चीमसाला, तेल, तूप, दूध आदि-मंडळी जास्ती किंवा कमी असतील त्याप्रमाणे सामान कमी जास्ती लागावे. हे सामान आणण्याची आज्ञा 'मला' झाली. त्या आज्ञेनुरुप 'मी' सेवा केली. नंतर हे काम कृष्णा

नरसीकर याला सांगून 'मला' भाष्य सांगावयाचे असल्याने नित्य स्नान लवकर करून येण्याची आज्ञा मिळाली. त्याअन्वये लवकर स्नान-पूजा करून स्वामिमहाराजांजवळ येऊन श्रवणादिक करण्याविषयी जी जी आज्ञा झाली ती केली गेली. स्वामिमहाराजांनी स्वत: होऊन मला कैवल्य, श्वेताश्वतर, मुक्ति, दत्तात्रेय ही चार उपनिषदे शिकविली व पाठ करण्यास ती पोथीही दिली. अरणे चिखलद्यास शिकवून त्याचे भाष्य कातरखेड्यास सांगितले.श्रीमत्भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम चिखलद्यास स्वामिमहाराजांकडून गुरुमुखे करून घेतले. 'आत्मचिंतन' ही येथे सांगितले गेले आहे.

३७

स्वामीमहाराज श्रीदत्तस्वरूपी होते

अदृश्यशक्तीची बाधा नष्ट आणि स्वामी स्वरूप-रहस्य प्रकट !

संवत् १९६९ चे साली स्वामिमहाराजांचा मुक्काम चिखलदा येथे असलेवेळी धार येथील राहणारे भैयाजी नाईकसाहेब कुटुंबास बाहेरबाधा झाल्यामुळे येथे आले होते. या बाईला तीन भुतांची पीडा होत असे. पुष्कळ वर्षे उपाय केला; तथापि आराम झाला नव्हता. चिखलद्यास आल्यानंतर समजले की, या बाईला एका भुताची पीडा नसोन तीन भुते इला कष्ट देत आहेत. असो. स्वामिमहाराजांस पिशाच्चाचे उपाय करण्यास लिंबू, गुग्गुळ, ऊद, रेशीम आदि कोणताही पदार्थ लागत नसे. एका एका पिशाच्चाने स्वामिमहाराजांजवळ आपले नाव, जात, काय कारणाने बाईला पीडा देतो इत्यादि वर्तमान सांगून 'इला सोडून देऊन मुक्ति घे' असे स्वामिमहाराजांनी भूतांस सांगितल्यावर क्रमाने सर्व भूतांची बाधा निवृत्त झाली.

एके दिवशी 'तिसऱ्या प्रहरी' स्वामिमहाराज नर्मदेवर स्नानास गेले आहेत असे एका भुताने जाणून भुतांचा संचार झालेली ती नाईकांची स्त्री आपले घरून म्हणजे चिखलदा येथील नाईकांचे घरून धावत धावत

श्रीनर्मदेवर गेली आणि तिने स्वामिमहाराज स्नान करीत होते, त्याचे खालचे भागी अर्थात् पश्चिमेस पाण्यात एकाएकी उडी मारली. या बाईच्या मागोमाग घरची मंडळी तेथे शोध घेत आली होती. त्यांनी तिला पाण्यात पडलेली पाहताक्षणीच त्या बाईस पाण्यातून बाहेर काढले. नंतर त्या भुताची पीडा पुनश्च झाली नाही.

या नाईकांच्या स्त्रियेने स्वामिमहाराजांच्या दर्शनास नित्य जावे. तिथे गेल्यावर कोणतेतरी पिशाच बाईच्या अंगात संचार करून येत असे एके दिवशी त्या पिशाच्चास स्वामिमहाराज म्हणाले, 'तूं नरसोबाचे वाडीला जाऊन श्रीदत्ताची सेवा कर.' त्यावेळी तो पिशाच्च म्हणाला, 'नरसोबाचे वाडीचा दत्त तर येथेच आला आहे. मग तेथे जाऊन काय होणार ?' पिशाच असे बोलत असतां त्याच वेळी स्वामिमहाराजांनी 'चूप रहा, बोलू नकोस' असे रागे भरून पळीभर पाणी त्याचे अंगावर टाकिले. तत्क्षणी त्या पिशाचाची मुक्ती होऊन बाई देहभानावर आली व तिचे कष्टनिरसन झाले. या पिशाचाचे बोलण्यांत विशेष महत्त्व भरलेले आहे. स्वामिमहाराज श्रीदत्तस्वरूपी होते हे सहज त्याच्या बोलण्यावरून लक्षात येते.

३८

खेचरी मुद्रा - जिव्हाछेदन संबंधी उल्लेख

चिखलदा येथील तृतीय आगमनात संवत् १९६९ त काही मंडळींचे जिव्हाछेदन बढवाणी येथील डॉक्टरसाहेबाकडून करविले. दर आठवे दिवशी डॉक्टरसाहेब बढवाणीहून यावे. जिव्हाछेदन सहा महिन्यांत पूर्ण होत असते. नंतर खेचरीमुद्रा साध्य होते. पण पूर्वकर्मामुळे प्रतिबंध येत असेल तर कार्यसिद्धी होत नाही. पूर्वीही कोटेश्वराचे व्यंकटबुवा, गुजराथचे गांडाबुवा, कर्नाटकातील अप्पासाहेब यांच्या जिभेखालील शिरेचा छेद गुणा येथील ताटके डॉक्टरसाहेबांनी केला होता. पण त्रिवर्गातून एकासही खेचरीमुद्रा साध्य झाली नाही. अनेक जन्मात पुण्य

घडत जाईल तरच इष्टप्राप्ती होते; अन्यथा होत नसते हे या उदाहरणा-वरून स्पष्ट दिसते.

३९
भक्तप्रपंचकार्यात – भक्तवत्सल स्वामींची कृपा !

तिसरें खेपेचे वेळी नारायणराव कृष्णदेव (दप्तरदार) चिखलदा येथे येऊन स्वामिमहाराजांना विनंती करून म्हणाले, दोन मुलींची लग्ने करणे असोन ती आपल्यासमोर व्हावी अशी इच्छा आहे. एक मुलगी पुणे येथील मुलाला देणे ठरविले असोन सर्वात धाकटी मुलगी सौ. मथू, 'माझ्या' वडील मुलाला चि. गणपतीला द्यावी, असे निश्चित केले आहे. स्वामिमहाराजांनी म्हणणे ऐकून घेतले आणि आलेल्या अडचणीचे निवारण करून दोन्ही कार्ये माघ वद्यात करविली. दप्तरदार यांना लागलेला भोजनखर्च व माझेकडील सर्व खर्च स्वामिमहाराजांचे आज्ञेने दिला गेला आहे. या लग्नाला स्वामिमहाराज उपस्थित होते.

४०
चिखलदा मुक्काम संपत आला !
पुढील स्थानाचा उल्लेख !!

त्यानंतर वऱ्हाडातून मालक या नावाचे गृहस्थ कुटुंबासह चिखलद्यास आले. त्यांची स्वाहाकार करण्याची इच्छा होती. पण चिखलदा येथोन प्रयाण करण्याचे ठरल्यामुळे त्यांना 'कातरखेडा येथे जावे, तेथे स्वाहाकार करण्यांत येईल' अशी आज्ञा स्वामिमहाराजांनी दिली म्हणून ते सहकुटुंब द्रव्य घेऊन कातरखेडा येथे गेले. तेथे त्यांची इच्छा परिपूर्ण झाली. स्वाहाकार ब्राह्मणभोजनासह केला गेला.

स्वामिमहाराज चिखलद्याहून प्रातःकाळी निघाले. त्यांचेबरोबर

नरसी येथील कृष्णा व बापू ही दोघे मुलेही होती. धरमराय येथे त्यादिवशी मुक्काम केला. दुसरे दिवशी कातरखेड्यास जाऊन तेथे वास्तव्य केले. मागाहून मार्तंड ब्रह्मचारी आदि मंडळी, वाडीचे भिक्षुक तसेच अन्य गृहस्थ वगैरे मंडळी कातरखेडा येथे गेली. पुष्कळ दुरून दर्शनार्थी मंडळी येथे आली होती. कातरखेडा हे अरण्यापैकी एक भयंकर स्थान आहे. येथे वस्ती नसोन नर्मदा प्रदक्षणावासी लोकांना सदावर्त देण्यासाठी इंदूर दरबारातून एक जागा बांधून दिली आहे. त्यांत सदावर्त देणारा मनुष्य रहात आहे. दरमहिन्यास खर्चासाठी दीड शिक्का (रुपये साडेबारा) यासी बट्टा वजा जातां कलदार रुपये दहा मिळत असत.

४१
कातरखेडा - स्थान वर्णन

कातरखेडा येथे स्वामिमहाराजांचा मुक्काम होणार हे वर्तमान श्रीमंत गणपतसिंहजी, राजेसाहेब, डही संस्थान धर्मराय यांना माहीत झाल्याने त्यांनी नर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर वाळवंटात सुमारे सवाशे मंडप तयार करवून त्यावर जांभळाची पाने घालून राहण्याची सोय सर्व लोकांस पृथक् पृथक् करून दिली. त्यामुळे दिवसा उन्हाचा ताप व रात्री कडक थंडीचे कष्ट कोणास भासले नाहीत. तेथे दिवसा कडक उन्हाळा व रात्री कडक थंडी असा अनुभव फाल्गुनमासी स्वामिमहाराजांकडे भाष्य समजून घेण्यास गेल्या वेळी मला आला आहे.

भिलाळे, भिल्ल, तडवी, नाईक या लोकांचा हा प्रदेश असल्याने हे लोक स्वामिमहाराजांच्या दर्शनास अधिक प्रमाणात येत असत. स्वामि-महाराजांजवळ हे लोक आले की, डही संस्थानच्या दिवाणसाहेबांचे बंधूंना त्यांची भाषा आपले भाषेत स्वामिमहाराजांना सांगावी लागे. येथेही दूरदूरचे देशात राहून दर्शनाभिलाषी पुरुष, बायका, ब्रह्मचारी, संन्यासी आदि लोक येत असत.

ही जागा क्रूर श्वापदे राहण्याची व रात्रीचे समयी हिंसक पशू पाणी

पिण्यास येण्याची असल्यामुळे सर्व मंडळींच्या संरक्षणासाठी रोज रात्रभर चारी दिशेस जागले - लोक जागे राहून पहारा देत असत. स्वयंपाकाकडे लागणारे सामान, लाकडे, पानपत्रावळे इत्यादि सर्व सामानाची व्यवस्था अगत्यपूर्वक श्रीमंत गणपतसिंहजी, राजेसाहेबांनी ठेविली होती. अरण्यात केवळ द्रव्य असेल तर भागणार नाही. अधिकारी असला पाहिजे. तो द्रव्याचे सामान आणण्यास समर्थ असतो. वारंवार डही येथून कातर-खेडच्यास येऊन स्वामिमहाराजांचे समागमाचा लाभ आणि प्रसाद (भोजन) लाभ श्रीगणपतसिंहजी राजेसाहेबांनी घेतला.

४२
कातरखेडा मुक्कामातील कार्य आणि घटना !

चिखलदा येथून संवत् १९६९ त माघ वद्य पक्षांत स्वामिमहाराजांनी प्रस्थान करून पश्चिमेस श्री नर्मदाकिनाऱ्यावर कातरखेडा येथे आले व चैद्य शुद्ध अष्टमीपावेतो मुक्काम करून तिसऱ्या प्रहरी येथून रवाना होऊन रात्री आठाचे सुमारास संस्थान डही येथे आले. कातरखेडा येथे मुक्काम असताना औषधांची माहिती डही येथील माजी खजांची सुखानंदजी यांना स्वामिमहाराजांनी लिहून दिली होती. त्या पुस्तकाची एक प्रत 'मी' लिहून घेतली आहे. कातरखेडा येथे सायंकाळी सायंसंध्या केल्यावर सर्व मंडळींना पुढे करून श्रीनर्मदेवरून स्वामिमहाराजांनी घेऊन यावे. यानंतर आपले आपले वसतिस्थान सोडून कोणीही बाहेर जाऊ नये अशी सर्वांना स्वामिमहाराजांची आज्ञा झाली होती. एके दिवशी रात्री नऊ वाजायचे सुमारास वसतिस्थानासमोर श्रीनर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावर एक मोठा वाघ येऊन तो जोराने गर्जना करू लागला. त्या गर्जनेचा प्रतिध्वनि व्हावा. त्यामुळे सर्व लोकांना भय उत्पन्न झाले. परंतु स्वामिमहाराजांचा आश्रय असल्याने लवकरच वाघाचे ओरडणे बंद पडले. नंतर सर्वांची भीति दूर होऊन प्रत्येक आपापले उद्योगाला लागले. या गावाजवळ शहर नाही. तथापि दुरून देशांतरातून पोस्टाने सर्व प्रकारची फळे, मेवा आदि वस्तू

कातरखेड्यास येऊन तो प्रसाद सर्वांना मिळावा या कारणाने कातरखेडा हे अरण्य आहे असे कोणालाही भासले नाही.

कातरखेड्यास आत्मचिंतनाच्या अर्थाचे ओवीबद्ध भाषांतर स्वामिमहाराजांनी केले असून आत्मज्ञान नावाचे प्राकृत ओवीबद्ध पुस्तक येथेच केले गेले. दोन्ही पुस्तकांच्या प्रति 'मी' करून घेतल्या आहेत. कातरखेड्यास येण्याचे पूर्वी चिखलद्यास स्वामिमहाराज असतांना मोने या नावाच्या गृहस्थाने, ऐतरेयाचा अर्थ प्राकृत अभंगरूपाने स्वामिमहाराजांनी केलेला लिहून, बऱ्याच भक्तीने लोकांस प्रसाद म्हणून लक्ष्मीनारायणाचे मंदिरात स्वामिमहाराजांच्या हाताने देविल्या गेल्या हे पुस्तक बऱ्याच वर्षांपूर्वी तयार झालेले असून मला हा प्रसाद मिळाला आहे.

चिखलदा आणि कातरखेडा येथे स्वामिमहाराजांकडे कोणी वस्त्राची याचना करावी, कोणी पुस्तक मागावे, कोणी पुत्र आणि कोणी द्रव्य मागावे, कोणी रोगनिवारणार्थ प्रार्थना करावी. 'आता ज्याचा जसा भाव असतो तसे त्याला फळ मिळते' हे सांगावयास नको. पण रत्नाकराजवळ जाऊन कपर्दिका मागावी तद्वत् ही याचना होय. एके दिवशी स्वामिमहाराज म्हणाले, 'आपल्याकडे नित्य शेकडो लोक दर्शनाच्या निमित्ताने येतात आणि द्रव्य किंवा मुलगा या दोन वस्तुखेरीज अन्य वस्तू मागणारा कोणी दृष्टीस पडत नाही. द्रव्याची व मुलाची याचना करणारेच सर्व लोक आहेत. 'भक्तीसारखेप्रमाणे फळ प्राप्त होते' असे स्वामिमहाराजांचे उद्‌गार ऐकण्यांत आले.

कातरखेड्यास स्वामिमहाराजांनी कृष्णा नरसीकर यास आज्ञा दिली, 'कोणी काही, कोणी काही आपल्याकडे मागतात. हा गंगाधर कांही मागत नाही. याला आमच्या सोवळ्याचे छाटीतून एक हातभर वस्त्र काढून देऊन सांग की, 'हे वस्त्र कोणालहा देऊ नको; पोथीवर गुंडाळून ठेव.' हा मिळालेला प्रसाद माझेजवळ असोन पवनी येथे दर्शनाला गेल्यावेळी नारळाचा प्रसाद मला मिळाला तो विशेष महत्त्वाचा असल्याने जपून ठेविला आहे. दर्शनाला लोक येत ते बहुतेक नारळ स्वामि-

महाराजांपुढे ठेवीत असत. स्वामिमहाराजांनी तोच त्याचा नारळ त्याला प्रसाद द्यावा. मला पवनी येथे मिळालेला प्रसादाचा नारळ अशा प्रकारचा नाही. आज्ञा घेऊन मी पवनीहून निघण्याचे वेळी स्वामिमहाराजांनी सीताराम महाराजांस बोलावून कोठारातून नारळ मागवून तो प्रसादरूपाने दिल्यामुळे तो नारळ महत्त्वाचा प्रसाद आहे.

महाशिवरात्री स्वामिमहाराजांनी कातरखेडा येथे केली. नंतर निसरपुरी मला आज्ञापत्र आले. 'भाष्याची पोथी घेऊन ये. बाकी राहिलेले भाष्य सांगण्यात येईल.' त्या आज्ञेप्रमाणे फाल्गुन शु. १० ला कातर-खेड्यास दाखल होऊन दुसऱ्या दिवसापासोन भाष्य समजून घेण्यास प्रारंभ केला गेला. संवत् १९७० चे चैत्र शुद्ध ८ पावेतों येथे स्वामिमहाराजांचे वास्तव्य झाले. मध्यंतरी होळीचा सण आला. त्यादिवशी चंद्रग्रहण ग्रस्तास्त असल्याने दुसरे दिवशी दिवसभर सर्व मंडळींसह उपवास करून सायंकाळी शुद्ध चंद्रमंडळ पाहून स्नान, संध्यावंदनादि केले. नंतर सर्वांना भातबेसन करून भोजन घातले. स्वत: रात्र असल्याने काहीच फराळ देखील स्वामिमहाराजांनी सेवन केला नाही. येथे असतांना वाडीच्या एका बाईला रात्री दोन वाजता हाताला दोन जागी विंचू चावला.

बाई जागृत होऊन मोठ्याने रडू लागली. स्वामिमहाराज व जवळची मंडळी सर्व उठून बाईजवळ आली. एका गृहस्थाने कडुलिंबाची फांदी आज्ञा झाल्याप्रमाणे स्वामिमहाराजांस आणून दिली. त्या फांदीने वारा घालून विंचू उतरवणे सुरू केले. तासभर वेळ झाला. विंचू उतरला नाही. बाईचे रडणे बंद होईना व स्वामिमहाराज कष्ट करून लिंबाने वारा घालण्याचे कार्य एकसारखे करीत असल्याचे सहन न झाल्याने 'मी' स्वामिमहाराजांची आज्ञा घेतली व जवळ म्हणजे निजण्यास खाट मिळाली होती त्या खाटेखालील वनस्पति होती ती काढून उपयोग केला. दोन मिनिटाने बाईचे रडणे बंद पडले. विंचू फार विषारी होता. त्या बाईला दोन दिवस थोडे कष्ट होत राहिले पण ते सहन करण्याजोगे होते. ज्या उपायाने साप उतरतो तो उपाय विंचू उतरण्यासाठी योजिला होता. विंचू उतरणे हे स्वामिमहाराजांस त्या वनस्पतीचे नाव विदित करून दिले. नंतर

कोणी विंचवाचे औषध विचारले तर स्वामिमहाराजांनी त्याला ह्या वनस्पतीचा उपयोग करण्यास माझ्यातर्फे सांगावे. येथे रात्री भजन करण्यास बसल्यावर नित्य शेकडो विंचू दिव्याजवळ यावे ते सर्व एका पात्रात घालून दूर नेऊन टाकिले जात होते. 'विंचू मारा किंवा विंचू मारू नका' या दोन्हीही आज्ञा स्वामिमहाराजांनी कोणालाही कदापि केल्याचे दिसून आले नाही. नागरमोथा पोटात दिल्याने व तो चावून दंश झालेल्या माणसाचे कानांत जोराने फुंक प्रत्येक कानांत वीस वेळा घातल्याने विषाची बाधा कमी होत असते. वाडीच्या बाईला हाच नागरमोथा वनस्पतीचा प्रयोग दोन्ही प्रकाराने केला होता.

४३

'डही' संस्थानमध्ये आगमन गरुडेश्वराकडे प्रस्थान

डही एथे चैत्र शुद्ध अष्टमी १९७० च्या रात्री स्वामिमहाराज सर्व मंडळींसह आले. बगीच्यात राहण्यास्तव गणपतसिंहजी राजेसाहेबांनी व्यवस्था केली होती. स्वामिमहाराजांना राहण्याची जागा पृथक् केली असोन ही जागा आजपावेतो सांभाळून ठेविली आहे. दर गुरुवारी या जागेत भजन होऊन प्रसाद वाटला जातो. भजन करण्यासाठी स्वत: गणपतसिंहजी राजेसाहेब मंडळींसह येत असल्याने अविच्छिन्न गुरुवारचे भजन चालत आहे. या रात्री भजन वगैरे आटोपले. दुसरे दिवशी श्रीरामनवमी होती. येथे श्रीरामाचे मंदिर आहे, स्वामिमहाराज व बरोबरची मंडळी जन्मापूर्वी त्या मंदिरांत जाऊन कीर्तनपूर्वक जन्माचा उत्सव जाहला. रामभाऊ बापट यांनी कीर्तन केले. राजेसाहेब एथे आले होते. रात्री मंत्रजागरण व भजन झाले. दुसरे दिवशी म्हणजे दशमीला राजेसाहेबांकडून सर्व मंडळींना मेजवानी झाली. दिवसाचे तिसरे प्रहरी गरुडेश्वरी जाण्यास स्वामिमहाराजांनी तयारी केली. सोबतच्या मंडळींस गाड्या देऊन रवाना करण्याचे राजेसाहेबांस सांगितले. त्याप्रमाणे

निसरपूरपावेतो गाड्या देऊन मंडळींस पोचते केले. स्वामिमहाराजांनी कोणी शिपाई वगैरे मार्ग दाखविण्यास बरोबर घेतला नाही. बरोबर कोणी येऊं नये अशी आज्ञा जाहल्याने निरुपाय झाला. स्वामिमहाराज जावयास निघाले त्यावेळी सर्व मंडळींची अंत:करणे वियोगानलाने तापून नेत्रांतून दु:खाश्रूंच्या धारा वाहू लागल्या होत्या. त्या दु:खाचे वर्णन करणे शक्य नाही.

अलिराजपुरावरून स्वामिमहाराज गरुडेश्वरी गेले. तेथे पोचल्यावर, 'आतां येथेच रहावे' अशी श्रीदत्ताची आज्ञा जाहली. गरुडेश्वरी सव्वा वर्षे स्वामिमहाराजांचा मुक्काम राहिला. दररोज दरबारात दिवसा ब्राह्मण-भोजन व्हावे व रात्री भजन झाले की शिरा प्रसादानिमित्त दिला जावा. येथे श्रीशंकराचार्य स्वामिमहाराजांच्या दर्शनार्थ आले होते. दूर देशांतरातून असंख्य मंडळी भक्तिप्रेमाने आकर्षित होऊन गरुडेश्वरी येत असत. तिलकवाडा येथील एक दक्षिणी ब्राह्मण, मुलाचे यज्ञोपवितानिमित्त आग्रहपूर्वक तिलकवाड्यास येण्याबद्दल प्रार्थना करून गेला. यज्ञोपविताचे दिवशी स्वामिमहाराजांनी गरुडेश्वराहून तिलकवाड्यास जाण्याची तयारी करून दंड घेण्यास हात लाविला त्यावेळी विंचू चावतो अशी वेदना हातास झाली. हात परत घेतला. विंचू दिसत नाही व हातास वेदना काय कारणाने झाली असे बोलून पुनश्च दोन वेळी दंड घेण्यास हात लावावा व हातास वारंवार वेदना व्हाव्या; तेव्हा स्वामिमहाराजांना गरुडेश्वरी आले, त्यादिवशी झालेल्या श्रीदत्ताच्या आज्ञेचे स्मरण झाले. 'आतां इथेच रहावे' नंतर तिलकवाड्यास 'यज्ञोपवीतानिमित्त आमचे येणे होणार नाही' असा निरोप त्याचवेळी पाठविला व नित्याप्रमाणे आह्निक करते झाले. देवाच्या मनांतील जाणण्यास कोणी समर्थ नाही.

गरुडेश्वरी सत्कालक्षेप चालला होता. संवत् १९७१ च्या ज्येष्ठ व. ३० स (अमावस्येस) व प्रतिपदेला मध्यरात्र लोटल्यावर भजन चालू होते. ब्रह्मानंद स्वामींनी भगवद्गीतेचा पाठ श्रवण करविल्यावर उठवून बसविण्यास स्वामिमहाराजांनी आज्ञा केली. मंडळींनी त्याचवेळी स्वामिमहाराजांस उठवून आसन घालून बसविले तेव्हा स्वामिमहाराजांनी

तेथे असलेल्या मंडळींना अखेरची आज्ञा दिली. **'कर्ममार्गाचा त्याग करूं नका. चित्ताची शुद्धी कर्माने होऊन नंतर कल्याणाची प्राप्ती होते. आपल्यास कर्माची जरूर नव्हती. तत्रापि सर्वांना कित्ता लागावा एवढ्यास्तव शेवटपावेतो कर्ममार्गाचे अवलंबन केले. आता ह्या देहावर अभिचार प्रयोग केला असल्याने व जरी आयुष्य अवशेष आहे तत्रापि शरीराचा त्याग करतो. कारण कर्तव्य अवशिष्ट नाही.'**

श्रीस्वामिमहाराजांचे हे वाक्य त्यांचे पूर्णत्व व्यक्त करणारे आहे. त्याचबरोबर जगदोद्धाराचे कार्य या ज्ञानपूर्ण अवस्थेत झाल्याचे त्यांच्या संपूर्ण जीवनात दिसते. आता मात्र 'कर्तव्य अवशिष्ट नाही' हे स्पष्ट सांगून मृत्यू परतविण्याचे सामर्थ्य असून स्वामींनी मृत्यू जाणीवपूर्वक समाधानाने स्वीकारला आहे. त्यांनीच श्रीदत्तमाहात्म्याच्या ४८ व्या अध्यायात जलाला गुरू का केले हे स्पष्ट करताना पुढील ओव्या लिहिल्या आहेत.

ज्ञान येता हातासी। कृतार्थता ये तयासी। तरी न टाकी देहासी। राखी लोकांसी तारावया॥१६॥

गंगाखेडला पत्नी बरोबर असताना मृत्यू त्यांना नेण्यास आला होता. पण मृत्यूला खडसावून सांगितले, 'मला संन्यास घेऊन खूप कार्य करायचे आहे अशी दत्तप्रभूंची आज्ञा आहे. मी येणार नाही' यावेळी मृत्यूला परतविले आहे. नंतर तेथेच गंगाखेडला पत्नीचे निधन झाले - स्वत: तिचे सर्व उत्तरकार्य केले आणि अशौच संपताच संन्यास घेतला त्यावेळी कोणी अज्ञात संन्यासी अचानक येऊन - प्रेषोच्चार देऊन निघून गेल्याचे वर्णन आहे.

कर्म संचित जाळून। क्रियमाण टाळून। प्रारब्धमात्र घेऊन।
राहे पावन कराया लोका॥१७॥
स्वेच्छे भूमीवरी फिरून। दर्शन स्पर्शन देऊन। करी लोकांते पावन।
उदकासमान होऊन॥१८॥

श्रीस्वामिमहाराजांचे जीवन वरील विचारांचे प्रात्यक्षिक होते.

ते स्वेच्छेने प्रवास करीत होते - पण त्यांचा 'स्व' म्हणजे प्रत्यक्ष दत्तभगवान् असल्याने ते दत्तइच्छेने फिरत होते व सर्वत्र सर्वकाल केवळ जगदोद्धाराचे कार्य करीत होते - 'माळिये जेऊते नेले। तेऊते निवांतची गेले' असे स्वामींचे जीवन.

आता येथे गरुडेश्वरी आल्यावर त्यांचेवर झालेल्या अभिचार प्रयोगाचे निराकरण न करण्याचा उद्देशही स्पष्ट केला आणि आपले काही कर्तव्यही शिल्लक राहिले नाही असा खुलासाही केला आहे. ही स्वामिमहाराजांची जीवन कृतार्थतेची अति स्पष्ट जाणीव देणारी घटना आहे.

काही भक्तमंडळींनी स्वामिमहाराजांस विनंती केली. 'प्रयोग परत करण्याचे ज्ञान आपल्याला नाही. आपण समर्थ असल्याने प्रयोग परत करतील.' त्यावर उत्तर मिळाले. 'संन्यासाश्रम घेतांना सर्व प्राण्यांस अभयवचन दिले गेले आहे, ते आपल्याला पाळले पाहिजे. जर आपण प्रयोग परत केला तर ज्याने प्रयोग केला आहे तो प्राणास मुकेल. वाचणार नाही' असे सांगून शरीरत्याग केला आणि स्वरूपी लीन होते झाले.

त्याच दिवशी एक नवीन संन्यासी आला होता. तो तृषित असल्याने पाणी पिऊन स्वामिमहाराजांजवळ जाऊन म्हणाला, 'जिजीविषुर्वा मुमुर्षुः वा' (जिवंत राहण्याची इच्छा आहे किंवा मरण्याची इच्छा आहे ?) त्या संन्याशाला उत्तर दिले, 'तुम्हांला माहीत.'

कित्येक लोकांचे मते याच संन्याशाने स्वामिमहाराजांवर अभिचार-प्रयोग केला असोन प्रयोगाचा परिणाम पाहण्यासाठी तो मुद्दाम तेथे आला होता. हा परत कोणास दिसला नाही. तो कर्नाटक देशाकडील होता असे बहुतेकांचे म्हणणे आहे.

कोणाची उन्नती पाहून विषाद वाटणे हे माणुसकीचे काम नाही. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य महाराजांवर अभिचारप्रयोग झाल्याचे सर्वांना विदित आहेच. तद्वत् स्वामिमहाराजांवर नीच बुद्धीच्या लोकांकडून अभिचार प्रयोग होऊन भवाब्धिवेदना हरण करणारे कर्णधारास स्थूल दृष्टीच्या आड करणे हे आमचे दुर्भाग्य होय.

शरीर विसर्जन करण्याचे पूर्वी तीन दिवस अगोदर स्वामिमहाराजांनी सांगितले, 'या देहास टोपलीत घालून नर्मदेच्या प्रवाहात टाकून द्या.' त्यांच्या ह्या सांगण्याचा अर्थ कोणास समजला नसोन समजणे शक्यच नाही. स्वामिमहाराजांचे शरीर अन्न सुटून जाऊन हगवणीच्या उपद्रवाने फार क्षीण झाले होते. मुखकमलावर मात्र ग्लानी मुळीच नसल्याने स्वामिमहाराजांचे देहाचे विसर्जन होईल, ही कल्पना येण्यास जागा नव्हती. सहा मासे अन्न स्वामिमहाराजांनी सेवन करावे. शौच्यास पुष्कळ दूर जावे. कधीतर नर्मदेवर जाण्याची शक्ती राहिली नसल्याने आसनाजवळ नर्मदेच्या थंड पाण्याने रोज स्नान करावे. अत्यंत अशक्तता आली असूनही धर्माचरण करण्यास उणीव झाली नाही. अखेरपावेतो स्वामिमहाराजांनी धर्मानुष्ठान करून लोकांस कित्ता दाखवून देह सोडून दिला.

४४

देहविसर्जनानंतर कारागिराला दर्शन व रोगावर उपाय

गरुडेश्वरी स्वामिमहाराजांचे शरीरविसर्जनानंतर श्रीदत्तमंदिराचे व समाधिमंदिराचे काम चालले होते. ते काम करणाऱ्यांपैकी एका कारागीराचे पायास सूज आल्याने फार दु:ख होऊ लागले. त्याला चालता येईना. त्यामुळे सर्व कामे करणे त्याला अशक्य झाले. त्याने बसल्याबसल्या सरकून शौच्यास जावे. आता येथून घरी जाणे भाग आहे, देवाचे काम करणे आपल्या प्रारब्धी नाही, असे त्याला वाटून उदासीनता आली. त्याच दिवशी तो नित्याप्रमाणे बसल्याबसल्या सरकत दूर शौच्यास गेला, तो मध्ये एक भगवे वस्त्र अंगावर असून कौपीन नेसलेला, त्या कारागीराजवळ येऊन त्याला म्हणाला, 'हे जवळचे झाड काढून घरी ने. याला बारीक वाटून तू सुजेवर लावून नंतर शेक कर. लवकर बरा होशील.'

त्या कारागीराने त्या आज्ञेप्रमाणे केले. दुसरे दिवशी त्याची सूज नाहीशी झाली, त्याला उभे राहतां आले व तो पायाने चालून जाण्यास योग्य झाल्याने काम करण्यास आला. त्याला कामदाराने बरा होण्यास

काय उपाय केला, हा प्रश्न केल्यावर त्या कारागिराने 'एक बाबाजी भेटून त्याने औषधी दाखवून उपाय करण्याचे सांगितले. काल त्याप्रमाणे औषधी लावली. आज माझी प्रकृती निरोगी होऊन काम करण्याची उमेदी आल्यामुळे कामावर हजर राहिलो' हे सांगितले. त्याचे हे भाषण ऐकून कामदार व इतर मंडळींस आश्चर्य वाटले.

या कारागीराला स्वामिमहाराजांची तसबीर दाखवून विचारले, 'तुला भेटलेला बाबाजी व या तसबिरीतील बाबाजी या दोघात अंतर होते किंवा नाही ?' त्याने तसबीर नीट पाहिली व उत्तर दिले, 'केवळ कपड्याचे रंगाशिवाय मी पाहिलेला बाबाजी व या तसबिरीतील बाबाजी हुबेहुब एकसारखे आहेत. तसबिरीतील वस्त्राचा रंग काळसर असून पाहिलेले बाबाजींची वस्त्रे लालसर भगवी होती. याखेरीज दुसरे अंतर मला दिसत नाही.' हे त्यांचे भाषण ऐकून कामदार व सर्व मंडळींना स्वामिमहाराज अदृश्य रूपाने येथे आहेत असे निश्चित कळून आले.

स्वामिमहाराजांनी लोकदृष्ट्या देहाचे विसर्जन केले. वास्तविक, ते आज अमृत, अनंत, वाणी - मनास अविषय असल्याने त्याच्या लीला अगम्य आहेत. त्यांचे गुण आम्हा पामराला कळणे शक्य नाही.

सांप्रत जसेजसे स्मरण होऊन स्वामिमहाराजांच्या लीलेची आठवण झाली ती तेथे लिहिली. याशिवाय पुष्कळ चरित्रे पाहिली व ऐकण्यात आली आहेत, पण स्मरणाच्या अभावाने येथे देता आली नाहीत.

स्वामिमहाराजांनी केलेले ग्रंथ पुष्कळ आहेत त्यापैकी आज आपल्याजवळ आहेत त्यांचे नावाचा निर्देश करून हा लेख समाप्त केला आहे.

वैद्य गंगाधर अण्णाजी वैद्य
महंमदपुरकर
मु.पो. निसरपुर, जि. धार (म.प्र.)

गेल्या १०-१२ वर्षांमध्ये प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी-महाराजांनी रचिलेल्या बहुतेक ग्रंथांच्या रचनांच्या शतकपूर्तीचा योग आला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या शिष्यपरंपरेतील प्रमुख शिष्यांना प्राप्त झालेल्या दीक्षाअनुग्रहाचीही शताब्दी संपन्न झाली आहे. त्यापैकी पू.श्री शंकरकाका आजेगावकर, योगिराज प.पू. श्रीगुळवणी महाराजांच्या मातोश्री पू. उमामाता, भगिनी गोदुताई व स्वत: श्रीवामनरावजींना इ.स. १९०९ (शके १८३१) च्या अनंतचतुर्दशीस सीमोल्लंघनाआधीच्या दिवशी मंत्रदीक्षा व श्रीस्वामींच्या पवनी चातुर्मासाचा शताब्दी सोहळा सन २००९मध्ये पवनीकर भक्तमंडळींनी केला. पुढच्याच वर्षी(शके १९३२) सन २०१० मध्ये प. पू. गुरुमहाराजांना आर्ततेने खडतर पायी प्रवासा-नंतर हावनूरला घडलेल्या श्रीगुरुभेट श्रीस्वामींच्या हृदयस्थ दिव्य श्रीदत्त-दर्शन साक्षात्कार प्रसंगाची शतकपूर्ति श्रावण शुक्ल अष्टमीस हावनूरकर व पुणे-मुंबईच्या गुरुभक्तांनी साजरी केली. हावनूरला तुंगा व भदा तसेच नजीकच्या श्री गर्गमुनींचे तपस्थान श्रीगळगनाथ (गर्गनाथचा अपभ्रंश) ला अन्य ५ नद्या असे स्थानमाहात्म्य आहे. अशा पवित्रस्थळी केवळ वर्षापूर्वी अनुग्रह दिलेल्या शिष्याला श्रीदत्तदर्शन स्वहृदयी करविणे या घटनेमध्ये त्या शिष्याची गुरुनिष्ठा व श्रीस्वामींचे अलौकिक सामर्थ्याची प्रचीती येते. ज्याप्रमाणे रेवा (श्रीनर्मदा) तीर हे योगी तपस्व्यांचे तपस्थान आहे. तद्वतच दक्षिणेकडील श्रीकृष्णागोदादि पवित्र नद्या व त्यांचे तीरावरील अनेक क्षेत्रेही पूर्वसुरींची श्रेष्ठस्थाने आहेत. अशा हावनूर क्षेत्रात श्रीस्वामींचा चातुर्मास मुक्काम होणे व शिष्यास दत्तदर्शन घडणे यात शिष्य कसोटीत खरा ठरणे व श्रीगुरुंचे दत्तावतारित्व सिद्ध झाले. त्या हावनूरमध्ये ७-८ घरे जोग आडनावाची असून त्या सर्व घरी श्रीस्वामींनी क्रमाक्रमाने माधुकरी भिक्षा घेतल्याची माहिती त्या घरातील वृद्धवर्गाकडून समजली. त्यांच्या मते इतरत्र कुठेही असा दिव्य साक्षात्कार न घडल्याने त्यांचे गाव विशेष ईश्वरी अधिष्ठान आहे.

तिथे श्रीस्वामींच्या शास्त्रनिष्ठेचा विशेष पैलू समजला तो असा... 'सामान्यत: सर्वजण मनुष्यांचे सोहरे (जनन अशौच) पाळतात. तत्रापि ज्या घरी मांजर वगैरे पाळीव प्राणी व्यायले असेल त्या घरीही स्वामीजी भिक्षेला जात नसत. ही पराकोटीची शास्त्रनिष्ठा ! इथेच एका मूक मुलास त्या चातुर्मासात 'श्रीं' कडून वाचाप्राप्ती झाली होती.'

श्रीगुरुदेवचरित्र (१० वी आवृत्ती)

शुद्धीपत्र

पान नंबर	ओळ क्रमांक	मूळ मजकूर	शुध्द मजकूर
३४	६	पंचकव्य.....	पंचगव्य
३४	१३	प्रासादशुद्धी.....	प्रसादशुद्धी
६२	१८	निर्मानमोहा जितसंगदोषाः	निर्माणमोहा जितसंगदोषाः
६३	१०	श्रीगोविंदस्वामीने.....	श्रीगोविंदस्वामींनी
६३	१२	घेण्याची.....	घेण्याचे
६७	१	शु.१२(११निर्जला).....	शु.१२ ला (११ निर्जला)- एकादशी असते.
६८	६	देवयोगाने.....	दैवयोगाने
८०	६	तो बरा.....	ती बरी
९७	११	दत्तलीला मृतसिंधु.....	दत्तलीलामृतसिंधु
१३२	२८	गुंडभट खोबारे.....	गुंडोभट खोंबारे
१३३	२	गुंडभटजीच्या.....	गुंडोभटजींच्या
१६७	१	खोबरे.....	खोंबारे
२४८	२१	मौजही.....	मुंजही
२५०	१३	वठार.....	वाठार
२५३	२३	धनासंबंधी.....	घनासंबंधी
२७५	१०	चाळीस गावाजवळ.....	चाळीसगावाजवळ
२९७	१	पदवारीधारा । धृवो सदा...	पदवारीधारा । धुवो सदा
३१३	१२	स्वामीमहाराजांनी लगचा...	स्वामीमहाराजांनी लग्नाचा

ग्रामदेवी यक्षिणी माता, माणगांव

श्रींचे जन्मघर
पुनर्रचित वास्तु, माणगांव



श्री दत्त मंदिर गाभारा, गरुडेश्वर



समाधी मंदिर, गरुडेश्वर

समाधी मंदिर गाभारा, गरुडेश्वर

समाधी स्थळी चरण पादुका मंदिर,
गरुडेश्वर